अरुंधती रॉय

द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज

अनुवाद : अपर्णा वेलणकर

मेहता पब्लिशिंग हाऊस

अरुंधती रॉय

जन्म : २४ नोव्हेंबर, १९६१

अरूंधती रॉय यांचा जन्म मेघालयातील शिलॉंग येथे झाला, त्या प्रख्यात कादंबरीकार आहेत. 'द गॉड स्मॉल थिंग्ज' या कादंबरीसाठी १९९७ मध्ये त्यांना बुकर पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या नावावर दोन पटकथा आणि अनेक निबंध संग्रह रूजू आहेत. त्यांचे सामाजिक राजकीय आणि पर्यावरणविषयक लेखन समाज-संवेदनशील असल्याने ते अनेकदा वादाच्या भोवऱ्यात सापडलेले दिसते.

अरूंधती रॉय यांची आई मेरी रॉय केरळी ख्रिश्चन होती, तसेच भारतीय स्त्री हक्काच्या चळवळीतील आघाडीची कार्यकर्ती होती. त्यांचे वडील रणजित रॉय बंगाली आणि हिंदू होते. त्यांचे चहाचे मळे होते. अरूंधती रॉय यांचे बालपण मुख्यत: केरळ आणि तामिळनाडूमध्ये गेले, त्यानंतर त्यांनी दिल्लीहून वास्तुरचना शास्त्राची पदवी प्राप्त केली. 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या कादंबरीच्या प्रचंड यशानंतर त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. तोवर त्यांनी पंचतारांकित हॉटेल्समध्ये एरोबिक्स शिकवण्यापासून अनेक लहान-मोठ्या प्रकारची कामे केलेली दिसतात. आता त्या दिल्लीत स्थायिक झालेल्या आहेत.

लक्षणीय पुरस्कार : मॅन बुकर पुरस्कार (१९९७)
सिडनी पीस पुरस्कार (२००४)

Arundhati Roy

अरुंधती रॉय
प्रशिक्षित वास्तुरचनाकार
'प्रॉडक्शन डिझायनर' म्हणून काम.
दोन चित्रपटांसाठी पटकथा लेखन.
दिल्लीमध्ये वास्तव्य.
द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज
ही त्यांची पहिली साहित्यकृती आहे.

"स्वत:च निर्माण केलेल्या उत्तुंग अपेक्षांना आणि
कसोट्यांना उतरणारी अद्वितीय साहित्यकृती"

– 'बुकर पुरस्कारा'चे मानपत्र
१४ ऑक्टोबर, १९९७

या पुस्तकाच्या उत्कृष्ट अनुवादाबद्दल
अनुवादिका श्रीमती अपर्णा वेलणकर
यांना अत्यंत प्रतिष्ठेचा
साहित्य अकादमी पुरस्कार, २००४ प्राप्त.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील बेस्टसेलर

एक अद्‌भुत कलाकृती... अद्वितीय!

– हार्पर्स अॅन्ड क्वीन

लिहिलेल्या शब्दावर केंद्रित होणाऱ्या सर्व जाणिवांना विलक्षण सुख देणारे लेखन.

– न्यूजवीक

अत्यंत कसबीपणाने तपशिलाच्या धाग्याधाग्यांनी गुंफलेली, नाजूकपणाने, हसत-खेळत सांगितलेली शोकान्तिका

– द पायोनिअर

जात, धर्म, भाषा आणि राष्ट्रीयत्वाची सगळी बंधने ओलांडून निखळ मानवतेचा इतका प्रगल्भ आविष्कार करणारी कलाकृती एखादीच!

– डेली टेलिग्राफ

सशक्त कथाबीजाचा आत्मविश्वास भिनलेल्या महत्त्वाकांक्षी लेखकाने स्वत:ची स्वतंत्र वाट शोधली पाहिजे. स्वत:साठी स्वतंत्र भाषा घडवली पाहिजे. या कादंबरीने ही दोन्ही आव्हाने यशस्वीपणाने पेलली आहेत.

– जॉन युपडाईक,
द न्यू यॉर्कर

समीक्षकांच्या नजरेतून...

भारतीय

अपार यातनांनी भरलेल्या बालपणातली गमतीजमतीची जादुई दुनिया उभी करता-करता अरुंधती रॉय यांनी भाषा आणि कल्पनाशक्ती यांचा अद्‌भुत विस्तार घडवला आहे. त्यांच्या साध्या अनलंकृत शैलीतला थेट, तीक्ष्ण बोचरेपणा घायाळ करतो.

– मारिया कोऊटो,
फ्रन्टलाईन

पहिल्याच कलाकृतीमध्ये भावभावनांच्या इतक्या विस्तीर्ण आणि गहन विश्वाला इतक्या सहजपणाने कवेत घेणे, हे खरोखरीच असामान्य आहे. वाचकांच्या सर्व संवेदनांना आवाहन करणाऱ्या, कथानकाचे सूक्ष्मातिसूक्ष्म तपशील खुबीने एकत्र गुंफणाऱ्या या लेखनाला एका अदृश्य मानसिक ताणाचे अस्तर आहे. उत्तरार्धात अधिकच तीव्र होणारा हा ताण थरारून टाकणाऱ्या रहस्यमय कलाकृतीचा अनुभव देतो.

– सुनील सेठी,
आऊटलुक

पृथ्वीच्या गर्भातून उमटणारे साद-प्रतिसाद, ध्वनी-प्रतिध्वनी, अश्रू आणि हुंदके... 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'चे प्राणतत्त्वच आहे. त्याहूनही महत्त्वाचे आहे ते या कलाकृतीमागचे बौद्धिक धाडस. ही केवळ एक अद्वितीय कादंबरी नव्हे, मानवी अस्तित्वाला घेरून असणारी आदिम भीती आणि नियतीच्या पाशामधली अपरिहार्यता यांचे वेढे उलगडून पाहाण्याचा हा प्रयत्न आहे... अद्वितीय!

– राजगोपाल नीदाम्बूर,
संडे ऑब्झर्व्हर

भूतकाळ आणि वर्तमानाचे चक्र सतत फिरते ठेवून, विलक्षण प्रतिभासामर्थ्याने त्यातले ताणेबाणे विणत-विणत अतिशय गुंतागुंतीचे गहन कथानक अरुंधती रॉय यांनी आपल्या कथनशैलीतून बांधले आहे. अपरिमित प्रेम, द्वेष, मत्सर, विश्वासघात, तीव्र तिरस्कार आणि अपराधीपणाचा डंख अशा अनेक भावभावनांचे पदर कोळ्याच्या जाळ्यासारखे धावत राहतात... विणले जातात.

एक अत्यंत उल्लेखनीय कलाकृती.

– सुप्रिया चौधरी, एशियन एज

ब्रिटिश

बुद्धी आणि भावना यांना एकाच वेळी आवाहन करण्याची, दोन्ही संवेदनांना एकाच वेळी परमोच्च सुख देण्याची क्षमता हे 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'चे वैशिष्ट्य आहे. बुद्धिमानतेने गुंफलेले गुंतागुंतीचे कथानक ओठावर हसू आणते... आणि अखेरीस डोळ्यातले अश्रू गोठून जावेत असा सुन्न करणारा अनुभव देते. अत्युत्कृष्ट आणि असामान्य कादंबरी.

– विल्यम डेलरीम्पल,
हार्पर्स अॅन्ड क्वीन

जाणिवांना संमोहन घालणारा प्रारंभ वाचतानाच लक्षात येते की, नवीन काहीतरी सांगणाऱ्या एका ताज्यातवान्या प्रतिभेने आपल्या मनाची पकड घेतली आहे... श्वास रोखून धरायला लावणारा नवा स्वर! 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'ने अपरिहार्य शोकान्तिकेचा अनाहत नाद अचूक गाठला आहे... एक अद्वितीय साहित्यकृती.

– ख्रिस्टीना पॅटर्सन,
ऑब्झर्व्हर

थक्क करून टाकणारी भावभावनांची विविधता आणि विपुल शब्दसामर्थ्याचा प्रत्यय देणारी, अत्यंत कसबीपणाने विणलेली गूढ, गहन साहित्यकृती.

– फिलीप झीगलर,
डेली टेलिग्राफ

विलक्षण आत्मविश्वासाने लिहिलेली गूढ आणि थरारक कादंबरी.

– इयान जॅक,
इन्डिपेन्डन्ट ऑन सन्डे

आधुनिकतेच्या पार्श्वभूमीवर घडणारे 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' हे एक प्राचीन महानाट्य आहे. केरळमधल्या बोलीभाषा आणि गुंतागुंतीच्या इतिहासाचे चक्र अलगद फिरवताना या महानाट्यात हसू फुटले आहे, भावभावनांचे धागे उलगडले आहेत. बुद्धीचा कस पाहणारे हे आव्हान समर्थपणे पेलणाऱ्या अरुंधती रॉय समकालीन भारतीय साहित्याच्या समृद्धतेचे निशाण घेऊन सामोऱ्या आल्या आहेत.

– बॉयड् टॉनकीन,
इन्डिपेन्डन्ट

अमेरिकन

या कथानकाच्या शब्दाशब्दांत गुंफलेली वेधक जादू, गूढ रहस्य आणि काळीज हलवून टाकणारी खिन्नता हे सारेच इतके अजब चेटूक आहे, की शेवटचे पान संपवताक्षणीच वाचक पुन्हा पहिले पान उघडतो. ते सारे पुन्हा पुन्हा वाचावे, अनुभवावेसे वाटते. झपाटलेपणाचा अविस्मरणीय अनुभव देणारी कलाकृती.

– डीयड्रे डॉनहॉ,
युसए टुडे

अरुंधती रॉय यांची कथनशैली अतीव असामान्य आहे. त्यामधले अपार परिश्रम आणि पारदर्शी कल्पनाशक्तीचा अतिशय लवचीक असा पोत... हे सारेच अखेरपर्यंत वाचकाचे मन वेधून घेते. पहिलेपणाच्या सार्‌या मर्यादा ओलांडून जाणारी सुंदर कादंबरी.

– अॅलीस ट्रक्स,
न्यूयॉर्क टाईम्स बुक रिव्ह्यू.

या पहिल्या-वहिल्या कादंबरीचे अखेरचे पान उलटले; तरी त्यातून सुटता येत नाही, स्वत:ला अलग करता येत नाही. लोणच्यामध्ये खारवलेल्या आंब्याचा आणि जॅममधल्या पिकल्या केळयांचा वास येत राहतो... मामाच्या गाडीत बसून एका अपरिहार्य शोकान्तिकेकडे प्रवास करणार्‌या मुलांची गाणी ऐकू येतात. अखेरचा शब्द वाचेपर्यंत अनेक गोष्टींची संगती लागता लागत नाही... त्यामुळे तिथवर पोचता-पोचता चित्रदर्शी कथनशैलीतून उलगडत जाणारी शोकान्तिका आणि त्यातून ठिबकणारा शोक हे सारे इतके आपले होत जाते, की सारे काही समजण्यापूर्वीच जीवाला या शोकान्तिकेचा चटका लागतो. एक अद्वितीय कादंबरी.

– लॉरा शॅपीयरो,
न्यूजवीक

द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज

मूळ लेखिका
अरुंधती रॉय

अनुवाद
अपर्णा वेलणकर

मेहता पब्लिशिंग हाऊस

THE GOD OF SMALL THINGS by AURNDHATI ROY
Copyright © Arundhati Roy
Originally Published by India Ink Publishing Co. Pvt. Ltd.,
New Delhi.
द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज / अनुवादित कादंबरी
अनुवाद : अपर्णा वेलणकर, 'झेनिथ', पाम स्प्रिंग्ज, वीर सावरकर नगर, गंगापूर रोड, नाशिक – ४२२०१३. E-mail : aparnavelankar@gmail.com
मराठी अनुवादाचे व प्रकाशनाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
प्रकाशक : सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिंशिग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे - ३०.
अक्षरजुळणी : स्वाती एंटरप्रायझेस, पुणे - ९.
मुद्रक : रेप्रो इंडिया लि., मराठे उद्योग भवन, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४०००२५.
मुखपृष्ठ : मेहता पब्लिशिंग हाऊस
प्रकाशनकाल : नोव्हेंबर, २००१ / सप्टेंबर, २००४ / नोव्हेंबर, २००७ / जुलै, २००९ / जुलै, २०११ / एप्रिल, २०१२ ऑक्टोबर, २०१३ / पुनर्मुद्रण : जानेवारी, २०१७
िंकमत : ` ३९५
P Book ISBN 9788177662535
E Books available on :
play.google.com/store/books
m.dailyhunt.in/Ebooks/marathi
www.amazon.in

• हे कथानक, यातील व्यक्तिरेखा संपूर्णपणे काल्पनिक आहेत. भौगोलिक सरहद्द, नद्या, रेल्वे क्रॉसिंग, चर्च आणि दहनभूमी इ. तपशिलाबाबत स्वातंत्र्य घेतलेले आहे.

मेरी रॉयला अर्पण

तिनंच मला वाढवलं.
चारचौघांत बोलत असताना तिला अडवण्यापूर्वी

‘एक्सक्यूज मी’ म्हणायला शिकवलं.
प्रेम केलं माझ्यावर.
जीव लावला... इतका, की
मोकळा श्वास घ्यायला मी निघाले,
तेव्हा मला जाऊ दिलं...

आणि एल. के. सी.
माझ्यासारखाच एक जीव.
तग धरून राहिला.
अखेर वाचला
त्याला...

कृतज्ञता

माझा अत्यंत कठोर समीक्षक, जिवलग मित्र आणि प्रियकर
प्रदीप कृष्णन... तू नसतास, तर या लेखनाला हे रूप लाभलंच नसतं.
पिया आणि मितवा, तुम्ही माझ्या आहात म्हणून...
आराधना, अर्जुन, बेटी, चंदू, कार्लो, गोलॅक, इंदू, जोआना, नाहीद, फिलीप, संजू, वीणा आणि विवेक.
हे पुस्तक लिहितानाची वर्षं तुमच्या आधारानेच सुखाची गेली, म्हणून... पंकज मिश्रा,
या पुस्तकाला जागतिक प्रवासाची दिशा दाखवलीत, म्हणून...
आलोक राय आणि शोमित मित्तर,
कुणाही लेखकाने जीव टाकावा असे तुम्ही वाचक आहात, म्हणून...
डेव्हिड गॉडवीन - 'प्लाईंग एजंट', मित्र आणि मार्गदर्शक,
तातडीने विमान गाठून भारतात येऊन मला भेटलात, म्हणून...
नीलू, सुषमा आणि कृष्णन,
माझा उत्साह टिकवलात, मनोधैर्य वाढवलंत आणि कामातून जाणारे
गुडघे ठीकठाक ठेवलेत, म्हणून...
आणि अखेरीस
दादा-दादी,
तुम्ही दिलेला अखंड आधार आणि अपरिमित प्रेमासाठी...
थँक यू!

मनोगत

अनुवादासाठी हे पुस्तक हाती आलं, तेव्हा त्यातल्या गूढ, गहन आशयाला आणि रूढ चौकटी मोडून स्वत:ची नवी वाट शोधणाऱ्या प्रज्ञावंत भाषेला हात लावण्याचा धीर होईना.

इंग्रजीच्या नामवंत प्राध्यापकांशी, समीक्षकांशी चर्चेचा प्रयत्न केला, तेव्हा सर्वांनी माझा धीर आणखीनच खचवला. शैलीविज्ञानाच्या किचकट काट्याकुट्यांत नेऊन माझ्यासमोरचं अरण्य अधिकच घनदाट केलं. संपन्न, समृद्ध आणि अनवट भाषेची गुंतागुंत भेदून कथानकाच्या आत्म्याशी पोहोचण्यासाठी चाललेले माझे प्रयत्न या चर्चांमधून चौफेर भरकटत राहिले. परस्परविरोधी निरीक्षणं, एकमेकांना खोडून काढणारे निष्कर्ष, अरुंधती रॉय यांना 'काय म्हणायचं आहे' यापेक्षा त्यांनी ते 'कसं म्हटलं आहे,' यावरच केंद्रित होणारे वाद आणि या सगळ्याला पुरून उरणारी 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'च्या शैलीविज्ञानाची चिकित्सा... ही प्रक्रिया दीर्घकाळ चालली. अशा श्रेष्ठ कलाकृतीला 'हात लावणं' म्हणजे भलतं दुष्कर कर्म आहे, असाच या साऱ्याचा निष्कर्ष होता.

या पार्श्वभूमीवर मी हे धाडस केलं, याचं संपूर्ण श्रेय माझे गुरू ज्येष्ठ पत्रकार-संपादक दत्ता सराफ आणि इंग्रजीचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. बी. एस. वाळके यांचं!

'अख्खं गणित एकदम सुटेल, या कादंबरीच्या प्राणतत्त्वाचं रहस्य, तिच्या भाषेमधली अंतर्गत वीण हे सारं एका क्षणात उलगडेल, असा भ्रम न बाळगता प्रारंभ कर. हलके हलके तुला तुझा रस्ता सापडेल, तो शोध. आयत्या दिशादर्शकांवर विसंबू नकोस,' असा मोलाचा सल्ला डॉ. वाळके यांनी दिला आणि मी पहिलं पाऊल उचललं.

प्राचीन काळी गुरुकुलात वाढणाऱ्या शिष्याला अरण्यवाचनासाठी धाडलं जाई. भविष्यातल्या वाटचालीतले खाचखळगे सोसण्यासाठी, अनपेक्षित संकटांचा आणि आव्हानांचा सामना करण्यासाठी त्याने आपले-आपले आडाखे बांधावेत, धैर्य कमवावं म्हणून गुरुजन आपल्या शिष्यांना हे 'अरण्यदिव्य' करायला लावत. माझे गुरू दत्ता सराफ यांनी त्याच उद्देशानं मला 'या अरण्यात' धाडलं असावं. त्यातून बाहेर पडताना मी खूपच कमावलं आहे.

दोन स्वतंत्र, संपन्न भाषांमधल्या मनोज्ञ संवादाचे सेतू उभारणाऱ्या या प्रवासात डॉ. म. बा. कुलकर्णी यांचं मार्गदर्शन आणि प्रा. लीना पांढरे यांची साथ लाभली.

'आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभलेल्या या पुस्तकाचा अनुवाद मी उत्तम करू शकेन, म्हणून तो मीच करावा,' असा विश्वास देऊन सर्वप्रथम आग्रह धरणारे अनिल मेहता आणि माझ्या हस्तलिखिताची प्रतीक्षा करणारे सुनील मेहता यांनी या अरण्यातून मला मनसोक्त भटकू दिलं.

सर्वांचे आभार.

अनुवादासाठी एकेक वाक्य अलग करता येईल, अशी शक्यताच या लेखनात अरुंधती रॉय यांनी शिल्लक ठेवलेली नाही. या कथानकातला हरेक संदर्भ गर्भाच्या नाळेसारखा आतून एकमेकांशी जोडलेला आहे. शब्दकोशापल्याडचे अर्थ घेऊन शब्द येतात आणि त्यांची घट्ट वीण घालणाऱ्या वाक्याचं चेटूक अधिकच गहिरं होत जातं. या अनवट कथनशैलीला धक्का लागू नये असं वाटत होतं, म्हणून 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' वाचता-वाचता माझ्या मनात ज्या प्रतिमा उमटत गेल्या, त्यांना मी नव्या भाषेचं शब्दरूप दिलं आहे. मूळ आशयाच्या अधिकाधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करणारा हा अनुवाद कोणत्याच अर्थाने शब्दश: नाही.

अनुवादाच्या प्रक्रियेचे समीक्षक या लेखनाची कशी चिकित्सा करतील सांगता येत नाही; पण अनुवादाचा एक नवाच आणि अधिक आनंददायी आविष्कार या निमित्ताने मी अनुभवला आहे, एवढं नमूद करते.

– अपर्णा वेलणकर

यानंतर अशी कथा जणू
पुन्हा सांगितलीच जाणार नाही.
हीच पहिली.
...आणि एकमेव.

– जॉन बर्जर

अनुक्रम

१. पॅराडाईज् पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्
२. पाप्पाचींचा ‘पतंग’
३. बडा आदमी लालटेन साहिब, छोटा आदमी मोमबत्ती
४. अभिलाष टॉकीज्
५. ‘गॉडस् ओन कंट्री’
६. कोचिन कांगारू
७. ‘विझ्डम एक्सरसाइझ् नोटबुक्स’
८. ‘वेलकम होम, अवर सोफी मॉल’
९. सौ. पिल्लई, सौ. इपेन आणि सौ. राजगोपालन
१०. नदी... होडीच्या गर्भातली!
११. द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज
१२. कोचु थोम्बन
१३. आशा... निराशा
१४. काम हाच संघर्ष
१५. नदी पार...
१६. काही तासांनंतर...
१७. कोचीन हार्बर टर्मिनस
१८. द हिस्टरी हाऊस
१९. अम्मूला वाचवताना...
२०. मद्रास मेल
२१. जगण्याचं मोल

All rights reserved along with e-books & layout. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, without the prior written consent of the publisher and the licence holder. please contact us at Mehta Publishing House, 1941, Madiwale Colony, Sadashiv Peth, Pune 411030.

✆ +91 020-24476924 / 24460313

Email :

info@mehtapublishinghouse.com

production@mehtapublishinghouse.com

sales@mehtapublishinghouse.com

Website :

www.mehtapublishinghouse.com

• या पुस्तकातील लेखकाची मते, घटना, वर्णने ही त्या लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

प्रकरण १

पॅराडाईज् पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्

आयमेनेममधला मे महिना म्हणजे जिवाची उलघाल... काहिली! लांबलचक पसरलेले, सुस्त, आळसावलेले दिवस... कोरड्याठाक पडलेल्या नदीपात्राच्या काठानं उडणारी उष्ण धूळ... डेरेदार आम्रवृक्षांच्या हिरव्यागार कुशीत लपून घमघमत्या आंब्यांवर तुटून पडणारे कावळे... पिकून उललेली लाल केळी... झाडावरच फुटलेले पिवळेधम्म फणस... आणि उन्हाच्या झळांनी रणरणत्या हवेत दरवळणारा गोडूस वास... या वासाचा मार्ग काढत माश्यांचे थवे घोंघावत येत. कसल्यातरी विचित्र धुंदीत असल्यासारख्या या माश्या खिडक्यांच्या तावदानांवर आपटत आणि रणरणत्या उन्हात जीवघेण्या गिरक्यांचा आकांत मांडून तडफडत मरून जात.

निरभ्र, मोकळ्या आकाशाच्या कुशीत मे महिन्यातल्या रात्री... सुस्त, आळसावलेल्या, अधुरेपणाचा शाप असलेल्या दुर्मुखल्या स्वप्नांसारख्या!

...पण जून महिना येई, तोच मुळी उसळत्या पावसाचं धसमुसळं तुफान घेऊन!... नंतरचे तीन महिने वारा-वादळ आणि बरसत्या पावसाची नुसती धुम्मस! ओथंबलेल्या आकाशात घेरून आलेले काळेभोर ढग थोडेसे उसवले, तरच सूर्य दिसणार! मधूनच असं लखलखीत ऊन पडलं, की पावसापाण्यानं गारठलेली मुलं घराबाहेर धूम ठोकीत... ओल्याचिप्प अंगणात मग धसमुसळे खेळ रंगत... एकच गलका उठे!

...आयमेनेममध्ये मृगाचा पाऊस असा सरीसरींनी धावत आला की आजूबाजूची खेडी हिरवीकंच होऊन जात. मूळ धरून रसरसलेल्या टॉपिओकाच्या वेली गर्भारशा दिसत. शेवाळयानं झाकून गेलेल्या विटांच्या भिंती... विजेच्या खांबांना कवटाळून सरसरत वर झेपावणारे मिरवेल... सैरावैरा धावणाऱ्या पाणलोटांच्या जबरदस्त मुसंडीनं धुपून गेलेले लाल मातीचे रस्ते... कुठून कुठून वाहून आलेल्या राक्षसी रानवेलींचं अस्ताव्यस्त जंजाळ... पावसाने असा आकांत मांडला, की घराबाहेर पडून बाजारात जायचं, तरी उफाळत्या पाण्यात होडी लोटावी लागे... काळ्या कुळकुळीत डांबरी रस्त्यांवर पडलेले खड्डे गढूळ पाण्यानं भरून जात आणि नदीतून वाहून आलेले छोटेछोटे मासे या खड्ड्यांमध्ये मजेत बागडताना दिसत.

राहेल आयमेनेममध्ये परत आली, तेव्हा पावसानं अखंड झड धरली होती. आकाशातून पृथ्वीवर अग्निलोळांचा वर्षाव चालू असावा, तसा विजांचा कडकडाट... लखलखत्या तलवारीचं जीवघेणं पातं फिरावं तशा आकाशभर धावणाऱ्या अग्निरेखा... अशा कल्लोळात राहेल परतली. टेकडीवरचं तिचं जुनं घर पावसानं काकडून गेलं होतं. एखादी जुनी हॅट कानांवरून मानेपर्यंत ओढून घ्यावी, तसं डोक्यावरचं छप्पर ओढून

घराचा डोलारा उभा होता. हिरव्यागार शेवाळयानं भरून गेलेल्या भिंतींना ओल आली होती. जमिनीतून झिरपलेलं पाणी चहूदिशांनी पसरत चाललं होतं. त्या जुन्या घराचा जीर्ण डोलारा सावरणाऱ्या भिंतींच्या ढासळत्या मजबुतीवर मऊसर, कोंदट ओल चढत चालली होती. बेलगाम वाढलेल्या जंगली झाडोऱ्याचं तण माजलेल्या बागेत छोट्या-मोठ्या जिवांची खुसफूस सुरू झाली होती. बागेतल्या एका कोपऱ्यात ओलसर चमकत्या दगडाभोवती वेटोळं घालून सुस्त पडलेला साप... लालभडक गढूळ पाण्याच्या डबक्यात जोडीदाराच्या शोधात भटकणारे, संभोगासाठी आक्रोश करणारे पिवळे बेडूक... बागेतून घराकडे येणाऱ्या, कुजलेल्या पाल्यापाचोळयाच्या ढिगाने झाकलेल्या छोट्या रस्त्यावर मधूनच दिसणारं ओलंचिंब, निथळत्या अंगाचं मुंगूस...

...घरही रिकामं, भकास! कडीकोयंडे लावून बंद केलेली दारं... भिंतीच्या कचाट्यातून निखळत चाललेल्या खिडक्या... आणि ओकाबोका, उदास व्हरांडा...! पण फिकट निळया, आकाशी रंगाची प्लायमाऊथ मात्र अजूनही पुढच्या दारी उभी होती... आणि त्या उदासवाण्या घराच्या एका कोपऱ्यातली बेबी कोचम्मा... तीही अजून जिवंत होती!

बेबी कोचम्मा... राहेलची आत्या-आजी, तिच्या आजोबांची धाकटी बहीण! खरं म्हणजे तिचं नाव होतं नवोमी... नवोमी आयपे! पण सगळे जण तिला बेबी कोचम्माच म्हणत. अगदी आत्याबाई, मावशीबाई व्हायच्या वयात 'बेबी' हे संबोधन तिच्या नावामागं चिकटलं, ते चिकटलंच. अर्थात, राहेल आयमेनेममध्ये आली, ती आपल्या आत्याला भेटायला नव्हे!... आत्याही काही तिच्या वाटेकडे डोळे लावून बसलेली नव्हती. भर पावसात राहेल धडपडत आली होती, तिच्या भावाला भेटायला.

– इस्था!

– राहेलचा जुळा भाऊ.

स्वतंत्र्य अस्तित्व असलेली, स्वतंत्र बीजांमधून जन्मलेली; तरीही एकाच नाळेची, पाठीला पाठ लावून आलेली जुळी भावंडं! इस्था... इस्थापन राहेलपेक्षा फक्त अठरा मिनिटांनी मोठा होता.

जुळी भावंडं खरी... पण इस्था आणि राहेल कधीच एकमेकांसारखे दिसले नाहीत. अगदी काटकुळया अंगाची, सपाट छाती-पोटाची शाळकरी पोरं असतानाही इस्था आणि राहेलनं कधी कुणाला बुचकळयात टाकलं नाही. इस्था कोण आणि राहेल कोणती? – असा प्रश्नच कधी कुणाला पडला नाही. एरवी जगभरातल्या जुळया भावंडांच्या हुबेहूब सारखेपणाला फसून मग उगीचच दात काढणारे नातेवाईक, देणगी मागण्यासाठी आयमेनेममधल्या घरी येणारे सनातनी सीरियन धर्मोपदेशक... यांतलं कुणीच कधी इस्था-राहेलच्या जुळेपणाला फसलं नाही.

...तरीही पेच होताच!

पण तो फार खोलवर... अगदी रक्तात भिनलेला... इस्था आणि राहेल यांच्या अस्तित्वाशीच जखडलेला!

या अजोड नात्याची वीण घालणारे सुरुवातीचे दिवस... तेव्हा तर सगळंच नवंकोरं, ताजंतवानं होतं. प्रत्येक गोष्टीचा प्रारंभ फक्त दिसत होता. सगळं काही संपून जाण्याच्या, हरवण्याच्या भावनेचा स्पर्शही न झालेलं अखंड, अमर्याद आयुष्य इस्था आणि राहेलसमोर उलगडत होतं. आयुष्याभोवती वेढून असणारा 'अटळ विनाशा'चा शाप समजुतीच्या पार पलीकडं असताना वाट्याला येणारे ते कोवळे, निरभ्र दिवस! त्या काळात इस्था आणि राहेल... दोघांचं मिळून एक 'अस्तित्व' होतं; पण 'ओळख' होती, ती मात्र स्वतंत्र... वेगवेगळी. जणू सयामी जुळ्यांची एक वेगळीच निपज... दोघांची शरीरं एकमेकांपासून स्वतंत्र, अलग... तरीही 'व्यक्तित्व' मात्र एकच – अभिन्न!

एका रात्री इस्थाला काहीतरी भलतंच विनोदी स्वप्न पडलं, म्हणून अर्ध्या झोपेतून जागी होऊन खळखळून हसत सुटलेली राहेल... आता इतक्या वर्षांनी तिला आठवतंय तिचं ते हसणं.

तिच्या स्मरणातल्या अशा अनेक आठवणी... ज्या खरं म्हणजे, तिच्या नाहीत... नव्हत्याच!

जसं, की 'अभिलाष' टॉकीजमधलं ते गुपित! खरं तर, राहेल तिथं नव्हतीच त्या वेळी; पण 'ऑरेंजड्रिंक... लेमनड्रिंक'वाल्या त्या माणसानं इस्थाशी काय केलं, ते तिला पक्कं ठाऊक होतं. शिवाय ते टोमॅटो सॅण्डविच. मद्रास मेलमध्ये इस्थानं खाल्लेलं... इस्थाचं सॅण्डविच! पण राहेलच्या जिभेवर अजून रेंगाळतेय त्याची चव!

...या अगदी छोट्या गोष्टी... किरकोळच, खरं म्हणजे.

...पण आता बदललंय सगळं. 'स्वतंत्र' असूनही पूर्वीचं ते 'अभिन्न' असणं... नाही उरलं आता.

नाहीच.

दोघांच्याही वाटा सुट्या झाल्या. आयुष्यं वेगळी झाली. वेगळी होऊन अर्थपूर्ण झाली. इस्थाला आता 'त्याच्या' स्वतंत्र आयुष्याचा संदर्भ आहे आणि राहेलला 'तिच्या'...

कडा घासल्या गेल्या. कंगोरे, कोपरे तासले गेले. अमर्याद भासणाऱ्या पायांखालच्या वाटेवर अर्धविराम, पूर्णविराम साकळले... लसलसत्या रक्ताच्या थेंबासारखे! अधुऱ्या, अपुऱ्या वर्तमानाच्या लांबलचक सावल्या घेरून आल्या आणि त्या सावल्यांच्या धगीत होरपळलेल्या डोळ्यांभोवती स्वीकाराचे, समजुतीचे अर्धचंद्र साकळले.

बघता-बघता दोघांचं वय झालं –

अम्मूएवढं.

त्याच वयात मृत्युनं गाठलं होतं अम्मूला...
एकतीस वर्षं.
ना धड म्हातारपण आलेलं,
ना धड तारुण्य उरलेलं!
मधलंच काहीतरी.
कदाचित जगणं पूर्णांशानं उमलेल...
कदाचित मृत्यू झडप घालील...
काहीही... कधीही...
असं वय.

इस्था आणि राहेल... एका धावत्या बसमध्येच खरं तर जन्म व्हायचा त्यांचा, पण अगदी थोडक्यात वेळ हुकली... प्रसववेदनांनी कळवळणाऱ्या अम्मूला गाडीत घालून त्यांचे बाबा शिलाँगला निघाले होते; पण शिलाँगच्या हॉस्पिटलमध्ये पोचण्याआधीच आसाममधल्या एका रस्त्यावर त्यांची गाडी अचानक बंद पडली. चांगला लांबरुंद रस्ता... भोवती चहाचे हिरवेगार मळे. शेवटी गाडीचा नाद सोडून देत बाबांनी सार्वजनिक वाहतूक महामंडळाच्या एका बसला हात दाखवला. खचाखच भरलेल्या माणसांनी ओसंडणारी ती डुगडुगती बस कशीबशी थांबली. अडचणीत सापडलेल्या (त्यातल्या-त्यात) बड्या लोकांना दया दाखवण्याची, त्यांची कीव करण्याची संधी आमजनतेला एरवी कुठली मिळायला?... म्हणूनही असेल, किंवा कदाचित दिवस भरलेल्या अम्मूची तड लागलेली अवस्था बघूनही असेल... गाडीत कोंबलेल्या प्रवाशांनी इकडं-तिकडं सरकून बाबा आणि अम्मूला बसायला जागा करून दिली. पुढच्या अख्ख्या प्रवासात इस्था आणि राहेलचे बाबा अम्मूचं गरगरून पुढं आलेलं पोट फार हिंदकळू नये, म्हणून हातातच धरून बसले होते.

वरची ताणलेली त्वचा दुभंगेल, असा तो गर्भाचा गुब्बारा... आत इस्था आणि राहेल!

...अर्थात हे सगळं पूर्वीचं.

म्हणजे अम्मू आणि बाबांच्या घटस्फोटाआधीचं.

त्यानंतर अम्मू परत केरळात आली आणि तिथंच राहिली मग.

इस्थाला वाटे, आपला जन्म खरोखरच त्या बसमध्ये झाला असता, तर पुढचं अख्खं आयुष्य आपल्याला बसमधून फुकटात फिरता आलं असतं. हे त्याला कुणी सांगितलं, कुठून सुचलं, कोण जाणे; पण त्या जुळ्या भावंडांच्या मनात सुरुवातीची काही वर्षं तरी ही चुटपुट होतीच. आपण खरंच जन्मलो असतो त्या बसमध्ये तर? – आयुष्यभराच्या फुकट प्रवासाची संधी हातची घालवली, म्हणून बाबा आणि अम्मूबद्दल रागपण होता त्यांच्या

मनात! इस्था आणि राहेलला वाटे; त्या दोघांनी फसवलं आपल्याला... फसवलंच!

रस्त्यावर आखलेल्या झेब्रा क्रॉसिंगच्या पट्ट्यांवर आपण मेलो एखाद्या वाहनाखाली चिरडून; तर आपल्या अंत्यसंस्काराचा सगळा खर्च सरकारच्या तिजोरीतून होतो, अशीही इस्था आणि राहेलची समजूत होती... अगदी ठाम! खरं म्हणजे, झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे सरकारनं त्यासाठीच रंगवलेले असतात, असं त्यांना वाटे.

झेब्रा क्रॉसिंगवर मृत्यू...

...म्हणजे फुकट अंत्यसंस्कार!

तरी बरं; आयमेनेमच्या रस्त्यांवर असं फुकटात मरण्यासाठी झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे नव्हते... जवळच्या कोट्टायम शहरातही नव्हते... पण आयमेनेमपासून दोन तासांवर असलेल्या कोचिनला इस्था आणि राहेल गेले, तेव्हा गाडीच्या खिडकीतून बघितलेले रस्ते... आणि त्यांवरचे ते पट्टे... तेवढंच काय ते! पण इस्था आणि राहेलच्या सगळं अगदी पक्कं लक्षात होतं...!

सोफी मॉलच्या अंत्यसंस्कारासाठी सरकारनं एक फुटकी कवडी दिली नाही... अर्थात ती काही झेब्रा क्रॉसिंगवर नव्हती मेली!

नवा रंग लावलेल्या आयमेनेमच्या जुन्या चर्चमध्येच झालं सगळं...

सोफी मॉल... इस्था आणि राहेलची मामेबहीण. त्यांच्या मामाची – चाकोची – मुलगी. सोफी इंग्लंडमधून आली होती सगळ्यांना भेटायला... पण गेली, ती गेलीच!... तेव्हा इस्था आणि राहेल होते सात वर्षांचे; आणि मृत्यूच्या कुशीत शिरलेली सोफी जेमतेम नऊ वर्षांची! तिच्यासाठी खास शवपेटी बनवली होती... छोट्या, सुबक आकाराची!

रेशमी रिबिनींनी सजवलेली.

चमकती पितळी मूठ असलेली.

त्या शवपेटीत शांतपणाने पहुडलेली सोफी मॉल... चुरगळल्या घड्यांची पिवळी बेलबॉटम, केसांभोवती गुंडाळलेली रिबन आणि एका कडेला तिचा जीव की प्राण असलेली ती गो-गो बॅग... मेड इन इंग्लंड! सोफीचा पांढुरका चेहरा अगदीच निस्तेज, फिका पडत चालला होता. पुष्कळ वेळ पाण्यात कपडे चुबकल्यानंतर धोब्याच्या हाताची बोटं आकसून जावीत, तशा आक्रसल्या सुरकुत्या तिच्या चेहऱ्यावर उमटू लागल्या होत्या. अखेरच्या प्रार्थनेसाठी जमलेले आप्त आणि खिन्न उदास वासाचं ते पिवळं चर्च... शोकगीतांचे करुण स्वर दाटून आलेल्या कंठात घुसमटून अधिकच दुखरे व्हावेत, तशी एक विचित्र विस्कट सगळीकडे नुसती कोंडून राहिली होती. कुरळ्या-दाढीवाल्या धर्मोपदेशकांनी सोफी मॉलसाठी जिकडंतिकडं धूपदाण्या मांडल्या आणि भरपूर धूप

जाळला... पण तिच्या धुरकटल्या चेहऱ्याकडं त्यांनी क्षणभर प्रेमानं पाहिलंसुद्धा नाही. ऐन रविवारच्या एकमेव सुटीचा मुहूर्त गाठून अखेरचा श्वास घेणाऱ्या मुलांच्या नशिबी नाहीतरी नसतातच असे प्रेमळ कटाक्ष!

चर्चमध्ये लावलेल्या उंच मेणबत्त्या हळूहळू वाकल्या, विझल्या. छोट्या मात्र अजूनही ताठ उभ्या होत्या... मेणबत्त्या!

कुणीतरी एक म्हातारी बाईही होती तिथं. तिला कुणीही ओळखत नसे; तरी मृताची दूरची नातेवाईक म्हणून अंत्यविधीच्या वेळी शवपेटीभोवती घुटमळत राहायची... नेहमीच.

कोण होती ती? दफनभूमीच्या भारल्या परिघातली गूढविद्या जाणणारी जारण-मारणवाली कुणी?... कोण जाणे!... पण तिनं कापसाच्या एका बोळयावर कलोनचे थेंब टाकले आणि अगदी भक्तिभावाने तो सुगंधी बोळा सोफीच्या कपाळावर टेकवला. शवपेटीच्या लाकडी वासात पहुडलेली सोफी मॉल कलोनच्या घमघमाटाने दरवळून गेली.

सोफीची इंग्लिश आई – मार्गरिट कोचम्मा – शेजारीच होती. सोफीच्या वडिलांनी – चाकोने – सांत्वनासाठी तिच्या खांद्याभोवती कवटाळलेला हात दूर करून ती एकटीच उभी राहिली... निश्चल आणि सुटी!

सगळं कुटुंब घोळक्यानं एकत्र जमलं होतं. मार्गरिट कोचम्मा, चाको, बेबी कोचम्मा, तिच्या शेजारी तिची वहिनी – माम्माची – इस्था, राहेल आणि सोफी मॉलची आजी!

घराबाहेर पडताना डोळयांवर चढवलेल्या काळया काचांच्या चश्म्याआडची दृष्टी माम्माची जवळपास गमावून बसली होती. एखाद्या ओलसर छपराच्या दोन्ही बाजूंनी पावसाचे थेंब सरकत राहावेत, तसे काळया चश्म्याआडून माम्मीचीच्या चेहऱ्याभोवती अश्रू ओघळत होते. काहीशा कडक, कुरकुरीत पोताच्या पांढऱ्या साडीत लपेटलेली माम्माची आजारी, कृश आणि केविलवाणी दिसत राहिली. चाको हा तिचा एकुलता एक मुलगा. नातीच्या वियोगाच्या दु:खानं मनातून बिचारी कोसळलीच होती. मुलाचा न पेलवणारा शोक बघून तर ती पुरतीच खचली!

अम्मू, इस्था आणि राहेल. तिघांनाही अंत्यविधीला उपस्थित राहण्याची अनुमती होती खरी; पण त्यांना कुणी आपल्यात सामावून मात्र घेतलं नाही. कुटुंबीयांपासून दूर... त्रयस्थपणे घोळका करून ते तिघे उभे होते. इतरांनी त्यांची फारशी दखलही घेतली नाही.

चर्चमध्ये खूप उकडत होतं. इतकं, की लिलीच्या पांढऱ्याशुभ्र फुलांच्या नाजूक पाकळया कडेनं करपत चालल्या होत्या. शवपेटीतल्या त्या सुगंधी फुलांमधून धावणारी माशीही अखेर उन्हाच्या काहिलीने तडफडली... मरून पडली. प्रार्थनेचं पुस्तक घेतलेले

अम्मूचे हात थरथरत होते. कशानं, कोणास ठाऊक, पण तिचं शरीर गार पडत चाललं होतं. तिच्या शेजारी इस्था... एरवी स्फटिकासारख्या चमकणाऱ्या त्याच्या डोळ्यांवर कसलीशी गुंगी चढली होती. अम्मूच्या कापऱ्या हातांवर टेकवलेले गाल चुरचुरायला लागले होते. त्याचं लक्षच नव्हतं कशात... काय चाललंय समोर, ते नीट कळतही नव्हतं.

राहेल मात्र टक्क जागी होती. आयुष्यातल्या एका भीषण सत्याच्या पहिल्या-वहिल्या अनुभवानं तिच्या जाणिवा थरारून उठल्या होत्या. मनामध्ये उठलेलं भयंकर तुफान पेलवत नव्हतं; तरी धीटपणानं ती या युद्धाचा सामना करीत होती.

आत खोलवर काहीतरी तुटत होतं, उद्ध्वस्त होत होतं... राहेलच्या नजरेसमोर होता सोफी मॉलचा चेहरा! पण सोफी मेली नव्हती...जागी होती टक्क! शवपेटीतसुद्धा!... तिनं राहेलला दोन गोष्टी दाखवल्या.

एक म्हणजे त्या जुनाट पिवळ्या चर्चचा नव्यानं रंगवलेला उंच उंच मनोरा! चर्चच्या आत असताना राहेलने तो मनोरा कधीसुद्धा पाहिला नव्हता. त्या मनोऱ्यावर चढला होता, निळ्या आकाशाचा सुंदर रंग... सळसळत्या वाऱ्यानं त्या आकाशात गुबगुबीत ढग वाहून आणले होते आणि त्या ढगांच्या कापसामधून पांढऱ्या शेपट्यांची छोटी-छोटी जेट विमानं सुसाट निघाली होती.

हे खरं होतं (अर्थातच!)

शवपेटीमध्ये मस्त पहुडल्यानंतरच दिसणार ना ते आकाश... ढग... आणि विमानं! प्रार्थनेची कळकट पुस्तकं घेतलेले हात आणि मृत्यूच्या दु:खानं गदगदणाऱ्या मोठ्या माणसांच्या थुलथुलीत कुल्ल्यांच्या मध्ये चर्चमधल्या बाकांनी घेरलेल्या छोट्या मुलीला हे सगळं कसं काय दिसणार? तिची नजर कशी पोचणार वरपर्यंत?

राहेलला आश्चर्यच वाटत राहिलं. भरपूर भरपूर रंग घेऊन कोण्ा बरं गेलं असेल इतक्या उंचावर? केवढे रंग!... आकाशासाठी निळा, ढगांसाठी पांढरा, विमानांसाठी चमकता चंदेरी... इतक्या रंगाचे जड जड कॅन्स... शिवाय थिनर्स... आणि मोठे मोठे ब्रश!

कोणी केला असेल हा खटाटोप?

राहेलच्या नजरेसमोर एकच आकृती उभी राहिली... वेलुथा!... तोच!! किंवा त्याच्याचसारखा कुणीतरी! उघड्याबंब चमकत्या शरीराचा... उंचचउंच शिडीवरून तो वर गेला असेल... मनोऱ्यापर्यंत! चारही बाजूंनी लाकडी फळ्यांचे झुलते झोपाळे बांधले असतील त्यानं... आणि त्यांवर बसून रंगवली असतील चंदेरी जेट विमानं... निळं आकाश!

पण अचानक झोपाळ्याची दोरी तुटली... तर?

त्यानंच रंगवलेल्या निळ्या आकाशातून तुटलेल्या तारऱ्यासारखा झपकन खाली आला असता तो आणि चर्चमधल्या तापल्या जमिनीवर मरून पडला असता. त्याच्या फुटलेल्या

डोक्यातून लालकाळं रक्त भळभळत बाहेर पडलं असतं... एखाद्या फुटलेल्या गुपितासारखं!

...पण माणसं अशी, इतक्या सहज मरत नाहीत. त्यांना मारण्याचे, त्यांची डोकी फोडण्याचे वेगवेगळे मार्ग जगानं ठरवलेले असतात, हे गुपित एव्हाना इस्था आणि राहेलला समजलं होतं. मृत्यूचा वासही त्यांना ठाऊक होता. गोडूस... घशात कोंडून राहणारा... मळमळणारा! कुजलेल्या गुलाबाभोवती घोटाळणाऱ्या वाऱ्यानं वाहून आणावा, तसा.

सोफी मॉलनं राहेलला दाखवलेली दुसरी गोष्ट म्हणजे एक पाकोळीचं पिल्लूच... काळंभोर.

सोफीच्या अंत्यसंस्काराचे विधी चालू असतानाच राहेलला दिसली होती ती पाकोळी... बेबी कोचम्मानं नेसलेल्या महागाड्या साडीच्या चुण्याचुण्यांमधून वाट काढत वर-वर चढत होती. करता-करता पाकोळी बेबी कोचम्माच्या कमरेशी गेली आणि बघता-बघता थेट ब्लाऊजच्या उघड्या गळ्याशी... तत्क्षणी बेबी कोचम्माचा तोल सुटला. आपण कशासाठी आलोय, काय करतोय ते विसरून, दु:खबिख्खं गुंडाळून ठेवून ती जोरात किंचाळली आणि हातातलं प्रार्थनेचं पुस्तक उघड्या तलवारीसारखं हवेत नाचवत सुटली. तालासुरात वाहत चाललेल्या शोकगीताच्या ओळीही अर्ध्यावरच तुटल्या. सुरेल स्वरांच्या कशिद्याने विणत आणलेलं 'शोकचित्र' अचानक विस्कटलं. त्यावर 'काय झालं?... काय झालं?'च्या उत्सुक, कर्कश प्रश्नांचे ओरखडे उठले. चोहींकडून एकच धुमश्चक्री आणि बेबी कोचम्माचं जोरजोरानं साडी झटकणं...

चौकोनी चेहऱ्यांच्या धर्मगुरूंनी अधिक दु:खीकष्टी रेघांची जाळी आपल्या चेहऱ्यावर ओढून घेतली आणि सोन्याच्या चमकत्या अंगठ्यांनी लखलखणारी बोटं जुन्या-जीर्ण दाढीच्या कुरळ्या, धुरकट केसांमधून फिरवली... त्या अगम्य केसाळ जंगलात कुण्या कोळ्यानं विणली असली चिवट जाळी... तर?

...पण तेवढ्यात पाकोळी गेली उडून. आकाशातच झेपावली एकदम आणि बघता-बघता तीच झाली जेट विमान... उलटसुलट कोलांट्या मारणारं, चपळ, शेपटी नसलेलं तरीही उंच आकाशात डौलानं तरंगणारं – जेट विमान!

सोफीच्या शवपेटीत एक मज्जा होती. गुप्त. अदृश्यच. सोफीच्या छोट्या गाडीचं चाक. तेही फक्त राहेललाच ठाऊक होतं.

शोकगीतांचे करुण स्वर पुन्हा एकदा वाहू लागले. तेचतेच पुन:पुन्हा... कोंडलेल्या घशात साठून राहावेत सगळे शब्द, घुसमटून जावेत सगळे सूर... तसं झालं होतं. ते जुनाट पिवळं चर्च दु:खाची सूज आल्यासारखं टम्म फुगलं, तरी इकडून-तिकडून शोकगीतं गळतच होती.

चर्चच्या पाठीमागं असलेल्या दफनभूमीमध्ये सोफीची शवपेटी नेण्यात आली. तिथल्या एका खड्ड्यात ती पेटी हळूहळू उतरवली जात असताना राहेल अस्वस्थ होती फार. कारण तिलाच ठाऊक होतं फक्त, की सोफी जिवंत आहे अजून! ती कशी मरेल? मरेलच कशी? खड्ड्याच्या कोपऱ्यात साठलेल्या लालभडक चिखलाची गजबज ऐकू येत होती... शवपेटीच्या चकाकत्या पॉलिशवर वेडेवाकडे ओरखडे काढणाऱ्या नारिंगी मातीची कर्कश्श खरखरसुद्धा शहारे उठवत होती अंगावर... म्हणजे शवपेटीतली सोफी मॉल ऐकतच असणार ना हे सगळं? खड्ड्यात उतरत असताना होणारी आदळआपट आणि इकडचे-तिकडचे सगळे आवाज सोफीला शवपेटीच्या लाकडाच्या आतून, भोवती लपेटलेल्या रेशमी कापडाच्या आतूनसुद्धा स्पष्ट ऐकू येत असणार – नक्की! धर्मगुरूंच्या आवाजात आता काहीसा गूढ जडपणा आला होता. तरीदेखील ते जाडेभरडे, खरबरीत, दु:खानं जडावलेले शब्द सोफीला स्वच्छ ऐकता येत असणार...

हे परमदयाळू बापा,
या आमच्या निवर्तलेल्या मुलीचा आत्मा
आम्ही तुझ्या हाती सोपवतो.
तिचं शरीर मातीला माती, राखेला राख, धुळीला धूळ असं
सनातन जीवनासाठी जे पुनरुत्थान,
त्याची निश्चित व दृढ आशा बाळगून भूमीला निरवतो.

जमिनीच्या आत, पृथ्वीच्या पोटात पुरली गेलेली सोफी किंचाळत होती प्रत्येक क्षणी... न गेलेला प्राण एकवटून तिनं आक्रोश केला. शरीराभोवती गुंडाळलेलं रेशमी कापड दातांनी कचाकचा तोडलं, फाडलं, ओरबाडून काढलं... पण दगड-धोंड्यांच्या इतक्या अवजड, निर्मम पसाऱ्यातून कुणाला ऐकू जाणार सोफी मॉलची आर्जवं?

सोफी मॉल मेली शेवटी... कारण इतक्या खोल खड्ड्यात पुरल्यावर तिला मुळी श्वासच घेता येत नव्हता.

...पण म्हणजे ती 'मेली' नाही काही...

चर्चमधल्या अंत्यसंस्कारानं तिला मारलं. अगदी जीव जाईपर्यंत! शोकगीतांच्या लोंढ्यात गुदमरून... दगडमातीच्या काळयाकभिन्न ढिगाऱ्यात कोंडून! मातीकडून मातीकडं... तिथून पुन्हा मातीकडं... मग तिच्या थडग्यावर एक दगड उभारला. त्यावर लिहिलं,

'अ सनबीम, लेन्ट टु अस टु ब्रीफली...'

(सूर्याचा छोटासा, तेजस्वी किरण... जो अगदी अल्पकाळासाठीच आमच्या वाट्याला आला!)

सोफी मॉलचा अंत्यविधी उरकल्यानंतर राहेल आणि इस्थाला घेऊन अम्मू तडक

कोट्टायम पोलीस स्टेशनमध्ये गेली. तिथला तो कुबट वास त्यांच्या ओळखीचा होताच. आदल्या दिवशीचा पुष्कळसा वेळ त्यांना त्या पोलीस स्टेशनातच घालवावा लागला होता. तिथल्या कळकट्ट फर्निचरपासून ओलसर भिंतीपर्यंत प्रत्येक ठिकाणच्या अंशाअंशांत मुरलेला मानवी मुत्राचा घाणेरडा उग्र वास श्वासात मिसळण्यापूर्वीच तिघांनीही नाक घट्ट दाबलं आणि चेहऱ्यावरचा वैताग दिसू न देता पोलीस स्टेशनात पाऊल ठेवलं.

अम्मूनं स्टेशनच्या मुख्याधिकाऱ्याची चौकशी केली. त्यांच्या ऑफिसमध्ये जाताक्षणी तिनं अत्यंत तीव्र शब्दांत आपली तक्रार मांडली. एकूणच सगळं फार भयंकर घडलंय आणि त्याबाबत आपण तातडीनं 'स्टेटमेंट' देऊ इच्छितो, असंही पुन्हा पुन्हा कळवळून सांगत राहिली. तिला तातडीनं वेलुथाला भेटायचं होतं. त्याबद्दलही तिनं चौकशी केली.

इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यूच्या झुबकेदार मिशा एअर इंडियाच्या महाराजासारख्या फुलारल्या होत्या... पण त्याच्या नजरेत महाराजाचा तो प्रसन्न लोभसपणा मात्र नावालाही दिसला नाही. चेहऱ्यावर दोन निखारे ठेवलेले असावेत, अशा धगधगीत कावेबाज डोळ्यांमधून अधाशी हावरटपणा ओसंडत होता. तसले ते वखवखीत डोळे त्यानं अम्मूवर रोखले...

"फार उशीर झाला, बाई, आता... एवढं पण कळत नाय का तुमाला?" – तो कुर्र्यात उत्तरला.

त्याला शुद्ध, सभ्य भाषेची साधी ओळखही नव्हती. मल्याळमचे गलिच्छ श्लेष काढणाऱ्या गावंढळ, रासवट कोट्टायम भाषेत तो बोलत होता.

"पोलिसांना सगळं काय ते व्यवस्थित ठाऊक आहे. त्यांना कुणीही शहाणपणा शिकवण्याची गरज नाही –" त्यानं अम्मूला ऐकवलं. वर अगदी कुर्र्यात म्हणाला,

"कोट्टायमचे पोलीस वेश्यांकडून आणि त्यांच्या अनौरस मुलांकडून 'स्टेटमेंट्स' घेत नसतात."

अम्मूच्या तोंडून संतापानं शब्द फुटेना. तरी तिनं त्या निर्लज्ज इन्स्पेक्टरला चांगलं सुनावलं. "बघून घेईन!" म्हणाली.

इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यू टेबलाला वळसा घालून पलीकडं आला आणि हातातली काठी त्यानं अम्मूच्या छातीवर टेकवली.

"मी जर तुझ्याजागी असतो ना, तर मुकाट घरी निघून गेलो असतो" – तो कडाडला.

टक... टक... टॅडॅक... टॅडॅक...!

त्याच्या हातातली काठी अम्मूच्या छातीचा उभार चाचपून पाहत होती. अगदी हलकेच. रसाळ आंब्यांनी भरलेल्या टोपलीतून अस्सल पाडाची भरदार फळं निवडावी... उचलावी आणि मिटक्या मारीत घरी न्यावी... तसंच काहीसं वळवळत होतं त्याच्या डोक्यात. गर्दीतून नेमकं सावज हेरून त्याच्यावर झडप घालण्याचा अनुभव होताच

त्याच्या गाठीशी! सगळयाच पोलिसांची दृष्टी या असल्या बाबतीत पक्की तयार असते. इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यूच्या शरीरात उफाळलेली वासना त्याच्या नजरेत आकार घेत होती.

मॅथ्यू उभा होता, त्याच्या मागच्या भिंतीवर लटकवलेला लाल-निळया रंगाचा बोर्ड... त्यावर मात्र भलतंच काहीतरी लिहिलेलं...

Politeness
Obedience
Loyalty
Intelligence
Courtesy
Effciency

विनयशील नम्रता, आज्ञाधारकता, संपूर्ण निष्ठा, बुद्धिमत्ता, सौजन्य आणि कर्तव्यतत्परता... एवढ्या सगळया गुणसंपदेची प्रभावळ 'पोलीस' या शब्दाभोवती मोठ्या खुबीनं गुंफली होती.

पोलीस स्टेशनमधून बाहेर पडताना अम्मू रडतेय हे बघून इस्था आणि राहेल भेदरलेच काहीसे. त्यांनी मग 'वेश्या म्हणजे काय?'हे अम्मूला विचारलंच नाही. 'अनैतिक म्हणजे काय?'हा प्रश्नही मनातच घट्ट कोंडून ठेवला. याआधी त्यांनी कधीच अम्मूला रडताना बघितलं नव्हतं. तिच्या तोंडून हुंदके फुटत नव्हते, तरीही ती खूप रडतेय, एवढं दोन्ही भावंडांना कळलं. एरवी बोलका असणारा अम्मूचा चेहरा निर्जीव, निर्विकार झाला होता... जणू काळा फत्तरच! डोळे मात्र पाण्यानं काठोकाठ भरलेले आणि दोन्ही गालांवरून ओघळणारे अश्रू्!

इस्था आणि राहेल दोघंही मनातून घाबरली होती. रडणार्‍या अम्मूचं करायचं काय, हे त्यांना समजेना. आजवर कधीच न अनुभवलेलं, समजुतीच्या कक्षेपल्याड असलेलं काहीतरी अचानक येऊन समोर उभं राहावं आणि त्या नव्या जाणिवेनं जीव घुसमटून जावा, तसं काहीसं झालं होतं. कधीच न पाहिलेल्या अम्मूच्या अश्रूंनी दोन्ही भावंडांना एका काळयाकभिन्न डोहाच्या काठाशी आणून उभं केलं होतं. त्यांच्या कोवळया नजरा भेदरूनच गेल्या एकाएकी.

इस्था आणि राहेल अम्मूबरोबर आयमेनेमला जाणार्‍या बसमध्ये चढले... तिथंही तेच. खाकी कपड्यातला बुटबैंगण कंडक्टर बसच्या धक्क्यांचं निमित्त करून सारखा त्यांच्या अंगावर रेलत होता. शेवटी आपले थुलथुलीत कुल्ले एका सीटला टेकवून तो अम्मूसमोर उभा राहिला आणि हातातला चिमटा चटकफटक करीत तिच्यासमोर नाचवला.

'बोला... कुठं?' – असाच त्या आवाजाचा अर्थ होता. ट्रेमध्ये हारीनं मांडलेल्या

तिकिटांच्या कवळ्यांचा उग्र, काळपट वास राहेलच्या नाकात घुसला... कंडक्टरच्या हातातल्या गंजलेल्या, हिरवट चिमट्यालाही कसलीशी घाणच येत होती.

"तो मेलाय."

कंडक्टरच्या डोळ्यांत रोखून पाहत अम्मू हलकेच कुजबुजली.

"मीच मारलं त्याला... मेला तो!"

"आयमेनेम..." अम्मूचं वाक्य पुरं व्हायच्या आत इस्थानं पटकन उत्तर देऊन टाकलं म्हणून बरं; नाहीतर कंडक्टरचं टाळकं सटकलंच असतं एकदम.

पुढचं क्रियाकर्मही इस्थानं झटपट आटपून टाकलं. अम्मूच्या हातातून तिची पर्स घेतली. त्यातले पुरेसे पैसे काढून कंडक्टरच्या हातावर टेकवले. कंडक्टरनं दिलेली तिकिटं नीट दुमडून आपल्या खिशात ठेवली आणि शून्यात नजर लावून आतल्या आत ओक्साबोक्शी रडणाऱ्या आपल्या आईभोवती छोटेसे हात प्रेमानं लपेटून घेत तो शांतपणे बसून राहिला.

त्यानंतर दोन आठवड्यांनी इस्था परत गेला. त्याला परत पाठवणं अम्मूला मुळी भागच पाडलं गेलं. आसाममधल्या चहाच्या मळ्यातली नोकरी सोडून इस्थाचा बाबा कोलकात्याला परतला होता. कार्बन ब्लॅक तयार करणाऱ्या एका कंपनीत त्यानं नोकरी पत्करली होती. दुसरं लग्न केलं होतं, दारू पिणंही कमी-अधिक प्रमाणात सोडलं होतं. त्याच्यात मुरलेल्या व्यसनाची जुनी लहर कधीमधी उफाळून यायची, एवढंच काय ते!... वडिलांबरोबर राहण्यासाठी म्हणून इस्था कोलकात्याला गेला, तो गेलाच. तेव्हापासून त्याची आणि राहेलची साधी दृष्टभेटही घडली नव्हती.

आणि आता, तब्बल तेवीस वर्षांनंतर इस्था आणि राहेलच्या बाबानं इस्थाला परत धाडलं होतं. एक मोठी सूटकेस आणि छोटंसं पत्र बरोबर देऊन त्यानं इस्थाला आयमेनेमला पाठवून दिलं. नव्याकोऱ्या कपड्यांनी सुटकेस खचाखच भरलेली होती. इस्थाबरोबर आलेलं बाबाचं पत्र बेबी कोचम्मानं राहेलला दाखवलं. पत्रातला मजकूर भलत्याच स्टाईलबाज बायकी अक्षरात, अस्सल इंग्रजीत लिहिलेला; पण मजकुराखाली सही मात्र धेडगुजरी – तिच्या बाबाच्या व्यक्तिमत्त्वासारखी... कदाचित त्याचीच!

सहीमधलं नाव तरी निदान त्याचं होतं.

'कार्बन ब्लॅक कंपनीतल्या नोकरीतून निवृत्त होऊन आपण ऑस्ट्रेलियाला जातोय... तिथल्या एका सिरॅमिक फॅक्टरीत प्रमुख सुरक्षा अधिकारी म्हणून नोकरी मिळलीय... त्यामुळं ऑस्ट्रेलियातच स्थायिक व्हायचं ठरवलंय; पण इस्थाला मात्र आपल्याबरोबर नेणं शक्य नाही,' असं त्या पत्रातून कळवलं होतं. शिवाय आयमेनेममधल्या प्रत्येकाला

मन:पूर्वक शुभेच्छाही दिल्या होत्या. 'यदाकदाचित आपण भारतात परत आलोच, तर पुन्हा इस्थाची जबाबदारी घेऊ'; अशा आश्वासनापाठोपाठ 'एकुणात तो योग जरा अवघडच आहे,' असंही सांगून टाकलं होतं.

बेबी कोचम्मानं ते पत्र राहेलच्या स्वाधीन केलं. म्हणाली,

"हवं असेल, तर ठेव तुझ्याजवळ!"

राहेलनं शांतपणे पत्राची घडी केली आणि पुन्हा तो कागद पाकिटात सरकवला. दमट हवेनं कागद इतका सादळला होता, की एखाद्या कापडाच्या तुकड्यासारखी त्याची मऊसूत घडी झाली. आयमेनेममध्ये मान्सून घोंघावत आला, की हवा कशी ओलसर, दमट होते हे विसरलीच होती राहेल. पाण्याच्या सतत वर्षावामुळं फुगलेल्या कपाटांची करकरणारी दारं... कडी-कोयंडे लावूनसुद्धा उसळत्या वाऱ्यानं फटाफट उघडणाऱ्या खिडक्या... कण्यापासून सुटी होऊन कव्हरच्या बाहेर लोंबणारी पुस्तकाची खिळखिळीत, ओली पानं... भांबावून गेलेल्या मेंदूतून अचानक नवनव्या कल्पनांचं मोहोळ फुटावं, तसं उतरत्या संध्याकाळी झुंडीच्या झुंडींनी येणारे आणि बेबी कोचम्मानं लावलेल्या चाळीस वॅटच्या अंधूक अशक्त बल्बभोवती घिरट्या घालत मरून पडणारे कुठलेतरी चित्रविचित्र किडे... सकाळ झाली, की किड्यांच्या कुरकुरीत मृतदेहांनी घरभरातल्या जमिनी नुसत्या भरून जात. खिडक्यांच्या तावदानांवरसुद्धा मरून पडलेल्या किड्यांचे थवेच्या थवे... हातात चांगला भलाथोरला झाडू घेऊन कोचू मारिया हा सगळा मृतदेहांचा कचरा साफ करीत असे; पण तोवर काहीतरी जळल्यासारखा धुरकट, करपट वास सगळ्या घरात भरून राही.

जूनमधल्या पावसाचं हे रूप... कधीच बदललं नाही. स्वर्गाची दारं उघडून आशीर्वचनांचे पूर वाहावेत, तसं धो-धो पावसाचं पाणी बरसत राहिलं... जुन्यापुराण्या दगडी विहिरींच्या कोरड्याठाक हृदयांना पुन:पुन्हा उमाळे आले... पडक्याझडक्या भिंतीपासून गलिच्छ डुक्करखान्यांपर्यंत सर्वत्र ओलसर शेवाळाची हिरवाई उगवली... लुसलुशीत गवताचे नवजात कोवळे अंकुर भिजता-भिजता हसत राहिले. मऊमऊ चिखलात मजेने बागडणारी गांडुळं आनंदाच्या उन्मादात निळी-जांभळी होत राहिली... खाजकुयलीचे हिरवे कोंब अंकुरले... झड धरून आलेल्या पावसाच्या सततच्या माऱ्यानं जुनीजाणती झाडंही काहीशी झुकत, वाकत राहिली.

...अशाच वाऱ्यावादळाच्या कल्लोळात, पावसापाण्याच्या धुमश्चक्रीत, एकाएकी भरून आलेल्या पावसाळी आकाशाच्या झाकोळल्या कुशीतून, उधाणल्या नदीच्या काठाकाठानं इस्था चालत होता. स्ट्रॉबेरीच्या रसरसत्या फळांच्या रंगाचा त्याचा गडद गुलाबी टी-शर्ट पावसानं भिजून ओलाचिंब झालेला... तरी तो तसाच निघाला होता, चालत-चालत. राहेल आलीय, हे त्याला ठाऊक होतं.

इस्था तसा पहिल्यापासूनच शांत स्वभावाचा. त्यामुळं त्याचं मोजकंच बोलणं कमी-कमी होत कधी पुरतंच थांबून गेलं, हे कुणालाच कळलं नाही. तारीख-वार सोडा, पण नक्की कधी? निदान कोणत्या वर्षी?... हेदेखील कुणाला नीट सांगता येणार नाही. इस्थाचं बोलणं थांबलं, म्हणजे थांबलंच... पूर्णविरामच यावा एकदम, तसं! अर्थात हा पूर्णविराम काही एकाएकी, अचानक एखाद्या क्षणी आलेला नव्हता. सूर्य अस्ताला जाण्याचे वेध लागताच पेढीवर बसलेल्या दुकानदारानं आवरासावर सुरू करावी आणि एका ठरल्या क्षणी दुकानाचं शटर ओढून शांतपणानं घरची वाट धरावी, तसं झालं सगळं. कुणाच्या कसं लक्षात येणार? जणू काही बोलायचं होतं, ते सगळं झालं बोलून आणि आता काहीच उरलं नाही सांगण्यासारखं... म्हणून बोलणंच थांबलं... मिटत-मिटत गेलं आणि इस्था गप्प झाला. त्याचं हे मौन विचित्र, अवघडलेलं नव्हतं... काही न बोलता कशाकशात नाक खुपसण्याएवढं धूर्त नव्हतं... न बोलून धुमसता आरडाओरडा करणारं आक्रस्ताळंही नव्हतं... कुणावर ठपका ठेवण्याचा हेतू नव्हता अगर कशाबद्दल मूक निषेधही नव्हता! काहीच करू नये, काहीच बोलू नये अशा शारीरिक-मानसिक निष्क्रियतेतून स्रवलेला एक प्रत्यक्ष आविष्कार... एवढाच होता इस्थाच्या मौनाचा अर्थ! उन्हाळा रणरणू लागला, की आटलेल्या तळयातले छोटे-छोटे मासे आपलं अस्तित्व गुंडाळून निपचित पडून राहतात, नवा पावसाळा येईतोवर जीव जगवत राहतात, तसंच इस्थाचं मौन! आपल्या भावभावनांची भेंडोळी गुंडाळून निपचित, नीरव पडून राहिलेलं! फरक फक्त एवढाच, की इस्थाला आक्रसून टाकणारा उन्हाळा फार लांबच्या पल्ल्याचा होता... कदाचित, कधीच न संपणारा... अनंत काळचा!

इस्था गप्प होत गेला, तसा तो गर्दीत मिसळून गेला... चारचौघांतला एक होऊन जगायला शिकला. सतत मागं राहायचं. याच्याआड... त्याच्याआड... कधी पुस्तकांनी भरलेल्या फळीआड, कधी पडद्याआड! व्हारांड्यात, बागेत, रस्त्यांवर... तो असला, तरी दिसायचा नाही. अनोळखी नजरांसाठी तर इस्था 'अदृश्य'च होता जवळजवळ! चारचौघांबरोबर एकाच खोलीत असला, तरी त्याचं अस्तित्व जाणवायचंच नाही कुणाला! आपल्या आसपास तो आहे आणि असूनही बोलत मात्र नाहीये, हे लक्षात यायलादेखील पुष्कळच वेळ लागायचा. अनेकांना तर तेवढंदेखील कळायचं नाही इस्थाबद्दल.

तो होताच तसा.

असून नसल्यासारखा.

या जगातलं आपलं अस्तित्वच त्यानं हलके-हलके पुसत आणलं होतं. शरीर आहे, म्हणून जमिनीवर दोन पावलं टेकवायची... बस्स, तेवढीच जागा! या अवाढव्य पसाऱ्यातला एक अंधूकसा बिंदू!

सोफी मॉलच्या अंत्यसंस्कारानंतर इस्था आपल्या बाबाकडं परत गेला, तेव्हा बाबानं इस्थाला कोलकात्याच्या 'बॉईज स्कूल'मध्ये घातलं. तो फार काही हुशार, बुद्धिमान वगैरे नव्हता, पण अगदीच जेमतेम, सो... सोही नव्हता... एक मध्यममार्गी विद्यार्थी! 'प्रगती साधारण' किंवा 'काम समाधानकारक' यांपैकी एखादा शेरा त्याच्या वार्षिक प्रगतिपुस्तकात हमखास नोंदलेला असे. 'शाळेमधल्या सामूहिक उपक्रमात सहभागी होत नाही'– हीच काय ती तक्रारवजा दखल; पण 'सामूहिक उपक्रम' म्हणजे नक्की काय, त्याचा उल्लेख इस्थाच्या शिक्षकांनी कधी केला नाही.

मजल-दरमजल करत इस्था वरच्या वर्गात जात राहिला आणि अखेरीस जेमतेम मार्कांनी का असेना, पण शाळेच्या शेवटच्या वर्षातून सहीसलामत सुटला. त्याला पुढं शिकायची अजिबात इच्छा नव्हती. 'आपण कॉलेजात जाणार नाही,' हे त्यानं स्वच्छच सांगून टाकलं. कारट्याच्या डोक्यात कसलं भलतंच खूळ शिरलंय, म्हणून वैतागलेल्या बाबाकडं आणि आईकडं लक्ष न देता इस्थानं सरळ घरकामांत स्वत:ला जुंपून घेतलं. शिक्षणात नाही, तर निदान घरीतरी आपला उपयोग व्हावा, अशी त्याची इच्छा होती की काय नकळे?... पण त्यानं घरातल्या एकेक जबाबदार्‍या उचलायला सुरुवात केली. तो स्वयंपाक करायला शिकला. रोज नियमानं भाजी आणायला जाऊ लागला. ताज्या भाज्यांच्या रसरशीत ढिगांमागे बसणारे जुने भाजीवाले 'रोजचं गिर्‍हाईक' म्हणून इस्थाला ओळखू लागले. बाजारात कितीही गर्दी आणि कलकलाट असला, तरी इस्थाची तातडीनं दखल घेतली जाऊ लागली. नेहमीचे भाजीवाले त्याला बरोबर हुडकून काढत. ढिगातून निवडलेली भाजी टाकण्यासाठी तत्परतेनं प्लास्टिकची फुटकी डबडी त्याच्यापुढं ठेवत. इस्था भाजीवाल्यांशी कधीच घासाघीस करीत नसे आणि तेही इतर गिर्‍हाइकांप्रमाणे त्याच्या खिशावर डल्ला मारत नसत. भाजीचं वजनमाप करून झालं, की भाजीवाले स्वत:हून इस्थाच्या लाल पिशवीत सगळा बाजार नीट भरून देत... तळाशी कांदे, त्यावर वांगी आणि सगळ्यात वर टोमॅटो! इस्थानं पैसे दिले, की भरून ओसंडणार्‍या त्याच्या पिशवीत कोथिंबिरीची छोटी जुडी आणि मूठभर हिरव्या मिरच्या आठवणीनं टाकल्या जात... त्याही फुकट आणि रोजच्या रोज! खरेदी आटपली की, भाजीपाल्याची वजनदार पिशवी घेऊन गर्दीनं गजबजलेल्या ट्राममधून इस्था घरी परत येई... उसळलेल्या समुद्राच्या पृष्ठभागावरून एखादा छोटासा बुडबुडा शांतपणे वाहत यावा, तसा!

जेवताना काही जास्तीचं हवं असेल, तर तो स्वत: उठून वाढून घ्यायचा.

ही निश्चल शांतता कुठून, कोण जाणे, पण इस्थामध्ये आली आणि त्वचेमधून आरपार शिरावी, तशी त्याच्या व्यक्तित्वामध्ये मिसळत, गुंतत, भिनत गेली. क्षितिजापार

पसरलेल्या आपल्या बाहूंमध्ये तिनं लपेटूनच घेतलं इस्थाला! त्याच्या मनात उसळणारे लाव्हे हळूहळू विझत गेले. जुनेपुराणे सलही मिटत गेले एकामागोमाग! इस्थाच्या प्राणात रुजून वाढत चाललेल्या त्या निश्चल शांततेनं हलके-हलके आपली मुळं वेढून घेतली. चोहोबाजूंनी... इस्थाच्या मस्तकाचा ताबा घेत उपटून फेकलं तिथलं द्वेषाचं रान... रागाच्या उफाळत्या टेकड्या छाटल्या... भुईसपाट केल्या. आणि लोभाच्या घनगर्द दऱ्या भरून घेतल्या अपार स्तब्धतेनं, स्थिरप्रज्ञेनं! जुन्या भावभावना झटकून टाकल्या... जिभेच्या आसपास रेंगाळणाऱ्या शब्दांच्या झुंडी हुसकावून लावल्या... शब्दांची, वाक्यांची वस्त्रं फेडून इस्थाचं मन सोलून काढलं आणि 'विचार' केले संपूर्ण नग्न! इतके स्थिरचित्त, की शब्दांची मुळी काही गरजच उरू नये. हलके-हलके इस्था अलग होत गेला इतर जगापासून. सुटा... स्वतंत्र! आत वळवळणाऱ्या 'ऑक्टोपस'ची त्याला बघता-बघता सवय होत गेली... इतकी, की त्यानंही आपला भूतकाळ पुसून टाकला... लख्ख वर्तमानाची चूळ भरून चिळकांडी उडवावी झाल्या-गेल्यावर, इतक्या सहजतेनं! हळूहळू त्याचं मौन सवयीचं झालं; पण त्यामागची कारणं मात्र नजरेआड होत गेली... दगडमातीच्या ढिगाऱ्याखाली चिरनिद्रा घेणाऱ्या थडग्यातल्या मृतदेहासारखी. इस्थाच्या शांत, प्रसन्न मौनात सगळंच विरघळून गेलं.

खूबचंद– अवघा सतरा वर्षांचा, तारुण्याच्या उन्मादानं अधीर, आंधळा झालेला इस्थाचा जिवाभावाचा मित्र. तो अचानक आजारी पडला, तेव्हाची गोष्ट. त्याचा आजार बळावला, जिवावर बेतला. जगण्या-मरण्याच्या लढाईत त्याची हार होणार, हे उघडच होतं; पण खूबचंदच्या गळयाभोवती पाश आवळून उभा असलेला मृत्यू येत मात्र नव्हता. त्या अत्यंत वेदनादायक काळात इस्थानं जीव तोडून खूबचंदची शुश्रूषा केली. स्वत:चा जीव वाचवण्यासाठी धडपडावं, अशा आकांतानं तो आपल्या मित्रासाठी दिवसरात्र राबला. जणू त्याचं स्वत:चं जगणं-मरणं खूबचंदच्या श्वासांच्या लयीशी जखडलेलं होतं. खूबचंदमध्ये अजूनही प्रबळ जीवनेच्छेची धुगधुगी जिवंत होती; पण त्याच्या कमजोर मूत्राशयानं साथ सोडली. सगळयाच इच्छांचे पाय पुरते लुळे होऊन गेले. शेवटी-शेवटी त्याची अवस्था वेगानं खालावली. परसदाराच्या दिशेनं तो स्वत:ला कसाबसा फरफटत नेई आणि मागच्या दाराच्या तळाशी लावलेल्या एका उघड्या फळीतून डोकं बाहेर काढून लघवी करी... त्याच्या जर्द पिवळया लघवीची तुटक धार कण्हत, कुंथत कशीबशी गळत राही... वेदनेनं कळवळणारं डोकं दाराबाहेर, आणि पिवळी लघवी आत... फुगून आलेलं मूत्राशय रितं झालं की संकटातून सुटल्यासारख्या आश्वस्त नजरेनं खूबचंद इस्थाकडं बघत राही. झोपून-झोपून आणि रडून-रडून सुजवटलेल्या चेहऱ्यावरच्या खोल खोबणींतून डोकावणारे त्याचे ते निश्चल, हिरवट डोळे... कितीतरी वेळ इस्थाच्या दिशेनं रोखलेले राहत. मग खुरडत-खुरडत खूबचंद आपल्या कुबट अंथरुणाकडं जाई आणि उशीत डोकं

खुपसून निपचित पडून असे. जमिनीवर सगळीकडं त्याच्या ओल्या पावलांचे ठसे... पिवळट... उग्र वासाचे!

अखेरच्या श्वासाची वाट पाहत मृत्यूशय्येवर पडलेल्या खूबचंदच्या गढूळ डोळ्यांत इस्थाला मधूनच कसलीशी चमक दिसे. बेडरूमच्या खिडकीचं प्रतिबिंब... कधी खिडकीपल्याडच्या आकाशाचा तेजस्वी निळा तुकडा... आणि एकदा तर त्या निळाईच्या पोटातून भरारी घेणारा सुंदर देखणा पक्षी... तोसुद्धा दिसला होता क्षणभर... त्या हिरवट, गढूळ मृत्युगोलात!... कुजलेल्या गुलाबांच्या गोडुस मरणगंधामध्ये भिजलेल्या, फुटलेल्या डोक्यातून उसळणाऱ्या लालकाळ्या रक्ताच्या चिळकांड्यांनी आतल्या आत भळभळणाऱ्या इस्थासाठी मरत-मरत जगणारा खूबचंद एक कोडंच होता... एखादा इतका नाजूक, स्पर्श केला; तरी मोडून पडेल, इतका ठिसूळ जीव जगू शकतो... जगूच कसा शकतो?... इतक्या नगण्य अस्तित्वाला जगण्याची मुभा असते? हा कसला भलताच चमत्कार? मरतुकड्या डोळ्यांच्या गढूळ बुबळांमधून उडणारे पक्षी तेवढ्यात दिसले आणि इस्थाला एकदम हसूच फुटलं.

खूबचंदच्या मृत्यूनंतर इस्थानं त्याचं 'चालणं' सुरू केलं. तासन्तास... सलग... नुसतं चालणंच! आधी शेजारपाजारच्या रस्त्यांवरून... गल्लीबोळांतून... बघता-बघता त्याच्या पावलांना नव्या वाटा फुटल्या. त्या वाटांनी इस्थाला चहूदिशांनी दूरवर ओढून न्यायला सुरुवात केली.

इस्था सतत रस्त्यावरच असे. कुठूनतरी कुठंतरी निघालेला. हळूहळू लोकांनाही त्याच्या या अफाट चालण्याची सवय झाली. रुबाबदार कपडे घातलेला एक माणूस रस्त्यानं चालतोय... अव्याहत. हळूहळू त्याचा चेहरा काळवंडला. डोळ्यांभोवतीची वर्तुळं बंधमुक्त होऊन मोकळ्या हवेच्या झोताबरोबर अगदी क्षितिजापार पोचली. काळसर, खडबडीत चेहऱ्यावर नव्या सूर्य-सुरकुत्यांचं प्रौढ, प्रगल्भ जाळं पसरलं... इस्था होता; त्यापेक्षा बराच पोक्त, सूज्ञ आणि समंजस दिसायला लागला. अथांग समुद्राची सारी गुपितं पोटात घेऊन शहराच्या गजबजाटात शांतपणानं वावरणाऱ्या कोळ्यासारखा!

आयमेनेममध्ये परत आल्यानंतर इस्थाची भटकंती पुन्हा सुरू झाली. त्यानं अख्खं गाव पायांखाली घातलं.

...पण आता बदललं होतं सगळं.

तो नदीकाठी फिरायला गेला, तर पावलापावलांवर घाण, कचऱ्याचे ढीग आणि जागतिक बँकेच्या कर्जातून खरेदी केलेल्या कीटकनाशकांचा वास मारणारं कुजकट पाणी... मासे तर बहुतेक मरूनच गेलेले... उरलेल्यांचा तडफडाट.

रस्त्यावरून जावं, तर दुतर्फा नवजात श्रीमंतीच्या ताज्या पुटकुळ्यांचा गजबजाट!

आखाती देशांत नको इतका घाम गळून मिळवलेल्या नको इतक्या पैशातून नर्सेस्, वायरमन, गवंडी, सुतार आणि बँकांतल्या कारकुनांनी बांधलेल्या भडक घरांच्या रांगा! त्यांच्यामागे अंग चोरून उभे असलेले जुने वाडे... हरवलेल्या वैभवाच्या खुणांचे व्रण अंगावर वागवणारी कोसळत्या सरंजामशाहीची उद्ध्वस्त प्रतीकं! त्या घरांची पूर्वीची शान गेलीच होती... भोवतीचं ऐसपैस आवारही आटत-आटत अगदी अंगण ओसरीला भिडलं होतं. आटलेलं अंगण आणि आटलेला अधिकार स्वत:च्या रबराच्या झाडांपुरताच, शिवाय जुनाट वृद्ध भिंतीवर चढलेलं शेवाळं!... विखारी मत्सराच्या थयथयाटानं पसरावा विषाचा अंमल, तसं चोहीकडं पसरलेलं... हिरवट... काळपट...

इस्था चालत राहिला. अखंडपणे. आयमेनेममधली गल्ली-गल्ली तुडवत राहिला. त्याच्या पणजोबांनी अस्पृश्यांच्या मुलांसाठी बांधलेली गावातली शाळा... सोफी मॉलचं ते जुनाट पिवळट चर्च... आयमेनेम युथ कुंग फू क्लब... टेन्डर बड्स नर्सरी स्कूल (बड्या प्रतिष्ठित मुलांसाठी, अर्थात!)... तांदूळ, साखर आणि छताला टांगलेल्या पिवळ्या रसरशीत घडांमधील केळी विकणारं रेशन दुकान... आता तिथल्या त्या जुनाट दोऱ्यांवरून उघड्यानागड्या बायका आणि त्यांच्यावर ओणवलेल्या पुरुषांची भडक, उत्तेजक शरीरं लोंबत होती... शिवाय त्यांच्या मध्येमध्ये गरमगरम लैंगिक वर्णनांचा दक्षिणात्य मसाला ठासून भरलेला! रेशन न्यायला येणाऱ्या भोळ्याभाबड्या खेडुतांच्या नजरा वाऱ्यावर फडकणाऱ्या त्या चटोर मसिकांमध्ये हमखास अडकून पडत... भरदार शरीराच्या लुसलुशीत बायकांची तेवढीच नजरभेट! निवळ रक्तमांसाच्या उंचसखल ढिगांमध्ये हातपाय पसरून झोपलेल्या बायका... 'त्या' मासिकांच्या भडक पानांमध्ये कोंबून रेशनच्या दुकानात टांगलेल्या!

इस्था कधीकधी जुन्या लकी प्रेसजवळ फिरायला जाई. कॉम्रेड के.एन.एम. पिल्लईंची प्रिंटिंग प्रेस. एके काळचं आयमेनेममधलं कम्युनिस्ट पार्टीचं अधिकृत ऑफिस. तिथं झाडून सगळ्या कम्युनिस्टांचा अड्डा असे... मध्यरात्र उलटेपर्यंत अभ्यासवर्ग चालत... संपूर्ण क्रांतीची स्वप्नं बघणाऱ्या जहाल साम्यवादी गीतांची पत्रकं तिथंच छापून वाटली जात... आता काही उरलं नव्हतं त्यातलं. फक्त छपरावर क्षीणपणानं उभा असलेला एक अशक्त, मलूल लाल बावटा. त्याचा तो लाल रंगही कधीचा उडून गेला होता.

भुरकट झालेले वृद्ध, विसविशीत बंडी अंगात घातलेले, शुभ्र केसांच्या मऊ भुरकुलातून उठून दिसणाऱ्या कोमट काळ्या डोळ्यांचे कॉम्रेड पिल्लई भल्या सकाळी घराबाहेर पडत. परातीत घालून कणीक मळावी, तशी मिरपूड घातलेल्या खोबरेल तेलानं चोळून-चोळून रगडलेली त्यांची सैलसर त्वचा वृद्ध हाडांच्या सांगाड्यावर आरामशीर पसरलेली दिसे. कॉम्रेड पिल्लई एकटेच राहत. त्यांची पत्नी कल्याणी गर्भाशयाच्या कॅन्सरनं गेलेली आणि मुलगा – लेनिन आयमेनेम सोडून दिल्लीत स्थायिक झालेला. तिथं तो परदेशी

वकिलातींसाठी ठेकेदार म्हणून काम करी.

घराबाहेरच्या अंगणात बसून कॉम्रेड पिल्लईंचं 'अभ्यंग' चालू असताना समोरून जाणारा इस्था दिसला, तर ते हटकून त्याला हाक मारीत.

'इस्था, मॉन!'

– एके काळी टिपेचा असणारा त्यांचा भरदार आवाज आता बराच जीर्ण झाला होता. फडातला उभा ऊस करकरत मोडावा, तशी ती दुभंगलेली हाक ऐकू आली की इस्था शांतपणे कॉम्रेड पिल्लईंना अभिवादन करी.

'गुडमॉर्निंग! काय म्हणताय?... तुमचं रोजचं मालीश ना?'

– आणि तो शांतपणे वाटेला लागे. औद्धत्य नाही, उगीचच खोटा विनय नाही... एक शांत, स्वाभाविक प्रतिसाद!

...रक्ताभिसरणाचा वेग वाढावा, म्हणून कॉम्रेड पिल्लई खूप वेळ आपल्या शरीरावर इकडंतिकडं चापट्या मारत बसत. इतक्या वर्षांनंतर इस्थानं आपल्याला ओळखलं तरी असेल का, हे त्यांचं त्यांनासुद्धा कळत नसे; पण त्याबद्दल वैषम्य वगैरे वाटून घेण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. झाल्यागेल्या हर-एक गोष्टीत कॉम्रेड पिल्लईंचा सहभाग होता, हे खरं; पण भूतकाळातल्या सगळ्याच बेरीज-वजाबाक्या आपल्याच खात्यात जमा करणं त्यांना फारसं मानवत नसे. 'राजकारणाच्या अपरिहार्य आणि आवश्यक प्रवासातले टाळता न येणारे परिणाम' अशी संज्ञा देऊन त्यांनी आपल्या राजकीय भूतकाळाचं बोचकं पक्कं बांधून टाकलं होतं.

...तरीही कॉम्रेड पिल्लईंच्या कोमट रक्तातली राजकारणाची झिंग उतरली नव्हती. सोयीस्कर रंग चढवून कातडी वाचवणाऱ्या सरड्याच्या धूर्ततेनं वावरण्याची जुनी सवय. 'आत' नक्की काय चाललंय, याचा थांग त्यांनी कधीच कुणाला लागू दिला नाही आणि सगळ्या राजकीय गोंधळातून स्वत: मात्र अगदी सहीसलामत निसटले. इतक्या हाणामाऱ्या, इतका विध्वंस... पण त्यांच्या सैल, म्हाताऱ्या, तेलकट त्वचेवर एक साधा ओरखडासुद्धा उठला नाही.

राहेल परत आली आहे, ही बातमी आयमेनेममध्ये सगळ्यांत पहिल्यांदा कॉम्रेड पिल्लईंना कळली. बातमी फारशी धक्कादायक नव्हती; पण त्यांचं औत्सुक्य मात्र जरूर चाळवलं. खरं म्हणजे, कॉम्रेड पिल्लई इस्थाला फारसे ओळखत नव्हते. इस्था तडकाफडकी आयमेनेममधून निघून गेला, त्यालाही पुष्कळ वर्षं झालेली... त्यामुळं त्याच्याबद्दल कॉम्रेडे पिल्लईंना फारसं काही आठवत नव्हतं; पण राहेलची गोष्ट वेगळी होती. कॉम्रेड पिल्लई तिला ओळखत होते. त्यांच्या नजरेसमोरच राहेल लहानाची मोठी झाली होती. त्यामुळं कॉम्रेड पिल्लई जरा बुचकळ्यात पडले. इतक्या वर्षांनंतर आयमेनेममध्ये परत यावं, असं राहेलला का वाटलं असेल? नेमक्या कुठल्या गोष्टीनं तिला

ओढ लावली असेल? – कॉम्रेड पिल्लईंना कळेना.

राहेल येईपर्यंत इस्था शांत होता... नेहमीसारखाच! पण ती आली आणि सगळंच बदललं. खोल, गहिऱ्या तळयात कुणीतरी दगड भिरकवावा आणि ढवळून जावं सगळं पात्र, तसं! राहेल आली... तिच्याबरोबर धडधडत जाणाऱ्या रेल्वेचा कर्कश खडखडाट आला... भणाणत्या वाऱ्याच्या खिडकीत बसल्यावर चेहऱ्यावर पडणारे आणि क्षणार्धात विझणारे चमकत्या प्रकाशाचे भगभगीत झोत आले... असं काय काय... भगभगीत, गजबजाटाचं! वर्षानुवर्षं कुलूपबंद करून ठेवलेलं जग बदाबदा डोक्यावर कोसळायला लागलं आणि या गजबजाटानं इस्था वैतागला. सुसाट धावणारी रेल्वे... रस्त्यारस्त्यांवर वळवळणारी वाहतूक... उसळतं संगीत... शिवाय स्टॉक मार्वेâट... शेअर बाजार. जणू धरणच फुटलं आणि कोंडून ठेवलेल्या पाण्याचे लोंढे उसळया मारीत वर्तमानाचे सगळे शांत, स्थिरचित्त क्षण गिळंकृत करत रोंरावत बाहेर धावले. आकाशातले धूमकेतू... व्हायोलिनचे सूर... एकटे एकटे ढग... आतल्या आत रुजलेलं ते धैर्य... धर्माभिमान... फडकते झेंडे... गर्तेत लोटणारे भूकंप आणि घेरून येणारं नैराश्य... सगळं काही त्या गरगरत्या भोवऱ्यांनी वाहून, निपटून नेलं... निर्दयपणे!

...मग सगळंच बदललं.

नदीकाठानं चालणाऱ्या इस्थाला पावसाचं ओलंचिंब सौंदर्य जाणवेनासंच झालं एकदम... शरीराची ऊब शोधत त्याला बिलगणारं, पावसानं काकडलेलं कुत्र्याचं पिल्लू... तेही आपलंसं वाटेना. जुन्या, वृद्ध वृक्षांच्या, अधूनमधून नदीच्या उसळत्या प्रवाहानं बाहेर फेकलेली लाल माती तुडवत तो बेभान चालत राहिला... शेवटी पाय मुडपून उकिडवी बसकण मारली आणि पावसाच्या तुफानी कल्लोळात त्यानं स्वत:ला झोकून दिलं. बुटांना चिकटलेल्या ओल्या चिखलाचे बदबदीत गोळे रपारप आवाज करीत राहिले... पावसात चिंब भिजून थंडीनं कुडकुडणारं ते कुत्र्याचं पिल्लू केविलवाण्या नजरेनं कितीतरी वेळ इस्थाकडं बघत होतं.

इस्था पुन्हा परतून आला, तेव्हा आयमेनेममधल्या घरात फक्त दोघी जणीच उरल्या होत्या – बेबी कोचम्मा आणि संतापी स्वभावाची, चिडखोर स्वयंपाकीण कोचू मारिया. माम्माची – इस्थाची आजी – त्यापूर्वीच स्वर्गवासी झाली होती. पुराणकालीन वस्तूंचा रडतखडत चाललेला व्यापार सांभाळणारा चाको कॅनडात कशीबशी गुजराण करत होता.

राहेलचं काय, तसंच जवळपास!

अम्मूही नव्हती आता. शेवटी-शेवटी अम्मू आयमेनेममध्ये आली, तीच मुळी कॉर्टिझॉनचे डोस घेऊनघेऊन भप्प सुजलेली... दूरवरच्या माणसाच्या किंचाळया ऐकू

याव्यात, तशी घरघर लागलेली आणि सतत वर-खाली धपापणारी, कोंडलेली छाती! पुढे ती फार दिवस जगलीच नाही. अम्मू गेली आणि राहेलचे पाय सुटले, ते सुटलेच. एका शाळेतून दुसऱ्या शाळेत अशी तिची भटकंती सुरू झाली. सुटीत मात्र राहेल आयमेनेममध्येच असे. चाको आणि माम्माची राहेलच्या अध्यातमध्यात नसत आणि बेबी कोचम्माला राहेल भीक घालत नसे. सुरुवातीला चाको आणि माम्माचीनं राहेलच्या आयुष्यात लक्ष घालण्याचा प्रयत्न केला थोडासा; पण लवकरच त्यांना हार मानावी लागली. पुढं त्यांनी ठरवलं, अन्नपाणी-कपड्यालत्त्यांची कमतरता पडणार नाही, एवढंच फक्त पाहायचं; बाकी लक्ष घालायचं नाही. तसंच केलंही त्यांनी... तिच्यासाठी 'व्यवस्था' करायची सगळी, पण 'काळजी' नाही!

सोफी मॉल गेली आणि आयमेनेममधल्या घराला उदास नैराश्यानं घेरलं... दुखऱ्या पावलांभोवती मऊ, पातळ मोजा चढवत जावा, तसं! काहीतरी तुटलं होतं, खुपत होतं आतल्या आत... पुस्तकांच्या रांगांमध्ये... भांड्यात शिजणाऱ्या अन्नामध्ये... माम्माचीच्या व्हायोलिन बॉक्समध्ये आणि चाकोला सतत त्रास देणाऱ्या त्याच्या पायावरच्या कुरूप-खपल्यांमध्येसुद्धा! एखाद्या नवतरुणीसारखे चाकोचे ते सुबक पाय... आणि त्यांवर सर्वत्र फुटलेल्या त्या कुरूप खपल्या!

दीर्घकाळ रेंगाळत राहाणारी मृत्यूची आठवण केवढी चमत्कारिक! मृत्यूनं अर्ध्यावर खुडून नेलेलं आयुष्य... त्याच्या आठवणी पटकन पुसल्या जातात; पण मृत्यूचा वास मात्र मागे रेंगाळत राहातो. सोफी मॉलच्या बाबतीतही तेच झालं... तसंच!

छोट्या-छोट्या गोष्टींतलं तिचं ते औत्सुक्य –

'पक्षी म्हातारे होऊन मरतात का? कुठं जातात ते मरायला? दिसत कसे नाहीत मेलेले? आकाशातून तारे पडतात. तसे मरून पडतात का पक्षी?'

...कठोर वास्तवाची चाहूल तिलाही लागते आहे, याची ती बोचरी जाणीव... लसलसत्या रक्ताच्या भडकपणानं तिच्या मनावर चढवलेला लालसर अंमल –

'मी ना अॅक्सिडेंट झालेला एक माणूस बघितला... त्याचे डोळे बाहेर येऊन दोन्ही बाजूंनी असे लोंबत होते...'

– सोफी मॉलच्या अशा कित्येक आठवणी; पण सगळंच हळूहळू अंधूक, धुरकट होत गेलं आणि तिच्या अकाली मृत्यूची भीषण जाणीव तेवढी मागं उरली. तो मरणगंध कधीच पुसला गेला नाही... दरवर्षी एखाद्या झाडाला नियमानं फळं धरावी, किंवा सरकारी नोकरीचा अमरपट्टा असावा; तसा तो वास! अगदी पक्का, कायमचा! सोफी मॉलच्या त्या मरणगंधाच्या सोबतीनंच राहेल वाढली. या शाळेतून त्या शाळेत मजल-दरमजल करता-करता बालपण सरलं आणि तारुण्य बहरलं.

अकरा वर्षांची असताना राहेलचं नाव पहिल्यांदा 'ब्लॅक लिस्ट'मध्ये गेलं, तेव्हा ती

‘नाझारेथ कॉन्व्हेन्ट स्कूल’मध्ये शिकत होती.

गुन्हा?... हाऊसमिस्ट्रेसच्या बागेसमोर पडलेल्या ताज्या शेणाच्या गोळयाला फुलांनी सजवणं!

दुसऱ्या दिवशी सकाळी ‘असेम्ब्ली’ झाली. शाळेचे नैतिक कायदेकानून सांभाळणाऱ्या मंडळाचे सदस्य एकत्र आले. त्यांनी राहेलला ऑक्सफर्ड डिक्शनरी उघडायला लावली आणि ‘डिप्रॅव्हिटी’ या शब्दाचा अर्थ शोधण्याचा हुकूम केला.

‘डिप्रॅव्हिटी’ – द क्वालिटी ऑर कन्डिशन ऑफ बीईंग डिप्रॅव्हड् ऑर करप्ट!’– राहेलनं मोठ्यानं वाचून दाखवलं. मागच्या बाजूला मख्ख, कोरड्या चेहऱ्यांच्या नन्स बसलेल्या आणि समोर गालांतल्या गालांत मिश्कील हसून राहेलची फजिती पाहणाऱ्या मुलींच्या रांगा!

ती पुढं वाचत राहिली.

‘नैतिक अध:पतन – आदिम पापकृत्यामुळं आत्मा विटाळण ही जन्मजात मानवी प्रवृत्ती आहे. सत् आणि असत् अशा दोन्ही प्रवृत्ती जगात प्रवेश करतात. या प्रवासात जे परमेश्वरापासून दूर जातील, त्यांच्यामध्ये फक्त असत् प्रवृत्तीच रुजतील आणि पापाचा विस्तार वाढत राहील.’ – जे. एच. ब्लन्ट

त्यानंतर बरोबर सहा महिन्यांनी राहेलची शाळेतून हकालपट्टीच झाली. वरच्या वर्गातल्या काही मुलींनी राहेलच्या विरोधात तकरार नोंदवली होती. राहेल मुद्दाम वर्गाच्या दाराआड लपून राहते आणि जाणाऱ्या-येणाऱ्या मोठ्या मुलींना धक्के मारते, असं त्यांचं म्हणणं होतं. त्यात काही चूक नव्हती किंवा अतिशयोक्तीही! राहेल खरंच अशी धक्केबाजी करीत असे.

अखेरीस प्रिन्सिपॉलनी विचारलं, की ‘का अशी विचित्र वागतेस तू?’ ...तर राहेल म्हणाली, ‘असे धक्के मारून तरी छातीवरचे उंचवटे दुखतात का, ते मला बघायचं होतं.’

– हे म्हणजे भलतंच! त्या सोवळया, कर्मठ ख्रिश्चन संस्थेला छातीवरच्या उंचवट्यांचं काय पडलंय? त्यांच्या दृष्टीनं असली काही भानगड मुळी दखलपात्रच नव्हती... आणि जी गोष्ट अस्तित्वातच नाही; ती दुखतेबिखते का, हे बघण्याचा प्रश्नच कुठं येतो?

– हे पहिलं कारण, राहेलच्या हकालपट्टीचं; त्यानंतर दोनदा तिला शाळेतून हुसकावून दिलं गेलं. एकदा शाळेत सिगारेट ओढली म्हणून; आणि दुसऱ्यांदा गंगावन घालून बांधलेल्या हाऊसमिस्ट्रेसच्या खोट्या अंबाड्याला आग लावली म्हणून! बळजबरीनं कोंडून घातल्यानंतर राहेलनं स्वच्छ कबूल केलं, की तिनंच चोरला होता तो खोटा अंबाडा.

राहेल ज्या-ज्या म्हणून शाळेत गेली; तिथल्या सगळया शिक्षकांचं दोन गोष्टींबद्दल एकमत होतं.

१. राहेल ही अत्यंत सभ्य, सुसंस्कृत मुलगी आहे.

२. तिला जवळची म्हणावी, अशी एकही मैत्रीण अगर मित्र नाही.

– हे म्हणजे सुसंस्कृतपणाचा सन्मान बहाल केलेल्या भ्रष्टाचार्‍यासारखं होतं; पण होतं खरं! त्याबद्दल शिक्षकांमध्ये आपापसांत बरीच चघळचर्चा चाले. 'शिक्षक' म्हणून आपल्या नतद्रष्ट 'विद्यार्थिनी'च्या वर्तनावर त्यांची ठळक फुली असली, तरी खाजगीत मात्र त्यांना राहेलबद्दल औत्सुक्यच अधिक वाटे. करता-करता एक गंभीर निष्कर्षही निघाला त्यातून. आपापसांत कुजबुज सुरू झाली.

मुलींनी कसं वागावं, हे कळतच नाही राहेलला... कदाचित मुलगी असणं म्हणजे काय हेच... नाही कळत!

त्या शिक्षकांचंही काही फार चूक होतं, असं नव्हे.

राहेलच्या बाबतीत एक विलक्षण गोष्ट खरंच घडली होती... तिच्याकडं सतत दुर्लक्ष होत गेलं सगळ्यांचं आणि त्यातून अगदी नकळत एका मुक्त आत्म्याचा जन्म झाला... मुक्त, स्वतंत्र!

कशासाठी जगायचं, कसं जगायचं, हे राहेलला कधीच कुणी सांगितलं नाही. ती तशीच वाढली. तिचं लग्न जमवण्यासाठी धडपडणारं कुणी नव्हतं... तिच्याकरता हुंड्याची तजवीज करणारं कुणी नव्हतं... म्हणूनच एका विशिष्ट वयानंतर आयुष्यात आपोआप, अपरिहार्यपणे उगवणारा नवरा नावाचा प्राणीही नव्हता.

...त्यामुळं राहेल अगदी मुक्त होती. ज्यात-त्यात डोकावून मनसोक्त चौकशा करण्यासाठी स्वतंत्र होती... छातीवरचे उंचवटे दुखतात का? अंबाड्यातलं गंगावन जळतं का?... आणि असे कित्येक प्रश्न! राहेल आयुष्यातही खोलवर डोकावत होती... ते कितपत जगण्याच्या लायकीचं आहे, हेही तपासून पाहत होती.

शाळेची भानगड एकदाची संपवल्यानंतर दिल्लीतल्या एका जेमतेम आर्किटेक्चर कॉलेजमध्ये तिनं प्रवेश मिळवला. तिला आर्किटेक्चरमध्ये फार समज किंवा रुची होती, असं नाही. तसं म्हटलं, तर अगदी वरवरचा इंटरेस्टसुद्धा नव्हता. राहेलनं सहज म्हणून प्रवेश-परीक्षा दिली; आणि स्वत:ला साधी अपेक्षासुद्धा नसताना ती चक्क पासही झाली. राहेलनं चारकोलची कांडी घेऊन चितारलेल्या भल्यामोठ्या आकृत्यांच्या आकारानंच परीक्षकांना भुलवून टाकलं असणार. बेदरकारपणे कागदावर ओढलेल्या आडव्या-उभ्या वेगवान रेघांना 'जन्मजात कलाकाराचा प्रतिभावंत आत्मविश्वास' वगैरे लेबलं लावली गेली आणि राहेलला प्रवेश मिळाला. प्रत्यक्षात अशा 'कलावंतपणा'ची चुकार लक्षणंही राहेलमध्ये नव्हती.

राहेलनं आर्किटेक्चर कॉलेजमध्ये तब्बल आठ वर्षं घालवली खरी; पण पाच वर्षांच्या अंडरग्रॅज्युएट कोर्सची डिग्री काही तिच्या पदरी पडली नाही. कॉलेजची फी फार महागडी

नव्हती. शिवाय होस्टेलमध्ये राहून विद्यार्थ्यांसाठी पुरवण्यात येणारं स्वस्त अन्न खाऊन दिवस आरामात कटत होते, त्यामुळं राहेलनं डोक्याला फारसे भुंगे लावून घेतले नाहीत. कधीतरी चुकूनमाकून वर्गात हजेरी लावायची... एरवी शिकाऊ विद्यार्थ्यांकडून चांगलं दामटून काम करून घेऊन वरून आपल्या चुकाचं खापर त्यांच्याच माथी फोडणाऱ्या एका कोंदट आर्किटेक्चर फर्ममध्ये ड्राफ्टस्मन म्हणून शिकाऊ नोकरी करायची, असं एकूण तिचं मजेत चाललं होतं.

इतर विद्यार्थ्यांना – विशेषत: मुलांना – राहेलच्या या स्वच्छंदीपणाचा धाकच वाटायचा. 'महत्त्वाकांक्षा' नावाची काही चीज अस्तित्वातच नसलेली कुणी मुलगी असू शकते, हे भलतंच भयंकर वाटायचं त्यांना. त्यामुळं बघता-बघता राहेल सगळ्या ग्रूपमधून वगळली गेली आणि एकटी पडली. कुणीही तिला कधी आपल्या घरी बोलावलं नाही. रात्रभर चालणाऱ्या एकाही धमाल पार्टीचं आमंत्रण दिलं नाही. एवढंच काय, तिच्या प्राध्यापकांनाही राहेल म्हणजे एक संकटच वाटे. वास्तुविद्येच्या सगळ्या सीमा ओलांडून तिने बनवलेल्या स्वप्नातल्या घरांचे चित्रविचित्र आराखडे... चुरगळलेल्या पिवळट कागदांवर बेलगामपणे ओढलेल्या वेगवान रेषा... या सगळ्याची अभ्यासपूर्ण चिकित्सा, चिरफाड करू पाहाणाऱ्या प्राध्यापकांकडं तिनं फेकलेले तटस्थ, बेपर्वा कटाक्ष... यांतलं काहीच कधी कुणाला उलगडता आलं नाही.

कॉलेजात असताना राहेल अधूनमधून चाको आणि माम्माची पत्रं लिहायची; पण त्या काळात तिनं आयमेनेममध्ये पाऊलसुद्धा ठेवलं नाही. पुढं माम्माची मरण पावली, चाको कायमच्या वास्तव्यासाठी कॅनडाला निघून गेला, तेव्हासुद्धा आयमेनेमला जावं, असं राहेलला वाटलं नाही.

आर्किटेक्चर कॉलेजमध्ये असतानाच तिला लॅरी मॅक्लिन भेटला. 'एनर्जी एफिशियन्सी इन व्हर्नाक्युलर आर्किटेक्चर' या प्रबंधाकरता संदर्भसाहित्य जमवण्यासाठी म्हणून लॅरी दिल्लीला आला होता. कॉलेजच्या ग्रंथालयात त्यानं राहेलला पहिल्यांदा बघितलं आणि नंतर खान मार्केटमध्ये. राहेल जीन्स आणि टी-शर्ट अशा नेहमीच्या वेषात होती. एका जुन्या बेडशीटवरचा पॅचवर्कचा तुकडा कापून गळ्यात अडकवलेला. लांबलचक केसांच्या काळ्या-कुरळ्या बटा चेहऱ्याभोवती फार घोंघाळू नयेत, म्हणून पाठीवर बांधलेल्या. आणि एका नाकपुडीवर लखलखणारा छोटासा हिरा! गळ्याभोवती टोकदार कॉलर बोन्सची महिरप आणि ऐन उमेदीतल्या अॅथलीटसारखं काटक, गोळीबंद शरीर.

देअर गोज् अ जॅझ ट्यून...

लॅरीच्या डोक्यात एकाएकी काहीतरी 'क्लिक' झालं आणि त्यानं त्याच्याही नकळत राहेलचा पाठलाग करायला सुरुवात केली... खान मार्केटमधल्या पुस्तकांच्या दुकानात

एकमेकांशी नजरानजर झाल्यावर मग दोघांपैकी कुणीच पुस्तकांकडं ढुंकूनसुद्धा पाहिलं नाही.

एखाद्या दमल्याभागल्या प्रवाशानं विमानतळावरच्या रिकाम्या खुर्चीच्या दिशेनं अगदी सहजपणे चालत जावं; तशी राहेल लॅरीकडं ओढली गेली आणि तिनं लग्न केलं... खुर्चीत बसून हुश्श करावं, तसं! लग्नानंतर लॅरी बोस्टनला परतला. त्याच्याबरोबर राहेलही होती.

लॅरीनं आपल्या नव्याकोऱ्या बायकोला मिठीत घेतलं, तेव्हा तिचे गाल त्याच्या हृदयाशी लागले... तिच्या लहानखुऱ्या शरीराच्या कितीतरी वरून दृष्टी फिरवावी इतकी लॅरीची नजर उंच होती. मिठीत लपेटून घेतलेल्या राहेलच्या डोक्यावरचं दाट केसांचं भुरकुल त्याला सहज दिसत होतं आणि तिचे उष्ण श्वास त्याच्या हृदयाभोवती रुंजी घालत होते. लॅरीनं राहेलच्या ओठांवरून हलकेच हात फिरवला. कोपऱ्यावरच्या नाजूक खोबणीत एक छोटासा तीळ होता. ती जागा लॅरीला बेहद्द आवडली... आणि राहेलच्या त्वचेच्या आतून उड्या घेणारं, उसळणारं ते रसायन! सगळं अस्पष्टच होतं... अंधुकसं... पण त्याची हालचाल जाणवत होती स्पर्शातून! लॅरी त्या स्पर्शाचं सुख भरभरून लुटत राहिला... राहेलच्या शरीरातून उमलणारा तो गूढ नाद नजरेनं ऐकत राहिला. होऊ घातलेल्या एखाद्या बापानं आपल्या गर्भवती स्त्रीच्या ताणल्या त्वचेला कान लावून गर्भामधल्या बाळाच्या हालचालींचा वेध घ्यावा, इतकी तन्मयता होती लॅरीच्या नजरेत!

आत्यंतिक प्रेमानं दिलेली अमूल्य भेट असावी, अशा अपूर्वाईनं, अभिमानानं लॅरीनं राहेलला आपल्या मिठीत घेतलं... ती छोटीशी, लहानखुरी 'भेट' त्याच्या कुशीत दिसेनाशी झाली.

...बिछान्यावर मात्र तो दचकला. राहेलच्या डोळ्यांत काही वेगळंच दिसत होतं... दुखावणारं! जणू ते डोळे राहेलचे नव्हतेच, इतके परके... कुणा तिसऱ्याच व्यक्तीचे असावेत असे! त्यांचा संभोग नजर रोखून पाहणारे... बऱ्याचदा खिडकीबाहेरच्या समुद्रात भिजलेले... कधी नदीमधल्या होडीशी गुंतलेले... तर कधी धुक्यातून चालणाऱ्या कुणा वाटसरूच्या गूढ पावलांमध्ये रुजलेले!

– लॅरी संतापला. राहेलच्या या अशा विचित्र नजरेचा अर्थ काय, हे त्याला समजेना. हजार-लाख धाग्याधाग्यांनी गुंतलेला, गजबजलेला तो अतर्क्य गुंता लॅरीला काही केल्या सोडवता येईना, तसा तो चिडला. मनातच. आतून धुसफुसलं काहीतरी. त्याला वाटलं, तटस्थता असेल एकतर, बेपर्वाई किंवा मग नैराश्य... कदाचित त्याच्यामधलं काहीतरी! राहेल जिथं जन्मली, जिथलं अन्न-पाणी-हवा स्वभावसूत्रांवर वाढली; त्या तिच्या देशात नैराश्यादेखील अनेकानेक छटा असतात, हे कुठलं लॅरीला माहीत असायला? एकमेकांत गुंतलेले असंख्य धागे – लसलसणारे, वरवर झेपावणारे. त्यांतला व्यक्तिगत नैराश्याचा

धागा फारच दुबळा, विसविशीत. तसं मानावंच लागतं रीतीप्रमाणे. म्हणून मग तो महत्त्वाचाही नसतो तितकासा. व्यक्तिगत आयुष्यातले कल्लोळ समाजातल्या वादळांपुढं समर्पित झाले की मग ते खरं नैराश्य. देशात प्रचंड खळबळ माजली, लाठ्याकाठ्या टक्करल्या, डोकी फुटली, रक्ताचे पाट उसळले... प्रचंड भयंकर आणि हृदयशून्य, चक्रीवादळासारखं हेलपाटून टाकणारं किंवा प्रचंड विनोदी... किंवा शुद्ध मूर्खपणाचं, विवेकशून्य असं काहीही उसळलं, की राष्ट्रीय अणीबाणीच्या त्या पवित्र स्थळाशी अर्पून टाकायची व्यक्तिगत नैराश्याची बोचकी... म्हणजे कसं काहीतरी घडल्यासारखं वाटणार!

...हे असे 'बिग गॉड' खदाखदा हसणार, आरोळ्या ठोकणार; की मग सर्वसामान्यांनी त्यांना लवून मुजरा करायचा, सक्तीनं. तोही अगदी पाठीचा कणा मोडून जाईस्तोवर.

...आणि मनातल्या मनात आक्रोशणारे, छोट्या-छोट्या व्यक्तिगत दु:खाच्या बोचक्यात घुसमटून तडफडणारे 'स्मॉल गॉड' कोंडून ठेवायचे. हर-एक दुखणारा, ठणकणारा क्षण खाजगी, स्वत:पुरता, स्वत:चाच म्हणून दाबून, पुरून टाकायची सगळी भळभळ.

...असा एकाकी दु:खानं डागलेला, निगरगट्ट, स्वत:च्या अशक्त वांझ साहसावर बधिरपणे हसणारा 'स्मॉल गॉड'... स्वत:चं क्षुल्लक अस्तित्व इतकं अंगवळणी पडलेलं, की कशाचंच काही वाटू नये. कशाचं काही वाटूच नये. उकळत्या पाण्यातली सळसळती वाफ जिरून ओशट तवंग धरावा, तसं!

कशालाच काही महत्त्व नव्हतं उरलं. भलभलत्याच उलथापालथी घडत होत्या वर्तमानात. सगळंच बिघडलेलं, खालावलेलं. डोक्यावर टांगलेल्या नग्न तलवारीसारखी रक्तरंजित युद्धाची भेसूर दहशत आणि सक्तीच्या शांततेची किळसवाणी भीती या दोन टोकांमधली समतोल-कसरत साधता-साधता आतून भेलकांडलेला राहेलचा देश आणि दर क्षणी नव्या अशुभ अनर्थाला जन्म देणारं वर्तमान.

...'स्मॉल गॉड'च्या चेहऱ्यावर पोकळ, रिकामा का असेना; पण हास्याचा बधीर अंशच फक्त. त्यातून मग तटस्थता. आणि मग मस्त बेपर्वाई. श्रीमंताघरच्या लाडावलेल्या, संवेदनशून्य पोरानं अर्धी चड्डी घालून मजेत शीळ वाजवत रस्त्यावरचे दगड पायानं उडवत बेदरकार भटकावं ना, तसं! ठिसूळ का असेना, पण होता आनंद. आपलं व्यक्तिगत नशीब फुटकं असलं, तरी ठिकऱ्या उडालेल्या राष्ट्रीय हिशेबापेक्षा पुष्कळ बरं... याचाच कदाचित! म्हणजे आनंद. असे 'स्मॉल गॉड' मग मुक्त सुटले सुखदु:खाच्या भोवऱ्यातून आणि कुणाकुणाच्या डोळ्यांत वस्तीला गेले... तिथं तिथं मग एक संथ, गूढ नजर साकळली. इतकी गूढ आणि धांदरली नजर, की शरीरात घुसू पाहणाऱ्या परक्या माणसाचा भडकाच उडावा एकदम, जसा की लॅरी.

खरं म्हणजे लॅरी मॅक्लॅस्लीनने राहेलच्या डोळ्यांत जे पाहिलं, ते दु:ख, नैराश्य नव्हतंच मुळी!... तिनं ओढूनताणून जमवलेली भविष्याची आशा होती तिथं आणि एक खोल

गहिरी पोकळी! त्या पोकळीत कधीकाळी इस्थाचे शब्द असत... आता संपलेले, विझून गेलेले; पण लॅरीला हे कसं कळणार? जुळ्या भावंडांमधल्या एकाच्या मनातलं भकास रिकामपण दुसऱ्याच्या मनात येतंच वास्तव्याला आणि तिथल्या गजबजाटावर निश्चल साय धरत जातं. दोघांच्या स्वतंत्र अस्तित्वाची नाळ आतून गुंतलेली असते एकमेकांत... जसे एका ढिगातले दोन चमचे, किंवा परस्परांमध्ये बुडालेल्या प्रेमिकांची दोन शरीरं! – पण हे लॅरीला कसं कळणार?

घटस्फोट झाल्यानंतर राहेलनं न्यूयॉर्कमधल्या एका भारतीय रेस्टॉरंटमध्ये वेट्रेस म्हणून काही महिने काम केलं. त्यानंतर वॉशिंग्टनबाहेरच्या एका पेट्रोलपंपावर बुलेट-प्रूफ केबिनमध्ये बसून रात्रभराचे आर्थिक व्यवहार सांभाळले. 'नाईट क्लार्क' म्हणून ती बरीच वर्षं तिथं होती. अख्ख्या रात्रींमध्ये पैशाच्या देवाणघेवाणीखेरीज पुष्कळ काही घडत असे. दारू पिऊन झोकांड्या खाणारी गिऱ्हाइकं पैशांच्या ट्रेमध्ये बदाबदा उलट्या करीत... शरीराच्या बाजारपेठेत दलाली करणारे भडवे डोळे मिचकावून राहेलला नव्या गलेलठ्ठ पगाराच्या नोकऱ्यांसाठी 'ऑफर्स' देत. गाडीच्या काचा फोडून आतल्या माणसांना गोळ्या घालून ठार मारण्याचा थरार दोनदा तिच्या नजरेसमोर घडला होता. आणि एकदा तर पाठीत सुरा भोसकलेला, रक्तानं लदबदलेला माणूस बाहेर ढकलून देत प्रचंड वेगानं एक गाडी तिच्यासमोरून निघून गेली होती.

एके दिवशी बेबी कोचम्माचं पत्र आलं. 'इस्था पुन्हा परतून आला आहे' हे कळताच राहेलनं तत्काळ पेट्रोल पंपावरची नोकरी सोडून दिली आणि अमेरिकेला आनंदानं रामराम ठोकला.

...तिला परत यायचं होतं.

आयमेनेमला भेटायला... आणि भर पावसात सचैल भिजणाऱ्या इस्थाला!

टेकडीवरच्या त्या जुन्या घरात जुनवट काकडीच्या आतला बुळबुळीत, फेसाळ गर काढीत बेबी कोचम्मा बसली होती. जेवणाच्या टेबलावर तिची सगळी खुडबुड चाललेली... फुग्यांच्या बाह्या असलेल्या चट्ट्यापट्ट्यांच्या नाईट गाऊनवर हळदीचे डाग पडलेले. पण टेबलाखाली एका लयीत डोलणारी तिची पावलं मात्र भलतीच रुबाबदार! उंच खुर्चीवर बसलेल्या एखाद्या लहान मुलानं आपल्या अधांतरी पायांना मजेत हेलकावे द्यावेत, तशा बालिश उत्साहात बेबी कोचम्माची पावलं टेबलाखाली नाचत होती. हवा भरलेल्या छोटेखानी उश्यांसारख्या दोन गुबगुबीत सपाताही त्या पावलांना बिलगून बसलेल्या! बेबी कोचम्माला आपल्या नाजूक, देखण्या पायांचा कोण अभिमान! जुन्या काळी आयमेनेममध्ये कुणीही पाहुणे आले, की हटकून त्यांचं लक्ष तिच्या पायांकडं जायचं आणि प्रत्येकाच्या लांबरुंद, फताड्या पावलांना ती हटकून नाकं मुरडायची; पण एवढं

करून तिचं समाधान होत नसे. त्या पाहुण्यांच्या स्लीपर्स आपल्या पायांत घालून बेबी कोचम्मा घरभर फिरायची, साडी थोडीशी वर उचलून इतरांचं लक्ष वेधत अभिमानानं म्हणायची,

'पाहिलंत? किती मोठ्ठ्या आहेत माझ्या पायापेक्षा!'

– आपल्या नाजूक, सुबक पावलांचं सगळ्यांनी अगदी भरभरून कौतुक करावं, म्हणून तिची कोण धडपड!

काहीशा अभिमानानं उंचावलेली मान थोडीशी तिरपी करत बेबी कोचम्मा पुष्कळ वेळ काकडी सोलत राहिली. तिच्या नजरेतली चमक लपता लपत नव्हती. इस्था राहेलशी एका शब्दानंही बोलला नाही, म्हणून तिच्या मनात आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. राहेलकडे एक कोरडा कटाक्ष टाकून इस्था सरळ चालता झाला. घराबाहेर... भर पावसात! सगळ्यांशी तो असंच वागायचा. त्याने अगदी राहेलचाही अपवाद केला नाही, हे बघून बेबी कोचम्मा भलतीच आनंदली होती.

...त्र्याऐंशी वर्षांचं वय आणि जाडजाड काचांच्यामागे वितळलेल्या लोण्यासारखे दिसणारे दोन डोळे!

"बघ, मी तुला सांगितलं होतं ना?... तस्संच वागला तो."– बेबी कोचम्मा राहेलला म्हणाली, "तुला काय वाटलं? तो तुझ्याशी फार चांगला वागेल?... विसरूनच जा आता. तो वेडा झालाय पार. मी सांगते, त्याच्या डोक्यावर परिणामच झाला असणार... नक्की! तो कुणालाही ओळखत नाही आता, कळलं का?"

– राहेल गप्पच राहिली.

एखादा काळा, अवजड फत्तर असावा, तसाच दिसत होता इस्था... अविचल आणि कोरडाठाक! तरीही त्याच्या 'आत' झुळझुळणाऱ्या झऱ्यांचे नाद राहेलला ऐकू येत होते. बरसत्या पावसाचा चिंब ओला स्पर्श अजूनही इस्थाच्या रोमारोमांतून वाहतोय, हे तिला जाणवत होतं. त्याच्या मनामध्ये भरून राहिलेल्या विराण उद्ध्वस्ततेच्या वेदनेची कळ तिच्याही जिवाला डसत होतीच.

बेबी कोचम्माला राहवेना. अस्वस्थ नजरेनं तिनं राहेलकडं पाहिलं. इस्था परत आल्याचं आपण कशाला या बयेला कळवलं, म्हणून ती स्वत:वरच वैतागली होती; पण या पश्चात्तापालाही प्रश्न फुटतच होते. नसतं कळवलं राहेलला, तर इस्थाचं काय केलं असतं आपण? त्याला जन्मभर सांभाळण्याचा मक्ता पेलवला असता का आपल्याला? आणि का म्हणून? इस्था ही काय आपली जबाबदारी आहे?

– पण असं कसं?

– नाकारता येईल त्याची जबाबदारी?

एक विचित्र शांतता पसरली दोघींमध्ये. राहेल आणि बेबी कोचम्मा शून्यवत बसून

राहिल्या आणि त्यांच्यामध्ये एक विचित्र थबकलेपण... जणू तिसरी व्यक्तीच असावी, असं!... सोलवटून निघालेलं, दुखावलेलं... रक्तबंबाळ!

या थबकल्या संवादाचा विषारी अंमल असह्य झालेल्या बेबी कोचम्माला मग गप्प बसवेना. रात्री झोपताना बेडरूमच्या दाराला आतून कडी लावण्याची आठवण करून देत, काहीतरी बोलायचं म्हणून ती राहेलला म्हणाली,

'कसाय माझा बॉबकट? आवडला तुला?'

– काकडी सोलून-सोलून पांढरट मऊ झालेले हात तिनं केसांवरून फिरवले आणि आपल्या नव्याकोऱ्या बॉबकटला कौतुकानं कुरवाळलं. बोटांमध्ये अडकलेला काकडीचा फेसाळ गर तिच्या केसांमध्ये कुठे-कुठे अडकून लोंबत राहिला.

राहेलकडे बोलण्यासारखं काही उरलंच नव्हतं. काकडीची सालं काढणाऱ्या बेबी कोचम्माकडे ती एकटक बघत राहिली. हिरवट पिवळ्या सालांचा तो ढीग कोचम्माच्या अगदी छातीशी आला होता. एखाद्या रिळाभोवती दोरा गुंडाळावा, तसे डोक्याच्या कातडीवर लाईनशीर बसवलेले काळे कुळकुळीत केस... केसांना लावलेला कलप ओघळून कपाळावर पडलेले डाग... त्यामुळे पुष्कळच खाली खेचल्यासारखा दिसणारा भांग आणि केसांच्याही पुढे धावलेलं कपाळावरचं काळसर वळण!

बेबी कोचम्मा आपल्या म्हाताऱ्या चेहऱ्यावर मेकअपदेखील चढवायला लागलीय, हे राहेलला पहिल्यांदाच जाणवलं. ओठांवर लिपस्टिक दिसत होतं आणि गालांवर रुजचे गोळे. आधीच घर बंदिस्त... कोंदट... त्यात बेबी कोचम्माचे आवडते चाळीस वॅटचे कोमट बल्ब लावलेले... त्यातून गळणाऱ्या त्या अशक्त, अंधाऱ्या प्रकाशात बेबी कोचम्माचा चेहरा भीषण दिसत राहिला. रंगवलेले ओठ एकीकडे आणि जबडा भलतीकडेच!

चेहऱ्यावरचं मांस झडलेलं, मानेभोवतीची वर्तुळं कमी होऊन खांदेही पुष्कळ सुबक सुटे झालेले. त्यामुळे बेबी कोचम्माच्या गोलमटोल शरीराला एक उभट सडपातळ रूप आलं होतं. त्यातून ती डायनिंग टेबलाशी बसलेली. तिचं भरदार, मांसल ढुंगण टेबलाखाली लपल्यामुळे बेबी कोचम्मा अगदी बारीक, जवळपास अशक्तच दिसत होती. खोलीतल्या पिवळट, अंधूक प्रकाशाने गालांभोवतीच्या सुरकुत्याही वितळून टाकलेल्या... त्यामुळे खोल गेलेल्या तिच्या चेहऱ्यावर तारुण्याची एक विचित्र झाक पसरली होती. त्यातून अंगभर घातलेले झगमगते दागिने. राहेलच्या स्वर्गवासी आजीचा एकूण एक जिन्नस बेबी कोचम्मानं अंगावर चढवला होता. चमकत्या अंगठ्या... हिऱ्यांची कर्णफुलं... सोन्याच्या बांगड्या आणि गळ्याभोवतीची नाजूक, सुंदर सोनसाखळी. बेबी कोचम्माची बोटं सारखी त्या सोनसाखळीशी खेळत. ती आपल्या गळ्याभोवती आहे, आपल्या मालकीची आहे, याचा आनंद त्या बोटांमध्ये शिगोशीग भरलेला दिसे. दागिन्यांनी मढलेल्या एखाद्या नववधूचा स्वत:च्या सौभाग्यावर विश्वासच बसू नये, तशी बेबी

कोचम्माची धांदरफळी अवस्था झालेली होती.

अर्ध्या गोवर्‌या स्मशानात पोचल्या, तरी असा शौक? एवढा उत्साह?... बेबी कोचम्मानं आपलं आयुष्य उलटं फिरवण्याची धडपड चालवलीय. ती पुन्हा मागं फिरतेय... नक्कीच! राहेलच्या मनात अचानक काहीतरी चमकून गेलं.

राहेलचं हे निरीक्षण अचूक होतं अगदी. बेबी कोचम्मा अशीच जगत आली होती आयुष्यभर... वर्तमानाचा सहज स्वीकार तिला कधीच करता आला नाही. ती सतत स्वत:ला उलट्या दिशेनं लोटत, ढकलत राहिली. ऐन तारुण्यात तिनं उपभोग झिडकारून लावले; आणि आता म्हातारपणात पोचल्यावर तिला इंद्रियांचे शौक जडले होते. छैलछबिली हौसमौज तिनं अगदी अप्रुपानं कवटाळली आणि शरीरमनाचे सगळे मोहदेखील तिला येऊन बिलगले.

वयाच्या अठराव्या वर्षी बेबी कोचम्मा पहिल्यांदा प्रेमात पडली. फादर मुलीगन – मद्रासच्या कॅथॉलिक स्कूलमधून वर्षभरासाठी केरळात आलेल्या या आयरिश फादरवर बेबी कोचम्माचं मन जडलं. हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानात नसलेले दोष अधिक बेमालूमपणे लोकांना सांगता यावेत, म्हणून फादर मुलीगन हिंदू धर्मग्रंथांचा बारकाईनं अभ्यास करीत होते.

बेबी कोचम्माचे वडील रेव्हरंड ई. जॉन आयपे हे मार थोमा चर्चचे धर्मगुरू. त्यांना भेटण्यासाठी म्हणून फादर मुलीगन दर गुरुवारी आयमेनेममध्ये येत असत. रेव्हरंड आयपे यांना ख्रिश्चन धर्मीयांमध्ये मोठं मानाचं स्थान होतं. सीरियन ख्रिश्चन चर्चचे सार्वभौम सम्राट असलेले बिशप अंत्योख यांचा प्रत्यक्ष आशीर्वाद लाभलेले रेव्हरंड आयपे... त्या आशीर्वादाच्या दंतकथा आयमेनेममध्ये वर्षानुवर्षं सांगितल्या आणि ऐकल्या जात.

१८७६ मध्ये बेबी कोचम्माचे वडील सातेक वर्षांचे होते. त्या वेळी त्यांच्या वडिलांनी त्यांना बिशप अंत्योखच्या भेटीला नेलं. बिशप अंत्योख केरळमधल्या सीरियन ख्रिश्चनांना भेटण्यासाठी आले होते. कोचिनच्या कॅल्नी हाउसमध्ये पश्चिमेकडच्या व्हारांड्यात बिशप अंत्योखचं भाषण चाललेलं. समोर प्रचंड गर्दी. त्या गर्दीत हे दोघे पिता-पुत्र अगदी योगायोगानं बिशपच्या समोर पहिल्याच रांगेत उभे होते. तेवढी संधी साधून वडिलांनी आपल्या छोट्या मुलाच्या कानात काहीतरी सांगितलं आणि त्याला जोरानं पुढे ढकललं. नक्की काय चाललंय, हे न समजून घाबरगुंडी उडालेला तो छोटा मुलगा ठेचकाळत, धडपडत बिशपसमोर जाऊन उभा राहिला. भीतीनं थरथरणारे ओठ त्यानं बिशपच्या बोटांमधल्या त्या पवित्र अंगठीवर टेकवले. त्याच्या ओठांमधून बोटांवर गळलेली फेसाळ थुंकी बिशपनी पटकन पुसली आणि भीतीनं थरथरणार्‌या त्या छोट्या मुलाला आशीर्वाद दिला. पुढे पुष्कळ वर्षांनी तो मुलगा मोठा झाला, 'रेव्हरंड' बनला; तरीही त्याला 'पुन्नयन कुंजू' – आशीर्वादानं पवित्र झालेला छोटा मुलगा – म्हणूनच ओळखलं जाई. त्याच्या

दर्शनासाठी कुठून कुठून लोकांच्या झुंडी येत. छोट्या होड्यांमधून नदी पार करून अलेप्पी आणि अर्नाकुलममधले गावकरीही आपल्या कच्चाबच्चांना घेऊन 'पुन्नयन कुंजू'च्या आशीर्वादासाठी येत.

फादर मुलीगन आणि रेव्हरंड आयपे समवयस्क नव्हते. चर्चच्या अधिकारकक्षेतली त्यांची स्थानंही वेगवेगळी होती (त्या दोघांमधला एकमेकांबद्दलचा कडवट असंतोष चर्चला हवाच होता नाहीतरी...). तरीही दोघांना एकमेकांचा सहवास हवासा वाटे. त्यामुळं फादर मुलीगन यांना रेव्हरंड आयपेंच्या घरी पुष्कळ वेळा दुपारच्या भोजनाचं निमंत्रण असे. जेवणं पार पडली, तरी पुष्कळ वेळ त्या टेबलाभोवतीच घोटाळत राहणाऱ्या एका तरुण मुलीच्या शरीरात उधाणलेल्या उष्ण-गरम लाटा कसल्या आहेत, हे त्या दोघांपैकी एका पुरुषानं पक्कं जोखलं होतं.

सुरुवातीला साप्ताहिक समाजसेवेचं उत्तम नाटक वठवून बेबी कोचम्मानं फादर मुलीगनला फशी पाडण्याचा प्रयत्न करून पाहिला. दर गुरुवारी फादर यायची वेळ झाली, की बेबी कोचम्मा रस्त्यावरच्या एखाद्या मरतुकड्या दरिद्री पोराला पकडून आणी. अंगणातल्या विहिरीवर त्याला घेऊन जायचं आणि खपाटीला गेलेल्या पोटातून बाहेर आलेल्या त्याच्या फासळ्यांना चोळून-चोळून साबण लावायचा... लाल साबणाची घट्ट वडी अंगाला टोचली, की ते पोर किंचाळून धिंगाणा घाली, तरी बेबी कोचम्माची 'समाजसेवा' चालूच!

फाटकातून आत येणारे फादर मुलीगन दिसले, की तिचा चेहरा उजळे. साबणानं थबथबलेल्या त्या पोरावरची पकड जराही ढिली न करता ती फाटकाकडं नजर लावून प्रसन्न हसे आणि फादरना अभिवादन करी.

'गुडमॉर्निंग, फादर...'

'– मॉर्निंग टु यू, बेबी...'

छत्री बंद करता-करता क्षणभर थांबून फादर सस्मित प्रतिसाद देत.

पुढे पुढे या संवादाला अधिक धुमारे फुटू लागले.

'फादर, कधीपासून तुम्हांला विचारीन, म्हणते...' अशी प्रस्तावना करीत बेबी कोचम्माची टकळी सुरू होई.

'बायबलच्या पहिल्या अध्यायातल्या दहाव्या भागातल्या तेविसाव्या ओळीत म्हटलंय, की... 'सगळ्या गोष्टी माझ्यासाठी कायद्यानं बंधनकारक असल्या, तरी त्या सगळ्याच गोष्टी योग्य आहेत, असं मात्र नाही.' फादर, 'सगळ्या गोष्टी कायद्यानं बंधनकारक आहेत,' हे कसं? म्हणजे, काही गोष्टी असल्या तशा, तर मी समजू शकते... पण?'

समोर उभ्या असलेल्या तरुण, कोवळ्या मुलीच्या काळ्याभोर तेजस्वी डोळ्यांत आपण काहीतरी वेगळी भावना जागवली आहे, हे जाणवून फादर मुलीगन स्वत:वर

भलतेच खूश होत. उत्कंठेनं थरारलेला तिचा चेहरा... पटकन् पुढं होऊन ओठांत गच्च पकडावेत असे तिचे ओठ... फादर तसे तरुणच. त्यामुळं त्यांच्या आत कुठंतरी काडी ओढली जाई आणि वासनेच्या ज्वाळांचे फुगवटे शरीरभर धावत जात. बेबी कोचम्माच्या बालिश, फुटकळ शंकांना आपण खोट्या गांभीर्यानं जी उत्तरं देतो त्यांचा, बायबलमधल्या तत्त्वज्ञानाचा आणि आपल्या हिरवट डोळ्यांतून ओसंडणाऱ्या भावनांचा एकमेकांशी तसूभरही संबंध नाही, हे फादरना जाणवल्यावाचून राहत नसे.

दर गुरुवारी, माध्यान्हीच्या जळजळीत प्रखर उन्हाची पर्वा न करता बेबी कोचम्मा आणि फादर मुलीगन तासन्तास विहिरीशेजारी बोलत उभे राहत. एक तरुण मुलगी आणि निर्भय वृत्तीचा एक तरुण ख्रिश्चन धर्मोपदेशक... ख्रिस्ती धर्मतत्त्वांची उघड पायमल्ली करणाऱ्या शारीर उद्रेकांच्या लाटा कशाबशा थोपवत अवघड वाटेवरून निघाले होते. एकमेकांचा सहवास मिळवण्यासाठी 'बायबल'चं निमित्त आयतंच हाती लागलेलं... पण ते निमित्तच होतं फक्त!

दोघांच्या गप्पा चालू झाल्या, की तेवढी संधी साधून जबरदस्तीची 'आंघोळ' सहन करणारं ते पोरगं स्वत:ची सुटका करून घेई. मग फादर मुलीगन एकदम भानावर येत. स्वत:ला सावरल्यासारखं करून नेहमीचा मुखवटा चेहऱ्यावर पुन्हा चढवत आणि करुणार्द्र डोळ्यांनी म्हणत,

'ओ गॉड! आता त्या मुलाला सर्दी होणार. त्याआधीच गाठलं पाहिजे त्याला.'

मग फादर हलकेच आपली छत्री उघडत आणि गडद तपकिरी रंगाचा पायघोळ झगा सावरीत, पायांतल्या मऊ चपला चटकफटक वाजवीत नव्या कामगिरीवर निघत. लांब-लांब टांगा टाकणाऱ्या उंटाच्या डौलानं ते हलके दूर जात, तरी त्यांच्या मनात रुतलेली बेबी कोचम्मा हलत नसे. छोटेमोठे दगडगोटे तुडवीत पायगतीच्या पालापाचोळ्यावरून ते तरंगल्यासारखे चालत राहात. त्यांच्यामागून बेबी कोचम्माचं विरहानं विव्हळणारं दुखरं हृदय फरफटत, मोडत तुटत जात राही.

असे अनेक गुरुवार आले आणि गेले. बघता-बघता अख्खं वर्ष संपलं. फादर मुलीगनना मद्रासला परतण्याचे वेध लागले. वर्षभर केलेली सक्तीची समाजसेवा फळाला येत नाही, हे जाणवल्यावर बेबी कोचम्मानं तो नाद सोडला आणि अखेर नाइलाजानं नशिबावर भिस्त ठेवून ती स्वस्थ बसली.

शेवटी सगळा संयम संपल्यावर बेबी कोचम्मानं हट्टच धरला. त्या काळात तरुण मुलीचा अतिरेकी हट्ट जन्मत:च फाटक्या ओठाइतका किंवा लंगड्या पायाइतका विद्रूप, भयंकर समजला जात असे. तरीही बेबी कोचम्मा मागं हटली नाही. वडिलांच्या सक्त विरोधाला न जुमानता तिनं रोमन कॅथलिक पंथाची दीक्षा घेतली. व्हॅटिकनकडून विशेष अनुमती मिळवून तिनं शपथ ग्रहण केली आणि मद्रासच्या एका कॉन्व्हेन्टमध्ये शिकाऊ

उमेदवार म्हणून प्रवेशही मिळवला. एवढा उपद्व्याप करून तरी फादर मुलीगनच्या सहवासाची संधी उपलब्ध होईल, अशी एकमेव आशा बेबी कोचम्माच्या मनात होती. त्या सहवासाची चटक तिला स्वस्थ बसू देईना. जड जड वेल्व्हेटच्या पडद्यांनी वेढलेल्या एखाद्या अंधाऱ्या खोलीत आपण फादर मुलीगनबरोबर बायबलमधल्या धर्मतत्त्वांची चर्चा करतो आहोत, असं चित्र सारखं तिच्या उत्तेजित नजरेसमोर तरळत राही. बेबी कोचम्माला एकच ध्यास लागला होता, फादर मुलीगनच्या सहवासाचा! ते क्षण कसंही करून मिळवलेच पाहिजेत, एवढंच तिच्या आयुष्याचं ध्येय बनलं होतं. फादर मुलीगनच्या खूप जवळ असावं. इतकं की, त्यांच्या दाढीचा उत्तेजक गंध घेता यावा आपल्या तनमनात ओढून... त्यांच्या पायघोळ झग्याची जाडीभरडी वीण स्पर्शानं जाणता यावी आणि त्यांच्याकडं निदान नुसतं बघता यावं... दुरून का असेना, प्रेम करता यावं!

मनाशी जपलेल्या या एकमेव स्वप्नामधला फोलपणा लवकरच बेबी कोचम्माच्या लक्षात आला. बायबलमधल्या धर्मतत्त्वांची चर्चा करण्याच्या निमित्तानं धर्मगुरूंच्या निकट जाण्याची संधी साधण्यात आपण फारच कमी पडतो, इतर सीनियर सिस्टर्स या खेळात भलत्याच वाकबगार आहेत, हे जाणवल्यावर बेबी कोचम्मा पार हिरमुसली. फादर मुलीगनच्या सहवासाची संधी हाती लागण्याआधीच तिचं मन विटलं. हळूहळू कॉन्व्हेन्टमध्येही बेबी कोचम्माचा जीव रमेनासा झाला. गाल, मान झाकून पार अगदी हनुवटीपर्यंत पोचणारं वस्त्र डोक्यावर घेऊन त्वचा सोलवटूनच निघाली. कॉन्व्हेन्टमधल्या इतर कुणाहीपेक्षा आपल्याला उत्तम इंग्लिश बोलता येतं, हे जाणवल्यावर तिला अधिकच एकाकी, उदास वाटायला लागलं.

बेबी कोचम्माला कॉन्व्हेन्टमध्ये जाऊन वर्ष व्हायच्या आतच वडिलांकडे तिच्या पत्रांचा ओघ सुरू झाला. त्यांतली गूढ, अतर्क्य भाषा सुरुवातीला कुणालाच उमजली नाही.

'प्रिय पपा, मी इकडं मजेत आहे; पण कोहिनूर मात्र सारखी उदास असते. तिला कायम घरची आठवण येते. पपा, आज तर जेवल्यानंतर तिला उलटी झाली. तिचं अंगही खूप तापलंय. कॉन्व्हेन्टमधलं जेवण मला आवडतं; पण कोहिनूरला मात्र ते मुळीच मानवत नाही. तिच्या घरची मंडळी तिला समजून घेत नाहीत, तिची साधी काळजीसुद्धा करत नाहीत. म्हणूनच कदाचित, कोहिनूर इतकी उदास असते.'

जगातला सर्वांत मोठा हिरा सोडला; तर 'कोहिनूर' या नावाशी रेव्हरंड आयपेंचा काही संबंधच नव्हता. आपल्या लेकीच्या पत्रातली ही 'कोहिनूर' कोण, हे विचार करूनही त्यांना समजेना. शिवाय मुस्लीम नावाची मुलगी कॅथलिकांच्या कॉन्व्हेन्टमध्ये कशी, हे एक मोठंच कोडं होतं.

– शेवटी बेबी कोचम्माच्या आईला हे कोडं उलगडलं. 'कोहिनूर' म्हणजे दुसरी-तिसरी

कुणी नसून स्वत: बेबी कोचम्माच असणार, याची खातरी पटल्यावर इतर संदर्भ आपोआप स्पष्ट होत गेले. पुष्कळ वर्षांपूर्वी आपल्या वडिलांच्या मृत्युपत्राची एक प्रत तिनं बेबी कोचम्माला दाखवली होती. आपल्या नातवंडांचं कौतुक करताना बेबी कोचम्माच्या आजोबांनी लिहिलं होतं,

'माझ्याकडं लखलखत्या हिऱ्यांसारखी सात नातवंडं आहेत. त्यातलं एक पिल्लू तर 'कोहिनूर' हिऱ्याएवढं मौल्यवान आहे.'

आपल्या संपत्तीमधलं जडजवाहीर आणि थोडे पैसेही त्यांनी प्रत्येक नातवंडाच्या नावानं लिहून ठेवले होते; पण 'कोहिनूर कोण?' याचा स्पष्ट उल्लेख मात्र त्यांच्या मृत्युपत्रात कुठेच नव्हता. लाडक्या आजोबांनी ते खास संबोधन आपल्यासाठीच वापरलंय, अशी समजूत बेबी कोचम्माच्या मनात तेव्हाच रुजली असणार, हे तिच्या आईला इतक्या वर्षांनी कळलं, आणि बेबी कोचम्माच्या गूढ पत्रांचा अर्थ लागत गेला. आपली पत्रं पोस्टात पडण्यापूर्वी मदर सुपीरिअरकडून 'सेन्सॉर' केली जातात, हे पक्कं ठाऊक असलेल्या बेबी कोचम्मानं 'कोहिनूर'चा उल्लेख मोठ्या हुशारीनं केला होता आणि मदर सुपीरिअरला चकवा देऊन कॉन्व्हेन्टमधला त्रास आईवडिलांपर्यंत पोचवला होता.

एवढं सगळं कळल्यानंतर रेव्हरंड आयपे तत्काळ मद्रासला गेले आणि त्यांनी बेबी कोचम्माची कॉन्व्हेन्टमधून सुटका केली. बेबी कोचम्मा अत्यानंदानं आयमेनेमला परतली; पण 'आपण अखेरच्या श्वासापर्यंत रोमन कॅथलिकच राहू,' हा तिचा हट्ट कायम होता. एवीतेवी आपल्या लेकीचा 'नावलौकिक' झालाच आहे; तेव्हा तिच्याकरता नवरा मिळणं मुश्कीलच होणार, हे रेव्हरंड आयपेंना समजत होतं. लग्नाची शक्यताच नसेल, तर तिला शिकवण्यात फारसा धोका नाही, असा विचार करून त्यांनी आपल्या लेकीला अमेरिकेतल्या रॉचेस्टर विद्यापीठात पाठवायचं ठरवलं. सगळी व्यवस्था झाल्यावर बेबी कोचम्मा अमेरिकेला निघूनही गेली.

'ऑर्नामेन्टल गार्डनिंग'चा डिप्लोमा घेऊन दोन वर्षांनंतर बेबी कोचम्मा परतली, तेव्हा तिचं मन फादर मुलीगनच्या प्रेमात पुरतं बुडून गेलेलं होतं. सडपातळ शरीराची, नाजूक चणीची बेबी कोचम्मा ओळखता येणार नाही इतकी ऐसपैस सुटली होती. रॉचेस्टर विद्यापीठातल्या दोन वर्षांच्या काळानं तिच्या शरीरावर लिबलिबीत मांसाचे थरच्या थर चढवले होते. चुंगम पुलावरच्या चेलप्पन टेलरनं तिचे ब्लाऊज शिवण्यासाठी चक्क शर्टाची शिलाई मागितली, इतकं तिचं शरीर हाताबाहेर गेलं होतं.

घरात बसून कुढत राहण्यापेक्षा बाहेर तिचा जीव रमावा, म्हणून रेव्हरंड आयपेंनी 'आयमेनेम हाऊस'समोरची बाग बेबी कोचम्माच्या ताब्यात देऊन टाकली. तिथं तिनं बरीच ढवळाढवळ केल्यावर उग्र वासाच्या लहान-मोठ्या झाडाझुडपांची एकच गर्दी बागेत वाढली आणि सगळा गजबजाट होऊन गेला. बेबी कोचम्माची 'बाग' बघायला

कोट्टायमपासून कुठले कुठले लोक येऊ लागले.

आयमेनेम हाऊसभोवती काहीसा चढाचा असलेला रेताड जमिनीचा वळसेदार तुकडा म्हणजे बेबी कोचम्माची बाग. तिनं त्याभोवती खुरट्या, लाईनशीर कापलेल्या झुडपांचं एक कुंपण उभारलं, मोठमोठ्या दगडधोंड्यांची कलात्मक रचना केली आणि त्यांच्या अधूनमधून पाण्याचे पाट तयार केले. अॅन्थुरिअमची फुलं तिची सगळ्यांत आवडती. तिनं जिकडंतिकडं अॅन्थुरिअमच्या वेगवेगळ्या जातींची लागवड केली. रब्रम... हनीमून... शिवाय जपानी फुलांच्याही काही निवडक जाती लावल्या. ठिपक्या-ठिपक्यांच्या काळ्या रंगापासून रक्तवर्णी तांबड्या आणि उत्तेजक नारिंगी रंगापर्यंत अनेकानेक छटांची फुलं तिच्या बागेत उमलू लागली. कातरलेल्या कडांची पिवळीधम्मक फुलं तर नेहमी असत. तऱ्हेतऱ्हेच्या फुलझाडांनी केलेल्या गर्दीच्या मधोमध बेबी कोचम्मानं छोटासा तलाव उभारला. त्या तलावात चोवीस तास लघवीची धार धरलेलं एक संगमरवराचं छोटं गोंडस बाळही उभं केलं होतं. त्या उथळ पाण्यात निळ्या कमळाचं एखादं फूल उमलू लागलं. तलावाभोवती आळसावल्या मद्दड चेहऱ्याच्या ठेंगू रक्षकांचे प्लॅस्टर ऑफ पॅरिसमधले बेढव पुतळेही बसवले होते. त्यांचे टम्म फुगलेले गाल आणि डोक्यावरचा लालभडक अणकुचीदार टोप्या भलत्याच उठून दिसत.

ओसंडणाऱ्या शरीरावरचा साडीचा बोंगा सावरत पायांत गमबूट घालून बेबी कोचम्मा रोज संध्याकाळी बागेत फेरफटका मारीत असे. नारिंगी रंगाच्या भडक हातमोज्यांमध्ये झाडंझुडपं भादरण्याची भलीमोठी कातर परजत बेबी कोचम्मा बागेत उतरली, की काम सुरू! अकराळविकराळ वाघ-सिंहांना माणसाळवण्याच्या कौशल्यानं बागेतल्या रानटी झाडोऱ्याला तिनं शिस्त लावली. बारीक देठाच्या नाजूक वेलींचे जडजंबाळ गुंते सोडवले... काटेरी निवडुंगाच्या राठ फण्यांची जोपासना केली. झाडांना छाटून त्यांचं 'बोन्साय' करणं तिला फारसं आवडत नसे; त्याऐवजी तिनं ऑर्किडची भरपूर झाडं लावली. आयमेनेममधल्या हवामानाशी फारसं सख्य नसणाऱ्या वनस्पतीही बेबी कोचम्मानं हट्टानं आपल्या बागेत रुजवल्या. पांढऱ्या नाजूक फुलांची 'सदाफुली' लावण्याचा आणि चायनीज पेरू पिकवण्याचाही प्रयत्न केला.

बागेमध्ये मनसोक्त काम करून झालं की बेबी कोचम्मा रात्री आपल्या तळपायांना भरपूर क्रीम चोपडून बसे आणि पायाच्या नखांवर झेपावणारी त्वचा एकाग्रतेनं मागं सारत राही.

अगदी आत्ता आत्ता, म्हणजे जवळपास पन्नास वर्षांनंतर घराभोवतीच्या बागेतून बेबी कोचम्माचं लक्ष एकाएकी उडालं. ती बागेत फिरकेनाशी झाल्यावर शिस्तीत कोंडून ठेवलेल्या झाडाझुडपाचं भलतंच फावलं आणि बघता-बघता अकराळविकराळ रानटी वेल चोहींकडे फोफावले. सर्कसमधल्या प्राण्यांनी आपल्याला शिकवलेलं कसब विसरून

इतस्तत: हिंडत बसावं, तशी बागेची अवस्था झाली. जागा मिळेल, तिथे रुजून कम्युनिझमप्रमाणे भराभर वाढणाऱ्या गवताला केरळमध्ये 'कम्युनिस्ट गवत' म्हणत. बेबी कोचम्माच्या बागेत या कम्युनिस्ट गवतानं हाहाकार माजवला. इतर सगळी नाजूक झाडंझुडपं या गवताच्या रानटी सपकाऱ्यांनी पार जमीनदोस्त होऊन गेली. भीषण शवागारात ठेवलेल्या प्रेताच्या पायाची नखं वाढत राहावीत, तशा काही रानटी वेली तेवढ्या भसाभस वाढत राहिल्या. वाढत-वाढत त्या वेलींनी प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या त्या मद्दड ठेंगू रक्षकांना विळखे घातले आणि फताड्या नाकपुड्यांमधून त्यांच्या थुलथुलीत शरीरांत घुसलेल्या वेलींचे शेंडे त्यांच्या रिकाम्या डोक्यात वाढत राहिले... आधीच आळसावलेल्या त्यांच्या चेहऱ्यांवर आश्चर्याच्या रेषा उगीच उठल्या... त्यात इतका ताण भरला, की कोणत्याही क्षणी फाडकन शिंक यावी!

– बेबी कोचम्मा तिच्या बागेकडं ढुंकूनही पाहीनाशी झाली. कारण ती पुन्हा एकदा नव्यानं प्रेमात पडली होती. तिनं आयमेनेम हाऊसच्या छपरावर भलामोठा डिश अॅन्टेना बसवून घेतला आणि तत्क्षणी ती अवघ्या विश्वाची सार्वभौम सम्राज्ञीच झाली... दिवाणखान्यात बसल्याबसल्या सॅटेलाईट टी. व्ही. जगभरात फिरवून आणू लागल्यावर कसली बाग न् कसलं काय! तिच्यामध्ये एक नवाच उत्साह ठासून भरला. रक्त सळसळतंय्... हृदय धडधडतंय्... हे सगळं सावकाश, टप्प्याटप्प्यानं तिच्यामध्ये भिनत गेलं, असं नाही. रातोरात बेबी कोचम्माचं रूप पालटलं. सोनेरी केसांच्या गोऱ्यागोमट्या टंच पोरी, विध्वंसक युद्धाचे भडके, टाचा घासून प्राण घेणारे दुष्काळ, फुटबॉल, गरमगरम सेक्स, झिंग आणणारं म्युझिक, सैनिकी बंड, राजकीय उलथापालथी... सगळ्या गोष्टी पोटात भरून एक भरधाव रेल्वेगाडीच जणू बेबी कोचम्माच्या घरात घुसली. त्या गाडीतले प्रवासी एकामागून एक उतरले आणि त्यांनी मस्त बस्तान जमवलं. ज्या आयमेनेममध्ये एके काळी बसचा हॉर्न एवढा एकमेव 'आवाज' ऐकू येई, तिथं आता जगभरातले पॉपस्टार्स भुळुभुळु अवतरले. जागतिक युद्ध, दुष्काळ, थरकाप उडवणाऱ्या रक्तरंजित दंगली... सगळं डोळ्यांदेखत घडू लागलं. घंटा वाजवून नोकराला बोलवावं, इतक्या सहजपणे बिल क्लिंटनना आज्ञा फर्मावून टी. व्ही.च्या झगझगीत पडद्यावर हजर करता येऊ लागलं... बेबी कोचम्मा हरखून गेली.

घराबाहेरची तिची बाग मरून जात असताना बेबी कोचम्मा मात्र टी. व्ही.च्या पडद्याला नाक लावून बसलेली असे. अमेरिकन फुटबॉलच्या लीग मॅचेस, वन डे क्रिकेट आणि सगळ्या ग्रॅन्ड स्लॅम टेनिस टूर्नामेंट्स तिच्या साक्षीनं घडत. '– द बोल्ड अॅन्ड द ब्यूटिफुल' आणि 'सान्ता बार्बरा'या दोन्ही गोष्टी बेबी कोचम्माला भलत्याच आवडल्या होत्या. रंगीबेरंगी लिपस्टिक लावून तऱ्हेतऱ्हेच्या हेअरस्टाईल्स केलेल्या उफाड्याच्या पोरी ज्या उन्मादानं पुरुषांना पाघळवून टाकीत आणि ज्या सहज हिमतीनं स्वत:च्या

लैंगिक स्वातंत्र्याचा पुरेपूर, नशिला उपभोग घेत; ते बेबी कोचम्माला भारी आवडे. टी. व्ही.च्या पडद्यावर भिरभिरणाऱ्या पोरींचे चमकदार लांडे कपडे... त्यांची रासवट, पुरुषी हजरजबाबी आणि मिश्कील भाषा... सगळयावर बेबी कोचम्मा बेहद्द फिदा होती. दिवसभरात कधीकधी या रंगीबेरंगी चित्रांतले तुकडे डिश अॅन्टेनाला चकवून बेबी कोचम्माच्या डोळ्यांसमोर उभे राहत; आणि ती एकटीच, स्वत:शीच हसत बसे.

कानांची भोकं ओघळून-ओघळून पार फाटायला आली, तरी सोन्याच्या जाड जाड रिंगा हट्टानं कानात घालणारी कोचु मारिया – 'आयमेनेम हाऊस'मध्ये स्वयंपाकीण असली, तरी तिलाही बेबी कोचम्मासारखाच दांगडा षौक जडला होता. तिला 'डब्ल्यू डब्ल्यू एफ'वाल्यांच्या कुस्त्या भारी आवडत. टिकल्या टिकल्या लावलेली चमकदार कातडी पायात चढवून एकमेकांना मस्त बुकलून काढणारे हक हॉगन आणि मिस्टर परफेक्ट हे योद्धे म्हणजे कोचु मारियाचे लाडके हिरो. अगडबंब थुलथुलीत शरीरात बुडून गेलेली त्यांची एवढुशी डोकी बघताना तिला हसू आवरत नसे. तिच्या त्या खुदुखुदु हसण्यात मधूनच कधीतरी दुष्टपणाची एक लबाड झाक चमकून जाई.

बेबी कोचम्मा आणि कोचु मारिया दोघीही दिवसभर टी. व्ही.समोर बसलेल्या असत. दुखरा पाय सांभाळत लाकडी आरामखुर्चीत किंवा बाकड्यावर बसलेली बेबी कोचम्मा आणि जमलंच तर उठून चॅनल बदलण्यासाठी धडपडणारी कोचु मारिया जमिनीवर पसरलेली! टी. व्ही.समोरच्या कोलाहल शांततेत दोघी स्वत:ला कोंडूनच घेत... एकीच्या डोक्यावर पांढऱ्या केसांचं भुरकुल, तर दुसरीच्या मस्तकी रंगवलेल्या काळ्याकुट्ट केसांचं नीट बसवलेलं टोपलं!... दोघींनी झाडून सगळ्या स्पर्धांमध्ये भाग घेतला, टी. व्ही.वरून विचारलेल्या एकूण एक प्रश्नांची उत्तरं लिहून देशभरात कुठं कुठं प्रतियोगिता कार्डं धाडली. त्यांना दोन बक्षिसंही मिळाली. एकदा एक टी शर्ट आणि दुसऱ्यांदा चांगला मोठा थर्मास! बेबी कोचम्मानं तो थर्मास मोठ्या अपूर्वाईनं आपल्या कुलपाच्या कपाटात नीट जपून ठेवला.

आयमेनेम हाऊसवर बेबी कोचम्माचा पहिल्यापासूनच जीव. त्या घरातल्या हर-एक वस्तूवर तिचं प्रेम होतं. आल्या-गेल्या प्रत्येकानं आणलेलं सामानसुमान, जुनंपानं फर्निचर सगळं तिनं नीट जपून ठेवलेलं. माम्माचीने आणलेलं व्हायोलिन, व्हायोलिनचा नाजुकसा स्टँण्ड, उटीहून आलेली कपाटं, प्लास्टिकच्या खुर्च्या, दिल्लीचे मोठमोठे पलंग, व्हिएन्नाहून आणलेलं तुटक्या हस्तीदंती मुठीचं देखणं ड्रेसिंग टेबल. वेलुथाकडून खास तयार करवून घेतलेलं रोझवूडचं डायनिंग टेबल!

चॅनल बदलता-बदलता बी. बी. सी.वरची दुष्काळाची दृश्यं आणि टी. व्ही.च्या पडद्यावर उसळणारे युद्धाचे आगडोंब दिसले, की बेबी कोचम्माचा जीव काळजीनं उडून जायला लागायचा. जगाच्या कोनाकोपऱ्यांत अस्वस्थ, बेचैन, फेकून दिलेल्या, पायदळी

तुडवलेल्या लोकांचे जथ्थेच्या जथ्थे पुन्हा तयार होऊ लागले आहेत, हे तिला घरबसल्या दिसत होतं. आता पुन्हा कोणीतरी लेनिन नाहीतर मार्क्स उगवतील आणि संपूर्ण क्रांतीची विरून गेलेली लाल आरोळी पुन्हा भडकून उठेल, या भीतीनं बेबी कोचम्मा आतल्या आत घाबरून गेली. जगात पुन्हा अशी क्रांती उसळली, वंशहत्या झाल्या आणि उपासमारीनं टाचा घासून मरणाऱ्या लोकांच्या फौजा संतापून उठल्या, तर जिवापाड जपून ठेवलेल्या आपल्या फर्निचरचं काय होईल, या काळजीनं ती मनातल्या मनात खंगत राहिली.

घाबरून गेलेल्या बेब्ी कोचम्मानं खिडक्यांचे कोयंडे सरकवले, दारांना कड्या-कुलपं ठोकली. आत-बाहेर यायचं-जायचं असेल, तर तेवढ्यापुरतं दार उघडायचं. एरवी चिडीचुप्प! खिडकीचं दार तर ती अगदीच आवश्यक तेव्हा उघडी... म्हणजे अगदीच गुदमर झाली, तर ताजी हवा आत यावी म्हणून, किंवा दुधाचे पैसे देण्यासाठी. किंवा कोचु मारियानं घरभर धावधावून टॉवेलात पकडलेली गांधीलमाशी घराबाहेर फेकण्यासाठी.

स्वयंपाकघरातल्या रंग उडालेल्या, जुनाट, मरतुकड्या फ्रीजचं दारसुद्धा बेबी कोचम्मानं टाळं ठोकून बंद करून टाकलं होतं. कोचु मारिया कोट्टायमला जाऊन आठवडाभरासाठीचे 'क्रीम बन्स' घेऊन यायची. ते बन्स आणि बेबी कोचम्माला येता-जाता पिण्याकरता लागायचं, ते तांदळाचं धुवण पाणी बाटल्यांमध्ये भरून फ्रीजमध्ये ठेवलेलं असे. फ्रीजच्या पोटात कशाबशा कोंबलेल्या ट्रेच्या खालच्या भागात बेबी कोचम्माने माम्माचीच्या वापरातला जुना डिनर-सेट ठेवला होता.

राहेलनं बेबी कोचम्मासाठी आणलेल्या इन्शुलिनच्या डझनभर बाटल्या फ्रीजच्या 'चीझ-बटर कम्पार्टमेन्ट'मध्ये नीट जपून ठेवलेल्या असत. छपरावरच्या डिश अॅन्टेनानं बेबी कोचम्माच्या डोळ्यांत संशय अगदी ठासून भरला होता. सहज म्हणून दारावर येणारा साध्याभोळ्या निरागस चेहऱ्याचा, स्वच्छ नजरेचा माणूसदेखील लुच्चा-लफंगा असू शकतो; तो घरातली भांडीकुंडी चोरून नेईल, किंवा क्रीम बन्स पळवेल, किंवा कदाचित परदेशातून आणलेलं महागामोलाचं इन्शुलिन चोरायला आयमेनेममध्ये आलेला तो 'डायबेटिक चाचा' नसेल कशावरून?... अशा तऱ्हेतऱ्हेच्या शंकांनी बेबी कोचम्माचा जीव नुसता हैराण होऊन जाई.

राहेल आणि इस्थावरदेखील बेबी कोचम्माचा तिळमात्र विश्वास उरलेला नव्हता. ही जुळी भावंडं वाट्टेल त्या क्षणी, वाट्टेल ते करू शकतील, असं तिला वाटे. वाट्टेल ते म्हणजे अक्षरश: काहीही! दोघं जणं मिळून त्यांचा वर्तमानकाळ चोरून नेऊ शकतील. आयुष्याचा प्रवाह उलटा वळवू शकतील. विचार करता-करता सहज तिच्या मनात आलं आणि पाठीत एकाएकी उसण भरावी, तशी बेबी कोचम्मा चमकलीच! किती सहज, किती

प्रभावितपणे त्या 'दोघांचं' अस्तित्व आपण एक करून टाकलं. त्यांचं अभिन्नत्व मान्य केलं, हे जाणवताच ती थरारली... इतक्या वर्षांनंतर पुन्हा? परत पुन्हा? सरपटत-सरपटत अंगावर चढलेली भूतकाळाची पाल क्षणार्धात झटकून टाकत बेबी कोचम्मानं आपलं मन पुन्हा एकदा पुसून लख्ख केलं. नवे, सोयीस्कर विचार तिथं नीट मांडले. वर्तमानकाळ चोरता येईल? नक्कीच! पण कदाचित आपल्यालाच! आपल्यालाच आयुष्याचा प्रवाह उलट वळवता येईल.

राहेल डायनिंग टेबलाशी उभी होती. नि:स्तब्ध! तिच्या चेहेऱ्यावर पुन्हा तेच गूढ. आतल्या आत काहीतरी लपवून ठेवल्यासारखं! – बेबी कोचम्मानं राहेलकडे पाहिलं; तर तिला एकदम इस्थाचाच चेहरा दिसला. नि:स्तब्ध! आतल्या आत काहीतरी लपवून ठेवल्यासारखा!

त्या विचित्र शांततेनं बेबी कोचम्माच्या पुसून लख्ख केलेल्या मनाची उभारीच खचली.

'मग?' – फाटलेल्या कर्कश आवाजात गांगरत, चाचरत तिनं राहेलला विचारलं,

'काय ठरवलंयस आता? इथं किती दिवस राहणार आहेस? काही केलंय का नक्की?'

– राहेलनं गप्प बसण्याचा निकरानं प्रयत्न केला. तरीही तिच्या नकळत एक तीक्ष्ण, अणकुचीदार बाण सुटलाच. वैतागून ती पुढं झाली आणि क्षणभर तरी मोकळी हवा खावी, म्हणून खिडकीचं दार ढकललं.

'तुझं झालं ना, की बंद कर ते दार!' – नको असलेला संवाद खाटकन् तोडावा, तशी बेबी कोचम्मा करकरली.

किलकिली दारं खटाखट लागली आणि बेबी कोचम्माच्या बंद चेहऱ्यावर भलंमोठ्ठं कुलूप अडकलं.

आता त्या खिडकीतून वाहत्या नदीची झुळझुळ दिसत नाही.

आयमेनेममध्ये सगळ्यांत पहिल्यांदा सरकणारं, घडीचं दार आणून माम्माचीनं मागचा व्हरांडा बंद करून घेतला, त्याआधी नदी दिसायची. अगदी स्पष्ट. ओलीओली. पण व्हरांडा बंद झाला आणि सगळंच बदललं. तिथल्या भिंतीवर अडकवलेली रेव्हरंड ई जॉन आयपे आणि अलीयुटी अम्माची (राहेल-इस्थाचे पणजोबा-पणजी) यांची भलीमोठी पोर्ट्रेट्स खाली उतरवून पुढच्या व्हरांड्यात टांगण्यात आली.

अजूनही ती पोर्ट्रेट्स तिथंच आहेत. भुसा भरलेलं जंगली गव्याचं मुंडकं. त्याच्या एका बाजूला रेव्हरंड आयपे आणि दुसरीकडे त्यांची पत्नी.

कुठल्याही पूर्वजांच्या चेहऱ्यावर असतं, तसं गूढ, सूज्ञ हसू रेव्हरंड आयपेंच्या चेहऱ्यावर आहेच. पूर्वी ते नदीकडं बघून हसत, आता रस्त्याकडं बघून हसतात, एवढंच!

अलीयुटी अम्माचीचा चेहरा मात्र काहीसा गोंधळलेला... अवघडलेला. चित्रातल्या चित्रात थोडं वळता आलं, तर किती बरं, अशी चुटपूट लागलेला! नदीला पूर्णपणे नजरेआड करून टाकणं, अम्माचीकरता एवढं सोपं नव्हतं. तिला त्रासच झाला असणार त्याचा. नवरा ज्या दिशेला पाहतो आहे; तिकडे नजर लावणं तिला भागच असलं, तरी तिचं लक्ष मात्र तिसरीकडेच! सौभाग्यालंकार म्हणून नवऱ्यानं तिच्या कानांत घातलेले कुनुक्कु इतके अवजड, की अम्माचीच्या कानाच्या पाळ्या लळत- लोंबत पार अगदी खांद्यापर्यंत पोचलेल्या! कानाची भोकं ही एवढी मोठीमोठी. त्यातून बघितलं, तर उष्ण-गरम नदी दिसते. त्या प्रवाहात वाकलेलं काळंभोर झाड दिसतं. होडीत बसलेले मच्छीमार आणि नदीत हुळहुळणारे मासेसुद्धा दिसतात!

पूर्वी घरात बसल्या-बसल्या नदी दिसायची, आता नाही; पण समुद्राकाठच्या कोरड्या शंख-शिंपल्यांमध्ये लाटांची गाज घुमत असते ना, तशी 'आयमेनेम हाऊस'च्या पोटातून नदी वाहते... अजूनही.

उधळत, उसळत, गहिऱ्या डोहात मासोळी सळसळत राहावी, तशी!

खिडकीतल्या भणाणत्या वाऱ्यात राहेल उभी होती. मोकळ्या केसांमध्ये भरलेलं तुफान, आणि समोर कोसळता पाऊस! पत्र्याच्या गंजलेल्या छपरावर वाजणारा पावसाचा ताशा ती कितीतरी वेळ ऐकत राहिली. त्या छपराखालीच कधीकाळी राहेलच्या आजीनं लोणच्याचा छोटा कारखाना चालवला होता.

– पॅराडाईज् पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्!

– नदी आणि घराच्या मध्ये.

त्या कारखान्यात लोणची, मुरंबे, जॅम, जेली, सरबतं, आमटीचा मसाला असं काय-काय तयार व्हायचं! शिवाय डबाबंद अननस! तिथल्या 'केळ्यांच्या मुरंब्या'वर मात्र फूड प्रॉडक्टस् ऑर्गनायझेशननं बंदी घातली होती. का? – तर म्हणे, हा 'जॅम'ही नाही आणि 'जेली'ही नाही. ऑर्गनायझेशनचे निकष लावायला गेलं, तर मधलंच काहीतरी हाताला लागतं, म्हणाले. म्हणजे 'जेली' म्हणावं, तर फारच घट्ट आहे, आणि 'जॅम' म्हणावं, तर पुष्कळच पातळ, सैलसर!... म्हणजे धड काहीच ठरवता येणार नाही, असलं काहीतरी.

आता त्यांच्या पुस्तकात 'असलं काही' नव्हतंच, तर ते तरी काय करणार?

विचार करता-करता राहेलला वाटलं, ही भानगड काही फक्त जॅम-जेलीपुरतीच मर्यादित नाही. कदाचित, आपल्या कुटुंबाच्या रक्तातच मुरलेलं असणार हे त्रांगडं! म्हणजे काहीच धड नसणं! ना जॅम, ना जेली. ना धड घट्ट, दाट ना पातळ, सैलसर!

खरं तर अम्मू, इस्था आणि राहेलनं मिळून पुष्कळच मर्यादा ओलांडलेल्या. रीतिभाती पार अगदी धाब्यावर बसवलेल्या; पण त्या तिघांखेरीज इतरांनी तरी वेगळं काय केलं

होतं? प्रत्येकानं नियम तोडले. सगळ्यांनी समाजाच्या लक्ष्मणरेषा अगदी बिनदिक्कत ओलांडल्या. कुणी कुणावर कसं आणि किती प्रेम करावं, याचे समाजाने घालून दिलेले नियम तर सगळ्यांनी पार ठोकरूनच लावले. आज्या ह्या आज्या उरल्या नाहीत, काका हे काका राहिले नाहीत, आया आईसारख्या वागल्या नाहीत. चुलत भावंडं, चुलत भावंडांसारखी उरली नाहीत. जॅमला जॅम आणि जेलीला जेली ठरवणारे कायदे कुठे कुणी पाळले?

कधी काकांनी वडिलांची जागा घेतली. कधी मुलाबाळांच्या आया प्रियकराच्या हाकेमागे घराबाहेर धावल्या. चुलत भावंडांनी श्वास रोखले आणि मधल्याच कुठल्यातरी विचित्र वयात स्वत:वर अंत्यसंस्कारसुद्धा करून घेतले.

ज्याचा विचारसुद्धा करू नये, अशा भद्र-अभद्र गोष्टी कुणाकुणाच्या डोक्यात कोण जाणे कुठून घुसल्या आणि जे कधी स्वप्नातसुद्धा येणार नाही, अगदी अशक्यप्रायच वाटेल, असं पुष्कळ काही प्रत्यक्षात घडलं.

अनेक वेळा घडलं!

सोफी मॉलचे अंत्यसंस्कार पार पडण्यापूर्वीच पोलिसांनी वेलुथाला शोधून काढलं होतं.

शर्टाची बाही घासून-घासून त्याच्या मनगटावर बरीच टेंगळं आलेली. त्या ओलसर बाहीला गंजलेल्या लोखंडाचा कडसर-आंबूस वास. बसमध्ये येतो किंवा लोखंडी चिमट्याने तिकिटं पंच करणाऱ्या कंडक्टरच्या हातांना येतो, तसा!

सगळं संपल्यावर अम्मू त्राग्यानं म्हणाली,

'जसं पेरावं ना, तसंच उगवतं!'

पेरण्या-उगवण्याशी, करण्या-भरण्याशी आपला जणू काही संबंधच नसावा. अशा त्रयस्थ आविर्भावात अम्मूने आपल्या आयुष्याचा गाडा पुन्हा सुरू केला. छोट्या-छोट्या गोष्टींची छोटी-छोटी दुनिया पुन्हा उभी केली. इस्थाला त्याच्या वडिलांकडे परत पाठवण्याची कल्पनाही तिचीच!

मुलीच्या मृत्यूनं उद्ध्वस्त झालेली मार्गरिट कोचम्मा आतून पार मोडून पडली होती. प्रखर दु:ख आणि संताप यांच्या ज्वाळा तिच्या मनात ठासून भरलेल्या... इतक्या, की तिच्या तोंडून ना शब्द फुटला, ना डोळ्यांत पाण्याचं टिपूस! मार्गरिट कोचम्मा एका शब्दानं बोलली नाही, पण इंग्लंडला परतण्याच्या दिवसापर्यंत तिनं इस्थाचा विलक्षण द्वेष केला.

अम्मूनं इस्थाच्या 'पाठवणी'ची तयारी सुरू केली. त्याची ट्रंक भरली. राहेल काही न बोलता सगळं पाहत होती.

‘त्यांचं बरोबरच आहे, नाहीतरी.’ – अम्मू स्वत:शीच पुटपुटत राहिली, ‘वाढत्या वयातल्या मुलांना, वडिलांच्या सहवासाची गरज असतेच!’

– अम्मूचे डोळे वाहून-वाहून लालबुंद झाले होते. राहेलच्या नजरेतून ते सुटलं नाही.

शेवटी जुळ्या मुलांच्या शारीरिक-मानसिक स्थितीचा विशेष अभ्यास असणाऱ्या हैदराबादमधल्या एका तज्ज्ञ डॉक्टरीणबाईंचा सल्ला घेण्यात आला. त्यांनी कळवलं,

‘एकाच बीजांडातून जन्मलेल्या जुळ्यांना एकमेकांपासून अलग ठेवण्याचा सल्ला सहसा दिला जात नाही; पण दोन स्वतंत्र बीजांडांमधून जन्मलेली जुळी मुलं इतर सर्वसाधारण भावंडांसारखीच असतात. कुटुंब दुभंगलं, आई-वडील विभक्त झाले, तर इतर मुलांना मानसिक यातना सोसाव्याच लागतात, त्याच क्लेशातून ही जुळी मुलंही जातील, एवढंच! त्याहून वेगळा धोका दिसत नाही.’

अखेरीस इस्थानं परत जायचं, हे नक्की ठरलं. कोऱ्या कपड्यांच्या घड्यांनी भरलेली पत्र्याची ट्रंक आणि खाकी होल्डॉलमध्ये गुंडाळलेले बूट घेऊन इस्था ट्रेनमध्ये चढला. मद्रासमेलच्या फर्स्टक्लासच्या बोगीमधून मद्रासपर्यंत आणि तिथून बाबाच्या एका मित्राबरोबर पुढे कोलकात्याला!

टोमॅटो सॅन्डविचनी भरलेला छोटा डबा इस्थाच्या ट्रंकेत होता, शिवाय गरुडाचं चित्र असलेला ‘ईगल’चा थर्मास! भंजाळून गेलेल्या त्याच्या डोक्यात चित्र-विचित्र आकृत्यांनी एकच थैमान घातलेलं!

– पाऊस... कसलीशी धुम्मस... वेगाने वाहणारं शाईसारखं दाट उसळतं पाणी आणि तो वास! गोडुस... घशात कोंडून राहणारा... कुजलेल्या गुलाबाभोवती घोटाळणाऱ्या वाऱ्यानं वाहून आणावा, तसा!

– इस्थाच्या ‘आत’... मनात... अस्तित्वात आणखीही काही होतं. आठवणी... अंधूक... तरी डसणाऱ्या! सुरकुत्या पडलेल्या भेसूर म्हाताऱ्या तोंडाच्या एका तरुणाच्या!... भप्प सुजलेला चेहरा आणि तुकडे-तुकडे झालेलं रक्तबंबाळ हास्य!... कसल्यातरी निवळशंख द्रवानं भरलेला तलाव आणि त्यात पडलेलं उघड्या, उजाड बल्बचं भगभगीत प्रतिबिंब!... एक लालभडक डोळा उघडला, ते पेटलेलं बुब्बुळ चोहीदिशांनी टकाटका फिरलं आणि हलकेच स्थिर झालं... नजर रोखली गेली... इस्थावर!

इस्थाने काय करावं? त्याने त्या डोळ्यांत रोखून पाहिलं आणि म्हणाला, येस्!

तोच होता तो. इस्था.

त्याच्या आत वळवळणारा तो ऑक्टोपस त्याच्या तावडीतून सुटायचा प्रयत्न... निकराचा... पण काहीही उपयोग झाला नाही. सगळ्या अस्तित्वालाच गिळून टाकणारी ती वळवळ आतल्याआत होतीच जिवंत! हृदयाला लगटलेल्या मांसपेशींच्या लुसलुशीत आवरणात किंवा कपाळावरच्या खोल, चिंताग्रस्त आठीत!... रुतलेली होती अगदी...

आंब्याच्या कोयीचं बारीक केसर दाताच्या फटीत अडकून बसावं, तशी!

अगदी वास्तवाला धरून खरंखुरं सांगायचं, तर सोफी मॉल आयमेनेममध्ये परत आली, तेव्हापासून हे सगळं सुरू झालं. एका दिवसात इकडचं जग तिकडं होऊ शकतं, वाट्टेल ती उलथापालथ होऊ शकते; हे तसं खरंच आहे. अवघे काही तास जीवनभराचं श्रेय उलथून टाकू शकतात. होत्याचं नव्हतं करू शकतात. असं होतं, तेव्हा समोर उभे राहतात, ते काही तास!... जळलेल्या घराच्या ढिगाऱ्यातून काही अवशेष हाती लागावेत, तसे!... कधीच बंद पडलेलं एखादं घड्याळ... ज्वाळांच्या तडाख्यात करपून गेलेले जुने फोटो... आगीच्या लोळांनी होरपळून गेलेलं काळं-करपट फर्निचर... त्यातूनच पुढं उभं करावं लागतं नवं जग. राख झटकून उभं राहावं लागतं पुन्हा... परीक्षा द्यावी लागते... आणि झाल्यागेल्याचा हिशेबही!

छोटे-छोटे प्रसंग... जळलेल्या, उद्ध्वस्त झालेल्या किरकोळ गोष्टी... त्यांच्यामध्येच नवे नवे अर्थ बहरतात मग! रंग उडून गेलेल्या एखाद्या गोष्टीची पिसं आकाशभर उधळावीत... तसं काहीसं!

सोफी मॉल आयमेनेममध्ये आली, तेव्हापासून सगळं सुरू झालं... खरंच? म्हटलं, तर 'हो'; पण म्हटलं, तर 'नाही'.

सोफी मॉल यायच्या आधी – हजारो-लाखो वर्षं आधीपासून सुरू झालं सगळं. मार्क्सवादी केरळात घुसले, त्याच्याआधी... ब्रिटिशांनी मलाबावर कब्जा केला, त्याच्याआधी... डचांच्या साम्राज्यापूर्वी... वास्को द गामा आला, त्याच्याही आधी... झामोरीननं कालिकत बंदर जिंकून घेतलं, त्याच्याआधी... जांभळे झगे घातलेल्या तीन सीरिअन बिशपची माशांनी कुरतडलेली प्रेतं पोर्तुगीजांनी समुद्रात फेकून दिली होती, समुद्रातल्या सापांची वेटोळी त्या प्रेतांच्या छाताडावर नाचत होती आणि कालवांनी त्यांच्या दाढ्यांचे केस एकमेकांत पक्के गुंतवले होते... त्याच्याही आधी?... खरं तर, होड्यांवर स्वार होऊन ख्रिश्चन धर्म केरळात आला आणि गरम पाण्यात बुडवलेल्या टी-बॅगमधून लाल चहा उतरावा, तसा सगळीकडं झिरपतझिरपत गेला, त्याच्याही आधीपासून हे सगळं चालू आहे. ...नक्कीच!

...खरं तर, त्याच्याही आधी मानवी प्रेमाचे कायदेकानून तयार केले गेले, तेव्हापासून चालू झालं सगळं.

त्या कायद्यांनीच तर ठरवलं सगळं...

प्रेम कुणावर करावं?... कसं करावं?...

आणि किती?

हेसुद्धा!

कितीही नाही म्हटलं, तरी जगावंच लागतं
या व्यवहारी जगात.
इथं नव्या आशेला जागा नाही, तरीही...
पाठीवर लादलेली तडजोडीची ओझी उतरवता येत नाहीत,
तरीही...

प्रकरण २
पाप्पाचींचा 'पतंग'

डिसेंबर एकोणसत्तरमधला एक निरभ्र निळा दिवस.

(एकोणीसशेचा उल्लेख नकोच शक्यतो.)

प्रत्येक कुटुंबाने वर्तमानाच्या कवचात... आत... कुठेतरी खोल लपवलेल्या नीतिशास्त्राला ढोसून-ढोसून चाळवण्याची वेळ येऊन कोसळतेच कधीतरी. तसंच झालं होतं नेमकं. कवचाच्या गर्भामधून वर येत-येत नैतिकता, नीतिमूल्यं वगैरे वगैरे प्रकरण पाण्याच्या पोटातल्या बुडबुड्यांसारखं पृष्ठभागावर येतं आणि जगासमोर एकदम उघडंच पडतं. वाहत्या प्रवाहासोबत इकडंतिकडं हिंडत, तरंगत बसतं.

निळ्या आकाशाच्या रंगात न्हालेली प्लायमाऊथ पाठीमागच्या दिव्यांमध्ये सूर्यबिंब खोचून कोचिनच्या दिशेनं निघाली होती. हिरवी कोवळी भातखाचरं आणि चेहरे ओढलेली रबराची म्हातारी झाडं दोन्ही बाजूंनी वेगात मागे पळत-पळत प्लायमाऊथसमोर रस्त्याचा गालिचा अंथरत होती.

पार पूर्वेकडच्या देशात, खरं म्हणजे, अशीच भातखाचरं... इतकीच म्हातारी रबराची झाडं... आजूबाजूचा निसर्ग सगळा अगदी असाच. तेच जंगल, तशाच नद्या आणि तेच कम्युनिस्ट! शिवाय पावलापावलांवर पडणारे बॉम्ब. दर सहा इंचांवर दबा धरून बसलेला मृत्यू.

...पण इकडं छान शांतता होती. भीती नाही, घबराट नाही. एखाद्या आपत्तीची, अपशकुनाची साधी चाहूलसुद्धा नाही. वेगानं धावणाऱ्या प्लायमाऊथमध्ये बसून एक कुटुंब अगदी मजेत कोचिनच्या दिशेनं निघालं होतं.

प्लायमाऊथ पाप्पाचींची! म्हणजे राहेल आणि इस्थाच्या आजोबांची. पाप्पाचींच्या मृत्यूनंतर प्लायमाऊथची मालकी आपोआपच माम्माचीकडे – म्हणजे आजीकडे – चालत आली. 'द साऊण्ड ऑफ म्युझिक' तिसऱ्यांदा बघण्याकरता उत्सुक असलेले राहेल आणि इस्था आजीच्या गाडीत बसून कोचिनला निघाले होते. त्या सिनेमातली एकूण एक गाणी त्यांना अगदी तोंडपाठ होती.

सिनेमा बघून झाला, की स्वयंपाकघरातल्या फडताळासारखा गोडुस वास येणाऱ्या हॉटेल 'सी क्वीन'मध्ये मुक्काम करायचा, असं ठरलेलं. तिथलं बुकिंग आधीच झालं होतं. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून त्यांना कोचिन विमानतळावर जायचं होतं. एके काळी चाकोची बायको असलेली त्यांची इंग्लिश मामी – मार्गरिट कोचम्मा आणि मामेबहीण सोफी मॉल... अशा दोघी जणी आयमेनेममध्ये ख्रिसमस साजरा करण्यासाठी थेट

लंडनहून येणार होत्या. मार्गरिट कोचम्माचा दुसरा नवरा; जो चार-पाच महिन्यांपूर्वी एका कार-अॅक्सिडेंटमध्ये ठार झालेला. ही बातमी कळल्यापासून अस्वस्थ झालेल्या चाकोने दोघींना आग्रहानं आयमेनेममध्ये बोलावलं होतं. सणाच्या दिवशी दु:खाचं सावट पसरलेल्या इंग्लंडमधल्या त्या उद्ध्वस्त घरात दोघींनी एकाकी, हिरमुसल्या अवस्थेत घुसमटत राहावं, हे चाकोला अजिबात मान्य नव्हतं. तसं त्याने स्वच्छच सांगून टाकलं आणि दोघींनाही आयमेनेममध्ये बोलावलं.

अम्मू म्हणायची, एवढं झालं, तरी अजूनही चाकोचं मार्गरिट कोचम्मावर मनापासून प्रेम आहे. माम्माचीला हे कधीच पटलं नाही. अगदी पहिल्या क्षणापासून त्या दोघांमध्ये दुरावाच होता आणि चाकोनं मार्गरिट कोचम्मावर कध्धी कध्धीच प्रेम केलेलं नाही... त्याच्या मनात ती भावना कधी रुजलीच नाही, अशी माम्माचीला छातीठोक खातरी होती.

राहेल आणि इस्थानं सोफी मॉलला अजून पाहिलंसुद्धा नव्हतं; पण गेला आठवडाभर घरी-दारी सतत तिच्याच नावाचा जप चाललेला. बेबी कोचम्मापासून कोचू मारियापर्यंत सगळे जण सारखे सोफी मॉलबद्दलच बोलत... अगदी माम्माचीसुद्धा! खरं म्हणजे, यांतल्या कुणीच सोफी मॉलला प्रत्यक्ष पाहिलेलं नव्हतं; पण गप्पा अशा की, सोफी मॉल यांच्या डोळ्यांदेखतच लहानाची मोठी झालीय्!

'सोफी मॉलला काय वाटेल? ती कशी हसेल? कशी दिसेल?'– याचा येता-जाता जप चाललेला! घरादाराला जणू तिच्याशिवाय दुसरं काही सुचतच नव्हतं.

बेबी कोचम्माचा तर जीवच उडून गेलेला. राहेल आणि इस्था सोफी मॉलशी कसे वागतील, याची तिला काळजीच लागली होती. तिनं सतत दोघांवर बारीक लक्ष ठेवायला सुरुवात केली. इस्था आणि राहेलनं एकमेकांशी इंग्रजीतच बोलायचं असा दंडक तिनं घालून दिला होता. चुकून एखादा मल्याळम शब्द कानी पडला, तर ताबडतोब दंड ठोठावला जाई आणि इन्कमटॅक्सवाल्यांनी मान खाली घालावी, इतक्या चलाखीनं दोघांच्या पॉकेटमनीमधून दंडाची वसुलीही अगदी क्षणात होत असे... डिडक्टेड अॅट सोर्स! बेबी कोचम्माला इंग्रजीचा खुंटा हलवून बळकट करायचा होता. म्हणून तिनं इस्था आणि राहेलपुढं कागद ठेवले आणि त्यांना लिहायला लावलं...

'आय विल ऑल्वेज स्पीक इन इंग्लिश'...

'मी कायम इंग्रजीतच बोलेन.'

– दोघांना ही कबुली तब्बल शंभर वेळा (लिहून) द्यायची होती. शेवटी बेबी कोचम्मानं लाल पेन्सिल घेऊन दोघांचेही कागद अगदी बारकाईनं तपासले. वाजवून पैसे वसूल करावे, तशी शंभर वाक्यं काटेकोर मोजून घेतली.

सोफी मॉलला घेऊन परत येताना गाडीमध्ये म्हणण्यासाठी एक 'कारसॉंग'ही बेबी

कोचम्मानं मुलांकडून घोकून घेतलं होतं. शब्द नीट म्हणायचे. उच्चार अचूक करायचे आणि गाण्याचा ताल नीट पकडायचा –

Rej-Oice in the Lo-Ord Or-Orlways
And again I say rej-Oice,
Rej-Oice,
Rej-Oice,
And again I say rej-Oice

इस्थाचं पूर्ण नाव होतं इस्थापन याको. राहेल मात्र 'राहेल'च होती. मधला काही काळ आडनाव नव्हतंच दोघांना. कारण अम्मूचा विचार चाललेला... आपलं आडनाव बदलून पुन्हा पूर्वीचंच करावं का?... म्हणजे लग्नापूर्वीचं? नाहीतरी बायकांना निवड करण्याची संधी असतेच कुठं फारशी? आपल्या नवऱ्याचं आडनाव किंवा वडिलांचं आडनाव... याखेरीज पर्यायच कुठं आहे?... त्यात अम्मू खूश नव्हती फारशी!

पायांत झोकदार बूट घालून आणि एल्व्हिस प्रिस्लेसारखा केसांचा कोंबडा काढून इस्था सजलेला. तो ऐटबाज कोंबडा त्याला भारी आवडायचा आणि एल्व्हिस प्रिस्लेचं ते 'पार्टी साँग'पण!... 'सम पिपल लाईक टु रॉक, सम पिपल लाईक टु रोल'... कुणाचं लक्ष नाहीसं बघून इस्था येता-जाता हे गाणं गुणगुणत बसे... स्वत:शीच! बॅडमिंटनची रॅकेट कमरेशी तिरपी धरून, एल्व्हिससारखेच ओठ मुडपत, त्याचं गाणं चालू असे... उच्चार पण अगदी तसेच... स्टाइलबाज... ओठांत घोळवलेले!...

बट् मुनिंऽऽग अॅन् ग्रुनिंऽऽग गोन्ना सॅटिसफाय् माय सोल्, लेट्स हॅव व पार्टी!

इस्थाचे डोळे पुष्कळसे पेंगलेले... झोपाळू आणि नुकते-नुकते उगवलेले पुढचे दातही मोठेमोठे, बेढव. कडाकडांची बारीक करवत अजून तशीच होती त्याच्या दातांवर. राहेलच्या कडक हिरड्यांचं गुपित मात्र अजून फुटलंच नव्हतं बाहेर. शाईनं भरलेल्या पेनमध्ये हजारो-लाखो शब्द कोंबून कोंबून थांबले असावेत, तसे राहेलचे दात आतच होते अजून. वाट पाहत थांबल्यासारखे... दोघांच्या जन्मवेळेतलं फक्त अठरा मिनिटांचं अंतर दातांनी कसं काय धुडकावून लावलं असेल, याचं सगळ्यांनाच फार आश्चर्य वाटे.

राहेलचे घट्ट, दाट केस म्हणजे टोपलंच. त्यांचा बुचडा बांधून तिच्या डोक्यावर एक कारंजच उभं केलं होतं अम्मूनं. कारंज्याभोवती दोन मणी लावलेला रबरबॅन्ड. त्याला म्हणायचं 'लव्ह इन टोकियो' लव्ह... टोकियो... आणि तो रबरबॅन्ड. कशाचा कशाशी अर्थाअर्थी संबंध नसला, तरी त्याला 'लव्ह इन टोकियो'च म्हणायचं. वर्षामागून वर्षं सरली... काळाची इतकी पानं उलटली, तरी केरळात 'लव्ह इन टोकियो' आहेच; अजूनही... अगदी आजही कुठच्याही लेडीज स्टोअर्समध्ये मागितलं, तर नक्की मिळेल... लव्ह इन टोकियो. रबरबॅन्ड आणि त्यावर लावलेले दोन मणी.

राहेलच्या मनगटावर एक घड्याळ... खेळण्यातलंच होतं, पण होतं! त्यावर 'किती वाजले' हे रंगवूनच टाकलेलं पक्कं... दोनला दहा कमी (की दहा वाजून दहा मिनिटं?). राहेलने पक्कं ठरवलं होतं स्वत:च्या मनाशी, की कधी ना कधीतरी आपण असं घड्याळ घ्य्ायचं; ज्याच्यावरची वेळ आपल्या मनाप्रमाणे बदलता येईल. हवी तेव्हा बदलता येईल (वेळ म्हणजे तिला खेळणंच वाटे सुरुवातीला. कंटाळा आला, की बदललं... पुन्हा बदलून नवीन घेतलं... किती वाजता किती वाजावेत हे आपणच ठरवायचं आणि काटे फिरवायचे).

राहेलच्या डोळ्यांवर होता एक झकपक गॉगल. पिवळी फ्रेम आणि लाललाल प्लास्टिकच्या काचा. तो गॉगल घातला, की अख्खं जग तिला लालम्लाल दिसे. अम्मू वैतागायची तिच्यावर. 'असला फालतू गॉगल सारखा कशाला घालतेस?... डोळे बिघडतील,' म्हणायची; पण राहेल अजिबात ऐकत नसे. मग आणखी वैतागून अम्मू म्हणे, 'घाल... पण सारखा नको.'

एअरपोर्टवर जाताना घालण्यासाठी म्हणून आठवणीनं घेतलेला राहेलचा खास फ्रॉक अम्मूच्या सूटकेसमध्ये होता. त्याला मॅचिंग चड्डीपण होती.

गाडी वेगानं चाललेली. चाको ड्रायव्हिंग करत होता. अम्मूपेक्षा चारेक वर्षांनी मोठा असेल; पण त्याला 'चाचेन' म्हणून हाक मारायला राहेल आणि इस्था घाबरत. कारण त्यांनी त्याला 'चाचेन' म्हटलं, की चाको 'चेतन आणि चेडुथी' म्हणून त्यांना चिडवत बसे. त्यांनी 'अम्मावेन' म्हटलं, की तो 'अप्पाई' आणि 'अम्माई'ची रेकॉर्ड लावायचा. राहेल आणि इस्थानं 'अंकल' म्हणून हाक मारली, की चाको लगेच 'आन्टी आन्टी' म्हणून हसत सुटायचा. चारचौघांत असं आन्टीबिन्टी म्हटलेलं दोघा मुलांना बिलकूल आवडत नसे. म्हणून ते चाकोला सरळ 'चाको' म्हणूनच हाक मारत.

चाकोच्या खोलीत कायम पुस्तकांचे गठ्ठेच्या गठ्ठे पडलेले असत. भिंतीलगत थप्प्या लावून ठेवलेली पुस्तकंच पुस्तकं. चाकोने त्यांतलं पान न् पान वाचलेलं असे. कुठल्याकुठल्या पुस्तकातले उतारेच्या उतारे तोंडपाठ. मग गरज असो-नसो, चाको ज्याच्या-त्याच्या तोंडावर पुस्तकातले निरर्थक संदर्भ फेकत राही. एकतर हे उतारे निरर्थक, विसंगत असत किंवा मग अत्यंत गहन! इतके की, कुणाला म्हणून त्यातला अर्थ उलगडेल तर शपथ! त्याच दिवशी सकाळची गोष्ट. सगळे जण कोचिनला निघाले, तेव्हा व्हारांड्यात उभ्या असलेल्या माम्माचीचा निरोप घेता-घेता चाकोनं अचानक आपली रेकॉर्ड सुरू केली.

'शेवटी सगळ्या जंजाळातून गॅटस्बी सुखरूप बाहेर पडला. ही नियतीच होती त्याची. धुरकटलेल्या स्वप्नात जळक्या वर्तमानाची भीषण ओंगळ राख तरंगत होती. त्या राखेच्या भपकार्‍यानं स्वारस्यच संपून गेलं सगळ्या जगाबद्दलचं. अलिप्ततेचे तटस्थ कोश फुटून

बाहेर भुळभुळणारी दु:खं आणि अत्यल्प काळाचे चिमुकले आनंद... सगळयाचीच राख जमते आहे पुन्हा?'

चाकोच्या या भाषणबाजीची सगळयांना इतकी सवय झाली होती, की कुणी कुणाला ढोसलं नाही, 'हे काय चाललंय? अशा अर्थाच्या भुवया उंचावून एकमेकांकडं पाहिलंसुद्धा नाही. चाको ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचा 'र्‍होड्स स्कॉलर' होता. त्यानं काय वाट्टेल, तो विक्षिप्त तर्‍हेवाईकपणा केला तरी चालायचं. 'र्‍होड्स स्कॉलर'ला कोण काय बोलणार?

अख्ख्या कुटुंबाचं चरित्र लिहून काढायचं आणखीन एक भूत चाकोच्या पुस्तकांनी किचकिचलेल्या डोक्यात होतं. 'मी असं चरित्र लिहीन की, ते प्रकाशित करू नये, म्हणून अख्ख्या कुटुंबाला माझ्या हातापाया पडावं लागेल, मनधरण्या कराव्या लागतील' – असा त्याचा दावा होता. ज्याला-त्याला तो हेच सांगत सुटे; पण चाकोची ही पोकळ मिजास अम्मूला बिलकूल मान्य नव्हती. ती म्हणे, या असल्या धमक्यांनी ज्याला घाम फुटावा आणि 'आपल्या इज्जतीचा पंचनामा चव्हाट्यावर झाला, तर काय होईल' – या धास्तीनं झोप उडावी, अशी एकच व्यक्ती संपूर्ण कुटुंबात आहे... ती म्हणजे खुद्द चाकोच!

...खरंच होतं अम्मूचं म्हणणं... म्हणजे तेव्हा!... सगळीकडं भयग्रस्ततेचं सावट पसरलं त्याच्या पुष्कळ आधी.

वार्‍याच्या वेगानं धावणार्‍या प्लायमाऊथमध्ये पुढच्या सीटवर अम्मू बसली होती. तिच्या शेजारी चाको. तो गाडी चालवत होता... सरळ समोर बघून. अम्मू जेमतेम सत्तावीस वर्षांची; पण तिच्या अथांग गर्भात जगण्यानं ठेवून दिले होते आपले अंकुर. त्यातल्या सुखदु:खांचा पाझर पेशीपेशींतून पाझरत तिच्या शरीरभर भिनला होता. 'आत' गोळा होऊन राहिलेल्या या जगण्यानं अम्मूला एकच संधी दिली; पण अम्मूच्या मुठीतून सगळं आयुष्यच भुळभुळून गेलं. चुकीच्या माणसाशी तिची गाठ पडली आणि लग्न झालं. तीच सुरुवात... सगळं संपत-संपत जाण्याची.

अम्मूचे वडील निवृत्त होऊन दिल्लीहून आयमेनेममध्ये परत आले, त्याच वर्षी तिची शाळा संपली होती. मुलीच्या जातीनं कॉलेजात जाणं म्हणजे फुकट पैसा उधळणं असं पाप्पाचींचं ठाम मत होतं. त्यामुळे पुढच्या शिक्षणाचे विचार बासनात गुंडाळून आयमेनेमला परत येण्याखेरीज अम्मूकडं दुसरा पर्यायच उरला नव्हता. आयमेनेमसारख्या आडवळणाच्या खेड्यात ती करणार तरी काय? लग्नाचे प्रस्ताव येण्याची वाट बघत बसणं आणि घरात स्वयंपाकपाणी शिकून घेणं एवढंच शक्य होतं फक्त. त्यातून मुलीसाठी 'स्थळं' धावत यावीत, तर त्यासाठी भरभक्कम हुंडा मोजण्याइतकी ऐपतही अम्मूच्या वडिलांची नव्हती. त्यामुळं ती बिचारी कोरडीच बसून राहिली. दोन वर्षं काही म्हणजे काहीच घडलं नाही. अम्मूचा अठरावा वाढदिवस आला आणि गेला... तरीही झाडाचं पानसुद्धा हललं नाही. तिचे आई-वडीलही तसेच मख्ख बसून होते. लेकीचा ऋतू वाया

चाललाय्, याकडं जणू लक्षच नव्हतं त्यांचं. अम्मू वैतागली. आयमेनेममध्ये तिचा जीव घुसमटायला लागला. रागीट, हेकट वडील आणि सारखी आजारपणात गुरफटलेली, सदान्कदा किटकिट करणारी आई यांच्या तावडीतून कधी एकदा आपली सुटका होईल, असं तिला झालं. अम्मूने पुष्कळ विचार केला. तर्हेतर्हेचे बेत रचून पाहिले... अखेर तिच्या एका डावाला यश आलं. कोलकात्याला राहणार्‍या एका दूरच्या आत्याकडं उन्हाळयाची सुटी घालवण्याची परवानगी अम्मूला मिळाली.

...तिथंच, दुसर्‍या कुणाच्या तरी लग्नात अम्मूच्या आयुष्यानं एक निराळंच वळण घेतलं. तिला तिचा भावी नवरा भेटला.

आसामातल्या चहाच्या मळयावर मॅनेजर म्हणून तो काम करायचा. सुटी घेऊन कोलकात्याला आला होता. एके काळी घरात झुलणार्‍या 'जमिनदारी वैभवा'च्या खुणा सांगणारं त्याचं कुटुंब फाळणीनंतर पूर्व बंगालमधून कोलकात्याला स्थलांतरित झालं होतं.

तसा तो लहानखुराच; पण अंगापिंडानं मजबूत. दिसायचाही छान... प्रसन्न. स्वभाव तसा बालिश, अवखळ... काहीसा उनाडटप्पू; पण डोळयांवर चढवलेल्या जाड जाड काचांच्या जुनाट चश्म्याआड हे सगळं बेमालूम लपवता यायचं. तो भलताच गंभीर, विचारी वगैरे दिसायचा. जेमतेम पंचविशीचा असेल. त्यांतली सहा वर्षं चहाच्या मळयात गेलेली. कॉलेजचं तोंड बघितलेलं नाही. उच्च शिक्षणाचा गंध नाही. 'माणूस' म्हणून खास कसले संस्कार नाहीत. त्यामुळे पंचविशी गाठूनही तो शाळकरी मुलगाच राहिला होता. अम्मूची भेट झाल्यापासून पाचव्या दिवशी त्यानं तिला 'प्रपोज' केलं. अम्मू त्याच्या प्रेमात वगैरे पडलेली नव्हती. तसा खोटा देखावाही तिनं केला नाही. तिनं फक्त समोर 'नसलेल्या' पर्यायांचा विचार केला आणि 'हो' म्हणून बसली. आयमेनेमला परत जाणं टळत असेल, तर काय वाट्टेल ते स्वीकारण्याची तिची तयारी होती. अम्मूनं आई-वडिलांना पत्र लिहिलं आणि आपला 'निर्णय' त्यांना कळवून टाकला. त्या पत्राला उत्तर म्हणून आयमेनेमहून साधं चार ओळीचं कार्डसुद्धा आलं नाही.

अम्मूचं लग्न कोलकात्याच्या पारंपरिक झोकात पार पडलं. तिच्या नवर्‍याच्या नजरेत कसलीशी चमक तरळताना दिसत होती. स्वप्नाळू प्रेमाचा सुंदर आभास निर्माण करणारी ती नजर, खरं म्हणजे, नशेनं पेंगलेली होती, हे पुढं पुष्कळ दिवसांनी तिला कळलं. त्या नजरेत प्रेम नव्हतं, काही तासांनी मिळणार्‍या संभोगसुखाची आसक्तीही नव्हती. होता फक्त मदिरेचा अंमल. आठ लार्ज पेग व्हिस्की. आणि तीही कोरी! ऑन द रॉक्स!

अम्मूचे सासरे रेल्वे बोर्डाचे चेअरमन. शिवाय केंब्रिज विद्यापीठातून 'बॉक्सिंग ब्ल्यू' मिळवलेले. बंगाल अॅमॅच्युअर्स बॉक्सिंग असोसिएशनचे सेक्रेटरी होते. अम्मूच्या लग्नात त्यांनी आपल्या मुला-सुनेला एक कोरी करकरीत गुलाबी रंगाची 'फियाट' भेट दिली. लग्नाचा सोहोळा आटोपल्यानंतर नवपरिणीत दांपत्य, सगळे दागदागिने आणि

मिळालेल्या भेटी गाडीत घालून त्यांनी स्वत: ती फियाट चालवली होती. इस्था आणि राहेलच्या जन्माआधीच, पित्ताशयाची शस्त्रक्रिया चालू असताना 'ऑपरेशन टेबल'वरच त्यांनी शेवटचा श्वास घेतला. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी बंगालमधले झाडून सगळे बॉक्सर्स हजर होते. रुंद जबडे आणि फुटलेल्या नाकांच्या त्या शोकाकुल जमावानं गेलेल्या जीवाकरता चर्चमध्ये प्रार्थना केली.

अम्मू तिच्या नवऱ्याबरोबर आसामला आली. चहाच्या मळयावरच्या मंडळींनी इतकं कोवळं, नरम तारुण्य फार दिवसांत पाहिलं नव्हतं. त्यामुळं 'प्लॅन्टर्स क्लब'- मधल्या सदस्यांच्या नजरा अम्मूच्या रक्तामांसात पक्क्या रुतल्या. त्यातून ती पाठ उघडी टाकणारे सेक्सी ब्लाऊज घालत असे. बेंबीच्या खाली नेसलेली साडी... नाजूक मनगटाभोवती हेलकावणारी नखरेल चंदेरी पर्स, असा तिचा थाट असे. चांदीच्या होल्डरमध्ये खोचलेल्या लांबलचक सिगारेट्स रुबाबात शिलगावून गोलगोल धुराची वेटोळी काढायलाही ती शिकली होती. अम्मूचा नवरा पक्का दारूबाज निघाला. तो रात्रंदिवस प्यायचा. सदान्कदा तांबारलेल्या डोळयांनी फिरायचा, एवढंच नव्हे, तर दारुड्या माणसाच्या सगळया तऱ्हा त्याच्यामध्ये ठासून भरलेल्या होत्या. त्याच्या वागण्याचे अर्थ कधीकधी अम्मूला समजतच नसत. तो थापा मारतो हे तिला ठाऊक होतं; पण गरज नसतानाही तो खोटं का म्हणून बोलतो, हे तिला कळत नसे. त्याला सोडून आल्यानंतरही तिच्या मनातले प्रश्न संपले नाहीत. निखाऱ्यावर खरपूस भाजलेला सालमॉन मासा आपल्याला फार आवडतो, असं तो मित्रमंडळींना सांगे. प्रत्यक्षात त्या माशाच्या वासाचादेखील त्याला तिरस्कार आहे, हे अम्मूला ठाऊक होतं. वस्तुस्थिती लपवून कसलाही फायदा होणार नसताना किंवा अजिबात कसली म्हणून गरज नसतानाही माणूस धडधडीत खोटं का बोलतो?... दारूच्या बरोबरीनं रक्तात भिनलेल्या या खोटारडेपणाचा अर्थ अम्मूला कधीच उलगडता आला नाही. अनेकदा तो क्लबमधून परत यायचा आणि अम्मूला सांगायचा, 'आज आम्ही 'मिट मी इन सेंट लुईस' ही फिल्म पाहिली'– प्रत्यक्षात मात्र त्या दिवशी 'द ब्रॉन्झ ब्युकारू' किंवा अशीच कोणतीतरी तिसरीच फिल्म दाखवलेली असे. हे प्रकार फार वेळा घडले की, असल्या व्यर्थ खोटारडेपणामुळे संतापलेली अम्मू त्याच्याशी हुज्जत घाली; पण त्यानं कधीही स्पष्टीकरण केलं नाही, खुलासे दिले नाहीत. माफी मागणं तर दूरच राहिलं! तो फक्त खुदुखुदु हसत बसे. अम्मूचा नुसता तिळपापड होई. इतका की, कधीकधी धगधगत्या रागाचा तो भडका तिला स्वत:लाच पेलता येत नसे.

ऑक्टोबर १९६२. भारत-चीन युद्धाचा भडका उडाला, तेव्हा अम्मू आठ महिन्यांची गरोदर होती. मळेवाल्यांच्या बायका-मुलांना आसाममधून ताबडतोब हलवण्यात आलं. अम्मूची अवस्था इतकी बिकट होती, की प्रवासाचा विचार करणंसुद्धा अवघड होऊन बसलं. नोव्हेंबरात अफवांचं पेव फुटलं. भारताची पीछेहाट होत आहे, चिनी पुढं पुढं

घुसतायत. ते कधीही येऊन कब्जा करतील, अशा दहशतीच्या सावटाखाली शिलाँगला निघालेल्या बसचे उलटसुलट धक्के खाऊन मेणबत्तीच्या मंद प्रकाशात इस्था आणि राहेलचा जन्म झाला. 'ब्लॅक आऊट'च्या आदेशामुळे हॉस्पिटलच्या खिडक्या काळे कागद लावून गुडूप केलेल्या. फारशी खळखळ न करता अम्मूच्या गर्भातून दोन जीव जन्माला आले. मध्ये फक्त अठरा मिनिटांचं अंतर. एकाच्या ऐवजी दोन दोन मुटकुळी अम्मूच्या कुशीत पहुडली. जन्माला येताना झालेल्या कष्टांच्या सुरकुत्या दोघांच्याही टिकलीएवढ्या चेहऱ्यांवर दाटून आल्या होत्या. अम्मूनं दोघांच्या हाता-पायांची चाळीस बोटं नीट मोजून घेतली. चार डोळे, दोन नाकं, चार ओठ, हातापायांच्या चार जोड्या सगळं तपासलं आणि मगच थकलेले डोळे मिटून झोपून गेली.

...अम्मूचं मोजमाप अचूक होतं; पण दोघांमधला 'एक आत्मा' तिला स्पर्शानं ओळखता आला नाही. त्यांची अस्तित्वं एकमेकांशी जोडून टाकणारी 'सयामी' नाळ तिच्या हातात मुळी गवसलीच नाही. आपल्या रक्तामांसातून जन्मलेली गोबरी-गोबरी बाळं बघून ती खूश मात्र झाली. त्या बाळांचा बाप बाहेर एका बाकड्यावर ताणून झोपला होता. दारूच्या उग्र वासाने भणभणणाऱ्या त्याच्या तोंडाभोवती माश्या घोंघावत होत्या.

जुळी मुलं जेमतेम दोन वर्षांची झाली असतील. चहाच्या मळ्यावरच्या भयानक एकाकीपणामुळे त्यांचा दारुडा बाप उबून गेला होता. त्या रिकाम्या उदास दिवसांत दारूशिवाय त्याला क्षणभर चैन नसे. त्याच्या पोटात वाहत येणाऱ्या दारूचे लोट शरीरभर पसरत झिरपत राहिले आणि मोठ्ठा फुगाच तयार झाला. तो सदैव त्या फुग्यात मंद पडून राही. डोळ्यांतली गुंगी, शरीरावरली ग्लानी वाढतच चालली होती. कामाच्या नावाने रोजची बोंब. मळकट, कुबट बिछान्यात त्याचं मुटकुळं पडलेलं असे. मळ्यावरला त्याचा गोरा साहेब मिस्टर हॉलिक – भडकलाच होता. शेवटी अतिच झाल्यावर साहेबानं त्याला बोलावणं धाडलं. बंगल्यावर जायचं होतं – फॉर अ सिरियस चॅट!

साहेबाशी बोलणी करायला गेलेल्या नवऱ्याची वाट बघत अम्मू व्हारांड्यात बसून होती. दारूनं पोखरलेल्या आपल्या कंडम नवऱ्याच्या हाती नारळ देऊन गोरा साहेब त्याला नोकरीवरून हाकलून देणार, हे तिला पक्कं ठाऊक होतं; पण फेंगड्या पायांनी घराकडे सरकत, सरपटत येणाऱ्या त्या प्राण्याकडे बघून अम्मू चमकलीच. तिला वाटलं होतं, तो कोसळूनच जाईल पार... पण तसं काही चिन्हं दिसेना. तांबारलेल्या चेहऱ्यावर निराशेची एखादी उद्विग्न छटा... एवढंच!

'मिस्टर हॉलिकनं एक प्रस्ताव मांडलाय्. त्याबद्दल थोडं बोलायचंय तुझ्याशी.' एवढी प्रस्तावना करून त्यानं सुरुवात केली. अडखळ, धडपड चालूच होती. शब्दही नीट सापडत नव्हते. सापडले, तर वाक्यात धड जुळत नव्हते. तरीही अम्मूची नजर चुकवत त्यानं नेट लावून धरला. हळूहळू त्याला सूर सापडला आणि प्रयासानं गिळून ठेवलेले शब्द

ओकारीसारखे भडाभडा बाहेर गळत राहिले.

'हॉलिकचा प्रस्ताव मान्य करण्यातच आपल्या दोघांचं, खरं म्हणजे, आपल्या सगळ्यांचं हित आहे,' एवढं त्यानं आधीच अम्मूच्या कानांवर घालून टाकलं. दोन-दोन मुलं... त्यांचं शिक्षण... जबाबदाऱ्या हे सगळं कधी नव्हे ते त्याला आठवत होतं.

मिस्टर हॉलिक भलताच स्पष्टवक्ता माणूस निघाला. त्यानं कसलाही आडपडदा न ठेवता आपल्या सहकाऱ्याशी थेट बोलणी केली. मळ्यावरच्या कामगारांच्या तकरारी, इतर अधिकाऱ्यांची तीव्र नाराजी हे सगळं स्पष्टपणे कानांवर घालून शेवटी तो म्हणाला,

"आता तुझा राजीनामा घेण्यावाचून माझ्यापुढे दुसरा पर्यायच उरलेला नाही."

विचित्र शांतता पसरली. समोरच्या खुर्चीत अंग चोरून बसलेल्या मुटकुळ्याकडे नजर रोखून पाहणाऱ्या धूर्त हॉलिकनं काही क्षण तसेच जाऊ दिले. त्या वांझोट्या भयंकर क्षणांनी आपलं काम चोख बजावलं... भीतीनं थरथरणाऱ्या खुर्चीतल्या मुटकुळ्याला आता रडू फुटणार, इतक्यात हॉलिकनं हातातला हुकमाचा पत्ता फेकला.

"वेल्... अगदीच सगळं संपलंय, असं समजू नकोस. परहॅप्स वी कुड वर्क समथिंग आऊट. माणसानं अखेरच्या क्षणापर्यंत आशा सोडू नये. काऊण्ट युवर ब्लेसिंग्ज..."

...हॉलिकने दीर्घ श्वास घेतला. भुवया उंचावल्या. दोघांसाठी त्याची आवडती ब्लॅक कॉफी मागवली.

'तसं म्हटलं ना, तर तू खरंच मोठा भाग्यवान माणूस आहेस. इतकं छान कुटुंब, गोंडस मुलं, सच अॅन अट्रॅक्टिव्ह वाईफ...'

खसकन् काडी ओढून हॉलिकनं सिगारेट शिलगावली. शेवटच्या टोकापर्यंत जळत जाणाऱ्या लालभडक बिंदूकडं तो नजर रोखून पाहत राहिला. त्याच्या गोऱ्या, नाजूक बोटाला चटका देऊन काडी विझली.

'अॅन एक्स्ट्रीमली अट्रॅक्टिव्ह वाईफ'...

समोरची गलितगात्र खुर्ची सावध झाली. एव्हाना रडणं थांबलं होतं. काहीशी घाबरलेली, भांबावलेली नजर तांबारलेल्या हिरव्या डोळ्यांमध्ये रुतली. कॉफीचे घोट घेता-घेता हॉलिकनं बाबाचं बोट धरलं. 'थोडी विश्रांती घ्यायला हवी... मळ्यापासून दूर... एखाद्या निवांत हॉटेलात किंवा जिथं चांगले औषधोपचार मिळतील, अशा एखाद्या क्लिनिकमध्ये...' हॉलिक सांगत राहिला. शेवटी म्हणाला, 'तुझ्या बायकोची काळजी नको करू. तिला बंगल्यावर पाठवून दे. मी सांभाळीन.'

चहाची पानं खुडणाऱ्या मळ्यातल्या काही खास मजूर बायकांना हॉलिकनं 'सांभाळलंच' होतं आजवर. भुरकट केसांच्या काळसर-गोऱ्या पोरांच्या झुंडीही मळ्यावर काही कमी नव्हत्या. मळ्यातली खाज जिरल्यावर आता हॉलिकनं जरा वरच्या वर्तुळाकडं आपला मोहरा वळवला होता एवढंच.

नवऱ्याच्या तोंडातून गळणाऱ्या आंबूस, गलिच्छ शब्दांचा अर्थ अम्मूसमोर उलगडत राहिला. ती काहीच बोलली नाही. तिचं ते भयंकर मौन त्याला अगदी असह्य झालं होतं. वेड लागेल, अशा त्या विचित्र शांततेनं हळूहळू त्याचा पारा चढला. काय होतंय् हे कळायच्या आत त्यानं अचानक अम्मूच्या अंगावर झेप घेतली... तिचे केस मुठीत धरून खेचले. चार थपडा लगावून दिल्या; पण तेवढ्यानंही त्याचं पौरुष गळून पडलं. पाठीचा कणा नावाची चीज नसलेल्या त्या लेच्यापेच्या लिबलिबीत माणसाची चीड येऊन अम्मू संतापून उठली. शेजारीच बुकशेल्फ होतं. रीडर्स डायजेस्टचा जाडजूड वर्ल्ड अॅटलास उचलून तिनं त्याच्या डोक्यात आदळला. फेंगड्या पायांवर... बुळबुळीत पाठीवर... ओघळलेल्या खांद्यावर. जिथं जागा मिळेल, तिथं हल्ला चढवत अम्मूनं त्याला बदडून काढलं. शुद्ध आली, तेव्हा मुक्या मारानं सुजलेलं त्याचं शरीर वेदनांनी ठणकत होतं. लाचार, लाळघोट्या शब्दांत तो अम्मूची क्षमा मागत राहिला. हातापाया पडून, अजिजी करून तिला पुन:पुन्हा विनवत राहिला. हे नेहमीचंच होतं. आधी दारू ढोसून मारझोड करायची. आणि नंतर लळतलोंबत क्षमा मागत राहायचं. त्याच्या किळसवाण्या शरीरात भिनलेल्या अल्कोहोलचा उग्र दर्प... तोंडाभोवती सुकून गेलेले आंबट ओकारीचे ओघळ... दारिद्री, निर्लज्ज चेहऱ्यावर पाझरणारी निर्बुद्ध अजिजी... या सगळ्या ओंगळवाण्या दृश्याचा अम्मूला वीट आला होता.

शेवटी सगळंच हाताबाहेर गेलं. मुलांना मारझोड सुरू झाल्यावर अम्मूची सहनशक्ती संपली. सीमेवर पाकिस्तानबरोबरच्या युद्धाचा कडाका फुटलेला असताना अम्मूनं मन घट्ट करून निर्णय घेतला आणि नवऱ्याला सोडून ती माहेरी परतली. आयमेनेममध्ये. तिथं कुणालाही आपलं तोंड पाहाण्याचीदेखील इच्छा नाही, हे अम्मूला ठाऊक होतं, तरीही. तेच गाव... तेच घर... तीच माणसं... तेच आयुष्य. ज्याचा वैताग येऊन काही वर्षांपूर्वी तिनं आयमेनेममधून स्वत:ची सुटका करून घेतली होती, तिथंच ती पुन्हा आली. इलाजच नव्हता. आणि दोन मुलंही होती पदरात. सगळं तेच, तसंच. तेव्हाची स्वप्नं नव्हती फक्त. कोरड्या, दुखावल्या, जखमी वर्तमानाखेरीज काहीच नव्हतं.

अम्मूच्या कर्मकहाणीवर पाप्पाचींचा विश्वासच बसेना. आपल्या लेकीचा नवरा काय लायकीचा आहे, हे त्यांना ठाऊक होतं; पण एखादा गोरा साहेब – कोणताही इंग्लिश माणूस – दुसऱ्याच्या बायकोची लालसा धरू शकतो, हे त्यांच्या कल्पनेपलीकडचंच होतं. त्यांच्या ब्रिटिशधार्जिण्या वृत्तीला ते मुळी झेपलंच नाही.

दोन्ही मुलांवर अम्मूचा विलक्षण जीव. तरीही त्यांच्या भोकरांसारख्या डोळ्यांमधली निरागस कोवळीक बघितली की तिचा थरकाप उडे. दोन्ही मुलं मनानं फार प्रेमळ होती. समोरचा माणूस कितीही परका, अलिप्त, त्रयस्थ असला; तरी त्याच्यावरही आपली मुलं वेड्यासारखं प्रेम करतात, हे लक्षात आल्यावर तर अम्मूचा संताप व्हायला लागला. तिला

वाटे, एकदा... निदान एकदातरी या भाबड्या मुलांना चांगलं बडवून काढावं, म्हणजे तरी त्यांना अक्कल येईल जगाला ओळखण्याची. त्यांच्या दारुड्या बापाला आपण मोठ्या मुश्कीलीनं हुसकावून लावलं आपल्या आयुष्यातून. नेमक्या त्याच फटीतून तिसरंच कुणी आत घुसलं म्हणजे? मुलांची नजर आंधळीच राहिली, तर काय भरवसा द्यावा?

...पण जुळ्यांचं मस्त चाललं होतं. दोघं सतत एकमेकांच्या भोवती-भोवती असत. आपल्या आपल्यातच रंगलेली. भरधाव वाहनांच्या वर्दळीनं गजबजलेल्या रस्त्याच्या कडेला एकमेकांच्या कुशीत मुटकुळं करून झोपलेले दोन बेडूक असावेत, तशी दोघांची जोडगोळी. वाट चुकली आणि क्षण हुकला, तर ट्रकचं अजस्र चाक कुठं घुसेल आणि काय होईल, याची साधी कल्पनाही नसलेले बेडूक... निर्धास्त. आळसावलेले. मनातल्या रक्ताची थारोळी दडपून ठेवत अम्मू नजर ताणून त्यांच्याकडे बघत बसे. तिच्या आत कुठेतरी एका विचित्र काळजीनं जाळं विणायला सुरुवात केली होती. मुलांच्या हर-एक पावलाखाली काळीज पसरणारी अम्मू क्षणाक्षणाला त्यांना समजावत, दटावत राही. तिच्या आयुष्यात स्वत:साठी असं काही उरलंच नव्हतं. फक्त आयमेनेम. पुढचा व्हरांडा. मागचा व्हरांडा. उसळती, उष्ण नदी, लोणच्याचा कारखाना...

...आणि गावातली कुजबुज. आभाळभर दु:खानं कण्हत, केकाटत राहावं; तशी... अखंड.

माहेरी परत आल्यानंतर पहिल्या काही महिन्यांतच खोट्या सहानुभूतीचे दिखाऊ चेहरे अम्मूला ओळखता येऊ लागले. तोंडदेखला कळवळा बघून-बघून तिच्या गळ्याशी तिरस्काराच्या ओकाऱ्या येत राहिल्या. हनुवटीवर पिकल्या केसांचे ओंगळवाणे खुंट उगवलेल्या, लुटलुटत्या चेहऱ्याच्या म्हाताऱ्या बायका कुठलीकुठली नाती सांगत रातोरात आयमेनेमला धावत होत्या. अम्मूचा घटस्फोट झाला, म्हणून सगळ्यांना नुसते दयेचे पाझर फुटलेले. नको-नको म्हणताना विषय उकरून काढून बारीक-बारीक मुद्द्यांचा कीस पडला; तेव्हा कुठे त्यांचं समाधान झालं. या अगोचर थेरड्या बायकांच्या कानशिलात भडकावून देण्याची खुमखुमी अम्मूला मोठ्या वâष्टानं आवरावी लागली. तिला वाटे, 'मॉडर्न टाइम्स'मधल्या चार्ली चॅप्लिनसारखा हातात एक भलामोठा पाना घ्यावा आणि या बायकांच्या लोंबत्या छात्यांवरची बोंडं पिरगाळून टाकावीत.

स्वत:च्या लग्नातले फोटोही अम्मूला परके, अनोळखी दिसायला लागले होते. फोटोतून बघणारी बाई, कोण जाणे, कोण होती... कशी होती?... दागिन्यांच्या ओझ्यानं वाकलेली मूर्ख, बावळट नवरी! सोन्याची जर लावलेली सूर्यास्ताच्या रंगाची किरमिजी रेशमी साडी... प्रत्येक बोटात चमकणाऱ्या अंगठ्या... ताणलेली कमान असावी, तशा कोरलेल्या भुवयांच्या कडेनं लावलेले चंदनाचे पांढरे ठिपके... स्वत:चं हे रूप बघताना अम्मूच्या चेहऱ्यावरचे फिके रंग भराभर पालटत... किती सजवलं होतं आपण स्वत:ला? फाशीच्या

वधस्तंभाकडं जात असताना कशासाठी हा साजशृंगार?... किती हास्यास्पद सगळं. निरर्थक... निष्कळ!

चुलीत जाळायच्या सरपणाला तेल पाजून चमकवण्याची ही व्यर्थ उठाठेव कशासाठी? – तिच्या मनात प्रश्नांचं रान माजत होतं. त्यात अडकत चाललेला जीव घुसमटत, कळवळत होता.

त्याच तिरमिरीत गावातल्या सोनाराकडे जाऊन तिनं लग्नातली जाडजूड अंगठी वितळवून घेतली. तेवढ्या सोन्यामधून सर्पमुखाची एक नाजूक बांगडी घडवली आणि राहेलच्या नावाने बाजूला ठेवली.

काहीही झालं, तरी 'लग्न' अपरिहार्यच असणार, हे अम्मूला ठाऊक होतं. चालिरीती, व्यवहार पाळायचा, तर 'लग्न' कसं टाळता येणार? पण लग्न करायचंच झालं, तर फार मोठा बेंडबाजा न वाजवता साधेपणानं करावं, रोजचेच कपडे घालावेत, एरवी आपण जसे असतो, तसंच असावं. लग्नाच्या भरजरी ओंगळ समारंभातला भेसुरपणा त्यामुळं निदान कमी तरी होईल, असं अम्मूला फार वाटे.

कधीकधी एक वेगळीच लहर अम्मूच्या तनमनावरून भरकटत जाई. रेडिओवरून तिच्या आवडत्या गाण्याची सुरावट कानी पडली, की तिच्या आत... खोलवर कुठेतरी सुखाचा ज्वालामुखी फुटे... नसानसांमधून एका नव्याच ऊर्जेचे लोट उसळत आणि जादुटोणा व्हावा तशी तिच्यातली मोहक, रसरशीत स्त्री संयमाची, विरक्तीची परित्यक्त आवरणं झुगारून उमलून उठे. अशा वेळी अम्मूला कुठलीही बंधनं, कसल्याही जबाबदाऱ्या आवरू शकत नसत. स्वत:चं वैवाहिक अपशय बाजूला सारून, मातृत्वाचा आब दूर लोटून तिच्यामधली 'स्त्री' हुंकारू लागली, की अम्मू काही वेगळीच दिसे. एरवी विशिष्ट लयीत पडणारी पावलं घरंदाज मर्यादा ओलांडून मनमुक्त भरकटत. तारुण्याच्या नशेत चळलेली चाल... नजरेत तरळणारी जादूई स्वप्नं... मोकळ्या भरदार केसांमध्ये माळलेली उत्तेजक फुलं... अशी स्वत:च्याच तंद्रीत असली, की अम्मू एका अक्षरानं कुणाशी बोलत नसे. छोटासा प्लॅस्टिकचा ट्रान्झिस्टर कानाला लावून तासन्तास वाहत्या नदीत पाय सोडून बसून राही. ओठांत शिलगावलेली सिगारेट. आणि तरंगत-तरंगत जाणाऱ्या मऊ धुराच्या वेटोळ्यांनी भुरभुरलेली नजर! अशा दिवसांत अम्मू स्वत:ला झोकूनच देई वाहत्या धारेत. मध्यरात्री तटतटून उठलेलं तिचं शरीर पात्रात तरंगत राही.

अम्मूचं सगळं अस्तित्वच उधळून टाकणारं हे भलतं गारुड आलं कुठून तिच्यामध्ये? ही मुक्तीची ओढ? हे धांदरलेपण? खरं म्हणजे, तिच्या 'आत'च चालला होता एक जबरदस्त झगडा. युद्धच!... खोल जखमांचं... भळभळत्या रक्ताचं! प्रसन्न, हळुवार, प्रेमळ मातृत्व आणि पोटाशी स्फोटकं बांधून जगाची राख करायला निघालेल्या धगधगत्या विखाराचा संतप्त लाव्हा – या दोन्ही गोष्टी एकाच वेळी नांदत होत्या अम्मूच्या मनात.

त्यांच्यामधल्या जबरदस्त टकरांनी रक्ताळून टाकलं होतं तिचं व्यक्तित्व! अम्मू इतरांसाठी असे कुणी वेगळीच... आणि प्रत्यक्षात कुणी तिसरीच! दिवसाउजेडी तिच्या मुलांसाठी जीव पाखडणारे पुरुष रात्रीच्या एकाकी अंधारात तिला हवेसे वाटत. नदीत नांगरलेली इस्था आणि राहेलची होडी मध्यरात्रीच्या सन्नाट्यात तिला हाका घाली.

...अशा धांदरल्या दिवसांत सगळे जण अम्मूला थोडे वचकूनच असत. एकमेकांमध्ये कसलीही नाळ नसलेल्या दोन स्वतंत्र जगांच्या परिघावरून अम्मू चालतेय ... घनगर्द सावली आणि तेजस्वी प्रकाश यांना विभागणाऱ्या अंधूक, धुसर गारुडाचा तिच्यावर अंमल चढतोय, हे न सांगता प्रत्येकालाच जाणवत असे. सगळ्यांनी नाकारलेल्या, धिक्कारलेल्या अम्मूजवळ नव्याने गमावण्यासारखं काही उरलंच नव्हतं शिल्लक. उलट, इतरांच्याच मनात एक विचित्र धास्ती रुजत चालली होती. स्वत:ला असं सांडत-लवंडत कोण जाणे, कुठं जाईल ही बाई! अम्मूचं भान हरपून टाकणारी 'ती गाणी' रेडिओवर वाजायला लागली, की शहाणेसुरते लोक त्या सुरांच्या आसपासदेखील फिरकेनासे झाले. अम्मूच्या भोवती विणलेला तीक्ष्ण नजरांचा भोचक गोफ मोकळा करून 'अशा दिवसांत' तिला तिच्याजवळ, तिच्यापुरतं मोकळं सोडलेलं बरं, हे एव्हाना लक्षात आलं होतं सगळ्यांच्या. इतर दिवशी अम्मू तशी प्रसन्न असे हसली की, गालांवर खोल खळ्या पडत.

अम्मूच्या चेहऱ्याच्या वाटा आणि वळणं पटाशीनं तासल्यासारखी रेखीव... उंच आभाळात झेपावणाऱ्या समुद्रपक्ष्याचे धारदार ताणलेले पंख असावेत, तशा कमानदार आणि काळ्याभोर भुवया... चाफ्याच्या कळीसारखं नाजूक, तरतरीत नाक आणि तेजस्वी, गव्हाळ कांती!

...डिसेंबरातल्या त्या निळसर, कोमल उन्हात प्लायमाऊथमध्ये विसावलेल्या अम्मूचे भुरकट कुरळे केस वाऱ्यावर उधळले होते. उघड्या बाह्यांच्या तंग ब्लाऊजमधून डोकावणारे तिचे पुष्ट, मांसल दंड पॉलिश केल्यासारखे चमकत होते. तिच्या उजळ चेहऱ्यावर खरंच नजर ठरत नव्हती.

कधीकधी इस्था आणि राहेलला वाटे, हीच आपण पाहिलेली सर्वांत सुंदर स्त्री! पण कधीकधी नसे तसं वाटत...

प्लायमाऊथच्या मागच्या सीटवर इस्था आणि राहेल यांच्या मध्ये बेबी कोचम्मा बसली होती. स्वत:च्या खिन्न दुर्भाग्याची ओझी वाहणाऱ्यांना कधीकधी आपल्याच वाटेवरून चालणाऱ्या अन्य सहप्रवाशांचा त्रास होतो... वीट येतो... पृथ्वीतलावरच्या सगळ्या दुर्भाग्याचाच राग येतो. तसंच बेबी कोचम्माचं झालं होतं. स्वत:च्या वडलांपासून तुटलेली ती अनाथ, निराधार जुळी मुलं तिला सहन होत नसत. त्यांच्या दुर्दैवी आयुष्याचे धिंडवडे आपल्या नजरेसमोर नको, असं तिला वाटे. त्यातून या मुलांचा

धर्मही धड नव्हता. अर्धवट हिंदू, अर्धवट ख्रिश्चन असा 'हायब्रीड' जन्म. स्वाभिमान असलेला कोण सीरियन ख्रिश्चन या पोरांशी पुढं लग्न करणार, म्हणून बेबी कोचम्माचं डोकं उठे, ते वेगळंच. आपण 'आयमेनेम हाऊस'मध्ये आपल्या आईच्या माहेरी राहतोय, परक्यांच्या तुकड्यांवर जगतोय याची ठुसठुस त्या जुळ्या पोरांच्याही मनात ठणकत राहावी, म्हणून बेबी कोचम्मा सारखी धडपडत असे. तसं म्हटलं, तर 'आयमेनेम हाऊस'मध्ये राहण्याचा हक्क जुळ्यांना नव्हता, तसा तिला स्वत:लाही नव्हताच. आपण आपल्या नशिबाचे भोग धीरानं सोसले, आनंदाने स्वीकारले, अशा समजुतीचा ताठा बेबी कोचम्माच्या मनात शिगोशीग भरलेला! तसल्याच भोगांशी झगडणारी, झुंजणारी अम्मू मात्र तिला भलतीच दुबळी वाटे... म्हणून मग अम्मूचाही राग, द्वेष! पुरुषाने टाकून दिलेल्या, नाकारलेल्या, त्याच्याविना एकटीनेच जगणाऱ्या बाईचे भोग! फादर मुलीगनपासून विलग झालेल्या बेबी कोचम्माचे भोग.

या भोगांचा ठणका तिला कधी विसरताच येत नसे. 'फादर मुलीगनवर आपण केलेलं प्रेम सफल झालं नसलं; तरी आपली भावना प्रामाणिक होती. योग्य वेळी योग्य तेच करण्याच्या निश्चयातूनच त्या अधुऱ्या प्रीतीचे अंकुर फुटले होते,' असं बेबी कोचम्मा स्वत:लाच सतत बजावत राही. वर्षानुवर्षं स्वत:ची समजूत घालून-घालून तिचा त्यावर पक्का विश्वासही बसला होता.

एकदा लग्न करून सासरी गेलेल्या मुलीचा तिच्या आईवडिलांच्या घरावर मुळीसुद्धा हक्क उरत नाही, हे बेबी कोचम्माला अगदी मनापासून मान्य होतं. नवऱ्यापासून घटस्फोट घेऊन एखादी स्त्री परतली, तर तिला माहेरच्या घरात अजिबातच स्थान असू नये, असंही बेबी कोचम्माला वाटे. त्यातून त्या घटस्फोटित स्त्रीनं प्रेमविवाह केलेला असेल; तर मग बेबी कोचम्माच्या वैतागाला शब्दच नसत. आणि त्याहीपुढं जाऊन आंतरजातीय प्रेमविवाहानंतरचा घटस्फोट असेल, तर तीव्र संतापानं धुमसणारी बेबी कोचम्मा काही न बोलता ताणल्या नजरेनं गप्पच बसून राही.

हे सगळं प्रकरण राहेल आणि इस्थाच्या समजुतीपलीकडचं होतं. म्हणून मग त्यांच्या छोट्या-छोट्या आनंदात विरजण घालत राहाणं, हा बेबी कोचम्माचा एक उद्योगच होऊन बसला होता. त्या दोघांनी पकडलेला एखादा भिरभिरत्या पंखांचा पतंग त्यांच्या तळहातावरचा छोटा खडा पायांमध्ये उचलून उडाला, किंवा रस्त्याकडेनं धावणाऱ्या डुकरांच्या पिलावळीला आंघोळ घालण्याची धम्माल मौज वाट्याला आली... किंवा उबवणीला बसलेल्या गुबगुबीत कोंबडीच्या पोटाखालून एखादं गरमगरम अंडं मिळालं, की इस्था-राहेल जल्लोश करीत. नेमका तो क्षण नासवून टाकण्यासाठी बेबी कोचम्मा सदैव सज्ज असे. जुळी मुलं एकमेकांबरोबर मजेत वाढताना दिसली, की असूयेने ग्रासलेल्या बेबी कोचम्माचा जळफळाट होई. त्या दोघांच्या प्रफुल्ल चेहऱ्यांवर काळसर

दु:खाचा एखादा ढग दिसावा, निदान एखादी सरकती सावली... म्हणून मग ती धडपडत राही.

विमानतळावरून परत येताना एके काळच्या पत्नीपदाचा हक्क सांगत मार्गरिट कोचम्मा गाडीच्या पुढच्या सीटवर चाकोशेजारी बसणार. सोफी मॉल दोघांच्या मध्ये असणार. म्हणजे मग अम्मूला मागच्या सीटवर यावं लागणार...

प्यायचं पाणीसुद्धा दोन वेगवेगळ्या थर्मासमध्ये असणार. मार्गरिट कोचम्मा आणि सोफी मॉलसाठी उकळून शुद्ध केलेलं... आणि बाकी सगळ्यांसाठी नळाचं साधं पाणी.

सगळं सामान गाडीच्या डिक्कीमध्ये!

प्लायमाऊथ गाडीच्या टपावर चारही बाजूंनी पत्रे लावलेला एक चौकोनी बोर्ड पक्का बसवला होता. त्यावर सगळीकडं मोठ्या-मोठ्या रंगीत अक्षरांत लिहिलं होतं – पॅराडाईज् पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्. त्या अक्षरांच्या खाली मिक्स्ड फ्रूट जॅम आणि खाद्यतेलात बनवलेल्या मसालेदार चविष्ट लिंबाच्या लोणच्याच्या बाटल्यांची चित्रं, त्या बाटल्यांवर पुन्हा रंगीबेरंगी लेबलं आणि त्या लेबलांवर पुन्हा तेच. पॅराडाईज् पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्. बाटल्यांच्या चित्रांना लागूनच झाडून सगळ्या पॅराडाईज उत्पादनांची यादी रंगवलेली आणि त्या यादीशेजारी घोळदार, फुगीर झगा घातलेल्या, चेहऱ्यावर भडक हिरव्या रंगाचं रोगण थापलेल्या एका कथकली नर्तकाचं चित्र. कथकली झग्याच्या वळणदार फुगीर चुण्यांच्या खाली तशाच वळणात झोकदार अक्षरं लिहिली होती –

एम्परर्स ऑफ द रेल्म ऑफ टेस्ट!...

स्वाद आणि चव यांच्या साम्राज्याचे सार्वभौम सम्राट!...

ही दिमाखदार ओळ कॉम्रेड के.एन.एम. पिल्लईंनी स्वत:हूनच सुचवली होती. 'रुची लोकॅथिन्दे राजावू' या वाक्याचं ते शब्दश: आणि बऱ्यापैकी हास्यास्पद भाषांतर! पण खुद्द कॉम्रेड पिल्लईंनीच केलेलं असल्यामुळं छापलं गेलं आणि ते बदलावं, असं कॉम्रेड पिल्लईंना साधं सुचवण्याचीही कुणाची हिंमत नव्हती. म्हणून मग काहीशा नाराजीनंच का असेना, पण 'एम्परर्स ऑफ द रेल्म ऑफ टेस्ट'हे सार्वभौम सम्राटपदाचं शेपूट पॅराडाईज् पिकल्सच्या लेबलांवर चिकटलं, ते कायमचंच!

जॅम, जेली आणि लोणची यांच्याशी त्या भडक रंगरूपाच्या कथकली नर्तकाचा संबंध काय, म्हणून अम्मूनं अनेक वेळा आपली तीव्र नापसंती नोंदवून पाहिली; पण चाको म्हणाला,

"त्यामुळं आपल्या जॅम, जेली आणि लोणच्याला अस्सल देशीपणाची झिलई चढेल, शिवाय पॅराडाईज् पिकल्स जागतिक बाजारपेठेत उतरेल, तेव्हा तर फायदाच फायदा!"

– तरी अम्मूची समजूत म्हणून पटत नसे. ती म्हणे,

“गाडीच्या टपावर टांगलेला हा भलामोठा बोर्ड विचित्रच दिसतो तरीपण. वाघसिंहाची चित्रं मिरवत आणि भसाडे कर्णे लावून सर्कस फिरते ना गावागावांत, तसा!”

पाप्पाची सरकारी नोकरीतून रिटायर झाले. दिल्ली सोडून आयमेनेममध्ये परतले. त्यानंतर माम्माचीने घरगुती लोणची विकायला सुरुवात केली. कोट्टायम बायबल सोसायटीने एक विक्रीवजा प्रदर्शन भरवलं होतं. त्यातल्या छोट्या स्टॉलवर माम्माचीनं बनवलेला केळयांचा जॅम आणि कैरीचं लोणचं धडाक्यात खपलं. आपल्या हाताला इतकी चव आहे, आपली लोणची आणि जॅम विकत घेण्यासाठी लोकं रांगा लावतात, याचा साक्षात्कार माम्माचीला पहिल्यांदाच होत होता. स्टॉलवरचा सगळा माल तर संपलाच; पण नव्या ऑर्डर्सचा एक भलामोठा डोंगर माम्माचीपुढं उभा राहिला. या अनपेक्षित यशानं हरखून गेलेली माम्माची दुप्पट उत्साहानं कामाला भिडली आणि वर्षाचे तीनशे-पासष्ट दिवस चालणारा ‘जॅम-जेली-लोणच्या’चा सिलसिला सुरू झाला. निवृत्तीनंतर करायचं काय, या प्रश्नचिन्हानं वैतागलेले पाप्पाची घरात रिकामटेकडे बसून-बसून उबून गेले होते. निरुपयोगीपणाची नामुश्की शेवटी त्यांना सहन होईनाशी झाली. आधीच ते माम्माचीपेक्षा वयानं मोठे. दोघांमध्ये तब्बल सतरा वर्षांचा फरक. त्यामुळे स्वत:चं आयुष्य संपता-संपता बायकोच्या कर्तृत्वाला आलेला बहर त्यांना त्रास द्यायला लागला. आपली बायको तरण्या बाईच्या आवेशात कामाला भिडलीय आणि आपण मात्र तारुण्य आटलेल्या थेरड्या म्हातार्‍यासारखे अडगळीत पडलो आहोत, या जाणिवेची तिडीक मस्तकात जायला लागली, तसा पाप्पाचींचा भडका उडाला. ते धुमसू लागले... आतल्याआत.

माम्माचीच्या डोळयांत मोतीबिंदू साकळलेले. ती जवळपास आंधळीच होत चालली होती, तरी तिच्या उद्योगात पाप्पाची काडीची मदत करत नसत. एकतर निवृत्त (का असेना) सरकारी अधिकार्‍याच्या बायकोनं लोणचीबिणची घालण्याचे फुटकळ उद्योग करावेत, हेच मुळी त्यांना मान्य नव्हतं. असली खालच्या दर्जाची कामं त्यांना अपमानास्पद वाटत. त्यातून त्यांच्या आत मत्सराची काडी ओढली गेली होती. आपल्याला अडगळीत फेकून गावभरची माणसं आपल्या बायकोलाच भाव देतात, याची खुन्नस त्यांच्या डोक्यात उतरत चालली होती. ऐन अधिकाराच्या काळात शिवलेले रुबाबदार सूट त्याच ताठ्यासह अंगावर चढवून पाप्पाची खालमानेनं इकडून-तिकडं नुसते फिरत राहत. भोवती ही कामाची धावपळ. उन्हात वाळवत घातलेल्या लाल मिरच्यांचे डोंगर, हळकुंडं दळून नुकते उभे केलेले ताज्या हळदीचे घमघमते ढीग... आणि सतत कामात गढलेल्या माम्माचीची तृप्त लगबग. कधी व्यापार्‍यांकडून कच्च्या मालाची खरेदी, कधी लिंबाच्या फोडींवर, फोडलेल्या कैर्‍यांवर मिठाचे थर चढवून उन्हात वाळवणं, कधी

खारवलेला माल लोणच्यासाठी साठवणं, तर कधी वजनमापांची धावपळ... दिवसभर या गराड्यात असून नसल्यासारखे दबकत-दबकत फिरणारे पाप्पाची रात्र झाली, की पितळी फुलदाणी हातात घेऊन माम्माचीला चांगले सडकून काढत. ही मारहाण काही नवी नव्हती; पण फॅक्टरीतल्या ताज्या लोणच्याच्या वासानं फिस्कारलेले पाप्पाची आजकाल ऊठसूठ हात उचलू लागले होते. एका रात्री तर त्यांनी माम्माचीच्या व्हायोलिनचा 'बो'च काडकन मोडला आणि नदीत भिरकावून दिला.

ऑक्सफर्डला शिकणारा चाको उन्हाळयाच्या सुटीसाठी आयमेनेममध्ये आला, तेव्हा हा धिंगाणा ऐन भरात होता. वाढतं वय... नुकत्याच फुटलेल्या मिसरुडांच्या जोशानं ओसंडणारं भारीभक्कम शरीर आणि रोमारोमांतून वाहणारा उग्र उतावीळपणा. चाको बदलला होता... पुष्कळच... आणि वाढलाही होता चांगला ताडमाड! आयमेनेममध्ये आल्यानंतर जेमतेम आठवडाभरात त्याच्या सगळं लक्षात आलं. एकदा भर दुपारी स्टडीमध्ये चाललेला तमाशा नजरेला पडताच चाकोचं डोकं सणकलं. माम्माचीच्या अंगावर पडणारा पाप्पाचींचा हिंस्र हात त्यानं मागच्या मागं पकडून जोरानं खेचला आणि दातओठ खाऊन तिरीमिरीनं मुरगळला. वडलांच्या नजरेत नजर रोखून म्हणाला,

'खबरदार. पुन्हा असा तमाशा कराल, तर याद राखा!'

... पुढचा अख्खा दिवस बाहेरच्या व्हारांड्यात बसलेले पाप्पाची शून्य नजरेनं समोरच्या बागेकडं एकटक पाहत राहिले. नजरेसमोर बाग, पण नजरेत क्षणभरसुद्धा कसलं पान म्हणून हललं नाही. कोचु मारियानं ताटलीत वाढून आणलेल्या अन्नाला त्यांनी हात लावला नाही. रात्री उशिरा एकाएकी तिरीमिरीनं उठून पाप्पाची स्टडीमध्ये गेले, तेल पिऊन तुकतुकलेल्या कातीव लाकडाची झुलती आरामखुर्ची त्यांनी ओढत-ओढत बाहेर आणली, मधल्या ओसरीत ठेवली आणि प्लंबरचा मोठ्ठा पाना हातात घेऊन सगळे स्क्रू त्वेषानं पिरग्ाळले. भाग न् भाग सुटा होऊन खुर्चीचं कलेवर तुकड्यातुकड्यांनी विखरून पडलं. उत्तम लाकडाच्या फळकुटांचा तो ढीग चंद्राच्या अशक्त प्रकाशात तसाच ठेवून पाप्पाची तरातरा घरात निघून गेले. त्यानंतर कधीही त्यांनी आपल्या बायकोच्या अंगाला बोट लावलं नाही. मारहाण नाही, स्पर्श नाही आणि बोलणंसुद्धा! त्यांनी माम्माचीशी बोलणं टाकलं, ते अगदी अखेरचा श्वास जिवंत असेपर्यंत! काही हवं असलं, तर ते कोचु मारियाला हाक मारीत किंवा मग बेबी कोचम्माला मध्ये घालून आपलं काम करून घेत.

संध्याकाळ झाली की आपल्या बायकोला भेटायला, तिच्याशी खरेदीविक्रीचे व्यवहार करायला गावातले लोक येतात, हे पाप्पाचींना ठाऊक होतं. नेमक्या त्याच वेळेस ते सुया आणि दोऱ्याचं रीळ घेऊन बाहेरच्या व्हारांड्यात बसत. हातात एक जुनापाना शर्ट घ्यायचा आणि त्याची न निघालेली बटणं उगीचच पुन्हा शिवत बसायचं. त्यासाठी डोळे

बारीक करून-करून सुया ओवायच्या. आपल्याकडे मुळीसुद्धा लक्ष न देता, आपली बायको नुसती पैसा कमावण्याच्या मागं लागलीय, हे इतर लोकांना कसंही करून कळावं, म्हणून पाप्पाचींची धडपड चाले. त्यातून फार काही साधलं असं नव्हे; पण पैसे कमावणार्‍या, उद्योगात पडलेल्या संसारी बायकांबद्दलचा आयमेनेम गावाचा आधीच गंजलेला दृष्टिकोन थोडा अधिक तांबारला, एवढं मात्र खरं.

त्याच दरम्यान मुन्नर गावातल्या एका इंग्लिश साहेबाकडे जाऊन पाप्पाचींनी फिक्या निळ्या रंगाची प्लायमाऊथ गाडी खरीदली. आयमेनेममधल्या खडकाळ अरुंद रस्त्यावरून आपली लांबरुंद गाडी मोठ्या कसरतीनं चालवणारे पाप्पाची हळूहळू गावकर्‍यांना सवयीचे झाले. सुटाबुटाच्या सरंजामामुळं वरून दिसत मोठे रुबाबदार; पण वूलनच्या सुटामध्ये उबलेलं त्यांचं शरीर आतून नुसतं घामानं पाझरत असे; पण 'आत काय' याची पर्वा नव्हतीच त्यांना कधी. पुढेपुढे तर प्लायमाऊथ आणि तिचा रुबाब याची जबरदस्त झिंगच चढली. त्या गाडीत त्यांनी माम्माचीला पाऊल ठेवू दिलं नाही. कुटुंबातल्या इतरांनाही पक्का मज्जाव होता. त्यांच्यापैकी कुणी गाडीजवळ नुसतं फिरकलेलंसुद्धा पाप्पाचींना चालत नसे. ती गाडी पाप्पाचींची एकट्याची होती... फक्त त्यांची त्यांच्यापुरतीच! माम्माचीसह अख्ख्या कुटुंबावर उगवलेला सूड असावा, तशी.

इंग्रजांच्या साम्राज्यातल्या 'पुसा' या साहेबी इन्स्टिट्यूटमध्ये बडे कीटकशास्त्रज्ञ म्हणून पाप्पाची काम करीत. स्वातंत्र्यानंतर 'साहेब' परतले आणि भारत सरकारच्या खात्यात कीटकशास्त्र विभागाचे संयुक्त संचालक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. रिटायरमेंट येईपर्यंत पाप्पाचींना संचालक-पदाला समांतर अशी बढतीही मिळाली.

– तरीही त्यांच्या मनाला कसलं म्हणून समाधान नव्हतं. कीटकांची एखादी तरी नवीन जात आपण शोधून काढावी आणि ते कीटक पुढं आपल्या नावानं ओळखले जावेत, अशी त्यांची आयुष्यभराची इच्छा होती. तसा एक कीटक त्यांनी शोधलासुद्धा! पण त्याचं श्रेय कुणा तिसर्‍यानेच लाटलं आणि 'नाव देण्याची' पाप्पाचींची इच्छा अखेर अपुरीच राहिली.

...एकदा अचानक भलतंच घडलं होतं. दिवसभर भटकून आल्यानंतर उतरत्या संध्याकाळी बाहेरच्या व्हारांड्यात बसून ड्रिंक्स घेत असताना एकदम कुणीतरी पाप्पाचींच्या ग्लासातच पडलं. त्यांनी चिमटीत धरून उचलून पाहिलं. तो पतंग होता; पण नेहमीसारखा नाही. वेगळाच. पाठीच्या कण्याशी थोडा फुगलेला. झुबकेदार मिशांचा कुणी वेगळाच कीटक. पाप्पाचींनी अगदी बारकाईनं पाहिलं, तसे त्यांचे डोळे चमकले. उत्साहाच्या भरात त्यांनी तो पतंग एका कागदावर टाचला. मोजमापं घेतली आणि त्याच्या अंगाला चिकटलेला दारूमधला अल्कोहोल उडून जावा, म्हणून काही काळ त्याला चक्क उन्हात ठेवला. नंतर ताबडतोब आपलं चंबुगबाळं आवरलं आणि दिल्लीच्या

दिशेनं जाणारी पहिली ट्रेन पकडली. ते भरधाव निघाले. दिल्लीकडे... प्रसिद्धी आणि त्यातून जमलंच तर वैभवाकडे! तब्बल सहा महिन्यांच्या वैतागवाण्या असह्य प्रतीक्षेनंतर कीटकांच्या वर्गीकरणाचं काम करणाऱ्या दिल्लीमधल्या एका इन्स्टिट्यूटनं त्यांना कळवलं, की तुमचा पतंग थोडा वेगळा खरा; पण फार ग्रेट वगैरे काही नाही. 'लिमॅनट्राईड' या नावानं ओळखल्या जाणाऱ्या जातीमधली ही एक थोडी 'वेगळी' व्हरायटी आहे, एवढंच! – त्या निरोपाने पाप्पाचींचा सगळा फेसाळता उत्साह एकदम मावळला.

अपेक्षाभंगाचा खरा बॉम्ब पडला, तो या घटनेनंतर तब्बल बारा वर्षांनी! त्या दरम्यान कीटकशास्त्राच्या वर्गीकरण शाखेत काहीतरी भलभलत्याच उलथापालथी झाल्या आणि असं लक्षात आलं, की पाप्पाचींनी शोधून काढलेला पतंग खरोखरच कुणी वेगळा होता. त्याच्या अस्तित्वाची ओळख तोवर कीटकशास्त्राला झालेलीच नव्हती; पण तोवर पाप्पाची निवृत्त होऊन आयमेनेममध्ये परतलेले. आपल्या 'संशोधना'वर हक्क सांगण्याची, त्यासाठी झगडण्याची संधी हातातून कधीच निसटली होती. शेवटी पाप्पाचींनी शोधलेल्या त्या पतंगाला कीटकशास्त्र विभागाच्या नव्या प्रभारी संचालकांचं नाव देण्यात आलं. पाप्पाचींच्या दृष्टीने तो माणूस एकतर फार ज्युनिअर. शिवाय त्याला कीटकशास्त्रातलं ओ की ठो कळत नाही, असंही पाप्पाचींचं म्हणणं होतं.

– पण झालं, ते झालं.

खरं म्हणजे, तो पतंग सापडण्याच्या कितीतरी आधीपासून पाप्पाची भलते लहरी होते. विक्षिप्त पण होते. तरीही पुढे त्यांच्या हर-एक विक्षिप्तपणामागे, विनाकारण उसळणाऱ्या संताप्ामागे त्या पतंगाचीच भानगड असणार, असं सरसकट गृहीतच धरलं जायला लागलं. त्या पतंगाचं अकराळविकराळ, झुबकेदार मिशावालं गलेगठ्ठ भूत पाप्पाचींच्या मानगुटीवर आयुष्यभर बसलं, ते बसलंच. पुढं ते जिथं जिथं राहिले, त्या प्रत्येक घरात त्या भुताचा वावर होता. या भुताने पाप्पाचींचा तर छळ मांडलाच; पण त्यांच्या मुलांचा आणि मुलांच्या मुलांचाही पुरेपूर पिच्छा पुरवला.

...अगदी अखेरच्या दिवसापर्यंत, आयमेनेममधल्या भयंकर उकाड्यातसुद्धा पाप्पाची गळयापासून पायापर्यंत इंच न् इंच बंदिस्त करणारा कडक इस्त्रीचा थ्रीपीस सूट हट्टानं घालत राहिले. ड्रेसिंग टेबलावर महागड्या कलोनच्या बाटलीशेजारी त्यांचा ऐन तारुण्यातला रुबाबदार फोटो फ्रेम करून ठेवला होता. कीटकशास्त्रातला सहा महिन्यांचा डिप्लोमा करण्यासाठी व्हिएन्नाला गेलेले असताना एका प्रख्यात फोटोग्राफरकडून काढून घेतलेला तो फोटो भलताच चिकणा होता. व्हिएन्नामध्ये, खरंतर काही महिन्यांचंच वास्तव्य, पण तेवढ्या काळात माम्माचीने व्हायोलिनचे प्राथमिक धडे गिरवले. त्या नाजूक वाद्यावर तिचा थोडा हात बसतोय, गोडी लागतेय; तोवर एक भलताच घोळ

झाला. माम्माचीला शिकवायला येणाऱ्या लाऊन्स्की टीपन्थॉल या शिक्षकांनी पाप्पाचींजवळ आपल्या विद्यार्थिनीचं भरभरून कौतुक केलं, आणि 'मनात आणलं, तर माम्माची व्हायोलिनवादनाच्या व्यावसायिक मैफली सहज करू शकेल,' अशी दादही अगदी मनापासून दिली... तेवढं पुरेसं होतं. त्या क्षणापासून माम्माचीचं शिक्षण थांबलं, ते थांबलंच.

पाप्पाचींच्या निधनाची बातमी चक्क इंडियन एक्सप्रेसमध्ये छापून आली होती. त्या बातमीचं कात्रण काढून माम्माचीनं फॅमिली फोटोग्राफ्सच्या अल्बममध्ये ताबडतोब चिकटवून टाकलं.

आयमेनेम येथील रेव्हरंड इ जॉन आयपे यांचे सुपुत्र आणि ख्यातनाम कीटकशास्त्रज्ञ बेनन जॉन आयपे यांचे कोट्टायमच्या इस्पितळात हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. ते 'पुन्नयन कुंजू' म्हणून प्रसिद्ध होते. पहाटे एकच्या सुमारास छातीमध्ये असह्य कळा येऊ लागल्याने त्यांना त्वरित इस्पितळात दाखल करण्यात आले. पहाटे पावणेतीनच्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला. श्रीयुत आयपे यांची प्रकृती गेल्या सहा महिन्यांपासून अस्थिरच होती. त्यांच्यामागे पत्नी सोशम्मा आणि दोन मुले आहेत.

पाप्पाचींच्या अंत्यसंस्काराच्या वेळी रडून-रडून हैराण झालेल्या माम्माचीच्या कॉन्टॅक्ट लेन्सेस अखेर डोळ्यांतून गळून पडल्या. इस्था आणि राहेलला या अश्रुपाताचं आश्चर्यच वाटत होतं. अम्मू म्हणाली, 'माम्माचीचं आपल्या नवऱ्यावर मुळीच प्रेम नव्हतं; पण शेवटी सवय होते ना माणसाची, तसं झालं. म्हणून हा एवढा धिंगाणा. लोणच्याच्या फॅक्टरीभोवती पाप्पाचींचं फेऱ्या घालणं, पितळेच्या फुलदाणीनं मारहाण करणं हे इतकं सवयीचं झालेलं, ते नसणार ना आता!

"माणूस सवयीचा गुलाम असतो. त्याला कसली वाट्टेल ती – अगदी मरेस्तोवर मार खाण्याचीसुद्धा – सवय लागू शकते, आपल्याला फक्त डोळे उघडे ठेवून ती सवय शोधता यायला हवी," असंही अम्मू म्हणाली.

अंत्यसंस्कार पार पडल्यावर माम्माचीनं राहेलला हाक मारली. डोळ्यांतून घसरलेल्या कॉन्टॅक्ट लेन्सेस् शोधण्यासाठी तिला राहेलची मदत हवी होती. कॉन्टॅक्स लेन्सेस् ठेवायच्या छोट्या डबीतलं नारिंगी रंगाचं द्रव्य बघून राहेलचे डोळे लकाकले. तिनं मोठ्या औत्सुक्यानं ती डबी हातात घेतली. माम्माचीला विचारलं,

'तू मेल्यानंतर ही डबी मला देशील का?'

– अम्मू ऐकतच होती. तिनं ताबडतोब राहेलला आतल्या खोलीत बोलावलं. आपल्या आगाऊ लेकीच्या पाठीत एक धपाटा घालून ती करवादली,

'तुला कितीदा सांगितलंय माणसांच्या मरणाबद्दल त्यांच्याशी असं बोलू नये म्हणून?

पुन्हा तुझी जीभ चुरूचुरू चालली, तर बघच मग!'

– राहेलला मार मिळाल्यामुळे इस्था खूश झाला. इतक्या निष्ठुर मुलीला शिक्षा मिळालीच पाहिजे, असं त्याला वाटत होतंच नाहीतरी.

व्हिएन्नामध्ये काढलेला पाप्पाचींचा तो रुबाबदार फोटो ड्रेसिंग टेबलावरून उठून एका नव्या, अधिक मोठ्या फ्रेममध्ये जाऊन बसला आणि 'आयमेनेम हाऊस'च्या दिवाणखान्यातल्या भिंतीवर नव्या रुबाबानं विराजमान झाला.

पाप्पाची तसे रुबाबदारच. त्यातून नीटनेटके. स्वत:च्या रंगरूपाचं नेमकं भान असलेले. त्यांच्या हनुवटीखाली मात्र सैलसर मांसाचे गोळे दिसत. त्यामुळे त्यांनी चेहरा तिरकस वळवलाय का, ते खाली बघताहेत का, की वर बघताहेत... काही म्हणता काही कळत नसे; पण त्या फोटोत मात्र पाप्पाचींनी आपली मान जरा जास्तच उंचावली होती. हनुवटीखाली मांस लोंबू नये आणि आपल्या मनातली गर्विष्ठ घमेंड चेहऱ्यावर झळकू नये, इतपत कसरत साधायचा त्यांचा प्रयत्न असावा. भुरकट घारे डोळे वरवर तसे निष्पाप, निरागस; पण त्यात खोल कुठेतरी थोडी तिरकस चमक होती. काळ्याकभिन्न मनाच्या तळघरात बायकोच्या खुनाचे कट शिजत असताना; कॅमेऱ्यापुढं सुसंस्कृत दिसणं ही काही एवढी सोपी गोष्ट नव्हतीच नाहीतरी; पण त्या फोटोनं साधलं होतं पुष्कळच. लहानपणी अंगठा चोखण्याची सवय असणाऱ्या मुलांचा वरचा ओठ मध्ये काहीसा फुगवट होतो, तसं झालेलं पाप्पाचींचं. त्यांच्या वरच्या ओठाच्या मध्यभागी असणारा मांसाचा गोळा खालच्या ओठावर झेपावताना फोटोत स्पष्ट दिसत होता. त्यामुळं कुणालातरी वेडावून दाखवणाऱ्या बावळट मुलाची काहीशी झाकही आलेली. दुर्मुखलेली, वेडसर. शिवाय पाप्पाचींच्या हनुवटीवर एक लांबलचक खळीही पडलेली दिसे. त्यांच्या मनातली सुप्त हिंसा त्या खळग्यात नुसती ठासून भरलेली. गोठून राहिलेलं क्रौर्य असावं, तशी. पाप्पाची आयुष्यात कधी घोड्यावर बसले नाहीत; पण फोटोत मात्र खानदानी घोडेस्वार घालतात, तसला 'खाकी जोधपुरी' अंगावर. पायांतल्या चमकदार बुटांवर पडलेला फोटोग्राफरच्या स्टुडिओतला लाईट इतक्या वर्षांनीही तसाच चमकत होता. चमकत्या हस्तिदंताची मूठ असलेला खानदानी चाबूकसुद्धा होता कमरेभोवती बांधलेला.

पाप्पाचींच्या फोटोतली एक विचित्र तटस्थता अख्ख्या खोलीत पाझरत राहिली. उन्हानं धगधगणाऱ्या त्या खोलीवर थंडगार तवंग पसरला.

पाप्पाचींनी आपल्यामागे ट्रंका भरून महागडे कपडे ठेवले होते आणि चॉकलेटच्या रिकाम्या डब्यांत भरून ठेवलेली पुष्कळशी कफलिंक्स! या सगळ्या चीजवस्तू चाकोनं कोट्टायमच्या टॅक्सी ड्रायव्हरांमध्ये वाटून दिल्या. त्यांनी कफलिंक्स वेगवेगळी केली आणि त्यातलं सोनं वितळवून अंगठ्या घडवल्या. गळ्यातली पदकं केली. अविवाहित मुलींच्या

हुंड्यांची तेवढीच सोय झाली, म्हणून सगळे खुशीत होते.

ही कफलिंक्स असतात कशासाठी, असं जुळ्यांनी विचारलं, तेव्हा अम्मू म्हणाली,

'टु लिंक कफ्स टुगेदर' – शर्टाच्या बाहीला असणारी दोन टोकं जुळवण्यासाठी. जुळ्यांना या शब्दसमूहाची मोठी गंमत वाटली. आजवर निरर्थक वाटलेल्या इंग्रजी भाषेतली गंमत पहिल्यांदाच त्यांना कळत होती. कफ ± लिंक्स · ़कफ्लिंक्स!... या समीकरणातून थोडं गणितही उलगडत होतं पहिल्यांदाच. 'कफ्लिंक्स' या शब्दानं राहेल आणि इस्थाला खरोखरच बेसुमार आनंद दिला. त्या आनंदातूनच इंग्रजी भाषेबद्दल प्रेमही रुजलं नकळत.

अम्मू म्हणे, ब्रिटिश साहेबाच्या आकर्षणानं पछाडलेले पाप्पाची, खरंतर सी.सी.पी.च होते. 'सी.सी.पी'म्हणजे 'छी.छी.पोछ्' चा शॉर्टफॉर्म. अधिक स्वच्छ भाषेत सांगायचं, तर शीट वीपर!... म्हणजे लोकांचं हगलंमुतलं पुसत फिरणारा.

चाकोचं मत थोडं वेगळं होतं. तो म्हणे, पाप्पाचींचं वर्णन एका शब्दात करायचं, तर 'अँग्लोफाईल' एवढंच पुरेसं आहे फक्त. आता 'अँग्लोफाईल' म्हणजे काय? चाकोने जुळ्यांपुढे रीडर्स डायजेस्टची ग्रेट एनसायक्लोपेडिक डिक्शनरी ठेवली आणि म्हणाला, 'बघा... काढा शोधून तो शब्द.' त्यांनी शोधला. अर्थ होता, 'पर्सन, वेल डिस्पोज्ड् टू इंग्लिश.'

आता 'डिस्पोज्ड्'म्हणजे काय?

मग इस्था आणि राहेलने आणखी एक शब्द शोधला. डिस्पोज्ड्. त्या शब्दापुढे एकूण तीन पर्याय लिहिले होते.

१. प्लेस सूटेबल इन पर्टिक्युलर ऑर्डर.

– व्यवस्थित, उपयुक्त मांडणी केलेली एखादी जागा.

२. ब्रिंग माईंड इन्टु सर्टन स्टेट.

– मनावर योग्य प्रकारे ताबा मिळवणे. मनाचा कल वळवून एखाद्या विशिष्ट स्थितीमध्ये स्थिर करणे.

३. डू व्हॉट वन विल विथ, गेट ऑफ वन्स हॅन्डस् , स्टो अवे, डिमॉलिश. फिनिश, सेट्ल, कन्झ्यूम (फूड), किल, सेल

– मनाला येईल तसा विनियोग करणे. झटकून टाकणे. कृती थांबवणे. निकाल लावणे. विल्हेवाट लावणे. व्यवस्थित मांडणी करणे. वापरून संपवणे. उपभोगणे. मारून टाकणे. विकून मोकळे होणे.

चाकोला वाटे, पाप्पाचींच्या संदर्भात दुसरा पर्याय अधिक लागू पडणारा आहे. डिस्पोज्ड. म्हणजे मनावर योग्य प्रकारे ताबा मिळवणं. मनाचा कल वळवून एखाद्या विशिष्ट स्थितीमध्ये स्थिर करणं. पाप्पाचींचं मन इतकं वळवलं गेलं, इतकं वळवलं गेलं,

की शेवटी ते अंतर्बाह्य 'इंग्लिशसाहेब' बनले असावेत.

कबूल करताना स्वत:चाच तिरस्कार वाटत असला, तरी आपण 'अँग्लोफाईल'च आहोत, असं चाकोने जुळयांना सांगून टाकलं होतं. त्याच्यामते, त्यांचं अख्खं कुटुंबच तसं होतं – चुकीच्या दिशेनं भलतीकडेच भरकटलेलं, स्वत:च्या इतिहासाची नाळ तुटून कसल्यातरी विचित्र कोंडीत घुसमटून पडलेलं, स्वत:ची मुळं शोधण्यात अपयशी ठरलेलं, पूर्वजांच्या पाऊलखुणांपासून दुरावलेलं. हे दुरावलेपण आलं, कारण इतिहासाच्या पाऊलखुणाच पुसून गेल्या होत्या सगळया. 'रात्रीच्या अंधारात भुतासारख्या उभ्या असणाऱ्या एखाद्या जुनाट बंगलीसारखा इतिहास असतो. तिथे रात्रभर दिवे लावलेले असतात आणि झाडून सगळया पूर्वजांची आपसांत कुजबुज चाललेली असते.' असं चाकोने राहेल आणि इस्थाला सांगितलं होतं.

'सगळा इतिहास नीट समजून घ्यायचा असेल ना, तर धाडस करून त्या बंगलीत घुसावं लागतं. अखंड चाललेली कुजबुज नीट कान देऊन ऐकावी लागते. कोनाड्यातल्या पुस्तकांचे ढीग उपसावे लागतात. भिंतीवर लटकवलेली चित्रं समजून घ्यावी लागतात. एवढंच नव्हे, तर त्या बंगलीत कोंडून राहिलेला शेकडो वर्षांचा वासही हुंगावा लागतो' – चाको सांगत राहिला.

हे सगळं वर्णन नदीपलीकडच्या रबराच्या बागेत असलेल्या जुन्या घराचं आहे, एवढं राहेल आणि इस्थाला समजत होतं. ते दोघं कधीच नव्हते गेले त्या घरात, तरी करी सैपूबद्दल गूढ आकर्षण मात्र रुजलं होतं त्यांच्या मनात. करी सैपू हा काळा साहेब. आयमेनेमचा कूर्टझ! मूळचा इंग्लिश, पण पुढं नेटिवांमध्ये जमा झालेला. कमरेभोवती मुंडू नेसायचा. मल्याळमही उत्तम बोलायचा. एखादी काळीशार गहन गुहा असावी, तसं त्याच्या आयुष्यात आयमेनेमचं स्थान होतं. आयमेनेम म्हणजे त्याचं हार्ट ऑफ डार्कनेस! पक्कं, पण गहन.

त्याला एक मित्र होता. खास. शरीरानं आणि मनानंही गुंतलेला. दोघांची शरीरं एकमेकांत गुंतलेली आणि एकमेकांच्या भुका भागवण्यासाठी चटावलेली. करी सैपूच्या त्या मित्राच्या आईवडिलांनी अचानक त्याला आयमेनेममधून उचललं आणि दूर कुठल्याशा शाळेत अडकवून टाकलं. प्रियकराचा विरह सहन न होऊन करी सैपूनं अख्खं पिस्तूल स्वत:च्याच डोक्यात रिकामं केलं, त्यालाही आता दहा वर्षं होऊन गेली होती. करी सैपूच्या आत्महत्येनंतर त्याची अख्खी इस्टेट नोकरचाकरांच्या घशात गेली. स्वयंपाकी आणि सेक्रेटरी – दोघांना सुटलेली हाव एवढी प्रचंड होती की, पुष्कळ कोर्टकचेऱ्या झाल्या, कज्जेखटले लढले गेले. या वादावादीत घर तसंच पडलं होतं. रिकामं. भकास. कधीतरी कुणीतरी जात असे त्या घरात. राहेल आणि इस्थानं ते घर कधी पाहिलं नसलं, तरी त्या घराचं चित्र होतं त्यांच्या नजरेसमोर.

– द हिस्टरी हाऊस!

थंडगार स्पर्शाची काळीशार दगडी जमीन... भरतीच्या लाटांवर डोलणाऱ्या जहाजांसारख्या भिंतीवरून धावणाऱ्या गूढ सावल्या. भिंतीवर टांगलेल्या जुनाट चित्रांच्या मागे कोळिष्टकांच्या चिकट जाळयात लपलपणाऱ्या पांढऱ्याधोप, जाड- जाड शेपट्यांच्या किळसवाण्या पाली... लांबलांब वाढलेल्या नखांमुळे धडपडत चालणारे, जख्ख म्हातारे झाले तरी एकमेकांमध्ये काहीतरी कुजबुज करणारे, जुनाट नकाशांसारखा कुजकट वास येणारे पूर्वज... असं खूप काही.

'पण आपल्याला नाही त्या घरात जाता येणार... कारण आपल्याला बाहेरच कुलूपबंद केलंय ना?' – चाको बोलता-बोलता विषादानं म्हणाला, '... आणि खिडकीतून डोकावून बघितलं, तर दिसणार फक्त सावल्याच. जहाजासारख्या डोलणाऱ्या, भिंतभर नाचणाऱ्या. आत काय चाललंय त्याकडे कान लावायचा प्रयत्न केला, तर फक्त कुजबुजच ऐकू येईल. त्या कुजबुजत्या शब्दांचा अर्थ लावण्याचं सामर्थ्य उरलंय कुठे आपल्या मनात? आपली मनं रक्तबंबाळ झाली आहेत त्या भयानक युद्धानं. युद्धाच्या सपकाऱ्यांनी छिन्नविच्छिन्न करून टाकलंय 'आतलं' सगळं. मनात खोल लपवलेली, रुजलेली आपली स्वप्नंसुद्धा सुटली नाहीत या हल्ल्यातून. त्या स्वप्नांचंही भलतंच काहीतरी झालंय आता. पुन्हा दिसतात, जाणवतात; तेव्हा ओळखूसुद्धा येत नाहीत. स्वत:ला कायम तुच्छ लेखायचं, स्वत:च्या व्यक्तिगत सुखदु:खांची बोचकी पृथ्वीच्या गर्भात खोल पुरून ठेवायची आणि युद्धात विजय खेचून आणणाऱ्या शूरवीरांचा गुणगौरव करायचा, हेसुद्धा या युद्धानेच भिनवलं आपल्यामध्ये. दुसरा काही पर्यायच नाही उरलेला.'

'स्वत:ला विसरा आणि विजेत्या शूरवीरांशी लग्न करा. हे तसंच आहे पुष्कळसं –' मार्गरिट कोचम्माचा थेट संदर्भ देत अम्मूनं एक खोचक टोमणा टाकला; पण चाकोनं तिकडं लक्ष दिलं नाही. त्याने राहेल आणि इस्थाला पुन्हा एकदा तोच शब्द शोधायला लावला. डिस्पाईस. त्या शब्दापुढं लिहिलं होतं,

टु लुक डाऊन अपॉन; टु व्ह्यू विथ कन्टेम्ट; टु स्कॉर्न ऑर डिसडेन

– 'तिरस्कार करणे, तुच्छतेने पाहणे, उपहास करणे किंवा झिडकारून टाकणे.'

चाको म्हणाला,

'मी ज्या युद्धाबद्दल बोलतोय ना, ते युद्ध मुळी स्वप्नांचं आहे – द वॉर ऑफ ड्रीम्स. आणि त्या संदर्भात 'डिस्पाईस' म्हणजे हेच सगळं. तिरस्कार. तुच्छता. उपहास. झिडकारलेपण.'

'आपण युद्धकैदी आहोत –' कुठंतरी शून्यात नजर लावून चाको बोलतच राहिला.

'आपली सगळी स्वप्नं साखळदंडांनी जखडलेली आहेत. रुग्णशय्येवर अखेरच्या घटका मोजताहेत. आपल्या अस्तित्वाची मुळं रुजतच नाहीत. कशी रुजतील? त्या मुळांना

स्वत:ची अशी मातीच कधी मिळाली नाही. उसळलेल्या समुद्रावर नांगराशिवाय भेलकांडणाऱ्या भरकटल्या होडीसारखी आपली अवस्था आहे. आपण असेच भणाण वाऱ्यासोबत भरकटत राहू. किनाऱ्याला पोचणं नशिबातच नाही आपल्या. आपल्या वेदना कधी ठणकणार नाहीत. आपली दु:खं, आपले क्लेश पुरेसे विषण्ण असणार नाहीत. त्या खऱ्याखुऱ्या विषण्णतेनं येणारी खिन्नता आपल्याला जाणवणार नाही. आपल्या सुखाचे क्षण ओतप्रोत आनंदानं ओसंडणार नाहीत, आपली स्वप्नंसुद्धा स्वप्नांसारखी असणार नाहीत. या जगातल्या कुणी आवर्जून दखल घ्यावी, असं काहीच आपल्याजवळ असणार नाही. अगदी आपलं आयुष्यसुद्धा.'

राहेल आणि इस्था या दोघांनाही इतिहासाकडं नीट, साकल्यानं बघता यावं, अशी चाकोची इच्छा होती (पुढच्या काही आठवड्यांत हे 'साकल्यानं पाहणं' वगैरे तो स्वत:च विसरून गेला, ही गोष्ट अलाहिदा). चाकोने त्या दोघांना धरतीमातेबद्दल सांगितलं. तो म्हणाला,

'चार हजार सहाशे दशलक्ष वर्षं वयाची पृथ्वी ही सेहेचाळीस वर्षांची एक स्त्री आहे – म्हणजे तुम्हांला मल्याळम शिकवणाऱ्या अलेयम्मा टीचरएवढी – अशी कल्पना करा. या एवढ्या आयुष्यात पृथ्वीवर जे काही आहे, ते सगळं घडलं. महासागर पसरले. पृष्ठभागावरून पर्वतांच्या रांगा उठून उभ्या राहिल्या. पहिला एकपेशीय जीव अस्तित्वात आला, तेव्हा धरतीमाता अकरा वर्षांची होती. पुढं ती चाळिशीत पोचेपर्यंत प्राणी आले. किडेमुंग्या, गांडुळं आणि जेलीफिश आले. आठ-एक महिन्यांपूर्वी म्हणजे धरतीमाता पंचेचाळिशी पार करून जाईतो या पृथ्वीतलावर डायनॉसोर्स भटकत होते.'

'ज्याला आपण मानवी संस्कृती म्हणतो ना' – चाको सांगत होता, 'ती जेमतेम दोन तासांपूर्वी सुरू झालीय धरतीमातेच्या आयुष्यात. म्हणजे आयमेनेमहून कोचिनला जायला लागतो ना, तेवढा वेळ. दोनच तास फक्त.'

चाकोच्या मते, हे सगळंच थक्क करून टाकणारं होतं आणि विश्वरचनेच्या सगळ्या पसाऱ्यापुढं नम्रतेनं लीन व्हायला लावणारंसुद्धा. 'नम्रता' हा श्ाब्द राहेलला खूपच आवडला. बेदरकार नम्रतेने भटकत राहायचं जगभर. सगळाच्या सगळा समकालीन इतिहास... म्हणजे सगळी जागतिक महायुद्धं, स्वप्नांना बेचिराख करणारी युद्धं, चंद्रावर पाऊल ठेवणाऱ्या माणसाचं अफाट कर्तृत्व, स्वत:ची मिजास मिरवणारं विज्ञान, साहित्य, तत्त्वज्ञान, ज्ञानाची अखंड तहान, विश्वाची रहस्यं समजून घेण्याची लालसा... हे सगळं म्हणजे धरतीमातेच्या आयुष्यातला एखाद-अर्धा क्षण जेमतेम. डोळ्यांवरची पापणी मिटून उघडावी, एवढंच फक्त. फक्त एक निमिष!

"अॅण्ड वी, माय डियर्स, एव्हरीथिंग वी आर् अॅन्ड एव्हर विल बी-आर् जस्ट अ ट्विंकल इन हर आय्. डोळ्यांमधली लुकलुक नुसती. बास."

बिछान्यावर पाठ टेकता-टेकता निर्विकार नजरेनं छताकडं पाहणारा चाको सांगत होता. स्वत:ला, मुलांना.

अशा मूडमध्ये असला, की चाकोच्या आवाजात एक वेगळाच रुबाब येई. रुबाब आणि पुष्कळसा अधिकार. थोडीशी खोलीसुद्धा. आपण जे काही बोलतोय, ते कुणी ऐकतंय का, कुणाला समजतंय का, याची तिळमात्र पर्वा न करता चाकोची तार लागे आणि लांबलचक स्वगतं सुरू होत. चाकोला असे वैचारिक झटके आले, की घरात सगळ्यांना कळायचं. अम्मूनं तर या झटक्यांना 'ऑक्सफर्ड मूड' असं नावच ठेवून टाकलं होतं.

पुढं पुष्कळ दिवस गेले, वर्षं सरली. मग सिद्ध झालं, की चाकोनं वापरलेला 'ट्विंकल' हा शब्द काही फारसा बरोबर नव्हता. निरर्थकच (ठरला) होता खरं म्हणजे. या शब्दाला थोडा नाद होता, सुखाचे चार कोपरे आणि अनाम आनंदाची झालरही होती हलकीशी. पण प्रत्यक्षात?

चाकोने सांगितलेली धरतीमातेची गोष्ट राहेल आणि इस्थाच्या मनावर ठसली होती, तरीही नदीपल्याडल्या त्या गूढ, ऐतिहासिक घराचं आकर्षण काही त्यांना स्वस्थ बसू देईना. दोघांच्याही मनात आता त्या घराचा ध्यास नुसता भरून राहिला होता. भीती वाटत होती. अंगावर शहारे फुटत होते. तरी मन धाव घेत होतं त्या अंधारल्या दिशेनं.

नदीपल्याडचं ते घर.

बंद दाराचं. कडेकोट काळ्याकभिन्न भिंतींचं आणि आत चालणारी ती कुजबुज.

लवकरच त्या घरात जाणं आपल्याला भाग पडणार... नदी पार करावी लागणार... जिथं असू नये, तिथं असावं लागणार. आणि तेदेखील ज्याच्यावर प्रेम करणं निषिद्ध आहे, अशा माणसाबरोबर. हे कुठं ठाऊक होतं दोघांना? काळाचं चक्र फिरेल आणि मागल्या व्हारांड्यात बसल्या-बसल्या समोर उलगडणारा इतिहास विस्फारल्या डोळ्यांनी बघत बसण्याखेरीज गत्यंतर उरणार नाही, हेदेखील अगम्यच होतं... अजून.

त्यांच्या वयाची मुलं जगभरातल्या काय-काय गोष्टी शिकत असताना राहेल आणि इस्था मात्र इतिहासाची पावलं ओळखण्याचे धडे गिरवत होते. नियम मोडून मनमानी करणाऱ्या, भरकटणाऱ्या माणसांना इतिहास योग्य वेळी कसा कोंडीत पकडतो आणि त्यांच्याकडून किती निर्दयतेनं कशी वसुली करतो, हे आता त्यांना समजायला लागलं होतं. भरकटणाऱ्या माणसांचे कणे मोडणाऱ्या इतिहासाच्या अदृश्य दंडुक्याचा आवाज त्यांनी ऐकला होता. त्याचा वासही घेतला होता.

इतिहासाचा वास.

कुजलेल्या गुलाबाभोवती घोटाळणाऱ्या वाऱ्यानं वाहून आणावा, तसा.

अगदी साध्यासाध्या सोप्यासोप्या गोष्टींत तो वास घुटमळत राहणार. हँगरवर

टांगलेल्या कोटमधून... टोमॅटोमधून... रस्त्यावर वितळलेल्या डांबरातून... काही ठरावीक रंगांतून आणि रेस्टॉरंटमधल्या प्लेट्समधून... नि:शब्द क्षणातून आणि रिकाम्या, भकास नजरेतून.

ही मुलं अशीच वाढतील आता. वर्तमानाचे रूपरंग घट्ट पकडून. झाल्या-गेल्या गोष्टींच्या संदर्भात जखडून. एकूणच या पृथ्वीच्या अस्तित्वात येण्याच्या प्रक्रियेचा विचार केला, तर काळाच्या ओघात जे घडलं, ते तितकंसं महत्त्वाचं नव्हतं, अशी स्वत:च स्वत:ची समजूत घालायला शिकतील... धरतीमातेची पापणी लवली फक्त. एवढंच. सगळ्या पसाऱ्याच्या तुलनेत इतकं क्षुल्लकच सगळं. वाईट, त्रासदायक गोष्टी घडल्या. घडतच राहिल्या, तरी त्यांना समाधान शोधताच येणार नाही, साध्या विचारातसुद्धा. समाधान नाही. साधा दिलासादेखील नाही.

-'द साऊंड ऑफ म्युझिक' बघायला जाणं म्हणजेदेखील आपल्या एकूण कौटुंबिक वृत्तीचा एक अँग्लोफीलिया आविष्कारच आहे, असं चाकोचं म्हणणं होतं.

मग मात्र अम्मू वैतागली. म्हणाली,

'अख्खं जग हा सिनेमा बघायला जातं, ते काय मूर्ख म्हणून? 'द साऊंड ऑफ म्युझिक' आहेच तसा. वर्ल्ड हिट.'

'नेव्हरदलेस, माय डिअर,' चाको त्याच्या त्या रुबाबदार आवाजात म्हणाला, 'तसं असलं, तरीसुद्धा.'

चाकोची गणना भारतातल्या हुशारांतल्या हुशार माणसांमध्ये नक्की होऊ शकेल, असं माम्माची नेहमी म्हणत असे; पण अम्मूला हे मुळीच पटायचं नाही. ती विचारे,

'कोण म्हणतं असं? कशावरून चाको हुशार आहे?' मग ऑक्सफर्डमधल्या एका 'दादा' माणसानं चाकोचं कसं तोंडभरून कौतुक केलं होतं, त्याच्यामध्ये पंतप्रधान होण्याचीसुद्धा कुवत आहे याची खातरी कशी दिली होती, अशा काय-काय गोष्टी माम्माची सांगत बसे. माम्माचीची ही पेटंट गोष्ट सांगून झाली, की अम्मू तिरकी तिरकी हसत सुटे.

'हा! हा! हा!'

कॉमिक्समधल्या पात्रांनी खदाखदा हसत सुटावं, तसं. अम्मूची काही ठाम मतं प्रचंडच होती.

(अ) ऑक्सफर्डला गेला, म्हणजे कोणीही येरागबाळा माणूस शहाणा ठरतोच, असं नव्हे.

(ब) अतिहुशारी अंगात असली, म्हणजे पंतप्र्धान होता येतंच, असं कुणी सांगितलं?

(क) ज्या माणसाला एक साधी लोणच्याची फॅक्टरी धडपणानं चालवता येत नाही, तो कसला पंतप्रधान होणार? देश कसा चालवणार?

आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे,

(ड) सगळ्या भारतीय आयांना आपल्या मुलांचं जरा जास्तच कौतुक असतं आणि मुलांच्या बऱ्या-वाईट कुवतीचा मुळीच विचार न करता शुद्ध आंधळेपणानं त्या मुलांच्या संदर्भात वाट्टेल तसे इमले उभारत सुटतात.

त्यावर चाको म्हणायचा,

(अ) तुम्ही ऑक्सफर्डला नुसते जात नाही. तिथं राहता. अभ्यास करता.

(ब) एकदा का ऑक्सफर्डला गेलं आणि तिथे अभ्यास करण्याची संधी मिळाली, की तुमच्या अकलेचे इमले चढत नाहीत. उलट उतरतात.

'म्हणजे जमिनीवर? असंच म्हणायचं ना तुला?'

अम्मूचा प्रतिप्रश्न तयारच असे,

'तेवढं तुला बरं जमतं. जमिनीवर उतरणं. तुझी ती विमानं उतरायची ना, एकामागोमाग एक, तसं.'

चाकोनं केलेली विमानं आणि त्यांचं भवितव्य चाकोच्या स्वत:च्या भवितव्यापेक्षा मुळीच वेगळं नसणार, याबद्दल अम्मूला पक्की खातरीच असे. तेव्हाही आणि आताही.

मान्सूनचे दिवस वगळले, तर दर महिन्याला चाकोच्या नावाने व्ही. पी. करून एक पार्सल यायचं. 'बाल्सा एअरो मॉडेलिंग कीट' त्यात ठासून भरलेलं असे. त्या छोट्या विमानाच्या इंधनाची छोटी टाकी आणि दोन पंखांसह सगळ्या गोष्टी आकृतीप्रमाणे एकमेकांना जोडून अख्खं विमान बनवण्यात चाकोचे आठ-दहा दिवस जात. ही झगमग एकदाची संपली, की राहेल आणि इस्थाला घेऊन चाको नट्टकोमच्या जवळ भातखाचरांमध्ये जायचा. तिथं पोचलं, की विमान उडवण्याचा सोहळा सुरू. त्याचं कुठलंही विमान कधीही मिनिटभरापेक्षा जास्त उडत नसे. महिन्यांमागून महिने गेले. विमानांमागून विमानं बनली, भातखाचरांच्या मधल्या चिखलाच्या राडीत कोसळलेली विमानं उचलता-उचलता आणि काळजीपूर्वक बनवलेल्या त्या विमानांचे उद्ध्वस्त अवयव जमवता-जमवता इस्था आणि राहेलची दमछाक होत राहिली.

शेपटी, इंधन भरायची टाकी, फाटकेतुटके पंख आणि जखमी होऊन धारातीर्थी पडलेली त्या विमानाची मोटार.

लाकडी विमानाच्या फुटक्या अवशेषांनी चाकोची खोलीही ओसंडून वाहत असे.

तरीही दर महिन्याला नवं पार्सल. त्यातल्या नवा संच; पण चाकोनं कधीही कोसळणाऱ्या विमानांचा दोष त्या साहित्यावर ढकलला नाही, एवढं मात्र खरं.

पाप्पाचींच्या मृत्यूनंतर चाकोनं मद्रास ख्रिश्चन कॉलेजातली प्राध्यापकी सोडून दिली आणि 'लोणची सम्राट' बनण्याचं स्वप्न डोक्यात घेऊन, वाट्टेल तेवढे कष्ट करण्याची तयारी

ठेवून तो आयमेनेममध्ये परतला. पेन्शन आणि प्रॉव्हिडंट फंडाची छोटीशी पुंजी त्यानं बरोबर आणली होती. ते सगळे पैसे खर्चून त्यानं 'भारत बॉटल सीलिंग मशिन' विकत घेतलं.

चाको आयमेनेममध्ये परत येईपर्यंत लोणच्याची फॅक्टरी अगदी छोटीशी होती. काम चांगलं चाललेलं. फायदाही होत होता. एक मोठ्ठं स्वयंपाकघर असावं आणि घरातल्या गृहिणीनं सगळ्या गोष्टी निगुतीनं करवून घ्याव्यात, तशा पद्धतीनं माम्माची फॅक्टरीचा छोटासा संसार चालवत होती. चाकोने आल्या-आल्या सगळं बदलायला सुरुवात केली. त्यानं ताबडतोब फॅक्टरीची रीतसर नोंदणी केली आणि व्यावसायिक भागीदारीचा करारनामाही तयार केला. एकूण व्यवहारात माम्माची 'स्लीपिंग पार्टनर' असणार होती. चाकोने फॅक्टरीत बरेच पैसे गुंतवले. कॅनिंग मशिन्स, मोठमोठ्या कढया घेतल्या. प्रेशर कुकर्स खरेदी केले. त्यापाठोपाठ कामगारही वाढवले. हा वेग इतका प्रचंड होता की, त्या छोटेखानी फॅक्टरीचा आर्थिक डोलारा बघता-बघता कोसळायला आला; पण चाको ही असली आव्हानं पेलायला तयारच होता. त्याने ताबडतोब कुटुंबाच्या सामाईक मालकीची भातशेती गहाण टाकली आणि वेगवेगळ्या बँकांकडून मोठ्या रकमेची कर्जं उचलली. खरं म्हणजे, अम्मूही चाकोच्या बरोबरीनं फॅक्टरीत काम करत असे. अन्न आणि औषध प्रशासनाचे अधिकारी, सॅनिटरी इन्स्पेक्टर्स आदी भानगडी निस्तरण्यात चाकोचा वेळ जायचा, तेव्हा फॅक्टरीतले सगळे व्यवहार अम्मूच सांभाळायची; पण चाकोच्या तोंडात सतत माझी फॅक्टरी, माझे अननस, माझी लोणची अशीच भाषा. घरातली मुलगी असूनही अम्मूचा या मालमत्तेवर काडीचा हक्क नव्हता.

कायदेशीर वाटा वगैरे दूरच राहिला, फॅक्टरीच्या संदर्भात अम्मूला तिचं म्हणणं नुसतं मांडण्याचासुद्धा अधिकार नाही, असं चाकोनं राहेल आणि इस्थाला ठणकावून सांगून टाकलं होतं.

'आपल्यासारख्या पुरुषप्रधान समाजाकडून दुसरी काय अपेक्षा करायची?' अम्मू कधीकधी विषण्णतेनं म्हणे. चाकोचं एक लाडकं तत्त्व होतं –

'जे तुझं, ते माझं... आणि जे माझं, ते तर नि:संशय माझंच!'

त्याचं एकूण आकारमान आणि इकडून-तिकडून ओसंडणाऱ्या शरीराच्या मानानं तो फारच गदगदून, जोराजोरानं हसायचा. तो असा हसायला लागला, म्हणजे त्याचं अख्खं शरीर सगळीकडून थरथरायचं.

चाको आयमेनेममध्ये येईपर्यंत माम्माचीच्या लोणच्याच्या फॅक्टरीला नाव नव्हतं. तिनं बनवलेल्या पदार्थांना लोक 'सोशाची लोणची' किंवा 'सोशाचा जॅम' असं म्हणत. सोशा म्हणजे सोशम्मा. माम्माचीचं पहिलं नाव.

चाकोने पहिल्यांदा फॅक्टरीचं नामकरण केलं 'पॅराडाईज् पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्'.

पुढे के. एन. एम. पिल्लईंच्या कम्युनिस्ट प्रेसमधून या नावाची लेबलंही छापून घेतली.

खरंतर, त्याच्या डोक्यात 'झ्यूस् पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्' असं नाव होतं. पण 'झ्यूस्' म्हणजे ज्युपिटर हे कुणाला समजणार? शिवाय 'पॅराडाईज्' या शब्दाला स्थानिक संदर्भ तरी आहे. तसा 'झ्युस्'ला कुठून असणार? वगैरे वगैरे बऱ्याच शंका निघाल्यानंतर चाकोनं तो विचार रद्द केला (कॉम्रेड पिल्लईंनी 'परशुराम पिकल्स' असं आणखी एक नाव सुचवलं होतं; पण ते जरा जास्तच गावठी वाटतं, म्हणून चर्चेअंती बाजूला पडलं.).

फॅक्टरीच्या नावाचा एक भलामोठा बोर्ड रंगवून तो प्लायमाऊथच्या टपावर लावायचा, हीसुद्धा चाकोचीच शक्कल.

कोचिनच्या दिशेनं गाडी धावत असताना अचानक तो बोर्ड निखळला आणि टपावर धडाधड आदळू लागला.

शेवटी वईक्कमच्या जवळ थांबून त्यांना तो बोर्ड दोरीनं घट्ट बांधून घ्यावा लागला. त्यात आणखी वीस मिनिटं गेली. 'द साऊंड ऑफ म्युझिक'चा पहिला सीन आपल्याला आता कसा बघता येईल? उशीर झाला तर? या काळजीनं राहेल नुसती वैतागून गेली होती.

काही वेळानं कोचिन दिसू लागलं; पण शहरात प्रवेश करण्याच्या जेमतेम काही मिनिटं आधी लाल-पांढऱ्या रंगानं रंगवलेलं रेल्वेचं अजस्र फाटक करकरत रस्त्यावर उतरलं आणि वेगानं जाणारी प्लायमाऊथ थांबली, ती थांबलीच. 'असं होऊ नये' यासाठी आपण सतत प्रार्थना करत राहिलो म्हणूनच नेमकं तसं झालं, हे राहेलला कळून चुकलं; पण आता जागच्या जागी चरफडत बसून काही उपयोग नव्हता.

स्वत:च्या आशांना लगाम घालणं, अपेक्षा मर्यादित ठेवणं आणि स्वप्नांना सीमा आखणं राहेलला अजून मुळी जमतच नव्हतं. तिचा हा स्वभाव इस्थाला मुळीच आवडत नसे. स्वत:च्या मर्यादा ओलांडून उगीच जिकडंतिकडं धावण्याची सवय बरी नव्हे, असं त्याचं स्पष्ट मत होतं.

एवढं सगळं झाल्यावर सिनेमाची सुरुवात चुकणार, हे सगळ्यांनाच समजून चुकलं होतं. टेकडीच्या उंचच उंच टोकावर एखाद्या ठिपक्याएवढी दिसणारी ज्युली अॅन्ड्रूयूज बघता-बघता अख्खा पडदाभर मोठी होत जाते... इतकी मोठी, की शेवटी तिच्या प्रतिमेचा मोठ्ठा स्फोट व्हावा, तसा पडदा उसळून उठतो... थंड पाण्यासारखा तिचा घनगर्द आवाज पाझरत राहतो. पेपरमिंटच्या गोड-उग्र दर्पासारखे तिचे श्वास घेरून येतात चोहींकडून.

ते दृश्य चुकणार.

नक्कीच चुकणार.

म्हणून हळहळ लागली होती.

रेल्वे फाटकाच्या मधोमध रस्ता अडवून उभ्या असलेल्या अजस्र पांढरट 'हातावर' लाल अक्षरात लिहिलं होतं.

S-T-O-P

P-O-T-S' – राहेलनं मोठ्ठ्यांदा ती अक्षरं वाचली.

शेजारीच उभारलेल्या एका भल्यामोठ्या पिवळट होर्डिंगवर लिहिलं होतं.

BE INDIAN, BUY INDIAN.

'NAIDNI YUB NAIDNI EB'

इस्था जोरजोरानं म्हणाला.

ही एक भलतीच भानगड होती.

वाचनाच्या बाबतीत जुळ्यांचं डोकं भलत्याच वेगानं चालत असे.

ओल्ड डॉग टॉम, जेनेट अॅण्ड जॉन आणि रोनाल्ड रीडआऊट वर्कबुक अशा कित्येक पुस्तकांचा फडशा पाडून-पाडून त्यांची डोकी भलती तेज-तल्लख झाली होती.

रात्र झाली की अम्मू किपलिंगचं 'जंगल बुक' काढून मुलांना वाचून दाखवे.

आता आकाशभर पंख पसरून घारी जंगलाकडे परततील... मग जंगलात पसरेल रात्रीचं साम्राज्य आणि तोंड लपवून बसलेल्या पाकोळ्या भरारा उडतील.

दोघंही गोष्ट ऐकता-ऐकता पेंगुळत.

बिछान्याशेजारच्या बल्बमधून पिवळसर उबदार प्रकाश सगळीकडे रेंगाळत राही.

पुस्तकातल्या पात्रांप्रमाणे वेगवेगळे आवाज काढण्यात अम्मू तरबेज होती. ती कधी शेरखानसारखी गुरगुरत बोले, तर तबाकीसारखी कण्हत-विव्हळत.

'लवकर काय ते ठरवा. हा कसला गोंधळ चालवलाय मूर्खासारखा. मी मारलेल्या बैलावर माझाच हक्क असताना गव्हाणीतल्या कुत्र्याप्रमाणे इथं-तिथं तोंड घालत मी का म्हणून ताटकळत राहू? ठाऊकाय ना तुम्हांला? मी शेरखान बोलतोय. माझ्यापुढं काय लागली तुमची टाप?'

'आणि मी बोलतोय रक्षा (राक्षस)... आता ऐक माझं.' दोघं जुळी मुलं आवाज टिपेला चढवून ओरडत.

'हा माणसाचा बच्चा माझा आहे. फक्त माझा. माझ्याशी जोडला गेलाय तो. तो मारला जाता कामा नये. तो लांडग्यांच्या झुंडीबरोबर जगेल आणि त्यांच्याबरोबरच शिकार करील. छोट्या-छोट्या शिकारींवर ताव मारून गुर्मी करणाऱ्या, मासे आणि बेडकांना मारून पोट जाळणाऱ्या शिकाऱ्या, लक्षात ठेव, हा माणसाचा बच्चाच शेवटी तुझी शिकार करील.

राहेल आणि इस्थाच्या शिक्षणाकडे लक्ष द्यायची जबाबदारी बेबी कोचम्मावर सोपवण्यात आली होती. चार्ल्स आणि मेरी लॅम्ब या दोघांनी लिहिलेली 'द टेम्पेस्ट'ची संक्षिप्त आवृत्ती बेबी कोचम्मानं जुळ्यांसाठी आणवली.

'व्हेअर द बी सक्स, देअर सक आय'– त्यातल्या ओळी गुणगुणण्याचा नादच इस्था आणि राहेलला लागला होता. इन अ काऊस्लीप्स बेल आय लाय...

त्याच दरम्यान कधीतरी बेबी कोचम्माची मैत्रीण असलेली मिस मिट्न ही ऑस्ट्रेलिअन मिशनरी बाई आयमेनेमला आली होती. तिनं राहेल आणि इस्थाला भेट म्हणून 'द अॅडव्हेन्चर्स ऑफ सुसी स्क्विरल' हे छोट्या मुलांचं पुस्तक दिलं. ती बालिश भेट बघून दोघं मुलं भलतीच दुखावली. आपल्याला 'बच्चेलोक' समजून दिलेलं ते पुस्तक त्यांना मुळीच आवडलं नव्हतं. पहिल्यांदा त्यांनी ते पुस्तक सरळ शिस्तीनं वाचून काढलं; पण राहेल आणि इस्थानं पुस्तक पुढून मागे म्हणजे उलटं वाचायला सुरुवात केल्यावर मात्र मिस मिट्न खूपच नाराज झाली. मुलांनाही इतकी खुन्नस चढलेली, की मुद्दाम तिच्या पुढ्यात 'उलट्या वाचनाचे प्रयोग' त्यांनी सुरू केले.

'ehT serutnevdA fo eisus lerriuqS. enO gnirps gninrom eisuss

lerriuqS ekow pU.'

मिस मिट्नचा पारा चढला, तसे दोघांनीही तिला 'Malayalam' आणि 'Madam I'm Adam' हे शब्द लिहून दाखवले. डावीकडून उजवीकडं वाचा किंवा उजवीकडून डावीकडं वाचा, काहीही फरक पडत नाही, हेदेखील तिच्या लक्षात आणून दिलं. शिवाय मिट्नला सांगितलं, केरळमध्ये सगळेच लोक असं बोलतात. ती वैतागलीच होती. म्हणाली,

'मला वाटतं, ही केरळचीच काहीतरी स्पेशल भाषा असणार. बाकी कुठे असला विचित्रपणा मी तरी बघितलेला नाहीय.'

तोवर इस्थाचाही पारा चढला होता. तो म्हणाला,

'असं काहीतरी भलतंच वाटणं हेही प्रचंड मूर्खपणाचं आहे. 'अ हायली स्टुपीड इंप्रेशन!'

इस्थाच्या या उद्धटपणानं चिडून जाऊन मिस मिट्नने बेबी कोचम्माकडं जोरदार तकरार नोंदवलीच. शिवाय मुलांचं हे पुढून मागं उलट्या दिशेनं वाचणं मुळीच बरोबर नाही, असंही सांगितलं.

'या मुलांच्या डोळ्यांत मला सैतानाची नजर दिसते. नतद्रष्ट कारटी!' मिस् मिट्न वैतागानं म्हणाली होती.

natiaS in their seye.

शेवटी मुलांना शिक्षा ठोठावली गेली.

एकच वाक्य शंभर वेळा लिहून काढायचं.

In future we will not read backwards.

यापुढं कधीही आम्ही पुढून मागे अशा उलट्या दिशेनं वाचणार नाही.

शंभर वेळा लिहायचं. पुढच्या सरळ दिशेनं मागून पुढे.

पुढे काही महिन्यांनी एका दुधाच्या टँकरने धडक दिल्यामुळे मिस मिट्न अपघातात मरण पावली. क्रिकेटच्या मैदानाशेजारी हे सगळं झालं; पण जुळयांच्या दृष्टीनं महत्त्वाचं म्हणजे, मिस् मिट्नच्या अपघाती मृत्यूमध्येही एक ईश्वरी संकेत होता.

मिस् मिट्नला आपल्या चाकांखाली चिरडणारा तो दुधाचा टँकर 'रिव्हर्स' टाकून मागं-मागं येत होता. पुढून मागं.

रेल्वे फाटकाच्या दोन्ही बाजूंना बस, गाड्या यांची लांबलचक रांग लागलेली. सगळे अगदी अस्वस्थ होऊन ताटकळत उभे होते. 'सेक्रेड हार्ट हॉस्पिटल' असे शब्द रंगवलेली एक अॅम्ब्युलन्स लग्नाला निघालेल्या लोकांचं भलंमोठं वर्‍हाड पोटात भरून उभी. भेदरलेली तरीही उत्सुक नवरी मागच्या खिडकीतून डोकावत होती. गाडीच्या मागे पांढर्‍या स्वच्छ पत्र्यावर रंगवलेल्या भल्यामोठ्या रेडक्रॉसमुळे नवरीचा चेहरा नीटसा दिसत नव्हता.

गंमत म्हणजे, रांगेत उभ्या असणार्‍या प्रत्येक बसवर मुलींची नावं रंगवलेली. लकीकुट्टी, मॉलीकुट्टी, बीनामोल... मल्याळममध्ये 'मोल' म्हणजे मुलगी आणि 'मॉन' म्हणजे मुलगा. बीनामोल बसमध्ये तिरुपतीला जाऊन डोकी भादरून आलेल्या यात्रेकरूंची गर्दी. बसच्या खिडकीला लावलेल्या आडव्या दोन सळयांमधून बाहेर ओकण्याचा रिवाज आहे. त्या सळयांच्या लायनीत एकामागोमाग एक टकलूंची रांगच्या रांग राहेलला दिसत होती. या दोन सळयांमधून ओकणं कसं काय जमतं लोकांना, याबद्दल राहेलला नेहमीच आश्चर्य वाटे. तिनं असं कधीच केलं नव्हतं आजवर. कुठूनतरी कुठंतरी जाताना इस्थाला एकदा उलटी झाली होती. तेव्हा त्याचा चेहरा लालमलाल झाला होता, डोळयांत पाणी भरलं होतं आणि शेजारी बसलेल्या अम्मूनं त्याचे नेहमीपेक्षा जास्तच लाड केले होते, एवढं राहेलला स्पष्ट आठवलं. चाको म्हणायचा,

'राहेल आणि इस्था तब्येतीनं जरा जास्तच बाळसेदार आहेत. इतकं गोलमटोल बाळसं बरं नाही दिसत मुलांच्या अंगावर.' सोफी मॉलबद्दलही त्याची हीच तकरार होती. जवळपास सगळे सीरिअन ख्रिश्चन आणि पारशी अगदी जवळच्या नात्यातल्या स्त्री-पुरुषांच्या विकृत संभोगातून जन्माला येतात... पुढं आयुष्यभर त्याची घाणेरडी फळं भोगतात. राहेल, इस्था आणि सोफी मॉलच्या बाबतीत असलं काही घडलं नाही, म्हणूनच तिघंही इतकी गुटगुटीत निपजली, असा चाकोचा निष्कर्ष होता.

पण माम्माचीला तसं वाटत नसे. असल्या विकृत संभोगातून जन्म एक वेळ परवडला, पण आपल्या नातवंडांनी जे भोगलं, ते त्याहूनही विचित्र आणि विकृत आहे, असं तिचं मत होतं. घटस्फोट घेऊन एकमेकांपासून दुरावलेले, वेगळे झालेले आई-बाप याच्याइतकं दुसरं दुर्भाग्य नाही आणि ते नेमकं आपल्याच नातवंडांच्या वाट्याला आलं, म्हणून माम्माची सदैव कळवळत असे.

जणू लोकांपुढे फक्त दोनच पर्याय उपलब्ध होते. एकतर विकृत संभोग पुढे चालू ठेवायचे किंवा मग सरळ घटस्फोट.

यातल्या नक्की कशाची विकृती आपल्यात रुजलीय हे राहेलला कळत नसे; पण आरशात बघून दु:खीकष्टी चेहरे करण्याचा आणि येता-जाता उसासे सोडण्याचा सराव मात्र ती वरचेवर करायची.

'इट इज अ फार, फार बेटर थिंग दॅट आय डू, दॅन आय हॅव एव्हर डन'!

हे तिचं लाडकं वाक्य होतं. चेहरा पाडायचा आणि स्वत:शीच पुटपुटत राहायचं. अशा वेळी राहेल म्हणजे चार्ल्स डार्नेच्या भूमिकेतला सिडनी कार्टून... *'अ टेल ऑफ टू सिटीज्'* च्या कार्टूनमधला चार्ल्स... शिरच्छेद होण्याच्या प्रतीक्षेत पायऱ्यांवर विमनस्क उभा असलेला.

गाडीत बसलेल्या सगळ्याच्या सगळ्या टकलूंना एकदम कशा काय उलट्या झाल्या असतील? गाडीत चाललेल्या भजनांच्या तालासुरांची सम गाठून सगळे एकमेकांच्या सोबतीनं ओकले असतील का? की एकामागून एक स्वतंत्रपणाने प्रत्येकाने आपापला कार्यक्रम उरकला असेल? – औत्सुक्यानं भरलेल्या राहेलच्या डोक्यात प्रश्नांची एकच गर्दी झाली होती.

रेल्वेचं फाटक बंद होता-होता गाड्या थांबल्या, तेव्हा धडधडत्या इंजिनांच्या आवाजांनी आणि भोंग्यांच्या कर्कश वेटोळ्यांना लगटून पसरलेल्या उग्र धुराने सगळं वातावरण नुसतं कोंडून गेलं होतं; पण फाटक बंद झाल्यावर थोड्याच वेळात क्रॉसिंगवरच्या छोट्या खोलीतला, फाटक बंद करणारा माणूस आरामात बाहेर आला आणि पाय ओढत, शीळ घालत कोपऱ्यावरच्या टपरीकडे चहा प्यायला निघाला. त्याला बघताच सगळ्यांनी सुस्कारे टाकले आणि आपापल्या गाड्यांची धडधडती, धूर ओकणारी इंजिनं बंद करून सगळ्या ड्रायव्हर्सनी पटापट रस्त्यावर उड्या टाकल्या. घामेजलेले, कातावलेले, उबले-अवघडलेले पाय जरा मोकळे करायला मिळाले, तर बरंच होतं. आता किमान अर्ध्या तासाची तरी निश्चिंती, हे सगळ्यांना न सांगता समजलं.

ताबडतोब लेव्हल क्रॉसिंगवरच्या ईश्वराने हाका घालून बोलवल्यासारखे त्याचे भक्तगण इकडून-तिकडून भुळभुळत जमले आणि चोहींकडे एकच कालवा सुरू झाला. तुटक्या, बोटं झडलेल्या हातापायांना चिंध्या बांधलेले भिकारी, केळीच्या पानावर

परीप्पूवडा आणि शहाळ्याचं लुसलुशीत खोबरं विकणारे विक्रेते... शिवाय फटाफट बुचं उडणाऱ्या कोल्ड्रिंकच्या बाटल्या. कोकाकोला, फॅन्टा, रोझमिल्क.

हातापायाला मळक्या चिंध्या बांधलेला एक महारोगी भिकेसाठी हात पुढं करून प्लायमाऊथच्या खिडकीसमोर उभा राहिला.

'त्याच्या जखमेतून वाहणारं रक्त बघ, कसं गोळीबंद पाऱ्यासारखं चमकतंय! – अम्मू बोलून गेली.

'अभिनंदन!' चाको हसला. 'अगदी खऱ्याखुऱ्या कर्मठ बुर्ज्वा माणसासारखं बोललीस!'

अम्मू मनापासून हसली. मग दोघांनी अगदी सहजच हात मिळवले. जणू स्वत: शेतमजूर नसलेल्या पण भांडवलशहा होण्याचीदेखील पात्रता, हिंमत नसलेल्या नपुंसक बुर्ज्वा संस्कृतीला जागून स्वत:मधल्या छुप्या स्वार्थसाधू मध्यमवर्गाचा प्रत्यय दाखवल्याबद्दल अम्मूच्या अभिनंदनाचा साग्रसंगीत सोहळाच चालला होता.

अशा क्षणांचं राहेल आणि इस्थाला फार अपूरप. एखाद्या अर्धवट माळेत जमवून-जमवून मणी ओवत राहावं, तशा अपूर्वाईनं असे दुर्मीळ क्षण ती दोघं टिपत राहत.

दलदलीतून उगवलेल्या छोट्या-छोट्या रानफुलांसारख्या मळकट पोरांचा एक जथ्था गाडीच्या मागे जमला होता. त्यांची मजा बघण्यासाठी म्हणून राहेल आणि इस्थानं खिडकीच्या काचेला नाकं लावली; पण अम्मूनं त्यांना जोरात मागं खेचलं. म्हणाली, 'गप्प बसा.'

तोवर चाकोनं आरामात एक चारमिनार शिलगावली होती. त्याने एक दीर्घ झुरका घेतला आणि मग जिभेच्या टोकावर जमलेले तंबाखूचे कण तुच्छतेनं थुंकून टाकले.

प्लायमाऊथच्या आत प्रचंड उकडत होतं. दोन्ही मुलांच्या मध्ये बेबी कोचम्माच्या अस्ताव्यस्त शरीराचा डोंगर, त्यामुळं राहेल आणि इस्था एकमेकांना दिसतच नव्हते. दोघांच्या भांडणाची कटकट नको, म्हणून अम्मूनं मुद्दामच दोघांना दोन बाजूला बसवलं होतं. दोघांची लढाई जुंपली, की इस्था राहेलला 'कुठल्यातरी फालतू ठिकाणाहून उडत आलेला निर्बुद्ध किडा' म्हणून चिडवायचा. राहेल काही कमी नव्हती. ती कंबरेला विचित्र हिसके देत नाचायला लागायची आणि नाचता-नाचता 'एल्व्हिस पेंल्व्हिस'चा गजर सुरू झाला, की इस्था भडकलाच. हे एक वेळ ठीक, पण दोघांची गुद्दागुद्दी सुरू झाली की घरातली एक वस्तू धड जाग्यावर राहत नसे. टेबललॅम्प, काचेचे अॅश ट्रे, पाण्याचे जग... जे हाताशी लागेल, ते फेकून देत, तोडफोड करीत दोघांमध्ये नुसतं तुंबळ युद्ध.

समोरची सीट हातानं घट्ट पकडून मधल्या खाचेत काहीशी ओणवून बेबी कोचम्मानं जेमतेम आपलं भलंमोठं बूड कसंबसं टेकवलं होतं. गाडी चालू झाली, की तिच्या गुबगुबीत हातावरचे लोंबणाऱ्या चरबीचे गोळे वाऱ्यावर वाळत घातलेल्या ओलसर कपड्यांसारखे हिंदकळत. रेल्वे फाटकासमोर गाडी थांबल्यापासून या लोंबणाऱ्या मांसाचा एक

गुबगुबीत पडदाच तयार झाला होता, इस्था आणि राहेलच्या मध्ये.

इस्था ज्या बाजूला बसला होता, त्या खिडकीबाहेर चहाच्या एका टपरीवर लोकांची गर्दी उसळली होती. माश्यांनी घोंघावणाऱ्या एका काचेच्या पेटीत ठेवलेली ग्लुकोजची फिकट बिस्किटंही इस्थाला स्पष्ट दिसली. निळ्या-निळ्या गोट्या लावून सगळी फसफस कोंडून ठेवलेल्या 'सोडावॉटर'च्या बाटल्याही हारीनं मांडल्या होत्या. शिवाय लाल रंगाची एक भलीमोठी बर्फाची पेटी, त्यावर दु:खीकष्टी चेहऱ्याच्या अक्षरात लिहिलं होतं, 'थिंग्ज गो बेटर विथ कोकाकोला... '

मुरलीधरन.

रेल्वे फाटकावर भटकणारा वेडा.

एखाद्या सिंहासनावर बसावं, तशा थाटात रस्त्याच्या कडेला उभारलेल्या मैलाच्या दगडावर तोल सावरून बसला होता.

दगडाच्या दोन बाजूंना लोंबणारे कमरेखालच्या मांसाचे दोन गोळे आणि मधोमध आक्रसलेलं काळंबेद्रं लिंग.

जणू दिशा दाखवणारा बाण असावा, तशा त्या लिंगाच्या बरोबर खाली लिहिलं होतं.

कोचिन.

मुरलीधरन संपूर्ण नागडाच होता. बड्या हॉटेलातले स्वयंपाकी टोपी घालतात, तशा रुबाबातली एक फाटकी प्लॅस्टिकची पिशवी फक्त त्याच्या डोक्यावर कुणीतरी लटकावून दिली होती. त्या धुरकट प्लॅस्टिकमधून आजूबाजूचं सगळं दिसत होतं. संथ. एकसारखं.

मुरलीधरनने कितीही ठरवलं असतं, की ही वेडीविद्री टोपी काढून टाकावी डोक्यावरून, तरी त्याला ते जमलंच नसतं. कारण त्याच्या नागड्या शरीराला मुळी हातच नव्हते.

१९४२साली घरातून पळालेला मुरलीधरन सिंगापूरला जाऊन 'आझाद हिंद सेनेत' दाखल झाला आणि जेमतेम आठवड्याभरातच एका धुमश्चक्रीत आपले दोन्ही हात गमावून बसला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यानं सर्वोच्च दर्जाच्या स्वातंत्र्यसैनिकांच्या यादीत स्वत:चं नाव नोंदवून घेतलं होतं. स्वतंत्र भारताच्या सरकारने त्याची ताबडतोब दखल घेतली आणि रेल्वेच्या अनिर्बंध प्रवासाचा 'फर्स्ट क्लास'चा फुकट पास त्याला आजन्म प्रदान केला. पुढं काळ लोटला, वर्षं उलटली, तसं त्याचं मन सांडत, हरवत गेलं आणि हरवलेल्या मनाच्या आगंमागं फर्स्ट क्लासचा तो पासही हरवून गेला. मग मात्र त्याला धावत्या रेल्वेमध्येही घर उरलं नाही. स्टेशनांवरच्या विश्रामकक्षांमध्येही डोकं टेकण्यापुरती जागा राहिली नाही. मुरलीधरनजवळ स्वत:चं घर नव्हतं. ज्याला कुलूप घालता येईल, असा एकही दरवाजा नव्हता... तरी जुन्यापान्या, कधीच्यातरी किल्ल्यांचा एक भलामोठा जुडगा मात्र त्याच्या नागड्या कमरेला सदैव लटकत असे.

वर्षानुवर्षं कडीकोयंडे ठोकून बंद केलेल्या कपाटांसारखंच झालं होतं त्याचं मन. घुसमटलेलं. कोंडलेलं आणि तरीही जगापासून लपवलेल्या कित्येक आनंदांनी खचाखच भरलेलं.

एक गजराचं घड्याळ... म्युझिकल हॉर्न असलेली एक लाल रंगाची रुबाबदार गाडी... अंगावर कुठंतरी एखादा हिरा लखलखणारी एखादी बायको... अत्यंत महत्त्वाच्या कागदपत्रांनी काठोकाठ भरलेली ब्रीफकेस... ऑफिसमधलं दिवसभराचं काम संपवून संध्याकाळी थकूनभागून घरी येणं... 'आय अॅम सॉरी, कर्नल सभापती, बट आय अॅम अफ्रेड... आय हॅव सेड माय से'... आणि मुलांसाठी खाऊ म्हणून केळयाचे कुरकुरीत वेफर्स.

मुरलीधरनच्या डोळयासमोरून कित्येक ट्रेन्स आल्या आणि गेल्या. तो कमरेच्या किल्ल्या मोजत राहिला.

कित्येक सत्ताधीशांचे, सरकारांचे उदय आणि अस्त त्यानं पाहिले. तो कमरेच्या किल्ल्या मोजत राहिला.

रेल्वेच्या बंद फाटकाच्या दोन्ही बाजूंनी उभ्या असलेल्या गाड्यांच्या खिडक्यांना नाकं लावून आशाळभूतासारख्या उभ्या असलेल्या चिल्ल्यापिल्ल्या पोरांच्या झुंडी... त्याच्या नजरेसमोरच जमत राहिल्या.

घरदार नसलेली, आईबापांचा पत्ता नसलेली, हजार रोगांनी लडबडलेली, सगळं भविष्य सापडण्याआधीच हरवून बसलेली, गटारातल्या डासांच्या झुंडीसारखी पोरं... तरीही मुरलीधरन शांत निर्विकारपणे फक्त किल्ल्याच चाचपत राहिला.

कोणतं कपाट कधी उघडावं लागेल आणि ते कोणत्या किल्लीनं उघडेल, कोण जाणे. त्याला काहीच नक्की सांगता येत नव्हतं. पडक्या घराच्या भकास खिडक्या असाव्यात; तशा शून्य नजरेनं, अंगभर कुठंकुठं उगवलेल्या केसांच्या घाणेरड्या जटा सावरत आणि ढुंगणाखालच्या तापलेल्या दगडाचे चटके सोसत मुरलीधरन नुसताच बसून राही. कधीकधी मनात असलं, तर दूर कुठंतरी नजर लावून बघत बसे. मोजण्यासाठी, चाचपण्यासाठी आपल्या कमरेला किल्ल्या आहेत, याचंच त्याला कोण सुख वाटे!

कधीमधी आकडे चालतील.

थोडासा बधिरपणा असेल, तर मस्तच.

किल्ल्या मोजायला सुरुवात केली की मुरलीधरन कधीमधी तोंड हलवायचा. मग त्यातून शब्दही उमटायचे. कधी अर्धकच्चे, कधी नीट ठाकूनठोकून तयार केल्यासारखे.

अून्नर...

रन्डर...

मून्नर... live to live

इस्था डोळे ताणून मुरलीधरनच्या अवताराकडं बघत होता. त्याच्या डोक्यावरचे केस

पांढरट, भुरकट, भुरकुल झालेले... वाऱ्यानं इकडेतिकडे उडणारे काखेतले पुंजके काळपट, गोलगोल कुरळे झालेले... आणि त्याच्या दोन मांड्यांच्या मध्ये उगवलेलं केसांचं जंगल मात्र काळंकाळं भोर... एकाच माणसाच्या अंगावर तीन ठिकाणी तीन रंगाचे केस असू शकतात, याचं इस्थाला जाम आश्चर्य वाटत होतं. ही काय भानगड आहे, त्याला काही कळेना आणि नक्की कुणाला याबद्दल विचारावं, तेही कळेना.

फाटक उघडण्याची वाट पाहण्याचा ताण छातीत भरून-भरून राहेलचा अगदी स्फोट व्हायला आला होता. तिनं मनगटावरच्या घड्याळाकडे नजर टाकली. दोन वाजायला दहा मिनिटं बाकी होती. राहेलला डोळ्यांसमोर एकमेकांच्या ओठात ओठ गुंतवलेले ज्युली अॅन्ड्रयूज आणि ख्रिस्तोफर प्लमर दिसू लागले. मधल्या दोन-दोन नाकांची टक्कर होऊ नये, म्हणून नाकाच्या इकडून आणि तिकडून एकमेकांचं घट्ट चुंबन घेणारे. चुंबन घेताना सगळ्यांचीच नाकं एकमेकांना टकरत असतील का? तसं होऊ नये, म्हणून सगळेच जण नाकाच्या इकडून आणि तिकडून चुंबन घेत असतील का? ही काय भानगड आहे, राहेलला कळेना. आणि नक्की कुणाला याबद्दल विचारावं, तेही कळेना.

पुष्कळ वेळानं पुष्कळ अंतरावरून एक लांबलचक पण अंधूकशी शीळ वाऱ्यावरून भिरभिरत आली आणि रेल्वे फाटकाच्या दोन्ही बाजूंना अडकून पडलेल्या लांबलचक गाड्यांच्या वैतागलेल्या रांगांना तिनं आपल्या कवेत घेतलं. पाय मोकळे करीत इकडेतिकडे हिंडणारे ड्रायव्हर्स झटपट आपापल्या गाड्यांमध्ये जाऊन बसले आणि त्यांनी फटाफट दारं बंद करून टाकली. हात पुढे करून अजिजी करणारे भिकारी आणि चौफेर कलकलाट करून डोकं उठवणारे विक्रेतेही क्षणभरात अदृश्य झाले. दोन-चार मिनिटांत सगळा रस्ता एकदम मोकळा-मोकळा दिसायला लागला. मुरलीधरन फक्त होता, एकटाच उरलेला. उन्हात तापलेल्या मैलाच्या दगडावर मस्त आपल्याच तंद्रीत बसलेला. एवढ्या सगळ्या धावपळीचा त्याच्यावर शून्य परिणाम होता. भुरकट डोळ्यांत कणभर उत्सुकता उगवली, तेवढीच.

तेवढ्यात सगळीकडे एकच गदारोळ सुरू झाला. पोलिसांच्या कर्कश शिट्ट्यांचे आवाज घुमू लागले.

फाटक उघडण्याची वाट पाहत थांबलेल्या लांबलचक रांगेच्या मागून त्याच रांगेला समांतर अशी एक माणसांची रांग भलत्याच वेगानं पुढेपुढे घुसत होती. प्रत्येकाच्या हातात लालभडक रंगाच्या बावट्यांची फडकी, दातओठ खाऊन रंगवलेले फलक आणि तोंडी कसल्याशा आरोळ्या. रांग जवळ येऊ लागली, तसा त्या आरोळ्यांचा आवाज वाढत राहिला. वाढत, वाढतच राहिला.

‘खिडक्यांच्या काचा लावून घ्या... ताबडतोब’ चाकोनं हुकूम सोडला, म्हणाला, ‘शांत बसून राहा चुपचाप. कम्युनिस्टांचा मोर्चा आहे. ते आपल्याला काही करणार नाहीत. घाबरू नका उगीच.’

‘तू का जात नाहीस त्यांच्यात, कॉम्रेड?’ अम्मूनं खोचून विचारलं, ‘वाटत असेल, तर जा तू. मी चालवीन गाडी.’

चाको काही बोलला नाही. त्याच्या घशात काहीतरी गोळा झालं होतं. अचानकच. घसाच बंद व्हावा एकदम, तसं. त्यानं अर्धवट जळलेली हातातली सिगारेट चुरडून फेकली आणि खिडकीची काच ओढून घेतली. चाको स्वयंघोषित मार्क्सवादी कम्युनिस्ट होता. तो फॅक्टरीतल्या देखण्या, टंच बायकांना नेहमी आपल्या खोलीत बोलवायचा आणि कामगारांचे हक्क, संघटनाचा कायदा असल्या विषयांवर बौद्धिक घेण्याच्या निमित्तानं बंद दाराआड त्या बायकांशी भरपूर चाळे करायचा. तो त्या बायकांना ‘कॉम्रेड’ म्हणून हाका मारी आणि त्यांनी पण आपल्याला ‘कॉम्रेड’च म्हणावं, अशी लाडिक सक्ती करी. त्यानं ही ‘कॉम्रेड’ची भानगड काढली, की त्या कामगार बायका एकमेकींकडे बघून खुदुखुदु हसत. त्याहून कहर म्हणजे, या बायकांना तो आपल्यासमोर टेबलावर बसून चहा प्यायला लावी. ही ‘कम्युनिस्ट समानता’ निभावता-निभावता हैराण होणाऱ्या त्या कामगार बायकांना सतत माम्माचीच्या रागाची भीती वाटत असे.

एकदा तर चाको फॅक्टरीतल्या बायकांना घेऊन कामगार संघटनेच्या एका ‘बौद्धिक वर्गाला’ उपस्थित राहण्यासाठी थेट अलेप्पीला गेला होता. सगळे जण बसने अलेप्पीला गेले आणि फेरीबोटीतून परत आले. दिवसभराची सहल झाल्यामुळे परत येताना सगळ्या बायका जाम खूश होत्या. अलेप्पीच्या बाजारात त्यांनी हातहातभर काचेच्या बांगड्या भरल्या होत्या. केसात भरपूर फुलं माळली होती.

अम्मूला हा सगळा पाचकळपणा वाटे. श्रीमंताघरच्या वाया गेलेल्या, बहकलेल्या पोरांनी ‘कॉम्रेड... कॉम्रेड’ खेळावं, तसा. बालिश. तद्दन मूर्खपणाचा. जुन्या काळातल्या ऐय्याशी जमीनदारांचा नवा ‘ऑक्सफर्ड’ अवतार. ज्यांना दोन वेळच्या अन्नाची भ्रांत आहे, अशा रोजीरोटीसाठी आपल्यावर अवलंबून असलेल्या कामगारांना बौद्धिक डोस पाजणारा पढतमूर्ख.

मोर्चेकरी मंडळी जवळ यायला लागली, तशी अम्मूनं खिडकीची काच ओढून घेतली. मग इस्था आणि राहेलनंही आपापल्या बाजूच्या काचा लावून टाकल्या (काचा वर सरकवता-सरकवता सगळेच हैराण झाले, कारण हँडलवरच्या काळ्या मुठी गळूनच पडल्या होत्या कधीच्या.).

त्या चिंचोळ्या रस्त्यावर कशीबशी अंग चोरून उभी असलेली ती प्लायमाऊथ अचानक भव्यदिव्य, श्रीमंत दिसायला लागली. एखाद्या चिंचोळ्या व्हरांड्यातून स्वत:चं

शरीर कसंबसं सावरत चालणाऱ्या एखाद्या गोलगरगरीत बाईसारखी. ब्रेड आणि वाईन आणण्याकरता बाहेर पडलेली बेबी कोचम्मा मध्येच चर्चमध्ये शिरली, की अशीच दिसे.

जोरजोरानं घोषणा देणाऱ्या मोर्च्यातली आघाडीची तुकडी गाडीजवळ पोचली, तसं बेबी कोचम्माला कापरं भरलं.

'खाली बघा सगळ्यांनी'... ती एकाएकी किंचाळली, नजरेला नजर भिडवू नका मुळीच. असं केलं, की कम्युनिस्टांना भारी चेव चढतो.'

तिच्या गळ्याच्या एका बाजूची शीर अचानक तटतटून फुगली.

काही क्षणांतच वारूळ फुटून मुंग्या भुळभुळाव्यात, तसे संतप्त माणसांचे जथ्थेच्या जथ्थे रस्त्यावर अवतरले. माणसांच्या फेसाळल्या नदीतली तरंगती बेटंच नुसती. लालभडक बावट्यांच्या संतापाने हवेत प्रचंड आग उठली. बावट्यांच्या लाटा खाली बसत होत्या... पुन्हा वर उसळत होत्या. रेल्वेचं फाटक बंद करणाऱ्या लोखंडी झडपांना न जुमानता मोर्च्यातले लोक त्याच्याखालून पलीकडे जात आणि परवानगी नसताना रूळ ओलांडून त्याही पलीकडे. ही ओलांडाओलांडी होईतो हातांतले बावटे खाली उतरवलेले. अडथळे संपले की पुन्हा वर आणि आणखी जोरजोरात घोषणांचा नुसता कहर.

हजारो माणसांच्या आरोळ्यांचा कलकलाट साचून राहिला हवेत आणि फाटकाच्या दोन्ही बाजूंना थांबलेल्यांच्या डोक्यावर आवाजाची एक भलीमोठी छत्रीच तयार झाली.

'इन्किलाब झिंदाबाद

थोझिलाली एकता झिंदाबाद!'

'क्रांतीचा विजय असो' सगळे जण घसा फोडून तेच-तेच म्हणत होते, 'जगातल्या कामगारांनो, एक व्हा!'

एक बंगाल सोडला, तर भारतात कुठेच फारशी रुजू न शकलेली ही डावी विचारसरणी फक्त केरळमध्येच इतकी कशी काय फोफावली, हे कोडं खुद्द चाकोलाही कधी सोडवता आलं नाही.

या प्रश्नावर उलटसुलट चर्चा मात्र बऱ्याच होत असत. कुणी म्हणायचं की केरळात ख्रिश्चनांची वस्ती एकूणात जास्त आहे, म्हणून लाल रंगाचं एवढं आकर्षण. केरळमधले जवळपास वीस टक्के लोक सीरिअन ख्रिश्चन. प्रभू येशूच्या बारा अनुयायांपैकी एक असणारा सेंट थॉमस हा ख्रिश्चन धर्मप्रसारक प्रभूच्या पुनरुत्थानानंतर प्रवास करत-करत पूर्वेकडे आला, तेव्हा त्याने केरळमधल्या शंभर ब्राह्मणांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिली. त्या शंभर ब्राह्मणांचे आपण वंशज आहोत, अशी केरळमधल्या सीरिअन ख्रिश्चनांची धारणा होती. पुढे मग ख्रिश्चन धर्मतत्त्वांना पुष्कळसा जवळचा असणारा विचार म्हणून केरळमध्ये मार्क्सवाद अगदी सहज रुजत गेला, असा एक अर्धकच्चा युक्तिवादही सातत्यानं केला जाई. 'गॉड'ला उचला आणि तिथं 'मार्क्स'ला ठेवा. सैतानाच्या जागी वांझ बूर्झ्वा

मंडळींची प्रतिष्ठापना करा... स्वर्गाऐवजी वर्गविरहित समाजरचना आणा आणि चर्चच्या जागी राजकीय पक्ष, मार्ग तोच. उद्दिष्टं तीच! प्रवासाच्या अखेरीस भल्यामोठ्या बक्षिसाचं आमिष दाखवणारी अडथळ्यांची शर्यत! त्यांतल्यात्यांत हिंदू मनाला जरा जास्त तडजोडी कराव्या लागतील एवढंच, पण त्यानं असं विशेष काय बिघडणार?

या सगळ्या सोईस्कर तत्त्वज्ञानात फक्त एकच अडचणीचा मुद्दा होता. केरळमधले बहुतांश सीरिअन ख्रिश्चन हे जमीनदार होते. गाठीशी मजबूत पैसा असणारे (लोणच्याचे कारखाने चालवणारे) आणि सरंजामशाहीचा रुबाब हाडामांसात पक्केपणानं रुजलेले! त्यांच्यासाठी कम्युनिझम हे एक दु:स्वप्नच होतं. म्हणजे एक वेळ टाचा घासून मरण परवडलं; पण कम्युनिझमची भानगड नको, असं! ही सगळी मंडळी म्हणजे काँग्रेसची अखंड पाठीराखी. व्होटबँकच!

केरळात मार्क्सवाद्यांची एवढी मिजास का, याचं दुसरं संभाव्य उत्तर म्हणजे इतर राज्यांच्या तुलनेत केरळमध्ये पुष्कळच जास्त असलेलं साक्षरतेचं प्रमाण. ही शक्यता पुष्कळशी बरोबर असावी. केरळमधल्या कम्युनिस्ट चळवळीमुळंच इथल्या साक्षरता अभियानाला पुष्कळ प्रतिसाद मिळू शकला, हेही काही फारसं खोटं नव्हतं.

पण खरी गोम वेगळीच होती.

केरळमध्ये कम्युनिस्ट आले; ते वाजतगाजत, घोषणा देत नव्हे. त्यांनी अत्यंत दबक्या पावलांनी पण सावध कावेबाजपणानं या राज्यात प्रवेश केला. बुरखा मोठा आकर्षक, समाजसुधारणेचा. जातीपातींनी विभागलेल्या, अत्यंत कडव्या, कर्मठ समाजातल्या परांपरागत मूल्यव्यवस्थेला त्यांनी मुळीच धक्के वगैरे दिले नाहीत. वरून घट्टमुट्ट दिसणाऱ्या जातीपातींमधल्या दुफळ्या शोधून मार्क्सवादी बरोब्बर तिथं घुसले आणि वरून हल्ले करण्याऐवजी त्यांनी थेट आत घुसूनच आपलं काम सुरू केलं. प्रतिप्रश्न नाहीत, आव्हानं नाहीत. एकदम चिडीचूप शांतता आणि आतून काम. आपल्याला जे हवं आहे, ते बिनबोभाट रुजवून आणण्याचं. शिवाय त्यांनी सामाजिक-राजकीय क्रांतीचा एक 'कॉकटेल फॉर्म्युला'च तयार केला. पौर्वात्य मार्क्सवाद आणि कडवा हिंदुत्ववाद याचं एक मादक, कैफ आणणारं मिश्रण. शिवाय वरून चिमूटभर 'लोकशाही'ची फोडणी.

चाकोनं कम्युनिस्टांचं 'कार्ड' कधी गळ्यात बांधून घेतलं नाही. त्या अर्थानं तो पार्टीचा सभासद नव्हता; पण ऐन तरुण वयात तो मार्क्सवादाकडं खेचला गेला आणि पुढे सगळ्या बऱ्यावाईट काळात पार्टीचा कट्टर समर्थक राहिला.

१९५७ साली कम्युनिस्टांचा आनंदोत्सव साजरा झाला. तेव्हा चाको दिल्लीच्या विश्वविद्यालयात शिकत होता. कम्युनिस्टांनी केरळ विधानसभेच्या निवडणुका प्रचंड बहुमतानं जिंकल्या आणि राज्यात मंत्रीमंडळ बनवण्यासाठी खुद्द नेहरूंनी कम्युनिस्टांना पाचारण केलं, तेव्हाचा तो आनंदोत्सव. त्या काळात अत्युच्च ब्रह्मवर्गाचे क्रांतिकारक

प्रतिनिधी असलेले आणि स्वत:च्या 'भटजी'पणाची उपरणी खुलेआम मिरवत मार्क्सवादी कम्युनिस्टांचं नेतृत्व करणारे ई. एम. एस. नंबुद्रीपाद भलतेच फॉर्मात होते. कम्युनिस्ट ई. एम. एस.वर कम्युनिस्ट चाकोची मनापासून श्रद्धा. ई. एम. एस. नंबुद्रीपादांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आणि लोकशाही मार्गानं निवडून येऊन राज्यकारभाराची सूत्रं हातात घेतलेलं जगभरातलं पहिलं 'कम्युनिस्ट सरकार' अस्तित्वात आलं; पण तत्क्षणी ध्यानीमनी नसताना कम्युनिस्ट एकाएकी भलत्याच पेचात सापडले. त्यांना एकीकडे शासनयंत्रणा चालवायची होती, कायदा आणि सुव्यवस्थेचे रखवालदार म्हणून काम करायचं होतं, तर दुसरीकडे कम्युनिस्ट क्रांतीच्या ज्वाळा धगधगत ठेवण्याची, त्यासाठी सतत लोकांना चेतवण्याची जागतिक जबाबदारी पार पाडायची होती. कम्युनिस्टांच्या टीकाकारांना ही गंमत बघताना खूपच मजा यायला लागली. या भलत्याच गफलतीतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधण्यात नंबुद्रीपादांचा फारच वेळ जायला लागला. त्यांना त्यावर विचार करावा लागला. पुस्तकंपण लिहावी लागली. 'द पीसफुल ट्रान्झिशन टु कम्युनिझम' हा त्यांचा प्रबंध चाकोनं मोठ्या भक्तिभावानं वाचून काढला होता. रात्रंदिवस खर्च करून केलेल्या या वाचनातून त्याला जवळपास सगळी उत्तरंसुद्धा गवसली. कम्युनिस्टांच्या कट्टर समर्थकांना प्रश्न पडत नसतात, हे नाहीतरी त्याला ठाऊक होतंच. कॉम्रेड ई. एम. एस. नंबुद्रीपाद आपल्या कार्यकाळात जमिनींचं फेरवाटप कसं करणार, कायम पक्षपाताने वागणाऱ्या पोलीस-यंत्रणेला निष्प्रभ करण्यासाठी कोणते मार्ग वापरणार, परंपरागत आणि कालबाह्य न्यायव्यवस्था कशी उलथून पाडणार, हे सगळं त्या प्रबंधातून चाकोला समजलं. शिवाय 'केंद्रातल्या प्रतिगामी काँग्रेस सरकारचा हस्तक्षेप टाळण्यासाठी आपण कोणते उपाय योजणार,' तेदेखील नंबुद्रीपादांनी सांगून टाकलं होतं.

पण प्रत्यक्षात झालं भलतंच. शांततामय मार्गानं कम्युनिझमची प्राणप्रतिष्ठा करण्याचं स्वप्न जेमतेम वर्षभरातच भंगलं आणि स्वप्नातली ती शांततादेखील अदृश्य झाली.

भल्या सकाळी न्याहारीच्या टेबलावर रक्तरंजित वर्तमानपत्रं यायला लागली. जागतिक कीर्तीचे थोर कीटकशास्त्रज्ञ वडील, सदान्कदा वैचारिक वाद घालणाऱ्या आपल्या मार्क्सवादी मुलाला ठळक बातम्यांचे मथळे वाचून दाखवू लागले. हिंसक दंगली, उपासमार घडवणारे संप आणि पोलीस-अत्याचारांच्या भयानक घटनांनी कम्युनिस्ट केरळला हादरे द्यायला सुरुवात केली होती. स्वप्नातल्या 'कम्युनिस्ट शांतते'चे दिवसाउजेडी लचके तोडले जात होते.

'मग, काय म्हणतोय कार्ल मार्क्स?' – रोज सकाळीच हा घेता-घेता वर्तमानपत्र वाचणारे पाप्पाची चाकोला खोचून विचारत, 'या महामूर्ख विद्यार्थी संघटनांचं काय करायचं आता? 'आपल्याच' कम्युनिस्ट सरकारविरुद्ध 'कम्युनिस्ट बोंबाबोंब' करतात,

लेकाचे! या हरामखोर विद्यार्थी संघटनांचा नायनाट करून टाकायचा का आता? कम्युनिस्टांना एवीतेवी 'लोकांचंच' भलं करायचं ना? मग 'विद्यार्थी' कुठं 'लोकां'मध्ये मोडतात?'

या सगळ्या आगडोंबात केंद्रातल्या काँग्रेसवाल्यांनी चांगलं तेल ओतलं, केरळातल्या 'चर्च'नी काड्या ओढल्या आणि जेमतेम दोन वर्षांत 'कम्युनिस्ट केरळ'मध्ये प्रचंड अनागोंदी माजली. त्या दरम्यान बी.ए.ची पदवी घेऊन पुढच्या शिक्षणासाठी चाको ऑक्सफर्डला निघून गेला होता. बघता-बघता केरळ यादवीच्या उंबरठ्यावर उभं राहिलं. परिस्थितीचा अंदाज घेऊन नेहरूंनी कम्युनिस्टांचं सरकार तडकाफडकी बरखास्त करून टाकलं आणि केरळमध्ये निवडणुका जाहीर झाल्या. कम्युनिस्टांच्या पाठीवर पाय देत काँग्रेसवाले पुन्हा सत्तेवर आले.

पहिल्या-वहिल्या सत्तेची चव चाखल्यानंतर तब्बल दहा वर्षांनी १९६७ मध्ये कॉम्रेड ई. एम. एस. नंबुद्रीपादांचा पक्ष पुन्हा एकदा बऱ्यापैकी 'जागा' मिळवून निवडून आला; पण या वेळी सत्तेच्या ताटात दोन वाटे झाले होते. युतीचं सरकार अस्तित्वात आलं. एक 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' आणि दुसरी 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट) सी. पी. आय.' आणि सी. पी. आय. (एम.)

तोवर पाप्पाची मरून गेले होते. चाकोचं लग्न आणि घटस्फोटदेखील पार पडला होता. 'पॅराडाईज् पिकल्स'ला सात वर्षं उलटून गेली होती.

नव्या युती सरकारचा शपथविधी होत असताना मोसमी पावसानं पाठ फिरवल्यामुळे संपूर्ण केरळ भयानक दुष्काळाच्या तडाख्यात सापडलेलं. लोकांवर टाचा घासून मरण्याची वेळ आली होती. ज्यांनी निवडून दिलं, त्या मतदारांच्या पोटात उसळलेली जीवघेणी भूक मिटवणं एवढ्या एककलमी कार्यक्रमाचं भलंमोठं आव्हान कम्युनिस्टांसमोर उभं ठाकलं होतं.

दुसऱ्यांदा सत्तेवर आलेले नंबुद्रीपाद तोवर पुष्कळसे निळवले होते. शांततामय मार्गानं कम्युनिझमची प्रतिष्ठापना करण्याचं काम या वेळी त्यांनी अगदी शांतचित्तानं हाती घेतलं. गडबड नाही, आरडाओरडा आणि घाई तर मुळीच नाही; पण हा वेग जागतिक कम्युनिस्टांना परवडणारा नव्हता. त्यामुळे चीनमधले कम्युनिस्ट नंबुद्रीपादांवर भलतेच संतापले. नंबुद्रीपादांच्या एकूण ढिलेपणाबद्दल आणि 'राजकीय मंदबुद्धीबद्दल' त्यांना धारेदार धरण्यात आलं. उपासमारीनं तडफडणाऱ्या राज्यातल्या जनतेला मदत पुरवून तिला लाडावल्याबद्दल आणि जनतेमधल्या क्रांतीची धग विझवल्याबद्दल नंबुद्रीपादांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करून खडा जाब विचारण्यात आला.

मार्क्सवादी कम्युनिस्टांमधून नव्यानं जन्मलेल्या, दहशतवादाकडं जरा जास्त ओढ असलेल्या नक्षलवाद्यांना तोवर चीननं आपल्या पंखाखाली घ्यायला सुरुवात केली होती.

बंगालमधल्या नक्षलबारी या गावात त्यांनी सरकारविरुद्ध केलेल्या सशस्त्र उठावानं भलतीच खळबळ उडाली. नक्षलवाद्यांनी गावातल्या गरीब शेतमजुरांना एकत्र करून त्यांच्या सशस्त्र, लढाऊ टोळ्या बांधल्या, सरंजामशाहीनं पोसलेल्या परंपरागत जमीनदारांना हुसकावून देऊन त्यांच्या जमिनी बळकावल्या आणि गरीब शेतमजुरांचं रक्त शोषणाऱ्या भांडवलशाहांना अद्दल घडवण्यासाठी लोकांच्या चावड्या उभारल्या. बघता-बघता नक्षलवादाचं लोण देशभर पसरलं आणि धड कुठलीच बाजू न पत्करता, मध्येच लोंबकळत राहून स्वार्थ साधू पाहाणाऱ्या बूर्झ्वा मंडळींच्या पोटात भीतीचा गोळा उठला.

केरळमध्ये तर दहशतीने भारलेल्या एका विचित्र उत्साहाची लाटच सरपटत पसरली होती. उत्तरेकडे खूनखराबा सुरू झाला होता. दिव्याच्या खांबाला लटकावून मुंडकं छाटलेल्या पालघाटमधल्या एका जमीनदाराचा रक्तमांसानं माखलेला फोटो देशभरातल्या वर्तमानपत्रांनी पहिल्या पानावर छापला होता. खांबावर लटकणारं धड आणि शेजारीच रक्ताचा तवंग साचलेल्या एका छोट्या डबक्यात छाटलेलं मुंडकं पडलेलं. भोवती घोंघावणाऱ्या माश्यांचे थवे... त्या डबक्यात आधी पाणी होतं आणि त्यावर रक्ताचे शिंतोडे उडालेले... की रक्ताच्या लालभडक लोटांनीच भरलं होतं ते डबकं? सांगता येणं कठीण अशी परिस्थिती होती. भल्या पहाटेच्या अंधूक प्रकाशात खरं काय ते कसं दिसणार?

त्या छाटलेल्या मुंडक्यावरचे दोन लालभडक डोळे मात्र तसेच होते. टक्क उघडे.

कॉम्रेड ई. एम. एस. नंबुद्रीपादांनी झाडून सगळ्या नक्षलवाद्यांची आपल्या पक्षातून हकालपट्टी केली आणि आपला सगळा कम्युनिस्ट क्रोध केवळ राजकीय कामांना जुंपला. त्यांना वाट्टेल ते करून आधी आपलं कम्युनिस्ट बूड स्थिर करायचं होतं. 'सोव्हिएत रशियाच्या हातांतलं बाहुलं. त्यांच्या ताटाखालचं मांजर' अशी हरतऱ्हेने हेटाळणी झाली, तरी त्यांनी तिकडं लक्ष म्हणून दिलं नाही.

डिसेंबर महिन्यातल्या प्रसन्न निळ्या दिवशी निळ्या प्लायमाऊथभोवती घेरून आलेला कम्युनिस्टांचा मोर्चा म्हणजे नंबुद्रीपादांच्या याच कार्यपद्धतीचा एक अपरिहार्य परिणाम होता. 'त्रावणकोर कोचिन मार्क्सिस्ट लेबर युनियन'चे नेते आपल्या समर्थकांचा भलामोठा मोर्चा घेऊन खुद्द नंबुद्रीपादांना आपल्या मागण्यांचं निवेदन देण्यासाठी सचिवालयाच्या दिशेनं निघाले होते. एकजात सगळ्या वादकांनी मिळून वाद्यवृंदाच्या संचालकालाच विनंतीवजा आदेश देऊन शहाणपण शिकवण्यासारखं होतं ते. मोर्चेकऱ्यांकडे विनंती-अर्ज होते आणि साध्यासुध्या मागण्यांची भलीमोठी यादी. सकाळी सात वाजल्यापासून संध्याकाळी साडेसहा वाजेपर्यंत तब्बल साडेअकरा तास भाताच्या शेतांत सलग काम करणाऱ्या शेतमजुरांना दुपारी तासभर जेवणाची सुट्टी मिळावी, स्त्री-

मजुरांना दर दिवशी 'एक रुपया पंचवीस पैसे' ऐवजी 'तीन रुपये' मजुरी मिळावी. पुरुष मजुरांना 'दोन रुपये पन्नास पैशां'ऐवजी 'चार रुपये पन्नास पैसे' देण्यात यावेत, या मुख्य मागण्या होत्या. त्याशिवाय 'अस्पृश्य लोकांना यापुढे त्यांच्या जातीच्या नावानं संबोधून हिणवलं जाऊ नये,' असाही मोर्चेकऱ्यांचा आग्रह होता. अच्छु पारायार किंवा केलन परावार किंवा कुट्टन पुलियार अश जातिवाचक हाका मारण्यापेक्षा अच्छु किंवा केलन किंवा कुट्टन एवढंच फक्त म्हटलं जावं, अशी सर्वांची मागणी होती.

मोर्चेकऱ्यांनी फारच जोरजोरात आरडाओरडा केला. वेलची सम्राट. कॉफी किंग आणि रबराच्या बागांच्या ऐश्वर्याने फुगलेली जहागीरदार मंडळी गावाबाहेरच्या आलिशान फार्म हाऊसमधून बाहेर आली. मोर्च्यातल्या कर्कश घोषणांनी सुकलेले घसे ओले करण्यासाठी थंडगार बिअरने फसफसणारे ग्लास सगळ्यांनी ओठांना भिडवले आणि 'सेलिंग क्लब'मध्ये मस्त पार्टी झाली. 'आपल्याला कशाची म्हणून पर्वा करण्याची गरज नाही,' असा दिलासा परस्परांना देता-देता पोटात उठणाऱ्या भीतीच्या कळा जो तो मोठ्या मुश्कीलीनं दाबून ठेवत होता.

मोर्च्यामध्ये कम्युनिस्ट कार्यकर्त्यांबरोबरच विद्यार्थी आणि कामगारसुद्धा होते, स्पृश्यांबरोबर अस्पृश्यही होते. इतकी वर्षं बोचक्यात गुंडाळून, दाबून ठेवलेल्या संतापाचा नव्यानं उडालेला भडका मस्तकात साठवूनच जो तो मोर्च्यामधून चालत होता. राग नवीन होताच. शिवाय त्याला धगधगत्या नक्षलवादाची छुपी धारही चढली होती.

गाडीच्या खिडकीवर चढवलेल्या काचेमधून बाहेरचं सगळं दिसत होतं, ऐकूही येत होतं. अनेकानेक घोषणांच्या गदारोळात फक्त 'झिंदाबाद' हा एकच शब्द जास्त जोरजोरात ओरडला जातो, हे राहेलच्या लक्षात आलं होतं. मोर्च्यातल्या लोकांनी 'झिंदाबाद' म्हटलं, की त्यांच्या गळ्यावरची शीर रटरटून फुगते, हेसुद्धा राहेलनं तेवढ्यातल्या तेवढ्यात बघून घेतलं. लाल बावटे उंचावणारे आणि घोषणांचे फलक फडकावणारे सगळेच हात जरा जास्तच कडक दिसतात, हेही तिच्या लक्षात आलं होतं.

गाडीत कोंडलेली हवा तापू लागली, तसे सगळे हैराण झाले. एखादा भिजलेला, दमट चिकट चिरूट असावा, तशी बेबी कोचम्मानं आपल्या मनातल्या भीतीची गुंडाळी केली आणि गाडीच्या तळात, अगदी खोल पायांशी लपवून टाकली. हा तर नुसता प्रारंभ होता. तिचं अख्खं आयुष्य ग्रासून टाकणाऱ्या दहशतीच्या चक्राचा! त्याच दहशतीच्या अमलाखाली धडपडणाऱ्या, आक्रसलेल्या बेबी कोचम्मानं पुढे दारं-खिडक्या लावून घरात दिवाभीतासारखं जगायला सुरुवात केली. त्या भीतीमधूनच तिचा जबडा खाली ओघळून लोंबू लागला. भेदरलेल्या कपाळावरचा भांग खेचला गेला आणि केसांच्याही पुढं

धावलेल्या एका काळसर वळणाचा व्रण उमटला. ही भीती कधीची रुजली होती बेबी कोचम्माच्या मनात. मुरली होती पक्की आणि पसरत गेला होती सार्‍या शरीरभर... आपलं सगळं कुणीतरी हिरावून घेईल आणि हुसकावून देईल... विल्हेवाट लागेल आपल्या अस्तित्वाची... याची भीती. थरकापच!

बेबी कोचम्मानं हातातल्या जपमाळेची चाळवाचाळव केली... त्यातले हिरवे मणी मोजायचा प्रयत्न करून पाहिला; पण तिचं कशातच लक्ष लागेना. तेवढ्यात मुठी वळवून घोषणा देणारा एक हात बाहेरून फाटकन प्लायमाऊथच्या खिडकीवर येऊन आदळला.

बघता-बघता प्लायमाऊथच्या बॉनेटवर तडाखे देणार्‍या असंख्य मुठींचं तांडवनृत्यच सुरू झालं. त्या जोरदार धक्क्यांनी स्प्रिंग उडावी, तसं धाडकन बॉनेट उघडलं आणि आ वासून उभी राहिलेली ती भलीमोठी गाडी प्राणिसंग्रहालयातल्या भुकेल्या निळ्या जनावरासारखी दिसू लागली... 'काहीतरी खायला द्या' म्हणून जबडा उघडून उभं राहिलेलं निळं जनावर.

खायला द्या काहीतरी.

एखादा बनपाव.

किंवा निदान एखादं केळं.

– मोर्च्यात वळून-वळून दुखणार्‍या मुठी पुन्हा एकदा त्या उघड्या बॉनेटवर तुटून पडल्या आणि प्लायमाऊथचं तोंड जसं उघडलं, तसं फाटकन बंदही झालं.

– तेवढ्यात चाकोनं आपल्या खिडकीची काच खाली केली आणि उघडलेलं बॉनेट बंद करण्यात पुढाकार घेणार्‍या माणसाचे आभार मानीत तो म्हणाला,

'थँक्स, कॉम्रेड!... धन्यवाद. वेलारे थँक्स!'

'त्याला इतकं लोणी लावण्याची काही गरज नाहीये, कॉम्रेड' – अम्मू वैतागली. 'सहज म्हणून त्याचा हात लागला बॉनेटला. तो काही मुद्दाम नव्हता धावला मदत करायला. 'या बंद जुनाट गाडीत तितकाच जुनाट मार्क्सवादी कम्युनिस्ट माणूस बसलाय' हे कसं कळणार त्याला? उगीच गोड गैरसमज करून घेऊ नकोस. कळलं?'

'अम्मू, तू कृपा करून जरा गप्प बसशील?' – चाको वैतागून म्हणाला, 'प्रत्येक गोष्टीकडे अशा तिरक्याच नजरेनं बघण्याचा हा तुझा कुजकट, घाणेरडा चक्रमपणा थांबवायला काय घेशील? इतकं खोचून कशाला बोलतेस दर वेळी?'

पाणी भरून-भरून स्पंज टम्म फुगावा, तशी शांतता गाडीत कोंडून राहिली. लोण्याच्या गोळ्यात अलगद लखलखती सुरी घुसावी, तसे चाकोचे शब्द खोलवर घुसत, रुतत गेले. एका कुटुंबात असण्याचा हाच तर त्रास असतो. एकमेकांवर जळणार्‍या डॉक्टरांना जशी एकमेकांची अंडीपिल्ली ठाऊक असतात, तसंच हे. कुणाची कुठली नस दाबली म्हणजे कळ उठेल, हे जाणून असतो प्रत्येक जण. अगदी चाकोसुद्धा.

– तेवढ्यात राहेलची नजर एका ओळखीच्या चेहऱ्याकडं गेली... वेलुथा... तोच. नक्की ! वेलय्या पाप्पेनचा मुलगा. राहेलचा अगदी खास जवळचा मित्र. हातात लाल बावटा घेऊन वेलुथा मोर्च्यातून चालला होता. पांढरा स्वच्छ शर्ट आणि कमरेभोवती मुंडू. त्याच्याही गळ्यावरची ती शीर तटतटून फुगली होती. खरं म्हणजे, वेलुथा कधी शर्ट घालत नसे. पण मग आज? क्षणार्धात राहेलने आपल्या बाजूच्या खिडकीची काच खाली केली आणि ती जीव एकवटून ओरडली,

'वेलुथाऽऽ वेलुथाऽऽ'

– तो क्षणभर थांबला आणि लगेच काही घडलंच नाही, अशा भावनेनं मोर्च्यात मिसळून गेला. इतक्या अनोळखी भागात एकदम ओळखीचा आवाज कुठूनतरी कानी आल्याचा भास त्याला झाला; पण भासच. त्यानं लगेच पुढचं पाऊल उचललं आणि बघता-बघता तो दिसेनासा झाला.

काय करावं, राहेलला कळेना. गाडीच्या मागच्या सीटवर उभी राहून उघड्या खिडकीतून बाहेर लोंबकळत, लोंबकळत ती हाका मारत राहिली. पिवळ्या फ्रेममधला लालभडक प्लॅस्टिकचा तिचा गॉगल आणि 'लव्ह इन टोकियो'मध्ये बांधलेली केसांची दोन कारंजी गाडीबाहेर डोकावत होती.

'वेलुथाऽऽऽ इकडं बघऽऽ वेलुथाऽऽ' – आता तिच्याही गळ्याची शीर तटतटून फुगली होती.

एका बाजूनं चालणारा वेलुथा परत एकदा ओझरता दिसला आणि त्याच्या चहूबाजूला उसळलेल्या संतापाच्या समुद्रात बुडून गेला.

हा आरडाओरडा ऐकून संतापलेली अम्मू गर्रकन् वळली आणि रागाच्या भरात तिनं राहेलच्या कुल्ल्यांवर एक सणसणीत चापटी ओढली. वेलुथाला हाका मारता-मारता खिडकीतून बाहेर ओणवलेल्या राहेलचे कुल्ले आणि पायच तेवढे गाडीत उरले होते. कुल्ल्यांवर लेसची चड्डी आणि पायांत बाटाचे सँडल्स.

'गप्प बैस. कशाला किंचाळतेयस?' – अम्मू जोरानं करवादली.

बेबी कोचम्मानं राहेलला खसकन् खाली ओढलं; तशी धपकन् ती सीटवर बसलीच एकदम. हे काय चाललंय, राहेलला कळेना.

'तो वेलुथा होता... माहित्येय?' – तिनं हसऱ्या चेहऱ्यानं गाडीतल्या कुटुंबीयांना माहिती पुरवली, 'वेलुथा हातात बावटा घेऊन मोर्च्यातून चालला होता. मी बघितलं त्याला. हाकासुद्धा मारल्या.'

– वेलुथाच्या हातातला लाल बावटा बघून राहेल भलतीच खूश झाली होती. त्या बावट्याचं फारच अप्रूप वाटत होतं तिला. लाल बावटा म्हणजे काहीतरी खास महत्त्वाची गोष्ट असणार, एवढं कळलं होतं आणि त्या बावटेवाल्या माणसांमध्ये आपला एक

मित्रसुद्धा आहे, याचा अभिमानही वाटत होता.

'मूर्ख मुलगी आहेस अगदी. अक्कलशून्य कार्टी'– अम्मूचा राग अजून जिवंत असावा.

तिचा अवतार बघून घाबरलेली राहेल सीटला घट्ट चिकटून बसली. राहेलला काही कळेचना. अम्मू एकदम इतकी का रागावली? आपण असं काय चुकीचं केलं?

'पण तो तोच होता...' – तिनं चाचरत स्पष्टीकरण द्यायचा प्रयत्न केला.

'गप्प बस. एक शब्द बोलशील तर खबरदार. फोडून काढीन!' – अम्मू अजूनही धगधगतच होती.

अम्मूच्या कपाळावर घाम डबडबून आला होता. तिचा वरचा ओठ थरथरतोय आणि डोळे काहीतरी विचित्र झालेयत, एवढं राहेलला समजत होतं. ती नजर विस्फारून अम्मूकडं बघतच राहिली. अम्मूचे डोळे थेट तसेच दिसत होते – व्हिएन्नामध्ये काढलेल्या पाप्पाचींच्या फोटोतल्यासारखे (पाप्पाचींचा तो 'पतंग' रुजलाच होता त्यांच्या मुलांच्या रक्तात.) – बेबी कोचम्मानं न बोलता राहेलच्या खिडकीची काच वर चढवून टाकली.

पुष्कळ वर्षांनी एका रविवारी सकाळी राहेल ग्रॅन्ड सेन्ट्रलपासून ट्रेननं क्रॉटन हार्मनपर्यंत चालली होती. न्यूयॉर्कच्या हवेतली ती भुरभुरती सकाळ. ट्रेनमधल्या प्रवासात राहेलला अचानक 'ती नजर' भेटली. अम्मूच्या डोळ्यांत साकळून राहिलेली ती नजर !... पुस्तकाच्या पानावर उगीच इकडेतिकडे भरकटत राहिलेल्या प्रश्नचिन्हासारखी... ते चिन्ह कुठल्याही वाक्यापुढं लागू नये आणि काहीच कधीच पूर्ण होऊ नये, अशी अर्धवट.

गारढोण सागरगोट्या असाव्यात, तसे ते अम्मूचे डोळे. वरच्या ओठाच्या कडेनं चिकटलेला घामाचा पातळ चकाकता थर... आणि अचानक उफाळलेला, थंड झाला, तरी आतल्याआत धगधगणारा तो संताप.

– काय अर्थ होता या सगळ्याचा?

रविवारची सकाळ. त्यामुळं ट्रेन जवळजवळ रिकामीच होती. राहेलच्या पलीकडच्या रांगेत बसलेल्या खरबरीत गालांच्या एका मिशाळ बाईनं जोरजोराने खाकरून घशातला कफ बाहेर काढला. मांडीवर ठेवलेल्या गठ्ठ्यातून एक वर्तमानपत्र उचलून त्याचा कागद टरकावला आणि त्या कागदावर छातीमधल्या कफाचे चिकट गोळे साठवायला सुरुवात केली. त्या कफाच्या तिनं छोट्या पुड्या बांधल्या आणि कफ-विक्रीचा 'स्टॉल' मांडला, इतक्या तन्मयतेनं समोरच्या रिकाम्या बाकावर हारीनं मांडल्या. हे काम करता-करता ती स्वत:शीच अगदी हळुवार आवाजात काहीतरी कुजबुजत होती. खुशीत गाणं गुणगुणणंसुद्धा चालू होतं.

राहेलच्या मनात पुष्कळ वर्षांपूर्वीचं ते स्मरण पुन्हा परतून आलं. ट्रेनमधल्या त्या

बाईसारखंच. काहीसं वेडसर. भूतकाळाच्या काळयाकभिन्न फडताळात शिरून पुष्कळ शोधाशोध करावी... गाळून, चाळून, पारखून पाहावं आणि ध्यानीमनी नसलेली एखादी गोष्ट अचानक हाताशी गवसावी, तसं! क्षणभराचंच. मनाला स्पर्शून पुन्हा क्षणभरात लुप्त होणारं. धुराच्या वेटोळयाभोवती फिरणारा तो धुरकट, तिखट वास... गाडीच्या काचांवरून रपरप फिरणारा वायपर... गारढोण सागरगोट्यांसारखे आईचे तटस्थ, निश्चल डोळे... बुरख्याखाली झाकून ठेवलेल्या, विस्मरणाच्या बोचक्यात दडपून टाकलेल्या अंधाऱ्या प्रदेशांची गाठ अचानक सुटली आणि अचानक काहीसं हाताला लागलं. ते मात्र वेडसर नव्हतं, ट्रेनमधल्या त्या बाईसारखं.

तिच्याबरोबर प्रवास करणाऱ्या बाईच्या नजरेतली ती वेडसर झाक बघून राहेल काहीशी सुखावली. आता न्यूयॉर्कच्या त्या भ्रमिष्ट वेडसर गर्भात तिला स्वस्थ राहता येणार होतं. तिला झपाटून टाकणाऱ्या, मानेवर बसून सतत तिचा छळ मांडणाऱ्या बाकीच्या भयानक आठवणींपासून दूर... न्यूयॉर्कच्या गर्भात. जुन्या गोष्टींचा पिच्छा सुटणार होता कदाचित... बस-रेल्वेच्या गंजलेल्या धातूचा तो घाणेरडा आंबूस वास... तो चटकफटक आवाज... हातात पकडून-पकडून उबलेले, घाणेरडा वास मारणारे कंडक्टरचे हात... म्हाताऱ्या माणसाच्या तोंडाचं बोळकं हनुवटीवर वळवळणारा तरुण.

न्यूयॉर्कमधली ती ट्रेन पुढं धावत होती. बाहेर हडसन शहराच्या खाणाखुणा दिसू लागल्या. पानगळीच्या मोसमाच्या रक्तवर्णी खुणांनी झाडं वाकली होती. थंडी होती थोडीशी.

'बघितलंस, केवढा गारठा आहे हवेत' – म्हणत लाडात आलेल्या लॅरी मॅक्स्कॅलीननं राहेलच्या विरोधाला न जुमानता तिच्या टी-शर्टमध्ये पुढून हात खुपसले आणि गारठल्या हातांनी तिच्या उबदार, घट्ट स्तनाग्रांशी चाळे सुरू केले. राहेलच्या चेहऱ्यावर सुख का दिसत नाही, ती हसत का नाही, हे मात्र त्याला समजत नव्हतं.

राहेल आपल्याच विचारात बुडून गेली होती. घरची आठवण आली, म्हणजे नेहमी आपल्या डोळयांसमोर जीवघेणा अंधारच का उभा राहतो? पाण्यात भिजलेल्या होड्यांचं तेल पाजलेलं तुकतुकीत लाकूड, पितळी दिव्यामधून भसाभस उसळणाऱ्या रिकाम्या, वांझ ज्वाळांच्या लवलवत्या जिभा. हेच सगळं का दिसतं डोळयांसमोर?– तिला कसला अर्थच लागेना.

तो वेलुथाच होता.

राहेलला तेवढी खातरी होती. अगदी पक्की. घोषणा देणाऱ्या माणसांच्या त्या गर्दीत तिनं वेलुथाला पाहिलं होतं. त्यानंही राहेलला बघितलं होतं. नक्की. त्याचा चेहरा इतका परिचयाचा, की राहेल त्याला कधीही, कुठंही ओळखू शकली असती. वेलुथानं शर्ट नसता

घातला, तरीसुद्धा पाठीमागून राहेलनं त्याला ओळखलंच असतं. वेलुथाची पाठ राहेलला चांगली ठाऊक होती, ती त्याच्या पाठीवर बसून कितीतरी वेळा आयमेनेममधून भटक भटक भटकली होती. वेलुथाच्या पाठीवर वाळून गेलेल्या टोकदार पानाच्या आकाराची एक जन्मखूण होती. तो म्हणायचा, ते पान म्हणजे शुभचिन्ह आहे. त्यामुळं पाऊस वेळेवर येतो. वेलुथाच्या काळ्याभोर टणक पाठीवरचं हलक्या तपकिरी रंगाचं ते पान.

शुभचिन्ह असलं, तरी तितकंसं 'शुभ' ठरलं मात्र नाही.

वेलुथा उत्तम सुतारकाम करायचा; पण त्यानं असलं काहीतरी करावं हे गावात मान्य होण्यासारखं नव्हतं.

वेलुथा रंगानं काळाभोर. म्हणून त्याचं नाव ठेवलं वेलुथा. वेलुथा म्हणजे मल्याळममध्ये स्वच्छ पांढरा. त्याचा बाप वेल्लय्या पाप्पेन हा जातीने पारायार. ताडाची पानं गोळा करून पोट भरणारा. त्याचा एक डोळा काचेचा होता. एकदा कधीतरी छिन्नी-हातोड्यानं ग्रॅनाईटच्या दगडाला आकार देत असताना अचानक एक धारदार कपची उडाली आणि डोळ्यात घुसली. डाव्या डोळ्यातल्या सगळ्या पेशी, रक्तवाहिन्या फाटून अक्षरश: चेंदामेंदा झाला.

वेलुथा लहान होता, तेव्हा आपल्या बापाबरोबर 'आयमेनेम हाऊस'मध्ये यायचा; पण मागच्या दारानं. परसातल्या नारळाच्या झाडांवरून पाडलेले नारळ आणून घालण्यासाठी वेल्लय्या आणि वेलुथा येत. पारायार लोकांनी घराच्या उंबरठ्यातून आत प्रवेश करायचा नाही, अशी पाप्पाचींची सक्त ताकीद होती. तो नियम मोडण्याची पारायारांची हिंमत नसे. हिंदू असोत किंवा ख्रिश्चन, बड्या धर्मातले स्पृश्य लोक ज्याला-ज्याला म्हणून शिवतात, अशा एकाही गोष्टीला स्पर्श करण्याची परवानगी पारायारांना नव्हती. इस्था आणि राहेलशी बोलताना माम्माची तिच्या लहानपणच्या आठवणी सांगायची. त्या तर याहून भयानक होत्या. माम्माची अगदी छोटी मुलगी होती, तेव्हा तर पारायारांना हातात झाडू घेऊन रस्त्यावरून जवळपास सरपटतच चालावं लागे. तेही पुढून मागं चालायचं. आणि चालता-चालता रस्त्यावर उमटलेले पावलांचे ठसे हातातल्या झाडूनं पुसत-पुसत जायचं. रस्त्यानं जाणाऱ्या एखाद्या हिंदू किंवा सीरिअन ख्रिश्चन माणसाचा पाय चुकून पारायारांच्या पाऊलठशावर पडलाच, तर उगीच धर्म भ्रष्ट व्हायला नको; घाणेरडी अमंगळ शिवाशिव नको, म्हणून ही खबरदारी. माम्माचीच्या लहानपणी पारायारांना गर्दीच्या हमरस्त्यांवरून चालण्याची परवानगी नव्हती. कमरेपासून वरच्या शरीरावर फडका टाकणं निषिद्ध होतं आणि तळपत्या उन्हातही डोक्यावर छत्री घेण्याची परवानगी नव्हती. बोलतानासुद्धा त्यांनी आपल्या तोंडापुढे पालथा तळहात धरायचा. त्यांची थुंकी उडून किंवा त्यांच्या अस्पृश्य तोंडातून निघालेल्या अस्पृश्य शब्दांनी आजूबाजूची हवा विटाळली आणि समोरच्याचा धर्म बुडाला तर? –

म्हणून ही काळजी.

मलाबारमध्ये ब्रिटिश आले आणि परिस्थिती झपाट्यानं बदलली. पुष्कळसे पारायार, पारावार आणि पुलेयारांनी धर्मांतर करून ख्रिश्चन धर्म स्वीकारला आणि अस्पृश्यतेच्या दुष्टचक्रातून कायमची मुक्ती मिळवण्यासाठी अँग्लिकन चर्चशी नातं जोडलं. त्यात वेलुथाचा आजोबा – केलनसुद्धा होता. अस्पृश्यतेचा कलंक मिटवून टाकण्याच्या आश्वासनाबरोबर या मंडळींना आणखी प्रोत्साहन म्हणून थोडं-फार धान्य आणि पैसेही मिळाले. त्यांना सगळे जण तांदुळवारी ख्रिश्चन म्हणू लागले; पण धर्मांतरानंतरचा हा आनंदीआनंद फार काळ टिकलाच नाही. आपण आगीतून उठून फुफाट्यात येऊन पडलो आहोत, हे लवकरच सगळयांच्या लक्षात आलं. त्यांच्यासाठी वेगळी चर्चेस् बनवण्यात आली. तिथे स्वतंत्र प्रार्थना सुरू झाल्या आणि धर्मगुरूसुद्धा वेगळे नेमले गेले. ख्रिश्चन धर्मात प्रवेश करणाऱ्या या पूर्वाश्रमीच्या हिंदू-अस्पृश्यांना विशेष भेट म्हणून त्यांच्याकरता वेगळया पारायार बिशपचीही व्यवस्था झाली. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तर हे धर्मांतरित अस्पृश्य भलत्याच कोंडीत सापडले. मागासलेल्या जातिजमातींसाठी आरक्षित असलेल्या सरकारी नोकऱ्यांवर किंवा अत्यल्प व्याजदरात बँकांमधून मिळणाऱ्या कर्जावर त्यांना हक्क सांगता येईना. कारण कागदोपत्री नोंदीनुसार ते 'ख्रिश्चन' होते. जन्मानं त्यांना मिळालेली 'जात' धर्मांतर केल्याक्षणीच पुसली गेली होती. इतकी वर्षं रस्त्यावर उमटलेले स्वत:च्या पावलांचे अस्पृश्य ठसे हातातल्या झाडूनं पुसावे लागत... आता तर ती झाडूसुद्धा जवळ उरली नव्हती. पूर्वी ठसे पुसावे लागत, आता तर रस्त्यावर पाऊल ठेवण्याचीच चोरी झाली होती.

जागतिक कीर्तीच्या 'कीटकशास्त्रातून' सुटी घेऊन दिल्लीहून आयमेनेममध्ये आलेल्या माम्माचीनं सगळयात पहिल्यांदा वेलुथाच्या हातातली जादू ओळखली. वेलुथा तेव्हा अकरा वर्षांचा होता. म्हणजे अम्मूपेक्षा जेमतेम तीन वर्षांनी लहान. वेलुथाच्या हातातलं कसब एखाद्या जादूगाराला लाजवील असं होतं. तो अतिशय गुंतागुंतीच्या किचकट घडणीची लाकडी खेळणी बघता-बघता बनवायचा. छोटी पवनचक्की, खुळखुळे, सुकलेल्या वेताच्या काठीपासून बनवलेल्या नक्षीदार दागिन्यांच्या पेट्या... तो प्रचंड वृक्षाचे ओंडके कापून मोठमोठ्या होड्या बनवायचा आणि काजूचा छोटा गर कोरून, बघत राहावे अशा छोट्या मूर्तीसुद्धा! काजूचे गर कोरून एखादी वस्तू केली, की पालथ्या तळहातावर ठेवून वेलुथा अम्मूकडे धावत यायचा. हात ताठ करून त्यावर वस्तू ठेवली, म्हणजे आपल्याला स्पर्श न करता अम्मूला ती वरच्यावर घेता येईल, हे शहाणपण तो आपल्या आपणच शिकला होता. खरं म्हणजे वेलुथा अम्मूपेक्षा लहान; तरीही तो तिला गमतीनं अम्मूकुट्टी म्हणायचा... म्हणजे छोटीशी अम्मू. माम्माचीनं वेल्लय्याकडे आग्रह करून करून वेलुथाला अस्पृश्यांच्या शाळेत घालायला लावलं. माम्माचीचे सासरे – पुन्नयन कुंजू

यांनीच ती शाळा सुरू केली होती.

वेलुथा चौदा वर्षांचा असताना बावारियामधल्या कारागिरांच्या एका संघटनेच्यावतीने जोहान केलीन हा परदेशी सुतार कोट्टायमला आला. कोट्टायममधल्या ख्रिश्चन मिशन सोसायटीसाठी त्यानं तीन वर्षं काम केलं आणि आजूबाजूच्या गावांतल्या खेडूत, अर्धशिक्षित सुतारांसाठी कार्यशाळा घेतल्या. रोज दुपारी शाळा सुटल्यानंतर धावत-पळत बस पकडून वेलुथा कोट्टायमला जाई आणि संध्याकाळी अंधार पडेपर्यंत जोहानबरोबर काम करत राही. सोळावं लागलं, त्या दरम्यान वेलुथाचं हायस्कूलचं शिक्षण संपलं होतं आणि सुतारकामातही तो पारंगत झाला होता. त्यानं स्वत:ची हत्यारं घेतली. इतरांजवळ फक्त सुतारकामाच्या हत्यारांचा संच असे; वेलुथाजवळ मात्र जर्मन शिस्तीची अचूकता आणि हातात सफाईदार कौशल्य आलं होतं. त्यानं माम्माचीसाठी रोझवुड वापरून बारा खुर्च्या असलेलं एक भलंमोठं डायनिंग टेबल बनवलं. घोड्यांच्या बग्गीमध्ये असतात, तशा पारंपरिक धाटणीच्या बैठका करून दिल्या. दरवर्षी प्रभू येशूच्या जन्मदिनी बेबी कोचम्मा छोट्या मुलांची नाटकं बसवायची. त्यात काम करणाऱ्या मुलांच्या पाठीवर सहज बांधता येतील असे देवदूतांचे पंख, स्टेजवर लावण्यासाठी पुठ्ठा कोरून बनवलेले हलक्या वजनाचे देखणे ढग, प्रभू येशूच्या जन्माच्या प्रवेशासाठी घडी करून मिटता-उघडता येणारी गव्हाणी... असं काय काय वेलुथानं बनवून दिलं. कोचम्माच्या बागेत उभ्या केलेल्या संगमरवरी बाळांच्या कमरेखालून तलावात उडणारी लघवीची धार अचानक आटली; तेव्हा डॉ. वेलुथानंच त्या पुतळ्यांमध्ये नवा मूत्राशय बसवला. सुतारकामातल्या कौशल्याबरोबरच लहान-मोठ्या यंत्रांशीही दोन हात करण्याचं कसब वेलुथा सरावानं शिकला होता. 'वेलुथा इतक्या खालच्या जातीत जन्मला नसता, तर पुष्कळ शिकून इंजिनिअर झाला असता, आपल्या हुशारीच्या जोरावर त्यानं नाव काढलं असतं,' असं हळहळत्या 'उच्चभ्रू' स्वरात माम्माची नेहमी म्हणत असे. वेलुथा रेडिओ दुरुस्त करायचा. शिवाय घड्याळं, पाण्याचा पंप असं पुष्कळ काही. 'आयमेनेम हाऊस'मधलं प्लंबिंग, विजेची उपकरणं, भिंतीवरचं वायरिंग हे सगळं वेलुथाच्या भरवशावरच चालत असे.

घराचा मागचा व्हरांडा बंद करून घ्यायचा असं माम्माचीनं ठरवलं, तेव्हा बांधकामाच्या नकाशापासून छपराच्या रचनेपर्यंत सगळी तयारी एकट्या वेलुथानंच केली. त्यानंच त्या नव्या खोलीसाठी सरकतं घडीचं दार बनवलं. ते अद्‌भुत दार पुढे अख्ख्या आयमेनेममध्ये चर्चेचा, कौतुकाचा विषय ठरलं.

'पॅराडाईज पिकल्स'मधल्या प्रत्येक यंत्राची नस न् नस वेलुथाला माहीत होती.

मद्रासमधील नोकरी सोडून चाको आयमेनेममध्ये परत आला आणि लोणच्याच्या फॅक्टरीसाठी त्यानं 'भारत बॉटल सीलिंग मशीन' विकत घेतलं, तेव्हा वेलुथानंच पुढची

सगळी जबाबदारी यशस्वीपणे पेलून दाखवली होती. त्या मशीनचे सुटे भाग एकत्र जुळवून मशीन नीट चालू लागेपर्यंत वेलुथानं अहोरात्र कष्ट उपसले. डोकं लढवलं. फॅक्टरीसाठी घेतलेल्या नव्या कॅनिंग मशीनची देखभाल करण्यापासून अननस कापणाऱ्या छोट्या स्वयंचलित यंत्रापर्यंत सगळी जबाबदारी एकट्या वेलुथावरच होती. पाण्याच्या पंपाचं ऑयलिंग, डिझेलवर चालणाऱ्या छोट्या जनरेटरची दुरुस्तीदेखील तोच करीत असे. त्यानं अॅल्युमिनिअमच्या पातळ पत्र्यापासून सहज साफ करता येतील, असे 'कटिंग ट्रे' बनवले होते. फळांचा रस आटवण्यासाठी भट्ट्या बांधल्या होत्या.

वेलुथाचा बाप – वेल्लय्या पाप्पेन म्हणजे बरंच जुनं खोड. स्वत:चं अस्पृश्यत्व त्याच्या वाकल्या म्हाताऱ्या कण्यात अगदी ठासून भरलेलं. जुन्या जमान्यातले हलाखीचे दिवस आणि त्या काळात माम्माचीच्या अख्ख्या कुटुंबानं केलेले उपकार तो विसरला नव्हता. ऐन पावसाळयात पुरानं ओसंडणारी रुंद पात्राची, खोल नदी असावी, तशी उपकाराची भावना त्याच्या मनात सतत उसळत असे. ग्रॅनाईटच्या दगडाची कपची उडून वेल्लय्याचा डोळा फुटला, तेव्हा तिथं काचेचा नवा डोळा बसवण्यासाठी माम्माचीनंच सगळी व्यवस्था केली होती. वरून त्यासाठीचा सगळा खर्चसुद्धा स्वत:च केला होता. त्या वेळचं ते कर्ज वेल्लय्या कधीच चुकवू शकला नाही. एवढे पैसे परत करणं आपल्याला बापजन्मात शक्य नाही, याची त्याला जाणीव होती आणि हे पैसे कुणी परत मागणार नाही, हेदेखील त्याला ठाऊक होतं. त्यामुळं आपला डावा डोळा आपला नाही, ते आपल्याला दिलं गेलेलं कर्ज आहे, असंच वेल्लय्या समजत असे. या एका घटनेनं त्याच्या डोक्यावरचं उपकाराचं ओझं एवढं वाढवलं, की वेल्लय्या कमरेतून पुरता वाकला. त्याच्या हसण्यातून जरा जास्तच अजिजी पाझरू लागली.

आपल्या मुलाच्या – वेलुथाच्या भविष्याबद्दल वेल्लय्याला काळजी वाटत असेच. आता तर त्याला भीतीही वाटू लागली. खरं म्हणजे, बापानं घाबरून जावं, असं वेलुथानं काहीच केलं नव्हतं. तो आपल्या बापाला काही वेडंवाकडं बोलला नव्हता; पण तरी काळजी होतीच. वेलुथा प्रत्येक काम ज्या तऱ्हेनं करायचा आणि प्रत्येक वेळी ज्या सुरात बोलायचा; ते पाहून आणि ऐकून वेल्लय्या खंगत चालला होता.

अस्पृश्यांनी कसं अडखळत, घुटमळत चाललं-बोललं पाहिजे; पण ही अडखळ, घुटमळ वेलुथाच्या व्यक्तिमत्त्वात जरासुद्धा नव्हती. तो ज्या रुबाबात चालायचा, ज्या तऱ्हेनं मान उंच ठेवायचा; ते सगळंच वेल्लय्याच्या दृष्टीनं आक्षेपार्ह होतं. कुणी काही विचारलेलं नसताना स्वत:हून एखाद्या विषयावरचं आपलं 'स्वतंत्र' मत देणं, इतरांनी केलेल्या सूचना शांतपणानं पण स्पष्ट-परखड भाषेत धुडकावून लावणं हे तर दिवसेंदिवस वाढतच चाललं होतं.

उच्च जातवाल्यांचं एक वेळ ठीक आहे. हे सगळे गुण त्यांच्या तरुण मुलांमध्ये असावेच

लागतात... पण अस्पृश्यांनी तो हट्ट धरून कसं चालेल? स्पृश्य तरुणांसाठी जो गुण, तो अस्पृश्य तरुणांसाठी उन्मत्त चढेलपणा म्हणून नाही का मोजला जाणार? खालच्या जातीतल्या माणसानं आपल्या पायरीनं राहावं, त्यानं उगीच आकाशाला हात लावायला जाऊ नये. तसं केलं, तर तो उद्धटपणा मानला जाईल; नव्हे तो उद्धटपणाच आहे, असं वेल्लय्याला वाटत होतं.

वेल्लय्यानं वेलुथाची समजूत घालायचा प्रयत्न केला. त्याला सबुरीनं वागण्याचा, आपल्या पायरीनं राहण्याचा सल्ला दिला; पण आपल्याला नक्की कशाची भीती वाटते आहे, हे वेल्लय्याला नीट स्पष्ट करून सांगताच आलं नाही. त्याला स्वत:लाच ते नीटसं उमजलं नव्हतं, तर वेलुथाला कसं सांगता येणार? पण त्यामुळं वेलुथाला आपल्या बापाच्या काळजीचं कारण कळलंच नाही. उलट, त्याचा गैरसमज झाला. त्याला वाटलं, बापाला आपला मत्सर वाटतो. आपल्या हातच्या कौशल्यावर आपला बाप जळतो, म्हणूनच त्यानं मोडता घालायचा प्रयत्न चालवलाय. या समज-गैरसमजातून कटुता वाढली आणि छोट्याछोट्या, किरकोळ कारणांवरून बापलेकांत झगडे सुरू झाले. या भांडणात वेलुथाची म्हातारी आई भरडली गेली. वेलुथा बाहेरबाहेरच राहू लागला. आईसाठीसुद्धा घरी येणं टाळायला लागला. तो उशिरापर्यंत काम करीत राहायचा. गळ घेऊन नदीवर जायचं. ताजे मासे मारून विस्तवात भाजायचे आणि पोटाची आग भागवून घराबाहेर नदीच्या काठी डोकं टेकायचं, असं सुरू झालं. पुढे पुढे वाढतच गेलं.

आणि एके दिवशी अचानक वेलुथा नाहीसा झाला. त्यानंतर तब्बल चार वर्षं त्याचा काहीही ठावठिकाणा लागला नाही. कुणी म्हणायचं, तो त्रिवेंद्रममधल्या एका सरकारी इमारतीच्या बांधकामावर काम करताना दिसला... तर कुणी काही वेगळंच सांगायचा. अगदी अलीकडं गावात खबर पसरली, की वेलुथा नक्षलवादी झालाय. त्याला अटक करून तुरुंगात टाकलाय. कुणी म्हणायचं, तुरुंगात कसा असेल? आम्हांला नुकताच तो क्विलॉनमध्ये दिसला.

वेलुथाची आई – चेल्ला क्षयरोगानं मेली; तेव्हा वेलुथापर्यंत ही बातमी पोचवायचा कुठलाही मार्ग उपलब्ध नव्हता. नंतर त्याचा मोठा भाऊ – कुटप्पन नारळाच्या झाडावरून खाली पडला आणि पाठीचा कणा मोडून कायमचा अंथरुणाला खिळला. आपल्या भावाला झालेल्या या जीवघेण्या अपघाताची बातमी तब्बल वर्षभरानं वेलुथाला समजली.

तब्बल चार वर्षांच्या अज्ञातवासानंतर वेलुथा आयमेनेममध्ये परतला, त्याला पाच महिने होऊन गेले. तरीही हे एवढे दिवस आपण कुठं होतो, काय करत होतो, याबद्दल वेलुथा चकार शब्दानं कुणाशी बोलला नाही.

माम्माचीनं पुन्हा एकदा वेलुथाला कामावर घेतलं आणि फॅक्टरीतल्या सगळ्या

यंत्रसामग्रीची जबाबदारी पूर्ववत त्याच्यावर सोपवली; पण त्यामुळं फॅक्टरीतले इतर उच्चवर्णीय कामगार चांगलेच भडकले. पारायार जातीच्या अस्पृश्य, हीन माणसाला सुतारकाम करण्याचा हक्कच कसा मिळतो, असा त्यांचा प्रश्न होता. अचानक, तडकाफडकी काम सोडून गेलेल्या आणि स्वत:ला फार श्रेष्ठ समजणाऱ्या अस्पृश्याला पुन्हा कामावर घेणं म्हणजे तर कहरच झाला, असं सगळ्यांना वाटत होतं आणि त्याचाही संताप धुमसत होता.

या संतापाला थोडासा आवर बसावा, म्हणून माम्माचीनं धूर्तपणानं वेलुथाला पूर्वीपेक्षा कमी पगार द्यायला सुरुवात केली. आयमेनेममध्ये आपल्याशिवाय दुसरं कुणीही वेलुथाला कामावर ठेवणार नाही, याची तिला खातरी होतीच. त्यामुळं पूर्वीपेक्षा थोडा कमी पण अन्य एखाद्या किरकोळ पारायार मजुरापेक्षा थोडा जास्त असा पगार ठरला. घरात काही तातडीची दुरुस्ती असली किंवा अन्य काही महत्त्वाचं काम असलं, तर तेवढा अपवाद वगळून माम्माचीनं वेलुथाच्या घरात येण्यावरदेखील निर्बंध घातले. आपल्याला फॅक्टरीच्या आवारात सर्वत्र फिरण्याची मुभा आहे, तिथल्या प्रत्येक वस्तूला आपण स्पर्श करू शकतो, याबद्दल वेलुथानं उपकृतच राहिलं पाहिजे, असा माम्माचीचा अंत:स्थ हेतू होता. अत्यंत नीच जातीतल्या पारायारासाठी एवढी परवानगीसुद्धा पुष्कळ झाली, असं ती वारंवार बोलूनही दाखवीत असे.

इतक्या वर्षांनंतर वेलुथा आयमेनेममध्ये परत आला, तरी त्याच्या हातांमधली जादू हरवली नव्हती. त्याचं हर-एक हुन्नर कायम होतं आणि त्याबद्दलचा आत्मविश्वासही पूर्वीइतकाच ताठ, बळकट, रुबाबदार होता. हे बघून वेल्लय्या पाप्पेनला पूर्वीपेक्षा जास्तच धास्ती वाटू लागली; पण या वेळी मात्र 'आपण काही बोलायचं नाही' असं त्यानं ठरवलं होतं. तो गप्पच राहिला.

पण त्याच्या 'आत' कसली तरी चाहूल लागली होती. अशुभाची चाहूल. रात्रीच्या गर्द अंधारात त्याच्या मनावरचं भीतीचं सावट अधिक गडद होत गेलं. रात्रीमागून रात्री उलटल्या... एक छोटीशी बोट भर मध्यरात्री नदी ओलांडून पल्याड जाते आणि पेंगुळलेल्या पहाटे परत येते, हे वेल्लय्याच्या लक्षात आलं होतं. त्याच्या पोटच्या 'अस्पृश्य' मुलानं कुठंकुठं, कशाकशाला स्पर्श करायला सुरुवात केलीय, हेदेखील त्या म्हाताऱ्या नजरेतून सुटलं नाही. वेलुथानं अनावर स्पर्श केले होते... त्याच्याही पुढं जाऊन पुष्कळ काही केलं होतं.

परंपरेने आखून दिलेली सीमा ओलांडून तो 'आत' आला होता आणि त्यानं प्रेमही केलं होतं.

या सगळ्या वाढत्या तणातून उसळलेली भीती सहन होईनाशी झाल्यावर वेल्लय्या पाप्पेननं थेट 'आयमेनेम हाऊस'चा रस्ता धरला आणि गहाण पडलेल्या काचेच्या निस्तेज,

लाचार डोळ्यानं माम्माचीसमोर जाऊन उभा राहिला. एक डोळा सरळ समोर बघत होता. दुसऱ्यामध्ये असहाय अश्रू मावता मावत नव्हते. एका गालावरून पाण्याचे पूर; दुसरा ठक्क कोरडा. काय करावं, ते न सुचून वेल्लय्यानं जोरजोरानं मुंडकं हलवायला सुरुवात केली. शेवटी माम्माची ओरडली, तेव्हा तो कसाबसा नीट उभा राहिला. रडवेला. त्याचं अख्खं शरीर भीतीनं थरथर कापत होतं. माम्माची पुन्हा ओरडली; पण शरीराला पांगळं करून टाकणारी भीतीची लाट थोपवून धरणं त्याला शक्य नव्हतं. एखादा माणूस अगदी अस्पृश्य असला, तरी हुकूम देऊन, आज्ञा करून त्याची 'भीती' कोण कशी घालवू शकणार? – आपण आपल्या एका डोळ्यानं बघू नये असं जे-जे काही बघितलं, त्याबद्दल वेल्लय्यानं माम्माचीला एका दमात सगळं सांगून टाकलं आणि मग अखंड क्षमायाचना! असलं काहीतरी भलतंच संकट केवळ आपल्या मुलामुळं ओढवलं, या अपराधी जाणिवेनं तो निम्माअधिक मेलाच होता. वेल्लय्यानं माम्माचीसमोर झाल्या पापाची कबूली दिली. 'शिक्षा म्हणून मी स्वत:च्या हातानं माझ्या मुलाचा शिरच्छेद करीन, त्याला जीवे मारीन,' असंही तो सारखं बरळत होता.

हा कलकलाट ऐकून 'काय झालं' ते बघण्यासाठी म्हणून बेबी कोचम्मा शेजारच्या खोलीतून धावत आली. समोर जीवघेण्या दु:खाचा आणि भीतीचा डोंगर उभा होता. बेबी कोचम्माच्या मनातल्या खोल कप्प्यात दडवलेल्या एका पोकळीत आनंदाच्या उकळ्या फसफसून आल्या.

मग बेबी कोचम्माने पुष्कळ निरर्थक बडबड चालवली. बोलता-बोलता सहज म्हणाली,

'पण तिला तो वास सहनच कसा झाला? या पारायारांच्या अंगाला किती घाण मारते!'

– बोलता-बोलता तिने नाक उडवलं. नको असलेल्या भाजीचा घास तोंडातून थुंकून टाकणाऱ्या लहान मुलाच्या ताठ्यानं किळसवाणा चेहरा करून अंग आकसून घेतलं... आणि अंगावरून पाल झटकावी, तसं काहीतरी झटकून टाकलं. या अस्पृश्य पारायारांच्या अंगाला येणाऱ्या घाणेरड्या वासापेक्षा तो आयरिश-जेसुईट सुगंध किती छान! – तिला तोच आवडायचा फक्त.

वेलुथा, त्याचा भाऊ कुटप्पन आणि वेल्लय्या असे तिघे जण 'आयमेनेम हाऊस'च्या खालच्या बाजूला नदीकाठी एका झोपडीत राहायचे. नारळाच्या बागेतून दोन-तीन मिनिटं चाललं, की राहेल आणि इस्था वेलुथाकडं पोचतसुद्धा. ती दोघं अम्मूबरोबर नुकती आयमेनेममध्ये राहायला आलेली. लहान वय. त्यामुळं वेलुथा आयमेनेम सोडून गेला, तेव्हा तो कसा होता, वगैरे काहीच इस्था आणि राहेलच्या गावी नव्हतं; पण वेलुथा

परत आल्यापासून मात्र या तिघांची अगदी घट्ट मैत्री जमली होती. खरं म्हणजे इस्था आणि राहेलला वेलुथाच्या घरी जाण्याची परवानगी नव्हती, तरीही हट्टानं ते आपल्या मित्राला भेटायला जात. वेलुथा कामात असला, की तिथल्या लाकडाच्या ओंडक्यांवर तासन्तास कुल्ले टेकवून बसत. रंधा घेऊन लाकूड तासताना निघणाऱ्या गोल गोल पातळ छिलक्यांशी खेळत राहात. या खडबडीत लाकडाच्या आत नेमका कुठला आकार दडलाय् हे वेलुथाला कसं कळतं आणि तो तेवढाच भाग फक्त कसा काय कोरून काढतो, याचं इस्था आणि राहेलला जाम आश्चर्य वाटे. एकदा का एखादा लाकडाचा तुकडा वेलुथाच्या हातात गेला, की तो मऊ गुळगुळीत होतो, एकदम चमकायला लागतो, ही सगळी जादूच आहे, असं त्या दोघांचं ठाम मत होतं. मग लकाकत्या उत्सुक डोळ्यांनी आजूबाजूला घुटमळणाऱ्या मुलांच्या हातात वेलुथा छोटा रंधा देई आणि लाकडाची सालं कशी काढतात, ते शिकवी, की मुलं खूश! वेलुथाच्या झोपडीवर सगळीकडे ओल्या लाकडाचा वास पसरलेला असे, आणि डोक्यावरच्या तळपत्या उन्हाचा दाह. कधीकधी काळी चिंच घालून शिजवलेल्या लाल माशांच्या आमटीचा घमघमाट वेलुथाच्या झोपडीतून येई. 'या आमटीची चव अख्ख्या जगातल्या कुठल्याच आमटीला येणार नाही,' असं म्हणत-म्हणत वेलुथाच्या घरी इस्था आमटी भुरकून प्यायचा.

वेलुथानं राहेलला मासे पकडण्याचा गळ त्याच्या काठीसह बनवून दिला होता. नदीवर जाऊन मासे कसे पकडायचे, ते दोघांनाही शिकवलं होतं.

डिसेंबरच्या त्या निळ्या दिवशी कोचिनबाहेरच्या रेल्वे फाटकाजवळून जाणाऱ्या मोर्च्यात हातातला लाल बावटा फडकवीत चालणारा तो ओळखीचा माणूस नक्की वेलुथाच होता. लाल प्लॅस्टिकच्या आपल्या चश्म्यातून राहेलनं त्यालाच पाहिलं होतं... वेलुथाच... शंकाच नको.

रेल्वेच्या बंद फाटकाबाहेर वाट पाहत थांबलेल्या गाड्यांच्या डोक्यावर आवाजाची छत्री तयार झाली होती. पोलिसांनी शिट्ट्या मारून-मारून त्या छत्रीला भोकं पाडली. आता त्या फाटक्या छत्रीतून राहेलला लाल आकाशाचे तुकडे तुकडे दिसायला लागले. त्या लाल आकाशात संतप्त, भुकेल्या घारींच्या घिरट्या सुरू झाल्या होत्या. त्यांना उंदीर टिपायचे होते. घारींच्या धम्म पिवळ्या मिटल्या डोळ्यांत गजबजत्या रस्त्याचे पट्टे उठले आणि पुढे-पुढे सरकणाऱ्या लाल बावट्यांच्या रांगाच रांगा. शिवाय एक पांढरा शर्ट. त्याच्या आतली काळी कुळकुळीत टणक पाठ आणि त्या पाठीवरची जन्मखूण.

मोर्चा चालूच होता. पुढे पुढे. उसळत्या दिशेने.

बेबी कोचम्मा भीतीनं गारठून गेली होती. गिळून टाकणारी हिंस्र भीती, आंबूस वासाचा घाम आणि ओघळलेली टाल्कम पावडर यांचं एक विचित्र जांभळट मिश्रण

तिच्या मानेभोवती लोंबत्या मांसात बरबटलं होतं. उघड्या तोंडातून बाहेर गळलेल्या थुंकीचे चिकट गोळेच्या गोळे ओठांच्या कडेला साचले होते. समोरून जाणाऱ्या मोर्च्यातला एक माणूस वर्तमानपत्रात छापून आलेल्या राजन या नक्षलवाद्याच्या फोटोसारखा दिसतो, असं नुसतं वाटलं आणि बेबी कोचम्मा हादरली. हा राजन पुढे पालघाटमधून दक्षिणेत कुठंतरी पळून गेला, असं ऐकलं होतं, मग तो इथं कसा? या मोर्च्यात?... राजनसारख्या दिसणाऱ्या (राजनच बहुतेक) त्या माणसानं मोर्च्यातून थेट आपल्याकडंच पाहिलं, असा भास झाला आणि बेबी कोचम्माचं उरलं-सुरलं अवसानही पार गळून गेलं.

हातात लाल बावटा घेतलेल्या, खूप गाठीगाठी असलेल्या क्लिष्ट-विचित्र चेहऱ्याच्या एका माणसानं राहेलच्या बाजूचं दार बाहेरून फाटकन् उघडलं. ते 'लॉक' नव्हतंच केलेलं. उघड्या दारासमोर एकाएकी बघ्यांची गर्दी जमली.

'उकडतंय ना?'– गाठीगाठीवाल्या चेहऱ्याच्या त्या माणसानं राहेलला मल्याळममध्ये शांतपणे प्रश्न केला. क्षणात त्याचा आवाज बदलला आणि एकाएकी करवादून तो ओरडला, 'तुझ्या बापाला सांग, एअरकंडिशनर विकत घे, म्हणावं... श्रीमंत आहे ना तो?'

आणि स्वत:च्याच वाक्कौशल्यावर खूश होऊन त्यानं पुन्हा एक जोरदार आरोळी ठोकली.

तो माणूस चाकोला राहेलचा बाप समजला होता. समजुतीच्या त्या घोटाळ्यानं खूश होऊन राहेल प्रसन्न हसली. क्षणभरासाठी का असेना, आपलं 'एक संपूर्ण कुटुंब' आहे, असा भास तिच्या मनाला शिवून गेला होता.

'बडबडू नकोस. उत्तर नको देऊ' – घाबरलेली बेबी कोचम्मा राहेलच्या कानात कुजबुजली, 'खाली बघ. शांत राहा.'

– मग लाल बावटेवाला तो माणूस बेबी कोचम्माकडेच वळला. क्षणात तिच्या जिवाचं पाणी पाणी झालं होतं. परक्या माणसाशी लग्न करून सासरी निघालेल्या नव्या नवरीसारख्या भेदरलेल्या चेहऱ्यानं ती मान खाली घालून बसली होती.

'हॅलो सिस्टर –' एकाएकी सफाईदार इंग्रजीत त्या माणसानं बेबी कोचम्माला हाकारलं,

'व्हॉट इज युवर नेम प्लीज?'

– बेबी कोचम्माच्या तोंडून शब्द फुटेना, तसा तो मागं वळला आणि आपल्या पाचकळ साथीदारांकडे बघून ओरडला.

'हेऽऽ हेऽऽ हेऽऽ, या बाईला मुळी नावच नाही.'

'मोदालाली मारीकुट्टी... हे कसंय नाव? चालेल?' – खोचक हसत गर्दीतल्या कुणीतरी सुचवलं.

मल्याळममध्ये 'मोदालाली' म्हणजे जमीनदार.

'ए, बी, सी, डी, एक्स, वाय्, झेड' – गर्दीतला आणखी कुणीतरी खवट माणूस जोरानं ओरडत बरळला.

बघता-बघता भोवती 'विद्यार्थी' जमले. कोंडाळं करून. उन्हाच्या तापत्या झळांपासून वाचवण्यासाठी म्हणून प्रत्येकाच्या डोक्यावर हातरुमाल बांधलेला किंवा बॉम्बे डाईंग छापाचे छोटे टॉवेल. 'सिंदबादच्या सफरी'चा मल्याळी सिनेमा बनवणाऱ्या सेटवर हुंदडणाऱ्या एक्स्ट्रॉ कलाकारांसारखे दिसत होते सगळे.

– गाठीगाठीवाल्या किचकट चेहऱ्याच्या त्या माणसानं आपल्याजवळचा लाल बावटा एकाएकी बेबी कोचम्माच्या हातात खुपसला... काहीतरी अमूल्य भेट दिल्याच्या थाटात म्हणाला,

'घे!'

बेबी कोचम्मा लक्ष देत नाहीसं बघून आपली 'भेट' तिच्या हातात खुपसत जोरानं करवादला,

'घे... घे म्हणतोय ना?'

घाबरत-घाबरत बेबी कोचम्मानं बावट्याची काठी कशीबशी हातात धरली.

'फडकव आता... फडकव तो बावटा. फडकू दे मस्त वाऱ्यावर!' – पुन्हा नवा हुकूम झाला.

– आता हुकमानुसार तो बावटा फडकवणं तिला भागच होतं. इलाजच नव्हता दुसरा काही. त्या बावट्याला नव्या कोऱ्या कापडाचा आणि अशी कापडं पोटात भरलेल्या दुकानाचा उग्रट वास येत होता... कुरकुरीत, धुळकट वास. बेबी कोचम्मा बावटा फडकवत नव्हती; तरीही तिनं कसाबसा हात हलवण्याचा प्रयत्न केला.

'आता म्हण, इन्किलाब झिंदाबाद!'

'इन्किलाब झिंदाबाद...' – घाबरून गळलेली बेबी कोचम्मा तोंडातल्या तोंडात पुटपुटली. शब्द उमटतच नव्हते नीटसे.

'गुड गर्ल!'

– तिला शाबासकी मिळाली. गाडीबाहेरची गर्दी जोरानं खिदळली. तेवढ्यात शिट्टीचा कर्कश्श आवाज भणभणत आला.

'ओ के देन...' – एखादं 'बिझीनेस डील' यशस्वीपणे पूर्ण करून निरोप घ्यावा, तशा इंग्रजी थाटात तो माणूस बेबी कोचम्माला म्हणाला, 'बाय बाय...'

– गाडीचा निळसर दरवाजा त्यानं जोरानं आपटून लावला. त्या धक्क्यानं बेबी कोचम्मा पुन्हा हादरली. गाडीभोवती जमलेली गर्दी भराभर पांगली आणि सगळ्यांनी पुन्हा एकदा मोर्च्यातल्या आपापल्या जागा घेतल्या. लाल बावटे पुन्हा नव्या वेगानं पुढे

सरकू लागले.

बेबी कोचम्मानं हातातल्या लाल बावट्याची पटकन गुंडाळी केली आणि सीटच्या मागच्या बाजूला टाकली. जपाची माळ मुठीत घेतली. ब्लाऊजच्या आत दोन गरगरीत कलिंगडांच्या मधल्या फटीत सरकवली. त्या विचित्र धक्क्यातून बाहेर पडण्यासाठी आणि कुण्या भुरट्या माणसांनी पायदळी तुडवलेली प्रतिष्ठा थोडीतरी सावरण्यासाठी असल्या फुटकळ गोष्टींमध्ये मन गुंतवण्याची गरज होतीच नाहीतरी.

मोर्चेकऱ्यांची शेवटची तुकडी नजरेआड झाल्यावर गाडीच्या खिडक्या उघडण्यात काही धोका नाही, असं ठरवून चाकोनं सगळ्यांना तसं करायला लावलं.

'तू नीट पाहिलंस? तो तोच होता?' – त्यानं अचानक राहेलला प्रश्न केला.

'कोण?' – तिला पटकन संदर्भ लागेना.

'वेलुथा... तुला खातरी आहे की तो वेलुथाच होता?'

'अंऽऽऽ' – राहेल जराशी घुटमळली. पलीकडून इस्था नक्की कसले हातवारे करतोय, त्याचा तिला उलगडा होत नव्हता.

'मी काय विचारतेय? तो वेलुथाच होता का? तू त्यालाच पहिलंस का?'– चाकोनं तिसऱ्यांदा विचारलं.

'अं... हो... हो म्हणजे तोच असणार. बहुतेक –' राहेल कशीबशी उत्तरली.

'म्हणजे तुझी खातरी आहे; पण बहुतेक?'

'नाही, नाही, तसं नव्हे. तो बहुतेक वेलुथा होता,' राहेल म्हणाली, 'तो माणूस वेलुथासारखा दिसत होता... जवळपास.'

'म्हणजे नक्की नाही?'

'नक्की... मी कसं सांगू?' – राहेलनं हळूच इस्थाकडं एक कटाक्ष टाकला.

'मी सांगतो, नक्की तो वेलुथाच असणार' – बेबी कोचम्मा त्राग्यानं म्हणाली, 'एकदा का माणसांना त्रिवेंद्रमचं वारं लागलं, की असंच होतं. प्रत्येक जण स्वत:ला ग्रेट राजकारणी समजायला लागतो.'

– तिचा हा निष्कर्ष फारसा कुणाला पटला नाही.

'आपण त्याच्या हालचालींवर नीट लक्ष ठेवलं पाहिजे' – बेबी कोचम्मा आता पुष्कळशी सावध झाली होती. म्हणाली, 'त्यानं आपल्या फॅक्टरीत ही कम्युनिस्टांची युनिअनबाजी सुरू केली ना, तर फार जड जाईल मग. तरी मला थोडी-थोडी लक्षणं दिसायला लागलीच होती. आजकाल कामगार जरा जास्तच उद्धट झालेत, त्यांना केल्या उपकारांची जाण म्हणून उरलेली नाही. परवा त्याला म्हटलं, 'रस्ता करायला झालाय, थोडं दगडांचं बघतोस का,' तर तो –'

'पण आपण निघालो, तेव्हा तर वेलुथा घरीच होता. मी बघितलं त्याला –' बेबी

कोचम्माला अर्ध्यावर तोडत इस्था पटकन म्हणाला. 'तो घरीच होता... मग इथं कसा असेल? या मोर्च्यात?'

'तो नसला ना या मोर्च्यात, तर उत्तमच. त्याचंच भलं होईल,' बेबी कोचम्मा चिडून म्हणाली, 'आणि इस्था, तूसुद्धा एक लक्षात ठेव. माझं बोलणं मध्येच तोडलेलं मला मुळीच आवडत नाही. पुन्हा असा शहाणपणा करू नको.'

– कुठला रस्ता करायचाय, कसले दगडे आणायचेत, याबद्दल कुणी साधी चौकशीसुद्धा केली नाही हे लक्षात आलं, तेव्हा बेबी कोचम्माचा पारा आणखीच चढला.

– त्या दिवसापासून वेलुथाबद्दलचा द्वेष बेबी कोचम्माच्या मनात अगदी ठासून भरला. चारचौघांच्या देखत झालेल्या आपल्या अपमानाचा राग तिनं वेलुथावर काढायला सुरुवात केली. धारदार खोबणीत खोचून पेन्सिलला टोक काढावं, तसं तिच्या मनातलं गिरमिट फिरू लागलं. त्या दिवशीच्या मोर्च्याचा, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीचा बावटा फडकवण्याची सक्ती करणाऱ्या त्या हिंस्त्र माणसाचा, 'मोदालाली मारीकुट्टी' म्हणून उसळलेल्या अवमानास्पद हास्याचा आणि निर्लज्जपणे तिची गंमत बघत उभ्या राहिलेल्या त्या निगरगट्ट जमावाचा सगळा राग बेबी कोचम्मानं एकट्या वेलुथाच्या टाळक्यावर थापला.

ती जास्तच भडकली. वेलुथा नजरेसमोर आला, तरी तिला सहन होईना. तिनं त्याचा तिरस्कार करायला सुरुवात केली.

अम्मूची मान अजून तशीच दिसत होती. ताठ... अवघडलेली तिचा राग अजून पुरता गेलेला नाही, हे राहेलनं ओळखलं. तिनं सहज घड्याळाकडे नजर टाकली. दोनला दहा मिनिटं बाकी होती. अजूनही ट्रेनचा काही मागमूस दिसेना. फाटक बंदच होतं. उघड्या खिडकीच्या कडेवर हनुवटी टेकवून ती शांत बसून राहिली. खिडकीची काच सरकण्यासाठी म्हणून लावलेली राखाडी रंगाची पट्टी तिच्या हनुवटीला बोचत होती. तेवढ्यात रस्त्यावर एक चिरडून मेलेला बेडूक तिला दिसला. तो नीट दिसावा, म्हणून राहेलनं डोळ्यांवरचा लाल-लाल गॉगल काढून तिकडे नजर लावली. धावत्या गाड्यांची अजस्र चाकं आणि अजस्र लाल बावट्यांखाली चिरडून-चिरडून बिचारा बेडूक एवढा सपाट होऊन गेला होता, की बेडकाच्या आकाराचं काही नावालासुद्धा उरलं नव्हतं त्याच्यात. तापलेल्या रस्त्यावर बेडकाच्या आकाराचा एक ओलसर चिकट डाग, एवढंच फक्त. मिस मिट्नचं पण असंच झालं असेल का? दुधाच्या टँकरखाली चिरडून ती मेली, तेव्हासुद्धा रस्त्यावर मिस् मिट्नच्या आकाराचा असाच ओलसर चिकट डाग पडला असेल का? – राहेलच्या एकदम मनात आलं.

खरंतर, वेल्लय्या पाप्पेन पक्का आस्तिक; पण या विश्वात 'काळं मांजर' नावाची काही गोष्ट मुळी अस्तित्वातच नसते,' असं त्यानं जुळयांना अगदी छातीठोकपणे सांगितलं होतं. तो म्हणायचा, या विश्वात काळया मांजराच्या आकाराची विवरं असतात फक्त.

...आणि रस्त्यावरही केवढे डाग पडलेले ओलसर... चिकट.

चिरडून मेलेल्या मिस् मिट्नच्या आकाराचे.

चिरडलेल्या बेडकाच्या आकाराचे.

चिरडलेला बेडूक खाता-खाता स्वत:च चिरडून मेलेल्या कावळयांच्या आकाराचे...

शिवाय वार्‍यावर उडत आलेली पिसं, आंबे, थुंकीच्या गोळयांचे सुकलेले खाकरे.

कोचिनकडे जाणार्‍या रस्त्यावर... अख्खा रस्ताभर असलंच काहीकाही.

– आता उन्हाच्या थेट कवडशांनी राहेलच्या चेहर्‍यावर गरम-गरम झोत सोडायला सुरुवात केली होती. तिनं त्रासून जाऊन झोंबणारे डोळे मिटून घेतले. तरीही मिटलेल्या पापणीच्या आत गरम-गरम वाटतच होतं. अख्खं आकाश तापून लालबुंद झालेलं. एखाद्या तरी चुकार ढगानं आपल्याजवळ यावं, म्हणून नारळाच्या झाडांच्या झावळया हात पसरून सळसळत होत्या. तेवढ्यात अंगभर ठिपके ठिपके असलेला चमकत्या कातडीचा तेजस्वी साप जिभा लवलवत आकाशातून वेगानं सरपटताना राहेलला दिसला आणि नंतर ठिपक्या ठिपक्यांच्या घोड्यावर बसलेला एक तेजस्वी रोमन सैनिक. कॉमिक्समधल्या या रोमन सैनिकांची राहेलला नेहमी गंमत वाटायची. हे सैनिक अंगावर एवढं जाड-जाड चिलखत घालतात, डोक्यावर एवढं मोठं वजनदार शिरस्त्राण चढवतात, पण त्यांचे पाय मात्र उघडे. ही भानगड राहेलला कधी उमगत नसे. अख्खं शरीर एवढं कडेकोट झाकून फक्त पाय तेवढे उघडे ठेवण्यात काय शहाणपण आहे?

अम्मूनं इस्था आणि राहेलला ज्युलियस सीझरची गोष्ट सांगितली होती. त्याचा जीवश्चकंठश्च मित्र असलेल्या ब्रूट्सनंच सीझरच्या पाठीत कसा खंजीर खुपसला, तेही अम्मूनं सांगितलं होतं. रक्तानं भळभळणार्‍या पाठीत तो खंजीर तसाच घेऊन सीझर जमिनीवर कोसळला आणि अखेरच्या क्षणी विषादानं म्हणाला,

'यू टु? ब्रूटस?' – देन फॉल सीझर.

'यातून काय दिसतं?' – अम्मू म्हणाली होती, 'तर आपण कुणावरही विश्वास ठेवू शकत नाही. आई, वडील, भाऊ, नवरा, जवळचा मित्र, कुणावरसुद्धा नाही. या जगात कुणाचाच भरवसा देता येत नाही.'

दोघांनी थोडं अविश्वासानं तिच्याकडं पाहिलं, तेव्हा अम्मू म्हणाली, 'येईल, अनुभव. अजून पुष्कळ आयुष्य जायचंय तुमचं. काहीही होऊ शकतं...' इस्था मोठा होऊन स्वार्थी, मतलबी आणि अहंकारी पुरुष बनू शकतो. असं काहीही होऊ शकतं.

– तेव्हापासून इस्थाला एक भलताच चाळा लागला. रात्री बिछान्यात उभा राहायचा.

अंगाभोवती चादर गुंडाळून मोठ्यानं म्हणायचा,

'यू टु ब्रूटस? – देन फॉल सीझर!'

– आणि गुडघे न दुमडता, एखादं प्रेत उभ्या-उभ्या कोसळावं, तसा सरळच्या सरळ बिछान्यात पडायचा. शेवटी खाली जमिनीवर चटई घालून झोपणारी कोचु मारिया वैतागायची आणि माम्माचीला नाव सांगण्याचा धाक घालून इस्थाला जरा फैलावर घ्यायची.

'आईला म्हणावं, इथं कशाला माहेरी राहतेस? घेऊन जा बापाच्या घरी.' कोचु मारियाचं जोरात करवादणं, 'तिथं जाऊन काय वाट्टेल तो धिंगाणा घाला. उड्या मारा, पलंग मोडा, काय हवं ते करा. इथं कशाला त्रास? हा तुझा पलंग नव्हे. लक्षात ठेव, हे घरसुद्धा तुझं नव्हे.'

– पलंगावरच्या उशीत डोकं खुपसून हे सगळं ऐकणारा इस्था पुन्हा उठून उभा राहायचा. अंगाभोवती चादर गुंडाळून ज्युलियस सीझरच्या थाटात म्हणायचा,

'यू टु कोचु मारिया? – देन फॉल इस्था.'

– आणि पुन्हा उभ्या-उभ्या सरळच्या सरळ बिछान्यात कोसळून मेल्यासारखा पडायचा.

पुढं पुढं तर हे 'यू टु' म्हणजे इंग्रजीतले काहीतरी बीभत्स, घाणेरडे शब्द असणार असं कोचु मारियाला वाटायला लागलं. इस्था आपल्याबद्दल काहीतरी अश्लील बोलतो, याची तकरार संधी येताच माम्माचीकडं करून टाकायची, असंही तिनं मनातल्या मनात पक्कं ठरवून टाकलं होतं.

– प्लायमाऊथच्या शेजारी उभ्या असलेल्या गाडीतल्या बाईच्या तोंडाला बिस्किटाचे कण चिकटलेले दिसत होते. बिस्किटांचा फन्ना उडवल्यावर शेजारी बसलेल्या तिच्या नवऱ्यानं सिगारेट शिलगावली. दोन दमदार खोल झुरके मारले आणि छातीत भरून घेतलेल्या धुराचे फवारे नाकातोंडातून बाहेर सोडले. क्षणभर तो माजलेल्या जंगली डुकारासारखाच दिसला. तेवढ्यात सौभाग्यवती डुकरीणबाईंनी हलक्या, प्रेमळ आवाजात राहेलला तिचं नाव विचारलं.

– तिच्याकडे ढुंकूनही न बघता राहेल तोंडातून थुंकीचे बुडबुडे काढायला लागली.

– हा घाणेरडा प्रकार मला मुळीच आवडत नाही, असं अम्मूनं वारंवार बजावून सांगितलं होतं. ओठांवरून गळणारे थुंकीचे गोळे बघितले, की अम्मूला तिच्या नवऱ्याची (किळसवाणी) आठवण येत असे. तोसुद्धा असाच स्वत:च्या थुंकीशी खेळत बसायचा आणि वेडेवाकडे पाय हलवत राहायचा. 'हा सगळा प्रकार अत्यंत अशिष्ट आहे. फक्त खर्डेघाशी करणारे कारकूनच असं वागू शकतात. आपल्यासारख्या उच्चवर्गीय प्रतिष्ठितांनी नीटच वागलं पाहिजे,' असं अम्मू कानीकपाळी ओरडून सारखी सांगत राही.

म्हणजे उच्चवर्गीय खानदानी माणसं कोण? – तर ज्यांना थुंकीचे बुडबुडे काढता येत नाहीत किंवा पाय हलवता येत नाहीत, ती.

इस्था आणि राहेलचा बाबा काही खर्डेघाशी करणारा कारकून नव्हता. तरी अम्मू म्हणे,

'तो सदान्कदा तसाच वागायचा. कारकुनासारखा.'

– मग अम्मूची नजर चुकवून 'कारकून कारकून' खेळायला इस्था आणि राहेलला मजा यायची. ते दोघं मजेत बुडबुडे उडवायचे, जोरजोरानं पाय हलवत बसायचे आणि घसा खरवडून खरवडून खाकरेही बाहेर काढायचे. इस्था आणि राहेलला त्यांचा बाबा फारसा आठवतही नसे. दोन युद्धांच्या मधला सहवास, तेवढाच काय तो. एकदा बाबानं त्या दोघांना दोन झुरके ओढून बघण्यासाठी आपली सिगारेट दिली होती आणि आधी सांगितल्याप्रमाणे आत ओढलेला धूर बाहेर न सोडता गिळून टाकल्याबद्दल दमही भरला होता. दोघांनी आपापली थुंकी लावून सिगारेट ओली करून टाकली, म्हणून तेव्हा भडकलाही होता बाबा.

'धूर खाऊन टाकता? ती काय मिठाई आहे?'

– बाबाचा तो राग अजून इस्था आणि राहेलच्या लक्षात होता. अम्मूपण एकदा अशीच रागावली होती. बाबा असताना. रागाच्या भरात एकमेकांकडे ढकलून- ढकलून दोघांनी इस्था आणि राहेलचे चेंडू केले होते अक्षरश:... बिलियर्डस्च्या टेबलावरून इकडंतिकडं ढकलेले जाणारे. इस्थाला नवऱ्याकडं ढकलून अम्मू तणतणत म्हणाली होती,

'सांभाळ तुझ्या पोराला. दोघादोघांची जबाबदारी मी एकटीनं का म्हणून घेऊ?'

– नंतर केव्हातरी त्या प्रसंगाबद्दल इस्थानं अम्मूला विचारलं, तेव्हा भरल्या डोळ्यांनी तिनं पटकन त्याला मिठीत घेतलं न् म्हणाली,

'विसरून जा सगळं. कशाला ते दिवस आठवत बसतोस?'

बाबाचा एकच फोटो अम्मूजवळ होता. तिनं तो एकदाच मुलांना दाखवला. तोही जेमतेम पाहता येईल, एवढाच वेळ. पांढरा स्वच्छ शर्ट आणि डोळ्यांवर चश्मा. बाबा एखाद्या देखण्या, अभ्यासू क्रिकेटपटूसारखाच दिसत होता. एका खांद्यावर इस्था बसलेला. त्याची हनुवटी बाबाच्या डोक्यावर टेकवलेली आणि दुसऱ्या हातात राहेल. उचलून हृदयाशी धरलेली. इस्था मजेत हसत होता, पण रागानं गाल टम्म फुगवलेली राहेल मात्र हुप्प! तिचे छोटे-छोटे पाय बाबाच्या पोटावरून लोंबत होते. दोन्ही मुलांच्या गालावर कुणीतरी रंगवलेले गोळे फोटोतही दिसत होते... स्पष्ट.

अम्मू सांगायची,

'या फोटोवर जाऊ नका. फक्त फोटोला पोझ द्यायची, म्हणून त्यानं असं उचलून घेतलंय तुम्हांला; पण प्रत्यक्षात तो इतका प्यायला होता, की मला तर भीतीच वाटत

होती सारखी. दारूच्या नशेत त्याने फेकलंच तुम्हांला, तर नीट झेलता तरी यावं, म्हणून मी घाबरून जवळच उभी होती... फोटोच्या फ्रेमला चिकटूनच जवळजवळ.'

– तरीसुद्धा, गालावरचे ते विचित्र गोळे सोडले, तर बाबाबरोबरचा तो फोटो इस्था आणि राहेलला अगदी मनापासून आवडला.

'राहेलऽऽ, काय चाललाय मूर्खपणा' – थुंकीचे बुडबुडे काढणाऱ्या राहेलच्या अंगावर अम्मू इतक्या जोरानं ओरडली, की रस्त्याच्या दगडावर बसलेला मुरलीधरन खाडकन उठून उभा राहिला आणि काय झालं, ते बघायला प्लायमाऊथच्या दिशेनं जोरात झेपावला.

'काय... काय झालं' – राहेल दचकली. पण क्षणार्धात 'काय झालं?' ते उमगून ओशळवाण्या स्वरात म्हणाली, 'सॉरी, अम्मू... पुन्हा नाही करणार.'

'नुसतं 'सॉरी' म्हणून काय होतं? मेलेला माणूस होतो का जिवंत परत?'– इस्थानं एक चापट हाणली.

'ओ, कमॉन् –' चाको वैतागला, 'तिच्या थुंकीचं ती वाट्टेल ते करील. तुम्ही कोण टिकोजीराव तिला कारण नसताना फैलावर घेणारे?'

'तू गप्प बस. तुझा काय संबंध?' – अम्मूचाही पारा चढलाच होता.

'अशी थुंकी उडवली ना कुणी, की जुनं सगळं आठवतं उगीचच' – इस्था बोलून गेला.

– राहेलनं पुन्हा एकदा आपला गॉगल डोळ्यांवर चढवला. सगळं जग एकदम लालम्लाल, रागानं भडकलेलं दिसू लागलं.

'काढून टाक, काढून टाक तो घाणेरडा गॉगल... काढ आधी' – अम्मू पुन्हा वैतागली.

राहेलनं मुकाट्यानं गॉगल काढला.

'ही हुकूमशाहीच झाली. मुलांशी इतक्या जुलूमजबरदस्तीनं वागतेस तू'– चाकोनं अम्मूची खपली काढली, 'मुलं असली, म्हणून काय झालं? तीसुद्धा माणसंच आहेत. त्यांनासुद्धा काही हक्क, स्वातंत्र्य असतंच... फॉर गॉड्स सेक, जरा नीट वाग.'

'खबरदार, उगीचच्या उगीच देवाचं नाव घेऊन टिंगल करशील, तर!' इतका वेळ गप्प असलेली बेबी कोचम्मा संतापानं कडाडली.

'मी कुठे टिंगल करतोय?' – चाकोनं हात उडवले, 'मी मुलांच्या भल्यासाठी सांगत होतो फक्त.'

'मोठा लागून गेलास मुलांचा रक्षणकर्ता!' – अम्मूनं चाकोला हाणण्याची संधी सोडली नाही, 'वेळ येईल तेव्हा समजेल. तुला ना मुलांची काळजी, ना माझी. कशाला उगीच फुकट बढाया मारतोस?'

'मी कोण? मी कशाला बढाया मारू?' – चाको चिडून म्हणाला, 'तुझी मुलं ही काय

माझी जबाबदारी आहे?' – अम्मू, इस्था आणि राहेल ही तिघं जण म्हणजे निष्कारण आपल्या गळयात बांधलेली धोंड आहे, असंही चाकोनं स्पष्टपणे सांगून टाकलं.

राहेलचे पाय आतल्या बाजूनं घामेजले होते, ओलसर झाले होते. प्लायमाऊथच्या सीटकव्हरवरून ती खाली घसरायला लागली. 'धोंड' म्हणजे काय, ते राहेल आणि इस्थाला ठाऊक होतं. 'म्युटिनी ऑन द बाऊन्टी' मध्ये त्यांनी पाहिलं होतं. समुद्रावर असताना माणसं मेली, की पांढऱ्या स्वच्छ कापडात गुंडाळून गळयात धोंड बांधलेली त्यांची प्रेतं जहाजावरून समुद्रात भिरकावून देतात. गळयात धोंड बांधलेली असली, की प्रेत पाण्यावर तरंगत नाही, म्हणून; पण प्रवासाला निघताना नक्की किती धोंडी बरोबर घ्याव्यात, हे जहाजवाल्यांना कसं कळतं, याबद्दल इस्थाच्या मनात प्रचंड औत्सुक्य होतं.

– कंटाळलेल्या इस्थानं दोन्ही पाय सीटवर घेऊन त्यात आपलं डोकं लपवलं. त्याच्या केसांचा ऐटबाज कोंबडा विस्कटला. चेहऱ्यावरून फिरवलेला आवडता पफही पुसला गेला. वाट बघून-बघून प्राण कंठाशी आल्यावर लांबून कुठूनतरी धडधडत येणाऱ्या रेल्वेचा आवाज अखेरीस ऐकू आला. बेडकाच्या आकाराचा ओलसर डाग पडलेल्या रस्त्याच्या दिशेनं येणारी धडधड वाढत राहिली. रुळांच्या दोन्ही बाजूंनी चटकफटक चटकफटक आवाज सुरू झाला.

बीनामोल बसमध्ये बसलेल्या टकलू यात्रेकरूंनी पुन्हा नव्या उत्साहानं नवं भजन सुरू केलं.

'च्ऽऽ हे हिंदू लोक म्हणजेऽऽऽ' – कडवा धार्मिक सूर लावून बेबी कोचम्मा वैतागानं म्हणाली, 'यांना कुठलीही गोष्ट आपल्याआपल्यापुरती मुळी करताच येत नाही. भजन करायचं, तर एवढा आरडाओरडा कशाला हवा?'

'तुला माहितीय का? हिंदू लोकांना शिंगं असतात... खवले असतात त्यांच्या अंगावर...' वर्मी घाव बसेल, अशा झोंबणाऱ्या शब्दांत चाको म्हणाला, 'हिंदू लोक अंडी उबवून मुलांना जन्माला घालतात, असंसुद्धा ऐकलंय मी?'

– राहेलच्या डोक्यावर चांगली दोन मोठीमोठी टेंगळं होती. इस्था म्हणायचा, आता यातून तुला दोन शिंगं फुटणार. निदान एकतरी फुटणारच, कारण राहेल 'अर्धी हिंदू' होतीच मुळी; 'पण मग तुझ्या शिंगांचं काय?' – असं इस्थाला पटकन विचारण्याचं राहेलला सुचलं नाही. कारण ती जशी होती, तसाच तोही होता. अर्धाअर्धा. अर्धा हिंदू. अर्धा ख्रिश्चन.

काळया धुराचे मोठेमोठे फवारे सोडीत धडधडणारी रेल्वे एकदाची इकडून तिकडे निघून गेली. एकूण बत्तीस डबे होते आणि प्रत्येक डब्याच्या उघड्या दाराला चिकटून लोंबकळणाऱ्या माणसांच्या झुंडी. जगण्या-मरण्याच्या काठावरच ओठंगून राहिलेले सगळे; जे कुणी खाली पडून मेले, त्यांचं पुढं काय झालं, ते शोधण्याच्या विचित्र उत्सुकतेनं

भारलेले. त्यांच्या डोक्यावर जोरजोरानं येऊन आदळणाऱ्या अंधाऱ्या काठीमुळे सगळ्यांचे केस पार उलटेपालटे होऊन गेले होते.

रेल्वे अक्षरश: क्षणार्धात इकडून तिकडे निघून गेली. एवढ्या क्षणभराच्या कामासाठी बंद फाटकाच्या दोन्ही बाजूंना केवढ्या प्रचंड रांगा... आणि किती प्रचंड जणांनी प्रचंड वेळ वाट पाहत राहणं. रेल्वे गेली, तरी रुळांच्या आजूबाजूच्या झाडांची पानं कितीतरी वेळ तशीच, त्याच लयीत आणि वेगात थरथरत होती... फाटकाभोवती थांबून-थांबून आंबून गेलेल्यांचा वैताग समजून घेतल्यासारखी.

जळलेल्या कोळशाच्या धुळीचा चिकट ढग भेलकांडत-भेलकांडत वरून खाली आला आणि हळूहळू वाहनं सरकायला लागली.

चाकोनं चावी फिरवून प्लायमाऊथ सुरू केली. सगळा राग, वैताग झटकून मस्त आनंदी व्हावंसं बेबी कोचम्माला वाटत होतं, म्हणून तिनं गाणं म्हणायला सुरुवात केली.

'देअर्स अ सॅड सॉर्ट ऑफ क्लँगिंग,
फ्रॉम द क्लॉक इन द हॉल
अॅन्ड द बेल्स इन द स्टी-प्ली टू.
अँड अप इन द नर्सरी
अॅन अॅबसर्ड
लिट्ल बर्ड
इज पॉपिंग आऊट टु से –'

आता इस्था आणि राहेल 'कु क्कु कु क्कु' म्हणून ओरडत टाळ्या पिटतील, अशा अपेक्षेनं तिनं जुळ्यांकडं बघितलं.

इस्था आणि राहेल तसेच बसून राहिले गप्प.

गाडीनं रस्त्यावरून धावता-धावता वेग घेतला, तसे उघड्या खिडकीतून ताज्या हवेचे प्रसन्न झोत आत आले. हिरवीगार झाडं आणि टेलिफोनचे खांब पळत-पळत मागे जात होते. विमानतळावर बेवारशी सामान पडून असावं, तसे धावत्या तारांवरचे चुकार पक्षीही अधूनमधून दिसत राहिले.

दिवस मावळायच्या आधीच उगवलेला भलामोठा अशक्त चंद्र आकाशात टांगला होता. तोही प्लायमाऊथच्या बरोबरीनं धावत राहिला. काहीसं मंद होतं त्याचं तेज, तरी फिकुटला आकार मात्र मोठा-थोरला... सदान्कदा बिअर ढोसणाऱ्या माणसाच्या गोल गरगरीत ढेरीसारखा!

प्रकरण ३

बडा आदमी लालटेन साहिब, छोटा आदमी मोमबत्ती

एखाद्या मध्ययुगीन सैन्यानं शत्रूच्या रिकाम्या बालेकिल्ल्यावर चाल करून जावी, तसे केरकचऱ्याचे, घाणीचे ओंगळवाणे ढीग 'आयमेनेम हाऊस'ला वेढा घालत पुढे पुढे सरकत होते. आजूबाजूला वाढलेल्या हिंस्र रानवेलींनी घराच्या भिंतींमधल्या फटी शोधून-शोधून भरल्या आणि खिडक्यांची तावदानं पार झाकून टाकली.

चहाच्या कपातून 'सूं सूं' करीत उडणारी चिलटं आणि वास मारणाऱ्या फुलदाण्यांमध्ये मरून पडलेले किडे होते, ते वेगळेच.

जमीन पार चिकट झाली. एके काळच्या पांढऱ्या भिंतीवर काळपट बुरशी चढली. पितळेची चमकती बिजागरं आणि कड्या गंजून गेल्या. कधीच वापरले न जाणारे लाईटचे प्लग घट्ट बसलेल्या पांढरट मळानं बुजून गेले. कोमट-कोमट प्रकाश गाळणाऱ्या दिव्यांवर पातळ तेलकट थर बसला. घरभर दुडुदुडु धावणारी झुरळं तेवढी गलेलठ्ठ आणि स्वच्छ चमकदार होती.

बेबी कोचम्माचं कशाहीकडे लक्ष नव्हतं. तिला कशाचंच काही वाटेनासं झालं, त्यालाही आता पुष्कळ वर्षं लोटली होती. कोचु मारियाला घरात पसरत चाललेली घाण दिसे; पण तिनं लक्ष देणं सोडून दिलं होतं.

बेबी कोचम्माची आरामशीर ताणून बसण्याची बैठकही पार मोडकळीला आली होती. त्याच्यावरचं जुनाट कापड विरून-विरून फाटायला लागल्यामुळं आत भरलेला शेंगांचा भुसा फट मिळेल तिथून बाहेर गळायला लागला होता.

ज्याला-त्याला खिळवून ठेवणाऱ्या टी. व्ही.मुळं कर्मठ 'आयमेनेम हाऊस'मध्येसुद्धा चोरपावलांनी, नकळत सक्तीच्या लोकशाहीचा प्रवेश झाला होता. त्यामुळं मालकीण आणि मोलकरीण टी. व्ही. बघता-बघता एकाच वाडग्यातल्या शेंगा खात. कोचु मारिया ठपकन् शेंग फोडून आतला दाणा गुटकन् तोंडात फेकीत असे, तर बेबी कोचम्मा नाजूक नखरेलपणानं सोललेला दाणा, हळूच अलगद खात असे, एवढंच काय ते.

टी. व्ही.वरचीच गोष्ट. अनेकदांपैकी एकदाची.

'बेस्ट ऑफ डॉनह्यू' नावाच्या एका कार्यक्रमात स्टुडिओ ऑडियन्सकरता एका फिल्मचा छोटासा तुकडा दाखवण्यात येत होता. त्यात रस्त्यावर गाणीबजावणी करणारा एक कृष्णवर्णीय माणूस भुयारी रेल्वेच्या स्टेशनात उभा राहून 'समव्हेअर ओव्हर द रेनबो' हे गाणं अगदी समरसून गात होता. जणू खरोखर इंद्रधनुष्यावर बसून स्वप्नातली सफर

चालली असावी, इतक्या तन्मयतेनं गाणं चाललं होतं. शेंगदाणे खाऊन-खाऊन लडबडलेल्या, थरथरत्या पातळ आवाजात बेबी कोचम्माही त्याच्याबरोबर गाऊ लागली. ते गाणं जणू तिच्याबद्दल असावं, अशा थाटात ती गाता-गाता मंद हसतही होती. बेबी कोचम्माला वेड लागलं असावं आणि त्या वेडाच्या भरात तिनं वाडग्यातल्या जास्त शेंगा मटकावल्या असाव्यात, अशा संशयानं कोचू मारिया आपल्या मालकिणीकडं पाहत राहिली. गाता-गाता गाण्याची सम आली, की तो गायक डोकं मागं झटकून प्रचंड वेगानं सुरांचा कल्लोळ करी आणि टी. व्ही.च्या अख्ख्या पडदाभर त्याचं फक्त तोंडच दिसे. तो कृष्णवर्णीय गायक कुणाही पॉप स्टारच्या तोंडात मारील, अशा गुणवत्तेचा होता; पण त्याचा पडका दात आणि काळ्याबेंद्र्या चेहऱ्यावरची अशक्त, निस्तेज झाक कशी लपणार? त्याची हलाखी आणि उपासमार सगळं त्यातून फारच धडधडीतपणे दिसत होतं. स्टेशनमध्ये रेल्वे आली किंवा गेली, की त्याला आपलं गाणं थांबवावं लागत असे. रेल्वेची आणि गाण्याची ही थांबाथांबी सारखीच चालली होती.

क्षणार्धात अंधारा स्टुडिओ झगझगीत प्रकाशानं उजळला आणि खुद्द डॉनह्यूनं टाळ्यांच्या गजरानं त्या गायकाचं स्वागत केलं. आधीच दिलेल्या 'क्यू'प्रमाणे त्या गायकानं अर्ध्यावर तुटलेलं फिल्ममधलं गाणं नेमक्या त्याच शब्दापासून उचललं आणि प्रतीकात्मक विजयाचा क्षण मोठ्या हुशारीनं साधला – व्हिक्टरी ऑफ साँग ओव्हर सबवे!

पण तेवढ्यात फिल डॉनह्यूनं त्याच्या खांद्याभोवती हात टाकून स्टुडिओत आल्याबद्दल त्या गायकाचे आभार मानले आणि पुन्हा एकवार त्याचं गाणं अर्ध्यावर तुटलं.

अर्थात सबवे स्टेशनवरच्या भुयारी रेल्वेच्या कर्कश्श खडखडाटामुळं थांबण्यापेक्षा खुद्द फिल डॉनह्यूकडून थांबवलं जाणं पुष्कळच आनंददायी होतं, सन्मानाचं तर होतंच होतं.

स्टुडिओत बसलेल्या प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्या गायकाचं स्वागत केलं आणि प्रत्येक जण अत्यंत कनवाळू दयार्द्र नजरेनं त्याच्याकडे बघू लागला.

'प्राईम टाईम प्रोग्रॅम'मधल्या या आनंदोत्सवाचं तेज त्या गायकाच्या चेहऱ्यावर झळकत होतं. क्षणभरासाठी त्याच्या काळ्याबेंद्र्या चेहऱ्यावर पसरलेली उपासमारीची ती निस्तेज अशक्त झाकही दिसेनाशी झाली.

'डॉनह्यू शो'मध्ये येऊन गाणं हे माझं आयुष्यभराचं स्वप्न होतं,' असं तो दाटलेल्या कंठानं सांगत होता. ते स्वप्नदेखील धड पुरं होण्याआधीच आपल्या हातून हिरावलं गेलंय, हेदेखील त्याच्या लक्षात येत नव्हतं, इतका आनंद वाहत होता चेहऱ्यावरून.

असंच होतं नेहमी.

स्वप्नं खूप मोठी असतात, लहानही असतात. गवसत नाही काहीच. सगळंच निसटून जातं.

इस्थाच्या शाळेची सहल जायची, तेव्हा दर वेळी रेल्वे स्टेशनवर भेटणारा एक

बिहारी हमाल स्वप्नांची ही अर्धवट गोष्ट मोठ्या खुशीनं सांगायचा. म्हणायचा,

बडा आदमी लालटेन साहिब,

छोटा आदमी मोमबत्ती.

मोठा माणूस म्हणजे कंदील, आणि छोटा मेणबत्ती.

ह्यूज मॅन द स्ट्रोब लाईट्स, अॅन् स्मॉल मॅन द सबवे स्टेशन' हेच खरं कदाचित.

शाळेची सहल घेऊन जाणारे शिक्षक त्या बिहारी हमालाशी प्रचंड घासाघीस करून अगदी कमी पैसे ठरवत, तो बिचारा मुलांच्या सामानाची ओझी उचलून थकल्या-भागल्या अवस्थेत कसेबसे पाय फरफटत इकडून-तिकडं धावत राही. आणि दुष्ट मुलं त्याची टिंगल करत खिदळत सुटत.

तो छोट्यांतला छोटा आदमी ठरवलेल्यातले निम्मे-शिम्मे पैसे घेऊन डुगडुगत, हेलपाटत निघून जाई, तेव्हा उरलेले पैसे मागून घेण्याचे त्राण त्याच्यात उरलेले नसे आणि केल्या कष्टांच्या मानानं मिळालेलं छदाम खऱ्या हमालीच्या एकदशांशसुद्धा नाहीत, हे सांगण्याची हिंमतही!

खूप वेळानं पाऊस थांबला आणि तुंबून राहिलेलं आकाश स्वच्छ मोकळं झालं. जुन्या गादीमधला कापूस विखरून पडावा, तसे ढगांचे छोटे-छोटे पुंजके आकाशभर पसरले.

स्वयंपाकघराच्या दाराशी ओठंगून इस्था उभा होता. चिप्प भिजलेला. चेहऱ्यावर आणि एकूण उभं राहण्यातही नसलेल्या हुशारीचा डौल. त्याच्यामागं लांबलचक गवत पसरलेलं. कुत्र्याचं ते छोटं पिलूही इस्थाच्या मागोमाग घरापर्यंत आलं होतं, खालच्याच पायरीवर काकडून उभं होतं. घराच्या छपराशेजारून बांधलेल्या गंजक्या पन्हाळ्या अजूनही पावसाचे उरलेसुरले थेंब गाळत होत्या. पाटीला लावलेले रंगीबेरंगी मणी असावेत, तसे चकचकीत तेजस्वी थेंब छपराच्या कडेनं ओघळत होते.

टी. व्ही.च्या पडद्यावर खिळलेली नजर उचलून बेबी कोचम्मानं जरा वर पाहिलं, तेव्हा कुठं तिला इस्था दिसला.

'आला ग तो ऽऽ ऐकलंस का?' आवाजाची पट्टी जराही न उतरवता तिनं राहेलला ओरडून सांगितलं. 'आता बघ. एक शब्दही बोलायचा नाही तुझ्याशी. उठेल आणि सरळ आपल्या खोलीत निघून जाईल. बघ आता.'

तेवढ्यात ते छोटं पिलू टुणकन् उडी मारून वर चढलं. त्याला इस्थाबरोबरच संयुक्त गृहप्रवेश करायचा होता जणू. पिलाला बघून कोचु मारिया चिडली. बसल्या जागी जमिनीवर हात आपटत तिनं पिलाला हाकलण्याचा जोरदार प्रयत्न करून पाहिला.

'हट् हट्... शुक शुक... पोडा पट्टी!'

पिलू शांतपणे थोडंसं दूर गेलं. हा तमाशा आता त्याच्याही सवयीचा झाला असावा.

‘बघ, बघ,’ अजून बेबी कोचम्माची रग जिरली नव्हती. ‘तो आता सरळ आपल्या खोलीत जाईल आणि कपडे धूत बसेल. असलं कसलं स्वच्छतेचं वेड? अतिच करतो हल्ली... एक शब्द बोलेल तर शपथ!’

मैदानावर चाललेल्या सामन्याच्या पंचाने गवतात लपलेला एखादा प्राणी अचूक हुडकून काढावा, तसा रुबाब बेबी कोचम्माच्या शब्दांत ठासून भरला होता. तो प्राणी कोण आहे, कसा वागेल, कशा हालचाली करील, याचा अचूक अंदाज अगदी छातीठोकपणे वर्तवावा, तसं बेबी कोचम्माचं चाललं होतं... इस्थाच्या बाबतीत.

वरून आत वळलेल्या फुलांच्या पाकळ्यांसारखे इस्थाचे ओले केस उलटे फिरले होते. एकमेकांशी चिकटलेल्या केसांच्या पुंजक्यांमधून दिसणारी डोक्याची पांढरी त्वचा आणि दोन्ही गालांवरून, गळ्याभोवतीनं भसाभसा ओघळणारं पाणी... तशाच भिजल्या अवतारात इस्था घरात आला आणि आपल्या खोलीच्या दिशेनं सरळ निघून गेला.

बेबी कोचम्माच्या भांबावल्या, भंजाळल्या मस्तकाभोवती एकाएकी दिव्य तेजोवलय दिसू लागलं. सर्वज्ञ ईश्वरासारखा गूढ-गंभीर चेहरा करून ती म्हणाली,

‘बघितलंस? तरी मी सांगतच होते.’

तेवढ्यात संधी साधून कोचु मारियाने टी.ी व्ही.चे खटके पिरगळले. खटाखट चॅनेल्स बदलली आणि ‘प्राईम बॉडीज्’वर एक ओझरती उत्सुक नजर टाकून घेतली.

इस्थाच्या मागोमाग राहेलही गेली. त्याच्या खोलीत, म्हणजे अम्मूच्या... इस्थाच्या आधी अम्मूच वापरत असे ती खोली.

खोली म्हणजे रहस्यच होतं. तिनं इस्थाच्या व्यक्तिमत्त्वाचा अंश न् अंश जपून, सांभाळून ठेवला होता. चुरगळलेल्या चादरीचे मळकट ढीग, पायांतून काढून अस्ताव्यस्त फेकलेले बूट किंवा खुर्चीच्या पाठीवर कधीचा पडलेला ओल्या टॉवेलचा गोळा किंवा अर्धवट वाचून इकडं-तिकडं टाकलेलं दुमडल्या पानांचं पुस्तक... असलं काहीही नव्हतं त्या खोलीत. सगळीकडे नुसती टापटीप आणि स्वच्छतेचा लखलखाट. एखाद्या जाणकार, कामसू नर्सनं हॉस्पिटलच्या खोलीत मांडावी, तशी शिस्त. स्वच्छ चकचकीत फारशी, पांढऱ्या शुभ्र भिंती, काळजीपूर्वक बंद केलेली कपाटं, नीट रांगेत मांडलेल्या चपला. कचऱ्याची टोपलीसुद्धा रिकामी आणि स्वच्छ.

माणसाचं मन पछाडून टाकणारी त्या खोलीतली कमालीची स्वच्छता हे इस्थाच्या जिवंतपणाचं एकमेव लक्षण होतं. या माणसाला जगत राहण्यात कदाचित थोडासा रस उरला असावा, कधीतरी कुठंतरी त्याला आयुष्याबद्दल थोडी का असेना, ओढ वाटत असावी, याची एक अंधूक शक्यता! इतरांनी घालून दिलेल्या रीतीरिवाजांचा, नीतिनियमांचा पसारा उल्लंघून का असेना, पण या माणसाला स्वत:च्या जगण्याची

स्वत:पुरती रूपरेषा तयार करायचीच, याचा एक आश्वासक प्रत्यय. खिडकीजवळ भिंतीला लागून असलेल्या इस्त्रीच्या लांबुडक्या टेबलावर उभी करून ठेवलेली इस्त्री दिसत होती आणि चुरगळलेल्या धुवट कपड्यांचा नीट घड्या घातलेला ढीग.

एखादं जीवघेणं गुपित वार्‍यावर उडून हरवून जावं, तशी नि:शब्द शांतता लटकत होती खोलीभर सगळीकडे.

आणि लहानपणीच्या खेळण्यांची भयंकर भुतं. पार अगदी छताला टांगलेल्या पंख्यापर्यंत पोचलेली. एक गलोल. मिस् मिटननं दिलेला क्वान्टा कोओला (त्याच्या डोळ्यांची बटणं ढिली पडली होती पार), हवा भरून फुगवायचा एक अजागळ हंस (त्याचंही पोट एका पोलीसवाल्याची जळती सिगारेट टोचून फुटलं होतं), पडत धडपडत चालणारी दोन बॉलपेनं आणि त्यात खाली-वर तरंगणार्‍या रेड लंडन बसेस.

खोलीत शिरल्या-शिरल्या न्हाणीघरात जाऊन इस्थानं नळ सुरू केला प्लॅस्टिकच्या रिकाम्या बादलीत पाण्याची धार वाजू लागली. अंगावरचे ओले कपडे ओढून काढता-काढता इस्था हैराण झाला. भिजून गोणपाटासारखी चिकटलेली जाडीभरडी, डार्क ब्ल्यू जीन्स कशीबशी पायांतून निघाल्यावर इस्थानं हात उंचावले आणि स्ट्रॉबेरीच्या रंगाचा लालचुटुक टी-शर्ट डोक्यावरून काढला... दोन घट्टमुट्ट पण नाजुकशा हातांची फुली त्याच्या शरीरासमोरून हलत राहिली.

दारावर राहेल येऊन उभी आहे, ती आपल्याला हाका मारतेय, हे इस्थाच्या गावीही नव्हतं. त्याचं लक्षच नव्हतं.

ओल्या अंगावरचा टी शर्ट काढल्यावर खपाटीला गेलेलं इस्थाचं पोट आणि बरगड्यांचा खुपणारा टोकदार सांगाडा राहेलला दिसला. साल सोलून काढल्यावर फळ उघडं पडावं, तशी त्याची ओलसर तपकिरी त्वचा चमकत राहिली. इस्थाचा चेहरा, मान आणि गळयाखालचा 'V' आकाराचा भाग इतर शरीरापेक्षा जरा जास्त काळवंडलेला... त्याचे हातसुद्धा जवळपास तसेच होते. उन्हानं रापलेले. अर्ध्या अर्ध्या दोन रंगांत विभागलेले. शर्टाच्या बाह्यांची उजळ सावली उमटलेले. हलक्याशा भुर्‍या कपड्यांमधला गडद तपकिरी माणूस. कॉफीचा हलका स्वाद मिसळलेलं चॉकलेट असावं, तसा. दोन्ही बाजूंनी उंचावलेली गालांची हाडं आणि झपाटलेली नजर. पांढर्‍या स्वच्छ टाइल्सनी मढवलेल्या बाथरूममधल्या कोळयासारखा. समूहाची सारी गुपितं डोळयांत ओथंबून घेणारा.

त्यानं तिला पाहिलं होतं का? की खरोखरच वेड लागलं होतं त्याला? ती तिथं उभी आहे एवढं तरी कळलं होतं का त्याला?

त्या दोघांना एकमेकांच्या उघड्या शरीरांची कधी लाज नाही वाटली फारशी. पण

खरंतर अशी उघडीवाघडी नग्न लाज म्हणजे काय, हे पुरेसं समजण्याइतपत ते वाढलेच कुठं होते एकमेकांबरोबर? एकमेकांबरोबर असताना अशी काय दुनिया पाहिली होती दोघांनी?

पण एव्हाना दिसलं होतं बरंच.

दोघंही वाढले होते पुरेसे.

म्हातारे.

जगतही राहता येईल, कदाचित मरूनही जावं लागेल, असं अर्धवट वय.

म्हातारपण.

त्या विचित्र शब्दाची राहेलला गंमतच वाटली. तिनं पुन्हा एकदा तो शब्द स्वत:शीच म्हणून पाहिला :

म्हातारपण.

राहेल बाथरूमच्या दाराशी उभी होती. लहानखुरी. अजिबात न गरगरलेले छोटे-छोटे कुल्ले ('सांग तुझ्या बायकोला, बाळंतपणाची वेळ येईल तेव्हा सीझेरियन करावं लागेल म्हणावं' पेट्रोलपंपावर सुट्ट्या पैशांची वाट बघत असताना एका तर्रर झालेल्या स्त्रीरोगतज्ज्ञ डॉक्टरमहाशयांनी तिच्या नवऱ्याला एकदा ओरडून सांगितलं होतं.). रंग उडालेल्या टी-शर्टवर एका पालीचं मोठ्ठं चित्र. भरपूर मेंदी लावलेले, गर्द लाल रंग पिऊन-पिऊन चमकणारे लांबलचक कुरळे केस. कधी निस्तेज पडून राहणारा, तर कधी झळझळत चमवâून उठणारा नाकावरचा हिरा. मनगटाभोवती केशरी, किरमिजी रंगाच्या प्रकाशवलयांचे खेळ करणारी सोन्याची सर्पमुखी बांगडी. एकमेकांशी डोकी भिडवून कुजबुजणारे छोटे-छोटे सापच जणू. त्यात तिच्या आईच्या लग्नातल्या अंगठीचं वितळलेलं सोनं होतं. राहेलच्या बाकदार देखण्या हातांच्या मनगटांचे कोपरे थोडे मऊसूत करणारं आईचं वितळलेलं सोनं.

राहेल पुष्कळशी अम्मूसारखीच दिसायला लागली होती. म्हणजे आईच्या त्वचेचा थरच्या थर घेऊन त्यातच वाढावी तिची मुलगी, तशी, दोन्ही बाजूंनी उंचावलेली गालांची हाडं. हसताना पडणाऱ्या गोड खळ्या... सगळं तसंच; पण ती अम्मूपेक्षा जरा उंच होती; शिवाय तिच्याहून बारीक, सडपातळ, जास्त काटक आणि वळणदार, अधिक टोकदार! ज्यांना गोल गरगरीत, गुबगुबीत बायका आवडतात, त्यांच्या दृष्टीनं अर्थातच पाप्याचं पितर! पण तिचे डोळे विलक्षण सुंदर होते. भोकरासारखे टपोरे आणि पाणीदार. लॅरी मॅक्स्कॅलीन म्हणायचा, तुझ्या डोळ्यांत गुंतून पडलेला माणूस मरेल घुसमटून. स्वत:चा जीव देऊनच त्यानं शोधलं होतं हे रहस्य.

समोर उभ्या असलेल्या भावाच्या नग्न शरीरावर राहेल आपल्या खुणा शोधत राहिली. त्याच्या पावलांची बाकदार कमान. दोन्ही खांद्याचा उतार. गुडघ्यांपर्यंत पोचणाऱ्या त्याच्या हातांमधले कोन. वर उचकटलेली पावलांची नखं. देखण्या लिंगाच्या दोन्ही बाजूंना कोरून काढाव्या तशा पोकळ्या आणि घट्टमुट्ट कुल्ल्यांच्या दोन्ही बाजूंची कातीव अर्धगोलाकार वळणं. खरंतर पुरुषांचे कुल्ले कधी फारसे वाढत नाहीत. खांद्यावर लटकवलेलं पाटीपुस्तकांचं दप्तर असावं, तसे लहानपणच्याच आठवणीत बुडून गेलेले असतात ते, पण इस्थाचे कुल्ले पुष्ट, उभाराचे. दंडावर चमकणाऱ्या नाण्यांसारख्या लस टोचल्याच्या दोन ठळक खुणा. राहेलला मात्र मांडीवर टोचली होती लस.

अम्मू म्हणायची, मुलींना नेहमी मांडीवरच टोचतात.

एखाद्या आईनं आपल्या भिजून काकडलेल्या मुलाकडे बघत राहावं, तशी राहेलची नजर इस्थावर खिळली होती. कधी त्या नजरेत भावाकडे पाहणाऱ्या बहिणीची नजर मिसळे, तर कधी नग्न पुरुषाकडे पाहणाऱ्या स्त्रीची. एकाच नाळेतून जन्मलेल्या एकाच प्राणाच्या दोन शरीरांपैकी एकाची नजरही होतीच दुसऱ्याला पाहणारी. एकाच वेळी अनेक नजरांचे पतंग उडत होते आभाळभर... राहेलचे डोळे इस्थावर खिळलेले.

कोण होता तो?

योगायोगाने भेटलेला एक अनोळखी नग्न पुरुष? की जगणं अस्तित्वात येण्यापूर्वी श्वासांचे हिशेब सुरू होण्यापूर्वीपासूनची ओळख सांगणारा कुणी?... तोच तर तिला पोहायला घेऊन गेला होता.

दोन्ही गोष्टी दोन टोकांच्या... दोन ध्रुवच. ज्यांना कधीही एकमेकांशी जुळवता येणार नाही, असे. एकमेकांपासून शतयोजनं लांब... दूरवर.

तेवढ्यात इस्थाच्या कानाच्या पाळीवर एक टपोरा थेंब घरंगळत आला. झगमगत्या पाऱ्याचा तेजस्वी गोळा! राहेल पटकन् पुढं झाली. त्या थेंबाला स्पर्श केला. तिथून उचलून तळहातावर घेतला.

इस्थानं तिच्याकडे पाहिलंसुद्धा नाही. तो त्याच्या नि:शब्द एकान्तात कधीचा परतून गेला होता. सगळ्या भावभावना जणू त्याच्या शरीरानं ओढून घेतल्या होत्या आपल्या गर्भात आणि कुणा परक्याला पोचताच येऊ नये, अशा खोल कोनाड्यात दडपून ठेवल्या होत्या. त्वचेच्या पृष्ठभागावर फक्त नि:शब्द शांतता, बाकी कसला मागमूस नाही.

धावपळीत असलेल्या कोळ्याच्या मादीने आपल्या पायापायांचं जंजाळ सावरून वरवर चढत जावं, तसे बाथरूमच्या गुळगुळीत भिंतीवरून मौनाच्या स्तब्धतेने शून्य धागे सरसरत वर गेले.

अंगावरून ओढून काढलेले ओले कपडे इस्थानं बादलीत टाकले... आणि निळ्या साबणाची छोटीशी वडी घेऊन तो ते धुवायला बसला.

प्रकरण ४
अभिलाष टॉकीज्

सत्तर एम. एम.चा सिनेमास्कोप पडदा असलेलं केरळमधलं पहिलं सिनेमाथिएटर म्हणून 'अभिलाष टॉकीज' स्वत:ची जाहिरात करत असे. हा दावा सिद्ध करण्यासाठी म्हणून गोलाकार सिनेमास्कोप पडद्याची सिमेंटमध्ये बनवलेली मोठी प्रतिकृती टॉकीजच्या प्रवेशद्वारावरच बसवून टाकली होती. त्याच्यावर इंग्रजी आणि मल्याळम अशा दोन्ही भाषांमध्ये लिहिलं होतं.

अभिलाष टॉकीज

शिवाय चोहींकडून निऑन प्रकाशझोतांचा झगमगाट.

टॉकीजमधल्या मुतार्‍यांवरसुद्धा नावं लिहिली होती HIS आणि HERS

अम्मू, राहेल, बेबी कोचम्मा यांच्यासारख्यांसाठी HERS आणि इस्थासाठी HIS. चाको नव्हताच कारण. हॉटेल सी क्वीनमधल्या बुकिंगची व्यवस्था बघण्यासाठी म्हणून तो जो गेला, तो गेलाच.

'जाशील? एकटा?'

अम्मूनं जरा सचिंत आवाजात विचारलं.

इस्थानं मान हलवली.

त्याला चालणार होतं... एकट्यानं जाणं.

हलकेच उघडणार्‍या आणि आपोआप बंद होणार्‍या लालचुटूक दारातून अम्मू आणि बेबी कोचम्मा HERS मध्ये शिरल्या, मागोमाग राहेल. आत जाता- जाता गुळगुळीत संगमरवरी फरशीवरून गर्रकन् मागे वळत तिनं इस्थाला हात केला. नवे कोरे कपडे घातलेला, केसांचा भांग पाडलेला इस्था एकटाच उभा होता. हात हलवणारी राहेल लालचुटूक दाराच्या पोटात अदृश्य होईपर्यंत त्या घाणेरड्या, ओलसर लॉबीतल्या आरशांकडे टकमक पाहत इस्था तसाच उभा राहिला. राहेल दिसेनाशी झाल्यावर मग तो हलकेच वळला आणि HIS च्या दिशेनं निघाला.

तोपर्यंत HERS मधला कार्यक्रम सुरू झाला होता. अम्मू राहेलला म्हणाली,

'भांड्यावर कुल्ले न टेकवता वरच्यावर ओणवी राहा आणि सू-सू कर. सार्वजनिक मुतार्‍या घाणेरड्या असतात ना, म्हणून!'

तशा तर सार्वजनिक नोटासुद्धा गलिच्छच असतात. कोण जाणे कुणाकुणाचे घाण हात लागत असतील नोटांना. कुष्ठरोगी, महारोगी, कसाई, खाटीक, कार मेकॅनिक्स (म्हणजे पांढरट हिरवट पू, लालभडक रक्त आणि काळंबेंद्रं चिकट ग्रीस.).

एकदा कधीतरी कोचू मारियानं राहेलला आपल्याबरोबर खाटकाच्या दुकानात नेलं

होतं. तेव्हा त्यानं परत केलेल्या पाच रुपयाच्या हिरव्या नोटेवर लाल मांसाचा एक छोटासा गोळा चिकटलाय, हे राहेलच्या लक्षात आलं होतं. लगेचच कोचू मारियानं अंगठा फिरवून नोट स्वच्छ पुसून घेतली. मांसाचा थेंब निघून गेला, तरी लालसर डाग पडलाच नोटेवर. कोचु मारियानं नोट उचलली आणि चोळीच्या आत सरकवली. ताज्या मांसाचा वास मारणारा रक्ताळलेला पैसा.

मुतारीतल्या भांड्याच्या मानानं राहेल खूपच बुटकी होती. तिला काही केल्या हवेतल्या हवेत सू सू करता येईना. मग अम्मू आणि बेबी कोचम्मानं बखोटी धरून राहेलला उचललं. बाटाच्या सँडलमध्ये घट्ट बसलेल्या पावलांचे पाय लोंबकळत होते. चड्डी काढून ती उंच हवेत तरंगत होती. पण काहीच होईना. राहेलनं खट्याळ नजरेनं दोघींकडं बघितलं. आता? पुढं काय?

'आटप लवकर,' अम्मू घाईने म्हणाली, 'स्स्ऽऽऽऽ'

सू सू साठी स् ऽऽऽऽऽऽ आणि म्यूऽऽझिक साठी म्ऽऽऽऽ

राहेल, अम्मू आणि बेबी कोचम्मा तिघीही खुदुखुदु हसत होत्या. अखेर एकदाची धार सुरू झाल्यावर दोघींनी मिळून राहेलला नीट धरलं. धार बरोबर भांड्यात पडेल, असं. राहेलला मुळीच कसली लाजबीज वाटत नव्हती. तिची सू सू आटोपल्यावर अम्मूनं एक टॉयलेट पेपर राहेलच्या हातात दिला.

'तू जातेस आता, की मी जाऊ?' बेबी कोचम्मानं अम्मूला विचारलं.

'कसंही चालेल,' अम्मू म्हणाली, 'तुम्ही जा आधी.'

हातातली छोटी बॅग राहेलकडे देऊन बेबी कोचम्मानं आपली चुरगळलेली साडी अलगद वर उचलली. तिच्या नाजूक, नितळ उघड्या पायांकडे राहेल टक लावून बघत होती (पुढे पुष्कळ वर्षांनी इतिहासाचा एक धडा वर्गात वाचला जाणार होता – 'बादशहा बाबरची गव्हाळ कांती विलक्षण चमकत असे. त्याच्या मांड्या म्हणजे ताशीव खांबच जणू! हे दृश्य एकाएकी राहेलच्या नजरेसमोर उभं राहिलं.).

एखाद्या मोठ्या पक्ष्याचं धूड असावं, तशी बेबी कोचम्मा मुतारीच्या त्या सार्वजनिक भांड्यावर बसत होती. तिच्या गोऱ्यापान पारदर्शक मांड्यांमधून निळ्या रक्तवाहिन्यांची जाळीच्या जाळी धावत होती. भल्यामोठ्या गुडघ्यांवर खड्डे आणि त्या खड्ड्यांमधून उगवलेले केस. अवाढव्य शरीराचा प्रचंड भार निमूट सोसणारी बेबी कोचम्माची लहानखुरी नाजूक पावलं दमली होती बिचारी. बेबी कोचम्मानं जेमतेम क्षण-अर्धा क्षण एवढीच वाट पाहिली. डोकं थोडंसं पुढं झुकवलं. ब्लाऊजमधून लोंबणाऱ्या कलिंगडांना हेलकावे देत बूड थोडं वर उचललं आणि थोडासाच जोर लावला. मग हुश्श करीत भांड्यामधून धावणाऱ्या पिवळट झऱ्याचा आवाज डोळ्यांनी ऐकत ती एकदम स्वस्थ झाली.

राहेलला हे सगळं जाम आवडत होतं. सगळ्यांच्या बॅगा घेऊन उभं राहणं आणि सगळ्यांनी सगळ्यांच्या डोळ्यांदेखत सू सू करणं. मित्रामित्रांच्यात असावं, तसं. मित्रत्वाचं हे गूढ किती मौल्यवान असतं, हे तिला ठाऊक नव्हतं तेव्हा. त्या तिघी पुन्हा कधीही अशा मित्रामित्रांसारख्या एकत्र येणार नाहीत – अम्मू, बेबी कोचम्मा आणि ती – हेसुद्धा राहेलला ठाऊक नव्हतं.

बेबी कोचम्माचं आवरल्यावर राहेलनं सहज घड्याळाकडे नजर टाकली.

'किती वेळ बेबी कोचम्मा!', ती वैतागून म्हणाली, 'दोन वाजायला फक्त दहा मिनिटं शिल्लक आहेत.'

रबाडब डब
थ्री विमेन इन अ टब
टॅरी अ व्हाईल सेड स्लो

– राहेलचा मनाशी काहीतरी चाळा चालू होता. तिला वाटलं, हे असं रेंगाळणंच माणूस झालं, तर? टॅरी अ व्हील सेड स्लो... म्हणजे स्लो कुरियन, स्लो कुट्टी, स्लो मॉल, स्लो कोचम्मा... असं.

स्लो कुट्टी, फास्ट व्हर्गिस अॅन्ड कुरियाकोसे. थ्री ब्रदर्स विथ् डॅन्ड्रफ.

– अम्मूनं एकदम गुपचूप सूसू उरकली. इतकी गुपचूप आणि अशा हुशारीनं, की तिच्या सूसूचा जरासुद्धा आवाज आला नाही. तिच्या वडलांची ताठर नजर अम्मूच्या डोळ्यांतून अचानकच उतरलेली होती. अम्मूचे डोळे परत एकदा अम्मूच्या वडिलांच्या डोळ्यांसारखे दिसायला लागले. हसता-हसता तिच्या गालांना चक्क खळ्या पडत होत्या. वेलुथाच्या प्रकरणाबद्दलचा राग किंवा थुंकीच्या बुडबुड्यांबद्दलचा तो तिखट संताप – सगळं तिच्या चेहऱ्यावरून पुसलं गेलं होतं. अम्मू छान हसतमुख दिसायला लागली.

छान वाटत होतं.

HIS मध्ये एकट्याच गेलेल्या इस्थाला उग्र वासाच्या डांबरगोळ्या आणि सिगारेटच्या चुरडलेल्या थोटकांनी भरून वाहणाऱ्या भांड्यात सूसू करावी लागली. खाली जमिनीत बसवलेल्या भांड्यात सूसू करणं खूप सोपं होतं; पण असली तडजोड आणि त्यातला पराभव इस्थाला मुळीच मान्य नव्हता. तो बुटका आणि सूसूचं गोल भांडं पुष्कळ वर लटकवलेलं. काय बरं करावं? त्याला काहीतरी 'उंच' हवं होतं. इकडंतिकडं बघितल्यावर मुतारीच्या (HIS) एका कोपऱ्यात त्याचं लक्ष गेलं. तिथं एक घाणेरडा खराटा होता, कुठल्यातरी सरबताच्या रिकाम्या बाटलीत भरलेलं पांढरं-पांढरं पाणी (फिनेल) होतं, छोट्या काठीला गुंडाळलेलं फरशी पुसायचं पोतेरं आणि दोन गंजके डबे. शिवाय कॅन. ते रिकामेच होते. कुणास ठाऊक, कसले? कदाचित पॅराडाईज पिकल्समधलेच असतील. साखरेच्या पाकातले अननसाचे तुकडे, किंवा स्लाईसेस्... चकत्या. अननसाच्या चकत्या.

आजीच्या हातचे ते कॅन्स बघून इस्थाचा ऊर अभिमानानं भरून आला. मग त्यानं एकट्यानं ते कॅन्स उचलून आणले आणि सूसूच्या भांड्याजवळ एकावर एक रचले. मग तो सावकाश चढून त्या कॅन्सवर उभा राहिला आणि अजिबात आवाज न करता त्याने शांतपणानं, काळजीपूर्वक सूसू केली. मोठ्या माणसासारखी. पुरुषासारखी. सिगारेटची थोटकं जरा जास्तच ओली झाली. ती पुन्हा पेटवून झुरके घेणं मुश्कीलच होतं आता. सू सू करून झाल्यावर इस्थाने सगळे कॅन्स उचलले आणि आरशाखालच्या बेसिनशेजारी नेऊन रचले. नळ सोडून हात धुतले. केसांवरूनही ओला हात फिरवला. अम्मूच्या खूप मोठ्या कंगव्यामुळं विस्कटलेला केसांचा कोंबडा पुन्हा एकदा नीट केला. खिशातल्या कंगव्यानं सगळे केस मागं सारले. पुन्हा थोडे पुढे ढकलले आणि दोन्ही बाजूंनी नीट वळवले. कंगवा नीट खिशात ठेवला. सावकाश खाली उतरून सगळे कॅन्स पुन्हा होते तिथं नेऊन ठेवले. त्या सगळ्या वस्तूंना इस्थानं कमरेत झुकून एक नमस्कारही ठोकला... ती बाटली, झाडू, कॅन्स आणि फरशी पुसायचं पोतेरं.

'वाक खाली' तो स्वत:शीच म्हणाला आणि हसला. खूप लहान असताना त्याला वाटायचं, की अभिवादनासाठी खाली वाकताना 'वाक' असं म्हणावंच लागतं. रीतीप्रमाणे. काही करताना, जे करतोय ते म्हणायचं. 'वाक खाली, इस्था' कुणीतरी सांगायचं. तो वाकायचा आणि म्हणायचा, 'वाक.' मग ते सगळे आपापसांत हसत बसायचे आणि तो काळजीत पडायचा. काय चुकलं? हे सगळे का हसतात?

नुक्ते नुक्ते उगवलेले त्याचे लहानमोठे दात आणि एकटाच इस्था.

'HIS' च्या बाहेर येऊन इस्था तिघींची वाट पाहत एकटाच उभा होता. बाहेर आल्यावर अम्मूनं उत्सुकतेनं विचारलं,

'इस्थापन, झालं?'

तो म्हणाला,

'हो.'

भांग आणि कोंबडा विस्कटणार नाही, अशा बेतानं त्यानं मान हलवली.

झालं – झालं.

इस्थानं आपल्या खिशातला कंगवा पुन्हा अम्मूच्या हँडबॅगमध्ये ठेवला. इस्था पहिल्यांदाच इतक्या जबाबदारीनं वागत होता. मोठ्या मुलांनी एकट्यानं करायचं कामही त्यानं पहिल्यांदाच एकट्यानं आणि न घाबरता केलं होतं. आपल्या शहाण्या, अबोल मुलाबद्दल अम्मूच्या मनात माया दाटून आली. तिनं इस्थाला जवळ घेऊन प्रेमाने त्याच्या केसांतून बोटं फिरवली. इस्थाचा भांग (आणि कोंबडा) पुन्हा एकदा विस्कटला.

स्टीलची 'एव्हररेडी' बॅटरी हातात घेऊन इकडं-तिकडं फिरणारा एक माणूस या पलटणीकडं बघून वैतागाने म्हणाला, 'सिनेमा सुरू झालासुद्धा. जा आता. पळा लवकर!'

अम्मू, बेबी कोचम्मा, इस्था आणि राहेल लाल जिन्याच्या पायऱ्या लगबगीनं चढत धावतच निघाले. जुनाट डुगडुगत्या पायऱ्यांवर तसलाच लाल गालिचा. आणि लाल जिन्याच्या लाल कोपऱ्यात पानाच्या पिचकाऱ्यांचे लाललाल डाग. बॅटरीवाला माणूस कमरेची चुरगळलेली मुंडू सावरत भराभर जिना चढून वर निघाला. चढण्याच्या घाईगडबडीत टरटरून फुगलेल्या त्याच्या पोटऱ्यांमधले गोळे आणखी टणक, घट्ट होत गेले. गोलगरगरीत तोफगोळ्यांवर केस फुटावेत, तसे. उजव्या हातात बॅटरी घेऊन तो तीरासारखा सरसरत जिना चढून गेला.

'खूपच वेळ झालाय िसनेमा सुरू होऊन.' तो म्हणत होता.

म्हणजे सुरुवात चुकलीच होती. संथपणे वरवर सरकत जाणारा चुण्याचुण्यांचा वेल्वेटचा पडदा, छोट्या-छोट्या दिव्यांच्या प्रकाशात झगमगणारे पडद्याचे पिवळे गोंडे आणि पडदा वर जात असतानाच सुरू होणारं म्युझिक... 'हतारी'मधलं 'बेबी एलिफन्ट वॉक' किंवा 'कर्नल बोगीज मार्च... 'सगळंच चुकलं होतं.

अम्मूनं इस्थाचा हात धरलेला. धापा टाकत जिना चढणाऱ्या बेबी कोचम्मानं राहेलचा. ब्लाऊजमधून ओसंडणाऱ्या कलिंगडांच्या भारानं वाकलेल्या बेबी कोचम्माच्या मनातली 'सिनेमा बघण्याची उत्सुकता' तिच्या चेहऱ्यावर मुळीसुद्धा दिसत नव्हती. हे सगळं आपण केवळ मुलांसाठी करतोय, असं तिनं स्वत:च स्वत:ला पटवून टाकलं होतं. तिनं लोकांसाठी काय काय केलं आणि लोकांनी तिच्यासाठी काहीच कसं केलं नाही, याचे लंबेचौडे हिशेबही बेबी कोचम्माजवळ तयार होते.

'साऊंड ऑफ म्युझिक'मधले सुरुवातीचे नन्सचे प्रवेश बेबी कोचम्माला फार आवडत. तेवढे तरी बघायला मिळू देत, असं मात्र तिला सारखं वाटत होतं. 'लोकांना आपल्या स्वत:च्या आयुष्याचं प्रतिबिंब पडद्यावर बघायला फार आवडतं,' असं एकदा अम्मू म्हणाली होती, ते राहेलला आठवलं. तिनं मनातल्या मनात विचार केला, आपल्याशी या सिनेमातलं कोण जुळेल? – तर कॅप्टन वॉन ट्रॅपची भूमिका करणारा ख्रिस्तोफर प्लमर. चाकोला मात्र तो मुळीच आवडायचा नाही. चाको त्याला कॅप्टन वॉन क्लॅप ट्रॅप म्हणे.

इकडून-तिकडं टणाटण उडणाऱ्या एखाद्या डासासारखी राहेलची अवस्था झाली होती. स्वत:च्या शरीराचं वजनदेखील वाऱ्यावर भिरकावून मस्त मजेत विहरणारा आनंदी डास. दोन पायऱ्या वर, दोन पायऱ्या खाली, पुन्हा एक पाऊल वर, अशी जिन्यावर धमाल चालली होती. बेबी कोचम्मा एक पायरी चढून जाईजाईपर्यंत राहेलची किमान पाच उड्डाणं वरून खाली, खालून वर आणि तोंडात गाणं. बटबटीत डोळ्यांच्या खलाशाचं. आणि त्याच्या काफिल्याचं.

आय् अॅम पॉपआय् द सेलर मॅन डमडम

आय लिव्ह इन अ कार-वाँ आय ओऽऽपन द डोअर

अॅन्ड फॉल ऑन द प्लो-अर

आय अॅम पॉपआय् द सेलर मॅन डमडम

दोन पायऱ्या वर, दोन पायऱ्या खाली. पुन्हा एक पाऊल वर. उड्या उड्या. उड्याच उड्या.

'राहेल,' अम्मू ओरडली, 'तुला अजून अक्कल येत नाही का, ग? तू कधी शिकणार?'

राहेल शिकली शेवटी.

आनंदासाठी अशी उताविळी केली की, अखेरीस दु:खच वाट्याला येतं.

जिना चढून सगळे जण 'अभिलाष टॉकीज'च्या प्रिन्सेस् सर्कल लॉबीमध्ये आले. बाजूलाच मांडलेलं खाद्यपदार्थांचं काऊंटर ओलांडून भराभर पुढं सरकले. काऊंटरवर ऑरेंजड्रिंक होतं, लेमनड्रिंकही होतं. खूपच नारिंगी. खूप खूप पिवळं. चॉकलेट्ससुद्धा खूपच नरम-नरम. वितळलेली.

बॅटरीवाल्या माणसानं लॉबीचा दरवाजा उघडला. आत पंख्यांवर गरगरणारा, शेंगदाणे खाण्याच्या कुरकुर आवाजानं गजबजलेला अंधारच अंधार पसरलेला. त्या काळ्याभोर अंधाराला केसांवर थापलेल्या उग्र तेलांचा, लोकांच्या श्वासोच्छ्वासांचा वास येत होता. शिवाय जुनाट गालिच्याची थोडीशी कोंदट घाण. 'साऊंड ऑफ म्युझिक'चा तो जादुई वास राहेलला जाम आवडला आणि लक्षात पण राहिला. संगीताच्या मधुर सुरांसारखा वास. राहेलनं खोल-खोल श्वास घेऊन जन्मोजन्मी पुरेल, इतका वास आत ओढून घेतला आणि झाकण बंद करून टाकलं.

तिकिटं इस्थाच्या हातात होती... छोटा माणूस. काफिल्यामध्ये राहणारा. डमडम.

बॅटरीवाल्यानं इस्थाच्या हातातल्या गुलाबी तिकिटांवर मोठ्ठा झोत टाकला. 'जे' रांग. आणि नंबर – १७, १८, १९, २०. इस्था, अम्मू, राहेल आणि बेबी कोचम्मा. आधीपासून आपापल्या खुर्च्यांवर येऊन बसलेल्या लोकांना ढोसत, पिळवटत आपापल्या खुर्च्यांवर पोचायचं. वैतागलेल्या लोकांनी पाय बाजूला घेत-घेत कसाबसा रस्ता करून दिला. खुर्च्यांच्या बैठका खाली ओढायच्या आणि पटकन त्यांवर बसायचं होतं. बेबी कोचम्मानं राहेलची 'सीट' खाली ओढून धरली होती. राहेल खुर्चीवर चढून बसली; पण तेवढ्या हलक्या वजनाचं खुर्चीला कसलं आलंय् अप्रूप? खुर्ची पुन्हा एकदा अर्धवट मिटली. मध्ये राहेल. सँडवीचमधल्या चटणीसारखी. तिनं तिच्या दोन गुडघ्यांच्या मधून समोरच्या पडद्यावर डोळे खिळवले. दोन गुडघे. त्यांच्यामध्ये 'लव्ह इन टोकियो'ने बांधलेलं डोक्यावरचं कारंजं. इस्था मात्र आजच 'मोठा' झाला होता. तो अगदी जपून खुर्चीच्या कडेवरच बसला.

सिनेमास्कोप पडद्याच्या दोन्ही बाजूंना छतावर गरगरणाऱ्या पंख्यांच्या सावल्या

फिरत होत्या.

बॅटरी विझली. सिनेमा सुरू झाला.

ऑस्ट्रेलियातल्या निळ्याभोर आकाशातून कॅमेरा तरंगत-तरंगत निघाला होता आणि मागं चर्चबेल्सचा करुण ध्वनी.

खूप-खूप खाली पृथ्वीच्या पाठीवर एका भव्य चर्चच्या आवारात नदीतले गोटे चकाकत होते. नन्सची ये-जा चालली होती. हलके-हलके जळणारा चिरूट असावा, तशी स्तब्ध हालचाल. शांत चेहऱ्याच्या नन्स हलके हलके मदर रेव्हरंडभोवती (ती कधीच त्यांची खाजगी पत्रं चोरून वाचत नसे.) जमल्या. पावाच्या कणाभोवती मुंग्यांची झुंड गोळा व्हावी, तशा. त्यांच्या गुडघ्यांवर केस नव्हते. ब्लाऊजमधून लोंबणारी कलिंगडंसुद्धा छातीवर नव्हती. आणि सगळ्यांचे श्वास पेपरमिंटसारखे. सगळ्या जणी आपापल्या तकरारी मांडण्यासाठी मदर रेव्हरंडभोवती जमल्या होत्या. ज्यूली अॅन्ड्रयूजबद्दलच्या गोड तकरारी. ज्यूली आजही डोंगरमाथ्यावरच कुठंतरी भटकत होती. 'द हिल्स आर अलाईव्ह, विथ द साऊंड ऑफ म्युझिक'च्या लडिवाळ सुरावटी पोटात भरून अशीच नेहमी भटकते कुठे कुठे. आज पुन्हा एकदा तिला उशीर झाला होता. मठात धर्मविधी सुरू व्हायची वेळ झाली, तरी वेडीचा पत्ताच नव्हता.

सगळ्या नन्स गातगात ज्यूलीच्या चहाड्या सांगत राहिल्या.

शी क्लाइम्ब्स् अ ट्री

अँ स्क्रॅप्स हर नीज्

कुठेकुठे झाडांवर चढते-पडते, धडपडते. आणि गुडघे फुटून जातात पुन्हा पुन्हा.

हर ड्रेस हॅज गॉट टीअर,

शी वॉल्टझ् ऑन हर वे टु मास

अॅन्ड व्हिसल्स ऑन द स्टेअर

तिचे कपडे उसवले, फाटले, तरी तिला शुद्ध नसते. मठात येते, तीसुद्धा नृत्याच्या पावलांवर झुलत आणि जिन्यांच्या पायऱ्या चढताना शीळ घालते धुंद होऊन...

अचानक समोर बघणाऱ्या लोकांच्या माना मागं वळायला लागल्या.

'शुक शुक' कुणीतरी हटकलं.

शुक शुक... शुक शुक...

'अँड अन्डरनिथ् हर विम्पल। शी हॅज कर्लस् इन हर हेअर'

तिच्या डोक्यावरचं ते परित्यक्त वस्त्र दूर करून पाहा... त्याच्या आड कुरळ्या कुरळ्या केसांना कसा बहर आलाय...

सिनेमाच्या पडद्याबाहेरून कुठून तरी आवाज येत होता.

पंख्यांवर गरगरणारा, शेंगदाणे खाण्याच्या कुरकुर आवाजानं गजबजलेला अंधार

मधोमध चिरणारा आवाज. स्वच्छ आणि स्पष्ट. त्यातून त्या शेकडो प्रेक्षकांमध्ये एक नन बसलेली. बाटलीच्या गळ्याभोवती झाकण फिरावं, तशा गरगरत माना वळल्या. काळ्याभोर केसांनी झाकलेल्या डोक्यांना मागच्या बाजूनं तोंडं फुटली. मिशा आल्या. मागच्यामागं चेहरे तयार झाले. शार्कएवढ्या अजस्र दातांनी फुसफुसणारी तोंडं... हजारो तोंडं.

'शूऽऽऽ' – एक चिडका आवाज. एकदम.

इस्थाच गात होता. केसांचा कोंबडा काढलेली नन बनून. थांबावं म्हटलं, तरी थांबणं त्याच्या हातात नव्हतं.

'ओऽऽ शुक शुकऽऽ बाहेर घेऊन जा त्याला' – तो इस्थाच आहे, हे नक्की झाल्यावर हुकूम सुटला.

'शटअप ऑर गेट आऊट!'

– गप्प बसा किंवा बाहेर तरी व्हा.

'गेटआऊट ऑर शटअप्.'

– बाहेर व्हा किंवा गप्प तरी बसा.

थिएटरमधले एवढे सगळे लोक 'बडे साहेब' होते आणि पैसे भरून तिकीट काढलेलं असलं रीतसर, तरी इस्था 'छोटा आदमी' – मोमबत्ती.

'इस्थाऽऽ कृपा करून गप्प बसायला काय घेशील?' हलक्या आवाजात अम्मू कडाडली.

म्हणून मग इस्था गप्प बसला. वचवचणारी तोंडं आणि रागानं थरथरणाऱ्या मिशा पुन्हा वळून पडद्यावर खिळल्या; पण काही क्षणांतच थांबलेलं गाणं पुन्हा परतून आलं. इस्थाच्याही नकळत. अम्मूचा धाक असूनही इस्थाला ते थांबवताच येईना.

'अम्मू, मी बाहेर जाऊन गाणं म्हणू?'

अम्मूच्या रागाचा भडका उडायच्या आत इस्थानं स्वत:च विचारलं,

'गाणं संपलं, की मी परत येईन.'

'काय वाट्टेल ते कर; पण पुन्हा सिनेमाला जायचं नाव काढलंस, तर खबरदार.' अम्मू करवादली.

'एकट्या तुझ्यामुळं आज इथे सगळ्यांची लाज गेलीय लक्षात ठेव.'

पण इस्थाचा काही इलाजच चालत नव्हता. बाहेर जायचं, म्हणून तो सरळ उठून उभा राहिला. रागावलेल्या अम्मूला ओलांडून, दोन्ही गुडघ्यांमधून एकटक 'साऊंड ऑफ म्युझिक' पाहणारी राहेल आणि तिच्या शेजारच्या बेबी कोचम्माला ओलांडून इस्था पुढे पुढे सरकत होता. वाटेतले लोक पायांच्या जुड्या इकडेतिकडे करण्याच्या वैतागानं त्रासून पडद्याऐवजी त्याच्याकडेच पाहत होते. एका दाराच्या डोक्यावर लाल अक्षरात लिहिलं होतं – EXIT... बाहेर जाण्याचा मार्ग. त्याच दरातून इस्था शांतपणं बाहेर निघून गेला.

लॉबीमध्ये ऑरेंजड्रिंक, लेमनड्रिंकच्या बाटल्या कधीच्या वाट पाहत पडल्या होत्या. शिवाय नरम-नरम चॉकलेट्स. निळ्या रंगाचे लांबलचक सोफे आणि काचेच्या चौकटीत झळकणारी 'कमिंगसून'वाली पोस्टर्स... सगळेच जण वाट पाहून पाहून थकलेले पार.

'अभिलाष टॉकीज'च्या प्रिन्सेस् सर्कल लॉबीमधल्या त्या निळ्या सोफ्यावर बसून इस्था गाऊ लागला. स्वच्छ, दाणेदार ननच्या आवाजात.

बट हाऊ डु यू मेक हर स्टे

अॅन्ड लिसन टु ऑल यू से

तिच्यावर कसा लागाम घालणार आता? रीतीभाती काय सांगतात, हे कसं समजावणार तिला?

खाद्यपदार्थांच्या काऊंटरमागे टेबलाला टेबल जोडून झोपलेला माणूस खरंतर इंटरव्हलपर्यंत मस्त ताणून देणार होता; पण इस्थाच्या गाण्यानं त्याला मध्येच जाग आली. पाणी गळणारे चिकट डोळे चोळून-चोळून त्यानं समोर पाहिलं, तर इस्था. नवेकोरे कपडे आणि बूट घालून विस्कटलेल्या भांगानं सोफ्यावर एकटाच बसलाय. जाग आल्या-आल्या त्या माणसानं हातालगतच घाणेरडं फडकं घेऊन सगळं काऊंटर खसाखसा पुसून काढलं आणि तो वाट बघत राहिला. पुन्हा फडकं मारलं. पुन्हा वाट पाहिली. समोर इस्था आपला गातच बसला होता.

हाऊ डु यू कीप अ वेव्ह अपॉन द सॅण्ड?

ओ, हाऊ डु यू सॉल्व्ह अ प्रॉब्लेम लाईक मारिया?

वाळूच्या समुद्रावर लाटा कशा आणणार? मारियाचा हा गहन प्रश्न कसा काय सोडवणार?

'एऽऽ एडा चेरुक्का!' काऊंटरवरचा तो माणूस एव्हाना प्रचंड कावला होता. झोपेनं थबथबलेल्या आवाजात त्यानं इस्थाला जोरात हाक दिली,

'काय, चाललंय् काय तुझं?'

हाऊ डु यू होल्ड अ

मूनबीम

इन युवर हँड?

आकाशीच्या चंद्रबिंबाला गवसणी कशी घालणार?

इस्था गात होता, गातच होता.

'एऽऽ' ऑरेंजड्रिंक–लेमनड्रिंकवाला माणूस आता भलताच चिडला होता. 'गप्प बसतोस की नाही? हा माझ्या विश्रांतीचा टाईमेय. नंतर उठून काम करायचंय मला. इथे उगीचच फालतू इंग्लिश गाणी म्हणून माझं डोकं उठवू नकोस. गप्प बस. ताबडतोब!'

मनगटावरच्या केसाळ जंगलात त्याचं सोनेरी घड्याळ बुडून गेलं होतं. आणि गळयातल्या सोन्याच्या साखळीभोवती छातीवरच्या केसाचं जंगल पसरलेलं. अंगात

पांढरट टेरिलीनचा शर्ट होता; पण पोटाच्या गरगरीत ढेरीपर्यंतची सगळी बटणं उघडी. त्यातून पुन्हा केसच केस. दागिन्यांनी मढलेल्या अस्वलासारखाच दिसत होता तो. त्याच्या पाठीमागं मोठे मोठे आरसे लावलेले. खाणंपिणं खरेदी करणाऱ्या माणसांना आपलं ध्यान नीट बघून घेता यावं, म्हणून... भांग विस्कटलाय का, अंबाडा सुटलाय का वगैरे. ते आरसे इस्थाकडं नजर ठेवून होते.

'तुझ्याविरुद्ध मी लेखी तकरार करू शकतो,' ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला इस्थावर चांगलाच उखडला, 'कळलं? लेखी तकरार. मग बस म्हणत गाणी.'

इस्थानं गाणं थांबवलं आणि आत जाण्यासाठी तो उठून उभा राहिला.

'नाहीतरी तुझ्या गाण्यानं माझ्या झोपेचा सत्यनाश झालाच आहे. इतका वैताग दिलास मला, आता नतद्रष्ट काट्र्या, काहीतरी विकत तरी घे. तेवढे तरी उपकार करशील की नाही?'

चेहऱ्यावर दाढीचे खुंट वाढलेला आणि पियानोच्या पट्ट्यासारखे मोठेमोठे पिवळट दात असणारा तो माणूस गिऱ्हाईक शोधू पाहत होता.

'नो, थँक्यू,' इस्था शांतपणे म्हणाला, 'माझी आई, बहीण... सगळे आत माझी वाट पाहत असतील. आणि माझ्याकडचा पॉकेटमनी पण संपलाय सगळा.'

'पॉ-के-ट-म-नी?' पिवळे दात विचकत ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला कारण नसताना खिदळला.

'इंग्लिश गाणी म्हणतोस. पॉकेटमनी बाळगतोस... अरे, माझ्या बाबा, तू आहेस तरी कोण? आणि राहतोस कुठं? चंद्रावर?'

त्याच्याकडं लक्ष न देता इस्था वळला.

'थांब, थांब!' ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्यानं घाईघाईनं त्याला थांबवलं, 'एक मिनीट फक्त.' त्याचा आवाज अचानक प्रेमळ प्रेमळ झाला होता.

'तुला विचारतोय मी काहीतरी. कुठं राहतोस?'

त्या माणसाच्या दातांमध्ये काहीतरी भलतंच गारूड होतं... रोखून बघणारं, विचकून हसणारं, मध्येच गाणारं, कसलासा वास येणारं... विचित्र गारुड!

'मी काय विचारतोय? कुठं राहतोस तू?'

'आयमेनेम,' इस्था पटकन म्हणाला. 'आयमेनेमला राहतो मी. तिथं माझ्या आजीचा लोणच्याचा कारखाना आहे. पॅराडाईज पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्. ती स्लीपिंग पार्टनर आहे.'

'खरं की काय? या वयात?' ते पिवळे दात पुन्हा विचकले. 'कुणाबरोबर झोपते तुझी आजी?' तो इतक्या विचित्रपणे खदाखदा का हसला, ते इस्थाला मुळीच कळलं नाही.

'जाऊ दे. तुला नाही कळायचं. बच्चा आहेस अजून. हे बघ, इकडं ये. कोल्ड्रिंक

प्यायचंय?' त्यानं चक्क प्रेमानं पुन्हा इस्थाला बोलावलं. 'फुकट घे रे, माझ्यातर्फेâ. पैशाची नको काळजी करू. इकडं ये आणि तुझ्या आजीबद्दल सांग मला सगळं.'

त्या पिवळ्या दातांनी खेचत नेल्यासारखा इस्था काऊंटरपाशी गेला.

'इकडं... आत ये.' ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्याने त्याला काऊंटरच्या आत बोलावलं आणि इस्थाच्या कानाशी कुजबुजत तो म्हणाला, 'गुपचूप पी. इंटरव्हलच्या आधी इथं कुणालाच काही खातापिता येत नाही. थेटरवाल्यांना कळलं, तर दंड करतात. त्यांच्या दृष्टीनं हा म्हणजे फारच मोठा गुन्हा आहे.'

'दखलपात्र,' क्षणभर थांबून त्याने नवी शेपटी जोडली, 'म्हणजे हे गुपित उघडकीला आलं, तर शिक्षा होते बरं!'

फुकटचं कोल्ड्रिंक पिण्यासाठी म्हणून इस्था काऊंटरच्या मागं गेला. तिथं त्या माणसाला झोपण्यासाठी म्हणून तीन छोटी छोटी स्टुलं एकाला एक लागून ठेवली होती. तो बसायचा, तिथलं लाकूड जरा जास्तच चमकत होतं.

'हे बघ, जरा धरतोस का तुझ्या हातात? तोपर्यंत मी तुला तुझं कोल्ड्रिंक देतो. ऑरेंज की लेमन?'– ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या माणसानं धोतराखालून त्याचं सुरकुतलेलं विसविशीत लिंग बाहेर काढून इस्थाच्या हातात दिलं.

घाणेरडा वास येणारा तो लिबलिबीत मांसाचा गोळा मुकाट्यानं हातात धरण्यावाचून इस्थाला गत्यंतरच नव्हतं.

'काय देऊ? ऑरेंज की लेमन?' त्या माणसानं सुखावलेल्या मऊ आवाजात विचारलं, 'की लेमनऑरेंज पितोस?'

'लेमन, प्लीज' – इस्थानं आपली आवड सांगितली.

पुढच्याच क्षणी इस्थाच्या हातात लेमनड्रिंकची थंडगार बाटली आली. बरोबर एक स्ट्रॉ पण. मग त्यानं एका हातात बाटली धरली आणि दुसऱ्या हातात ते धोतराखालचं लिंग. आता ते फुगलं होतं चांगलं. गरम झालं होतं आणि आत शिराशिरा पण जाणवत होत्या.

इस्थाला कसंतरीच वाटलं. गिळगिळीत.

ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या माणसानं इस्थाच्या हातावर आपला भलामोठा हात ठेवून सगळा व्यवहार एकदम गुप्त करून टाकला. त्याच्या अंगठ्याचं नख बायकांसारखं लांब वाढवलेलं होतं. त्यानं आपल्या लिंगावरचा इस्थाचा हात हलवायला सुरुवात केली. खालून वर, वरून खाली. आधी हळूहळू आणि एकाएकी एकदम प्रचंड वेगात. जोरजोरानं.

लेमनड्रिंक मस्त गोड-गोड आणि गारेगार होतं.

पण हाताखालचं लिंग तापलेलं टणक.

पियानोच्या पिवळट पट्ट्या हे सगळं पाहत होत्या.

'तुझ्या आजीची फॅक्टरी आहे म्हणतोस, तर मग...' ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या माणसानं अचानक हवापाण्याच्या गोष्टी काढल्या. 'कसली आहे फॅक्टरी?'

'खूप गोष्टींची.' वर न बघताच स्ट्रॉकडं डोळे लावून इस्था म्हणाला. 'म्हणजे सरबतं, लोणची, जॅम, मसाले, पाकात मुरवलेल्या अननसाच्या चकत्या. खूप.'

'वा!' त्या माणसानं हसून दाद दिली, 'छानच!'

इस्थाच्या हातावरची त्याची पकड आणखीन घट्ट झाली होती. वेगही वाढला होता. खालून वर, वरून खाली.

फास्ट फास्टर फेस्ट
नेव्हर लेट इट रेस्ट
अन्टील द फास्ट इज फास्टर
अॅन्ड द फास्टर्स फेस्ट

बाटलीतलं लेमनड्रिंक ओढून-ओढून थकलेली इस्थाची स्ट्रॉ भीतीची लहर आणि थुंकीच्या बुडबुड्यांमुळं एकदमच गळाठली होती. गळून गेलेली ती स्ट्रॉ एका हाताने घट्ट पकडून इस्थाने बाटलीतल्या बाटलीत बुडबुडे काढायला सुरुवात केली. दुसरा हात त्याचं काम करीत होताच. आपली आजी काय काय बरं करते? मनातल्या मनात त्यानं यादी करायला सुरुवात केली.

लोणची	सरबतं	जॅम
आंबा	संत्री	केळी
हिरवी मिरी	द्राक्षं	मिक्स फ्रूट
कडू भोपळा	अननस	संत्री
आलं	आंबा	द्राक्षांचा मुरांबा
खारवलेलं लिंबू		

तेवढ्यात दाढीच्या खुंटांनी गजबजलेला तो राठ विकृत चेहरा अचानक प्रचंड, असह्य सुखानं पिवळटला. इस्थाच्या हाताला ओलं, गरम असं चिकट चिकट काहीतरी लागलं. त्यानं बघितलं, तर अंड्यातल्या पांढरा बलक असावा, तसलं काहीतरी होतं.

लेमनड्रिंक गोड चवीचं आणि गारगार, तर गळून गेलेलं; मऊ पडलेलं लिंग रिकाम्या चामडी पिशवीसारखं. पोकळ आणि विसविशीत. काऊंटर पुसण्याचा तोच घाणेरडा फडका घेऊन ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या माणसानं इस्थाचा ओला चिकट हात पुसून काढला.

'कोल्ड्रिंक संपवा, आणि पळा आता,' इस्थाच्या कुल्ल्यावर सुखानं चापट मारत तो म्हणाला. दोन्ही कुल्ले छोटेसे, पण चांगले घट्टमुट्ट होते.

'टाकून नको देऊ.' इस्थाची समजूत घालण्याच्या सुरात तो पुन्हा म्हणाला, 'ज्यांना

खायला-प्यायला काहीच मिळत नाही, अशा गरीब लोकांचा जरा विचार कर. तू चांगला नशिबवान आहेस, शिवाय श्रीमंतपण आहेस. तुझ्याकडं पॉकेटमनी असतो. झालंच तर आजीची फॅक्टरी पुढं तुलाच मिळणार. देवाचे आभार मान त्याबद्दल आणि बाटलीतलं सगळं लेमनड्रिंक संपवून टाक पटापट.'

अशा प्रकारे केरळमधला सत्तर एमएमवाला पहिला सिनेमास्कोप स्क्रीन असलेल्या 'अभिलाष टॉकीज'च्या प्रिन्सेस् सर्कल लॉबीमधल्या रिफ्रेशमेंट काऊंटरवर इस्थापन याकोनं दहशतीनं फसफसून भरलेल्या बाटलीतली लेमनड्रिंकच्या चवीची भीती फुकटात प्यायली. ते पेय खूपच गार होतं आणि गोड मिट्ट. त्या बाटलीतली फसफस इस्थाच्या थेट नाकात गेली. ओलसर झालेला चिकट हात इस्थानं शरीरापासून काहीसा दूरच धरला होता.

जणू त्या हातानं कशाला स्पर्श करण्याची बंदीच असावी.

बाटलीतलं सगळं लेमनड्रिंक संपल्यावर ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला तो माणूस खुशीत येऊन म्हणाला, 'संपवलंस? शाब्बास.'

त्यानं इस्थाकडून रिकामी बाटली, सपाट झालेली स्ट्रॉ घेतली आणि त्याला पुन्हा 'द साऊंड ऑफ म्युझिक'च्या जगात पाठवून दिलं.

केसांवर थापलेल्या तेलानं घमघमणाऱ्या अंधारात इस्थानं पुन्हा एकदा प्रवेश केला. सारखं लडबडणारं, घरंगळणारं एखादं गिळगिळीत संत्रं धरलेलं असावं, तसा हात. वर उंच आणि शरीरापासून लांब. सिनेमा बघण्यात गर्क झालेल्या आणि पायांच्या जुड्या इकडून-तिकडं हलवून हलवून वैतागलेल्या प्रेक्षकांना, बेबी कोचम्माला, अजूनही पाठ झुकवून बसलेल्या राहेलला आणि अजून घुश्शात असलेल्या अम्मूला ओलांडून इस्था आपल्या खुर्चीपाशी आला. खाली बसला. गिळगिळीत संत्र्यांचा तो बुळबुळीत हात अजूनही तसाच. वर आणि शरीरापासून लांब.

समोर कॅप्टन वॉन क्लॅप ट्रॅप ख्रिस्तोफर प्लमर. उद्धट. उलट्या काळजाचा. आडवी भेग पडावी तसं तोंड आणि हातात पोलिसांकडे असते, तसली स्टीलची शिट्टी. कॅप्टनला एकूण सात मुलं. स्वच्छ, शुद्ध, निर्मळ आणि पवित्र. पेपरमिंटच्या चकाकत्या पाकिटासारखी. मुलांवर आपलं मुळीच प्रेम नाही, असं कॅप्टन भासवायचा, पण प्रत्यक्षात तसं नव्हतं. त्याचं त्याच्या मुलांवर प्रेम होतं आणि तिच्यावरही (ज्यूली अॅन्ड्रूज). तीही त्याच्यावर प्रेम करत होती. दोघांचं मिळून मुलांवर प्रेम आणि मुलांचंही त्या दोघांवर. त्या सगळ्यांचं एकमेकांवर प्रेम होतं. सगळं स्वच्छ पवित्र. गोरीगोमटी मुलं आणि त्यांचे सुंदर सुंदर मऊ मऊ बिछाने.

ते राहायचे, ते घरही सुंदर. भोवती मोठी बाग. शेजारीच एक निर्मळ तलाव. घरातून गोलाकार वळत-वळत जाणारा लांबरुंद जिना, स्वच्छ पांढरी दारं, शुभ्र खिडक्या आणि

फुलाफुलांनी बहरलेले देखणे पडदे.

आकाशात ढगांचा गडगडाट झाला की ती गोरीगोमटी, गोबरी-गोबरी मुलं खूपच घाबरत. मग त्यांची भीती दूर करण्यासाठी ज्यूली अॅन्ड्र्यूज त्यांना जवळ घेई स्वच्छ, सुंदर बिछान्यात सगळ्यांना झोपवी आणि तिला आवडणाऱ्या गोष्टीचं एक गोड गाणं त्या मुलांसाठी गाई... तिला खूप काही काही आवडायचं. त्यात महत्त्वाचं म्हणजे :

(१) कमरेला निळ्या रेशमी रिबिनी बांधलेल्या स्वच्छ पांढऱ्या कपड्यातल्या गोड गोड मुली.

(२) आपले ऐटबाज पंख पसरून चंद्रबिंबाबरोबर उडत-उडत जाणारे डौलदार हंस.

(३) तांब्याच्या चमकत्या किटल्या.

(४) दारावरची मंजुळ घंटा आणि घोडा जुंपलेल्या बग्गीचा नाद... इत्यादी.

एवढं सगळं डोळ्यांदेखत घडल्यावर 'अभिलाष थिएटर'मध्ये बसलेल्या जुळ्यांना प्रश्नच प्रश्न पडले आणि उत्तरांची तहान लागली.

(अ) कॅप्टन वॉन क्लॅप-ट्रॅपला कारण नसताना पाय हलवत बसण्याची सवय आहे का*?*

– नाही. तो असं कधीच करत नाही.

(ब) कॅप्टन वॉन क्लॅप-ट्रॅप तोंडातल्या थुंकीचे बुडबुडे काढून हवेत उडवत बसतो का*?*

– नाही. मुळीचच, अगदी अजिबातच नाही.

(क) जे दिसेल, ते मटकावून तो हसतो*?*

– नाही.

ओऽऽऽ कॅप्टन वॉन क्लॅप ट्रॅप, तऱ्हेतऱ्हेच्या वासांनी घमघमणाऱ्या या थिएटरमध्ये गिळगिळीत संत्र्याचा हात वर करून बसलेल्या एका छोट्या मुलावर तू प्रेम करू शकशील का?

त्यानं अगदी आत्ताच ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या माणसाची गिळगिळीत, बुळबुळीत सू सू आपल्या हातात धरली होती.

– पण तरीसुद्धा, तू करशील का त्याच्यावर प्रेम?

आणि दोन गुडघ्यांमध्ये मान रोवून बसलेली, 'लव्ह-इन-टोकियो'मध्ये बांधलेलं केसांचं कारंजं डोक्यावर झुलणारी त्याची छोटी जुळी बहीण? तिच्यावरसुद्धा तुला प्रेम करता येईल का?

– पण कॅप्टन वॉन ट्रॅपलादेखील त्याचे स्वत:चे असे काही प्रश्न पडलेच होते :

(अ) ही मुलं स्वच्छ, सुंदर, निर्मळ आहेत का*?*

– नाहीत (पण सोफी मॉल आहे.).

(ब) ही मुलं तोंडातल्या थुंकीचे बुडबुडे काढून हवेत उडवत बसतात का*?*

– हो, बसतात (पण सोफी मॉल असं कधीच करत नाही.).

(क) या मुलांना सरकारी कारकुनांप्रमाणे काहीही कारण नसताना उगीच पाय हलवण्याची सवय आहे का?

– हो, आहे (पण सोफी मॉलला मात्र नाही.).

(ड) त्या दोघांपैकी एकानं, किंवा दोघांनीही एखाद्या अनोळखी माणसाची सू सू कधी हातात घेतलीय का?

– ना... नाही... हो (पण सोफी मॉलनं असं काही केलेलं नाही.).

'देन, आय अॅम सॉरी. माफ करा...' कॅप्टन वॉन क्लॅप-ट्रॅप म्हणाला, 'अशा मुलांवर मी प्रेम करू शकत नाही. मुळीच नाही. मी कसा त्यांचा 'बाबा' बनू? शक्यच नाही.'

– कॅप्टन वॉन क्लॅप-ट्रॅपचा काही इलाजच नव्हता.

आपल्याच मांडीत डोकं खुपसून इस्था शांत बसून राहिला.

'काय झालं?' अम्मू आणखीच काळजीत पडली. 'अजूनही असाच फुरंगटून बसणार असशील, तर मी सरळ तुला घरी घेऊन जाईन. नीट बैस उठून आणि समोर पाहा. त्यासाठीच तुला आणलंय ना इथं?'

संपव, संपव सगळं लेमनड्रिंक.

समोर पाहा. सिनेमाकडे पाहा.

ज्यांना खायलाप्यायला मिळत नाही, अशा गरीब लोकांचा विचार कर.

तुझ्याकडे तर पॉकेटमनी असतो. नशिबवान आहेस आणि श्रीमंतही.

तुला कसली आलीय काळजी?

– इस्था उठून बसला. ताठ. पण समोर पाहता-पाहता त्याच्या पोटात एकाएकी ढवळून आलं. एकदम गोळेगोळे उठून मळमळल्यासारखं, समुद्रावरच्या भन्नाट खार्‍या वार्‍याच्या वासाचं, हिरवट हिरवट लाटांचं, जडजड आणि प्रचंड हलकं असं काहीतरी विचित्र विचित्र वाटायला लागलं. त्या विचित्रपणाची विचित्र चव त्याच्या तोंडात दाटून आली.

'अम्मूऽऽऽ' – इस्था कळवळला.

'आता काय??' – तिरीमिरीनं बाण सुटावा, तसा एक तिखट संतप्त प्रश्न शेजारच्या खुर्चीतून आला.

'उलटी होणारसं वाटतंय' – इस्था म्हणाला.

'तुला उलटी होतेय? की नुसतं आल्यासारखं वाटतंय?' – आता अम्मूला काळजी वाटायला लागली होती.

'माहीत नाही.'

'करून बघतोस का?' – अम्मू म्हणाली, 'त्यानं तुला बरं वाटेल.'

'बरं तर...' इस्थानं मान हलवली.

करून बघतोस का? – बघतो. ओके? – ओके.

'आता कुठं चाललात तुम्ही दोघं?' – बेबी कोचम्माची उत्सुकता चाळवली.

'इस्थाला उलटी होतेय का बघतो जरा.' अम्मू म्हणाली.

'कुठं चाललात?' राहेलने पुन्हा विचारलं.

'उलटी होणारसं वाटतंय,' – इस्था म्हणाला.

'मी येऊ का बघायला?'

'मुळीच नको. तुझं काय कामंय तिथं?' – अम्मू वैतागली.

– पुन्हा एकदा पायांच्या जुड्या इकडे-तिकडे करून करून वैतागलेल्या प्रेक्षकांच्या रांगेतून...

आधी गाणं म्हणायचं होतं म्हणून. आणि आता उलटी होतेय का ते बघायला. EXIT च्या खालून बाहेर. बाहेर जाण्याच्या मार्गानं... रीतसर. बाहेर.

लॉबीमधल्या काऊंटरवरचा ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला काहीतरी गोड खात बसला होता. आत फिरणाऱ्या घासांमुळं दोन्ही गाल टम्म फुगलेले. बेसिनमधून पाणी वाहून जावं, तसे आवाज करत तो चटकमटक खात होता. ग्रीन पॅरीजचं रिकामं रॅपर समोर पडलेलं. याला काय, खाणंपिणं सगळं फुकटचं! गोड पदार्थांच्या रांगाच्या रांगा मांडलेल्या होत्या. घड्याळ घातलेल्या केसाळ रानटी हातानं त्यानं तोच घाणेरडा फडका उचलला आणि काऊंटर खसखसून पुसून काढलं. समोरून एक उघड्या, नितळ खांद्यांची तरुण सुंदर बाई मुलाला घेऊन येतेय, हे बघितल्यावर त्याच्या राठ चेहऱ्यावरून एकदम कसलीतरी सावली सरकून गेली. मग आपले पिवळे दात दाखवत हसत-हसत तो म्हणाला,

'एवढ्या लवकर? सिनेमा तर संपायचाय अजून.'

– इस्था कोरड्या ओकाऱ्या काढून-काढून लालबुंद आणि हैराण झाला होता. अम्मू त्याला घेऊन HERS च्या दिशेनं झपाझप गेली.

– इस्था उंच उचलला गेला. समोर फारसं स्वच्छ नसलेलं बेसिन आणि मागे अम्मू. पाय तसेच लोंबकळत. बेसिनवर एक स्टीलचा नळ होता. नळावर गंजके डाग आणि नळाखाली वेड्यावाकड्या बारीक बारीक रेषांचं जंगल माजलेलं मळकं, अस्वच्छ बेसिन. रेषांचं ते जाळं म्हणजे कुठल्यातरी भल्यामोठ्या थोर शहराचा नकाशाच दिसत होता. क्लिष्ट. किचकट. म्हणूनच कदाचित महत्त्वाचा.

– इस्थानं पुष्कळ खोकून, खाकरून पाहिलं; पण काहीच उपयोग झाला नाही. शरीरातून बाहेर ओकले गेले, ते फक्त विचारच. काही वेळ ते बेसिनमधून वाहत राहिले आणि आतून बाहेर आले, तसे परत पुन्हा तोंडातून पोटात गेले. अम्मूला मात्र यातलं काहीच दिसलं नाही. बेसिनमधल्या त्या शहरावरून उलटसुलट विचारांचे प्रचंड वादळी ढग क्षणार्धात सरकून गेले होते; पण बेसिन शहरातल्या बेसिन पुरुषांना आणि बेसिन

स्त्रियांना काय झालं ते कळलंच नाही. त्यांचं बेसिन जनजीवन होतं तसंच सुरू राहिलं. बेसिनमधल्या गाड्या आणि बसेस् जात-येत राहिल्या. जनजीवन एकदम सुरळीत.

'होत नाहीये का?' – अम्मू.

'नाही ना...' – इस्था.

'नाही होत?'

– 'नाही.'

'मग तोंडावर जरा पाणी मार.' अम्मू म्हणाली, 'पाण्यानं नेहमी स्वच्छ, प्रसन्न वाटतं. तोंड नीट धुवून घे, मग आपण लेमनड्रिंक प्यायला जाऊ.'

इस्थानं हात स्वच्छ धुतले. मग चेहरा. पुन्हा हात. मग चेहरा. त्याच्या पापण्यांचे केस ओले होऊन एकमेकांना चिकटले होते.

ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या माणसानं रिकाम्या रॅपरची घडी घातली आणि अंगठ्याचं रंगवलेलं नख फिरवून दुमड पक्की करून टाकली. पटकन एका मासिकाची गुंडाळी केली, सारखा त्रास देणाऱ्या माशीचा एका फटक्यात मुडदा पाडला. आणि हलकेच टिचकी मारून तिचा मृतदेह काऊंटरवरून उडवून लावला. जमिनीवर पडलेली मेलेली माशी नंतर कितीतरी वेळ मेलेल्या दुबळ्या पायांची उघडझाप करत तडफडत होती.

'गोड आहे मुलगा –' ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला चिकट हसून अम्मूला म्हणाला, 'फार छान गातो.'

'माझाच मुलगा आहे.' – अम्मू थोडी आनंदली.

'काय सांगता? खरंच?' – अम्मूच्या शरीरावरून एक लघळ नजर फिरवीत ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला म्हणाला, 'वाटत नाही, तुम्हांला इतका मोठा मुलगा असेलसं. तुम्ही तर केवढ्या तरुण दिसता.'

'त्याची तब्येत बरी नाहीये,' – अम्मूनं विषय बदलला. 'एखादं कोल्ड्रिंक घेतलं, तर बरं वाटेल बहुतेक.'

'अर्थात!' – तो खूश – 'बोला, काय देऊ?'

'ऑरेंजलेमन? की लेमनऑरेंज?'

प्रश्न तसा भयंकरच होता.

इस्था घाबरून म्हणाला,

'नो थँक्यू. मला नकोय काहीच.'

त्यानं अम्मूकडं पाहिलं. पुन्हा एकदा तसंच वाटायला लागलं होतं. पोटात गोळेगोळे उठून मळमळल्यासारखं. समुद्रावरच्या भन्नाट खाऱ्या वाऱ्याच्या वासाचं, हिरवट हिरवट लाटांचं, जडजड आणि प्रचंड हलकं असं काहीतरी. विचित्रच.

'तुम्हांला काय देऊ?' – ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या माणसानं अम्मूला विचारलं.

‘कोका कोला... फॅन्टा? आईस्क्रीम... रोझमिल्क?’

‘नको. मला नकोय काहीच, थँक्यू!’ – अम्मू हसून म्हणाली. तिचा चेहरा अधिकच उजळला आणि गालांना छान खळ्या पडल्या.

‘हे घे’ – प्रेमळ हवाईसुंदरीनं प्रवाशांना आग्रह करावा, तशा रुबाबात मूठभर चॉकलेटं इस्थापुढं धरून ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला म्हणाला, ‘घे... तुझ्यासाठी खाऊ.’

‘नको मला. थँक्यू –’ अम्मूकडं बघत इस्थानं मान फिरवली.

‘घे, इस्था, इतक्या प्रेमानं दिलेली वस्तू अशी नाकारू नये,’ अम्मूनं समजावण्याचा प्रयत्न करून पाहिला.

इस्थानं पुढं होऊन चॉकलेटं घेतली.

‘आता थँक्यू म्हण.’ अम्मूनं आठवण करून दिली.

‘थँक्यू’ (चॉकलेटं आणि अंड्याचा तो पांढरा बलक... दोन्हींसाठी.).

‘नो मेन्शन’

– ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या माणसाने रुबाबदार इंग्रजीत उत्तर दिलं.

मुलगा म्हणतो, ‘तुम्ही आयमेनेममध्ये राहता?’

‘हो’ – अम्मू म्हणाली.

‘मी नेहमी येतो तिकडं,’ ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला माणूस उत्साहानं उसळत म्हणाला.

‘माझ्या बायकोचं माहेर आयमेनेमलाच आहे. तुमची फॅक्टरीपण मला ठाऊक आहे. ‘पॅराडाईज् पिकल्स’... तीच ना? तुमच्या मुलानंच मघाशी सांगितलं मला.’

– याचा अर्थ इस्थाला पुन्हा कुठं शोधायचं, ते त्याला पक्कं ठाऊक होतं. तेच तो पुन्हा पुन्हा सांगत होता. धोक्याची सूचना किंवा धमकीच दिल्यासारखा.

इस्थाचे डोळे तळावल्याचं अम्मूला जाणवलं. ताप येणार की काय?

‘चला, आम्ही निघतोच आता...’ ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्याचा निरोप घेत अम्मू म्हणाली, ‘उगीच याला तापबीप चढला, तर पंचाईत व्हायची. उद्या मुलांची चुलतबहीण यायचीय’ – तिनं मुलांच्या ‘काकांना’ सांगून टाकलं आणि पुढं सहज म्हणाली,

‘लंडनहून यायच्यात दोघी... मुलांची चुलतबहीण आणि तिची आई.’

‘लंडनहून?’ – काकाच्या उग्रट डोळ्यांत एकदम प्रचंडच आदर निर्माण झाला. थेट लंडनशी नातं असलेलं कुटुंब म्हणजे...

‘इस्था, तू इथं काकांबरोबर थांब. मी आत जाऊन बेबी कोचम्मा आणि राहेलला घेऊन येते...’ अम्मू म्हणाली.

‘ये बेटा’ – काका स्वागताला तयारच होता.

‘इथं आत ये आणि माझ्याबरोबर या उंच स्टुलावर बस.’

‘नाही... मुळीच नाही, अम्मू. मी नाही इथं थांबणार. मला तुझ्याबरोबरच यायचंय...’

– एरवी अगदी शांत, अबोल असणाऱ्या इस्थाचा हा ‘अकारण’ त्रागा आणि हट्ट बघून अम्मूला जरा नवलच वाटलं. ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या काकांची क्षमा मागून ती म्हणाली,

‘सॉरी हं. तो नेहमी असा हट्ट नाही करत. चल, इस्थापन. निघू या.’

पुन्हा सगळं तेच. तोच वासानं घमघमणारा अंधार. गरगरणारे पंखे. पडद्याशेजारून धावणाऱ्या सावल्या. केसाळ डोकी. गळे. कॉलर्स. केसांचे कोंबडे. अंबाडे. पोनीटेल्स.

‘लव्ह इन टोकियो’मधून उसळणारं कारंजं, एक छोटी मुलगी आणि एक पूर्वाश्रमीची नन.

कॅप्टन वॉन ट्रॅपच्या पेपरमिंटसारख्या स्वच्छ, निर्मळ मुलांच्या आंघोळी नुकत्याच झालेल्या. ओलेचिप्प केस खाली ओघळलेली सगळी मुलं एका चमकदार पेपरमिंट रांगेत उभी आणि कॅप्टन वॉन ट्रॅपच्या प्रियतमेसाठी आज्ञाधारकपणे सुरेल आवाजात गाणं म्हणतायत... गुलाबी मऊ काया आणि निळेनिळे डोळे असलेली ती लावण्यवती सम्राज्ञी हिऱ्यासारखी झळझळतेय.

द हिल्स आर अलाईव्ह,

विथ द साऊण्ड ऑफ म्युझिक

‘चला, आपल्याला निघायला हवं –’ गाण्यात बुडून गेलेली राहेल आणि बेबी कोचम्मा दोघींना अम्मूनं भानावर आणलं.

‘पण, अम्मूऽऽ,’ राहेल रडवेली होऊन म्हणाली, ‘अजून तर सगळ्या महत्त्वाच्या गोष्टी व्हायच्याच आहेत गं. अजून त्यानं तिचं चुंबन कुठं घेतलंय? त्यानं तर अजून हिटलरचा झेंडासुद्धा फाडलेला नाही. रॉल्फ नावाचा तो पोस्टमन त्यांचा विश्वासघात करतो, तेसुद्धा व्हायचंय अजून.’

‘इस्थाला बरं नाहीये, राहेल,’ अम्मू म्हणाली, ‘चल लवकर.’

‘अगं, पण ते नाझी सैनिक अजून आलेलेसुद्धा नाहीयेत.’

‘कळलं मला. ऊठ.’ अम्मू घाईत होती.

‘चल आटप, निघायचंय आपल्याला.’

‘हाय ऑन द हिल वॉज अ लोनली गोटहर्ड... तेसुद्धा राहिलंय अजून.’ – राहेल कुरकुरत राहिली.

‘हे बघ, उद्या सोफी मॉल येईल तेव्हा इस्थाची तब्येत ठीक असायला हवी, की नको?’ – बेबी कोचम्मानं मध्यस्थीचा प्रयत्न केला.

‘नसली, तरी चालेल. काय बिघडतं?’ – राहेलच्या तोंडून शब्द निघून गेले. स्वत:शीच

बोलण्यासारखे.

'काय म्हणालीस?' – नक्की काय ते कळलं होतंच, असं नाही, तरी नेहमीच्या सवयीनं बेबी कोचम्माचा पारा चढला.

'काही नाही' – राहेलनं तिला झटकून दिलं.

'पण मी ऐकलंय. मला ठाऊकेय तू काय म्हणलीस, ते' – बेबी कोचम्मा धुमसतच होती.

बाहेर लॉबीमध्ये ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाले काका आपल्या बाटल्यांचा हिशेब लावत बसले होते. थंडगार बाटल्यांच्या बुडाचे गोल ठसे पुसून पुसून घाणेरड्या फडक्यानं काऊंटर स्वच्छ करणं चाललं होतं. इंटरव्हलची तयारी एकूण जोरात सुरू होती. आता ते अगदी 'स्वच्छ, निर्मळ काका' बनले होते. केसाळ अस्वलाच्या ओंगळवाण्या शरीरात भरलेलं हवाईसुंदरीचं प्रेमळ, कनवाळू हृदय.

'काय ठरलं शेवटी? निघालात?' – प्रेमळ, कनवाळू प्रश्न..

'हो ना. निघायचंच म्हणतोय,' अम्मू पुन्हा हसली, 'इथं टॅक्सी कुठं मिळेल?'

'गेटमधून बाहेर पडलात, की मुख्य रस्त्यावर डाव्या बाजूला. लगेच मिळेल टॅक्सी,' राहेलवरून नजर फिरवत काका माहिती देत होते, 'तुम्ही सांगितलं नाही मघाशी, तुम्हांला एक सुंदरशी गोड मुलगी पण आहे, म्हणून!' – मूठभर चॉकलेटं राहेलपुढं आली.

'घे, बेटा.'

'हे घे, माझं चॉकलेट –' इस्था पटकन राहेलला अडवत म्हणाला. राहेलनं त्या घाणेरड्या माणसाजवळ मुळीच जाऊ नये, असं त्याला वाटत होतं.

– पण इस्था काही म्हणतोय त्याकडं लक्ष न देता राहेल निघालीसुद्धा. त्याच्याजवळ पोचली, तसा पिवळे दात दाखवत तो फिसकन हसला आणि त्यानं राहेलला जवळ ओढलं. त्याच्या स्पर्शात, नजरेत काय विष होतं न कळे, पण राहेलने आपलं शरीर आक्रसून घेतलं. असली घाणेरडी, गिळगिळीत भीती तिला याआधी कध्धीच वाटली नव्हती. इस्थाला शोधण्यासाठी ती झर्रकन मागं वळली.

– आणि त्या केसाळ अस्वलापासून धावत सुटली.

आपल्याजवळचं पॅरीज्चं चॉकलेट इस्थानं गुपचूप राहेलच्या हातात सरकावलं, तेव्हा त्याच्या गरम बोटांचा चटका तिला चांगलाच जाणवला; पण इस्थाच्या बोटांचे शेंडे मात्र गारढोण पडले होते. मृत्यूची भीती भिनत जावी, तसे.

'अच्छा,' काकांनी इस्थाचा निरोप घेतला, 'आयमेनेममध्ये भेटूच कधीतरी.'

– पुन्हा लाल पायऱ्यांचा तो जिना. येताना टणाटण उडणारी राहेल जाताना मात्र पाय ओढत कशीबशी चालत होती. हळूहळू सावकाश. पायांत जणू मणामणाची ओझी

बांधली होती.

'भला माणूस वाटला तो ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला.' – अम्मू कौतुकानं म्हणाली.

'श्शीऽऽ कसला तो...? डुक्कर मेला!' बेबी कोचम्मानं उगीचच नाक मुरडलं.

'दिसतो थोडासा तसा; पण इस्थाशी फारच प्रेमानं वागत होता,' अम्मू म्हणाली.

'एवढा आवडलाय का तुला तो माणूस? मग तू लग्नच का करत नाहीस त्याच्याशी?' – राहेलचा भडकाच उडाला होता.

– क्षणभर शांतता पसरली. सगळेच गप्प झाले.

इस्था चालता-चालता थांबला.

बेबी कोचम्मापण.

'राहेलऽऽ'

अम्मूच्या तेवढ्या एका शब्दातल्या दहशतीनं भानावर आलेली राहेल पुरती गारठली. तोंडून निसटलेली भयंकर चूक तिच्या तत्क्षणी लक्षात आलीच होती. घडल्या अपराधाबद्दल ती पुन:पुन्हा कळवळून क्षमा मागत राहिली. ते शब्द आले कुठून, हे तिला कळत नव्हतं. असले, इतके घाणेरडे शब्द आपल्या आत असूच कसे शकतात, याचा तर काही अंदाजच लागत नव्हता; पण आता उपयोग काय? ती घाण तोंडातून बाहेर तर निसटली. कितीही वाटलं, तरी परत थोडीच गिळता येणार? सरकरी ऑफिसात नोकरी करणाऱ्या कारकुनांसारखे चिकट हसणारे तिचे ते शब्द लाल जिन्यावर जाऊन बसले. आणि अम्मूकडं बघत त्यांनी काहीही कारण नसताना पाय हलवायला सुरुवात केली.

'राहेल,' अम्मू म्हणाली. 'तुला कळतंय का नीट? तू नेमकं काय करतेयस, कशी वागतेयस, ते?'

घाबरलेल्या दोन डोळ्यांनी डोक्यावरचं कारंजं सावरत अम्मूकडं पाहिलं.

'घाबरू नकोस. मी काही मारणार नाहीये तुला,' धीर देत अम्मू म्हणाली, 'फक्त माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. कळतंय का तुला?'

'काय पण?' – हलक्या आवाजात राहेल पुटपुटली.

'तू आत्ता जे काही केलंस, ते... कळतंय का?'

– घाबरलेल्या दोन डोळ्यांनी डोक्यावरचं कारंजं सावरत पुन्हा एकदा अम्मूकडं पाहिलं.

'लोकांना असं दुखावलं, त्यांच्या मनाला क्लेश दिले, की काय होतं माहितेय?' – अम्मू अगदी शांतपणे सांगत होती, 'असं करणारा जो तो स्वत:लाच त्रास देत असतो, खरं म्हणजे. कारण अशा माणसांवरचं लोकांचं प्रेम मग कमी होत जातं. कसलाही विचार न करता उच्चारलेले वाट्टेल ते शब्द तुमचा घात करतात. त्या शब्दांनी जे-जे दुखावतात, ते-ते तुमच्यावरचं प्रेम कमी करायला लागतात.'

– अंगावर जाड जाड पंखांचे झुबके असलेला एक गारढोण पतंग हलकेच राहेलच्या हृदयावर येऊन बसला. त्याचे थंडगार पाय तिला आतून बोचले आणि तिच्या निष्काळजी, भावनाशून्य, विचारशून्य हृदयाला सहा टेंगळं आली.

– तिच्या अम्मूचं तिच्यावरचं प्रेम काही क्षणांपूर्वीच कमी झालं होतं... होतं त्यापेक्षा आणखी कमी.

– सगळे जण गेटमधून बाहेर पडून मुख्य रस्त्यावर येत डावीकडे वळले. टॅक्सीस्टॅण्ड. एक दुखावलेली आई, एक पूर्वाश्रमीची नन, एक मूल तापाने फणफणलेलं आणि एक भीतीने गारढोण. शिवाय सहा टेंगळं आणि एक उडत आलेला पतंग.

टॅक्सीच्या आत सगळा झोपेचा वास भरून राहिलेला. जुन्या कापडांच्या दमट गुंडाळया. एक ओला टॉवेल आणि दोन केसाळ काखा. ती टॅक्सी म्हणजे टॅक्सी ड्रायव्हरचं घरच होतं. तो टॅक्सीतच राहत होता. त्याच्या आवतीभोवती, त्याचे स्वत:चे सगळे वास गोठवून ठेवण्याची तीच एक जागा होती. दोन्ही सीट्सचा पुरता निकाल लागलेला. घाणेरडा पिवळसर स्पंज जिकडून तिकडून बाहेर लोंबतोय. मागच्या सीटवर तर काविळीनं पिवळीजर्द झालेली पित्ताशयं असावीत, तसे अनेक पुंजके पुंजके. जिकडं-तिकडं कुरतडत कुरतडत सुटणाऱ्या आणि जंगलात घुसलेल्या शिकाऱ्याला त्याची पारध गाठून देणाऱ्या उंदीर-घुशींसारखा तो ड्रायव्हर. तरतरीत. टक्क. बाकदार रोमन नाक आणि छोट्या 'रिचर्ड'छाप मिशा. बुटबैंगणच होता. इतका की, स्टीअरिंगच्या मधून त्याला रस्त्याकडं बघायला लागत होतं. आजूबाजूनं जाणाऱ्या वाहनातल्या लोकांना नक्की वाटत असणार, की चालत्या टॅक्सीत प्रवासी तर बसलेले दिसतात; मग ड्रायव्हर कसा नाही?... एखाद्या भांडकुदळ माणसासारखा चेव येऊन तो भन्नाट गाडी चालवत होता. दिसली थोडी मोकळी जागा, की घूस तिथं... शेजारून जाणाऱ्या गाड्यांना शक्य तेवढं ढोसत-ढोसत त्यांच्या 'लेन'मधून हुसकव बाहेर, असं सगळं दे दणादण चाललं होतं. झेब्रा क्रॉसिंग आलं, की वेग अजून वाढवायचा आणि सिग्नल दिसला की मुद्दाम तोडायचा.

'तू ढुंगणाखाली एखादी उशी किंवा दुसरं काहीतरी का नाही घेत? –' बेबी कोचम्मानं अगदी सहज, प्रेमळ आवाजात सूचना मांडली. 'त्यामुळं तुला बाहेरचा रस्ता जरा नीट दिसेल; नाही का?'

'लोकांच्या भानगडीत नाक न खुपसता तुम्ही तुमचं तुमचं काम का नाही करत? तेही बरं; नाही का?'

– ड्रायव्हरनं तिरसटून चोख उत्तर देऊन टाकलं.

समुद्राच्या शेजारून टॅक्सी भरधाव जात होती. इस्था खिडकीबाहेर डोकं काढून बसला होता. समुद्रावरून येणारे गरम-गरम वारे चवीला खारट लागत होते. त्या तुफान वाऱ्यात आपले केस वरच्यावर उडून जातील, असं इस्थाला वाटायला लागलं.

ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या त्या माणसानं आपल्याबरोबर जे काही केलं; ते जर अम्मूला कळलं, तर आपल्यावरचं तिचं प्रेम नक्की कमी होणार, याची भीतीही वाटत होती अधूनमधून. त्याच्या पोटात पुन्हा एकदा ढवळून, उमळून, घाणेरड्या लाजेनं बरबटून आलं. वाटलं आत्ताच्या आत्ता नदीपाशी जावं. एकदम छान वाटेल. मोकळ्या, स्वच्छ पाण्याने छान वाटतंच.

झगमगणाऱ्या न्यूऑन दिव्यांच्या गळणाऱ्या प्रकाशानं चिकट झालेली रात्र खिडकीबाहेरून धावत होती. टॅक्सीत खूप उकडत होतं. सगळे गप्प. शब्दच हरवून बसल्यासारखे... शांत बेबी कोचम्माचा विचित्र चेहरा तेवढा एका विचित्र उत्साहानं विचित्रासारखा चमकत होता. जे काही झालंय, त्या सगळ्या कडवटपणात आपला काही संबंध नाही, आपण कशालाही जबाबदार नाही, या समाधानाच्या उकळ्या तिच्या पोटात फुटत होत्या. एखादा भरकटलेला, भेदरलेला कुत्रा रस्त्यावर आडवा आला रे आला, की ड्रायव्हर दातओठ खाऊन, सगळे प्रयत्न एकवटून त्या कुत्र्याच्या जिवावर उठे... कसंही करून मेलाच पाहिजे. बास!

राहेलच्या हृदयावर येऊन बसलेल्या त्या पतंगानं एव्हाना आपले मखमली चिकट पंख पसरायला सुरुवात केली होती. त्याच्या पायातून टोचलेला गारठा सरपटत-सरपटत राहेलच्या हाडांमध्ये घुसायला लागला होता.

हॉटेल 'सी क्वीन'च्या कारपार्किंगमध्ये बाकीच्या छोट्या-छोट्या गाड्यांशी कुजबुज करीत निळी प्लायमाऊथ उभी होती. खुसफुस खुसफुस चाललेली. अखंड... हिस्लीप हिस्लीप हशूनऽऽस्नाहऽऽ छोट्या छोट्या किरकोळ बायकांच्या पार्टीत एकदम एखाद्या महाराणीनं येऊन दिमाख मिरवावा, तशी.

'रूम नंबर तीनशे तेरा आणि तीनशे सत्तावीस' – नजर वर उचलण्याचेही कष्ट न घेता रिसेप्शनवरच्या माणसानं त्याची नेहमीची रेकॉर्ड सुरू केली, 'एअर कंडिशन नाही. डबल बेड. दुरुस्तीचं काम चालू असल्यामुळे लिफ्ट बंद.'

– कुठूनतरी एक 'बेलबॉय' धावत आला आणि सामान उचलून थेट चालायलाच लागला. तो वयानं 'बॉय' तर नव्हताच, आणि त्याच्याजवळ 'बेल' तर मुळीच नव्हती. दोन थकलेभागले, लुकलुकते डोळे, रंग उडालेला, बटणं हरवल्यामुळं पुढून उघडा पडलेला जुनाट कोट आणि त्यातून बाहेर डोकावणारा आतला चुरगळलेला शर्ट. त्याच्या डोक्यावरची टोपी तर भलतीच विनोदी आणि अजागळ दिसत होती. सगळ्या बाजूंनी तिरपी तिरपी वळलेली आणि खाली एक गोल प्लॅस्टिकची पट्टी. 'बेलबॉय'च्या म्हाताऱ्या हनुवटीखाली लोंबणाऱ्या मांसात खोल बुडून गेलेली. एखाद्या इतक्या म्हाताऱ्या माणसाला 'बेलबॉय' बनवून त्याच्या डोक्यावर ती अजागळ विनोदी टोपी चढवायची

आणि हनुवटीखाली स्वच्छंदपणे मस्त झोके घेणाऱ्या त्याच्या वयाला प्लॅस्टिकच्या पट्टीनं बांधून ठेवायचं, हा भलताच दुष्टपणा होता.

– पुन्हा एकदा तोच लाल पायऱ्यांचा जिना आणि 'अभिलाष टॉकीज'मध्ये होता, अगदी तसलाच जुनाट, लाल गालिचा.

चाको वर त्याच्या खोलीत होता. हॉटेलच्या किचनमधून मागवलेल्या खाद्यपदार्थांवर तुटून पडलेला असतानाच चाको अचानक पकडला गेला. रोस्टेड चिकनचा ढीग, फिंगर चिप्स, स्वीटकॉर्न आणि चिकन सूप, शिवाय दोन गोलगरगरीत पराठे आणि चॉकलेट सॉसमध्ये ओतप्रोत न्हायलेलं वॅनिला आईस्क्रीम. पोट फुटेपर्यंत खाऊन खाता खाता मरण्याची आपली महत्त्वाकांक्षा चाको अनेक वेळा बोलून दाखवीत असे. माम्माची म्हणायची, आतल्या आत दाबून ठेवलेलं दु:ख असह्य झालं म्हणजे माणूस असलं काहीतरी बोलतो. चाकोचंदेखील काही फार वेगळं नाही; पण हे विश्लेषण चाकोला मुळीच मान्य होत नसे. तो म्हणायचा, दु:खबि:ख सगळं झूट. मला खाण्याची, खात राहण्याची जबर हावच आहे. तीच खरी... शुद्ध लालसा.

सिनेमाला गेलेली सगळी फलटण इतक्या लवकर, अर्ध्यावरूनच परत आलेली बघून खरं म्हणजे चाको चांगलाच चपापला होता; पण तसं न दाखवता त्यानं आपलं खाणं सुरू ठेवलं.

इस्था चाकोबरोबर त्याच्या खोलीत झोपेल, अम्मू आणि बेबी कोचम्माबरोबर राहेल त्यांच्या खोलीत झोपेल, असं आधी ठरलं होतं; पण आता तसं कसं जमणार? एकतर इस्था अचानक आजारी पडला होता आणि नव्यानंच झालेल्या प्रेमाच्या फेरवाटपात राहेलच्या वाटचा हिस्सा एकदमच कमी झाला होता. त्यामुळं राहेलला चाकोबरोबर झोपणं भाग होतं आणि इस्था अम्मूबरोबर, बेबी कोचम्माबरोबर त्यांच्या खोलीत.

अम्मूनं राहेलचा पायजमा, टूथब्रश बॅगमधून बाहेर काढून पलंगावर ठेवला.

'हे घे.' - ती म्हणाली.

दोन खटक्यांत बॅग बंद झाली.

खटक. खटक.

'अम्मू', राहेलनं न राहवून विचारलं.

'शिक्षा म्हणून आज रात्री मी जेवलेच नाही तर?' – ताबडतोब शिक्षा भोगून झाल्या अपराधातून मोकळं व्हावंसं तिला वाटत होतं. अम्मू पुन्हा एकदा तिच्यावर पूर्वीसारखंच, पूर्वीएवढंच प्रेम करणार असली, तर त्या बदल्यात उपाशी राहण्याची तिची तयारी होती.

'तुला वाटेल ते कर,' अम्मू म्हणाली, 'पण थोडं खाऊन घेतलंस, तर बरं होईल. त्याशिवाय वाढणार कशी तू? बघ, भूक लागली असेल, तर चाकोच्या प्लेटमधलं थोडंसं

चिकन तू आरामात खाऊ शकशील.'

'खाऊ शकशील किंवा खाणारही नाहीस. पाहिजे तर खा. नको तर नको,' चाको पटकन म्हणाला.

'पण मग माझ्या शिक्षेचं काय?' राहेलनं अम्मूला विचारलं, 'तू मला शिक्षा का करत नाहीयेस?'

'काही गोष्टी केल्या म्हणजे आपोआप शिक्षा होतच असते. नव्यानं कशाला करायला पाहिजे?'- राहेलला कधीच सोडवता येणार नाही असं काहीतरी अवघड गणित समजावून सांगत असल्याच्या थाटात बेबी कोचम्मा म्हणाली.

काही गोष्टींबरोबर त्याबद्दलच्या शिक्षाही आपोआप येतात. जशी तयार घरातल्या तयार बेडरूमबरोबर आधीच भिंतीत बसवलेली कपाटं; पण शिक्षेचं हे गणित इतकं सोपं नसतं, हेदेखील लवकरच कळेल त्यांना. म्हणजे राहेलला, इस्थाला आणि सगळ्यांनाच. कळेल की, शिक्षांचे आकार आणि प्रकार काही ठरलेले नसतात. कधीकधी शिक्षा इतकी प्रचंड असते की, बेडरूम पोटात घेऊन बसलेलं भिंतीतलं कपाट – कधीकधी अख्खं आयुष्यच त्यात बंद होऊन जातं. मग आतल्या अंधाऱ्या कप्प्यात वाट फुटेल, तसं भरकटत राहायचं फक्त.

बेबी कोचम्मानं घेतलेल्या 'गुडनाईट किस'चा ओला डाग राहेलच्या गालावर तसाच राहिला होता. तो तिनं खांद्याला पुसून टाकला.

'गुडनाईट... गॉडब्लेस...,' राहेलकडं पाठ फिरवून खोलीतून बाहेर पडता- पडता अम्मू म्हणाली. ती बाहेर गेलीच होती जवळजवळ. गेली आणि दिसेनाशी झाली.

'गुडनाईट' – तापानं म्लान झालेल्या इस्थानं दुरूनच कसाबसा बहिणीचा निरोप घेतला.

हॉटेलच्या कॉरीडॉरमधून आपल्या खोलीच्या दिशेनं जाणाऱ्या त्या तिघांकडे राहेल खूप वेळ बघत राहिली. अंधारात शांतपणानं चालणाऱ्या भुतांसारख्या तीन आकृत्या. दोन मोठ्या. एक छोटी. कोरे कपडे आणि बूट घातलेली. पायांखाली पसरलेल्या लाल गालिच्यानं त्यांच्या पावलांचे आवाजसुद्धा हिरावून घेतले होते. हॉटेलमधल्या खोलीच्या त्या दारात राहेल कितीतरी वेळ विषण्ण मनानं उभी राहिली.

उद्या सोफी मॉल येणार, त्याचं दु:ख... एकाएकी उणावलेल्या अम्मूच्या प्रेमाचं दु:ख आणि ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या माणसानं 'अभिलाष टॉकीज'मध्ये इस्थाबरोबर जे चाळे केले, त्याच्या संतापाचं दु:ख...

वेदनांनी भरून-भरून वाहणाऱ्या दु:खाच्या वाऱ्यानं राहेलचे कोरडेठक्क डोळे झोंबत, सलत राहिले.

चाकोनं 'रोस्टेड चिकन'ची एक तंगडी उचकटून एका छोट्या प्लेटमध्ये ठेवली. शेजारी

थोडे फिंगर चिप्स घातले आणि प्लेट राहेलकडं सरकावली.

'मला नकोच, तूच खा. थँक्यू!' - राहेल म्हणाली.

स्वत:च स्वत:ला थोडी शिक्षा करून घेतली, तर मग अम्मू कदाचित माफ करेल, अशी वेडी आशा अजूनही तिला वाटत होती.

'थोडं आईस्क्रीम खातेस का, चॉकलेट सॉसवालं?' - चाकोनं थोडा वेगळा पर्याय दिला.

'नकोय, थँक्यू' - राहेल ठाम होती.

'नको तर नको, गेलीस उडत,' चाको वैतागून म्हणाला, 'एवढं सांगतोय, तर खाऊन बघ. मस्त आहे. मागाहून तूच पस्तावशील... लक्षात ठेव.'

- त्यानं एकट्यानं अख्ख्या चिकनवर ताव मारला. आणि एका दमात सगळं आईस्क्रीमही संपवून टाकलं.

राहेलनं कपडे बदलून पायजमा चढवला.

'शिक्षा देण्यासारखे काय काय उद्योग तू करून आलीयस, ते सांगून उगीच माझं डोकं पिकवू नकोस. कृपा कर.' चाको एकदम म्हणाला, 'त्या कहाण्या ऐकत बसण्याची माझी मुळीच इच्छा नाहीये.'

सॉसच्या बाटलीवर राहिलेला चॉकलेट सॉसचा शेवटचा थेंब चाको पराठ्याच्या तुकड्यानं पुसून घेत होता.

तडस लागेपर्यंत जेवण, वर स्वीट आणि 'पुन्हा' स्वीट म्हणजे कहरच अगदी.

'पण झालं काय? डासांनी चावलेल्या खुणा रक्त येईपर्यंत खाजवत बसलीस? की टॅक्सी ड्रायव्हरला 'थँक्यू' म्हणायचं विसरलीस?' - स्वस्थ बसणं चाकोला मुश्कील झालं असावं.

'त्याच्यापेक्षा वाईट. भयंकर.' अम्मूचा चेहरा आठवून राहेल म्हणाली.

'मला मुळीच सांगू नको,' चाको ओरडला. 'असल्या गोष्टी ऐकण्याची मला अजिबात इच्छा नाहीये.'

– चाकोनं खोलीतला फोन फिरवला. आळशी चेहऱ्याचा, पेंगुळलेल्या डोळ्यांचा एक बेअरा कसाबसा येऊन चाकोचं खरकटं आवरून गेला. चोखलेली हाडं आणि रिकाम्या प्लेटस्बरोबर रोस्टेड चिकनचा आणि आईस्क्रीमचा खोलीत भरलेला वासही त्या बेअरला निपटून न्यायचा होता; पण ते सगळे वास त्याच्या कचाट्यातून सुटले आणि खोलीच्या धुरकट छतावर जाऊन बसले.

खाऊन-खाऊन पोट टम्म फुगलेला सुस्त मामा आणि उपाशीपोटी झोपायच्या तयारीत असलेली त्याची भाची; दोघांनी हॉटेल सी क्वीनच्या बाथरूममध्ये दात घासले. चट्ट्यापट्ट्यांचा पायजमा घातलेली, डोक्यावर 'लव्ह इन टोकियो'मधून उडणाऱ्या केसांचं कारंजं असलेली, पुराव्यानिशी गुन्हा शाबीत झालेली छोटी मुलगी. सुती बंडी

आणि अंडरपॅन्टमधला तिचा मामा – चाको. टम्म फुगलेल्या पोटावर त्याची ती बंडी अगदी ताणून-ताणून कशीबशी चढली होती – दुसऱ्या कातडीचा थरच. पोटाच्या पुष्कळ खाली असलेल्या बेंबीवरून मात्र ती बंडी अजागळासारखी लोंबत होती. एकाएकी नैराश्याच्या झटक्यानं सगळं पातळ, पोकळ, विसविशीत व्हावं, तशी.

फेसानं फसफसलेला टूथब्रश राहेलनं घट्ट स्थिर पकडला आणि दातांवर ब्रश फिरवण्याऐवजी आपले दात ब्रशवरून इकडंतिकडं फिरवले, तरीही चाको तिच्या अंगावर ओरडला नाही.

तो काही हुकूमशाहा नव्हता.

दोघांनी आळीपाळीनं तोंडातला फेस थुंकून टाकला. बेसिनमध्ये पाडलेल्या बिनाका छाप फेसाच्या पांढऱ्याशुभ्र समुद्राकडं राहेल कितीतरी वेळ टक लावून पाहत राहिली. बेसिनच्या छिद्रातून अदृश्य होणाऱ्या त्या फेसात आपल्याला काय काय दिसू शकतं, हेच तिला पाहायचं होतं.

...पण काहीच नव्हतं. कुणीसुद्धा नव्हतं... बिनाकाचे बुडबुडे फक्त.

खोलीतला मोठा लाईट चाकोनं बंद करून टाकला.

बिछान्यावर पडल्या-पडल्या राहेलनं केसांमधला 'लव्ह इन टोकियो' हेअरबँड काढला आणि लाल-पिवळ्या गॉगलच्या शेजारी काळजीपूर्वक जपून ठेवला. सकाळपासून बांधलेलं केसाचं कारंजं थोडंसं विस्कटलं, पण पुन्हा तसंच – ताठच्या ताठ उभं राहिलं.

पलंगाशेजारून येणाऱ्या लाईटच्या तलावात डुंबत पडल्यासारखा चाको बिछान्यात पसरला होता. काळ्याकुट्ट अंधाऱ्या रंगमंचावर झोपलेलं आडदांड गलेगठ्ठ शरीर. पलंगाच्या खालच्या टोकाशी पडलेला चुरगळलेल्या शर्टाचा बोळा त्यानं पाय लांबवून खेचून घेतला. शर्टाच्या खिशातून पाकीट काढलं आणि पाकिटातल्या सोफी मॉलच्या फोटोकडे खूप वेळ पाहत बसला. दोन वर्षांपूर्वी मार्गरिट कोचम्मानं तो फोटो चाकोला पाठवला होता.

फोटो हातात घेतलेल्या चाकोकडे राहेल पाहत राहिली. तिच्या आत बसलेला तो थंड रक्ताचा पतंग पुन्हा आपले पंख फडफडवायला लागला होता. हलके हलके. लूटमार करून, दुसऱ्याच्या मांसावर गुजराण करणाऱ्याने आपली सुस्त, भावनाशून्य नजर हलकेच मिचकवावी, तसा.

बिछान्यावरच्या चादरी जाड्याभरड्या, पण बऱ्यापैकी स्वच्छ होत्या.

सोफी मॉलचा फोटो ठेवलेलं पाकीट चाकोनं बंद केलं आणि पलंगाशेजारचा छोटा दिवाही विझवला. खोलीत सगळा अंधार. त्या अंधाराला चटका देत चाकोनं 'चारमिनार'

शिलगावली आणि छातीभरून झुरके घेत-घेत, पडल्या पडल्या त्याच्या डोक्यात चक्र सुरू झालं. 'आपली मुलगी कशी दिसत असेल? नऊ वर्षांची झाली आता. म्हणजे किती उंच असेल? अगदी पहिल्यांदा तिला बघितलं, तेव्हा जेमतेम माणसाच्या आकाराचा मऊ-मऊ गोळा होता फक्त. लालसर आणि सुरकुत्या सुरकुत्या पडलेला.

– त्यानंतर बरोबर तीन आठवड्यांनी चाकोचा जीव की प्राण असलेली त्याची बायको – मार्गरिट कोचम्मा रडत भेकत त्याच्याजवळ आली आणि तिनं पहिल्यांदा 'जो'बद्दल सगळं सांगितलं.

आता एक क्षणभरदेखील 'जो'शिवाय राहणं आपल्याला शक्य नाही, असं मार्गरिट कोचम्मा परत-परत म्हणत होती. तिनं चाकोला खूप काही सांगितलं. म्हणाली, 'मला माझी स्वतंत्र 'स्पेस' हवीय. वेगळी 'जागा.' स्वत:चं स्वतंत्र अवकाश. स्वतंत्र जीवन.'

वेगळी 'जागा'?- जसं की चाको तिचं कपाट आपले कपडे ठेवण्यासाठी वापरतो, म्हणून वैताग झाला होता तिचा. चाको कधीकधी खरोखरच करायचा तसं. त्यालाही ते माहीत होतं, कळत होतं.

– मार्गरिट कोचम्माला चाकोपासून घटस्फोट हवा होता.

मार्गरिट कोचम्माला 'स्वतंत्र' करून तिला सोडून जाण्यापूर्वीच्या उरल्यासुरल्या वादळी रात्री चाकोनं वेगळ्या बिछान्यात काढल्या. छोटी बॅटरी बरोबर घेऊन तो झोपायचा आणि अंधाऱ्या मध्यरात्री गाढ झोपलेल्या आपल्या मुलीचा चेहरा कसा दिसतो, ते पाहत राहायचा. ते रूप चाकोला आपल्या नजरेत, आठवणीत साठवून घ्यायचं होतं. पुढं जेव्हा केव्हा तिच्या आठवणीनं अस्वस्थ व्हायला होईल, तेव्हा ती पटकन डोळ्यांपुढे उभी राहावी, यासाठी चाकोची धडपड चालली होती. तिच्या मऊमऊ डोक्याच्या पृष्ठभागावर चिकटलेले गडद बदामी रंगाचे जन्मकण, सतत हलत राहणाऱ्या तिच्या तोंडाचा आकार, इवलुशा बोटांमधले लोभस खळगे आणि तिच्या गोऱ्यापान त्वचेवर भविष्यात उमलू घातलेल्या तिळांच्या अस्पष्ट अंधूक खुणा... असं खूप काही; पण आणखीही काही होतं. त्याहून महत्त्वाचं. आपल्या रक्तामांसातून जन्मलेल्या मुलीच्या निद्रिस्त शरीरावरून उत्सुकतेने फिरणारी चाकोची नजर त्याच्याही नकळत 'जो'च्या खुणा कुठं दिसतात का' ते शोधत राही. एकदा बॅटरीच्या अशक्त प्रकाशात त्याची मत्सरग्रस्त, संशयानं पेटलेली बोटं गाढ झोपेतल्या त्या शरीरावरून फिरत असताना अचानक चुळबुळ झाली आणि त्याच्या मुलीनं आपल्या बाळमुठीत पटकन चाकोची तर्जनी पकडली. एखाद्या टेकडीवर गोलाकार घुमट उभारावा, तशी तिच्या मऊमऊ पोटाच्या मध्यभागातून छोटीशी टपोरी बेंबी बाहेर डोकावत होती. तिच्या उष्ण पोटावर हलकेच कान टेकवून थक्क झालेला चाको आतले गूढ आवाज औत्सुक्यानं ऐकत राहिला. अगदी कोवळ्या आवाजात कसले-कसले निरोप इकडून तिकडे पाठवले जात होते.

एकमेकांची ओळख करून घेणाऱ्या, एकमेकांशी जुळवून कसं घ्यायचं ते शिकणाऱ्या नवीन अवयवांचं काम हलके-हलके वेग घेऊ लागलं होतं. संपूर्ण स्वतंत्र रीतीनं कारभार चालवण्याची जबाबदारी असलेलं एक नवं सरकार सत्तेवर येत होतं. कामाच्या वाटपांची धांदल चालू झाली होती. कोण कुठं असणार, तिथून काय करणार, हे ठरवलं जात होतं. हक्क आणि कर्तव्यांची वाटणी चालू झाली होती.

मऊमऊ पांघरुणात गुंडाळलेल्या त्या इवलुशा मुलीला दूध आणि सूसूचा वास येतो, हे चाकोनं पटकन ओळखलं. ज्याला अजून धड माणसाचा आकारही आला नाही, ज्याच्या अस्तित्वाला अजून कसलाच अर्थ नाही, असा इतका लहान, कोवळा जीव मोठ्यामोठ्या, शहाण्यासुरत्या माणसांना आपल्याकडे कसा काय खेचून घेत असेल? कशाच्या बळावर त्यांचं इतकं अपरंपार प्रेम मिळवत असेल?– चाकोला नवल वाटत राहिलं आणि सुखानं हसूही आलं.

चाको घरातून एकटा आणि कायमचा बाहेर पडला, तेव्हा आपल्या अस्तित्वाचा एक लचका तोडून देत असल्यासारखं त्याला वाटलं. तो तसाच रक्ताळल्या, हरवल्या मनानं घरातून बाहेर पडला.

पण आता 'जो'च उरला नव्हता. गाडीच्या अपघातात तो मारला गेला आणि संपलं सगळं. 'जो' मेला. बंद दरवाजात घुसलेल्या मुठीसारखा आणि अख्ख्या विश्वाच्या छाताडावर 'जो'च्या आकाराचं एक मोठ्ठं लांबुडकं छिद्र पडलं.

चाकोजवळच्या फोटोतली सोफी मॉल सात वर्षांची होती. गोरीपान. निळसर डोळ्यांची आणि लालचुटूक ओठांची. सीरिअन ख्रिश्चनत्वाचे अंश मात्र फारसे नव्हते दिसत, तरी सोफी मॉलचा फोटो बघितल्यावर माम्माची म्हणालीच, की तिचं नाक थेट पाप्पाचींवर गेलंय म्हणून!

'चाको?'– अंधाऱ्या बिछान्यावर पडल्या-पडल्या राहेलनं हाक मारली. 'तुला एक प्रश्न विचारू का?'

'एक का? दोन विचार' – चाको उत्तरला.

'चाको, या जगात सगळ्यात जास्त प्रेम तू सोफी मॉलवर करतोस का रे?'

'अगं, ती मुलगीच आहे माझी,' चाको म्हणाला.

– राहेलनं तेवढा मुद्दा नीट लक्षात घेतला.

'चाको, या जगातलं सगळ्यांत जास्त प्रेम आपल्या मुलावर करणं माणसांना भागच असतं का रे?'

'असा काही नियम नाही,' चाको म्हणाला, 'पण सर्वसाधारणत: लोकं करतात आपल्या मुलांवर प्रेम.'

‘पण असं समज...’ राहेलनं पुन्हा विचारलं, ‘फक्त समज हां... की उदाहरणार्थ, माझ्यापेक्षा आणि इस्थापेक्षाही सोफी मॉलवर अम्मूचं जास्त प्रेम आहे, असं होऊ शकतं का?’

‘अग, माणसाचा स्वभाव आहे तो. काहीही होऊ शकतं’ – पुस्तकांच्या जगात गुदमरलेला चाकोचा तो खास कमावलेला, प्रवचनाचा सूर अचानक त्याला गवसला होता. शेजारी झोपलेल्या आपल्या गोड भाचीचा विसर पडून चाको खोलीत पसरलेल्या अंधाराशीच बोलायला लागला,

‘प्रेम... वेडेपणा... आशा... अपरिमित आनंद...’

– माणसाच्या स्वभावात काय-काय असू शकतं, घडू शकतं, याचा विचार करता-करता हे चार पर्याय राहेलच्या डोक्यात घुसले. प्रेम... वेडेपणा... आशा... अपरिमित आनंद. बाकी सगळं ठीक, पण ‘अपरिमित आनंद’ या शब्दातच असह्य दु:खाचा एक छुपा नाद दडलेला आहे, असं तिला जाणवल्यावाचून राहिलं नाही.

अपरिमित आनंद चर्चमधल्या विषण्ण दु:खाचा नाद असलेला शब्द... अंगावर सगळीकडे असलेल्या कल्ल्यांनी झाकलेल्या माशासारखा. खिन्न, विषण्ण.

थंड रक्ताच्या पतंगानं हलकेच आपला पाय वर उचलला.

रात्रीच्या अंधारातून सिगारेटच्या धुराची पांढरी वेटोळी वरवर सरकत होती. खाऊन खाऊन टम्म झालेला जाडा माणूस आणि एक छोटीशी, उपाशी मुलगी. दोघेही टक्क उघड्या डोळ्यांनी त्या काळ्याभोर शांततेत पडून राहिले.

काही खोल्या सोडून पलीकडच्या त्या खोलीत बेबी कोचम्मा घोरत पडलेली... आणि इस्था टक्क जागा.

खिडकीला लावलेल्या निळ्या काचेतून रस्त्यावरच्या दिव्यांचा निळसर मंद प्रकाश खोलीत पाझरत होता. त्या प्रकाशात शांत निजलेली अम्मू तेजस्वी, सुंदर दिसत राहिली. खोल निळ्या पोकळीतून उसळणाऱ्या डॉल्फिनचं स्वप्न पडत असावं, तसं झोपेतलं हसू तिच्या ओठांच्या कडेनं सांडत होतं. गूढ, अद्‌भुत हसू. ज्याच्या चेहऱ्यावर उमलतंय, त्याच्या मनात खोल पुरून ठेवलेल्या जिवंत बॉम्बचा पत्तासुद्धा लागू न देणारं.

इस्था उठला. एकटाच. हलके-हलके बाथरूमच्या दिशेनं चालत गेला. त्याला छान उलटी झाली. आंबूस, चकाकतं, फसफसतं, लेमनड्रिंकच्या वासाचं पुष्कळ काहीतरी उलटून पडलं. मोठ्या होऊ घातलेल्या लहान मुलानं आयुष्यातल्या पहिल्या दहशतीचा सामना केल्यानंतर पोटात साचलेलं झणझणीत जहाल विष त्याच्या नजरेसमोरून वाहत-वाहत चाललं होतं... डमडम.

इस्थाला पहिल्यापेक्षा जरा बरं वाटायला लागलं. पायांत बूट चढवून तो सरळ खोलीच्या बाहेर आला. बुटांची लेस त्याच्या मागून लळतलोंबत चाललेली. कॉरीडॉर पार करून चालत आलेला इस्था राहेलच्या खोलीबाहेर बंद दारासमोर शांतपणानं उभा राहिला.

राहेलनं खोलीतली एक खुर्ची सरकवत-सरकवत दाराजवळ आणली आणि खुर्चीवर उभं राहून दाराची उंच कडी काढली.

दार उघडलं. इस्था न बोलता आत आला.

दाराबाहेर इस्था उभा आहे, हे कुणीही न सांगता राहेलला कसं काय समजलं, असल्या गोष्टींचा विचार करणं चाकोनं एव्हाना सोडूनच दिलं होतं. जुळ्यांमधल्या या विचित्र अद्‌भुतपणाची त्याला आता सवयच झाली होती.

किनाऱ्यावर आलेल्या व्हेलमाशासारखा हॉटेलातल्या त्या अरुंद पलंगावर चाको औरसचौरस पसरला. त्याच्या डोक्यात आता नवीन किडा घुसला होता. कम्युनिस्टांच्या मोर्च्यात राहेलनं ज्याला पाहिलं, तो 'वेलुथा'च असेल का? – त्याला खरं वाटेना. वेलुथा... किती हुशार मुलगा. शिवाय कर्तृत्ववान. जातीने पारायार असला, तरी नशीब उघडण्याचं कसब अवगत असलेला... वेलुथा मार्क्सवादी पार्टीचा 'कार्ड-होल्डिंग मेंबर' झाला असेल का? त्याच्या आणि कॉम्रेड के. एन. एम. पिल्लईंच्या भेटीगाठी, चर्चा होत असतील का? – चाकोच्या डोक्यात कसले कसले हिशेब चालू झाले.

अगदी अलीकडेच, कॉम्रेड पिल्लईंना एकाएकी राजकीय महत्त्वाकांक्षेची उबळ आली होती. कॉम्रेड जे. कट्टुकरन आणि कॉम्रेड गुहान मेनन या दोघा सदस्यांची 'नक्षलवादी' असल्याच्या संशयावरून पार्टीतून हकालपट्टी झाली आणि स्थानिक राजकारणाची समीकरणं बदलली. नजीकच्या मार्चमध्ये कोट्टायममधल्या विधानसभेच्या जागेसाठी पोटनिवडणूक लागली होती. त्या निवडणुकीत कॉम्रेड गुहान पार्टीचे अधिकृत उमेदवार असतील, हेही जवळपास निश्चित झालेलं. खुद्द भावी उमेदवाराचीच पार्टीतून हकालपट्टी झाल्यावर अचानक भलीमोठी पोकळी निर्माण झाली आणि ताबडतोब ती भरून काढण्यासाठी इच्छुकांच्या झुंडी मोर्चेबांधणी करू लागल्या. त्यांत कॉम्रेड के. एन. एम. पिल्लईसुद्धा होते.

टी. व्ही.वरच्या फूटबॉल मॅचमध्ये रमलेल्या कॉम्रेड पिल्लईंना एकाएकी 'पॅराडाईज पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्'मधल्या घडामोडींमध्ये फारच रस वाटू लागला. आपल्या भावी मतदारसंघात छोटी का असेना, पण एखादी नवीन कामगार संघटना उभारता आली, तर आपल्या नव्या राजकीय जीवनाचा उत्तम प्रारंभ होऊ शकेल, असं खूळ कॉम्रेड पिल्लईंच्या डोक्यात घुसल्यापासून ते फारच घायकुतीला आले होते.

तोवर 'पॅराडाईज पिकल्स'मध्ये सगळं छान चाललं होतं. 'कॉम्रेड कॉम्रेड' हा

फुरसतीच्या वेळात मन रमवण्याचा एक निरुपद्रवी खेळ असतो, एवढंच तिथल्या कामगारांना ठाऊक होतं. पण एखादा इरेला पेटला आणि सगळ्यांना शिस्तीनं शिस्तीत चालवणाऱ्या (कम्युनिस्ट) चाकोच्या हातांतून अधिकाराचा दंडुका हिरावून घेतला, तर अगदी गळ्यापर्यंत कर्जात बुडालेल्या 'पॅराडाईज पिकल्स'चा इमला खाली कोसळायला फार वेळ लागणारा नाही हे (एकटा चाको सोडून) सगळ्यांना ठाऊक होतं.

आधीच कर्जाचं ओझं आणि त्यात व्यापारातल्या मंदीमुळं 'पॅराडाईज पिकल्स'मध्ये अर्थिक तंगी सुरू झाली होती. कामगार संघटनांनी ठरवलेल्या किमान वेतनापेक्षा 'पॅराडाईज'च्या कामगारांना कितीतरी कमी पैसे दिले जात; पण तरीही चाकोमधला 'कम्युनिस्ट' स्वस्थ बसला नाही. त्यानं आपल्यावर ओढवलेल्या आर्थिक अरिष्टाची कामगारांना नीट कल्पना दिली, मजुरीत कपात करण्याखेरीज दुसरा इलाज का उरलेला नाही, ते समजावून सांगितलं आणि परिस्थिती पालटली, की ताबडतोब कामगारांना मजुरी वाढवून दिली जाईल, असं आश्वासनही दिलं. आपण मांडलेली सगळी परिस्थिती कामगारांना नीट समजली आहे, त्यांचा आपल्यावर विश्वास आहे आणि आपण त्यांचं भलंच करू इच्छितो, हेदेखील कामगारांपर्यंत व्यवस्थित पोचलं आहे, अशी स्वत:चीच समजूत घालून चाको निर्धास्त झाला.

– पण एका माणसाचा या संदर्भात तीव्र मतभेद होता. संध्याकाळी उशिरा फॅक्टरीतल्या कामाची पाळी संपवून 'पॅराडाईज पिकल्स'चे कामगार घरी जायला निघाले की आधीपासून दबा धरून बसलेले कॉम्रेड के. एन. एम. पिल्लई रस्त्यावर उभे राहत आणि भेटेल त्या कामगाराला आपल्या प्रिंटिंग प्रेसच्या आवारात बोलावून घेत. 'काय आहे, ते बघू तरी' अशा औत्सुक्यानं घोळका जमला की कॉम्रेड पिल्लईंची गेट मीटिंगच सुरू होई. हलक्या, कुजबुजत्या आवाजात कॉम्रेड पिल्लई 'पॅराडाईज पिकल्स'च्या कामगारांना क्रांतीची ललकारी देत. त्यांच्या भाषणात तातडीची स्थानिक समस्या, तिचं विश्लेषण आणि माओवादी अलंकारयुक्त शैलीदार शब्दरचनेचं भलतंच भन्नाट मिश्रण असे. शिवाय मल्याळममध्ये ते ऐकायला फारच थोर वाटे.

'जगाच्या नागरिकांनो,' – कॉम्रेड पिल्लई बोलता-बोलता ललकाऱ्या देत, 'हिंमतवान बना. अन्यायाविरुद्ध पेटून उठा. लढे उभारण्याची धमक ठेवा. तीव्र विरोध होईल, उसळत्या लाटांसारख्या अडचणी येतील आणि विरूनही जातील. पण लढ्याच्या अंती संपूर्ण जगाची मालकी तुमच्या ताब्यात येईल. कष्टकऱ्यांचं रक्त शोषणाऱ्या, नीच, अधम भांडवलदारांचा नायनाट केलाच पाहिजे. जे तुमच्या हक्काचं आहे ते मागून आणि मिळत नसेल, तर भांडून घेतलंच पाहिजे. वर्षातून एकदा बोनस. प्रॉव्हिडंट फंड. अपघाती विम्याची पॉलिसी.'

– येऊ घातलेल्या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून

भव्य जनसमुदायापुढे करायच्या भाषणांची ही रंगीत तालीम असल्यामुळं कॉम्रेड पिल्लई जरा जास्तच उंच स्वरात लांबलचक हेल काढून बोलत, ते जरा विचित्र वाटे; पण कॉम्रेड पिल्लईंना एवढं भान उरलंच नव्हतं. हिरव्यागार भातशेतीच्या लांबलचक मळ्यांनी वेढलेल्या प्रचंड मैदानात, लाल बावट्यांनी फुलून गेलेल्या विस्तीर्ण निळ्या आकाशाखाली सुरू झालेली जाहीर सभा त्यांच्या डोळ्यांसमोर दिसू लागली, की आपली छोटीशी खोली त्यांच्या नजरेआड होई. शेजारच्या प्रिंटिंग प्रेसमधल्या शाईचा वाससुद्धा मग त्यांना येत नसे.

कॉम्रेड के. एन. एम. पिल्लईंनी चाकोच्या विरोधात उघड भूमिका कधीच घेतली नाही. भाषणात चाकोचा उल्लेख करायचा झाला, तरी ते कधीही स्पष्टपणानं त्याचं नाव घेत नसत. 'कामगारांचं रक्त शोषणाऱ्या भांडवलदार व्यवस्थेचा एक प्रतिनिधी'... किंवा 'एखाद्या मोठ्ठ्या साखळीतला छोटासा घटक'... प्रत्यक्ष तत्त्वावर आधारलेली एक सैद्धान्तिक शब्दरचना. संपूर्ण क्रांतीचं स्वप्न उलथून पाडण्यासाठी अन्यायकारी व्यवस्थेच्या हातात असलेलं एक बूर्झ्वा बाहुलं, यापलीकडे कॉम्रेड पिल्लई चुकूनसुद्धा चाकोचं नाव घेत नसत. त्याऐवजी 'व्यवस्थापनाचे प्रतिनिधी' म्हणत. म्हणजे 'चाको'च, हे सगळ्यांना न सांगता समजत असे. थोडक्यात, कॉम्रेड पिल्लईंनी चाकोला अनेक वेगवेगळ्या रूपांत विभागून टाकला होता. म्हणजे माणूस एकच; पण त्याची रूपं मात्र (कॉम्रेड पिल्लईंच्या) सोयीनुसार वेगवेगळी. व्यवहारचातुर्य म्हणून ही खेळी सोईस्कर होतीच; पण चाकोमधला 'कारखानदार' आणि 'माणूस' वेगवेगळा करून त्यांचा वेगवेगळा विचार करणं कॉम्रेड पिल्लईंना व्यावसायिकदृष्ट्याही फारच सोयीचं होतं. पॅराडाईज पिकल्सच्या बाटल्यांवर, डब्यांवर लावायची लेबलं छापून मिळणाऱ्या पैशांवर पाणी सोडणं कॉम्रेड पिल्लईंच्या डबघाईला आलेल्या प्रिंटिंग प्रेसला (आणि त्यांच्या कफल्लक खिशाला) मुळीच परवडण्यासारखं नव्हतं. पण 'चाको – एका व्यवस्थापनाचा प्रतिनिधी' आणि 'चाको – प्रिंटिंग प्रेसचा आश्रयदाता ग्राहक' या दोन वेगवेगळ्या व्यक्ती आहेत, असं स्वत:च स्वत:ला सांगून कॉम्रेड पिल्लई स्वत:चं नैतिक समाधान करून घेत. शिवाय 'कॉम्रेड' म्हणून चाकोचं एक रूप होतं, ते वेगळंच.

कॉम्रेड पिल्लईंनी अत्यंत काळजीपूर्वक आखलेल्या व्यूहरचनेत एकच अडचण होती – वेलुथा. पॅराडाईज पिकल्सच्या संपूर्ण कामगार-वर्गात हा एकमेव माणूस कम्युनिस्ट पार्टीचा 'कार्डहोल्डर' होता. म्हणजे कॉम्रेड. म्हणजे एका अर्थानं कॉम्रेड पिल्लईंचा मित्रच. किंवा जवळचा, विश्वासातला सहकारी तर नक्कीच; पण तिथंच नेमकी माशी शिंकली. हा 'मित्र' नसता आपल्या वाटेत, तर सगळं फार सहज निभावता आलं असतं, म्हणून कॉम्रेड पिल्लई स्वत:शीच चरफडत. फॅक्टरीतले इतर सगळे उच्चवर्णीय कामगार काही विशिष्ट कारणांसाठी वेलुथावर खार खाऊन आहेत, हे कॉम्रेड पिल्लईंना चांगलं

ठाऊक होतं. तेवढा धागा त्यांनी पकडून ठेवला आणि योग्य संधीची वाट बघावी, असं ठरवलं.

कॉम्रेड पिल्लईंनी सातत्यानं कामगारांशी संपर्क ठेवायला सुरुवात केली. कारखान्यात काय-काय घडतं, यावर त्यांचं बारीक लक्ष होतंच. कामगारांची पाठराखण करणारं, कामगारांचं स्वत:चं सरकार राज्यात सत्तेवर असताना कमी मजुरी मान्य करणाऱ्या घाबरट, भ्याड कामगारांची टिंगल उडवायला त्यांनी सुरुवात केली.

कारखान्यातला अकाऊंटंट पुन्नाचेन रोज सकाळी माम्माचीला पेपर वाचून दाखवण्याकरता घरी यायचा. 'मजुरी वाढवून मिळावी' अशी मागणी कामगार करणार आहेत, त्याबद्दलच्या चर्चा आजकाल रोज चालतात, अशी खबर पुन्नाचेननं दिल्यावर माम्माचीचा संतापानं भडका उडाला.

'त्यांना म्हणावं, जरा रोजचे पेपर वाचत चला. उपासमारीनं टाचा घासून लोक मरतायत. नोकऱ्या नाहीत, काम नाही. दुष्काळ पसरलाय सगळीकडे. तुम्ही निदान उपाशी तर मरत नाही ना, त्याचे उपकार माना, म्हणावं. अजिबात कामच नाही, म्हणून उपासमारीनं मरण्यापेक्षा, आहे त्यात समाधान मानणं परवडलं की नाही?'

– माम्माचीचं चित्त उडालं. कारखान्यात काहीतरी भयंकर घडायचं असलं, की चाकोच्या आधी त्याची खबर माम्माचीपर्यंत पोचणार, हे अगदी ठरलेलं होतं. आपल्या अडीअडचणी, तकरारी घेऊन कामगार पहिल्यांदा माम्माचीकडेच यायचे. कारण 'मालका'च्या भूमिकेत एकटी माम्माचीच फिट्ट बसत असे. ती जन्मानं आणि स्वभावानंही 'भांडवलदार' होती. ती काय बोलेल, कशी वागेल, कोणता निर्णय घेईल, याचे अचूक आराखडे कामगारांना बांधता येत. माम्माचीचं बोलणं जरा उद्धट, आक्रस्ताळं होतं; पण जे बोलायची, ते सरळ, स्वच्छ. कसलाही आडपडदा न ठेवता.

चाको स्वत:ला 'कुटुंबप्रमुख' मानायचा; पण त्याचं हे 'प्रमुखत्व' फक्त त्याच्या स्वत:पुरतंच होतं. येताजाता 'माझी फॅक्टरी, माझी लोणची, माझे जॅम' म्हणायचा. पण त्याला व्यवहारात काही अर्थ नव्हता. खडा संघर्ष समोर येऊन उभा ठाकला, तरी घडणाऱ्या घटनांचे नीट अर्थ चाकोला कधीच लावता आले नाहीत.

माम्माचीनं चाकोला सावध करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. त्यानं शांतपणानं तिचं बोलणं ऐकून घेतलं; समजून घेण्याचा त्याचा स्वभावच नव्हता. त्यामुळं कर्जात बुडालेल्या 'पॅराडाईज पिकल्स'वर कामगारांच्या तीव्र असंतोषाचे ढग दाटून आले, तरी क्रांतीच्या रंगीत तालमीत गढून गेलेला चाको त्याच जुन्या उत्साहानं तोच जुना 'कॉम्रेड कॉम्रेड'चा खेळ खेळत राहिला.

त्या रात्री, हॉटेल सी क्वीनच्या अरुंद पलंगावर पडल्या-पडल्या चाकोनं नव्या व्यूहरचनेचा विचार केला. स्वत:च्या कामगारांना एकत्र करून स्वत:च एक खाजगी कामगार संघटना उभी केली, तर कॉम्रेड पिल्लईंना परस्पर शह देता येईल का, असं गणित चाकोनं स्वत:लाच घातलं. कामगारांसाठी निवडणुका घ्यायच्या... त्यांना मतदान करायला शिकवायचं... मग ते स्वत:च स्वत:चे प्रतिनिधी निवडतील... हे प्रतिनिधी कामगारांच्या अडीअडचणींबद्दल शांततामय मार्गानं व्यवस्थापनाशी चर्चा, वाटाघाटी करतील...

– चाकोला झोप आली होती, तरीही तो आपल्याला सुचलेल्या कल्पनेवर एकदम खूश झाला. कॉम्रेड सुमति... किंवा तिच्यापेक्षा सरस आणि तिच्यापेक्षा जास्त सुंदर केस असलेली कॉम्रेड लकीकुट्टी चर्चेसाठी आल्या आहेत... त्यांच्याबरोबर आपली 'राऊंड टेबल कॉन्फरस' चाललीय, अशी चित्रं डोळ्यांसमोर तरळायला लागल्यावर चाकोला मनापासून हसू आलं.

– मग पुन्हा त्याच्या मनात मार्गरिट कोचम्मा आणि सोफी मॉलचे विचार परतून आले. गमावलेल्या प्रेमाचा एक अद्‌भुत बंध गळ्याभोवती इतका घेरून आला, की श्वास घेणं मुश्कील व्हावं. चाको जागाच होता कितीतरी वेळ. त्या दोघींना आणायला जायचंय... विमानतळावर... या उत्कंठेनं चाकोला झोपच येईना. तो तसाच उलटणारी सेकंद, मिनिटं, तास मोजत 'सकाळ कधी होतेय' त्याची वाट पाहत जागत राहिला.

शेजारच्या पलंगावर चाकोचा भाचा आणि भाची एकमेकांच्या मिठीत गाढ झोपले होते. दोन जुळे जीव. एक तापानं फणफणलेला. एक भीतीनं गारठलेला. तो आणि ती... आम्ही आणि आपण... भविष्यातल्या सर्वनाशाची जाणीव त्यांना नव्हतीच, असं नाही... झेपावत येणाऱ्या पंखांच्या पोटात आपल्यासाठी काय वाढून ठेवलंय, हेदेखील बहुधा जाणवत असावं त्यांना...

त्यांच्या स्वप्नांतून त्या दोघांची नदी वाहत होती. काठावरून आत कललेल्या नारळाच्या झावळ्यांनी झाकून गेलेलं स्वच्छ-सुंदर पात्र... त्यावर तरंगणाऱ्या होड्या. सकाळचा उसळता, उलटा प्रवाह आणि संध्याकाळचं संथ वाहतं पाणी... तेल पाजलेल्या, चकचकीत काळ्याभोर लाकडाच्या होड्या नदीत लोटताना पाण्यात वाजणारा चुबुकडुबुक आवाज... वल्हे होडीवर आपटले की उमटणारा खिन्न विषण्ण नाद...

त्या स्वप्नातलं पाणीही खूप उबदार होतं. निवळशंख... मंद खळखळत जाणारं... रेशमासारखं.

त्या पाण्यात मासे होते.

आकाश आणि झाडं होती.

रात्री, गर्भरेशमी चंद्राचे हजारो तुकडे विखरून पडत होते प्रवाहावर.

स्वप्न संपण्याची वाट बघून-बघून कंटाळलेले, खोलीत भरून-भरून वैतागलेले रोस्टेड चिकनचे, स्वीट कॉर्न सूप आणि व्हॅनिला आईस्क्रीमचे वास पडद्यांवरून सरपटत-सरपटत वर चढले... हॉटेल सी क्वीनच्या खिडकीतून निसटले आणि तसल्याच वासांनी दरवळणाऱ्या समुद्रावर रात्रभर तरंग-नृत्य करण्यासाठी निघून गेले.

– दोन वाजायला दहा मिनिटं बाकी होती.

प्रकरण ५
'गॉडस् ओन कंट्री'

खूप वर्षांनी राहेल परत आली, तेव्हा तिची नदी मरणोन्मुख झाली होती. प्रेताची कळा पसरलेल्या विषण्ण चेहऱ्यानं, रुग्णशय्येवर पडलेले अशक्त मलूल हात कसेबसे उंचावत क्षीण हसून नदीनं राहेलचं स्वागत केलं. तिच्या त्या भकास हसण्यातूनदेखील काळ्याकभिन्न पोकळ्यांनी विच्छेदलेले, उगमापासून उपटून मलूल होऊन पडलेले एके काळचे खळाळते झरे लपत नव्हते.

विचित्रच झाली होती तिची प्रकृती. अशक्त आणि खोट्या विकासानं सुजलेली. उन्मादानं मुसमुसलेली आणि मुळातूनच रोडावलेली, खुंटलेली.

ती वाढली होती एका बाजूनं आणि वाढता-वाढता हिरमुसत, आक्रसत गेली होती.

राहेलची नदी.

प्रवाहाच्या खालच्या बाजूला उभ्या झालेल्या धरणाच्या अजस्र भिंतींनी तिचा श्वास कोंडला होता. हजारो एकर भातशेतीची मालकी असणाऱ्या धनवान, श्रीमंत शेतकऱ्यांनी आपल्या 'मतां'चा यशस्वी सौदा करून नदी 'बांधून' घेतली. धावत उसासत जाऊन ती अरबी समुद्राला मिळायची, तिथं भिंती उभ्या करून समुद्रातून नदीत मिसळणाऱ्या खाऱ्या पाण्याचे प्रवाह अडवले. मग पाणीच पाणी. विकासच विकास. वर्षातून एकाऐवजी दोन पिकं. एकाऐवजी दोनदा सुगी. तांदळाच्या राशी... नदीला फाशी देऊन कमावलेल्या.

जून.

ऐन पावसाचे दिवस. पाऊस कोसळतही होता धुवांधार, तरी नदीला उधाण येईना. 'नदी' म्हणजे उरलंच होतं काय? थोडीशी सूज आलेला सांडपाण्याचा नाला! कसाबसा वळत वळवळत वाहणारा. काठावरच्या मातीच्या बंधाऱ्यांना चाटत-चाटत थकल्याभागल्या प्रवाहानं, नासून गेलेल्या त्रासानं वाहणारी जाड पाण्याची एक पातळ चिंधी! त्या झिरझिरीत पट्टीवर कधीतरी एखाद्या मेलेल्या माशाची चंदेरी शेपटी आपटायची; तेवढीच फक्त प्रवाहातली चमक. छातीत मुळ्या खुपसून चौफेर फोफावलेल्या रानटी पाणवेलींनी श्वास कोंडला होता नदीचा. त्या पाणवेलींच्या हिंस्र मुळ्या पाण्याच्या खाली हातपाय पसरून वळवळताना दिसत आणि त्या जंजाळातून इकडून तिकडे दुडदुडणारे कसले कसले प्राणी... फताड्या पायांचे... सावध!

कधी काळी याच नदीच्या फेसांडत्या प्रवाहाचा थरार पाहिला की भीतीनं शब्द फुटत नसत. तिची दहशतच होती तशी जबरदस्त. एकाच वेळी जे मिळेल, ते पोटात घेऊन अफाट धावणारा अकराळविकराळ विध्वंस... आणि मानवी संस्कृतीची आदिमाय

असणारं अपरंपार सर्जन... ती जीवनदायिनी होती. हर-एक प्राणिमात्राच्या जगण्याला संजीवन देण्याचं अद्‌भुत सामर्थ्य होतं तिच्यात. काठोकाठ.

...पण आता संपलं होतं सगळं. आटले होते तिचे प्राण. झडून गेलेल्या दहशतीच्या दातांची अंधारी बोळकी आणि विझलेल्या चैतन्याची ओली, चिकट राख. तिचं 'नदी'पणच संपलं होतं. कुबट दुर्गंधीचा कोंडमारा सोसत काठावरची घाण, मैला, ओला मऊ चिखल समुद्रापर्यंत वाहून नेणारी एक हिरवट काळपट चिंधी... म्हणजे नदी. झाडपाल्याचं अस्ताव्यस्त रान माजलेल्या त्या चिकट प्रवाहाच्या पृष्ठभागावर प्लॅस्टिकच्या पिशव्यांच्या चमकदार जखमा... आणखी रक्त काढणाऱ्या, उरलासुरला प्राण शोषून कोंडून घालणाऱ्या.

नदीला बांधलेला सुंदर घाट हे एके काळी तिचं वैभव होतं. त्याचे काळेभोर ताशीव दगड पायऱ्यापायऱ्यांनी उतरत हलकेच नदीच्या पाण्याला स्पर्श करत. प्रात:काळी स्नानाला येणाऱ्या भाविकांच्या ओल्या पाऊलखुणा श्रद्धेनं मिरवणारा तो दगडी घाट आता अगदीच केविलवाणा होऊन आटलेल्या नदीपात्रापासून पार तुटून पडला होता. नदीशी असलेलं त्याचं अभिन्न नातंच दुभंगून गेलेलं आणि मध्ये कोरड्या, सुकलेल्या चिखलाची खरवड... नदीच्या भेटीची आस लागलेल्या पावलांना प्रवाहाच्या मध्यापर्यंत थेट घेऊन जाणाऱ्या पायऱ्या आता कुठून कुठं जातात, काही कळेनासंच झालं होतं. पाणी संपलेलं... प्रवाह पांगलेला... दिशा हरवलेल्या... आणि दूर कुठंतरी त्या निरुपयोगी दगडांचा मेलेला पसारा. दगडांमधल्या भेगा शोधून-शोधून निगरगट्टपणे जगत राहणारी खुरटी झुडपं तेवढी मुळं रोवून उभी.

पल्याडच्या किनाऱ्यावर पसरलेला मऊ ओला चिखल वाळून-वाळून त्याच्या छोट्या-छोट्या भिंतीच उभ्या राहिल्या होत्या. नदीकडे पाठ करून त्यावर बसलेली नागडी पोरं आपापली पोटं रिकामी करीत आणि उग्र आंबूस वासाचे ते पिवळसर लदबदीत गोळे उघड्या पडलेल्या नदीपात्रात बदाबदा गळत राहात. संध्याकाळ झाली, की कसेबसे प्राण कंठाशी आणत उचंबळून आलेली नदी दिवसभराचा 'प्रसाद' भक्षण करून भरल्या पोटानं समुद्राच्या दिशेनं सरकत, सरपटत राही... मग पुष्कळ वेळानं दोन्ही काठांवर पांढऱ्या-पांढऱ्या अशक्त रेषांची जाळी कोरून नदीची ही उचंबळ विरून, विस्कटून जाई. शिवाय संध्याकाळची गजबज. प्रवाहातून फेसाळणाऱ्या कारखान्याच्या हिरवट उग्रट सांडपाण्यात कपडे धुणाऱ्या, भांडी घासणाऱ्या टापटिपीच्या स्त्रिया... आणि उघडं अंग चोळून-चोळून त्यातच अंघोळ करणारे पुरुष... ओलसर चिकट पटांगणावर हातपाय तोडलेल्या धडांचे अर्धपुतळे हारीनं मांडून ठेवावेत, तसे. शिवाय त्या काळ्याकुट्ट आकृत्यांवर थापलेले साबणाच्या उफाळत्या फेसाचे गोळे.

उन्हाळा आला की आटलेल्या नदीत कुजून वाळलेल्या हाग-मुताचा उग्र घाणेरडा वास

अख्ख्या आयमेनेमच्या डोक्यावर घोंघावत राही.

...हे सगळं अगदीच पातळ, कोमट, म्हणून ही काय, नदीच्या आयुष्यात आणखी एक रंगीबेरंगी, रोमांचक प्रकरण सुरू झालं होतं. पंचतारांकित हॉटेल्सच्या एका बड्या उद्योगसमूहानं भरपूर पैसा ओतून नदीच्या काळजातले अंधारे, रहस्यमय कप्पेच खरीदले आणि क्षणाक्षणाचे वेढे, वळसे देतदेत साकळलेल्या वर्षानुवर्षांच्या अंधाराला क्षणात गिळंकृत करून भगभगीत प्रकाशाचा झगमगाट नदीच्या काळजात एखाद्या तीरासारखा सपकन् खोचला.

थंडगार स्पर्शाची काळीशार जमीन असलेलं, काळयाकभिन्न कडेकोट भिंतींचं आणि लांबलचक नखं वाढलेल्या, जुनाट नकाशांसारखा कुजकट वास येणाऱ्या जख्ख म्हाताऱ्या पूर्वजांच्या सावल्यांचं ते 'हिस्टरी हाऊस'... नदीच्या पात्रातून त्या गूढ वास्तूकडे घेऊन जाणारी पाऊलवाटसुद्धा आता उरली नव्हती. 'हिस्टरी हाऊस'नं आयमेनेमकडे पाठ फिरवली होती. आता फेरीबोटीवर स्वार झालेले पर्यटक 'बॅकवॉटर'च्या छाताडावरून तरंगत-तरंगत कोचिनहून थेट हॉटेलच्या आलिशान लाऊंजमध्येच पाय ठेवीत. जबरदस्त वेगानं सुसाट धावणाऱ्या त्यांच्या बोटी तीक्ष्ण धारेनं पाणी कापत हॉटेलकडं वळल्या, की 'V' आकाराचा फेस रसरसून उठे आणि मग पुष्कळ वेळ आटलेल्या नदीच्या अशक्त पात्रावर तरंगणारी जळक्या पेट्रोलची सप्तरंगी इंद्रधनुष्यं!

हॉटेलमधून आजूबाजूला नजर टाकली, की सगळं छान छान दिसेल, याची चोख व्यवस्था होती; पण पाण्याचं काय करणार? भोवतालचं पाणी दूषित आणि विषारी झालेलं. मग चलाख हॉटेलवाल्यांनी देखण्या, रुबाबदार अक्षरात 'No Swimming' च्या झोकदार पाट्या जिकडे-तिकडे लटकावून दिल्या. शिवाय हॉटेलातल्या धनवान पर्यटकांना काठावरच्या झोपडपट्ट्या दिसू नयेत आणि झोपडपट्टीवाल्यांनीही करी सैपूच्या इस्टेटीची हद्द ओलांडून अतिक्रमणाची डोकेदुखी करू नये, म्हणून हॉटेल आणि झोपडपट्टीच्या मधोमध एक टोलेजंग, देखणी भिंत उभी राहिली. श्रीमंत 'नजरां'चा त्रास वाचला; पण त्यांच्या 'नाकां'ची काळजी घेणं थोडं अवघडच होतं. पंचतारांकित हॉटेलवाले झाले, तरी कुजलेल्या नदीचा वास कसा, कुठून आणि किती अडवणार?

...पण नदी नसली, तरी त्यांच्याकडे पोहण्यासाठी 'स्विमिंग पूल' होता आणि मेन्यूकार्डावर जिभेचे शौक पुरवणाऱ्या नाना तऱ्हेच्या पाककृती!...

...शिवाय झाडं अजून बऱ्यापैकी हिरवी होती, आकाशही बऱ्यापैकी निळं होतं. आणखी काय लागतं? त्यामुळे आसमंतात भरून राहिलेल्या मृत-वासाचं मरतुकडं प्रकरण फारसं लक्षात न घेता हॉटेलवाल्यांनी जय्यत तयारी केली... आणि मेलेल्या नदीचा वास मारणाऱ्या पृथ्वीवरच्या स्वर्गाच्या गळयात 'गॉडस् ओन कंट्री' अशी रुबाबदार पाटी लटकावून दिली. ही वासाची भानगड आपण चुटकीसरशी निस्तरू, असा आत्मविश्वास

आधुनिक व्यवस्थापनशास्त्रानं त्यांना दिलाच होता... वास... वास तो काय? घेत राहिला की होऊन जाईल सवय! टाचा घालून मरणाऱ्या लोकांची गरिबी बघून-बघून नजरा मरत नाहीत का?... तस्संच! पण प्रश्न आहे फक्त सवय होण्याचा. जो वास 'आहे', तो 'नाहीच' असं मानणाऱ्या स्वयंशिस्तीचा. अशी शिस्त हवी आणि एअर कंडिशनर्स. म्हणजे पुष्कळ झालं...

करी सैपूचं ते घर आता अंतर्बाह्य बदलून गेलं होतं. नवी सजावट... नवा, आधुनिक रंग. त्याच्याभोवती कृत्रिम कालव्यांनी वेढलेली आणि छोट्या-छोट्या नखरेल पुलांनी जोडलेली एक वेगळीच दुनिया उभी राहिली होती. शिवाय कडेकडेनं झुलत राहणाऱ्या छोट्या-छोट्या बोटी... लांबलचक व्हरांडा आणि ग्रीक वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या भव्य खांबांनी सजलेली ती प्राचीन वास्तू भोवतालच्या गर्दीत अंग चोरून उभी होती. हॉटेलवाल्यांनी पैशांच्या राशी ओतून आजूबाजूच्या गावातल्या वाडवडिलांची छोटी लाकडी घरं उचकटून आणली आणि 'हिस्टरी हाऊस'च्या गूढ, अंधाऱ्या अस्तित्वाभोवती गोलाकार मांडली... श्रीमंत पर्यटकांच्या मनोरंजनासाठी 'ऐतिहासिक खेळण्या'चं एक म्युझिअमच. एखाद्या जोसेफच्या स्वप्नात भाताच्या भरघोस पेंढ्याच पेंढ्या उगवाव्यात किंवा उत्सुक एतद्देशीयांनी इंग्लिश मॅजिस्ट्रेटपुढं अर्जविनंत्यांचा विनम्र डोंगर उभारावा, तशी ती जुनी लाकडी घरं अत्यंत आदराने, नम्रतेनं 'हिस्टरी हाऊस'भोवती मांडली गेली... आणि संस्कृतीचा उद्घोष होत राहावा, होतच राहावा, म्हणून हॉटेलचं नाव ठेवलं 'हेरिटेज.'

'हिस्टरी हाऊस'भोवती उभारलेल्या छोट्या-छोट्या लाकडी घरांपैकी सगळ्यांत जुन्या घराच्या पोटात एक भलंमोठं हवाबंद कोठीघर होतं. त्याकडे बोट दाखवून हॉटेलवाले त्यांच्या पाहुण्या पर्यटकांना गमतीच्या गमती सांगत. या कोठीघरात अख्ख्या सैन्याला वर्षभर पुरेल एवढं धान्य मावतं; एवढंच नव्हे, तर हे घर केरळचे माओ-त्से-तुंग असणाऱ्या कॉम्रेड ई. एम. एस. नंबुद्रीपादांच्या पूर्वजांचं आहे, इतपत माहिती सांगितली, म्हणजे आश्चर्यानं डोळे विस्फारलेले पर्यटक खूश! नंबुद्रीपादांच्या त्या जुन्या घरातलं फर्निचर आणि इतर किरकोळ वस्तूही अगदी नीटसपणानं मांडून ठेवल्या होत्या. एक बांबूची छत्री, कलाकुसरीनं विणलेला पलंग आणि नववधूबरोबर दिलेले दागदागिने, कपडेलत्ते, सामानसुमान वाहून नेणारी मोठी लाकडी पेटी. हॉटेलवाल्यांनी या प्रत्येक वस्तूवर देखणी कार्डं चिकटवली होती. त्यावर लिहिलं होतं, Traditional Kerala Umbrella DeeefCe Traditional Bridal Dowary Box.

इतिहास, साहित्य आणि संस्कृती यांतली हर-एक गोष्ट व्यापारासाठी उभी राहिली...

खरेदी-विक्रीचे व्यवहार सुरू झाले... आयमेनेममधले प्राचीन पूर्वज आणि कार्ल मार्क्स दोघेही हातात हात घालून श्रीमंत पर्यटकांच्या स्वागतासाठी सज्ज उभे राहिले आणि बोटीबाहेर पडणाऱ्या मऊ मुलायम पायांना धूळमाती लागू नये, म्हणून लाल गालिचे अंथरले जाऊ लागले.

कॉम्रेड नंबुद्रीपादांच्या जुन्या घरात 'हेरिटेज' हॉटेलची डायनिंग रूम सजली. केरळातल्या सूर्यप्रकाशात 'टॅनिंग'ची मौज लुटणारे वीतभर कपड्यातले परदेशी पर्यटक कोवळ्या, लुसलुशीत शहाळ्यात स्ट्रॉ खुपसून नारळाचं पाणी पीत आणि एके काळी भांडवलदारांविरुद्ध असंतोषाचं रान पेटवणारे जुने कम्युनिस्ट, 'बेअरा'चे रंगीबेरंगी, पारंपरिक भारतीय थाटाचे डगले चढवून कमरेत झुकून ट्रे घेऊन उभे असत.

रोज संध्याकाळी हॉटेलवाल्यांना 'संस्कृतिदर्शना'चे झटके येत. परदेशी पर्यटकांसमोर 'केरळचा सांस्कृतिक वारसा' म्हणून कथकली नृत्याचे छाटछूट कार्यक्रम उरकले, की झालं प्राचीन, थोर-थोर संस्कृतीचं दर्शन! 'थोडक्यात काय ते आटपा' अशी धमकी खाऊनच रंगमंचावर गेलेले कलाकार मिळेल तेवढ्या वेळात, जमेल तेवढे छुटपुट पाय हलवत... सगळ्या पूर्वापार नृत्यरचना छाटून- छाटून त्यांची अर्धमेली कलेवरं तेवढी उरली होती. सहा सहा तास रंगणाऱ्या अभिजात कलाकृती पंधरा-वीस मिनिटांच्या 'परफॉर्मन्स'पुरत्या आचके देत जिवंत होत्या.

पारंपरिक कथकली नृत्याचा हा मॉडर्न धमाका स्विमिंग पुलाभोवती सादर होई. जीव तोडून मृदंगम् वाजवणारे वादक आणि मन ओतून 'कथकली'चा आविष्कार पेश करण्यासाठी धडपडणारे नर्तक ऐन रंगात येत असताना स्विमिंग पुलात उतरलेले अर्धनग्न पर्यटक मात्र आपल्या मुलाबाळांबरोबर मस्त बागडत असत. निळ्याशार पाण्यात चुबकाचुबकीला अगदी जोर येई... तिकडे नदीच्या काठावर आक्रोशणारी कुंती प्राणपणानं जपलेलं जन्मरहस्य कर्णाला सांगतेय; आणि इकडे रंगात आलेली जोडपी एकमेकांच्या उघड्या अंगांवर तेल चोळतायत... एकमेकांच्या छात्या आणि कंबरा कुरवाळतायत... तिकडे पूतनामावशी विषाने भरलेल्या छातीशी लावून श्रीकृष्णाला पाजतेय, आणि इकडे उघड्या अंगाचे थेरडे बाप, लग्नाला आलेल्या आपल्या मुलींच्या शरीराशी खेळतायत... तिकडे दु:शासनाची मांडी फोडून उसळलेल्या रक्तात द्रौपदीचे केस भिजवणारा भीम खदाखदा हसतोय आणि इकडे नक्षीदार ग्लासातून दारूचे खोल घुटके घेत प्रेमाच्या गप्पा!

'हिस्टरी हाऊस'चा मागचा व्हरांडा (तिथंच पोलिसांची एक मोठी पलटण जमली होती आणि फुगून फुगून टम्म झालेलं एक टेंगुळही फुटलं होतं.) बंद करून हेरिटेज हॉटेलचं 'किचन' थाटण्यात आलं आणि कबाब किंवा कॅरॅमल कस्टर्डखेरीज दुसरं काही भयानक, चित्तथरारक घडण्याची शक्यताच संपुष्टात आली. 'हिस्टरी हाऊस'मधली ती

दहशत विझलीच एकाएकी; आणि सगळीकडे अन्नाचा दरवळ पसरला. ओरखडा उठला; तरी थरकाप होईल, अशा सन्नाट्याच्या पोटात स्वयंपाक्यांचे धारदार सुरे घुसले आणि किचकिच, कल्लोळाचं भळभळतं रक्त वाहत राहिलं. शिजवताना, भाजताना, तळताना रंगून गेलेल्या स्वयंपाक्यांची गाणीबजावणी... आलं आणि लसूण यांचे तुकडे-तुकडे करणाऱ्या लखाखत्या सुऱ्यांचा छनछनाट... इतिहासाच्या तुलनेनं कमी प्रतीच्या प्राण्यांच्या म्हणजे डुक्कर किंवा बकरी यांच्या कत्तली... मांसाचे तुकडे करतानाची खटखट आणि माशांच्या अंगावरचे खवले काढण्याची घाईगडबड.

...या सगळयाच्या खूप खाली, खोल जमिनीच्या गर्भात काहीतरी होतं. गवताने झाकलेलं... तेवीस पावसाळे घुसमटत राहिलेलं...

एक छोटीशी गोष्ट. विसरलेली, तशीच पडून असलेली.

त्या वस्तुविना काही अडलं नसतं. जगाचं... किंवा कुणाचंही.

...एका मुलीचं प्लॅस्टिकचं घड्याळ. छोटंसं. त्याच्यावर रंगवलेली 'वेळ'

...दोनला दहा कमी!

राहेल उत्सुकतेने पुढे पुढे जात राहिली. तिच्यामागे उनाड पोरांची हीऽऽ पलटण.

'एऽऽ हिप्पी बाईऽऽऽ'– कुणीतरी केकाटलं. तब्बल पंचवीस वर्षांनी.

'नाव काय्ये तुझं? आं?'

...तेवढ्यात कुणीतरी एक छोटासा दगड राहेलच्या दिशेनं भिरकावला... आणि तिचं बालपण तिच्या हातून निसटलं... छोटे-छोटे हात आपटत-धोपटत कोण जाणे कुठे पळून गेलं...

परतीच्या वाटेवर 'आयमेनेम हाऊस'ला वळसा घालून राहेल मुख्य रस्त्यावर आली. तिथंही झाडांच्या खाली निवारे शोधत छोट्या-छोट्या घरांची पिलावळ झपाट्यानं वाढलेली दिसत होती. मुख्य रस्त्याला फुटलेल्या छोट्या फांद्या असाव्यात, तशा घरांच्या मधून धावणाऱ्या बारीक-बारीक गल्ल्या इतक्या अरुंद; की वाहन जाणं सोडाच, साधं चालणंही मुश्कील व्हावं. रस्ताच नाही म्हणून वाहनं नाहीत आणि वाहनं नाहीत म्हणून शहरी गजबजाट नाही; पण खेड्यातल्या शांततेचा हा 'आभासच' होता नुसता. प्रत्यक्षात आयमेनेमची लोकसंख्या चांगलीच फुगली होती. त्याच्या पोटात आशा, आकांक्षा, स्वप्नं कोंबून-कोंबून भरली होती. नजरेला सुख देणाऱ्या हिरवट झाडांच्या अशक्त पडद्यामागे हाक दिली, तर क्षणभरात भुळभुळत येतील, असे गर्दीचे जथ्थे रागानं, भुकेनं धुमसत उभे झाले होते.

संतप्त जथ्थे... बेदरकार गाडी चालवणाऱ्या ड्रायव्हरला जिवानिशी मारण्याकरता

टपलेले... विरोधी पक्षीयांचा 'बंद'चा आदेश झुगारून रस्त्यावर उतरण्याची हिंमत करणाऱ्या गाडीच्या काचांचा चक्काचूर करण्यासाठी खवळून उठलेले... कोट्टायमच्या उत्तम बेकरीतून आणलेले क्रीमबन्स आणि इम्पोर्टेड इन्शुलिनसकट बेबी कोचम्माचा सगळा ऐवज लुटून नेण्यासाठी टपून बसलेले... जथ्थे. सळसळणारे. संतप्त.

लकी प्रेसच्या बाहेर उभे राहून कॉम्रेड के. एन. एम. पिल्लई फाटकाजवळच्या एका माणसाशी काहीतरी बोलत होते. दोन्ही हातांची घट्ट आडवी मिठी छातीवर आवळलेली आणि दोन्ही दंड बरगड्यांमध्ये जोरानं खुपसलेले. जणू त्यांच्या काखेतले केस कुणीतरी उधारीनं मागत होतं आणि कॉम्रेड पिल्लई जीव एकवटून आपल्या काखा आवळत होते. फाटकापलीकडच्या माणसाच्या हातात प्लॅस्टिकच्या जुनाट पिशवीतल्या फोटोंची चळत. तो भलत्याच उत्सुकतेनं फोटो वर-खाली करून पाहत होता. त्यांतले बरेचसे फोटो कॉम्रेड पिल्लईंच्या मुलाचे – लेनिनचे – होते. लेनिन दिल्लीत राहायचा.

डच आणि जर्मन वकिलातींसाठी पेंटिंग, प्लंबिंग आणि वायरमनची कामं करायचा. त्याचे तिथले फोटो. दिल्लीतले. नावावरून उगीच घोळ नको आणि कामं मिळवण्यात अडचण ठरेल, अशी नसती राजकीय भानगड उपटायला नको, म्हणून त्यानं आपल्या नावातही किंचितसा बदल करून घेतला होता – आता तो स्वत:ला 'लेविन' म्हणवून घ्यायचा. पी. लेविन.

कॉम्रेड पिल्लईंची नजर चुकवून पटकन पुढं निघून जावं, असं राहेलच्या मनात होतं; पण ते तिला अर्थातच जमलं नाही.

'अय्योऽऽऽ राहेल मॉलऽऽ' – कॉम्रेड पिल्लई तिला बघताच एकदम पुढं झाले... 'ओर्कूनल्ली? ओळखलंस? मी... तुझा कॉम्रेड अंकल?'

'ओळखलं नं' – राहेल कशीबशी हसली.

तिनं खरंच ओळखलं होतं त्यांना?...

– संवाद सुरू करण्याचा एक सर्वसामान्य रीतीरिवाज... यापलीकडे त्या प्रश्नाला आणि उत्तरालाही फारसा अर्थ नव्हता. दोघांमधल्या अनेक गोष्टी कधीच्या विसरल्या गेल्या आहेत, काळाच्या उदरात त्यांना मूठमाती मिळालीय... हे दोघांनाही कळत होतं. आणि काही व्रण अजून ताजे आहेत... ठणकतायत... धुळीनं माखलेल्या जुनाट कपाटातल्या भुसा भरलेल्या पक्ष्यासारखे नजर रोखून बसलेयत, हेही दोघांना दिसत होतं. राहेलला... आणि कॉम्रेड पिल्लईंनासुद्धा.

'मगऽऽ', कॉम्रेड पिल्लईंनी सुरुवात केली, 'तू सध्या अमेरिकेत असतेस, असं ऐकलं.'

'अमेरिकेत कुठं?' राहेल काहीशा तिरसटपणाने म्हणाली, 'मी तर इथंच आहे. सध्या.'

'ते कळलं ग,' कॉम्रेड पिल्लई हटायला तयार नव्हते. 'पण एरवी अमेरिकेतच असतेस नं?'

बोलता-बोलता कॉम्रेड पिल्लईंनी छातीवर आवळलेली हातांची मिठी सोडली. कुंपणाच्या छोट्या भिंतीवरून डोकावणाऱ्या छातीवरच्या तपकिरी, भुरकट बोंडांनी सेंट बर्नाडच्या करुण नजरेने राहेलकडं बघितलं.

'ओळखलंस?'- राहेलच्या दिशेनं सूचक इशारे करीत कॉम्रेड पिल्लईंनी फोटोंच्या चळतीत बुडून गेलेल्या त्या माणसाला विचारलं.

ही कोण कुठली बाई... त्या माणसाच्या काही लक्षात येईना.

'त्या जुन्या पॅराडाईज पिकल्सची कोचम्मा... तिच्या मुलीची मुलगीऽऽऽ'- कॉम्रेड पिल्लईंनी एक धागा सुचवून पाहिला.

– तो माणूस जास्तच गोंधळात पडला असावा. त्याला पॅराडाईज पिकल्स... कोचम्मा यांतलं काहीच माहीत नव्हतं. बहुधा लोणच्याची चवही माहिती नव्हती. मग कॉम्रेड पिल्लईंनी जरा वेगळा रस्ता धरला.

'पुन्नयन कुंजू?' – त्यांनी प्रश्न टाकला. बिशप अंत्योख क्षणभरासाठी आकाशात प्रकट झाले आणि वरूनच त्यांनी आपला शुष्क, निस्तेज हात हलवला.

...हळूहळू त्या माणसाच्या डोक्यात प्रकाश पडत चालला होता. त्याने हातातल्या त्या फोटोसकट समजुतीखातर मान हलवायला सुरुवात व्ाâली.

'पुन्नयन कुंजुंचा मुलगा? बेनन जॉन आयपे? दिल्लीत राहायचा? आठवतं?'- कॉम्रेड पिल्लईंनी बोट धरून त्याला भूतकाळाची सैर घडवली, तसा खूश होऊन तो म्हणाला, 'उवर... उवर... आत्ता ओळखलं!'

'ही त्याच्या मुलीची मुलगी. सध्या अमेरिकेत असते.'

- राहेलच्या पूर्वजांची संगतवार क्रमवारी लावल्यावर मग त्या माणसानं राहेलला ओळखलं.

'उवर...उवर... अमेरिकेत असतेस, नाही का?'-

यात प्रश्नापेक्षा कौतुकच जरा जास्त होतं.

...बोलता-बोलता त्या माणसाला एक जुनं लफडं आठवलं. तपशील नीटसे स्मरत नव्हते; पण स्त्री-पुरुषांच्या संभोगाची आणि खुनाची काहीतरी भानगड आहे, एवढं लक्षात होतं. त्या काळात ही लफडेबाजी पेपरातसुद्धा आली होती छापून. काय बोलावं काही सुचेनासं झाल्यावर त्या माणसानं आपल्याजवळची फोटोंची चळत कॉम्रेड पिल्लईंकडे सुपुर्द केली आणि निरोप घेऊन रस्ता धरला.

'अच्छा कॉम्रेड, मी येतो आता...'

– त्याला कुठलीतरी बसही पकडायची होती.

'मगऽऽ'- हातातल्या सर्चलाईटचा झोत टाकावा, तसं आरपार पाहत कॉम्रेड पिल्लईंनी पुन्हा एकदा राहेलची चौकशी सुरू केली. जन्मभराच्या कडव्या शाकाहाराचं बक्षीस

असावं, तशा त्यांच्या गुलाबी हिरड्या चमकत होत्या. कॉम्रेड पिल्लई वाळून, वाकून, वृद्ध होऊन इतके खारकेसारखे आक्रसले होते, की हा माणूस कधी लहान मुलगा असेल... तान्हं बाळ असेल, हे खरंच वाटू नये. आईच्या पोटी जन्माला आले, तेच मध्यमवयीन. पाठीचं पोक आणि डोईचं टक्कल घेऊन... तसे!

'तुझा नवरा?' – त्यांना स्वस्थ बसवेना.

'नाही आला.'

'त्याचा एखादा फोटो-बिटो?'

'अंहं.'

'नाव?'

'लॅरी. म्हणजे 'लॉरेन्स.'

'अच्छा, लॉरेन्सऽऽऽ'-

– एकदम काहीतरी पटल्यासारखे कॉम्रेड पिल्लई म्हणाले. जणू त्यांनीदेखील हजारो नवऱ्यांमधून राहेलसाठी लॉरेन्सच निवडला असता.

'काही मुलबिलं?'

'नाहीत' – राहेल कोरडेपणानं म्हणाली.

'म्हणजे अजून प्लॅनिंगच चाललंय? की झालीय तयारी? कितवा महिना?'

'नाही.'- राहेलला थांबवायचं होतं सगळं.

'एखादं तरी मूल पायजेच. मुलगा किंवा मुलगी,' कॉम्रेड पिल्लईंनी आग्रह धरला, 'आता दोन मुलं व्हावीत, की नाही, ही मात्र ज्याची त्याची इच्छा.'

'आमचा घटस्फोट झालाय –' धक्क्यानं तरी त्यांनी गप्प बसावं, म्हणून राहेलनं स्पष्टच सांगितलं.

'घट... स्फोट?' – कॉम्रेड पिल्लईंचा आवाज अचानक एवढा चढला, की प्रश्नचिन्ह गाठेगाठेतो फाटलाच पार. काहीतरी अशुभाचा उच्चार करावा, तशा त्रयस्थ त्राग्यानं त्यांनी तो शब्द उच्चारला होता... घटस्फोट.

'वाईट झालं. फार वाईट झालं –' भानावर येत कॉम्रेड पिल्लईंनी आपली प्रतिक्रिया दिली. एकाएकी काहीशा नाटकी सुराचा आणि पुस्तकी भाषेचा आधार घेत पुन्हा एकवार मान वेळावत मिटल्या डोळ्यांनी ते म्हणाले, 'फाऽऽऽर वाईट झालं.'

पूर्वजांनी केलेल्या पापांची फळं बिचारी पोरं भोगतायत, असंही कॉम्रेड पिल्लईंच्या मनात आल्यावाचून राहिलं नाही. काय हा ऱ्हास... केवढी उतरती कळा...

एकाला तर वेडच लागलंय... आणि दुसरीचा घटस्फोट... दोघांचीही आयुष्यं वैराण.

कदाचित हीच खरी क्रांती असली पाहिजे. ख्रिश्चन बूर्झ्वा लोक स्वत:च स्वत:च्या पायावर कुऱ्हाडी मारून घेतायत.

– आजूबाजूला त्या दोघांशिवाय चिटपाखरू नव्हतं, तरी कुणी ऐकायला नको, म्हणून कॉम्रेड पिल्लईंनी हलक्या आवाजात राहेलला विचारलं,

'बरं, तो कसाय?'

'ठीक,' राहेल म्हणाली, 'ठीकाय.'

ठीक. सपाट छातीपोटाचा आणि मधासारख्या हलक्या तपकिरी रंगाचा. साबणाची वडी घेऊन स्वत:चे कपडे स्वत: धुवत बसतो.

'अय्यो पाव्वम,' छातीवरची दोन बोंडं घुसळत कॉम्रेड पिल्लई परत कुजबुजले, 'बिच्चारा...' आधी एखाद्याची झडती घ्यावी, तसे खोदून-खोदून प्रश्न विचारायचे आणि नंतर उत्तरांकडे सपशेल दुर्लक्ष... या भानगडीत कॉम्रेड पिल्लईंना नेमकं काय मिळतं, राहेलला कळेना. राहेल आपल्याला खरं काय ते सांगणार नाही, हे कळण्याइतपत कॉम्रेड पिल्लई चतुर होते; पण मग हा माणूस निदान तसा बुरखा तरी का पांघरत नाही?

'लेनिन दिल्लीत असतो सध्या' – राहेलच्या वंशावळीतून बाहेर पडलेल्या कॉम्रेड पिल्लईंच्या स्वरातला अभिमान लपता लपत नव्हता.

'दिल्लीतल्या परदेशी वकिलातींसाठी कामं करतो. हे बघ...'

कॉम्रेड पिल्लईंनी फोटोंची पिशवी राहेलच्या हातात सरकवली. जवळपास सगळे फोटो लेनिनचे आणि त्याच्या कुटुंबाचेच होते. त्याची बायको, छोटं मूल आणि नवीकोरी बजाज स्कूटर. एका फोटोत गोऱ्यागोमट्या, भलत्याच रुबाबदार माणसाबरोबर शेकहँड करणारा लेनिन दिसत होता.

'हे जर्मनीचे सचिव आहेत भारतातले.' कॉम्रेड पिल्लईंनी लगोलग माहिती पुरवली.

फोटोतला लेनिन आणि त्याची बायको, दोघेही भलतेच उत्साहात दिसत होते... जणू नुकताच एखादा फ्रीज घेतलाय विकत, किंवा नव्याकोऱ्या फ्लॅटसाठी हप्ता...

लहानपणी लेनिन सारखा आईला चिकटून असायचा. सतत तिच्या साडीत लपलेला. तो आपल्या आईपासून वेगळा होऊन 'एक स्वतंत्र व्यक्ती' म्हणून इस्था आणि राहेलला पहिल्यांदा भेटला, ते सगळं मजेशीरच प्रकरण होतं. लेनिनचे फोटो चाळता-चाळता राहेलला तो प्रसंग आठवला. ती आणि इस्था पाच वर्षांचे होते आणि लेनिन त्यांच्यापेक्षा वर्षभरानं लहान. कोट्टायमचे प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ आणि समस्त आयांची बाळं जन्माला घालणारे डॉ. वर्गिस. वर्गिस यांच्या दवाखान्यात योगायोगानं सगळे भेटले. राहेल अम्मूबरोबर आलेली आणि त्यांच्या पाठीशी लागून हट्ट करून आलेला इस्था. लेनिनबरोबर कल्याणी पिल्लई होत्या, त्याची आई. राहेल आणि लेनिन, दोघांच्याही नाकांत कसलातरी खडा अडकलेला, म्हणून दोघे रडकुंडीला आलेले आणि दोघांच्या आया त्रस्त, शिवाय घाबरलेल्या. सगळं सारखंच. एकदम. एकाच वेळी. तेव्हा काही लक्षातही

आलं नव्हतं; पण त्या अजब योगायोगाची आता राहेलला गंमत वाटत राहिली. जगण्याच्या प्रत्येक गोष्टीत, हर-एक श्वासात 'राजकारण' कसं गुंतलेलं असतं, तेही त्या प्रसंगानं शिकवलं.

राहेल... एका ख्यातनाम कीटकशास्त्रज्ञाची नात आणि लेनिन एका कट्टर कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचा मुलगा. त्यामुळं दोघांच्या नाकातले खडेही वेगवेगळे. त्यांच्या राजकीय पार्श्वभूमीला साजेसे. राहेलच्या नाकात काचेचा चमकता मणी गेलेला, तर लेनिनच्या नाकात हिरवा हरभरा.

'वेटिंग रूम' खच्चून भरलेली. पलीकडे डॉक्टरांच्या खोलीला लावलेल्या पडद्याआडून कसलेकसले चित्रविचित्र आवाज आणि अधूनमधून पोरांच्या ठो-ठो किंकाळ्या. शिवाय कसल्याशा धातूवर घासणाऱ्या काचेची खरखर, उकळत्या पाण्याच्या बुडबुड्यांचे आवाज आणि हलकी हलकी कुजबुज. भिंतीवर एक छोटी लाकडी पेटी लावलेली. त्यावर लिहिलं होतं Doctor is IN आणि Doctor is OUT.

त्या पाटीवरची पट्टी कधी इकडं, तर कधी तिकडं सरकवत, डॉक्टरांना कधी IN ठेवत, तर कधी OUT घालवून टाकत. एक मुलगा पुष्कळ वेळ खेळ करत बसला होता. तापानं फणफणलेलं एक छोटं बाळ आईच्या छातीशी उचक्या देत होतं. खच्चून भरलेल्या वेटिंग रूममध्ये तऱ्हेतऱ्हेचे आजार आणि त्या आजारांची भीती ठासून भरलेली. डोक्यावर रडतखडत फिरणारा पंखा भीतीनं जडावलेल्या हवेच्या दाट, कोंदट थराला आडवे छेद देत कापत-कापत खोलीभर पसरवत होता. मागामधून सूत पडावं, तशी हवेची वाटोळी गोलाकार भेंडोळी सरसरत खाली गळत होती. सलग आणि एकसारखी. एखाद्या अखंड बटाट्याची न संपणारी अनंत साल सोलत-सोलत जावी, तशी!

वेटिंग रूममधल्या बसक्या टेबलावर पुष्कळ जुनीपानी आणि नवीकोरी मासिकं पडलेली; पण कुणीच काही वाचत नव्हतं.

बाहेरच्या दारावर ओढलेल्या अर्धवट पडद्याच्या खालून असंख्य पाय चटकफटक चपला वाजवत रस्त्यावरून मजेत जात-येत होते. वेटिंगरूमबाहेरच्या त्या बिनधास्त जगाला कसली काळजी म्हणून नव्हती. ना कुणाला ताप भरलेला, ना कुणाच्या नाकात काचेचे मणी किंवा हिरवे हरभरे गेलेले.

अम्मू आणि कल्याणी. दोघींनीही एकमेकींच्या मुलांना जवळ घेतलं. नाकं पुन्हापुन्हा वर करून बघितली, डोकी मागे झुकवून आणि नाकाच्या अंधारात उजेड खुपसून काही दिसतंय का, ते परत-परत बघून झालं. दोन्ही आयांना काहीच सापडत नाहीये, हे सिद्ध झाल्यावर काळ्या पँटीत पिवळा शर्ट खोचलेला टॅक्सीसारखा दिसणारा लेनिन हातातलं चिकलेटचं पाकीट घट्ट धरून पुन्हा एकदा आपल्या आईच्या नायलॉन मांडीशी चिकटला. साडीवर काढलेलं भलंमोठं फूल शोधून एखाद्या सिंहासनाच्या थाटात लेनिन त्यावर

बसला आणि हक्काच्या उच्चासनावरून एकूण परिस्थितीचा अदमास घेत राहिला. सहज म्हणून त्यानं डाव्या हाताचं बोट रिकाम्या नाकपुडीत खोल खुपसलं आणि तोंडानं मोठ्ठा श्वास घेतला. एका बाजूला भांग पाडून लेनिनचे केस व्यवस्थित विंचरलेले. शिवाय वरून कुठलंसं आयुर्वेदिक तेल लावलेलं. चिकलेट्स होती हातात; पण डॉक्टरांचं तपासून होण्यापूर्वी नुसती हातात ठेवायची आणि तपासून झाल्यानंतर मग खायची, असा ठराव झालेला होता. सगळं कसं नीट, शिस्तीत, सुरळीत चाललेलं. वेटिंग रूममधलं कोंदट, कुबट, घाबरट वातावरण आणि पडद्याच्या पलीकडून ऐकू येणाऱ्या किंकाळ्या या सगळ्या 'सिस्टिम'मधून डॉक्टर वर्गिस यांच्याबद्दलची भीतीच (तार्किकदृष्ट्या) सर्वत्र पसरली पाहिजे, असा बंदोबस्त आहे. त्यामुळं आपण घाबरूनच वागलं पाहिजे वगैरे संकेत समजून घेण्याचं लेनिनचं वयच नव्हतं.

वेटिंग रूममधल्या कपाटाच्या तळाशी असलेल्या खोबणीमधून डॉक्टरांच्या खोलीपर्यंत घाईघाईनं येरझारे घालून थकलेला एक उंदीरमामा मात्र लेनिनला दिसत होता.

डॉक्टरांच्या खोलीला लावलेला पडदा बाजूला करत एक नर्सही अनेकदा आली आणि गेली. दर वेळी तिच्या हातात कसलीकसली शस्त्रं दिसत. एक छोटीशी बाटली... रक्ताचा थेंब चिकटवलेली आयताकृती काचेची पट्टी... पिवळसर चमकदार मूत्रानं भरलेली परीक्षानळी... उकळलेल्या सुया हारीनं मांडलेला स्टेनलेस स्टीलचा ट्रे... त्या नर्सनं आपल्या केसाळ पायांवर पांढरेशुभ्र स्टॉकिंग्ज चढवले होते. त्यांच्या आतूनही पायांवर चिकटलेली राठ केसांची गोलगोल वेटोळी लपत नव्हतीच. टॉक टॉक आवाज करणारे तिचे उंच टाचांचे बूट एका बाजूनं इतके झिजलेले, की दोन्ही पाय आतल्या दिशेला वळले होते. तेलानं चपचपलेल्या केसांवर पांढरीशुभ्र उंच टोपी नीट बसावी, म्हणून दोन्ही बाजूंनी लावलेल्या काळ्या चकचकीत हेअरपिना कानांच्यावरून सापासारख्या सरसरत वर चढल्या होत्या.

त्या नर्सच्या चश्म्यावर एखादा उंदीर-रोधक पडदा असावा. कारण नजरेसमोर, अगदी तिच्या दोन्ही पायांच्यामधून मस्त मजेत बागडणारा उंदीर तिला दिसता दिसत नव्हता. खोल गेलेल्या पुरुषी आवाजात ती एकामागून एक नावं पुकारत होती: 'ए. नीनन... एस्. कुसुमलता...बी. व्ही. रोशनी...एन्. अंबाडी...' वेटिंग रूममध्ये भिरभिरणाऱ्या घाबरट, उत्सुक हवेकडं तिचं मुळी लक्षच नव्हतं.

इस्था एव्हाना भलताच घाबरला होता. Doctor is IN... Doctor is OUT असं लिहिलेल्या पाटीकडं घाबरून गळाठलेली नजर लावून त्याची चुळबुळ चालू होती.

आता राहेलचाही संयम संपत आला. ती घाबरून म्हणाली,

'अम्मू, पुन्हा एकदा बघू या का...'

अम्मूनं एका हातात राहेलचं डोकं मागून घट्ट पकडलं. दुसऱ्या हाताच्या बोटाभोवती रूमाल गुंडाळून राहेलची उघडी नाकपुडी जोरानं दाबून धरली. वेटिंग रूममध्ये अचानक भलताच ताण निर्माण झाला. सगळ्यांच्या नजरा क्षणार्धात राहेलवर खिळल्या. जणू आयुष्यभरातली सर्वांत कठीण परीक्षा तिला आत्ता... या क्षणी द्यावी लागणार होती. आपलंच नाक जोरानं शिंकरण्याच्या बेतात असलेल्या इस्थाच्या कपाळावर एकाएकी आठ्या चढल्या... तो डोळे ताणून आणि श्वास रोखून राहेलकडे एकटक पाहत होता.

राहेलनं सगळा जीव एकवटून जोर लावला. देवा... कृपा कर... सोडव मला... सोडव. पायांचे तळवे, हातांच्या मुठी आवळून राहेलनं हृदयाच्या तळापासून सगळी शक्ती एकवटली आणि अम्मूच्या रूमालात जोरानं नाक शिंकरलं.

...एका फटक्यात शेंबडानं बरबटलेला मणी बाहेर आला. पांढरट चिकट स्रावावर चकाकणारा जांभळा मणी... समुद्रातल्या कालवांच्या पोटात मोती चमकावा, तशा रुबाबातला. वेटिंग रूममधली झाडून सगळी मुलं 'तो मणी दिसतो कसा' हे बघण्याकरता राहेलभोवती गोळा झाली. IN आणि OUT च्या पट्टीशी खेळणारा तो मुलगा मोठ्याच तिरस्कारानं राहेलकडं बघत राहिल.

'असं जोरानं नाक शिंकरून शेंबडातला मणी मी पण बाहेर काढीन. त्यात काय एवढं?' – त्यानं कुर्त्यात नाक उडवलं.

'करून तर बघ. फटके खाशील, तेव्हा समजेल' – लेकाच्या त्रासानं वैतागलेली त्याची आई करवादली.

'मिस राहेलऽऽऽ'

– नर्सनं जोरात नाव पुकारलं. जी कुणी राहेल असेल ती उठेल, म्हणून इकडंतिकडं नजर फिरवली.

'झालं आता...' हातातला चुरगळलेला ओलसर रूमाल दाखवत अम्मू म्हणाली, 'आला तो आपोआप बाहेर.'

– म्हणजे काय, ते नर्सला बिलकूल समजलं नाही.

'आम्ही निघतो आता,' अम्मूनं त्या नर्सचा निरोप घेतला, 'मणी आला बाहेर. आपोआप.'

'नेक्स्टऽऽ' – उंदीररोधक काचांच्या आड डोळे बंद करून घेत नर्सनं पुढचा पेशंट पुकारला.

('काय पण भेटतात एकेक' – ती स्वत:शीच पुटपुटली.)

'एस. व्ही. एस. कुरूपऽऽऽ कोणेय?'

गाल फुगवून बसलेल्या त्या हट्टी मुलाचं बखोट धरून त्याची आई डॉक्टरांच्या खोलीत शिरली, तसं त्यानं मोठ्ठं भोकाड पसरलं.

– विजयी मुद्रेनं राहेल आणि इस्था अम्मूबरोबर दवाखान्याच्या पायऱ्या उतरले. लहानगा लेनिन आणि त्याची आई दवाखान्यातच राहिले. आता डॉक्टर वर्गिसांकडून हरभऱ्यानं चोंदलेली नाकपुडी तपासून घेण्यावाचून लेनिनला आणि संपूर्ण 'स्वतंत्र चेकअप' करून घेण्यावाचून त्याच्या आईला गत्यंतरच नव्हतं.

तेव्हाचा हा लेनिन.

आता त्याच्याजवळ स्वत:चं घर होतं. नवीकोरी बजाज स्कूटर, लग्नाची बायको आणि स्वत:चं एक मूलसुद्धा होतं.

लेनिनच्या कौटुंबिक फोटोंची पिशवी राहेलनं कॉम्रेड पिल्लईंच्या हातात दिली. तिला आता निघायचंच होतं. काहीही करून.

'एक मिन्टं थांब फक्त.' कॉम्रेड पिल्लई घाईघाईनं म्हणाले. कुंपणावरच्या सरड्यासारखी त्यांची अवस्था झाली होती. पलीकडं उभ्या राहणाऱ्या माणसांना छातीवरच्या बोंडांची भुरळ घालायची, आणि स्वत:च्या मुलाचे फोटो गळयात अडकवून त्यांना लटकवून ठेवायचं. त्यांनी पटापट सगळया फोटोंची चळत खालीवर केली (लेनिनच्या आयुष्यातून एका मिनिटाची चित्रमय सैर) आणि सगळयांत शेवटचा फोटो काढून राहेलसमोर धरला.

'ओरकुनुन्दो?... ओळखलंस?'

– फोटो पुष्कळ जुना, 'ब्लॅक अॅन्ड व्हाईट' जमान्यातला होता. 'ख्रिसमस प्रेझेंट' म्हणून मार्गारेट कोचम्मानं चाकोला दिलेल्या रोलिफ्लेक्स कॅमेऱ्यानं काढलेला. फोटोग्राफर? – अर्थातच दस्तुरखुद्द चाको. 'आयमेनेम हाऊस'च्या पुढल्या व्हरांड्यात काढलेल्या त्या फोटोत एकूण चार मुलं होती. लेनिन, इस्था, सोफी मॉल आणि राहेल स्वत:. चौघांच्या मागं बेबी कोचम्मानं ख्रिसमससाठी लावलेल्या चमकत्या कागदांच्या झिरमिळया... छतापासून खाली जमिनीपर्यंत झेपावणाऱ्या. आणि एका बल्बला टांगलेला पुठ्ठ्याचा चमचमता तारा. रस्त्यावरून सुसाट जाणाऱ्या गाडीच्या प्रखर दिव्यांच्या प्रकाशानं भांबावलेल्या छोट्या-छोट्या प्राण्यांसारखी लेनिन, राहेल आणि इस्थाची अवस्था झाली होती. तिघंही प्रचंड घाबरलेले. डोळयांमध्ये भीती अगदी साकळून आलेली. गुडघे एकमेकांना घट्ट चिकटलेले, चेहऱ्यावर जबरदस्तीनं आणलेलं उसनं हसू गोठलेलं. दोन्ही हात 'सावधान'च्या खड्या पावित्र्यात आणि फोटोंचं संकट झेलण्यासाठी कमरेतून काहीशी वळलेली छाती... जणू एखादं पापकृत्य करत असल्यासारखी तिन्ही मुलं कशीबशी ओठंगून उभी.

...एकटी सोफी मॉल तेवढी ऐटबाजपणे 'फोटो'साठी सजली होती. खरेखुरे वडील

म्हणून पहिल्यांदाच ओळख झालेल्या चाकोच्या कॅमेऱ्यासमोर बसण्यापूर्वी तिनं बरीच तयारी केली. आपले डोळे नाजूक शिरा असलेल्या टवटवीत गुलाबी पाकळीसारखे दिसावेत (म्हणजे ब्लॅक अॅन्ड व्हाईट फोटोमध्ये भुऱ्या रंगाचे दिसावेत), म्हणून तिनं पापण्या हलकेच आत वळवल्या. लिंबाची रसदार साल कोरून-कोरून आपल्या खऱ्या दातांवर जास्त देखणे असे खोटे दात चढवले... त्या गोलाकार दातांमधून जीभ बाहेर काढली आणि जिभेच्या टोकावर माम्माचीचं चांदीचं अंगुस्तान चढवलं (सुटी घालवण्याकरता 'आयमेनेम हाऊस'मध्ये पाऊल टाकताक्षणी सोफी मॉलनं त्या सुंदर अंगुस्तानावर कब्जा केला होता आणि अख्ख्या सुट्टीभर आपण यातूनच पाणीबिणी पिणार, असं जाहीर करून टाकलं होतं.). तिनं दोन्ही हातांत पेटलेल्या मेणबत्त्या घेतल्या. एका पायावरची डेनिम बेलबॉटम पार अगदी अर्ध्या पायापर्यंत दुमडून गुडघ्यावर काढलेलं चित्र फोटोत दिसेल, अशी व्यवस्था केली. फोटोसाठी उभी राहीराहीपर्यंत सोफी मॉलनं इस्था आणि राहेलला त्यांचं जन्मरहस्य समजवण्यात पुष्कळ वेळ खर्ची घातला होता. तुम्ही दोघेही अनौरस असण्याची केवढी दाट शक्यता आहे आणि 'अनौरस' म्हणजे नक्की काय, हे ती दोघांनाही पुन्हापुन्हा समजावून सांगत होती. तिचा निष्कर्ष कसा चुकीचा आहे, हे सांगणारे अनेक पुरावे (म्हणजे फोटो, आठवणी) धडाधडा धुडकावून लावत होती. मग बोलता-बोलता आपसूकच 'सेक्स'चा विषय निघाला. औरस-अनौरसाची भानगड समजावताना हा विषय कसा टाळता येणार?

...मग काहीतरी आंतरराष्ट्रीय गुपित सांगत असल्याच्या थाटात गंभीर चेहरा करून सोफी मॉल म्हणाली,

'हे बघा, सोप्पंय! सेक्स म्हणजे माहीतेय का, नवरा आणि बायको काय करतात ते...'

...त्यानंतर काही दिवसांत ती गेलीच. अखेरचा श्वासच एकदम. समाप्ती.

...सोफी मॉल.

चांदीच्या अंगुस्तानातून पाणी पिण्याचा हट्ट धरणारी... शवपेटिकेमध्ये झोपून सरकत्या चाकांवरून निघून जाणारी...

मुंबई-कोचिन विमानानं ती आली होती.

डोक्यावर भली मोठ्ठी हॅट... बेलबॉटमचा रुबाब. आणि जन्माला आल्या क्षणापासून मिळालेल्या अपरंपार प्रेमाचं चेहऱ्यावरून ओसंडणारं सुख.

प्रकरण ६
कोचिन कांगारू

कोचिनच्या विमानतळावर पोचल्यानंतरसुद्धा गोळयागोळयांचं डिझाईन असलेली राहेलची चड्डी कुरकुरीत होती. रंगीत तालमी करून-करून सगळं 'नाटक' मुलांना तोंडपाठ झालं, तरी अम्मू तशीच आणि तितकीच बेचैन. अखेर तो 'कसोटी'चा दिवस उजाडला. 'सोफी मॉलला काय वाटेल?' या एकाच पालुपदानं तब्बल आठवडाभर रंगलेल्या नाटकाचा उत्कंठावर्धक कळसाध्याय... समारोप!

खोल गहिऱ्या निळाईतून उसळणाऱ्या डॉल्फिनची स्वप्नं बघून ताज्यातवान्या झालेल्या अम्मूनं सकाळी हॉटेल 'सी-क्वीन'मध्ये तयारी सुरू केली. सगळयांना लवकरात लवकर विमानतळाकडे निघायचं होतं. अम्मूनं राहेलचं बखोट पकडून चुण्याचुण्यांचा, झालरवाला ऐटबाज फ्रॉक तिच्या अंगावर चढवला. अम्मूनं आपली एरवीची सौंदर्यदृष्टी जरा बाजूला ठेवून चमचमत्या चंदेरी चकत्या गुंफलेले पिवळयाजर्द लेसचे दोन मोठेमोठे पुंजके राहेलच्या खांद्यांवर फ्रॉकला टाचले. कमरेच्या खाली गुडघ्यापर्यंत असलेल्या चुण्या गोलाकार फुलाव्यात, म्हणून फ्रॉकच्या आतून एक जाडंभरडं अस्तरही लावलं होतं. यातलं काहीच आपल्या गॉगलशी 'मॅच' होत नाहीये, म्हणून काळजीत पडलेली राहेल मनातून थोडीशी खट्टूच झाली होती.

अम्मूनं फ्रॉकला 'मॅचिंग' असणारी ती कुरकुरीत चड्डी राहेलसमोर धरली. राहेलनं अम्मूच्या खांद्यावर हात ठेवून आपल्या नव्याकोऱ्या चड्डीत समारंभपूर्वक प्रवेश केला (आधी डावा पाय मग उजवा) आणि खूश होऊन अम्मूच्या दोन्ही गालांवर ओठ टेकवून तिचे मुके घेतले (आधी डावा गाल मग उजवा) चड्डीचं इलॅस्टिक राहेलच्या मऊमऊ पोटावर चटाक्कन आरामात बसलं.

'थँक्यू अम्मू'... राहेल म्हणाली.

'थँक्यू? कशाबद्दल?'... अम्मूला कळेना.

'मला नवा फ्रॉक आणि चड्डी आणलीस ना, म्हणून.'

अम्मू हसली.

'यू आर् वेलकम, माय स्वीटहार्ट'... राहेलकडे बघताना तिच्या नजरेत अचानक कसलंसं अनाम दु:ख घेरून आलं.

'यू आर् वेलकम् माय स्वीटहार्ट...'राहेलच्या काळजात खोल कुठेतरी बसलेल्या पतंगानं आपला मऊ मुलायम पाय हलकेच उचलला आणि पुन्हा परत ठेवला. एक गारढोण शिरशिरी इकडून-तिकडे धावत गेली. तिच्या आईचं तिच्यावरचं प्रेम उणावलं

होतं. थोडं का असेना, पण नक्कीच.

'सी-क्वीन'मधल्या त्या खोलीला उकडलेल्या अंड्यांचा आणि फिल्टर कॉफीचा वास येत राहिला.

सगळे खाली उतरून गाडीकडे निघाले.

इस्थाच्या हातात नळाच्या साध्या पाण्याने भरलेला 'ईगल'चा थर्मास होता.

आणि राहेलकडे उकळलेल्या पाण्याचा.

दोन्ही थर्मासवर पंख पसरून झेपावणाऱ्या ईगलची चित्रं होती. तीक्ष्ण नजर आणि बाकदार पायांच्या नख्यांमध्ये पकडलेला पृथ्वीचा गोल.

हे दोन्ही ईगल्स दिवसभर त्या पृथ्वीच्या गोलावर नजर ठेवून असतात; आणि रात्र झाली की तेजस्वी चंद्रबिंब पंखांवर घेऊन थर्मासभोवती घिरट्या घालतात, असं जुळयांना वाटे... रात्रीच्या काळयाकुट्ट चिडीचुप्प अंधारात पंख न वाजवता घुबडांनी उडावं, तशा नीरव घिरट्या...

इस्थानं लांबलचक बाह्यांचा, टोकदार कॉलरवाला लाल शर्ट घातला होता आणि सांडपाणी वाहून नेणाऱ्या पाइपांसारखी सरळसोट काळी पॅन्ट. कपाळावरचा केसांचा कोंबडाही रुबाबदार होता भलताच... उत्सुक आश्चर्यानं अगदी फुलून आलेला. फेटून-फेटून फुगलेला अंड्यातला पांढरा बलक असावा, तसा.

फारशी अतिशयोक्ती न करता इस्थानं आपलं एक निरीक्षण जाहीर करून टाकलं. सोफी मॉलच्या स्वागतासाठी जरा जास्तच सजलेली राहेल अगदीच 'भैताड' दिसतेय.

ही टीका सहन न होऊन संतापलेल्या राहेलनं इस्थाला एक जोरदार धबुका लगावून दिला.

...मग इस्थानंही संधी न सोडता तिचा धबुका जरा जास्तच जोरानं परतवून लावला.

...विमानतळावर जाईपर्यंत दोघांमध्ये 'गट्टी फू' झाली होती.

नेहमी कमरेभोवती मुंडू गुंडाळणारा चाको सैलसर, ढगळ सुटात भलताच विचित्र दिसत असला, तरी त्याचा चेहरा मात्र आनंदानं नुसता उजळला होता. शर्ट अगर कोटाशी काहीही संबंध नसलेला आणि सारखा इकडून-तिकडून ओघळणारा चाकोचा जुनाट, बेंगरूळ टाय अम्मूनं सरळ करून दिला. चाकोबरोबर भरपेट 'ब्रेकफास्ट' करून त्या टायचं पोटही तुडुंब भरलं होतं.

'दीनदुबळयांच्या कैवारानं पेटून उठणाऱ्या आमच्या लोकनायकाला आज काय म्हणे झालंय?'

– प्रचंड खुशीनं ओसंडून वाहणाऱ्या चाकोकडे पाहत अम्मू मिश्कीलपणानं म्हणाली.

...पण तिच्या प्रश्नातली खोच चाकोला अजिबात बोचली नाही.

...म्हणून मग चाकोनं तिला धबुका लगावला नाही. आणि तिनंही चाकोला पुन्हा उलटून धोपटलं नाही.

'सी-क्वीन'मधल्या फुलवाल्याकडून चाकोनं लालजर्द गुलाबाची दोन टवटवीत फुलं खरीदली आणि रुबाबात हातात पकडली.

...नीट जपून.

काळजीनं,

– आणि आनंदानं.

केरळ पर्यटन विकास महामंडळाचं विमानतळावरचं दुकान हरतऱ्हेच्या वस्तूंनी नुसतं ओसंडून वाहत होतं. कमरेत झुकून हसणारे एअर इंडियाचे महाराजा (लहान... मध्यम... मोठे), चंदनाचे हत्ती (लहान... मध्यम... मोठे) आणि कागदाच्या लगद्यापासून बनवलेले कथकली नर्तकांचे रंगीबेरंगी मुखवटे (तेही पुन्हा लहान... मध्यम... मोठे). डोकं उठवणाऱ्या घमघमत्या चंदनाचा आणि टेरिकॉटमध्ये कुजलेल्या घामट काखांचा (लहान... मध्यम आणि मोठ्या) उग्र वास दुकानभर सगळीकडे नुसता कोंडून राहिलेला.

विमानतळावरच्या 'अरायव्हल लाऊंज'मध्ये पोटाशी सिमेंटच्या गोलगरगरीत पिशव्या असलेले सिमेंटचे चार भलेमोठे कांगारू उभारले होते आणि चौघांच्याही पोटुशी पिशव्यांवर लिहिलं होतं,'USE ME'.. चौघांचीही जड जड सिमेंटची पोटं सिमेंटच्या बाळांऐवजी सिगारेटच्या थोटकांनी, रिकाम्या काडेपेट्या आणि बाटल्यांच्या बुचांनी, चुरगळून फेकलेले पेपर कप्स आणि गलेलठ्ठ झुरळांनी भरभरून वाहत होती.

विड्याची पानं खाऊन पचापचा थुंकलेल्या लालभडक पिचकाऱ्यांनी कांगारूंच्या पोटांना रक्ताळलेल्या जखमा पण झाल्या होत्या.

...तरीही इकडून-तिकडून रंगवलेल्या तांबूस तोंडांनी सगळे कांगारू हसत होते आणि हलक्या गुलाबी रेषांनी कोरलेले कान टवकारून काहीतरी ऐकतही होते.

चेहरे इतके जिवंत आणि सिमेंटचे ओठ इतके विलग, की पोट दाबलं, तर कदाचित आवाज फुटेल आणि बॅटरी संपून गेली असली, तरी 'मा...मा...'चे रिकामे, अर्धवट स्वर ऐकू येतील, असं वाटत होतं.

सोफी मॉलला घेऊन येणारं मुंबई-कोचिन विमान कोचिनच्या निळसर आकाशी आकाशात हलकेच तरंगत येताना दिसलं, तशी लोकांची एकच गर्दी उसळली. जो तो समोरच्याला पुढे रेटून पुढचं काय दिसतं, ते बघण्याकरता धडपडायला लागला.

महत्त्वाकांक्षांचे पंख लावून परदेशी उडून गेलेले सगळे जिवाचे जिवलग या एकाच मुंबई-कोचिन विमानानं परत यायचे. त्यामुळं दर वेळी 'अरायव्हल लाऊंज'मधली हवा

अपरंपार प्रेमानं आणि अतिरेकी उत्सुकतेनं भरून-भरून जड व्हायची. सोफी मॉलच्या विमानाचंही तेच होतं.

विमानातल्या उतारूंची कुटुंबच्या कुटुंबं अख्ख्या केरळच्या कानाकोपऱ्यांतून जमलेली. कित्येक तासांचा प्रवास करून धुळीनं माखलेल्या बसमधून जो तो आलेला. कुणी रानीहून, कुणी कुमिली, विझहिंजाम, कुणी उझव्हूरहून, तर कुणी कुठून... त्यातल्या बऱ्याच लोकांनी तर अख्खी रात्र विमानतळावरच मुक्काम ठोकला होता. बरोबर रात्रीच्या जेवणाचे डबे, पाण्याच्या बाटल्या; शिवाय पाहुण्यांना घेऊन परत जाताना तोंड चाळवायला म्हणून टॅपिओकाच्या वेफर्सची पाकिटं आणि केरळची खासियत 'चक्का वेलायचाथू!'

विमानतळाच्या डोक्यावरच्या आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या त्या गर्दीत कोण नव्हतं? कान फुटून ठार बहिरेपण आलेल्या अम्मूम्मा, सांधेदुखीनं बेजार झालेले भांडखोर अप्पुपन, टोचून बोलून सतत किरकिरणाऱ्या बायका, परदेशी गेलेल्या पुतण्यांच्या माघारी षड्यंत्र रचणारे कारस्थानी कावेबाज काका आणि जिकडे-तिकडे सैरावैरा पळून वात आणणाऱ्या पोरांची पलटण.

परदेशी वारं लागलेल्या प्रियकरांच्या परीक्षेला पुन्हा एकदा उतरण्याची कटकट मागं लागून धास्तावलेल्या पोरी, सौदीच्या व्हिसाची वाट बघत केरळातच कुजून सुकलेला तिकडल्या शिक्षिकेचा नवरा, सौदीहून आपल्या हुंड्याची पाकिटं येतील, म्हणून डोळे लावून भावाची वाट बघणाऱ्या अविवाहित बहिणी, कधीच्या कधी सौदीला गेलेल्या एका वायरमनची गर्भार बायको.

'शी: केवढी गर्दी हीऽऽऽ सगळे साले खालच्या वर्गातले. वास मारतोय नुसता' – बेबी कोचम्मा वैतागली होती... तेवढ्यात तिच्या शेजारी उत्तमातली उत्तम जागा पकडून रेलिंगला ओठंगून उभी असलेली एक आई चरफडली. हात सुटून कुठल्याकुठं गेलेला तिचा मुलगा एका रिकाम्या बाटलीच्या तोंडात आपलं तोंडल्याएवढं लिंग अडकवून मजेत हसत उभा होता. त्याच्याकडे आश्चर्यानं बघणाऱ्या आजूबाजूच्या गर्दीला हातबीत दाखवणं चाललं होतं.

'शूऽऽऽ' आपल्या प्रतापी चिरंजीवांच्या दिशेनं असले आवाज फेकण्याखेरीज बिचारी आई काय करणार? आधी थोड्या आग्रहानं, मन वळवावं म्हणून शुकशुक करून आणि नंतर संतापानं धगधगते फुत्कार टाकूनही काही उपयोग झाला नाही. परमपावन पोप असल्याच्या थाटात बाटलीत लिंग घातलेले चिरंजीव जमावापुढं मिरवत होते.

'डोन्ट फरगेट दॅट यू आर् अॅम्बॅसिडर ऑफ इंडिया' – बेबी कोचम्मानं राहेल आणि इस्थाला थेट इंग्लिशमध्येच चापलं. 'आपल्या देशाची लायकी तुम्ही कसे वागता, त्यावरच ठरणार आहे शेवटी... देअर फर्स्ट इम्प्रेशन! अख्ख्या भारताचे प्रतिनिधी म्हणून

तुमच्याकडेच बघतील त्या दोघी पहिल्यांदा. विसरू नका.'

दोन अंड्यांच्या एकाच नाळेतून जन्मलेले दोन जुळे राजदूत... अॅम्बॅसिडर्स. अॅम्बॅसिडर ए (ल्व्हिस) आणि अॅम्बॅसिडर प (तंग).

वाऱ्यावर उडणाऱ्या कुरकुरीत चुण्यांचा घोळदार झालरवाला फ्रॉक आणि 'लव्ह इन टोकियो'नं बांधलेलं डोईवरचं उडतं कारंजं यांमुळं राहेलचं रूपडं विमानतळावरच्या भैताड परीसारखंच दिसत होतं. भोवती सगळीकडं ओलसर कुल्ल्यांच्या चिकट गोळयांची थुलथुल (ती पुन्हा असणारच होती. त्या पिवळट चर्चमध्ये) आणि ताणून-ताणून तुटायला आलेल्या उत्सुकतेचा विचित्र तवंग. या एवढ्या अचाट गर्दीत राहेलच्या काळजावर पाय रोवून बसलेला तिच्या आजोबांचा पतंग होता, तो होताच. तिच्या मामेबहिणीला आकाशमार्गानं घेऊन येणाऱ्या त्या भल्याथोरल्या चमकत्या पक्ष्याच्या घरघराटाकडे पाठ फिरवून क्षणभरासाठी राहेल वळली मात्र; तिला एक मोठीच गंमत दिसली.

लालचुटुक तोंडाचे ते कांगारू विमानतळाच्या चमकत्या फरशीवरून सिमेंटच्या पावलांनी हसत-हसत मस्त मजेत फिरत होते.

टीक टॉक

टीक टॉक

लांबलचक, फताडे पाय. पायांचे आवाज.

शिवाय पोटाशी बांधलेल्या विमानतळावरच्या कचऱ्याच्या पिशव्या.

सगळयांत छोट्या कांगारूनं आळस देत मान लांबवली. ऑफिसमधून दमून आलेले इंग्लिश सिनेमातले हिरो घरात पाय ठेवताच पहिल्यांदा गळयाभोवतीचा टाय सैल करतात, तसे मानेला आळोखेपिळोखे दिले.

मधल्या कांगारूनं पोटाशी लावलेल्या पिशवीत भरपूर उचकापाचक केली. मस्त झुरका घ्यायला एखादं लांबुडकं सिगारेटचं थोटूक मिळतं का, ते शोधून पाहिलं; पण तसं थोटूक नव्हतंच. एका जुनाट, फाटक्या प्लॅस्टिकच्या पिशवीच्या तळाशी चुकून राहून गेलेला काजूगर तेवढा मिळाला. मग सिगारेटच्या झुरक्याऐवजी त्या कांगारूनं तो उरलासुरला काजूगरच पुढच्या दातांनी कुरतडून कुरतडून खाल्ला.

सगळयांत मोठ्ठं कांगारू उगाचच एका भल्यामोठ्या बोर्डापाशी अडखळत, धडपडत काहीतरी चाळे करीत होतं. 'नमस्ते'च्या मुद्रेत उभ्या असलेल्या एका कथकली नर्तकाचं रंगीबेरंगी चित्र होतं त्या बोर्डावर आणि पुढं लिहिलं होतं – 'Kerala Tourism Development Corporation welcomes you.'

'केरळ पर्यटन विकास महामंडळ' आपले सहर्ष स्वागत करीत आहे.

शेजारी दुसराही एक बोर्ड होता. पण स्वागताच्या बोर्डाला लोंबकळणाऱ्या कांगारूचं तिकडं लक्षच नव्हतं. त्यावर लिहिलं होतं,

'emocleW oX eht ecipS tsaoC fo aidnI'

हे बघताच आजूबाजूच्या गर्दीतून झपाझप बिळं खोदत अॅम्बॅसिडर राहेल आपल्या अॅम्बॅसिडर भावाच्या दिशेनं धूम पळत गेली.

'इस्था, बघ... ते बघ ना... तिकडे.'

...पण इस्थाचं लक्ष नव्हतं. राहेलनं दाखवलेल्या गोष्टीकडे त्यानं ढुंकूनसुद्धा पाहिलं नाही. त्याला इच्छाच नव्हती. नळाच्या पाण्यानं भरलेला 'ईगल'चा थर्मास काखोटीला मारून, प्रचंड घरघराट करत जमिनीवर उतरणाऱ्या विमानाकडे तो एकटक बघत राहिला. त्याच्या पोटात पुन्हा एकदा ढवळायला लागलं होतं. घशाशी आंबटगोड गिळगिळीत मळमळ साठली होती. तो ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला कधीही येईल, कुठंही येईल. कधी कुठं आणि कसं यायचं, हे ठाऊकेय त्याला. आयमेनेममधल्या फॅक्टरीत... किंवा मग मीनाचलच्या काठावर... पोटात उसळणाऱ्या भीतीवर झाकण घालून-घालून इस्था थकला होता.

आपली रुबाबदार हँडबॅग सावरत अम्मू उत्सुकतेनं समोर पाहत होती.

गुलाबाच्या दोन फुलांसह चाको... आणि लुटुलुटु हिंदकळणाऱ्या हनुवटीवरच्या तिळासकट बेबी कोचम्मा.

मुंबई-कोचिन विमानातले प्रवासी एकामागोमाग एक बाहेर यायला लागले... आतल्या थंडगार हवेतून बाहेरच्या धुरकट रखरखाटात. बसून-बसून वाकलेली, चुरगळलेली शरीरं चुण्या मोडून ताठ होत अरायव्हल लाऊंजमध्ये उतरू लागली.

परदेशगमन पार पाडून, 'फॉरिन रिटर्नड् 'चा ऐटबाज शिक्का कपाळी लेवून मातृभूमीकडे परतलेले समस्त सुपुत्र... सुकन्या. 'वॉश न् वेअर'वाले रुबाबदार सुटस्, सप्तरंगी छटांनी झगमगते गॉगल्स... रक्त शोषून घेणाऱ्या गरिबीच्या समाप्तीच्या घोषणांनी काठोकाठ भरलेल्या गुबगुबीत बॅगा आणि त्या बॅगांमध्ये तरी किती काय काय... गवतानं शाकारलेल्या मोडक्या छपरासाठी सिमेंटचे पत्रे, जन्मभर नदीत न्हायलेल्या आईबापांच्या बाथरूममध्ये टांगण्यासाठी बटन दाबताच गरम पाणी सोडणारे गीझर्स, सांडपाणी वाहून नेणाऱ्या आधुनिक यंत्रणा आणि उघड्या संडासांसाठी सेप्टिक टँक्स! शिवाय मॅक्स्या आणि हाय हीलवाले सँडल्स, फुग्यांच्या बाह्यांचे ब्लाऊज आणि लिपस्टिक्स, मिक्सर ग्राईंडर्स आणि कॅमेऱ्यांसाठी अॅटोमेटिक प्लॅश... मोजून-मोजून कंटाळा येईल इतक्या किल्ल्या आणि कुलपं घालता-घालता पुरेवाट होईल, इतकी कपाटं!... खूप दिवसांपासून चाखायलादेखील न मिळालेल्या 'कप्पा' आणि 'वेविपटू'ची मेजवानी हाणण्यासाठी खवळलेली भूक... शिवाय खूप दिवसांपासून न भेटलेल्या आप्तांसाठीचं अंधूक प्रेम आणि त्यांच्या संतापजनक गावंढळपणाबद्दलची शरम! कपडे तरी

पाहा त्यांचे... याच्यापेक्षा बरं काही नव्हतं का घालायला? विमानतळावर येतानासुद्धा मळक्या चिंध्याच नेसतात साले... सगळा गबाळग्रंथी कारभार! कधी च्यायला सुधारणार आपला देश? आणि या मल्याळी लोकांचे दातसुद्धा साले किती बटबटीत!!

विमानतळावरची 'जन्ता' ही अशी, आणि खुद्द विमानतळ? गावातल्या 'यस्टी डेपो'पेक्षा जरा बरं, एवढंच! इमारतीवर जिकडेतिकडे पक्ष्यांनी शिटून केलेल्या घाणीचे ओघळ... कांगारूंच्या पोटांवर पानाच्या लालभडक पिचकाऱ्या!

या असल्या गावंढळ लोकांच्या नादानं अख्ख्या देशाचा सत्यानाश होणार, च्यायला!

बसचे धक्के खात केलेला लांबलचक प्रवास आणि विमानतळावरच्या रात्रभराच्या मुक्कामानं आंबून गेलेल्या शरीरांना विमानातून उतरलेली, थोड्याशा प्रेमात भिजलेली आणि पुष्कळशा शरमेने थिजलेली शरीरं भेटली, की क्षणभरासाठी का असेना, एकच गलका फुटे. गप्पा... हसणं-खिदळणं... हा गलका पुढे वाढत-वाढत जाणार आणि कुणाला काही कळायच्या आत परदेशांतून परतलेली सगळी स्वप्नं 'हिस्टरी हाऊस'च्या रिंगणावर अचूक जाळ्यात सापडणार आणि रक्ताच्या थारोळ्यात होत्याचं नव्हतं...

...सुटांच्या, गॉगल्सच्या आणि बॅगांच्या गर्दीत अखेर सोफी मॉलचा चेहरा दिसला!

...चांदीच्या अंगुस्तानातून पाणी पिण्याचा हट्ट धरणारी.

शवपेटिकेमध्ये झोपून चार चाकांवरून निघून जाणारी सोफी मॉल.

भुरभुरत्या केसांमधून वाहणाऱ्या लंडनच्या मंद गंधाच्या ढगावर स्वार होऊनच सोफी मॉल विमानातून उतरत होती.

पिवळ्या बेलबॉटमचे थेट गुडघ्यापर्यंत दुमडलेले पाय आणि हॅटमधून चौफेर वाहणाऱ्या लाटांसारखे उसळते लांबलचक केस...

एका हातानं आईचं बोट पकडलेलं आणि दुसरा सैनिकी शिस्तीनं मागं-पुढे झुलणारा (लेफ्ट, लेफ्ट... लेफराईट... लेफ्ट).

देअर वॉज
अ गर्ल
टॉल अॅन्
थिन अॅन्
फेअर...
हर हेअर
हर हेअर
वॉज द डेलिकेट कलर
जीन्. नन् जर (लेफ्टलेफ्ट, राईट)
देअर वॉज
अ गर्ल...

विमानातून उतरल्यावरसुद्धा सोफी मॉलचे चाळे चालूच होते.

शेवटी वैतागून मार्गरिट कोचम्मा म्हणाली,
'स्टॉप्पिट्!'
सो, *शी स्टॉप्पिटेड्!*
ती खटाक्कन गप्पच बसली.

टाचा उंचावून-उंचावून अम्मू समोर बघत होती.
'राहेल, दिसतेय? तुला दिसतेय का ती?'
तिनं एकदम वळून पाहिलं, तर राहेल लांबवर कुठंतरी पोटाशी पिशवी लावलेल्या सिमेंटच्या कांगारूंशी खेळत बसलेली. अम्मू तणतणत तिकडे गेली आणि रागारागानं बखोटी धरून तिनं राहेलला खेचत-खेचतच आणलं. 'मी राहेलला मुळीच खांद्यावर उचलून घेणार नाही.' असं चाकोनं आधीच सांगून टाकलेलं होतं. कसं घेणार उचलून! त्याच्या हातात राहेलपेक्षा कित्येक कित्येक पटीनं महत्त्वाची अशी खास वस्तू होती.
– लालचुटुक गुलाबाची दोन फुलं.
आठवणीनं आणलेली.
...आणि प्रेमानं.
अरायव्हल लाऊंजमधून रुबाबात चालत येणाऱ्या सोफी मॉलला बघण्याच्या औत्सुक्याला वैतागून संतापलेल्या राहेलनं इस्थाला एक कडकडीत चिमटा काढला. मग इस्थानंही दोन्ही हातांच्या चिमटीत तिच्या मगनगटावरची कातडी खालून वरून पकडली आणि जोरानं खेचली. म्हणजे चायनीज् बांगडी. तिचा वळसा मनगटाभोवती पडल्यावर राहेल कळवळली. वेदनेनं झोंबणाऱ्या मनगटावरून तिनं पटकन जीभ फिरवली, तर तिला खारट-खारट लागलं. ओल्या जिभेतून गळलेल्या थुंकीचा छोटासा बुडबुडा राहेलच्या मनगटावर खूप वेळ आरामशीर बसून राहिला.
पण अम्मूला काही म्हणता काही कळलं नाही.
जिवलगांच्या भेटीसाठी तडफडणाऱ्या जीवांना त्यांच्या जिवलगांपासून अलग करणारं ते अवाढव्य लोखंडी रेलिंग चाकोला आता अगदी असह्य झालं होतं. उचंबळून आलेलं त्याचं मन आनंदानं फुटून बाहेर पडेल की काय, अशा अवस्थेत काही न सुचून चाको टाचा उंचावून-उंचावून पुढं झेपावत होता. मार्गरिट कोचम्मा आणि सोफी मॉल नजरेच्या टापूत आल्यावर चाको अत्यानंदानं कमरेतून गुडघ्यांपर्यंत झुकला. त्याच्या रक्ताची नवीकोरी मुलगी आणि भूतपूर्व (का असेना) बायको समोर येताच त्याला काही सुचेनासंच झालं होतं.
चाको असा कमरेत झुकलेला बघून इस्था मनातल्या मनात म्हणाला,
'वाक खाली...' आणि (मनातल्या मनात) वाकलासुद्धा.

‘या...या...या...’

चाकोच्या आवाजात अचानक त्याचा तो ‘खास कमावलेला स्वर’ मिसळला होता *(*आदल्याच रात्री राहेलला प्रवचन देणारा स्वर... प्रेम, वेडेपणा, आशा आणि अपरिमित आनंद... तोच*.).*

‘कशा आहात तुम्ही दोघी? कसा झाला प्रवास?’

सांगण्यासारख्या गोष्टी, ऐकण्यासारख्या गोष्टी आणि काय सांगावं-ऐकावं यांबद्दल आडाखे बांधणारे विचार या सगळ्याच लचांडाची अचानक गर्दीच गर्दी उसळली; पण अशा वेळी महत्त्वाचं ते नेमकं मनातच दाबावं लागतं आणि किरकोळ, बिनमहत्त्वाच्या गप्पांचे नुसते पूरच्या पूर येतात. तसंच झालं नेमकं.

‘से ‘हॅलो’ अॅन्ड ‘हाऊ डु यू डु?’ मार्गरिट कोचम्मानं सोफी मॉलला सुचवलं.

‘हॅलो अॅन्ड हाऊ डु यू डु?’ – सोफी मॉलने सही सही आईचे शब्द उचलले आणि लोखंडी रेलिंगच्या पलीकडून एकाच वाक्यात सगळ्याची घाऊक चौकशी करण्याचा उपचार उरकला.

‘घ्या... एक तुझ्यासाठी आणि एक तुझ्यासाठी.’

खूप वेळ प्राणपणानं सांभाळलेली गुलाबाची फुलं चाकोनं मोठ्या रुबाबात दोघींना प्रदान केली.

‘...आणि थँक्यू कोण म्हणेल?’ मार्गरिट कोचम्मानं (पुन्हा एकदा) लेकीला शिष्टाचाराची आठवण केली.

‘आणि थँक्यू कोण म्हणेल?’ आईच्या वाक्यातलं नेमकं काय गाळावं, ते न कळून सोफी मॉलनं चाकोकडे बघत-बघत हुकमाबरहुकूम ओठ हलवले.

लेकीच्या या बधिर उद्धटपणानं मार्गरिट कोचम्मा वैतागली. तिनं सोप्ाâी मॉलचा हात मागच्या मागं जोरानं खेचला.

‘यू आर् वेलकम. स्वागत असो...’

चाकोला अजून नीट शब्द सुधरत नव्हते.

‘नाऊ लेट मी इंट्रोड्यूस एव्हरीबडी.’

त्यानं शेवटी ओळखपरेड सुरू केली.

हा एकूण स्वागतसमारंभ चोरून पाहणार्‌या आणि ऐकणार्‌या आजूबाजूच्या भोचक बघ्यांपुढे जरा भाव मारून घ्यावा, म्हणून मार्गरिट कोचम्माकडे पाहत अभिमानानं छाती फुगवून चाको म्हणाला.

‘ही मार्गरिट कोचम्मा. माय वाईफ.’

सूचक हसून मार्गरिट कोचम्मानं हातातल्या गुलाबाच्या फुलानं चाकोला हलकीशी टपली मारली.

‘वाईफ? चाको, एक्स-वाईफ.’

तिच्या ओठांनी शब्दांचे आकार बांधले होते खरं म्हणजे; पण आतून आवाज तेवढा फुटला नाही.

मार्गरिट कोचम्माच्या शेजारी उभ्या राहिलेल्या चाकोच्या रोमारोमांतून इतक्या सुंदर स्त्रीचा नवरा असल्याचा अभिमान नुसता ओसंडत होता.

कुणालाही हवीशी वाटावी, अशी स्त्री.

गोरीगोमटी. अंगावर फुलाफुलांचा फ्रॉक आणि फ्रॉकच्या खाली निमुळते, घाटदार पाय. शिवाय पाठीवर बारीक-बारीक पिंगट डागांचं वांग. आणि तसंच हातावर पण.

... पण तिच्याभोवतीचे दु:खाचे खिन्न तरंग विरले नव्हते अजून. सगळ्यांकडे बघून आनंदानं हसणारे तिचे डोळेही आतून तीव्र वेदनेनं भळभळत असावेत.

नुकताच झालेला तो अपघात.

– आणि अवकाशाच्या छाताडावर भस्सकन् घुसलेली ‘जो’च्या आकाराची ती भलीमोठी पोकळी.

‘हॅलो,’ डोळ्यांच्या आत भळभळणारं अदृश्य दु:ख लपवत मार्गरिट कोचम्मा म्हणाली,

‘असं वाटतंय, की वर्षानुवर्षांपासून आपण सगळे ओळखतोय एकमेकांनाऽऽऽ.’

‘ही माझी मुलगी... माय डॉटर, सोफी.’

... आता चाकोच्याही हसऱ्या, उत्साही डोळ्यांत काळजी घुसली होती. हसणंही जरासं आक्रसलंच होतं. न जाणो, मार्गरिट कोचम्मा पुन्हा म्हणाली तर, की ‘एक्स–डॉटर’ पण तसं काही झालं नाही. मार्गरिट कोचम्मा न बोलता हसली फक्त. तेही सहज समजेल असं. इस्थाला चक्रावून टाकणाऱ्या ऑरेंजड्रिंक- लेमनड्रिंकवाल्यासारखं नव्हतं त्यात काही.

‘...ल्लो,’ सोफी मॉलनं एक अक्षर गिळून पुन्हा एकदा शिष्टाचार पाळायची धडपड केली.

ती इस्थापेक्षा उंच होती पुष्कळच. आणि चांगली धट्टीकट्टी. निळे... निळसर भुरे डोळे... किनाऱ्यावरच्या वाळूच्या रंगाची मऊ लुसलुशीत त्वचा...

...पण डोईवरच्या हॅटमधून झेपावत उसळणारे तिचे केस सगळ्यांत छान होते. लालसर भुरे, काहीसे तपकिरी, चमकदार.

...आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे तिच्या नाकातून बाहेर फुटू पाहणारं पाप्पाचींचं नाक.

एका छोट्या मुलीच्या नाकात लपलेलं एका ख्यातनाम ‘पतंग’प्रेमी कीटकशास्त्रज्ञाचं नाक.

‘मेड-इन-इंग्लंड’चा शिक्का मिरवणारी तिची लाडकी बॅग सोफीनं घट्ट पकडून ठेवली

होती.

'ही अम्मू... माझी बहीण.'

चाकोनं ओळखपरेड पुढे चालू केली.

अम्मूनं मार्गरिट कोचम्माकडे वळून एक रूबाबदार प्रौढ अभिवादन केलं आणि सोफी मॉलकडं बघून जरा जास्त अनौपचारिक प्रेमानं, थोड्या कौतुकानं हात हलवला.

म्हणजे,

'हॅलो'

आणि

'हॅल्लोऽऽऽ'

अम्मूच्या डोळ्यांत सोफी मॉलबद्दल नक्की कितीसं प्रेम दिसतं, ते मोजूनच टाकावं, म्हणून धास्तावलेली राहेल नजर विस्फारून उभी होती; पण अम्मूच्या डोळ्यांतलं 'हॅल्लो'चं प्रतिबिंब तिला कळलंच नाही नीटसं.

उत्सुकतेनं ताणलेल्या 'अरायव्हल लाऊंज'मधल्या प्रतीक्षेचा काच सैलावल्यावर हळूहळू हसण्या-खिदळण्याची हवा पसरत गेली.

मल्याळम सिनेमातला लोकप्रिय विनोदवीर अदूर बासी त्याच (मुंबई-कोचिन) विमानातून अगदी नुकताच उतरला होता. आधीच जवळ बारीक-बारीक ओझी आणि त्यात वरून टाळक्यावर कायमची लादलेली सक्तीच्या 'खुशामतखोरी'ची प्रेमळ भानगड... लोकांच्या उपकारांचं ऋण फेडायचं, तर त्यांचं मनोरंजन न करून कसं चालेल?

अदूर बासीनं हातातल्या एकेक गोष्टी खाली टाकायला सुरुवात केली आणि तालासुरात बडबड...

'एन्डे देवयवोमे! ई सदानन्गल.'

इस्थाला हसू आवरेना. ठो ठो हसत तो अम्मूला म्हणाला,

'बघ बघऽऽऽ, अदूर बासी कसा धडपडत चालतोय. त्याला धड स्वत:च्या वस्तूसुद्धा सांभाळता येत नाहीयेत...'

'तसं नाहीय्ये काहीऽऽऽ मुद्दाम करतोय तो,' आवाजातल्या शिष्टपणाच्या मात्रेला आणखी एक वळसा देत बेबी कोचम्मा तिरसटून म्हणाली,

'मूर्खय तो. तू कशाला लक्ष देतोस तिकडं?'

अदूर बासी सिनेमातला नट आहे, ही माहिती बेबी कोचम्मानं परदेशी पाहुण्यांना तत्परतेनं पुरवून टाकली.

'लोकांचं लक्ष खेचून घ्यायचं वाट्टेल ते करून... दुसरं येतंच काय मेल्यांना?' शेवटी नाक उडवून बेबी कोचम्मानं एक टोमणा टाकलाच... आणि 'लोकं गेली खड्ड्यात, आपण

त्याला का भाव द्यावा?' अशा विचारानं स्वत:चं लक्ष काढून घेतलं.

अर्थात बेबी कोचम्माचा जळफळाट अजिबातच योग्य नव्हता. लोकांचं लक्ष आपल्याकडे खेचून घेण्याची अदूर बासीला काही गरजच नव्हती खरं म्हणजे. आपल्यावर आधीपासूनच मोठ्या अपेक्षेनं खिळलेल्या नजरांना देता आला, तर थोडाफार आनंद द्यावा, म्हणून धडपडत होता बिचारा.

'ही माझी आत्या... बेबी कोचम्मा.' चाको म्हणाला.

सोफी मॉलला क्षणभर काही कळेचना. तिनं आश्चर्यानं डोळे विस्फारून बेबी कोचम्माकडं एकवार नीट पाहून घेतलं. तिला 'काऊ-बेबीज्' ठाऊक होत्या. 'डॉग-बेबीज्' आणि 'बिअर-बेबीज्'सुद्धा तिनं पाहिल्या होत्या (काही दिवसांनी तर ती राहेलला 'बॅट बेबी'– छोटी पाकोळी दाखवणारसुद्धा होती.). पण 'आत्या' आणि 'बेबी' ही काय भानगड आहे, तिला समजेना. गोंधळच गोंधळ माजला तिच्या डोक्यात.

'हॅलो मार्गरिट... हॅलो सोफी मॉल' – बेबी कोचम्मानं दोघींचं स्वागत केलं.

'सोफी मॉल इतकी विलक्षण सुंदर आहे, की तिला बघून 'एरियल'सारख्या वनदेवतेचीच आठवण होतेय'... असं म्हणत बेबी कोचम्मानं आपल्या नातीचं तोंड-भरून कौतुक केलं.

'माहीतेय, एरियल कोण होती?' बेबी कोचम्मानं सोफी मॉलला विचारलं, 'द टेम्पेस्ट' मधली एरियल?'

सोफीनं काही न कळून मान हलवली. 'व्हेअर द बी सक्स, देअर सक् आय... आठवतं?'-

सोफी मॉलनं पुन्हा एकदा इकडून-तिकडं मान हलवली.

'इन अ काऊस्लीप्स बेल आय लाय?' – बेबी कोचम्मानं चिकाटी सोडली नाही.

– सोफी मॉलनं पुन्हा तेच केलं. नकार. या खांद्यापासून त्या खांद्यापर्यंत.

'अगं, द टेम्पेस्ट... शेक्सपियरचं? आठवतंय?'

– बेबी कोचम्माचा हेका काही संपला नव्हता.

इंग्रजी साहित्यातली आपली जाणकारी (खुद्द) मार्गरिट कोचम्मापुढे सिद्ध करण्याची एवढी चांगली संधी... तिनं तरी का गमवावी? आपण विमानतळावरच्या 'जन्ते'त उभे असलो, तरी परदेशी टामटुम मिरवणाऱ्यांपुढे अगदीच काही गावंढळ नाही, हेही बेबी कोचम्माला एकदा सुनावूनच द्यायचं होतं. तिनं दणक्यात आपली गाडी रेटली.

'अतिच भाव खातेय.'

– अॅम्बॅसिडर ए (एल्व्हिस) अॅम्बॅसिडर प (पतंग)च्या कानात कुजबुजला.

– अॅम्बॅसिडर राहेलच्या गुपचूप हसण्याची खुदखुद अचानक एका निळसर-हिरव्या फुग्यातून निसटली आणि पिकून फुटलेल्या फणसाभोवती घोंघावणाऱ्या माशीचे रंग

घेऊन विमानतळावरच्या गरमगरम हवेत भिरभिरत राहिली. फट्!... असा आवाजही झाला.

ही सगळी फाट्फुट् बेबी कोचम्मानं हेरली होती. या खुसफुसण्याच्या मुळाशी इस्थाच असणार, हेसुद्धा तिनं ओळखलं होतं.

'...आणि आता सगळ्यांत महत्त्वाची ओळख...' आपल्या त्याच दमदार, कमावलेल्या आवाजात चाकोनं परदेशी मान्यवरांपुढं नव्या ओळखीचा प्रस्ताव मांडला.

'हा माझा भाचा, इस्थापन.'

'एल्व्हिस प्रिस्ले' – ताबडतोब वचपा काढण्याची संधी बेबी कोचम्मानं सोडली नाही.

'आय अॅम अफ्रेड, वी आर् अ लिट्ल बिहाइंड द टाइम्स हिअर'... बेबी कोचम्माची 'इंग्लिश खोच' इतकी उघड होती, की इस्थाकडे बघून सगळेच हसायला लागले.

अॅम्बॅसिडर इस्थाच्या नव्याकोऱ्या, टोकदार बुटांच्या तळव्यातून एक संतापाची लाट उसळली आणि वर वर झेपावत थेट त्याच्या काळजाभोवती घोंघावत, झोंबत राहिली.

'हाऊ डु यू डु, इस्थापन?' – मार्गरिट कोचम्मानं शिस्तीत विचारलं.

'आयअॅम फाईन थँक्यू'- दुर्मुखल्या खिन्न आवाजाला मध्ये दम घेण्याचीसुद्धा इच्छा उरली नव्हती.

'इस्थाऽऽ', अम्मूच्या स्वरात अचानक प्रेम दाटून आलं.

'काय शिकवलंय? कुणी आपल्याला 'हाऊ डु यू डु?' विचारलं, तर आपण पुन्हा काय विचारायचं असतं?- तेच. 'हाऊ डु यू डु?' ...नॉट फाईन थँक्यू. कमॉन, से हाऊ डु यू डु?'

अॅम्बॅसिडर इस्था अम्मूकडे पाहत तसाच उभा राहिला.

'कमॉन, से हाऊ डु यू डु?... म्हण पुन्हा.'

– इस्थाचे पेंगुळलेले डोळे, खरं म्हणजे आता हट्टानं पेटले होते.

पण अम्मूही हार मानायला तयार नव्हती. शेवटचा उपाय म्हणून ती मल्याळममध्ये इस्थाच्या अंगावर खेकसली.

'कान फुटलेत तुझे? ऐकू येतंय, मी काय सांगतेय ते?'

निळसर हिरवे भुरे डोळे आपल्याकडे रोखून पाहतायत आणि बाहेर फुटण्याआधी छोट्या नाकात दडून बसलेलं मोठं नाक आपल्या अंगाला टोचतंय, हे इस्थाला जाणवत होतं... पण ते 'हाऊ डु यू डु?' प्रकरण काही केल्या त्याला सापडेना.

'इस्थापन' – अम्मूचा आवाज जरा जास्तच चढला होता... तिच्या आतून संतापाची एक लाट उसळली आणि वर-वर झेपावत थेट तिच्या काळजाभोवती घोंघावत झोंबत राहिली. आम जनतेच्या देखत स्वाभिमानाच्या चिंध्या करणारा हा बंडाचा झेंडा आणि तिच्या स्वत:च्या कार्यकक्षेत वाट्याला आलेली ही मानहानी सहन होण्यापलीकडची होती. अम्मू आतल्या आत धुमसत राहिली. एवढं शिकवून, पढवून, रंगीत तालमी घेऊन

ऐन कसोटीचा क्षण तिच्या हातून निसटलाच अखेर. सगळं काही शिस्तशीर पार पडावं आणि 'इण्डो-ब्रिटिश बिहेव्हिअर कॉम्पिटिशन' मध्ये आपल्या मुलांनी बाजी मारावी, एवढी किमान अपेक्षा होती; पण ऐन वेळी सगळंच नासून गेलं.

'प्लीज. पुरे कर आता. नंतर बघू...'

– हा सगळा तमाशा बघून संतापलेला चाको मल्याळममधून अम्मूच्या अंगावर हलकेच खेकसला.

आग ओकणारे अम्मूचे डोळे इस्थावर खिळलेले होतेच. तेही मग नाइलाजानं इस्थाला म्हणाले, 'ठीकाय... नंतर बघू.'

त्या 'नंतर बघू' मध्ये भलतीच दहशत ठासून भरलेली होती. शिवाय वरून बोबडी वळेल अशी धमकी... शेवाळ्यानं भरलेल्या खोल विहिरीत गंभीर घंटेचे ठणठण टोल पडावेत; तशी. काळजाचा थरकाप उडवणारी. टोकदार केसांनी भरलेली... काळजावर दबा धरून बसलेल्या पतंगाच्या फडफडत्या पायासारखी.

ऐन पावसाळ्यात घातलेलं लोणचं नासावं, तसा जमवत-जमवत आणलेला सगळा खेळ एकाएकी नासून गेला.

'...आणि ही माझी भाची.'

चाको सहज वळला, तर तिथं कुणीच नव्हतं.

'अरे, राहेल कुठं गेली? इथंच होती ना आत्ता?'

छोट्याशा आयुष्याला बसणारे मोठे-मोठे धक्के आणि वरून खाली, खालून वर डचमळण्याचा खेळ सहन न होऊन राहेल विमानतळावरच्या एका घाणेरड्या जडजंबाळ पडद्याशी जाऊन लगटली होती. इतकी आत घुसली, की पडद्याच्या तळाशी बाटाच्या सँडल्स तेवढ्या दिसत राहिल्या.

'जाऊ दे... अजिबात लक्ष नका देऊ त्या भैताडाकडं,' अम्मू वैतागून म्हणाली,

'लोकांचं लक्ष खेचून घेण्याचे नखरे आहेत सगळे. भाव खातेय. दुसरं काय?'

– पण, खरं म्हणजे, निष्कर्ष चुकलाच होता पार. लोकांनी अपेक्षित आणि हक्काचा असलेला 'भाव'सुद्धा आपल्याला देऊ नये... आपल्याकडे नजर उचलून बघूच नये, म्हणून राहेलची धडपड चालली होती.

'हॅलो राहेल' – विमानतळावरच्या त्या घाणेरड्या पडद्याशीच मार्गरिट कोचम्मानं बोलणं सुरू केलं.

'हाऊ डु यू डु?'- पडदा हळूच पुटपुटला.

'बाहेर नाही का यायचं? समोर येऊन तू 'हॅलो' नाही का करणार तुझ्या मामीला?' – शाळकरी मुलीला समजावणाऱ्या शिक्षिकेसारखी आवाजात हुकमी साखर पेरत मार्गरिट कोचम्मानं राहेलला पुन्हा हाकारलं (जुळ्यांच्या डोळ्यांतला 'तो सैतान' दिसायच्या

आधी मिस मिट्नसुद्धा अशीच लाडात येऊन बोलत असे.).

– पण पडद्याच्या त्या जंजाळातून राहेल बाहेर आली नाही. तिला यायचं नव्हतं बाहेर. कधीच, शक्यच नव्हतं मुळी. कारण सगळाच घोळ झाला होता. अम्मूच्या उफाळत्या रागानं डोळ्यांतून तीरासारखे बाहेर पडलेले ते शब्द – नंतर बघू – राहेल विसरली नव्हती. ती आणि इस्था – दोघांच्याही संदर्भात नंतर काहीतरी भलतंच घडणार, या भयानक भीतीचे हात तिच्याहीभोवती आवळले जात होते.

केसाळ पायांचे पतंग आणि गारढोण पंखांची फुलपाखरं अचानक भिरभिरून उठली... शिवाय खोल वाजणाऱ्या मृत्युघंटा... अंधाऱ्या विहिरीत भसाभसा रुजलेलं शेवाळ...

...आणि बटबटीत डोळे रोखून बसलेलं एक घुबड!

विमानतळावरच्या त्या घाणेरड्या पडद्याची भलीभक्कम ढाल, तिथला अंधार आणि आडोसा... सगळंच प्रचंड सुखाचं वाटत होतं राहेलला.

'जाऊ दे. लक्ष नका देऊ तिच्याकडं' – हा पेच हसण्यावरी न्यावा म्हणून अम्मूनं परत एकदा तेच सुचवून पाहिलं.

राहेलच्या मनात रस्त्याच्या कडेकडेनं उभ्या असणाऱ्या, ढुंगणाला चटके देणाऱ्या मैलाच्या दगडांची ही रास जमली... आणि निळसर भुरे डोळेच डोळे तरंगत राहिले.

– अम्मूचं प्रेम आता आणखीच आटलं असणार. नक्की. चाकोच्या निमित्तानं सिद्धच होऊन गेलं होतं सगळं.

'चला, चला... सामान आलंऽऽऽ'

– एका फालतू भानगडीतून आयतीच सुटका झाल्याच्या आनंदात चाकोनं 'सामान आल्या'ची सहर्ष घोषणा केली.

'कमॉन सोफीकीन्स, चल तुझी बॅग आणू आपण.'

सोफीकीन्स...

ढगळ सुटातला, इकडं-तिकडं ओघळणाऱ्या 'टाय'वाला चाको अत्युत्साहानं नुसता टणाटणा उडत होता. सामान आणायला निघालेल्या लोंढ्यात शिरून याला ढकलत, त्याला पाडत एखाद्या शूरवीरासारखा तो आत-आत घुसत निघाला. त्याचा हा अवतार बघून वैतागलेली गर्दी आपसूक बाजूला सरली आणि शूरवीर आणखी त्वेषाने आघाडीवर निघाले. चाकोच्या गोलगरगरीत, थुलथुलीत ढेरीमुळं तो कायम फक्त चवड्यांवरच चालतोय, असं दिसायचं. आयुष्यातल्या सगळ्या चढउतारांशी दोस्ती करत, गप्पा मारत, नाहीच जमलं, तर थोड्या वाटाघाटी करत, 'तोड-पाणी' करून जमवून घेत मजेत चालल्यासारखे थुलथुलीत ढेरीखालचे चाकोचे चवडे एकापुढे एक पडत.

...तसाच चाको निघाला होता. सामान आणायला. रेलिंगच्या एका बाजूनं तो. दुसरीकडून मार्गरिट कोचम्मा आणि सोफी मॉल.

...सोफीकीन्स

डोईवर रुबाबदार टोपी चढवून आणि खांद्यावर चमकते बिल्ले लटकावून बसलेला विमानतळावरचा गार्ड चाकोच्या उसळत्या उत्साहानं पार गांगरूनच गेला. सामानाच्या ट्रॉलीकडे निघालेल्या चाकोला अडवण्याचा साधा प्रयत्नसुद्धा न करता त्यानं 'न विचारलेली' परवानगी देऊनच टाकली.

...आता त्या तिघांमध्ये रेलिंगचा लोखंडी अडथळा उरला नव्हता.

त्या क्षणाची तहान लागलेल्या चाकोनं पटकन मार्गरिट कोचम्माच्या ओठांवर ओठ टेकले आणि सोफी मॉलला कडेवर उचलून घेतलं.

'आधी तुला कडेवर घेतलं, तेव्हा शर्ट भिजवला होतास माझा... आठवतं?' – जुन्या आठवणींनी चाकोला हसू आवरत नव्हतं. त्यानं सोफी मॉलला घट्ट छातीशी कवटाळलं आणि न राहवून लाडक्या लेकीचे मुके घेत सुटला. तिच्या निळसर भुऱ्या निळ्या डोळ्यांचे... 'कीटकशास्त्रज्ञ'छाप नाकाचे... हॅटमधून झेपावणाऱ्या तिच्या लालसर पिंगट केसांचे... प्रेमाचा नुसता पूर उसळला होता. घट्ट मिठी... मिठीवर मिठी आणि मुके... मुकेच मुके.

शेवटी सोफी मॉलचा जीव घुसमटला. श्वास कोंडला, तशी ती नाराजीनं म्हणाली,

'अंऽऽऽ... एक्स्क्यूज मी, आता खाली उतरवशील का मला? असं उचलूनबिचलून मला नाही आवडत.'

– चाकोनं सोफी मॉलला कडेवरून खाली उतरवलं.

त्याच्या फुगलेल्या छातीतली हवा अचानक गेलीय आणि अंगावरचा ढगळ सूट आणखीच बेंगरूळ दिसायला लागलाय, हे अॅम्बॅसिडर इस्थाच्या (हट्टी) डोळ्यांनी पटकन बघून घेतलं.

बॅगा ताब्यात घेण्याच्या सोहळ्यात चाको पार बुडून गेलेला असताना विमानतळावरच्या त्या घाणेरड्या पडद्याजवळ एक वेगळंच नाट्य रंगलं होतं. नंतर कधीतरी येणारा बघून घेण्याचा क्षण अचानकच येऊन ठेपला होता.

...आता मस्त मजा येणार, या अपेक्षेनं लाळ घोटत लुटुलुटु डुलणारा बेबी कोचम्माच्या मानेवरचा तीळ इस्थाच्या नजरेतून सुटला नाही. दिर-दोम...दिर...दोम... चालूच होतं सारखं. आणि सरड्यासारखे रंगही बदलत होते पटापटा... कधी हिरवा, कधी निळसर काळा, तर कधी जर्द पिवळा.

ट्विन्स फॉर टी,

इट वुड बी...

आता मिळेल चांगला धडा, घडेल चांगली अद्दल!

'बास झालं आता,' अम्मू करवादली, 'दोघांनी पुष्कळ दिवे लावलेत. राहेल, मुकाट्यानं

बाहेर ये.'

पडद्याच्या घाणेरड्या आडोशाला डोळे घट्ट म्िटून राहेल निपचित उभी होती. काय काय आठवत होतं तिला... तिची हिरवीकंच नदी, त्यात खूप खोल पोहणारे चमकत्या शेपट्यांचे मासे, स्वच्छ उन्हात उडणाऱ्या मोठमोठ्या पतंगांचे कोळ्याच्या जाळ्यासारखे नाजूक पारदर्शी पंख. वेलुथानं तिला एक मासे पकडायचा गळ बनवून दिला होता... छोट्याशा पिवळ्या बांबूला बांधलेला! पाण्यात वरवर घुटमळणाऱ्या मूर्ख माशांना अगदी अचूक फशी पाडणारा गळ! राहेलला एकदम वेलुथाची आठवण आली. आत्ता तो असता आपल्याबरोबर तर, असंही चटकन वाटून गेलं.

...तेवढ्यात इस्थानं पडदा बाजूला केला आणि राहेल उघडी पडली. सिमेंटचे कांगारू टक लावून बघत होते.

अम्मूनं दोन्ही मुलांकडे एक कटाक्ष टाकला.

बेबी कोचम्माच्या मानेवरच्या त्या लुटलुटत्या तिळाची धडधड सोडली, तर आजूबाजूच्या हवेत पानसुद्धा हलत नव्हतं. स्मशानशांतता असावी असा ताण तेवढा भरून राहिला होता.

'मग?' – अम्मूनं विचारलं.

मोठाच प्रश्न होता... मग?

...आणि काही उत्तरही नव्हतं.

अॅम्बॅसिडर इस्था मान खाली घालून आपल्या बुटांकडे एकटक पाहत राहिला. जिथून ती संतापाची लाट उसळली, तिथले बूट जरा जास्तच चावायला लागले होते. अॅम्बॅसिडर राहेलनं आपल्या बाटा सँडल्सकडे नजर टाकली, तर तिथं भलताच कट चालला होता. सँडलमध्ये उबलेली राहेलची पावलं तिच्या पायांपासून स्वत:ला ओरबाडून, बोचकारून काढत होती. त्यांना ते पाय जणू नकोसे झाले होते. दुसऱ्या कुठल्या पायांना चिकटायला मिळालं तर बरं, असंही वाटत होतं. राहेलला वाटलं, संपलं आता. आपली पावलं निघून गेली आपल्या पायांना सोडून, तर कमरेखालच्या दोन भुंड्या काड्यांना फडकी गुंडाळून लेव्हल क्रॉसिंगवरच्या त्या महारोग्यासारखं बसावं लागणार!

'यापुढं कधीही... ', अम्मूनं सुरुवात केली, 'काय सांगतेय? कधीही चारचौघांच्या देखत तुम्ही माझं ऐकलं नाहीत, तर दोघांचीही बोचकी बांधीन आणि उचलून फेकून देईन एखाद्या बोर्डिंगात. तिथं चांगलं कळेल तुम्हाला, शिष्टाचार म्हणजे काय आणि धड रीतीनं कसं वागायचं असतं ते... कळलं?'

अम्मूचा भडका उडाला, की ती याच शब्दांत धमकवायची नेहमी. चांगलं कळेल तुम्हांला... हे शब्द आले, की काहीतरी भयानक चित्रं नाचायची नजरेसमोर...

'इज दॅट क्लिअर? कळलं?' – अम्मूनं पुन्हा एकवार खुंटा हलवला.

घाबरलेल्या डोळ्यांनी, दचकून थरारलेल्या कारंज्यानं अम्मूकडे टरकून बघितलं.

पेंगुळलेले डोळे आणि विस्कटलेला कोंबडाही अम्मूकडेच बघत होते. टरकून.

दोन माना एकूण तीन वेळा खाली-वर हलल्या.

येस्. इट्स क्लिअर.

कळलं.

संतापानं ठासून भरलेल्या प्रसंगात बऱ्यापैकी जाळपोळीची संधी असताना, बार अगदीच फुसका निघालेला बघून बेबी कोचम्मा वैतागली. मानेला झटका देत नाक उडवत म्हणाली,

'कप्पाळ!'

कप्पाळ. म्हणजे कसलं काय?

अम्मूला कळेना, तिनं बेबी कोचम्माकडे वळून पाहिलं. नजरेत प्रश्न.

'याला काही अर्थय् का?' बेबी कोचम्मा तडतडली, 'कळलं? काय कळलं? लबाड आहेत पोरं तुझी. कपटी-कावेबाज. त्यातून हे असं वाढतं वय. नाही तुझ्या हाताबाहेर गेली, तर बघ. नाव बदलून देईन.'

– नव्या ठिणगीनं पेटलेली अम्मू पुन्हा इस्था आणि राहेलकडे वळली.

'जो तो म्हणायचा, पोरं वाढवायची म्हणजे बाप हवाच त्यांना. एकट्या बाईला काय जमणारैय? पण मी दर वेळी हे उडवून लावलं. म्हटलं, इतरांची असतील; माझी मुलं नाहीत तशी. असं का म्हणायची मी? ठाऊकाय?'

– दोन डोकी पुन्हा वरून खाली हलली.

'सांगा बरं, का म्हणायची मी असं?'

'कारण तू आमची अम्मू आहेस, आणि आमचा बाबा पण. दोघादोघांचं प्रेम तू एकटीच करतेस आमच्यावर.'

– इस्था आणि राहेलनं चाचरत-चाचरत, एकमेकांबरोबर शब्द जुळवत उत्तर दिलं.

'त्यापेक्षाही जास्त. किती? दोघांच्या प्रेमापेक्षा जास्त प्रेम. दुपटीपेक्षाही जास्त. कळलं?', अम्मूचा आवाज वर चढून-चढून काहीसा दुभंगला... चिरला होता, 'म्हणून मी सांगते, ते नेहमी लक्षात ठेवा. लोकांना आपल्याविषयी काय वाटतं, हे फार महत्त्वाचं असतं. त्यांच्या भावना मोलाच्या असतात. चारचौघांदेखत तुम्ही माझं ऐकलं नाही, म्हणजे प्रत्येकाला वाटतं, की वायाच गेली पोरं.'

'कसले तुम्ही भारताचे अॅम्बॅसिडर्स? चांगली लाज राखलीत देशाची' – बेबी कोचम्मानं आणखी डावभर तेल ओतलं.

अॅम्बॅसिडर ए. एल्व्हिस आणि अॅम्बॅसिडर प. पतंग माना लटकावून दुर्मुखल्या चेहऱ्यानं बसून राहिले.

‘...राहेल, आणखी एक गोष्ट...’ अम्मूनं फक्त एकच शिकार पकडली, ‘स्वच्छ आणि घाणेरडा या दोन शब्दांचे अर्थ नीट समजून घेशील, तर बरं. लहान नाही राहिलीस तू आता... घोडी झालीयस चांगली. भारतातच राहायचंय तुला.’

– अॅम्बॅसिडर राहेलनं मान आणखी थोडी खाली घातली.

‘स्वच्छ आणि घाण... म्हणजे कळतंय का, काय ते? तुझा फ्रॉक स्वच्छ आहे. म्हणजे होता. तो पडदा घाणेरडा आहे. ते कांगारूपण तसेच आहेत. आणि तुझे हात. ते पण घाणेरडे.’

स्वच्छ आणि घाण... अम्मू इतक्या जोरजोरानं ठासून बोलत होती, की त्या दोन्ही शब्दांच्या दहशतीनं राहेल घाबरलीच.

‘आता नखरे नकोयत मला. नीट जायचं शिस्तीनं आणि मी शिकवलं होतं त्या पद्धतीनं ‘हॅलो’ म्हणायचं –’ अम्मूनं नवीन फर्मान काढलं, ‘एवढे तरी उपकार करणार आहात का माझ्यावर?’

– दोन डोकी पुन्हा एकदा वरून खाली हलली.

दोनदा.

अॅम्बॅसिडर इस्था आणि अॅम्बॅसिडर राहेल चुपचाप सोफी मॉलकडे निघाले.

‘बोचकी बांधून उचलून फेकीन, म्हणजे काय ग? कसं वागायचं हे शिकवायला कुठे पाठवतात?’

इस्थानं हळूच राहेलला विचारलं.

‘अरे, एवढंपण कळत नाही का तुला? सरकारकडे पाठवतात. रिमांड होममध्ये.’ – राहेल कुजबुजली, कारण तिला हे प्रकरण ठाऊक होतं चांगलंच.

‘हाऊ डु यु डु?’

– अम्मूला ऐकू जावं म्हणून चांगल्या ठणठणीत आवाजात इस्थानं सोफी मॉलचं रीतसर स्वागत केलं.

‘जस्ट लाईक अ लड्डू, वन पिस टू’ – सोफी मॉल पटकन म्हणाली. तिच्या वर्गातल्या एका पाकिस्तानी मुलीनं तिला हे शिकवलं होतं.

आता काय?

इस्था अम्मूकडे पाहत राहिला.

ती चुकली, तर चुकू दे. तू केलंयस ना बरोबर सगळं, मग झालं तर!- अम्मूनं न बोलता नुसत्या नजरेनंच सांगितलं.

– सगळे जण विमानतळावरून ‘पार्किंग’मध्ये उभ्या केलेल्या गाडीकडे निघाले.

जिकडेतिकडे भरून राहिलेले गरम हवेचे झोत सरपटत-सरपटत त्यांच्या कपड्यांमध्ये घुसले आणि नव्याकोऱ्या कुरकुरीत चड्ड्या ओल्या, दमट होऊन गेल्या. आजूबाजूच्या गाड्यांना, टॅक्सीवाल्यांना हात करत-करत मुलं पुष्कळ मागं रेंगाळली होती.

'ती मारते तुम्हांला?' – सोफी मॉलनं हळूच विचारलं.

या प्रश्नातली भानगड नीट न उकलता आलेले इस्था आणि राहेल चपापून गप्पच बसले.

'माझी मारते,' सोफी मॉल झोकात म्हणाली, 'कधीकधी बदडून पण काढते.'

'पण आमची नाही कधी असं करत,' इस्था स्वत:ला सावरून काय बरं दिसेल, ते बोलला.

'च्ऽऽ नशिबवान आहात, बुवा!' – सोफी चुकचुकली.

नशिबवान श्रीमंत मुलगा. शिवाय खिशात पॉकेटमनी. आणि आजीची एवढी मोठी फॅक्टरी... तीही वारसाहक्कानं मिळणार. काय लागतं आणखी? नशिबवान च्यायला.

'विमानतळावरच्या तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेचं एक दिवसाचं लाक्षणिक उपोषण' ओलांडून सगळे सरळ पुढे निघून गेले. त्या लाक्षणिक उपोषणाकडे औत्सुक्यानं बघणारी गर्दीही ओलांडून झाली. सगळे आणखी पुढे निघून गेले.

उपोषणाला पाहण्यासाठी जमलेली गर्दी आणि 'गर्दी जमली' म्हणून जमलेली गर्दी... हे सगळं ओलांडून पुढं गेल्यावर समोर एक बोर्ड दिसला. मोठ्ठ्या वडाच्या झाडाला ठोकलेल्या पत्र्याच्या त्या बोर्डावर रंगवलं होतं – 'सर्व प्रकारच्या लैंगिक समस्यांसाठी कृपया भेटा... डॉ.ओ.के.जॉय.'

'या जगात तुझं सगळ्यात जास्त प्रेम कुणावर आहे?' – राहेलनं सोफी मॉलला विचारलं.

'जो'- जराही विचार न करता सोफी मॉल पटकन म्हणाली, 'माझे वडील. दोन महिन्यांपूर्वीच वारले ते. त्या दु:खातून सावरायलाच आम्ही इथं आलोय, नं?'

'पण मग चाको? तेच तर तुझे बाबा आहेत नं?' – इस्थानं चक्रावून विचारलं.

'हो... पण ते फक्त माझे खरे बाबा आहेत रे!' सोफी मॉल गुंता उकलून दाखवत म्हणाली, 'पण माझे बाबा म्हणजे 'जो.' तेच. ते कध्धी मला मारत नाहीत. कध्धीच नाही.'

'पण ते आता मरून गेलेयत ना? मग तुला कसे मारतील?'- राहेलनं मुद्द्याचा प्रश्न मांडला.

'तुमचे बाबा कुठंयत?' – आता सोफी मॉललाही उत्सुकता लागली होती.

'ते...'- काय सांगावं नक्की, हे न समजून राहेलनं इस्थाकडे बघितलं.

'...इथं नसतात.' – इस्थानं पटकन विषय संपवला.

‘...मी माझी यादी सांगू?... की माझं कुणावर प्रेमेय जास्त...’ राहेलनं प्रस्ताव ठेवला.

‘सांग ना... तुला आवडत असलं, तर खुशाल सांग.’ – सोफी मॉल म्हणाली.

राहेलची ‘यादी’ म्हणजे एकूण कठीणच प्रकरण होतं. हा प्रेमाचा घोळ निस्तरता-निस्तरता दर वेळी बिचारी थकून जाई. खरं ‘प्रेम’ कुणावर आणि प्रेम करणं भागच आहे, म्हणून कर्तव्यापोटी केलेलं प्रेम कुणावर, हे राहेलला कधीच नीट ठरवता येत नसे. त्यामुळं सतत बदलून-बदलून तयार केलेली राहेलची यादी म्हटलं तर होती आणि म्हटलं तर अगदी मनापासून खरी होतीच, असंही नव्हतं.

‘हे बघ, पहिल्यांदा अम्मू आणि चाको,’ राहेल म्हणाली, ‘...आणि नंतर माम्माची.’

‘...म्हणजे आमची आजी –’ इस्थानं लगेच खुलासा दिला.

‘...आणि तुझा भाऊ? तो सगळ्यांत शेवटी?’ – सोफी मॉलनं आश्चर्यानं विचारलं.

‘आम्ही मुळी मोजतच नाही एकमेकांना...’, राहेल उत्तरली, ‘आणि त्यातून अम्मू म्हणते की, एक ना एक दिवस तो बदलणारेय... मग कशाला घ्यायचं त्याला यादीत?’

‘म्हणजे काय? बदलणारेय म्हणजे काय होणारेय त्याचं?’ – सोफी मॉलला काही कळलं नव्हतं.

‘पुरुषप्रधान संस्कृतीचा आंधळा, हट्टी, कर्मठ प्रतिनिधी! अ मेल शॉविनिस्ट पिग.’ – जेवढं लक्षात होतं, तेवढं राहेलनं सांगून टाकलं.

‘नक्की नाही हां. कदाचित. पण नाहीच जवळजवळ,’ इस्थानं आपला इरादा जाहीर केला.

‘बरं ते जाऊ दे, यादी ऐक पुढची. माम्माचीनंतर वेलुथा आणि वेलुथानंतर...’

‘वेलुथा कोण?’ सोफी मॉलनं विचारलं.

‘त्याच्यावर खूप प्रेम आहे आमचं,’ राहेल म्हणाली, ‘आणि वेलुथानंतर तू.’

‘मी? तुम्ही कशाला प्रेम कराल माझ्यावर?’ – सोफी मॉलला आश्चर्यच वाटलं एकदम.

‘म्हणजे काय? आपण आत्ते-मामे भावंडं आहोत नं? मग एकमेकांवर प्रेम न करून कसं चालेल?’ – राहेलनं प्रेमाची रीत समजावली.

‘पण तू तर मला ओळखतसुद्धा नाहीस धड,’ सोफी मॉलचं आश्चर्य अजून संपलं नव्हतं, ‘आणि मुख्य म्हणजे, माझं कुठंय तुझ्यावर प्रेम? आय डोन्ट लव्ह यू.’

‘आत्ता ओळख नाहीये म्हणून प्रेमपण नाहीये; पण एकदा का तुझीमाझी गट्टी जमली, की प्रेम करशीलच ना तू पण!’ – राहेल आत्मविश्वासानं म्हणाली.

‘वाट्टेल ते बोलताय... मला नाही खरं वाटत.’ – इस्थाचा विरोधच होता पूर्ण.

‘का पण? का नाहार वाटत?’ – सोफी मॉलनं विचारलं.

‘कारण सांगू? राहेल ना... ठेंगुबाईच होणारेय. वाढणारच नाहीये तिची उंची.’ इस्था म्हणाला.

म्हणजे राहेल ठेंगुबाई होणार आणि ठेंगू माणसावर कसलं बोडक्याचं प्रेम करायचं?

'मी नाहीच्च होणार ठेंगुबाई' – राहेल वैतागली.

'होच्च मुळी' – इस्था म्हणाला.

'नाहीच्च.'

'होच्च.'

'नाहीच्च... मुळळीच नाही.'

'होच्च मुळी. तू ठेंगुबाईच होणार... बघच...' इस्था सोफी मॉलकडे वळून म्हणाला, 'आम्ही जुळी भावंडं आहोत. तरी बघ ती किती छोटीय माझ्यापेक्षा ते.'

'तू कदाचित थोडीशी उंच ठेंगुबाई म्हणजे बुटकी होशील, राहेल,' सोफी मॉलनं मध्यममार्ग सुचवला, 'म्हणजे उंच माणसापेक्षा थोडीशी ठेंगू आणि ठेंगूबाईपेक्षा थोडीशी उंच.'

...काही वेळ गप्पच बसले तिघेही.

या मध्यममार्गाचं काय करायचं, ते कळतच नव्हतं नीटसं.

'अरायव्हल लाऊंज'मधून बाहेर पडता-पडता लालचुटूक तोंडाच्या एका काळ्या आकृतीनं राहेलकडे बघून आपला सिमेंटचा पंजा हलवला. तो 'निरोप' एकट्या राहेललाच दिसला फक्त. नंतर मग आकाशातून छोट्या हेलिकॉप्टर्सनी गिरक्या घालाव्यात, तसे काही सिमेंटचे मुकेही उडत-उडत राहेलकडे आले.

चमकदार दिव्यांच्या शेपट्या लावलेली निळसर आकाशी प्लायमाऊथ सोफी मॉलकडे बघून छान हसली. चमकत्या खवल्यांच्या अगडबंब शार्क माशानं आपलं अख्खं शरीर सावरत हळूच हसावं... तशी.

...पॅराडाईज पिकल्स कार्सस्माईल...

प्लायमाऊथच्या टपावर बांधलेला भलामोठा बोर्ड, त्यावर रंगवलेली लोणच्याच्या बाटल्यांची चित्रं आणि जॅम-जेली-सरबतांच्या याद्या बघून मार्गरेट कोचम्मा चक्रावलीच. म्हणाली,

'ओऽऽमाय डियरऽऽऽ मला तर वाटतंय की जहिरातच चाललीय. आणि मी इथं जाहिरातीतच उभीय...'

'ओऽऽ माय डियरऽऽऽ'

...ती म्हणाली.

खूप वेळ, खूप वेळा म्हणाली.

'तुम्ही अननसाच्या खारावलेल्या फोडी पण करता, हे नव्हतं माहीत मला,' तिनं

कौतुकानं म्हटलं, 'सोफीला खूप आवडतो अननस. हो नं, सोफी?'

'कधीकधी आवडतो,' सोफी म्हणाली, 'कधीकधी मुळीच नाही आवडत.'

पाठीवर पसरलेलं पिंगट भुऱ्या ठिपक्या ठिपक्यांचं वांग, हातावर पसरलेलं आणखी एक तसलंच ठिपक्याचं जाळं, फुलाफुलांचा ड्रेस आणि त्याच्याखालून डोकावणारे सुबक घाटदार पाय... असा सगळा ऐवज घेऊन मार्गरिट कोचम्मा 'पॅराडाईज पिकल्स'च्या जाहिरातीत शिरली.

मार्गरिट कोचम्मा आणि चाको दोघंही प्लायमाऊथच्या पुढच्या सीटवर बसले. सोफी दोघांची मुलगी; म्हणून अर्थातच ती त्यांच्यामध्ये बसली.

'कमरेत झुकून डौलदार अभिवादनाचं नृत्य कसं करतात, ठाऊकाय?' – सोफी मॉलनं विचारलं.

'नाय् ब्बॉ! आमच्या भारतात असलं नाही काय करत' – अॅम्बॅसिडर इस्थानं स्वच्छ नकार देऊन टाकला.

'आमच्या इंग्लंडमध्ये करतात. मॉडेल्स करतात, टी. व्ही.वर तर सारखंच करतात. हे बघ, असं... सोप्पंय ना?' सोफी मॉलची पावलं हलकेहलके तालात झुलू लागली.

बघता-बघता कमरेत झुकून नाजूक गिरक्या घेणाऱ्या डौलदार नृत्याची झुळूक तिघांच्याही शरीरातून झुळझुळत गेली आणि विमानतळावर नृत्य भरारलं.

'ईगल' थर्मास आणि 'गो गो बॅग्ज' झुलत्या कुल्ल्यांना आपटून डौलात झुलत होते.

तिघांच्या सावल्या एकमेकींच्या हातात हात गुंफून जमिनीवर नाचू लागल्या.

मधूनच चर्चच्या निळ्याभोर आकाशातल्या जेट विमानांच्या सुळसुळत्या चंदेरी शेपट्या प्रकाशाच्या कवडशात, नाचणाऱ्या पतंगाचे थवेच जणू!

सगळ्यांना पोटात भरून आयमेनेमच्या दिशेनं भरधाव निघालेली प्लायमाऊथ इट्टुमन्नुरच्या जवळ आली; तेव्हा तिथल्या रस्त्यावर एक महाकाय हत्ती मरून पडलेला दिसला. खांबावरून सुटून रस्त्यावर झेपावलेल्या विजेच्या जिवंत तारेचा धक्का बसून हत्ती गेला होता. त्याच्या त्या अजस्र मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी इट्टुमन्नुर म्युनिसिपालिटीतल्या एका इंजिनिअरची धावपळ चालली होती. आपल्या हाताखालच्या मजुरांची पलटण नीट काम करतेय, याकडे डोळ्यात तेल घालून त्याचं लक्ष होतं. 'रस्त्यावर मेलेल्या हत्तीचं शासकीय क्रियाकर्म कसं करावं,' याची रीत आणि भविष्यकालीन मार्गदर्शक तत्त्व घालून देण्याची जबाबदारी असल्यामुळे हातात एक फाईल घेऊन तो जोराजोरानं ओरडत होता. या आरडाओरडीच्या, धावपळीच्या आणि मेलेल्या अजस्र शरीराच्या जवळपासच 'जॉय आईस्क्रीम'ची एक हातगाडी आणि जेमतेम आठ-नऊ दाणे मावतील, अशा कागदाच्या सुरनळ्या टोपलीत खोचून शेंगदाणे विकणारा एक माणूस.

‘तो बघ... हत्ती मेलाय...’ सोफी मॉल दचकून म्हणाली.

आयमेनेमच्या देवळातला हत्ती – कोचु थोम्बन – दर महिन्यातून एकदा ‘आयमेनेम हाऊस’मध्ये मानाचा नारळ घ्यायला यायचा. हा तोच तर नव्हे? – अशी शंका आल्यामुळं चाकोनं गाडी थांबवली आणि चौकशी केली; पण सुदैवानं तो कोचु थोम्बन नव्हता.

मेलेला हत्ती ओळखीचा नव्हता, कोचु थोम्बन तर नव्हताच नव्हता... मग मरू दे! मरेना का? म्हणून प्लायमाऊथने आपला रस्ता धरला.

‘थँग गॉड,’ इस्थानं सुस्कारा सोडला.

‘थँक गॉड, इस्था थँग नव्हे’, कोचु मारिया कधीपासून टपलेली होती.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी कच्च्या रबराच्या दुर्गंधीने भरलेले ट्रक उलटसुलट धावत जात-येत होते. हळूहळू त्या अपरिचित वासाची सोफी मॉलला सवय झाली. दूरवरून दुर्गंधी आली रे आली, की नाक घट्ट दाबून धरायचं आणि ‘तो ट्रक’ लांब निघून गेला की, मग मोकळा स्वच्छ श्वास घ्यायचा, हे तंत्रही तिला लवकरच जम्ालं.

बेबी कोचम्माला गाण्याचा मूड आला होता. तिनं सगळयांनाच आग्रह केला.

इस्था आणि राहेलसाठी पुष्कळ वेळानं पुन्हा एकदा नवी परीक्षा उद्भवली होती. आठवडाभर घोटून-घोटून, रंगीत तालमी करून-करून पाठ केलेलं गाणं अगदी पहिल्यांदाच आणि सहज म्हटल्यासारखं आनंदानं, प्रसन्नतेनं म्हणायचं होतं... तेही स्वच्छ, शुद्ध इंग्लिशमध्ये.

अॅम्बॅसिडर ए. एल्व्हिस आणि अॅम्बॅसिडर प. पतंग तयार झाले...

री जॉईस इन द लॉ ऑऽऽऽर्ड ऑं रऽऽऽल्वेज

अॅन्ड अगेन आय से री– जॉ ऑऽऽ ईस

शेपटीवरच्या दिव्यांमध्ये आकाशाचे रंग भरून, डोईवर लोणच्याच्या जाहिराती झळकवत निळी प्लायमाऊथ उन्हानं चटचटणारा रस्ता तुडवीत हिरव्यागार झाडांच्या रांगांमधून धावत होती.

आयमेनेमच्या वेशीवर पोचता-पोचता एकदम अचानक गाडीतले सगळे फिक्या हिरव्या फुलपाखरांच्या दुनियेत धडकले (कदाचित, ते फुलपाखरूच त्यांच्यात धडकलं).

प्रकरण ७

‘विझ्डम एक्सरसाइझ् नोटबुक्स’

पाप्पाचींच्या स्टडीमधल्या काचेच्या शोकेस सप्तरंगी चमकत्या धुळीच्या छोट्या-छोट्या टेकड्यांनी गजबजून गेल्या होत्या. कधीकाळी त्या शोकेसमध्ये टोकदार टाचण्यांनी टाचलेली फुलपाखरं आणि पतंग टाचणीमधून तुटून भुगा भुगा होऊन शोकेसच्या तळाशी निपचित पडले होते. ऐन उमेदीत सुळावर चढवलेल्या पंखांचा निळसट हिरवट भुगा... नग्न आणि क्रूर.

खोलीत जिकडेतिकडे कोंदट बुरशी चढलेली आणि निरुपयोगीपणाचा मद्दड आंबूस वास भरून राहिलेला, एखाद्या प्रचंड थोर साधुमहाराजांच्या मस्तकाभोवतीचं विझून गेलेलं तेजोवलय डळमळत राहावं, तसा एक जुनाट हिरवट दिवा खुंटीवर लटकवलेला. ‘बस्बी बर्कले’च्या नृत्यनाट्यात पाय उंचावून ढुंगण मुरडणाऱ्या आगोचर नर्तिकांसारखे कुल्ले मुरडत खिडकीच्या तावदानांपलीकडून धावणारी काळ्या मुंग्यांची रांग... खालून वर तुरुतुरु पळणाऱ्या त्यांच्या सुंदर आकृत्या.

टेबलावर स्टुल ठेवून वर चढलेली राहेल धुळीच्या थरांनी माखलेल्या काचांची दारं उघडून पुस्तकांच्या कपाटात खूप वेळ काहीतरी उसकाउसकी करत होती. जमिनीवर पसरलेल्या धुळीत तिच्या पावलांचे ठसे रोवलेले... दारापासून टेबलापर्यंत (टेबल ओढून पुस्तकांच्या कपाटापर्यंत नेल्याचे फराटे)... तिथून पुन्हा स्टुलापर्यंत (मग स्टुल टेबलापर्यंत ओढत नेऊन तिथून वर थेट पुस्तकांपर्यंत...).

राहेल खूप वेळ काहीतरी शोधत होती. कडा घासल्या गेलेल्या... कंगोरे

तासले गेलेले... आयुष्याला काही आकार आलेला, ठेवण ठरलेली... डोळ्यांभोवती साकळलेले समजुतीचे, स्वीकाराचे अर्धचंद्र... आणि क्षितिजापार उभ्या असलेल्या होड्यांच्या रांगा... मंद्र गाण्याचे, गुणगुणत्या स्वरांचे गुणगुणते थवे.

पाप्पाचींच्या कपाटातल्या सगळ्यांत वरच्या कप्प्यात ‘द इन्सेक्ट वेल्थ ऑफ इंडिया’ या ग्रंथाचे खंडच्या खंड ठेवलेले. त्या जाडजूड ग्रंथाच्या बांधणीवरचं चामडं उचकटून पन्हळच्या पन्हळ तयार झाले होते आणि भारताची कीटक-संपत्ती वळून वाकून दुमडून पुष्कळशी उघड्यावर पडली होती. कसरीच्या किड्यांनी पानापानांमधून, भारतीय कीटकांच्या वंशपरंपरागत जातीजमातींमधून फिरत-फिरत वर्षानुवर्षांच्या बारीक अभ्यासानं जमवलेली माहिती कुरतडून कुरतडून, पुस्तकभर जिकडे-तिकडे पिवळट भुग्याच्या रांगोळ्या घातल्या होत्या.

जाडजूड पुस्तकांच्या रांगांचे जडजंबाळ अडथळे राहेलनं जोर लावून-लावून बाजूला

केले आणि चाचपून-चाचपून खूपशी गुप्त संपत्ती शोधून काढली.

एक भलामोठा गुळगुळीत शिंपला. अणकुचीदार, शिंगवाला. छोटासा.

कॉन्टॅक्ट लेन्सेस ठेवायची एक प्लॅस्टिकची डबी. आणि नारिंगी किरमिजी रंगाचे चिकट द्रव्य.

सुळावर चढवलेल्या येशू ख्रिस्ताची चांदीची प्रतिमा आणि बेबी कोचम्माची जपमाळ.

राहेलनं ती माळ उचलली आणि समोर धरली. समोरून येणाऱ्या प्रकाशावर हावरेपणानं डल्ला मारून हर-एक मणी चमकू लागला.

जमिनीवरच्या धुळीनं माखलेल्या आयताकृती प्रकाशावर सावली पडली होती.

झगमगत्या प्रकाशमण्यांची माळ हातात घेऊन राहेल पटकन दरवाजाच्या दिशेनं वळली.

'हे बघ, इथेचेय अजून ही माळ. मी चोरली होती... आठवतं? तू परत आलास नं, त्यानंतर...'

– अभावितपणे शब्द निसटून गेला होता...

परत आलास नं, त्यानंतर...

जणू जुळयांच्या नशिबात तेच होतं फक्त... तेवढंच... उधारउसनवारीनं निघून जाणं. आणि मग परत येणं. लायब्ररीतल्या पुस्तकांसारखं.

...पण इस्था ढिम्म हलला नाही. त्यानं राहेलकडं पाहिलंसुद्धा नाही. त्याच्या मनात इकडून-तिकडे धावणाऱ्या रेल्वे गाड्यांचा कर्कश्श कल्लोळ उठला होता. दरवाजातून येणारा प्रकाश अडवून तो तसाच शुंभ उभा राहिला... विश्वाच्या छताडावर पडलेलं इस्थाच्या आकाराचं मोठ्ठं भोकच जणू!

पुस्तकांच्या मागं सापटीत हात घालून शोध-शोध शोधणाऱ्या राहेलच्या बोटांना अचानक काहीतरी धडकलं. तिनं ती वस्तू बाहेर काढली आणि शर्टाच्या बाहीनं स्वच्छ पुसली. प्लॅस्टिकच्या पिशवीत काळजीपूर्वक गुंडाळलेलं आणि सेलोटेपच्या तुकड्यांनी चिकटवलेलं एक छोटंसं सपाट पाकीट. प्लॅस्टिकच्या पिशवीच्या आतून डकवलेल्या एका कागदाच्या चिटोऱ्यावर लिहिलं होतं इस्थापन आणि राहेल. अम्मूचं अक्षर राहेलनं लगेच ओळखलं.

त्या पाकिटात जीर्ण जुनाट झालेल्या चार वह्या होत्या. प्रत्येक वहीच्या कव्हरवर वहीचं नाव –

'विझ्डम एक्सरसाईझ् नोटबुक्स'

आणि त्याच्या खाली एक चौकोन.

नाव –

शाळा/कॉलेज –

इयत्ता –

विषय –

– दोन वह्यांवर राहेलची नावं होती आणि उरलेल्या दोघींवर इस्थाची.

एका वहीच्या मागच्या कव्हरवर ढोबळ्या-ढोबळ्या अक्षरात काहीतरी गिरबिटलेलं राहेलला दिसलं.

अडखळत, धडपडत न वळणाऱ्या कोवळ्या बोटांना वाकवत-वळवत कशीबशी गिरवलेली अक्षरं... लिहिण्याच्या या असह्य युद्धानं घायाळ झालेली अक्षरं आणि शब्दांमधले चित्रविचित्र खड्डे... आणि इकडेतिकडे धावणाऱ्या पेन्सिलवर ताबा मिळवता-मिळवता, पकड बसवता-बसवता उडालेली धांदल दिसत होती स्पष्ट. वहीच्या त्या कव्हरवर लिहिलं होतं –

मिस् मिट्टन नालायक बाई आहे. मला मुळीच आवडत नाही, आणि तिची चड्डी फाटलीय बहुतेक.

वहीच्या वरचा रिकामा चौकोनही इस्थानं पुष्कळच गिरगिटून ठेवला होता. एकतर नावापुढचं आडनाव थुंकी लावून-लावून पुसलेलं. त्यामुळं अर्धं-अधिक कव्हर घाणेरडं. मळकट. त्याच मळकट कागदावर इस्थानं आपल्या नावापुढं पेन्सिलने लिहिलं होतं – अननोन्... माहीत नाही.

इस्थापन अननोन्... माहीत नाही.

(त्याला 'त्याचं असं' आडनाव खरोखरच नव्हतं त्या काळात. नवऱ्याला सोडून आल्यावर नवऱ्याचंच आडनाव ठेवायचं की पुन्हा माहेरचं लावायचं, या घोळाचा चक्का अम्मूनं पुष्कळच दिवस टांगून ठेवला होता.)

'इयत्ता' या शब्दापुढं लिहिलं होतं – सहा वर्षं आणि विषय : कथालेखन.

राहेल पायावर पाय टाकून जरा स्वस्थ बसली (टेबलावर ठेवलेल्या स्टुलाच्या वर... आणि शांत.).

'इस्थापन अननोन्...'

भुवया उंचावून स्वत:शीच पुटपुटत तिने वहीचं पहिलं पान उघडलं आणि मोठ्यानं वाचायला सुरुवात केली.

'युलीसीस घरी परतला त्याचा मुलगा म्हणाला, बाबा, तुम्ही घरी परत याल याची मला मुळी खातरीच वाटत नव्हती. तिथं खूप राजपुत्र आलेले. सगळ्यांनाच पेन लोपशी लग्न करायची इच्छा होती; पण पेन लोप म्हणाली, जो कुणी बारा कड्यांमधून उडी मारून पलीकडं जाईल, तोच माझ्याशी लग्न करू शकेल; पण पेन लोपची ही अट कुणालाही पूर्ण करता आली नाही आणि सगळे राजपुत्र एकामागोमाग एक हरले आणि तेवढ्यात भिकाऱ्याच्या फाटक्यातुटक्या कपड्यांतला युलीसीस राजवाड्यात आला. तो म्हणाला, मी मारतो कड्यांमधून उडी, मला संधी द्या आणि सगळे त्याच्याकडे बघून हसले आणि

म्हणाले, आम्ही हरलो, तर तू काय कप्पाळ उड्या मारणार; पण तेवढ्यात युलीसीसच्या मुलाने सगळ्यांना थांबवलं आणि म्हणाला, संधी तरी देऊन पाहा आणि मग युलीसीसने कमरेत झुकून सगळ्यांना नमस्कार केला आणि तो बारा कड्यांमधून उडी मारून पटकन पलीकडे गेला.'

या गोष्टीच्या खाली आधीच्या गोष्टीतले चुकलेले शब्द सुधारून लिहिण्याची खटपट इस्थाने केली होती –

कधीतरी आणि खटपट उचकपाचक

कधीतरी आणि खटपट उ च क पा च क

कधीतरी आणि खटपट उ क पा च प का

कधीतरी आणि खटपट

– या शुद्धलेखनातली इस्थाची चलाखी बघून राहेलला मनापासून हसू आलं... सोप्पे शब्द कसे पहिल्यांदा लिहिलेत...' तिच्या नजरेतून हा चलाख बारकावा सुटला नव्हता.

अम्मूनं पानावर डाव्या बाजूला एक लांबलचक रेघ ओढून विचारलं होतं,

समास कुठेय?

हस्ताक्षर सुधारणे आवश्यक.

'कोणत्याही शहरातल्या रस्त्यावरून आपण जेव्हा चालत असतो...' जागरूक इस्थाची नवी सावध गोष्ट सुरू झाली होती, ... 'तेव्हा आपण कायम रस्त्याच्या कडेने, फूटपाथवरूनच चाललं पायजे. कारण फूटपाथवर वाहनं येत नाहीत आणि अपघात होत नाहीत. पण मुख्य रस्त्यावरून इतकी वाहनं इतक्या वेगानं धावत असतात, की कोणतंही वाहन कधीही तुम्हांला धडकून ठोसा मारून खाली पाडील... मग तुमचं शरीर राहील फक्त; पण काय होतंय, ते तुम्हाला कळणारच नाही. किंवा मग तुम्ही लंगडे लुळेपांगळे होऊन जाल. तुमचं डोकं फुटलं किंवा हाड मोडलं, तर मग तुम्ही फारच दुर्दैवी. माणसं वाहनांना धडकून कामातून जाऊ नयेत आणि लंगडे-पांगळे होऊन दवाखान्यात जाण्याची वेळ त्यांच्यावर येऊ नये, म्हणून पोलीस वाहनांना शिस्त लावू शकतात. बसमधून उतरताना कंडक्टरला आधी विचारून मगच उतरलं पायजे, नाहीतर मग आपण जखमी होऊ आणि मग डॉक्टरांच्या दवाखान्यातली गर्दी खूपच वाढेल. सगळ्या ड्रायव्हरांचं काम खूपच वाईट असतं. त्यांच्या घरची माणसं खूपच धास्तावलेली असतात. कारण कोणताही ड्रायव्हर कधीही मरू शकतो.'

'किती विकृत होतास, रे, लहानपणी...' पान उलटत राहेल इस्थाला म्हणाली.

पुढच्या पानावर पोचता-पोचता तिचा गळा दाटून आला... मन भरून आलं एकाएकी आणि आवाजही खोल गेला... थरथरला.

इस्थाच्या पुढच्या गोष्टीचं नाव होतं :

– छोटीशी अम्मू.

हस्ताक्षर पुष्कळच सुधारलेलं. काना-मात्रा-वेलांट्या वळणावळणानं नीटस

गुंफलेल्या...

दारातला प्रकाश अडवून उभी असलेली सावली अजूनही तशीच स्थिरचित्त... ढिम्म गोठलेली.

अम्मूसाठी भेट आणायची होती, म्हणून शनिवारी आम्ही कोट्टायमच्या दुकानात गेलो, कारण की, सतरा नोव्हेंबरला अम्मूचा वाढदिवस असतो. आम्ही तिच्यासाठी एक डायरी आणली आणि लगेचच गुपचुप लपवून ठेवली. त्यानंतर लगेच रात्र झाली. मग आम्ही तिला विचारलं की, तुझ्यासाठी आम्ही काय भेट आणलीय ती बघायला तुला आवडेल का? तर अम्मू म्हणाली की, 'हो आवडेल'. मग आम्ही एक छोट्याशा कागदावर लिहिलं, की 'आमच्या प्रिय, छोट्याशा अम्मूला इस्था आणि राहेलकडून सप्रेम भेट' आणि मग आम्ही ती डायरी अम्मूला दिल्यावर अम्मू खूप खूश झाली आणि म्हणाली, की खूपच मस्तैय भेट, कारण मला हवीच होती अशी एक डायरी. नंतर मग थोडा वेळ आम्ही तिघांनी गप्पा मारल्या. आम्ही डायरीबद्दल पण खूप बोललो आणि नंतर नेहमीप्रमाणे अम्मूचे खूपखूप मुके घेतले आणि नंतर झोपायला गेलो.

मग मी आणि राहेलनं थोड्याशा गप्पा मारल्या आणि मग आम्ही झोपून गेलो. झोपेत आम्हांला छोटंसं स्वप्नपण पडलं.

थोड्या वेळानं मला जाग आली, तेव्हा मला तहान लागलेली होती, म्हणून मी अम्मूच्या खोलीत गेलो आणि म्हणालो, की मला तहान लागलीय. अम्मूनं मला दिलेलं पाणी पिऊन मी आमच्या खोलीत निघालोच होतो, तेवढ्यात अम्मूनं मला परत बोलावलं आणि म्हणाली, की आज माझ्याजवळच झोप. मी अम्मूच्या पाठीवर झोपलो आणि तिच्याशी थोड्या गप्पा मारून नंतर मग झोपून गेलो. पुन्हा थोड्या वेळाने मला जाग आली, तेव्हा मी परत अम्मूशी गप्पा मारल्या आणि मग आम्ही दोघांनी मध्यरात्रीच्या मेजवानीवर मस्त ताव मारला. केळी आणि संत्री खाल्ली आणि कॉफी प्यालो. मग राहेल आली. राहेल आल्यावर आम्ही आणखी दोन केळी खाल्ली आणि अम्मूचे मुके घेऊन तिच्यासाठी गाणी म्हटली. कारण की तो तिचा वाढदिवस होता. मध्यरात्रीनंतर सुरूच झाला होता वाढदिवस. नंतर मग सकाळी अम्मूनं आम्हा दोघांना भेटी दिल्या, कारण की तिने आमच्यासाठी नवेनवे कपडे आणले होते. ते कपडे घालून राहेल महाराणी बनली आणि मी छोटा नेहरू.

अम्मूनं चुकीचे शब्द दुरुस्त करून दिले होते आणि खाली लिहिलं होतं,

'मी कुणाशीही बोलत असताना फारच तातडीचं काम असलं, तरच मला हाक मारावी. अशी हाक मारताना दर वेळी न विसरता 'एक्स्क्यूज मी' म्हटलंच पाहिजे. माझी सूचना पाळली गेली नाही, तर मी कडक शिक्षा करीन, हे नीट लक्षात ठेव. आणि तुझ्या चुका लगेचच दुरुस्त करून टाक.'

बिचारी अम्मू.

तिने स्वत:च्या चुका मात्र कधीच दुरुस्त केल्या नाहीत.

तिला तिचा बाडबिस्तारा आवरून, सगळ्या स्वप्नांना मूठमाती देऊन निघून जावं लागलं. तिच्या 'असण्याला' काही 'अर्थच' उरला नव्हता. आणि 'अधिकार' तर नव्हताच तिच्याजवळ. चाकोनं तर तिला उडवूनच लावलं. म्हणाला, 'झाला एवढा तमाशा पुरे. काय वाट लागायची, ती लागलीच आहे पुरती.'

अम्मू आयमेनेममध्ये आली, ती जीव घायाळ करणारा अस्थमा सोबत घेऊनच. दूरवरून कुणाच्या तरी किंकाळ्या ऐकू याव्यात, तशी तिच्या छातीमधली घरघर आणि आतडी पिळवटून टाकणारा ठो-ठो खोकला.

इस्थाने अम्मूचं हे असलं रूप कधी पाहिलंच नव्हतं.

घरघरणारी... हिंस्र चेहऱ्यानं कळवळणारी... आजारी आणि दु:खानं पिचलेली.

याआधी अम्मू आयमेनेममध्ये आली, तेव्हा शेणाच्या गोळ्याला फुलांनी सजवल्याबद्दल आणि मैत्रिणींच्या छातीवरच्या उंचवट्यांशी धडकाधडकी केल्याबद्दल नाझरेथ कॉन्व्हेन्टमधून नुकतीच राहेलची हकालपट्टी झाली होती. नोकऱ्यांमागून नोकऱ्या शोधून थकलेल्या अम्मूला नव्या मालकांनी हाकलून दिलं होतं. एका फालतू हॉटेलात 'रिसेप्शनिस्ट' म्हणून काम करता-करता अम्मू आजारी पडली आणि बरेच दिवस कामावर खाडे झाले, म्हणून नोकरी सुटली, ती सुटलीच. 'आज आहे, तर उद्या नाही', असली रोगट रिसेप्शनिस्ट आमच्या काय उपयोगाची?'– असं ऐकवून त्या हॉटेलवाल्यांनी अम्मूच्या हाती नारळ ठेवला.

शेवटच्या भेटीत अम्मूनं राहेलजवळ बसून तिच्याशी खूप गप्पा मारल्या. अख्खी सकाळ आपल्या लेकीबरोबर घालवली. शेवटच्या तुटपुंज्या पगारातून अम्मूनं राहेलसाठी चॉकलेटी कागदात गुंडाळलेल्या छोट्या-छोट्या भेटी आणल्या होत्या... चमचमता चॉकलेटी कागद आणि त्यावर चिकटवलेली छोटी छोटी रंगीबेरंगी हृदयं. लांबुडक्या चॉकलेटचं एक पाकीट, फॅन्टम पेन्सिलींचा बॉक्स आणि 'पॉल बनयान'ची कॉमिक्स. सहा-सात वर्षांच्या मुलीसाठी असाव्यात, तशा या भेटी अम्मूनं अकरा वर्षांच्या राहेलसाठी आणल्या होत्या. माणसाचं अस्तित्वच वाऱ्यावर उधळून देणाऱ्या काळाच्या वेगाला जणू विटली होती ती. तिला थांबवून धरायचं होतं, ते भिरभिरतं चक्र. गोठवून ठेवावासा वाटत होता क्षण न् क्षण आणि जुळ्या मुलांच्या आयुष्याशी आपण पुन्हा जोडून घ्यावं स्वत:ला, असंही वाटत होतं. असं ठरवलं मनापासून, तर ते जमेल आपल्याला; असा विश्वास न कळे कुठून उगवला होता तिच्यात! मनात आणलं, तर आपल्या मुलांचं करपणारं लहानपण थोपवून धरू आपण, आणि एकदा का मुलांना बरोबर घेऊन स्वतंत्र राहण्याची ऐपत आली की, जिथं थोपवून धरली, तिथून पुन्हा सुरू होईल सारी कहाणी... असं वाटत होतं तिला. विश्वासही होता ठाम. स्वत:वर. स्वत:च्या इच्छाशक्तीवर.

अम्मूनं इस्थासाठीही कॉमिक्स आणली होती. तिनं राहेलला हळूच सांगितलं, की

‘त्याच्याकरतासुद्धा आणलंय.’ पण अम्मूनं लपवून ठेवलं होतं ते पुस्तक. दुसरी नोकरी मिळाली आणि तिघांच्या संसाराचे हातपाय पसरण्यापुरती एखादी खोली भाड्यानं घेतली, की मग अम्मू कोलकात्याला जाणार... इस्थाला आपल्याबरोबर घेऊन येणार आणि मग त्याला त्याचं पुस्तक देणार, असं ठरलं होतं. अम्मू म्हणाली, ‘तो दिवस काही फार लांब नाही. बघता-बघता दिवस जातील आणि नवा सूर्य उगवेल.’ मग पैसे मिळतील. एकत्र राहण्याचा आणि खोलीचं भाडं देण्याचा प्रश्न सुटेल. तिला खातरीच होती, की असं होईल. असंच होईल.

अम्मूनं संयुक्त राष्ट्रसंघात नोकरीसाठी अर्ज केला होता. ‘ती नोकरी मिळाली, तर आपण सगळेच हेगमध्ये राहू आणि एखादी डच आया तुमच्या तैनातीसाठी असेल,’ असंही अम्मू परत-परत सांगत होती. ते नाहीच जमलं, तर भारतातच राहायचं आणि एखादी शाळा सुरू करायची, असंही अम्मूनं ठरवून टाकलं होतं. संयुक्त राष्ट्रसंघात नोकरी की शैक्षणिक क्षेत्रातली कारकीर्द, याचा निर्णय करणं सोपं नव्हतंच अम्मूसाठी... पण ती म्हणाली,

‘निवड करण्यासाठी दोन-दोन पर्याय उपलब्ध असणं तरी कुठं कमी आहे? हे म्हणजे मोठंच अहोभाग्य... नव्हे का?’

– आवाज खोल गेलेला होता तिचा आणि डोळ्यांत कसलीशी विचित्र चमक...

पण अजून निवड होत नव्हती. नक्की काय करायचं, ते ठरत नव्हतं. हा निर्णय होईपर्यंत इस्थासाठी घेतलेल्या भेटी तशाच ठेवून द्यायच्या, असं अम्मूनं ठरवलं होतं.

त्या सकाळी अम्मू अखंड बोलत राहिली. उत्तरं द्यायचा अवसरसुद्धा न देता राहेलवर प्रश्नामागून प्रश्नांची फैर झाडत राहिली. राहेलनं एखादा शब्द बोलायचा अवकाश, अम्मू तत्क्षणी तिला अडवत होती. लगेच नवा प्रश्न... नव्या शंका आणि चौकशा. आपली लेक चुकून एखाद्या जाणत्या बाईसारखं बोलून बसली आणि गोठवून ठेवलेलं तिचं लहानपण वितळून गेलं भराभर... तर? या नुसत्या शक्यतेनं अम्मूचा थरकाप उडाला असणार... म्हणून तर एकसारख्या तिच्याच प्रश्नांच्या आणि तिच्याच उत्तरांच्या फैरींची चकमक झडत होती. मनात कोंडलेल्या भीतीच्या भयाण लाटेनं उरल्यासुरल्या शब्दांना ढकललं होतं बाहेर आणि अम्मू अखंड अविरत बडबडत होती. शब्दामागून शब्द गळत होते...

कॉर्टीझॉनचे डोस घेऊन-घेऊन अम्मू सुजली होती पार. सगळं तेज उतरलेलं... चेहराही पार गळून गेलेला... राहेलच्या नजरेत, मनात साठून राहिलेली पूर्वीची नाजूक, सडपातळ अम्मू कुठल्याकुठं चिणली गेली होती. आणि तिच्या शरीरावर चढले होते मांसाच्या गोळ्यांचे डोंगर. लस टोचलेल्या दंडावर सुरकुतलेल्या कातडीचे चकचकीत गोलसर डाग उमटावेत, तशी तिच्या गब्बू गालांवरची त्वचा खेचून, फाटून सुरकुतली होती. ती हसली, की गालांवरच्या दुखावल्या खळ्या असह्य वेदनांनी आक्रसून जात.

खांद्यावरून खाली झेपावणाऱ्या अम्मूच्या कुरळ्या केसांचा खळखळता डौलही आटून गेला होता पार. दरवाजाच्या बोडक्यावर जुनाट मळके पडदे लोंबावेत, तसे तिचे केस सुजवट, मंद चेहऱ्याच्या दोन्ही बाजूंनी टांगलेले दिसत. मनगटाभोवती फाटकीतुटकी जुनाट हँडबॅग आणि त्यात एका काचेच्या नळीत भरून ठेवलेले श्वास. नाकाला झिणझिण्या आणणारा बदामी धूर. तिचं अशक्त, मरतुकडं फुफ्फुस पिळवटून-पिळवटून श्वासभर हवेसाठी आक्रोश करी आणि आतून बसणारे पोलादी ठोसे त्याला आणखी घुसमटून, कोंडून टाकत. एकेक श्वास घ्यायचा म्हणजे अम्मूला तुंबळ युद्धच करावं लागत होतं. क्षणाक्षणाला चालणारं, हेलपाटून टाकणारं हे भयंकर श्वास-युद्ध राहेल नजर रोखून पाहत राहिली. मोठ्या मुश्कीलीनं आईच्या फुफ्फुसात शिरणारा एकेक श्वास तिला दिसत होता. हँडबॅगमधली काचेची नळी नाकात खुपसून त्यातले कृत्रिम, धुरकट श्वास अम्मूनं प्राण पणाला लावून आत ओढून घेतले, की तिच्या गळ्याच्या दोन्ही बाजूंचे खड्डे एकदम खोल जात आणि मग हलके-हलके भरून येत.

...अम्मूला एकाएकी जोराची उबळ आली. तिनं तोंडापुढं रुमाल धरला आणि जीव एकवटून त्यात खाकरली. घशात चोंदून राहिलेला कफाचा चिकट ओला गोळा बुदकन् रुमालात पडला.

अम्मूच्या हातातला कफानं रुमाल भरलेला बघून काहीशा जडावल्या घोगरट आवाजात राहेल म्हणाली,

'नीट बघतेस ना तू? लक्ष ठेवलं पाहिजे नीट. दर वेळी तपासून पाहिलं पाहिजे.'

...जणू काही तो कफाचा गोळा म्हणजे गणिताच्या परीक्षेतली उत्तरपत्रिकाच. शेवटची देऊन टाकण्यापूर्वी एकदा नीट बारकाईनं पाहून घेतली, म्हणजे बरं.

'हे बघ, पांढरा असेल ना कफ, तर समज की तो पिकलेला नाही; पण पिवळट झाला असेल आणि वरून घाणेरडा वासही आला तर, मग तो पिकलाच. म्हणजे मग खाकारून-खाकरून थुंकलाच पाहिजे बाहेर. फळ असतं ना एखादं, कच्चं किंवा पिकलेलं; तसंच हे! फक्त नीट लक्ष ठेवून तुला ओळखता आलं पाहिजे.'

दुपारचं जेवण झाल्यावर सुजवट विचित्र आवाजात 'एक्स्क्यूज मी' म्हणत अम्मूनं एखाद्या ट्रक-ड्रायव्हरसारखी लांबलचक ढेकर दिली. तिच्या भुवयांमध्ये लांबलचक राठ केस कुठून उगवले, राहेलला समजेना. तळलेला मासा उचलून अम्मूनं त्याचे काटे खेचून काढले; आणि टेबलाभोवती अचानक पसरलेल्या शांततेची जाणीव होऊन मंद हसली. मग म्हणाली,

'रस्त्यावर डावीकडे उजवीकडे बाणांचे बोर्ड लावतात आणि त्यावर पक्षी शिटतात ना, तशी झालीय माझी अवस्था.'

तिच्या डोळ्यांत पुन्हा एकदा ती विचित्र चमक झळझळत आली. तापानं

फणफणणारी आणि दु:खानं चमकणारी.

माम्माचीला काय वाटलं अचानक, कोण जाणे. ती अम्मूला म्हणाली,

'दारूबिरू पितेस की काय? राहेलला भेटणं कमी कर पहिल्यांदा. काही गरज नाहीये.'

– अम्मू खाडकन उठून उभी राहिली.

– आणि एक शब्दही न बोलता ताट सरकवून जेवणाचं टेबल सोडून निघून गेली.

'ऊठ... तिला खोलीत पोचवून ये'- चाको राहेलला म्हणाला.

पण जणू काही ऐकलंच नाही, अशा थाटात राहेल शांतपणे जेवत राहिली. जेवता-जेवता अचानक तिला अम्मूच्या हातरुमालातला चिकट गोळा आठवला आणि ओकारीच आली. शी!... अंगावर पाल पडावी, तशी अम्मूविषयीची किळस सरसरून उभी राहिली आणि राहेलच्या अंगावर द्वेषाचे शहारे फुटले. तिच्या मनात अम्मूची घृणा भरून राहिली काठोकाठ... तिरस्कार!

...त्या क्षणी सगळं संपलं आणि...

पुढं राहेल कधीच अम्मूला भेटली नाही.

अलेप्पीच्या भारत लॉजमधल्या एका धुरकट, कोंदट खोलीत अम्मूनं अखेरचा श्वास घेतला.

कुठल्याशा फडतूस माणसाच्या सेक्रेटरीची नोकरी मिळवण्याकरता म्हणून ती अलेप्पीला गेली होती. तिथल्या भारत लॉजमध्ये ती मेली. एकटीच. डोक्यावर फक्त एक घरघरता पंखा, पाठीवर झोपून तिच्याशी गप्पा मारायला इस्थासुद्धा नव्हता जवळ. मेली, तेव्हा अम्मू एकतीस वर्षांची होती. ना धड म्हातारी... ना धड तरुण. कदाचित जगतोसुद्धा येईल, कदाचित मरावंसुद्धा लागेल, असं अर्धवट वय.

त्या रात्री अम्मूला पुन्हा तेच... नेहमीचंच स्वप्न पडलं, म्हणून ती खडबडून उठली. कुणी एक पोलीसवाला हातातली कचकचीत कात्री वाजवत तिच्या केसांचे तुकडे-तुकडे करतोय ... आणि कापलेल्या केसांचा पायांशी हाऽऽ ढीग. कोट्टायमच्या बाजारात वेश्या पकडल्या, की धारदार कात्रीनं पोलीस त्यांची डोकी भादरून टाकत. एकदा का डोकी तासली; की सगळ्यांना कळेल, या बायका काय लायकीच्या आहेत. कसले धंदे करतात... वेश्या साल्या! म्हणजे मग नव्यानं ड्यूटीवर हजर झालेल्या पोलीसवाल्यांना नव्यानं बायका शोधायचा त्रास नको. कुणाशी 'धंदे' करायचे, ते कळतंच आपोआप. अशा जबरदस्तीनं डोकी तासलेल्या, शून्य नजरेनं फिरणाऱ्या बायका कोट्टायमच्या बाजारात अम्मूला नेहमी दिसत. तेल लावून वेण्या घातलेल्या लांबसडक केसांचा अधिकार फक्त उच्चकुलीन आणि नीतिमान बायकांनाच होता.

एका अनोळखी शहरातल्या अनोळखी लॉजमध्ये त्याहून परक्या पलंगावर बसून अम्मू रात्रभर ढासत राहिली. आपण कुठं आहोत, काय चाललंय; तिला काही कळत नव्हतं...

धपापल्या काळजात फक्त भीती. तिची सोबत अखेरपर्यंत नव्हती सुटली.

मध्यरात्र उलटल्यावर तिच्या छातीत कोंडलेला तो कर्कश आवाज अचानक किंचाळायला लागला. घुसमटून टाकणाऱ्या पोलादी ठोशांनी तिचं फुप्फुस चोहोबाजूंनी घेरलं. आता काहीच थांबणं शक्य नव्हतं. श्वासांच्या लढाईतला तुंबळ रक्तपात वाढत...वाढतच गेला. आणि तिच्या गळयाभोवतीचे खड्डे पाकोळयांच्या सावल्यांनी झाकोळून गेले.

सकाळी झाडूवाल्यानं दार उघडलं, तेव्हा कळलं. अम्मू शांत झोपली होती. त्यानं खटका दाबून पंखा बंद केला.

अम्मूच्या एका डोळयाखाली निळसर उंचवटा साचून राहिलेला. एखाद्या बुडबुड्यासारखा गोठलेला. फुफ्फुसांनी हात टेकल्यानंतर तिच्या त्या डोळयानं कदाचित लढवलं असणार श्वासांचं युद्ध. मध्यरात्र उलटून गेल्यानंतर पुष्कळ वेळानं तिच्या छातीतून ठो-ठो बोंबलणारा तो आवाज एकाएकी थांबला. नंतर मग कधीतरी मेलेल्या झुरळाचं शव पाठीवरून वाहून आणणारी मुंग्यांची रांग दाराच्या फटीतून अम्मूच्या खोलीत शिरली आणि संथ, गंभीर पावलांनी पुढंपुढं सरकत राहिली... कुणाचं तरी शव कुणीतरी वाहून नेणं भागच असतं ना?

अम्मूचे अंत्यसंस्कार करायला चर्चनं साफ नकार दिला. कारणं पुष्कळ. म्हणून मग चाकोनं एक शववाहिका भाड्यानं घेतली आणि अम्मूला विद्युतदाहिनीत न्यायचं ठरलं. अम्मूचं निश्चल शरीर एका घाणेरड्या मळकट चादरीत गुंडाळून स्ट्रेचरवर ठेवण्यात आलं. राहेलला वाटलं, एखाद्या रोमन सम्राटासारखीच दिसतेय आपली अम्मू! यू टु, अम्मू! राहेलला एकदम इस्था आठवला आणि हसू आलं.

मेलेल्या रोमन सम्राटाचं शव गाडीत घालून गजबजत्या रस्त्यांवरून वाट काढणं म्हणजे विचित्रच होतं. निळया आकाशात एकाएकी खिन्न, उदास छटांचं जाळं पसरलं. शववाहिकेच्या बंद खिडक्यांपलीकडल्या जगाचे व्यवहार कालच्यासारखे आजही चालू होते. माणसांचं जाणं-येणं... हसणं-खिदळणं...रडणं-रुसणं...प्रेम आणि द्वेष... सगळं तेच. तसंच. कागदी बाहुल्यांनी पाठीशी बांधलेल्या कळसूत्राच्या हिसक्याबरोबर हलत राहावं, तसं.

...पण खरं जीवन होतं बंद खिडक्यांच्या आत. मरून पडलेलं... कधीचं. रस्त्यावरच्या खड्ड्यांना धडकून उसळत हिंदकळत अम्मूच्या शरीराचा प्रवास चालला होता. शववाहिकेच्या तळाशी असलेल्या एका लोखंडी खिळयाला आपटून डोक्याला खोक पडली, तरी अम्मूला जाग आली नाही. दचकणं नाही, घाबरणं नाही, उठून बसणं नाही...

फक्त निर्विकार, शांत झोप.

राहेलच्या डोक्यात, कोण जाणे, कुठून काय शिरलं... त्याची गुणगुण ऐकत-ऐकत तीही असून नसल्यासारखी झाली... शांत, स्थिरचित्त, आतल्याआत मिटलेली. पुढं अख्ख्या दिवसभर तिला काही सांगायचं, म्हणजे चाकोला वैतागच झाला. कारण राहेल ऐकत होती... आणि नव्हतीही.

स्मशान.

स्मशान कसलं, घाणेरडं ओंगळवाणं रेल्वे स्टेशनच होतं ते. तिथं माणसांचे लोंढे नव्हते फक्त. आणि जाणाऱ्या-येणाऱ्या धडधडत्या गाड्यांचा कलकलाट. रस्त्यावरचे नागडेउघडे भिकारी, पोलीस कोठडीत मरणारी माणसं आणि इतर उपेक्षित केरकचरा माणसांसाठीच होतं ते स्मशान. बाकीचे उच्चवर्णीय मृतदेह तिकडं चुकुनसुद्धा फिरकत नसत. पाठीवर झोपून गप्पा मारणारं कुणीच जवळ नसताना एकेकट्यानं मरणारी माणसं फक्त मेल्यावर त्या स्मशानात येत.

अखेर अम्मूची वेळ आली.

राहेलचा हात घट्ट पकडून चाको उभा होता. तिला अजिबात नको होते हातात हात. म्हणून मग स्मशानातल्या मरणबिंदूंचा घाम जमवून-जमवून चाकोच्या पकडीतून तिनं सटकन आपला हात सोडवून घेतला. त्या दोघांखेरीज कुटुंबातलं बाकी कुणी नव्हतंच तिथं.

धुरकटलेल्या भट्टीचं स्टीलचं दार करकरत उघडलं. काही काळासाठी गप्प झालेल्या आतल्या ज्वाळा कंबर कसून उठल्या आणि नवा घास घेण्यासाठी लाल लाल जिभा वेळावत पुन्हा वर झेपावल्या. उपासमारीनं खंगलेल्या रानटी पशूनं खूप दिवसांनी मिळालेल्या सावजावर झडप घालावी, तशी अधाशी आग भडकली. राहेलच्या अम्मूचा घास त्या जनावरच्या तोंडात हलकेच सारला गेला. तिचे केस... तिची त्वचा... आवाज, हसणं... गालांवरच्या खळ्या... रात्री मुलांना थोपटून झोपवताना ती किपलिंगचं 'जंगलबुक' वाचून दाखवायची. वी बी ऑफ वन ब्लड; यू अँड आय ...मुलांवर आसुसून प्रेम करण्याची तिची ती पद्धत... रात्री झोपण्यापूर्वीचे मुके... ती एका हातानं राहेल आणि इस्थाची हनुवटी वर उचलायची आणि दुसऱ्या हातानं त्यांच्या केसांचे भांग पाडून द्यायची... गालांवर रुतलेली तिची ती प्रेमळ बोटं आणि तिनं विंचरलेले केस... राहेल कपडे घालायला लागली, की हातात चड्डी धरून समोर उभं राहाण्याची तिची ती धावपळ... डावा पाय, उजवा पाय, हे आणि असंच खूप काही मटकावून भट्टीत गाडलेल्या त्या रानटी जनावराच्या धगधगीत ज्वाळांच्या जिभा शांत झाल्या.

राहेल आणि इस्थाची अम्मू... तीच त्यांची अम्मू होती आणि त्यांचा बाबा पण. तिनं दुप्पट प्रेम केलं दोघांवर.

कर्कश आवाज करीत भट्टीचं दार बंद झालं. एकही डोळा अश्रूंनी भिजला नाही.

स्मशानातल्या अंत्यसंस्कारांचा 'इन्चार्ज' असलेला माणूस कधीचा चहा प्यायला गेलेला. अर्धा तास उलटला, तरी परतला नव्हता. अम्मू नसली, तरी तिची राख गोळा करणं भागच होतं. आणि त्या 'इन्चार्ज'नं पावती फाडून दिल्याशिवाय ते कसं जमणार? – म्हणून मग त्या गुलाबी चिटोऱ्यासाठी चाको आणि राहेलला झक्कत थांबून राहणं भागच होतं... अम्मूची राख. तिचे अवशेष... तिच्या हाडांमध्ये ठासून भरलेली जिद्द आणि हसताना चमकणारे तिचे दात... हे सगळं एका मातीच्या बुडकुल्यात ठासून ठासून भरलेलं... पावती क्रमांक क्यू – ४९८६७३

कुठली राख नक्की कुणाची आहे, हे स्मशानवाल्यांना कसं काय कळतं? – असा प्रश्न राहेलला खूप वेळापासून पडला होता. तिनं सहज चाकोला विचारलं, तर तो तिरसटून म्हणाला,

'असेल काहीतरी त्यांची सिस्टिम!'

– इस्था असता बरोबर तर अम्मूच्या राखेची पावती त्यानं स्वत:जवळच ठेवून घेतली असती. असले सगळे संदर्भ जुळवून, जमवून ठेवण्याचं वेडच होतं त्याला. बसची तिकिटं, बँकेच्या पावत्या, रोख खरेदीच्या पावत्या, चेकबुकांची उरलीसुरली चौकोनी थोटकं... असं काय-काय जमवायचा तो आणि ठेवायचा स्वत:जवळ! त्या संदर्भांच्या जंजाळातच रहायचा.

पण इस्था नव्हता. त्याला न बोलावलेलंच बरं, असं ज्यानं-त्यानं ठरवूनच टाकलं होतं... सगळं आटपलं की मग लिहू पत्र! माम्माची म्हणाली, की राहेलनंच इस्थाला कळवलेलं बरं. पण काय कळवायचं? आणि लिहायचं तरी काय?

प्रिय इस्था, तू कसा आहेस? मी ठीक आहे.

कालच अम्मू मेली?

– राहेलनं इस्थाला काहीच लिहिलं नाही. काय लिहायचं? कशाला? आणि कुणाला?

आपण आपल्यालाच कुठं पत्र लिहितो?

...आपल्याच पायांना किंवा केसांना... किंवा आपल्याच हृदयाला काय कळवायचं पत्र लिहून?

ना धड तरुण, ना धड म्हातारी अशा अर्ध्यामुर्ध्या वयातली राहेल पाप्पाचींच्या स्टडीमध्ये खूप वेळ बसली होती... कोंडलेलं मन आणि धुळीनं माखलेले पाय... हातातलं 'विझ्डम एक्सरसाईझ् नोटबुक्स' बाजूला करून तिनं वर पाहिलं, तर 'इस्थापन-अननोन्' कधीच निघून गेला होता. दरवाजाची चौकट रिकामी. सावलीच्या जागी भगभगीत प्रकाश.

राहेल स्टुलावरून टेबलावर, टेबलावरून जमिनीवर उतरली आणि व्हरांड्याच्या दिशेनं धावली.

...समोरच्या फाटकातून निघून जाणाऱ्या इस्थाची पाठ दिसली तेवढीच!

भल्या सकाळी आकाशात भरून आलेल्या ढगांनी वातावरण कोंडलेलं. पावसाची चिन्हं दिसत होती. ओथंबलेली सर कोसळण्यापूर्वीचा तो विचित्र, भयानक प्रकाश –

दूर कुठूनतरी कोंबड्याची बांग कानी आली. बुरशी चढलेल्या जुनाट बुटाचं चामडं सोलून काढावं, तसा त्या कोंबड्याचा आवाज फाटत, दुभंगत गेला आणि थांबला.

स्टडीमध्ये सापडलेल्या जुन्यापान्या वह्या हातात घेऊन राहेल खूप वेळ उभी होती. जुन्या घराच्या त्या लांबलचक व्हरांड्यांत... भुसा भरून भिंतीवर लटकवलेल्या रानटी गव्याच्या बटबटीत मुंडक्याखाली.

...अनेक वर्षांपूर्वी आयमेनेममध्ये आलेल्या सोफी मॉलच्या स्वागताचा समारंभ – वेलकम होम, अवर सोफी मॉल – साजरा झाला होता, तिथंच.

...गोष्टी बदलतात. एका दिवसात. खरंच बदलतात.

प्रकरण ८
‘वेलकम होम, अवर सोफी मॉल’

‘आयमेनेम हाऊस’. भलंमोठं, प्रचंड घर. पिढ्यान्पिढ्यांची वास्तू; पण तिच्या नजरेतला त्रयस्थ परकेपणा पुसला नव्हता अजून. आपल्या अंगाखांद्यांवर राहणाऱ्या, वाढणाऱ्या, म्हाताऱ्या होणाऱ्या लोकांच्या आयुष्यांशी काही देणंघेणंच नसावं, अशा थाटात ते घर मख्ख बसून असे. लहान मुलाच्या उत्साहानं ओसंडून वाहणाऱ्या खेळाकडे बघत-बघत एखाद्या म्हाताऱ्यानं आयुष्याच्या क्षणभंगुरतेची जपमाळ ओढावी आणि रसरसून जगण्याच्या या अवखळ मोहावर वर्तमानाची बुरशी चढली की क्षणात सगळा खेळ आटपेल, म्हणून डोळ्यांवर कातडं ओढून बसावं, तशी ती वास्तू बसलेली असे. मख्ख. म्हातारी. डोळ्यांच्या कडेने गळणारी चिकट घाण... आणि भोवती घोंघावणाऱ्या माश्या.

छप्पर ठिकठिकाणी कमरेत वाकलेलं आणि पावसापाण्यात धुवून-धुवून शेवाळ्यानं माखलेलं. छपराच्या डुगडुगत्या पाख्यांना आतून आधार म्हणून चांदईला लागून लाकडाचे त्रिकोण ठोकले होते. त्या जंजाळातून आत येणारा प्रकाश तुकड्यातुकड्यांनी विखरून जमिनीवर पडे. एकमेकांमध्ये मिसळणाऱ्या, जोडून पुन्हा तुटणाऱ्या... विलग होणाऱ्या त्या झगमगीत कवडशांमध्ये कसली कसली गुपितं भरभरून ओसंडताना दिसत. कधी भेसूर लांडगे... कधी डोलणारी फुलं... कधी खोबणीत पाय रोवून सरकणाऱ्या घोरपडी. सकाळी आकाशात चढलेला सूर्य दिवसभराचा गोलाकार प्रवास संपवून संध्याकाळी ठरल्या वेळी क्षितिजाशी प्राण सोडेपर्यंत

जमिनीवरच्या कवडशांचे खेळच खेळ.

‘आयमेनेम हाऊस’च्या प्रत्येक दरवाजाला दोनाऐवजी चारचार झडपा होत्या. त्याही चांगल्या मजबूत. सागवानी लाकडाच्या. जुन्या काळात बायकांची भारी सोय व्हायची. खालच्या दोन झडपा बंद करून टाकल्या, की वरच्या फळीवर कोपर टेकवून दाराबाहेरच्या विक्रेत्यांशी मनसोक्त हुज्जत घालता येई. म्हणजे कमरेच्या खालचं विश्वरूप दर्शन घडवण्याची भानगडच नको. छातीवर पदर तेवढा ओढून घेतला, की गालिच्यांपासून बांगड्यांपर्यंत वाट्टेल ती खरेदी करायला बायका मोकळ्या. कमरेच्या खाली काही असलंच उघडंवाघडं, तरी कशाला कोण बघतंय?

अंगणात पोचवणाऱ्या रस्त्यापासून पुढे नऊ पायऱ्या चढून गेलं, की भलामोठा व्हरांडा. त्या पायऱ्यांचं झोकदार वळण भलतंच रुबाबाचं. वर चढलं, की रंगमंचावर आल्यासारखंच वाटायचं आणि नंतरची प्रत्येक हालचाल, बोलणंचालणं म्हणजे एखाद्या महानाट्याचा प्रयोगच! रंगमंचाच्या उच्चस्थानावरून सभोवार नजर फिरवली, की बेबी

कोचम्माच्या बागेचा गोलाकार पसारा... बागेला लगटून वळणावळणांनी वर चढणारा लाल मातीचा रस्ता आणि तळाशी नजर पोचली की, छोटीशी, टुमदार टेकडी... त्या टेकडीवरच 'आयमेनेम हाऊस' नावाची ती म्हातारी, मख्ख वास्तू उभी होती... गेली कित्येक वर्षं.

त्या लांबलचक व्हरांड्यात काय जादू होती, नकळे. आत गेलं, की थंडगार वाटे. बाहेर भाजून काढणारं ऊन असलं, तरी आतला गारवा तसाच. अगदी भर माध्यान्हीसुद्धा उन्हाची झळ यायची नाही आत.

जमिनीवरची लालचुटूक सिमेंटची फरशी अजून चमकत होती. कित्येक वर्षांपूर्वी जमीन केली, तेव्हा तब्बल नऊशे अंड्यांमधला पांढरा बलक काढून सिमेंटमध्ये मिसळला होता. त्याची चमक अजून उतरली नव्हती.

व्हरांड्यातल्या भिंतीवर लटकावलेल्या भुसा भरलेल्या गव्याच्या मुंडक्याखाली वेताची खुर्ची टाकून माम्माची बसली होती. बटबटीत डोळेवाल्या त्या गव्याच्या दोन्ही बाजूंना टांगलेल्या तिच्या सासू-सासऱ्यांच्या तसबिरी... समोर एक वेताचं बसकं टेबल. त्या टेबलावर हिरव्या काचेची फुलदाणी... त्यातून वळून बाहेर आलेली ऑर्किडच्या फुलांची एकच काडी.

दुपार कलली, तरी उन्हाचा कडाका ओसरला नव्हता. शिवाय गरम, उष्ण हवेत खूप वेळापासून कोंडून राहिलेली प्रतीक्षा... तगमग होत होती.

हातातल्या जुनाट व्हायोलिनवर हनुवटी टेकवून माम्माची किती वेळ बसलेली. डोळ्यांवर काळ्या काचांचा आणि चमकते खडे बसवलेल्या फ्रेमचा गॉगल. कांजी घालून कडक केलेली, सुगंधानं घमघमणारी, जरीच्या किनारीची पांढरी साडी... कानांमध्ये लटकवलेल्या झुंबरासारखी लखलखणारी हिऱ्यांची कुडी... हाताच्या नाजूक बोटात अडकवलेली थोडीशी सैलसर सोन्याची अंगठी आणि तीवर चमकणारं लालचुटूक माणिक. एके काळी सुदृढ तेजानं चमकणारी माम्माचीची उजळ त्वचा आता उकळून थंड झालेल्या दुधावरच्या सायीसारखी सुरकुतली होती... शिवाय त्या सुरकुत्यांवर छोट्या छोट्या तिळांची तांबूस नक्षी. माम्माची सुंदरच दिसत होती. विलक्षण सुंदर. थकलेली, पण तरीही शरीरावरचं राजस तेज टिकवून असलेली.

...व्हायोलिन कवेत घेऊन बसलेली वृद्ध विधवा आई.

ऐन तरुण वयातच माम्माचीनं आपल्या म्हातारपणाची तयारी सुरू केली होती. भविष्यात आपल्या मस्तकावरच्या सौंदर्याला ओहोटी लागणार, हे योग्य वेळी जोखून तिनं गळणारे केस एका छोट्या, नक्षीदार पर्समध्ये साठवायला सुरुवात केली. केसांनी भरत-भरत जाणारी ती पर्स तिच्या ड्रेसिंग टेबलावरच ठेवलेली असे. पुरेसे केस साठल्यानंतर तिनं त्या केसांचा एक अंबाडा बनवून घेतला आणि दागिन्यांच्या फडताळात

कुलूपबंद करून ठेवून दिला. अगदी अलीकडे तिचे केस पांढरे झाले आणि गळून-गळून जेमतेम उंदराच्या शेपटीएवढे उरले; तेव्हा माम्माचीनं तो कुलपात ठेवलेला अंबाडा वापरायला सुरुवात केली. पांढऱ्या स्वच्छ विरळ केसांच्या आत तो काळ्याभोर केसांचा अंबाडा आकड्यांनी टाचला, की तिच्या अशक्त केसांना जरा वजन येई. शेवटी अंबाडा खोटा असला, तरी त्यातले केस तिचेच होते. त्यामुळं यात काही बनवेगिरी आहे, असं माम्माचीला चुकूनसुद्धा वाटत नसे. रात्री झोपताना टाचलेल्या पिना काढून आतला अंबाडा सोडवला, की तिच्या खऱ्या केसांची सुतळ पाठीवर विखरून पडे. मग माम्माची आपल्या नातवंडांना बोलवी आणि त्यांच्याकडून त्या तेलकट, वळयावळयांच्या केसांची उंदराची शेपटी बांधून घेई. खाली एक रबर लावला, की झालं. आजीच्या शेपटीशी खेळायला मिळालं, की नातवंडं पण खूश असत. एकानं आजीची वेणी घालायची आणि एकानं तिच्या अंगावरचे मोजताच येणार नाहीत इतके असंख्य तीळ मोजायचे. रोज दोघांच्या पाळया बदलायच्या. एकदा वेणी... दुसऱ्यांदा तीळ.

माम्माचीच्या म्हातारऱ्या टाळूवरचे चंद्रकोरीच्या आकाराचे खोल व्रण एकाएकी उघडे पडले होते. उरलेसुरले केस पसरून ती त्या खुणा लपवण्याचा आटोकाट प्रयत्न करी. इतिहासजमा झालेल्या लग्नातल्या जुनाट मारहाणीच्या खुणा... पितळी फुलदाणी उचलून तिच्या डोक्यात हाणल्याच्या... हिंस्र, क्रूर आठवणींच्या खोल रुतलेल्या खुणा. हँडेलच्या 'वॉटर म्युझिक' मधल्या 'लेन्टमेन्ट'च्या सुरावटीचे तुकडे माम्माचीच्या व्हायोलिनमधून पाझरत होते.

माम्माचीच्या डोळयांवर चढवलेल्या काळया गॉगलमागचे निरुपयोगी, फुटके डोळे मिटलेले असले; तरी कवेतल्या व्हायोलिनमधून निघून गेलेले, परके झालेले सूर तिला दिसत... उतरत्या संध्याकाळी आपल्याला सोडून जाणाऱ्या सुरांचा आकाशभर झालेला धूरही तिला आंधळया डोळयांनी बघता येत असे.

माम्माचीच्या अंधाऱ्या, आंधळया दुनियेत दुसरं काही उरलंच नव्हतं. काळेकुट्ट पडदे ओढून घेतलेली एक कोंदट खोली. बस्स!

व्हायोलिनवर बोट फिरवता-फिरवता अचानक माम्माचीला खूप वर्षांपूर्वीचे दिवस आठवले. तिच्या फॅक्टरीत तयार झालेली (व्यावसायिक) लोणच्याची पहिलीवहिली बॅच! किती सुंदर दिसायच्या त्या बाटल्या. सकाळी उठल्या-उठल्या पहिल्यांदा त्यांचंच प्रसन्न दर्शन व्हावं, त्यांनाच स्पर्श करता यावा, म्हणून माम्माचीनं अगदी आपल्या उशागतीच ठेवल्या होत्या. त्या रात्री माम्माची अंमळ लवकरच अंथरुणावर पडलेली; पण मध्यरात्र उलटल्यावर अचानक तिला जाग आली. आपलं लोणचं कुठंय, म्हणून तिने अंधारातच चाचपडून पाहिलं, तर तिच्या हाताला तेलाचा तवंगच लागला. लोणच्याच्या बाटल्यांभोवती अक्षरश: तेलाचं तळंच साचलं होतं. सगळीकडे तेलच तेल. थर्मासच्या

खाली... बायबलच्या खाली. पलंगाशेजारच्या टेबलावरची प्रत्येक गोष्ट तेलानं माखली होती. लोणच्यातल्या आंब्यांनी भराभरा तेल प्यालं. बघता-बघता ते फुगले आणि बाटल्या तडकून गळायला लागल्या होत्या.

'घरगुती लोणची कशी घालावीत,' याबद्दलचं एक पुस्तक चाकोनं आणलं होतं. माम्माचीनं घाबर्‍या-घाबर्‍या त्या पुस्तकाची पानं उलटून पाहिली; पण काही उपयोग झाला नाही. शेवटी तिनं अन्नमा चंडीच्या दिराला पत्र लिहिलं. तो मुंबईतल्या 'पद्मा पिकल्स'मध्ये बर्‍याच मोठ्या हुद्द्यावर 'विभागीय व्यवस्थापन' म्हणून नोकरीला होता. त्यानं माम्माचीला कळवलं, की लोणचं नासू नये म्हणून तुम्ही त्यात जी रसायनं घालता, त्यांचं प्रमाण वाढवा आणि मीठही जरा जास्तच घाला. त्यामुळं माम्माचीच्या लोणच्याचा प्रश्न पुरता सुटला नाही, पण एकूणात या सूचनेचा बराच फायदा झाला. आज इतक्या वर्षांनंतरही 'पॅराडाईज पिकल्स'च्या बाटल्या थोड्याथोड्या का होईना, पण गळतच होत्या. काय, कुठून चुकतं, काही कळायचं नाही, पण जरा लांबचा प्रवास झाला, की बाटल्यांवरची लेबलं तेलकट होत आणि आतलं लोणचं लेबलातून अगदी आरपार दिसे. शिवाय सगळी लोणची चवीला अंमळ खारट असत, ते वेगळंच...

बाटलीतून न गळणारं आणि अजिबात खारट न होणारं लोणचं घालण्याची हुकमी, हातखंडा पाककृती आपल्याला कधीतरी जमेल का?... आणि सोफी मॉलला नक्की काय आवडेल?... बर्फ घातलेलं द्राक्षाचं सरबत... की ग्लासात मस्त चमकणारा जांभळाचा ज्यूस?... माम्माची खूप वेळ हाच विचार करत बसली होती.

...नंतर एकाएकी तिला मार्गरिट कोचम्माचा चेहरा आठवला आणि तिचं डोकं तडकलं. सुस्त, निरुत्साही सुरांनी पाझरणार्‍या व्हायोलिनमधून अचानक कर्कश सुरांच्या रागीट आरोळ्या उसळल्या.

खरं म्हणजे, मार्गरिट कोचम्मा काळी की गोरी, तेसुद्धा माम्माचीला धड ठाऊक नव्हतं. दोघींची भेटच नव्हती झाली; पण तरीही त्या अनोळखी स्त्रीबद्दलच्या तिरस्कारानं माम्माचीचं मन काठोकाठ भरलं होतं. कुठल्यातरी कुडमुड्या दुकानदाराची मुलगी एवढीच तिच्या दृष्टीनं मार्गरिट कोचम्माची ओळख, आणि तीच, तेवढीच किंमत!

माम्माचीच्या जगात माणसांच्या 'ओळखी' याच रीतीनं नोंदवल्या जात. एखाद्या आमंत्रणावरून ती कोट्टायमच्या एखाद्या लग्नाला गेली, तरी जो भेटेल, त्याच्यापुढे एकच रेकॉर्ड सुरू होई... नवरीच्या आईचे वडील माझ्या वडिलांकडे सुतारकाम करीत... कुंजुकुट्टी आयपेन... आठवतो? त्याच्या पणजीची बहीण त्रिवेंद्रममध्ये साधी सुईण होती. घरोघरी जाऊन बायकांची बाळंतपणं करी... ही जी टेकडी दिसते ना संपूर्ण, ती अख्खी माझ्या नवर्‍याच्या कुटुंबाच्या मालकीची होती...'

दिवसभर तेच. माम्माचीचा अख्खा वेळ या अशाच बडबडीत जायचा.

अर्थात, मार्गरिट कोचम्मा दुकानदाराची मुलगी होती, याला फारसं काही महत्त्व नव्हतं. ती इंग्लंडच्या राजघराण्याची एकुलती एक वारसदार असती, तरीसुद्धा माम्माचीनं तिचा तिरस्कारच केला असता. मार्गरिट कोचम्मा कोण, कुठली, कुठल्या वर्गातली आहे, यापेक्षा ती 'चाकोची बायको' आहे (म्हणजे होती), हे एकच कारण माम्माचीच्या संतापाला पुरेसं होतं. मार्गरिट कोचम्मा चाकोला सोडून गेली, म्हणून माम्माचीनं तिचा प्रचंड तिरस्कार... अगदी राग राग केला; पण ती चाकोबरोबर राहिली असती तर कदाचित दुप्पट तिरस्कार आणि चौपट राग तिच्या वाट्याला आला असता.

पितळेची फुलदाणी उचलून बायकोच्या टाळक्यात हाणण्यासाठी रागारागानं उगारलेला पाप्पाचींचा हात चाकोनं मागच्या मागं धरून पिरगळला (आणि धुमसत्या पाप्पाचींनी आत्मक्लेश म्हणून आपली आवडती खुर्ची मोडून तोडून ठार मारली.), त्या दिवसापासून माम्माची चाकोची उपकृतच झाली काहीशी. तिनं आपलं पातिव्रत्य गुंडाळून ठेवलं आणि पोटच्या लेकावर सगळा जीव ओतायला सुरुवात केली. मग चाकोच तिच्यासाठी 'सर्व काही' झाला. तिच्या प्रेमाला पात्र असणारा एकमेव पुरुषोत्तम.

पुढे फॅक्टरीतल्या बायकांशी चाकोचे 'संबंध' जुळल्याच्या वार्ता कानांवर यायला लागल्या, तरी माम्माचीनं त्याला अवाक्षरानं जाब विचारला नाही. असल्या गोष्टी मुळीसुद्धा मनावर घ्यायच्या नाहीत, या निर्धारानं ती गप्पच बसली. एकदा अतिच झालं म्हणून चाकोच्या बाहेरख्यालीपणाच्या गोष्टी कानांवर घालून बेबी कोचम्मानं विषय काढला; तेव्हा आतून काहीशी घाबरलेली माम्माची घुम्म बसून राहिली. काही वेळानं नीट शब्द जुळवून शांतपणानं म्हणाली,

"मग तो तरी काय करील? पुरुष आहे शेवटी. वयही तरुण आहे. त्याच्या शरीराच्या गरजा असणारच!"

आश्चर्य म्हणजे माम्माचीचा हा खुलासा बेबी कोचम्मानं तत्काळ मान्य करून टाकला. इतक्या वर्षांनी का असेना; पण 'माणसाच्या शरीराला भुका लागतात आणि त्या भागवल्या गेल्या पाहिजेत,' ही गोष्ट 'आयमेनेम हाऊस'मध्ये विनातकरार मान्य झाली; यातला गूढ थरार काही वेगळाच होता.

मार्क्सवादाची नशा चढलेलं चाकोचं साम्यवादी मन आणि केवळ सरंजामशाहांनाच शोभणारा त्याचा स्वैर बाहेरख्यालीपणा यात काही विरोधाभास आहे, हे माम्माची आणि बेबी कोचम्मा या दोघींपैकी कुणाच्याही लक्षातसुद्धा आलं नाही. त्यांना फक्त नक्षलवाद्यांची भीती वाटे. एखाद्या उच्चकुलीन पुरुषानं आपल्या हाताखालच्या मजूर बायकांशी संबंध ठेवून त्यांची पोटं फुगवली, तर नक्षलवादी जबरदस्तीनं त्या मजूर बायकांशी मालकांची लग्नं लावून देत. त्यामुळं घराण्याची प्रतिष्ठा कायमची बेचिराख करून टाकणारं भयानक क्षेपणास्त्र कधी कुठल्या अनोळखी कोपऱ्यातून सणसणत येईल,

काही सांगता येत नसे. त्या भीतीनं माम्माची आणि बेबी कोचम्मा – दोघीही मनातून धास्तावलेल्या होत्या.

...माम्माचीनं चाकोच्या खोलीसाठी बाहेरच्या बाहेर उघडेल, अशा एका स्वतंत्र दाराची व्यवस्था करून टाकली. त्याच्या शरीराच्या भुका मिटवण्यासाठी येणारी प्रेमपात्रं बाहेरच्या बाहेर येतील आणि आपलं काम आटपून बाहेरच्या बाहेर निघून जातील. उगीच घरात त्यांचा वावर नको, म्हणून माम्माचीनं भानगड कायमची मिटवून टाकली. एवढंच नव्हे, तर ओघळल्या शरीरानं चाकोच्या खोलीबाहेर पडणाऱ्या प्रत्येकीच्या हातात काही नोटा घातलेलं एक पाकीटही ती हळूच सरकवून द्यायला लागली... त्यांची खुशी सांभाळलेली बरी, नंतर उगीच कटकट नको. त्या बायकाही गुपचूप पाकिटं घेत आणि कच्चाबच्चा पोरांची, उपाशी आईबापांची आठवण करून ब्लाऊजच्या मधल्या खळगीत सरकवून देत... शिवाय त्यांचे नवरे. अख्खी कमाई दारूत उडवून वर बायकोला बडवणारे. त्या मारानं दुखावल्या शरीराला हे चार भिंतीआडचं सुख बरं. शिवाय वरून पाकीट. ही व्यवस्था माम्माचीसाठीही फारच सोयीची होती. केल्या कामाचं दाम चुकवलं, की विषय मिटला. म्हणजे चाको करतो, तो केवळ संभोग... प्रेम नव्हे. गरज वेगळी आणि भावना वेगळ्या. चाको भागवतो, ती त्याच्या शरीराची गरज. त्याच्याशी भावनांचा काही संबंध नाही. म्हणून घेतल्या कामाचं दाम चुकवलं, की बरं.

...पण मार्गरिट कोचम्मा हे जरा जास्त गुंतागुंतीचं, क्लिष्ट, किचकट प्रकरण होतं. तिनं फक्त एकदा कोचु मारियाला मध्ये घालून चाकोच्या पलंगपोसावरचे डाग शोधून पाहायचा प्रयत्न केला होता. बाकी तिला फार भोचक उत्सुकता नव्हती; पण माम्माचीला राहवेना. मार्गरिट कोचम्मानं पुन्हा एकदा चाकोशी शरीरसंबंध सुरू केले तर? तिचा कोण भरवसा देणार?... या सटवीला चाकोच्या पलंगावर झोपण्यापासून कसं रोखता येईल, याचा विचार करून-करून माम्माचीच्या डोक्याचा पार भुगा झाला, तर तिला खातरीचा मार्ग सुचेना. मग मार्गरिट कोचम्मा आयमेनेममध्ये असेपर्यंत धोब्याला देण्यासाठी बाजूला काढलेल्या तिच्या झग्यांच्या खिशांत 'पाकिटं' सरकवून माम्माचीनं आपल्या मनाची समजूत घालायला सुरुवात केली. मार्गरिट कोचम्मानं त्यातला एक पैसाही कधी परत केला नाही, कारण तिला माम्माचीची पाकिटं मुळी मिळतच नव्हती. कपडे न्यायला अनियान आला, की तो नेहमीप्रमाणे सगळ्या कपड्यांचे खिसे उलटेपालटे झटकून रिकामे करायचा. हे न कळण्याएवढी माम्माची शुंभ नव्हती; पण मार्गरिट कोचम्मा आपल्या नकळत आपल्या मुलावर काही 'विशेष उपकार' करतच असेल, तर त्याची किंमत आपण चुकवतोय आणि मार्गरिट कोचम्मा काही बोलत नाही, म्हणजे तीदेखील केल्या कामाचा मोबदला बिनबोभाट स्वीकारतेय, असं त्रैराशिक मांडून माम्माचीनं आपल्या मनाला लागलेल्या टोचणीचा पक्का बंदोबस्त करून टाकला होता.

चाकोच्या खोलीला असणाऱ्या स्वतंत्र दारातून आत येणाऱ्या आणि ओघळत्या शरीरानं बाहेर पडणाऱ्या इतक्या बायका आहेत... त्यांतलीच एक मार्गरिट कोचम्मा! हे गणित जमवल्यावर माम्माचीच्या जिवात जीव आला. म्हणून ती खूश, वरच्या वर होणाऱ्या रोजच्या कमाईमुळं अनियान धोबी खूश... आणि ही काय भानगड चाललीय यातलं काहीच माहीत नसल्यामुळं मार्गरिट कोचम्मा तर अत्यानंदातच न्हाऊन निघालेली!

विहिरीच्या खोल खोबणीत लपून बसलेल्या घुबडानं हळूच आपले गडद तपकिरी पंख इकडून-तिकडे चाळवले.

चोरलेल्या साबणाचा तुकडा चिकटून कावळ्याच्या चोचीला फेसच फेस आला होता.

धुरानं कोंडलेल्या अंधाऱ्या स्वयंपाकघरात चवड्यांवर उभी राहिलेली कोचु मारिया एका भल्यामोठ्या केकवर आयसिंगची नक्षी काढत होती. गोलाकार आधार लावून एकावर एक दोन केक ठेवलेले. त्यावर लिहिलं होतं,

'वेलकम होम, अवर सोफी मॉल'

खरं म्हणजे, त्या काळात सीरिअन ख्रिश्चनांच्या बहुतेक बायकांनी साडी नेसायला सुरुवात केली होती; पण कोचु मारिया हट्टानं होती तशीच राहिली. कमरेभोवती गुंडाळलेलं पांढरं मुंडू, मागं ढुंगणावर निऱ्या काढून केलेला घड्याघड्यांचा कापडी पंखा आणि वर अर्ध्या बाह्यांचा, त्रिकोणी गळ्याचा पांढरा ब्लाऊज-चट्टा. कोचु मारियानं आपल्या कमरेभोवती स्वयंपाकिणीसाठी असतो तसा निळ्या-पांढऱ्या चौकड्यांचा अॅप्रन बांधलाच पाहिजे, असा माम्माचीचा आग्रह होता. त्या अॅप्रनआडून तिच्या ढुंगणावरचा तो पंखा मुळी दिसायचाच नाही.

कोचु मारियाचे दोन्ही हात जाडजाड आणि काहीसे आखूड होते. बोटं अगदी धबधबीत. नाक फताडं आणि दोन्ही नाकपुड्या जाडजूड सांडग्यांसारख्या सदैव फुललेल्या... नाकापासून हनुवटीकडे धावणाऱ्या लोंबत्या वळ्या... आणि दुभंगलेला चेहरा चिकटवलेल्या डोक्याचा हा एवढा ढोल. जीवशास्त्राच्या प्रयोगशाळेत फॉर्मेलिनच्या द्रावणात तरंगणारा मानवी गर्भ बाटली फोडून बुळुक्कन बाहेर यावा आणि वाढत्या वयाबरोबर घट्टघट्ट होत जावा, तशी कोचु मारिया दिसे.

तिच्या छातीवरचे गोळेही भलतेच मोठेमोठे होते. ते फार ओघळू नयेत आणि लोकांच्या डोळ्यांत येऊ नयेत, म्हणून कोचु मारिया चोळीची गाठ आवळून, करकचून, बांधून टाकायची. त्या दोन गोळ्यांच्या मधल्या घामट खड्ड्यात कायम छोट्यामोठ्या नोटा खोचलेल्या असत. कानांत लोंबणारे सोन्याचे कुनुक्कु चांगले जड आणि भारीभक्कम. कुनुक्कुच्या भारानं लोंबणाऱ्या कानाच्या पाळ्या कोचु मारियाच्या मानेभोवती सदैव

लुटलुटत आणि मेरी-गो-राऊंडमध्ये बसून खिदळणाऱ्या मुलांसारखे दोन्ही कुनुक्कु मजेत हिंदकळत राहत. या कुनुक्कुच्या वजनानं ओघळलेली उजव्या कानाची पाळी एकदा फाटली पण होती पूर्ण. डॉ. वर्गीस आले आणि कानाला टाके घालून शिवून गेले; पण कोचु मारियानं कानांतले कुनुक्कु काही काढून ठेवले नाहीत. महिन्याला फक्त पंच्याहत्तर रुपड्यांसाठी स्वयंपाकिणीची नोकरी करण्याची वेळ आपल्यावर आली असली, तरी आपण मुळात एका प्रतिोqष्ठत सीरिअन ख्रिश्चन घराण्यातली बाई आहोत, हे कुनुक्कु घातल्याशिवाय लोकांना कसं कळणार? – याची भलतीच धास्ती कोचु मारियाच्या मनात होती. काही झालं, तरी ती काही पालायार, पारायार, पारावार किंवा पुलियार नव्हती. चांगली उच्चवर्णीय, उच्चजातीय ख्रिश्चन! टी-बॅगमधून पाझरणाऱ्या चहासारखा ख्रिश्चन धर्म पाझरत-पाझरत उतरला होता तिच्यात. म्हणून कुनुक्कु न घालून कसं चालेल? त्यापेक्षा फाटक्या कानाची पाळी शिवून घेणं केव्हाही परवडलं.

आपल्या मनात दबा धरून बसलेल्या टी. व्ही.च्या व्यसनाची ओळख कोचु मारियाला अजून पुरती पटली नव्हती. तिला त्याला अर्थच लावता येत नव्हता. तिनं आजतागायत टेलीव्हिजनचा सेट पाहिलेला नव्हता. टी. व्ही. नावाचं काही प्रकरण अस्तित्वात आहे, यावर तिचा विश्वास बसणंच मुळात कठीण होतं. कुणी तसं नुसतं सुचवलं असतं, तरी 'माझ्या अडाणीपणाची टिंगल करतोस काय?' म्हणून कोचु मारिया त्याच्या अंगावर सरळ धावूनच गेली असती. आजूबाजूची माणसं बाहेरच्या जगाबद्दल काय-काय बोलतात, याकडे तिचं बारकाईनं लक्ष असे. आपण अडाणी, भोळसट आहोत, म्हणून जो तो आपल्यासमोर वाट्टेल त्या गोष्टी बोलून येता-जाता आपला पाणउतारा, अपमान करतो, अशा कल्पनेनं कोचु मारिया नेहमीच आतल्या आत धुमसत असे; पण आता तिनं असं आतल्या आत जळफळणं सोडून दिलं होतं. ती उघडउघड प्रत्येकाशी वाद घाली आणि कुणी काहीही म्हटलं, की ते सरळ धुडकावून देई. कशावर विश्वास म्हणून ठेवायचा नाही, असं तिनं ठरवूनच टाकलं होतं.

काही वर्षांपूर्वी... कधीच्या तरी जुलैत कोचु मारियाशी बोलता-बोलता राहेल सहज म्हणाली, की

'नील आर्मस्ट्रॉंग नावाचा एक अंतराळवीर चक्क चंद्रावर पोचला आणि तिथं चाललासुद्धा!'

ते ऐकून कोचु मारिया उपहासानं हसली आणि राहेलची खिल्ली उडवीत म्हणाली,

'ओ, मुथुच्चेन नावाचा एक मल्याळी डोंबारी नाकात पेन्सिली घालून सूर्यावर गेला आणि तिथं कोलांट्या उड्या मारून आला... ठाऊकेय?'

'अमेरिकन' माणसांना तिनं कधीच पाहिलं नव्हतं. तरीही अशी कुणी माणसं अस्तित्वात असतीलही कदाचित, इतपत मानायला कोचु मारिया तयार होती. अगदी

नील आर्मस्ट्रॉंग हे नाव कानाला थोडं विचित्र वाटलं, तरी या नावाचा कुणी माणूस या पृथ्वीवर आहे, इतपत तिला मान्य होतं; पण चंद्रावरून चालणं वगैरे तिच्यासाठी एकदम फालतू आणि बकवास गोष्टी होत्या. सरळ-सरळ थापाच. कोचु मारियाला पेपर वाचता येत नव्हता; पण नील आर्मस्ट्रॉंग चंद्रावरून चालतोय, असा एक धुरकट फोटो मल्याळम मनोरमामध्ये छापून आला, तरीही कोचु मारियानं तिकडे ढिम्म लक्ष दिलं नाही.

'यू टू... कोचु मारिया?' असं म्हणून धाडकन उभ्याच्या उभा आडवा होणारा इस्था इंग्रजीतून आपला अपमानच करतो, याबद्दल तर कोचु मारियाची अगदी पक्कीच खातरी पटली होती. तिला वाटे, 'यू टू... कोचु मारिया?' म्हणजे, 'हलकट. नालायक काळीकुट्ट ठेंगु कोचु मारिया'असंच काहीतरी असणार. ती योग्य संधीची वाट पाहत होती. संधी मिळाली रे मिळाली, की ताबडतोब इस्थाचा हा नालायकपणा माम्माचीला सांगून टाकायचा, असं तिनं ठरवूनच टाकलं होतं.

उंचच उंच केकवर सगळीकडं आयसिंग करून झालं होतं. कोचु मारियानं हुश्श केलं आणि मान चांगली वर करून हातातल्या नळीतलं उरलंसुरलं आयसिंग जिभेवर पिळलं. कोचु मारियाच्या गुलाबी जिभेवर चॉकलेटी टूथपेस्टसारखी वेटोळी वेटोळी खूप वेळ गळत राहिली. तेवढ्यात व्हरांड्यात बसलेल्या माम्माचीची खणखणीत हाक आली,

'कोचु मारियाऽऽऽ गाडीचा आवाज येतोयसा वाटतो, गोऽऽऽ'

कोचु मारियाचं तोंड आयसिंगनं शिगोशीग भरलं होतं. तिला काही उत्तरच देता आलं नाही. तिनं भराभरा आयसिंग मटकावलं, दातांवरून जीभ फिरवली... काहीतरी आंबटचिंबट खाल्ल्यावर जिभेनं 'मिट्ट...मिट्ट' आवाज करावेत, तशा मिटक्या मारल्या आणि कमरेच्या अॅप्रनला हात पुसत ती बाहेर पळाली.

दूरवरून निळसर आकाशी आवाज कानांवर येऊ लागले होते. बस स्टॉप मागं गेला... मग शाळा... मग ते पिवळं चर्च ओलांडत-ओलांडत खाचखळग्यांमधून दणके खात लालचुटूक रस्त्यावरून रबराच्या झाडांमधून पळत-पळत आवाज आणखी जवळ येत होता. पॅराडाईज पिकल्सच्या कोंदट इमारतीत त्या आवाजाची कुणकुण पोचताच जो तो आपापल्या हातांतली कामं टाकून आवाजाकडे कान लावून बसला. रस काढणं, चकत्या कापणं, फोडी काढणं, उकळणं आणि ढवळणं, किसणं, खारवणं, सुकवणं आणि वजन करून बाटलीत भरणं सगळंच खट्कन थांबलं.

'चाको सार वान्नूऽऽ'

जिकडे-तिकडे एकच कुजबुज पसरली. चाकू-सुऱ्या जागच्या जागी थांबल्या. मोठ्या-मोठ्या स्टीलच्या थाळयांमध्ये अर्धवट चिरलेल्या भाज्या, कडवट भोपळे आणि अननसाचे कप तसेच पुढं सारले गेले. बोटांवर चढवलेल्या रंगीबेरंगी (निरोधसारख्या) टोप्या

उचकटून काढत मंडळी उठली. लोणच्यात गुंतलेले हात धुवून कमरेच्या निळ्या अॅप्रनना फटाफट पुसले गेले. इकडेतिकडे विस्कटलेल्या केसांच्या बटांवर बोटं फिरली आणि त्या पुन्हा जागच्या जागी बसून बुचड्यात शिरल्या... अॅप्रनच्या आत गुडघ्यांपर्यंत वर ओढून खोचलेल्या मुंडुंचा घोळ पुन्हा पावलांपर्यंत सुटला आणि सगळे जण पटापट बाहेर पडले.

फॅक्टरीची स्वयंचलित दारं करकरणाऱ्या बिजागऱ्यांचे आवाज करीत आपोआप बंद झाली.

घराकडे वळणाऱ्या रस्त्याच्या एका बाजूला, जुन्या विहिरीला लागून असलेल्या 'कोदम पुली'च्या झाडाखाली निळे अॅप्रन घातलेलं सैन्यच्या सैन्य उत्सुकतेनं उभं राहिलं.

सगळ्यांच्या कमरेला निळे अॅप्रन आणि डोक्यांवर पांढऱ्या टोप्या... निळ्या-पांढऱ्या झेंड्यांची रुबाबदार कवायतच जणू!

अच्छु, जोस, याको, अनियान, इलायन, कुहन, विजयन, वावा, जॉय, सुमती, अम्मल, अन्नम्मा, कनकम्मा, लता, सुशीला, विजयम्मा, जॉलीकुट्टी, मोलीकुट्टी, लकीकुट्टी आणि बिनामोल (बसची नावं असलेल्या मुली). स्वामिनिष्ठेच्या जाडजूड बुरख्याखाली बेमालूम लपवलेलं असमाधान आणि कुरकुर घेऊन सगळे एका रांगेत. एकसाथ!

एक झोकदार वळण घेऊन निळी प्लायमाऊथ फाटकात धडकली आणि आतल्या रस्त्यावर पसरलेल्या शंख-शिंपल्यांचा चुराडा करीत, छोट्या-छोट्या लाल-पिवळ्या दगडांना चाकांखाली चिरडत हलतडुलत घराच्या दिशेनं वळली. आत बसलेली मुलं सीटवर हिंदकळून-हिंदकळून खिडकीतून बाहेर झेपावतील की कायसं वाटत होतं.

डोक्यावरची कारंजी मोडली.

कोंबडे विस्कटले.

पिवळी बेलबॉटम आणि गो-गो बॅगचा तर पार अगदी चोळामोळा झाला. विमानातून आल्यामुळं 'जेट-लॅग'ची गुंगी आणि घेरून आलेली झोप. काही डोळे तर जेमतेम, कसेबसे उघडे.

...आणि मोठ्या माणसांचे गुडघे सुजलेले. सारखं बसूनबसून पाठीला रग लागलेली.

बाहेर अंगणात गाडी थांबली. दारं फटाफट उघडली... आतली माणसं बाहेर आली... मग पायऱ्या चढणारी पावलं...

एकूण एक नव्या हालचालींकडे बारीक कान लावून बसलेली माम्माची हळूच आवाजाच्या दिशेनं वळून म्हणाली,

'आलात?'

तिच्या व्हायोलिनचे सुरदेखील पुष्कळच खाली उतरले होते.

'माम्माची माम्माचीऽऽ' घरात पाऊल टाकल्या-टाकल्या राहेल आपल्या देखण्या आजीला बिलगली,

‘तिकडं ना इस्था ओकला. आम्ही द साऊंड ऑफ म्युझिक बघायला गेलेलो ना, तर सिनेमा चालू असताना मध्येच ओकला आणि...’

अम्मूने हलकेच राहेलचा फ्रॉक खेचला. आणि तिच्या खांद्यावर टप् टप् केलं... म्हणजे शूऽऽ बोलू नकोस. राहेल पटकन वळली आणि मागं बघितल्यावर तिला एकदम जाणवलं... नाटकाचा प्रवेश सुरू झालाय! ठरवून दिलेले संवादच चोख पाठ म्हणायचे. तिची भूमिका छोटीशीच होती, अर्थात...

राहेल म्हणजे नाटकातल्या भिंतीवर टांगलेलं निसर्गचित्र... किंवा त्यातलं एखादंच फूल किंवा फार फारतर झाड.

गर्दीतला टिंबाएवढा चेहरा. गावकऱ्यांपैकी कुणीतरी एक.

राहेलला कुणी साधं ‘हॅलो’सुद्धा म्हटलं नाही. कशी आहेस वगैरे चौकशी तर दूरच. अगदी जुन्या विहिरीलगतच्या झाडाखाली हिरव्या उन्हात उभ्या असलेल्या निळ्या सैन्यानंसुद्धा तिची दखल घेतली नाही.

‘ती कुठाय?’ समोर आलेल्या आवाजांकडे कान लावून माम्माचीनं उत्सुकतेनं विचारलं.

‘माझी सोफी मॉल? कुठाय् माझं लेकरू? ये राजा... जवळ ये. बघू दे तरी, कशी दिसतेस ते!’

व्हायोलिनमधून गळलेल्या, वाट बघणाऱ्या, उत्सुक-उदास स्वरांनी माम्माचीच्या डोक्यावर देवळातल्या हत्तीच्या डोक्यावर असते, तशी झुलती छत्री धरली होती. माम्माची बोलायला लागल्यावर एकमेकांत गुंफलेले सगळे सूर ओघळले आणि इकडेतिकडे विखरून पडले.

‘आमच्या या लोकनेत्याला आज झालंय तरी काय?’ या प्रश्नाचं लेबल डकवलेल्या सुटातला चाको मार्गरिट कोचम्मा आणि सोफी मॉलला पुढं करून रुबाबात पायऱ्या चढून आला... जणू क्रीडांगणावरून जिंकून आणलेल्या दोन लखलखीत ट्रॉफ्याच!

...आणि पुन्हा एकदा खरं काय ते महत्त्वाचं सगळं मनातच दाबून ठेवून किरकोळ छोट्या-छोट्या गोष्टीच तरंगत वर आल्या. ‘खरं’ काय वाटतंय ते बाजूला ठेवून ‘बरं’ काय दिसेल, तेच बोलणं सुरू झालं.

‘हॅलो माम्माची.’

शाळेतल्या शिक्षिकेनं मुलांशी बोलावं (आणि कधी बोलता-बोलता फटके द्यावे) तशा आवाजात मार्गरिट कोचम्मा म्हणाली,

‘तुम्ही आम्हांला इकडं बोलावलंत... खरंच खूप बरं वाटलं. नाहीतर सगळ्यातून बाहेर पडणं शक्यच नसतं झालं.

माम्माचीला अचानक हलक्या, स्वस्तातल्या सेंटचा भपकारा जाणवला आणि

विमानातल्या घामाचा आंबूस वास (माम्माचीजवळ हिरव्या मखमली पिशवीतली DIOR ची बाटली होती चांगली... दागिन्यांच्या फडताळात नीट जपून ठेवलेली.).

मार्गरिट कोचम्मानं माम्माचीचे हात हातांत घेतले. मऊ मऊ बोटं... आणि जाड जाड माणकाच्या अंगठ्या.

'हॅलो मार्गरिट.'

तटस्थ, त्रटस्थ आवाजात माम्माचीनं पाहुण्यांच्या स्वागताची रीत सांभाळली.

'वेलकम टु आयमेनेम. सॉरी हां, मी तुला बघू नाही शकणार. डोळे गेले ना आता, आंधळीच झालेय जवळजवळ. तुला ठाऊकच असेल, म्हणा!'

'ओऽऽ दॅट्स ऑलराईट,' मार्गरिट कोचम्मा म्हणाली, 'नाहीतरी मी कुठं एवढी छान दिसतेय? सगळा अवतारच झालाय माझाऽऽ' आणि जरा बेतानंच हसली. आपण बोललो, ते बरोबर की चूक, तिला काही ठरवताच येईना.

'चूक... साफ चूक.' आता चाको स्वत:हून मध्ये पडला आणि माम्माचीकडे वळून अभिमानानं हसत-हसत म्हणाला, 'ती अजूनही पूर्वीसारखीच सुंदर दिसते. अॅज लव्हली अॅज एव्हर!'

'जो'बद्दल ऐकून फार वाईट वाटलं. असं नको होतं व्हायला. इतक्या तरुण वयात...'

माम्माची म्हणाली.

खरं म्हणजे तिला फार वाईट-बिईट नव्हतं वाटलेलं.

थोडी चुटपुट लागलेली फक्त.

तिच्या आवाजातूनही ते कळलं.

मग थोडा वेळ कुणीच काही बोललं नाही.

'जो'ला श्रद्धांजली... दु:खाचा एक मुका ढग...

'सोफी मॉल कुठंय माझी?' माम्माचीनं पुन्हा हाक मारली, 'ये बेटा... आजीजवळ ये...'

मग कुणीतरी सोफी मॉलला माम्माचीच्या दिशेनं ढकललं. माम्माचीनं डोळ्यांवरचा गॉगल वर करून केसांत अडकवला. काळ्या काचांआड लपलेले तिचे मिचमिचे डोळे उघडे पडले. डोक्यावर चढलेल्या काळ्या काचा बुरशी आलेल्या गव्याच्या मुंडक्याकडे नजर रोखून बघत होत्या. मग गवा चिडला. बटबटीत डोळे आणखीच वटारून म्हणाला,

'मुळीच नाही... अज्जिबात. अज्जिबात.'

डोळ्यांवर शस्त्रक्रिया करून आतल्या बाहुल्या बदलून झाल्या होत्या, तरी माम्माचीला फक्त उजेड आणि अंधार, एवढंच दिसे. दारात कुणीतरी उभं राहिलं, तर 'कुणीतरी समोर उभं आहे' एवढं माम्माची सांगू शके; पण उभा राहिलेला माणूस कोण, हे मात्र तिला दिसत नसे. बँकेचे चेक, पावत्या किंवा नोटा डोळ्यांच्या अगदी जवळ धरल्या,

म्हणजे जवळजवळ डोळ्याला चिकटवल्या, की माम्माचीला ओळखता येत. असे महत्त्वाचे कागद ती डोळे फिरवून-फिरवून खूप वेळ वाचत असे.

नाटकातली आम जनता (चुण्याचुण्यांचा झालरवाला फ्रॉक घालून) माम्माचीकडे टक लावून बघत होती. माम्माचीनं सोफी मॉलला घट्ट जवळ घेतलं. महत्त्वाचा चेक वाचण्यासाठी म्हणून डोळ्याला चिकटवावा, इतक्या जवळ. मिचमिचे डोळे फिरवून-फिरवून ती सोफी मॉलला वाचण्याची धडपड करत होती. माम्माचीच्या त्यातल्या त्यात धडक्या डोळ्याला खूप वेळानं लालसर भुरे... जवळजवळ सोनेरीच... केस दिसले. दोन गुबगुबीत गोंडस गालांची लोभस लालसर... वळणं आणि निळसर भुरकट निळे डोळे.

'नाक म्हणजे अगदी पाप्पाची!' माम्माची सोफी मॉलला कवटाळून कौतुकानं म्हणाली.

'तू सुंदर आहेस ना खूप... छान छान परीसारखी?'

'हो.' सोफी पटकन म्हणाली.

'आणि उंचपण आहेस ना?'

'हो. माझ्या वयाच्या मानानं उंचच.' सोफी मॉलनं नेमकं उत्तर दिलं.

'वयाच्या मानानं कसली? चांगलीच उंचनिंच आहे,' बेबी कोचम्मा मध्येच घुसली.

'इस्थापेक्षा तर खूपच उंच.'

'अहो, पण सोफी मॉल मोठी आहे इस्थापेक्षा.' अम्मूनं मुद्दा काढला.

'तरी पण...' बेबी कोचम्मा म्हणाली.

दूरवरून रबराची झाडं ओलांडत मधल्या पायवाटेनं वेलुथा येत होता. त्याचं उघडं गोळीबंद शरीर झपाझप पावलं टाकत पुढे-पुढे झेपावत होतं. एका खांद्यावर विजेच्या वायरीचं भलंमोठं भेंडोळं. कमरेला गुंडाळलेलं निळसर काळं मुंडू त्यानं गुडघ्यापर्यंत दुमडून घेतलं होतं. आणि उघड्या पाठीवर त्याची जन्मखूण असणारं ते पान (त्या पानामुळं तर पाऊस लवकर पडायचा.). वसंतऋतूचं शुभचिन्ह... पाठीवरचं पान.

दूरवरून येणारा वेलुथा घरापर्यंत पोचण्यापूर्वीच राहेलचं त्याच्याकडे लक्ष गेलं आणि व्हारांड्यात रंगलेल्या नाटकाचा खेळ अर्ध्यावर सोडून ती वेलुथाच्या दिशेनं धावत सुटली.

अम्मूचं लक्ष होतंच.

खऱ्या रंगमंचाच्या पुष्कळ खाली मन:पूर्वक स्वागताचा सोहळा मोठ्या उत्साहानं पार पडला. वेलुथानं कमरेला खोचलेलं मुंडू सोडलं... 'द किंग्ज ब्रेकफास्ट' मधल्या गवळणीसारखं गोल उचलून धरलं आणि ठरल्या रिवाजाप्रमाणे तो राहेलकडे बघून कमरेत झुकला. मग राहेलही वाकली (आणि मनात म्हणाली 'वाक'). मग त्या दोघांनी

बोटात बोटं गुंफली आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रातल्या अधिकाऱ्यांसारखे गंभीर चेहरे करून हात मिळवले. हलकेच 'शेकहॅण्ड' केला.

दाट हिरव्या झाडांमधून प्रकाशाचे कवडसे तुकड्यातुकड्यांनी हलत होते. त्या हलणाऱ्या सावल्यांमध्ये वेलुथानं राहेलला उचलून हवेनं भरलेल्या फुग्यासारखं उंच उडवल्याचं अम्मूनं पाहिलं. वेलुथानं हलकेच राहेलला झेललं आणि पुन्हा वर उडवलं. ती जोरजोरानं खिदळत वेलुथाच्या कवेत शिरली.

राहेलला हवेत उडवून पुन्हा झेलणाऱ्या वेलुथाच्या गोळीबंद शरीरावरचे टरारलेले स्नायू अम्मूच्या नजरेतून सुटले नाहीत. त्याच्या सपाट पोटाभोवतीच्या मजबूत फासळ्यांचे आकार रेघारेघा पाडलेल्या चॉकटेलच्या वडीसारखे प्रमाणबद्ध दिसत होते. एवढा एवढासा असणारा हा मुलगा... आपल्या डोळ्यांदेखत 'पुरुष' झाला, तरी आपल्याला कळलं कसं नाही, याचं अम्मूला आश्चर्यच वाटलं. ऐन जोशातलं ते तटतटलेलं टणक शरीर तिच्या नजरेसमोरून हलेना. एखाद्या जलतरणपटूसारखं आखीव-रेखीव शरीर. सुतारकाम करणारा जलतरणपटू. भरगच्च आणि चमकत्या शरीराचा.

त्याच्या गालावरही बाकदार उंचवटे तरारले होते आणि स्वच्छ पांढऱ्या दातांमधून हसू सांडत होतं... हाका घालीत होतं.

ते हसणं बघून अम्मूला एकदम लहानपणीचा वेलुथा आठवला. नारळाची रास मोजणाऱ्या वेल्लय्या पाप्पेनला मदत करणारा... त्याच्या मागून-मागून फिरणारा... अम्मूसाठी पसरलेल्या ताठ तळहातावर ठेवून छोट्या-छोट्या 'भेटी' आणणारा. कधी छोट्या होड्या... कधी नक्षीदार डब्या... तर कधी लाकडाच्या गोलगोल पवनचक्क्या. तो तिला अम्मूकुट्टी म्हणायचा. म्हणजे छोटीशी अम्मू. खरं म्हणजे ती मुळीचच लहान नव्हती त्याच्यापेक्षा. तरीही तो म्हणायचा... अम्मूकुट्टी.

आपल्यासमोर आपल्या लेकीबरोबर खेळणारा उघड्या गोळीबंद शरीराचा आकर्षक पुरुष, म्हणजे तोच लहानगा, भाबडा वेलुथा... हे अम्मूला खरंच वाटेना. तो किती वेगळा दिसायचा लहानपणी, आणि आता किती वेगळा! पुरुष!! त्याचं स्वच्छ पांढरं हसणं तेवढं तसंच होतं. लहानग्या वेलुथासारखं.

राहेलनं मोर्च्यात बघितलेला 'ओळखीचा माणूस' म्हणजे वेलुथाच असला पाहिजे, असं अम्मूला एकाएकी वाटलं. तोच असणार. त्यानंच लाल बावटा उंचावला असणार आणि रागानं फुरफुरणारे बाहू उचलले असणार. तिला वाटलं, निदान वेलुथानं तरी तसंच असावं. त्याच्या हसतमुख, प्रसन्न चेहऱ्याआड उफाळता राग धुमसत असावा... संथ, सुस्त जगाला निदान त्यानं तरी उघड जाब विचारावा. मनात इतका संताप खदखदत असून आपण जे करू शकत नाही, ते निदान त्यानं तरी करावं.

अम्मूला फार आशा वाटली मनातून.

‘तो’ वेलुथाच असणार. त्यानं असलंच पाहिजे मोर्च्यात.

वेलुथाच्या उघड्या शरीरावरून राहेल इतक्या निर्धास्त, नि:संकोचपणानं बागडतेय, हे बघून अम्मूला नवलच वाटलं. राहेलनं स्वत:साठी एक स्वतंत्र जग उभारलंय... त्यात खूप आनंद भरलाय, हास्याचा गडगडाट चाललाय, हे आपल्याला कसं ठाऊक नाही? आणि त्या जगात आपण कशा नाही? आपल्याला ईर्ष्या वाटतेय... खोल कुठंतरी आपल्याच मुलीचा हेवा वाटतोय हेदेखील अम्मूला कसं, कोण जाणे, पण जाणवलं. हेवा... पण नक्की कुणाचा? पोटच्या गोळ्याचा? की त्या पुरुषाचा? की हातात हात मिळवून एकमेकांच्या सहवासात रमलेल्या त्या दोघांच्या हसर्‍या, आनंदी जगाचा?... असले भलतेसलते प्रश्न मनातून झटकून टाकण्याकरता अम्मू उगीचच धडपडत राहिली.

रबराच्या गर्द झाडांमधून पाझरणारे उन्हाचे गोल-गोल कवडसे अंगावर नाचवत, राहेलला कडेवर घेऊन खिदळणार्‍या त्या पुरुषानं सहज वर पाहिलं... आणि त्याची नजर अम्मूच्या डोळ्यांत गुंतून पडली... बघता-बघता खोलवर रुतली.

त्या एका क्षणात शतकानुशतकांची उलथापालथ झाली होती. घराण्याच्या चारित्र्याची पावलं घसरली आणि बेसावध क्षणी नेमका डाका पडला. दलदलीतून सरपटणार्‍या सापाची जुनी कात गळून पडावी, तसा घराण्याच्या अभिमानाचा टेंभा सोलला, ओरबाडला गेला. सगळ्या जुन्या खुणा, जुने घाव आणि ठणकत्या जखमा उघड्या पडल्या. सक्तीनं डोळ्यांवर ओढलेले सगळे खोटे आणि दांभिक बुरखे गळून पडल्यावर स्वच्छ, लुकलुकत्या प्रकाशाची नाजूक हळवी प्रभा सर्वत्र पसरली. भर उन्हात चटके लागावेत किंवा गळाला लागलेल्या माशाचा हिसका जाणवावा, इतकं स्पष्ट होतं सगळं... उन्मुक्त आणि उघडउघड; पण म्हणूनच इतरांना दिसलं नाही. कुणालाच काही कळलं नाही.

त्या अर्ध्यामुर्ध्या क्षणात वेलुथानं अत्यंत अनोळखी, याआधी कधीच न पाहिलेली चमक अम्मूच्या नजरेत पाहिली होती... आजवर त्याच्या कुवतीच्या, अधिकाराच्या पार पल्याड असणार्‍या अनेक गोष्टी... सक्तीनं ओढलेल्या बुरख्याआड दडलेल्या अनेक गोष्टी.

अगदी साध्या आणि सोप्या.

जसं की, राहेलची आई ही एक ‘स्त्री’ आहे, हे त्याला पहिल्यांदाच कळलं.

ती हसली, की तिच्या गालाला खोल खळ्या पडतात आणि डोळ्यांतलं हसू विरलं, तरी त्या गोड खळ्या खूप वेळ हसतच राहतात.

तिचे तांबूस गोरे नितळ दंड... त्यांचा सुबक प्रमाणबद्ध आकार. तोही पहिल्यांदाच दिसला.

तिचे उघडे खांदे चमकतात आणि नजरेत काही वेगळीच छटा असते, हेही.

आता तिला भेटी द्यायच्या झाल्या, तर आपल्याला स्पर्श करावा न लागता वरच्यावर

उचलता येतील, अशा बेतानं तळहातावर ठेवण्याची काही गरज उरलेली नाही, हे त्याच्या लक्षात आलं... छोट्या होड्या... नक्षीदार डब्या आणि लाकडाच्या गोलगोल पवनचक्क्या. आता फक्त 'देत' राहण्याची गरज नाही. आता आपल्यासाठी तिच्याकडेही काही भेटी आहेत आणि त्या आपल्याला मिळू शकतात, हेही पहिल्यांदाच त्याच्या लक्षात आलं.

चाकूचं लखलखतं पातं घुसावं, तशी ही नवीकोरी जाणीव केवळ क्षणभरात वेलुथाच्या मनात घुसत उतरत गेली.

त्यानं सगळं पाहिलंय, हे अम्मूनंही पाहिलं. तिनं पटकन नजर वळवली. त्यानंही. खोटे बुरखे फाडून उघडावाघडा, नग्न केलेला तो सैतान पुन्हा दोघांच्या मानगुटीवर येऊन बसला होता. त्यानं पुन्हा त्यांच्या मुसक्या बांधल्या आणि त्यांच्या-त्यांच्या पायरीवर ओढत, फरफटत नेऊन फेकलं. पुन्हा त्याच जगात. कायद्यांनी करकचून बांधलेल्या जगात.

तिथं नियम घालून दिलेले होते.

कुणी कुणावर प्रेम करावं,

कसं,

आणि किती करावं, याचे नियम!

अम्मू मुकाट्यानं पायऱ्या चढून व्हरांड्यात आली आणि न बोलता तिथल्या नाटकात सहभागी झाली. तिच्या हातापायांना कापरं भरलं होतं.

वेलुथाच्या कडेवर बसलेले अॅम्बॅसिडर प. पतंग महाशय अजूनही खिदळत होते. वेलुथानं तिला खाली उतरवलं. त्याचे हातपाय थरथरायला लागलेले आणि घशालाही नुसती कोरड.

'काय हा नखराऽऽऽ,' वेलुथानं तिच्या झोकदार फ्रॉककडं बघत राहेलची टिंगल केली.

'काय, लग्न-बिग्न करतेयस की काय?'

राहलेनं पुन्हा त्याच्याकडं झेप घेतली आणि अंगावर डोकं घुसळून वेलुथाला पार बेजार करून टाकलं... इक्कीली, इक्कीली, इक्कीली!

'मी तुला बघितलं, काल...' ती वेलुथाकडं बघत रुबाबात म्हणाली.

'मला? कुठं?' आवाजात जास्तीतजास्त आश्चर्य आणत वेलुथानं स्वर उंचावला.

'खोटारडा...' राहेल चिडली, 'खोटारडा आहेस तू. आता कशाला थापा मारतोस? मी स्वत: बघितलंय तुला. तू 'कम्युनिस्ट' बनलेलास. हातात लाल बावटा घेतलेलास आणि शर्टसुद्धा घातलेलास अंगात. तू पण माझ्याकडं बघितलंस; पण लक्ष न देता तसाच निघून गेलास. सांग, हो की नाही? तो तूच होतास की नाही?'

‘अय्यो कॅशट्म...’ वेलुथा तिची समजूत घालत म्हणाला, ‘मी कसा दिसेन तुला? आणि दिसलो, समजा, तर असा वागेन का तुझ्याशी? तूच सांग बरं, वेलुथा असं करील का कधीतरी? खूप वर्षांपूर्वी माझा एक जुळा भाऊ हरवला होता. त्याला बघितलं असशील तू!’

‘कुठला जुळा भाऊ? कधी हरवला? आणि असा कसा हरवला?’

‘अग, तो उरुम्बन नाही का?... कोचीला राहायचा...’

‘कोण उरुम्बन?’ आता राहेलला मोठीच शंका आली होती, ‘वाट्टेल त्या थापा नको मारूस! खोटारडा! तुला जुळा भाऊ नाहीच्चे मुळी. तो उरुम्बन नव्हताच. तूच होतास.’

वेलुथा मनापासून हसला.

‘अग, मी कसा असेन? मी तर आजारी पडलो म्हणून झोपून होतो काल दिवसभर.’

‘बघ... बघ... तू हसतोयस, वेलुथा. म्हणजे तू होतास. हसतोयस म्हणजे तो तूच होतास,’ राहेलनं त्याला अडकवलं.

‘हसतोय म्हणजे ‘हो’ असा अर्थ फक्त इंग्लिशमध्ये असतो, अगं’ वेलुथा म्हणाला, ‘माझे सर सांगायचे, की मल्याळममध्ये हसतोय म्हणजे ‘नाही’... मी हसतोय, म्हणजे ‘तो मी नव्हतोच’!’

राहेलला पटकन काही कळेना. तिचं डोकं भंजाळलं, तशी ती पुन्हा वेलुथाच्या अंगावर झेपावली. इक्कीली... इक्कीली... इक्कीली!

वेलुथा अजूनही हसत होता. हसत-हसत तो व्हरांड्यातलं सोफी मॉलसाठीचं नाटक बघत राहिला.

‘अग, पण सोफी मॉल कुठंय?’ त्यानं मान उंचावत राहेलला विचारलं, ‘मला बघू तरी दे. तू आणायला गेली होतीस ना तिला? मग आलीस घेऊन की विसरलीस तिकडेच?’

‘तिकडे व्हारांड्याकडे नको ना बघू’... राहेल कळवळून म्हणाली.

ती टुणकन सिमेंटच्या कठड्यावर चढली आणि डोक्यावरच्या रबराच्या झाडाच्या फांद्या बाजूला करून तिनं वेलुथाच्या डोक्यासमोर पालथे तळवे धरले.

‘का पण?’ वेलुथाला कळेना.

‘मुळीच नको बघू. मला नाही आवडत,’ राहेलनं स्वच्छच सांगून टाकलं.

‘बरं, मग इस्था मॉन कुठंय?’

मागून गळ्यात हात टाकून पाठीवर लोंकळणाऱ्या आणि मग दोन्ही पाय त्याच्या कमरेभोवती वेटाळून मुटकुळं करून बसलेल्या राहेलला थोपटत वेलुथानं विचारलं. राहेलनं आपले छोटे-छोटे चिकट तळवे त्याच्या दोन्ही डोळ्यांवर गच्च आवळून धरले होते.

‘अग, असं काय करतेस? मी कधीपासून बघितलं नाही ना इस्थाला, म्हणून

विचारतोय!'

'इस्था ना? त्याला आम्ही विकून टाकला कोचिनमध्ये,' राहेल खिदळत म्हणाली, 'इस्थाच्या बदल्यात एक पोतंभर तांदूळ मिळाले आणि एक छोटी बॅटरी.'

तिच्या कुरकुरीत फ्रॉकवर टाचलेली लेसची फुलं वेलुथाच्या पाठीला टोचत होती. ती फुलं आणि वेलुथाच्या पाठीवरचं ते पान बघता-बघता एकत्र झाली आणि काळयाकाळया उघड्या पाठीवर मोठ्ठाच्या मोठ्ठा बगीचा फुलला.

वेलुथाच्या खांद्यावरून राहेलनं समोरच्या व्हारांड्यातल्या नाटकावर एक नजर टाकली; पण इस्था कुठे दिसला नाही.

एव्हाना रंगमंचावर कोचु मारियाची एन्ट्री झाली होती. मोठ्ठाच्या मोठ्ठा केक नाचवत ठेंगणी-ठुसकी कोचु मारिया स्वयंपाकघरातून बाहेर आली आणि माम्माचीला ऐकू जावं, म्हणून मोठ्ठ्यांदा म्हणाली,

'केक आला, केकऽऽ'

माम्माचीशी बोलताना ती नेहमीच असा टिपेचा सूर लावी. माम्माचीचे डोळे गेले, म्हणजे बाकीची ज्ञानेंद्रियं पण आता लवकरच आटपणार आणि कानांनी ऐकू तर येतच नसणार, असं तिनं गृहीतच धरून टाकलं होतं.

'कोण? कोचु मारिया?' माम्माचीनं विचारलं, 'तुला दिसतेय का ग माझी सोफी मॉल?'

'हांऽऽ मीचेय्ऽऽऽ' कोचु मारिया पुन्हा ओरडून म्हणाली, 'मला दिसतेय ती... सोफी मॉल.'

मग ती सोफीकडं बघून चांगलं लांबरुंद हसली.

सोफी मॉल अगदी तंतोतंत कोचु मारियाएवढीच उंच होती. सीरिअन ख्रिश्चनांपेक्षा काहीशी ठेंगू.

'आईसारखी गोरी आहे हो मुलगी... अगदी तस्साच रंग उचललायन,' कोचु मारियानं सोफीचं कौतुक केलं.

'आईचा रंग... पण नाक थेट पाप्पाचींचं,' माम्माचीनं ठासून, सांगितलं.

'ते नाही बाई ठाऊक. पण ती सुंदर आहे खूप, एवढं खरं!' कोचु मारिया माम्माचीच्या कानात ओरडून म्हणाली, 'सुंदरीकुट्टी... लहानशा परीसारखी दिसते बरं!'

लहान पर्‍या आणि छोटे देवदूत तांबूस गोर्‍या रंगाचे... बेलबॉटम घालणारे.

छोटे सैतान चिखलमाखल्या काळपट रंगाचे... चुण्याचुण्यांचा फ्रॉक घालणारे आणि

डोक्यावर टेंगळं आलेले... त्या टेंगळांतून शिंगं फुटतील, म्हणून धास्तावलेले. शिवाय डोक्यावर 'लव्ह इन् टोकियो'नं बांधलेलं कारंजं आणि पुढून मागे वाचण्याची उफराटी सवय.

शिवाय नीट बघितलं, तर त्यांच्या डोळ्यांत लपलेला सैतान दिसायचा, तो वेगळाच.

कोचु मारियानं सोफीचे दोन्ही हात हातांत घेतले, तिचे तळवे पसरले आणि आपल्या तोंडाशी नेऊन डोळे मिटून दीर्घ श्वास घेतला.

'हे काय चाललंय?'

सोफीला काही कळेना.

आयमेनेमच्या घट्टे पडलेल्या, टणक, सुरकुतलेल्या हातांमध्ये लंडनचे नाजूक कोवळे हात घुसमटून गेले.

'कोण आहे ही बाई? आणि माझ्या हातांचा वास का घेतेय?' सोफीनं पुन्हा विचारलं.

'ती आपली स्वयंपाकीण आहे, बेटा,' चाको म्हणाला, 'दॅटस् हर वे ऑफ किसिंग यू...'

'किसिंग? आणि असं?' सोफी मॉलला काही पटलं नाही; पण तिला आता गंमत वाटायला लागली होती.

'वॉवऽऽ हाऊ मार्व्हलसऽऽ' मार्गरिट कोचम्मानं भुवया उंचावल्या, 'हे म्हणजे जोरजोरानं श्वास घेण्यासारखंच आहे. डू द मेन अॅण्ड वीमेन डू इट टू इच अदर टू? तुमच्याकडं स्त्री आणि पुरुषसुद्धा असंच चुंबन घेतात?'

मार्गरिट कोचम्मा सहज बोलून गेली आणि आपण सगळ्यांदेखत काय बोललो, ते लक्षात आल्यावर लाजून चूर झाली... विश्वाच्या छाताडावरचा लाजाळू शिक्षिकेच्या आकाराचा एक खड्डा! भोक!

'ओऽऽ ऑल द टाईम.' इतका वेळ गप्प असलेली अम्मू खोचून म्हणाली, तेव्हा स्वत:च्या आवाजातला झोंबरा उपहास तिला लपवूनही लपवता आला नाही.

'आमच्याकडं अशीच चुंबनं घेतात आणि त्यातूनच मुलं जन्माला येतात.'

चाकोनं तिच्या थोबाडीत हाणली नाही.

म्हणून अम्मूनंही हात उगारला नाही.

...पण वातावरण एकाएकी संतप्त झालं.

'अम्मू, माझ्या बायकोची माफी माग... यु नो माय वाईफ अॅन् अपॉलॉजी' स्वत:चा मालकी हक्क गाजवत चाकोनं उन्मत्तपणे हुकूम सोडला (पुन्हा एकवार तोंड वेंगाडून मार्गरिट कोचम्मा 'एक्सवाईफ, चाको' अशी आठवण करून देणार नाही, इतपत अपेक्षा होती बिचाऱ्याची).

'जाऊ दे रेऽऽ' मार्गरिट कोचम्मा म्हणाली, 'खरं म्हणजे, चूक माझीच होती. मी काहीतरीच बोलून गेले एकदम. तसं नव्हतं मला म्हणायचं... म्हणजे, एकूण ते आहे मोह

पडावा असंच, पण...'

'तू विचारलेला प्रश्न बरोबरच होता. आणि योग्यसुद्धा होता.' तिची घसरगुंडी थांबवत चाको म्हणाला, 'तुझं काहीही चुकलेलं नाही. अम्मूनं माफी मागितलीच पाहिजे.'

'इतका हरामखोरपणा करण्याची खरंच काही गरज आहे का, चाको?' अम्मू वैतागली.

'ओऽऽ डियरऽऽ' – आता हा वाद कसा थांबवावा, हे न कळून मार्गरिट कोचम्मानं चाकोशी जरा सलगी करून पाहिली.

रंगमंचावरच्या नाटकामध्ये पुन्हा एकवार संतापानं खदखदणारा सन्नाटा पसरला. जुन्या विहिरीशेजारच्या हिरव्या उन्हातलं निळं-पांढरं सैन्य अजून तिथंच, तसंच उभं होतं. अम्मू तणतणत पायऱ्या उतरून खाली उभ्या असलेल्या प्लायमाऊथजवळ गेली, खाटकन दार उघडलं, आतली आपली बॅग काढून धाडकन बंद केलं आणि जशी आली, तशी बॅग घेऊन सरळ आपल्या खोलीत निघून गेली. तिचे उघडे खांदे उन्हात झळझळत होते. जो तो आश्चर्यानं अम्मूकडे पाहत होता. एवढा निर्लज्ज धीटपणा तिच्यात आला कुठून, कुणालाच काही कळेना.

...खरं सांगायचं, तर अम्मूला भलतंच काहीतरी झालं होतं. कुणाला कसं कळणार?... आणि अम्मूलातरी?

तिची अवस्थाच तशी होती. धड शिक्षण नाही, धड वाचन नाही, नीट रितीभातीचा जनसंपर्क म्हणावा, तर तोही नाही; अशा अवस्थेत 'आपण काय करतोय, कसे वागतोय?' याचा निवाडा कसा करता येणार तिला?

आतून कुणीतरी हुंकारलं जोरानं, म्हणून ती तशी वागली... एवढंच!

लहान असताना तिला 'अस्वल आई' आणि 'अस्वल बाबां'च्या गोड गोष्टी वाचायला दिल्या, की ती ताबडतोब धुडकावून लावीत असे. तिची गोष्ट त्या पुस्तकातल्या गोष्टीपेक्षा फार म्हणजे, फारच वेगळी होती: तिच्या गोष्टीतले अस्वल बाबा हातात पितळी फुलदाणी घेऊन अस्वल आईच्या टाळक्यात हाणत आणि अस्वल आई बिचारी काही न बोलता मुकाट्यानं मार खात राही.

वाढत्या वयात अम्मूनं जे बघितलं, ते सगळंच भयानक होतं. आपल्या वडिलांनी स्वत:भोवती एक भयंकर विचित्र जाळं विणायला सुरुवात केलीय, हे तिला हळूहळू समजायला लागलं. त्यांच्याकडे कुणी पाहुणे आले की, अम्मूचे वडील भलतेच सुसंस्कृत आणि रुबाबदार गृहस्थासारखे वागत. त्यातून तो पाहुणा 'गोरासाहेब' असला, तर त्याच्यापुढं शेपटी हलवून गोंडा घोळणं तेवढं शिल्लक असे. त्यांनी अनाथाश्रमांना आणि कुष्ठरोगांच्या आश्रमांना हात मोकळे सोडून देणग्या दिल्या. एक दानशूर, सुसंस्कृत आणि

नीतिमान गृहस्थ म्हणून समाजात आपली प्रतिमा तयार करण्यासाठी दिवसरात्र धडपड केली; पण चार भितींच्या आत मात्र या माणसाचं रूप क्षणात पालटत असे. बायको आणि मुलं समोर दिसली, की त्याच्यातला दृष्ट, निर्दयी राक्षस जागा होई... मग हाताला येईल, ते उचलून रक्तबंबाळ युद्धाची सुरुवात! त्यांच्या कावेबाज, संशयी डोळ्यांतून बरसणारा नीच, अधम संताप क्षणात सगळ्यांची राख करून टाकत असे. मग बायको-म्ुलांनी मरेस्तोवर मार खायचा, ओठ घट्ट मिटून अपमान सहन करायचा आणि घराबाहेर मात्र कर्तव्यदक्ष नवरा, प्रेमळ बाप मिळाल्याबद्दल मित्रमंडळींना वाटणारा 'हेवा' सोसायचा.

दिल्लीला असताना थंडीच्या कडाक्यातल्या कित्येक रात्री अम्मूनं घराबाहेरच्या मेंदीच्या कुंपणात लपून उघड्या अंगानं सोसल्या होत्या. ऑफिसमधून वैतागून आलेल्या पाप्पाचींचा भडका उडाला की, ते माम्माची आणि अम्मूला रक्त फुटेस्तो फोडून काढत आणि मध्यरात्री घराबाहेर हाकलून देत. मग आजूबाजूच्या लोकांना हा तमाशा दिसू नये आणि चारचौघांत छी: थू: होऊ नये म्हणून मेंदीच्या कुंपणात लपून रात्र काढायची.

...अशाच एका रात्री आपल्या आईबरोबर मेंदीच्या कुंपणात लपून बसलेली नऊ वर्षांची अम्मू खिडक्यांच्या काचांमध्ये नाचणार्‍या पाप्पाचींच्या सावल्यांकडे एकटक बघत होती. ते सारखे या खोलीतून त्या खोलीत येरझार्‍या घालत होते. चाको शिक्षणासाठी दूरच्या गावी गेलेला... बायको आणि मुलीला मारझोड करून घरातून हाकलून दिलेलं... मोठ्या घरात पाप्पाची एकटेच! संतापाच्या भरात त्यांनी खिडक्यांवरचे पडदे ओरबाडून फाडून काढले, लाथा घालून-घालून घरातलं फर्निचर भिरकावलं आणि जळता टेबललॅम्प आपटून फोडला. खूप वेळानं घरातले दिवे विझले.

मेंदीच्या कुंपणात लपून कुडकुडणार्‍या माम्माची आणि अम्मू जाग्याच होत्या. माम्माची भीतीनं थरथरत होती. तिच्या विनवण्या झिडकारून अम्मू उठली आणि मेंदीचं कुंपण पार करून घराच्या दिशेनं सरपटत निघाली. एका खिडकीच्या वरची झडप उघडी होती. त्यातून हळूच घरात शिरली. काय वाट्टेल ते झालं, तरी नुकतेच आणलेले नवीन गमबुट तिला त्या राक्षसाच्या तावडीतून सोडवायचे होते. पाय न वाजवता आपल्या खोलीत जाऊन तिनं आपले लाडके गमबूट उचलले, कागदात नीट गुंडाळले आणि पुन्हा त्या उघड्या खिडकीतून घराबाहेर निसटून जाण्यासाठी ती दबक्या पावलांनी बाहेरच्या खोलीत आली.

तेवढ्यात अचानक अंधार उजळला. खटका ओढला गेला आणि दिवे लागले.

आपल्या लाडक्या खुर्चीत बसलेले पाप्पाची डोळे मिटून शांतपणे झुलत होते.

त्यांनी अम्मूला पकडलं.

आणि एक शब्दही न बोलता हस्तिदंती मुठीच्या चाबकाच्या काठीनं रक्त फुटेपर्यंत फोडून काढलं.

ओठ घट्ट मिटून फटके खाणारी अम्मू अजिबात रडली नाही.

शेवटी पाप्पाचीच थकले आणि थांबले.

मग त्यांनी सुजलेल्या, रक्ताळलेल्या अम्मूला घरात पिटाळलं, माम्माचीच्या शिवणाच्या डब्यातली सगळयात धारदार कात्री आणायला लावली.

आणि अम्मूच्या डोळ्यांदेखत त्या ख्यातनाम कीटकशास्त्रज्ञानं तिचे लाडके, नवेकोरे गमबूट कचाकचा कापून, फाडून फेकले.

...जमिनीवर काळ्या रबराच्या पट्ट्यापट्ट्यांचा हा एवढा ढीग पडला... तरीही धारदार कात्री करकरत चालतच होती.

खिडकीच्या काचेपलीकडे भीतीनं गारठलेली माम्माची थरथरत उभी आहे, हे अम्मूला कळलं होतं, तरी तिनं तिकडे ढुंकूनसुद्धा पाहिलं नाही.

अवघ्या दहा मिनिटांत तिचे लाडके गमबूट जमिनीवर मरून पडले.

हातातला शेवटचा तुकडा फेकून झाल्यावर पाप्पाचींनी अम्मूकडे रोखून पाहिलं... नंतर शांतपणे खुर्ची हलवायला सुरुवात केली. खूप वेळ झुलत-झुलतच राहिले... त्यांच्या खुर्चीभोवती फुत्कारणाऱ्या रबरी सापांचा समुद्रच उसळला होता.

पुढे मग या थंड रक्ताच्या भावनाशून्य आणि मतलबी क्रौर्याची अम्मूला सवयच होत गेली. 'मिटल्या ओठानं अन्याय सहन करत राहणं हे काहीतरी उदात्त, उच्च आहे' असं मनोमन वाटायला लागलं. जन्मभर कोणातरी 'थोर' माणसाकडून छळवाद सोसत राहणाऱ्या, दबलेल्या, चिरडलेल्या माणसांमध्ये पुढे हट्टी, हेकटपणाची चिडखोर झाक दिसायला लागते. अम्मूचं तसंच झालं. भांडणं आणि वादविवाद टळावेत, म्हणून प्रयत्न करणं दूरच, उलट तिनं सतत भांडणं ओढवूनच घेतली. कधीकधी तर उकरूनसुद्धा काढली. पुढे पुढे तिला भांडणांची मजाच वाटायला लागली.

'ती गेली का गं?' कुणीच बोलत नाहीसं बघून शेवटी माम्माचीनंच सभोवारच्या सन्नाट्याला विचारलं.

'होऽऽ गेलीऽऽ आपल्या खोलीत गेलीऽऽऽ,' कोचु मारियानं ओरडून सांगितलं.

'तुमच्याकडे भारतात 'हरामखोर' म्हटलं तरी चालतं?' सोफी मॉल डोळे विस्फारून विचारत होती.

'कोण म्हणालं 'हरामखोर'?' चाकोनं विचारलं.

'ती नाही का म्हणाली आत्ताच? अम्मू आन्टी.' सोफी मॉलनं लक्षात आणून दिलं, 'ती म्हणाली की, इतक्या 'हरामखोर'पणानं वागायची काही गरज आहे का, म्हणून.'

‘ते जाऊ दे. तू आता केक काप आणि सगळयांना दे बरं...’ माम्माचीनं विषय थांबवायचा प्रयत्न केला.

‘इंग्लंडमध्ये नाही बुवा, असं म्हणता येत...’ सोफी मॉल चाकोला सांगत होती.

‘काय पण? काय नाही म्हणता येत?’

‘ह-रा-म-खो-र.’

माम्माचीनं डोळे किलकिले करून बाहेर एक नजर टाकली. संध्याकाळच्या मंद प्रकाशात काही तरी काळं काळं दिसलं.

‘तिकडं कुणी आहे का?’ माम्माचीनं विचारलं.

‘उवर, कोचम्मा’, हिरव्या उन्हातल्या निळया सैन्यानं एकसाथ उत्तर दिलं, ‘आम्ही सगळे इकडे आहोत.’

रंगमंचाच्या बाहेर उभी असलेली राहेल डोळे विस्फारून इस्थाला म्हणाली,

‘आपण नाहीय्योत त्यांच्यांत. नाटकातसुद्धा नाहीय्योत की नाही आपण?’

‘हो’, वेलुथा म्हणाला, ‘आपण नाहीय्योत त्या नाटकात. पण मला सांग, इस्थापप्पीचाच्येन कुट्टप्पेन पीटर मॉन कुठंय आपला? कित्ती वेळापासून दिसलाच नाहीय्ये तो!’

वेलुथाच्या त्या शब्दांची दोघांना म्ोठ्ठीच गंमत वाटली, त्यातला ताल सापडला, श्वास रोखून धरणारी लय गवसली आणि रबराच्या बागेत मस्त नृत्यच सुरू झालं.

ओ इस्थापप्पीचाच्चेन कुट्टप्पेन पीटर मॉन
तू गेलास कुठं, गेलास कुठं, सांग... सांग... सांग...

...अडखळणारी पावलं हळूहळू भलतीच ठेक्यात पडू लागली आणि केशरी फुलांचा सडा पडावा तसे शब्दही सुचू लागले.

लवकर ये... लवकर ये... लवकर ये राजा
तुझ्याशिवाय मित्रांना सांग कसली मजा?
आहेस कुठं... आहेस कुठं... आहेस कुठं पण?
लाडक्या... लाडक्या... लाडक्या इस्थाप्पन

कोचु मारियानं केकचा छोटासा तुकडा कापून माम्माचीपुढं धरला.

‘एकेकच तुकडा दे हं प्रत्येकाला’... कोचु मारियाच्या हातातला केकचा तुकडा सगळयांना पुरेल इतपत छोटा आहे ना, ते माणकांनी लखलखणारी बोटं फिरवून माम्माचीनं चाचपून पाहिलं.

मग कोचु मारियानं सपासप सुरी फिरवून अख्ख्या केक कापला. भाजलेल्या बकरीचे

तुकडे कापावे, तसा आटापिटा करून, दात-ओठ खात, मोठमोठ्यानं धपापत कोचु मारिया खूप वेळ त्या केकशी लढत होती. शेवटी आयसिंगमध्ये बरबटलेल्या बोटांनी तिनं केकचे वेडेवाकडे तुकडे चांदीच्या मोठ्या ताटात रचले. माम्माचीच्या व्हायोलिनमधून 'वेलकम होम, अवर सोफी मॉल'चे सूर पुन्हा गळू लागले.... गोड गोड गोडूस... साखरेच्या पाकानं लडबडलेल्या चॉकलेटचा जणू समुद्रच. ते ऐकून-ऐकून इतका वीट आला होता की, सगळयांनाच मळमळायला लागलं.

शेवटी व्हायोलिनच्या सुरांचा तो अवीट पाझर मध्येच थांबवून चाको ओरडला,

'ममाऽऽ, बास आता. पुष्कळ झालं तुझं व्हायोलिन.'

माम्माची एकाएकी थांबली आणि हातातला बो हवेतल्या हवेत रोखून चाकोकडं पाहतच राहिली.

'काय म्हणालास? चाको?'

'अगं, बास झालं आता. पुरे कर.'

'बास तर बास.' स्वत:शीच पुटपुटत माम्माचीनं सगळा पसारा आवरला. म्हणाली, 'थांबवतेच मी आता.' जणू तिनं स्वत:च व्हायोलिनवादनाचा समारंभपूर्वक समारोप केला होता.

माम्माचीनं शेजारची काळी बॉक्स ओढली आणि खांद्यावरची व्हायोलिन उतरून त्यात ठेवून दिलं. कपड्यांनी भरलेली सुटकेस असावी, तशी ती बॉक्स बंद झाली... आणि त्याच्या आत गोड गोड सुरांची ती वेटोळी!

खटाक. खटाक.

माम्माचीनं पुन्हा एकदा काळा गॉगल डोळयांवर चढवला. नजरेला कसला त्रास नको, म्हणून आतले पडदे ओढून घेतले.

काळंकुट्ट चिडीचुप्प जग.

– आणि त्यात माम्माची.

खूप वेळानं घरातून बाहेर आलेल्या अम्मूनं राहेलला हाक घातली.

'राहेलऽऽ, दुपारची हुंदडू नको बाहेर. झोपायला चल लवकर. केक झाला खाऊन, की ये लगेच.'

राहेल वैतागली.

दुपारची झोप तिला बिलकूल आवडत नसे.

पण तिच्या नाराजीकडे लक्ष न देता अम्मू तरातरा आत निघून गेली.

वेलुथानं कडेवरून उतरवून राहेलला खाली ठेवलं. तिच्या हसण्याचा खळाळ

कुठल्याकुठं पळून गेला होता.

व्हरांड्यातल्या नाटकाच्या रंगमंचावर पाऊल न टाकता ती एकटीच रस्त्याच्या कडेला उभी राहिली. काय करावं, तिला सुचत नव्हतं... दुपारची झोप... आणि आत्ता?

'तुला कुणी सांगितलं ग, त्या शुंभाशी एवढ्या लाडात यायला?' बेबी कोचम्मा अचानक राहेलच्या अंगावर कडाडली, 'पुन्हा त्या माणसाला फार चिकटशील प्रेमानं तर बघच मग.'

'कुणाला चिकटते?' माम्माची सावध झाली, 'कोण माणूस? काय रे चाको, काय म्हणतेय ही? कोण कुणाशी इतक्या लाडात येऊन वागतं?'

'राहेल... दुसरं कोण?' बेबी कोचम्माचा फणकारा कायम होता.

'राहेल लाडात येऊन वागते... पण कोण?'

'अग, कोण नव्हे, कुणाशी विचार... कुणाशी?' चाकोनं आईची चूक सुधारली.

'बरं, कुणाशी वागते राहेल फार लाडात येऊन?'

'तोच... तुमचा लाडका वेलुथा. दुसरं कोण?' बेबी कोचम्मानं माम्माचीला सांगून टाकलं. मग चाकोकडे वळून ती म्हणाली,

'त्याला विचार, कुठं होतास म्हणावं काल? काय तो सोक्षमोक्ष लावून टाका एकदाचा.'

'कोण लाडात येतं? कुणाबद्दल चाललंय हे?', सोफी मॉलनं मार्गरिट कोचम्माला विचारलं; पण ती चकार शब्द बोलली नाही.

'वेलुथा? वेलुथा... आहेस का, रे? आहेस का तू इथं?' माम्माचीनं उतरणाऱ्या उन्हांना प्रश्न विचारला.

'उवर कोचम्मा'... रबराच्या झाडांमध्ये उभ्या असलेल्या वेलुथानं अचानक रंगमंचावरच्या नाटकात प्रवेश केला.

'काय झालं होतं? शोधलंस का काय ते नीट?' माम्माचीनं विचारलं.

'फूट व्हॉल्व्हमधला वॉशर खराब झाला होता,' वेलुथा म्हणाला, 'मी बदललाय तो. आता नीट चालतोय पंप.'

'अरे बाबा, मग चालू कर लवकर. टाकी कधीrची कोरडीठाक पडलीय. पाण्याचा टिपूस नाही घरात,' माम्माचीनं सुस्कारा सोडला.

'हा माणूस कधी ना कधी नडणार आपल्याला. जिवावर उठेल, तेव्हा कळेल', बेबी कोचम्मा फणकाऱ्यानं म्हणाली. तिला भविष्याची चाहूलबिहूल नव्हती लागलेली किंवा अचानक काही साक्षात्कार पण नव्हता झाला. काही ना काही करून वेलुथाला कसल्या ना कसल्या त्रासात अडकवता येतं का ते पाहावं, म्हणून बेबी कोचम्माची धडपड चालली होती.

पण कुणीही तिचं म्हणणं फारसं गांभीर्यानं घेतलं नाही.

'लक्षात ठेव. मी म्हणते तसं नाही झालं, तर नाव बदलून देईन.'

बेबी कोचम्माच्या संतापाला कडवट धार चढली होती.

'ती बघ... किती छानय्.' राहेलच्या समोर केकचा ट्रे धरत कोचु मारिया म्हणाली, तिला वाट्टेल ते करून सोफी मॉलबद्दल राहेलशी बोलायचंच होतं.

'मोठी झाली ना, की तीच आमची कोचम्मा होईल... मग ती आमचे पगार वाढवील. ओणमच्या सणाला नायलॉनच्या साड्यासुद्धा देईल.'

कोचु मारिया कधी चुकूनसुद्धा साड्या नेसत नसे, तरी नायलॉनच्या साडीचा मोह मनात वळवळत होताच.

'बघच तू. ती खूप पैसे देईल आम्हांला. आणि साड्या.'

'त्यात काय एवढं?' राहेलनं वैतागून म्हटलं, 'मी असणारच्चेय कुठं? तोपर्यंत मी आफ्रिकेत निघून गेलेली असेन –'

'आफ्रिका?' कोचु मारियानं नाक उडवत तोंड अगदीच आंबट केलं, 'शी: तिथं तर काळेकुट्टे, घाणेरडे लोक राहतात म्हणे. आणि मेल्या या एवढ्या डासांच्या झुंडी!'

'तूच्चेस काळीकुट्ट आणि घाणेरडी!' राहेल तिच्यावर डाफरली आणि (इंग्रजीत) म्हणाली, 'स्टुपिड ड्वॉर्फ.'

'काय... काय म्हणालीस?' कोचु मारिया राहेलवर एकदम तुटूनच पडली, 'स्टुपिड... काय? मी ऐकलंय. मला ठाऊकेय तू काय म्हणालीस ते. थांब तू! माम्माचीलाच सांगते आता. म्हणजे मग कळेल.'

राहेल तिथून उठली आणि जुन्या विहिरीपाशी गेली. तिथं नेहमी मुंग्यांच्या रांगाच रांगा असत. चटचट मुंग्या मारायला मजा यायची. त्यांतल्या लाल मुंग्या निवडून निवडून चिरडल्या, की कसलातरी विचित्र आंबट वास यायचा. राहेल विहिरीकडे गेली, तर तिच्या मागोमाग केकचा ट्रे घेऊन कोचु मारियासुद्धा लुटुलुटु धावली.

राहेलचा वैतागानं भडका उडाला होता. ती चिडून म्हणाली, 'मला मुळीच नकोय तुझा केक न् बेक!'

'कुशुम्बी'... कोचु मारियानं आणखी ढोसलं.

'दुसऱ्यांवर जळणारी माणसं नरकात जातात हो थेट! ठाऊकाय ना?'

'इथं कोण जळतंय कुणावर? वाट्टेल ते काय बोलतेस?'

'आता 'कोण जळतंय, ते तुलाच ठाऊक. मी बापडी काय सांगणार?' कमरेभोवतीच्या अॅप्रनचा घोळ एका हातानं सावरत कोचु मारिया खोचक शब्दांत म्हणाली. तिच्या

आतून उफाळणारी चीड विझता विझत नव्हती.

राहेलनं हातातला गॉगल पुन्हा डोळ्यांवर चढवला आणि ती निमूटपणे 'नाटका'त काय चाललंय ते बघायला लागली.

रंगमंचावर सगळीकडे रागाचा भडका उडालेला. दोघांपैकी कुणीतरी एक आपल्या कानशिलात लावून देणार, अशा भीतीनं उगाचच बावरलेली सोफी मॉल, चाको आणि मार्गरिट कोचम्माच्या मध्ये उभी होती.

तेवढ्यात राहेलला चांगल्या टचटचीत मुंग्यांची एक रांग दिसली. लालेलाल झगे घालून त्या सगळ्या जणी चर्चच्या दिशेनं निघाल्या होत्या... त्यांचा खातमा करणं भागच होतं. रांगेतली पहिली मुंगी चर्चच्या पायरीशी पोचायच्या आत सगळ्यांना दगडानं ठेचून मारण्याशिवाय मुळी पर्यायच नव्हता. असल्या घाणेरड्या, अंगाला वास मारणाऱ्या मुंग्या चर्चमध्ये जाऊन कसं चालेल?

शेवटी सगळ्या मुंग्या चिरडून मेल्या. मरताना सगळ्यांनी कुरुम कुरुम आवाज पण केले. छोट्याशा वनदेवतेनं कुरुकुरु टोस्ट खावा किंवा बिस्कीट खावं, तसे.

मुंग्यांचं चर्च आता तसंच रिकामं भकास राहील. चांदीच्या धुपदाणीत धुपाचा धूर करून मुंग्यांचे बिशप गमतीजमतीचे मुंग्याळ झगे चढवून वाट बघत बसलेले असतील... पण कुणीच येणार नाही.

बऱ्यापैकी मुंग्याळ वेळ वाट बघून झाल्यावर मुंग्यांचे बिशप वैतागतील, कपाळावर लांबलचक आठ्या घालतील आणि वैतागून-वैतागून मान हलवतील.

मग ते खूप वेळ खिडक्यांवर लावलेल्या मुंग्यामुंग्यांच्या काचांकडे नजर लावून बसतील. आणि त्याचाही कंटाळा आला, की कमरेला लटकावलेल्या हजारो किल्ल्यांचा जुडगा लावून चर्चला टाळं ठोकतील आणि निघून जातील. मग चर्चमध्ये सगळा अंधारच अंधार पसरेल. मग मुंग्यांचे बिशप तडक आपल्या घरी बायकोकडे जातील आणि *(*ती जिवंत असलीच समजा तर*)* तिच्याबरोबर दुपारीच एक मुंग्याळ डुलकी काढतील.

हॅट घालून, बेलबॉटम नेसून सजलेली आणि जन्मल्या क्षणापासून लाडाकोडात वाढलेली सोफी मॉल व्हरांड्यातल्या नाटकाला कंटाळली आणि राहेल काय करतेय ते बघायला जुन्या विहिरीपाशी धावली. मग व्हरांड्यातलं नाटकही तिच्याबरोबर धावलं. ती धावली, की नाटक धावणार, आणि ती थांबली, की थांबणार. नाटकातल्या सगळ्यांच्या प्रेमळ नजरा आणि कौतुकाच्या हसण्यानं सोफीची पाठ म्हणून सोडली नाही. कोचु मारियाही केकचा ट्रे घेऊन तिच्यामागं धावली. सोफी धडाधड पायऱ्या उतरून विहिरीजवळच्या चिखलात गेली (बेलबॉटमचा पिवळा रूबाब पार चिखलानं माखून निघाला.).

विहिरीजवळचं घनघोर हत्याकांड सोफी मॉलनं कमरेवर हात ठेवून बारकाईनं बघितलं. रक्तरंजित दगडाला अजूनही काही लाल मृतदेह चिकटलेले होते. शिवाय वेदनांनी विव्हळणाऱ्या तुटक्या पायांची अखेरची तडफड... तडफड.

उरल्यासुरल्या तुकड्यांनी लडबडलेला केकचा ट्रे घेऊन कोचु मारिया तशीच उभी राहिली.

कौतुकानं बघत राहिली.

मुली खेळत होत्या.

गोड. गोंडस.

एक तांबूस गोरी.

एक काळीबेंद्री.

एक लाडाकोडाची, आवडती.

एक थोडी नावडतीच.

'हे बघ, आपण एकाच मुंगीला जिवंत ठेवू या का? म्हणजे मग बसेल एकटीच भरकटत,' सोफी मॉलनं सुचवून पाहिलं.

पण तिच्याकडे अजिबात लक्ष न देता राहेलनं सगळ्या मुंग्या वेचून-वेचून चिरडल्या. ठार मारल्या. मग चुण्याचुण्यांचा 'खास' फ्रॉक, त्याला मॅचिंग (पण आता आधीइतकी कुरकुरीत न राहिलेली) चड्डी आणि डोळ्यांवर भलत्याच रंगाचा लाल-पिवळा गॉगल घातलेली राहेल पळत सुटली... हिरव्या प्रकाशात दिसेनाशी झाली.

प्रेमाच्या नजरा अजूनही सोफी मॉलवर खिळून होत्या. स्पॉटलाईटसारख्या. त्यांना वाटत होतं, राहेल पळून गेली, म्हणजे दोघी बहुतेक लपाछपी खेळतायत.

आत्तेमामे बहिणी खेळतातच ना लपाछपी नाहीतरी!

प्रकरण ९

सौ. पिल्लई, सौ. इपेन आणि सौ. राजगोपालन

दिवसभराच्या प्रकाशाची हिरवाई गर्द झाडांच्या कुशीतून झिरपून, पाझरून मंदावली होती. पावसाळी ढगांनी गच्च भरून आलेल्या आकाशाखाली झुलणारी पामची काळपट हिरवी पानं जुनाट कंगव्याच्या दात्यांसारखी पसरट होऊन गेलेली. त्या थकल्या-भागल्या पानांमधल्या पडक्या दातांच्या फटींमधून सरकत-सरकत सूर्याचा नारिंगी गोळा क्षितिजावर कधी टेकला; ते कळलंही नाही.

उदास अंधारात मिटत जाणाऱ्या झाडांच्या खिन्न पिकल्या फळांभोवती हावरट माश्यांच्या झुंडी मात्र खूप वेळ गरगरत राहिल्या.

घरासमोर पसरलेल्या वैराण, उद्ध्वस्त बागेत राहेल उभी होती. बागेच्या रक्षणासाठी उभारलेले प्लॅस्टर ऑफ पॅरिसचे ठेंगोडे रक्षक उभे राहून-राहून झोपाळलेले... त्या छोट्या संगमरवरी गोंडस मुलाच्या चेहऱ्यावर अनाथपणाचं दुःख पसरलेलं... सगळे जण आळसावलेल्या, भोचक नजरांनी राहेलकडे पाहत होते. खूप वेळानं ती थिजून, कुजून गेलेल्या तळ्याकाठी उकिडवी बसली... तळ्याभोवती उंडारणारी नाकतोड्यांची फौज. इकडून-तिकडे टुणटुण उड्या मारत शेवाळलेल्या, निसरड्या दगडांवरून बागडतानाची त्यांची धावपळ... कुठे गेले सगळे?

ओंगळ पंख-पायांचे सुंदर नाकतोडे.

ठिपक्याठिपक्यांनी भरलेले. चिकट, बुळबुळीत... आणि त्यांचा तो कर्कश्श, खरखरीत आवाज.

स्त्रीसुखासाठी हपापलेले, पहिल्यावहिल्या चुंबनासाठी तळमळणारे शापित राजकुमार कैद असत त्यांच्या शरीरांत! त्यांचा तो आक्रोश ऐकवत नसे. मग जून महिन्यात वाढलेल्या उंचच उंच गवतात ते थकून पडून राहत आणि सळसळत धावणाऱ्या सापांना मेजवानी मिळे.

पण आज तळ्याभोवती सगळंच सुन्न होतं.

...नाकतोडे नव्हते आसपास आणि चुंबनासाठी आक्रोशणारे राजकुमारही.

रात्र चढत होती; पण पावसाचा पत्ता नव्हता. राहेलनं आयमेनेममध्ये पाऊल ठेवल्यापासून पाहिल्यांदा पावसाची धुम्मस थांबलेली. कोरडी रात्र.

आत्ता हे वॅशिंग्टन असतं, तर?– राहेलच्या डोक्यात चक्रं सुरू झाली...

मी एव्हाना कामावर निघाले असते. बसचा कंटाळवाणा प्रवास. रस्त्यावरचे भगभगणारे लाईट्स आणि पेट्रोलचा भुरकट धूर. भोवती उभारलेल्या बुलेटप्रूफ केबिनच्या काचांवर हलणारे लोकांच्या श्वासांचे चित्रविचित्र आकार. सुट्ट्या नाण्यांनी खचाखच

भरून जोरात ढकललेला पत्र्याचा ट्रे... बोटांना चिकटून भोवती घोंघावणारा पैशांचा वास आणि पोटात दारूचा समुद्र रिचवून बरोबर दहा वाजता गाडीत पेट्रोल भरायला येणारा तो नालायक. हेऽऽ यूऽऽ ब्लॅक बिच! सक् माय डिक्... चाट, चाट माझा लवडा...

राहेलजवळ सातशे डॉलर्स होते. सर्पमुखाची सोन्याची बांगडी आणि बेबी कोचम्मानं तिच्या तोंडावर फेकलेले दोन प्रश्न.

किती दिवस राहणारैय् इथं?

आणि इस्थाचं काय?

'किती' आणि 'काय', राहेललाच ठाऊक नव्हतं.

कसला हिशेब नाही, योजना नाही.

पाय रोवून धड उभं राहावं, याकरता कुठला आधारच नाही.

तिनं सहज मान वळवून बघितलं. 'आयमेनेम हाऊस.'

मद्दड चेहऱ्याची, आळसावलेली, उतरत्या छपराची एक ढिम्म आकृती. विश्वाच्या छाताडावर घराच्या आकाराचं एक मोठ्ठं भोक.

बेबी कोचम्मानं छपरावर उभारलेल्या त्या उलट्या चंदेरी छत्रीत राहिलो आपण तर?

आतमध्ये जाऊन आरामात पाय पसरून लोकांना राहता येईल, इतपत मोठं दिसतंच ते प्रकरण. अनेक माणसांची दगड-विटांनी बांधलेली घरंसुद्धा एवढी मोठी नसतात.

उदाहरणार्थ, कोचु मारिया राहते ती खोली.

त्या चंदेरी छत्रीहून निम्मीच असेल जेमतेम.

राहेल खूप वेळ विचार करत राहिली.

आईच्या गर्भात पाय पोटाशी घेऊन गुपचूप पडून राहिलेल्या बाळासारखे आपण आणि इस्था गुरगुटून झोपलो, त्या उलट्या छत्रीत... तर?

हक हॉगन आणि बाकीचे बमबम बिन्गो काय करतील? छपरावरची उलटी छत्री भरून गेली पृथ्वीवरच्या दोन माणसांनी, तर मग आकाशातून उतरणारे ते सगळे कुठं जातील? छात्रीशेजारी लावलेल्या धुरांड्यातून त्यांना उतरता येईल का बेबी कोचम्माच्या टीव्हीत? आणि तिथून तिच्या आयुष्यात? पिळदार दंडांत भरलेल्या गोट्या फुगवून झगमगत्या कपड्यांची चकमक मिरवत ते धुरांड्यातून थेट चुलीवरच उड्या ठोकतील का? हिय्याऽऽ पण मग किडकिड्या, खंगलेल्या लोकांचं काय होईल? ते कुठून येतील घरात आणि टीव्हीत? दुष्काळानं अर्धमेले झालेले स्त्री-पुरुष, पोटं खपाटीला गेलेल्या रडक्या पोरांच्या झुंडी आणि भयग्रस्त निर्वासित... ते दारांच्या फटींमधून, छपरावरच्या सापटीतून निसटून घुसतील का घरात? आणि वंशहत्या... त्याही सरपटतील का जमिनीवरून?

कोंबून-कोंबून भरलेल्या टी. व्ही.नं अख्खं आकाश चोंदून गेलेलं. जादूच्या काचा

धरल्या डोळ्यांसमोर तर आकाशातून उडत-उडत घराकडे परतणारे पक्षी आणि घोंघावणाऱ्या माशांभोवती विणली गेलेली भयंकर क्लिष्ट, गुंतागुंतीची जाळी दिसतील कदाचित! गोऱ्या-गोमट्या उफाड्याच्या टंच उघड्या पोरी, रक्तबंबाळ युद्धं, भयंकर दुष्काळ, फुटबॉलचा जल्लोश, चटपटीत पाककृती शिकवणारे फूड शोज्, हिंसक राज्यक्रांत्या, फवारे उडवून-उडवून डोक्यावर टोपलीसारख्या चिकटवलेल्या हेअरस्टाईल्स, शिवाय पुरुषांची लाळ गाळत तोकड्या कपड्यांमधून ओसंडणाऱ्या बायकांच्या छात्या. सगळं जगच आयमेनेमवर स्वारी करण्यासाठी तरंगत-तरंगत आकाशातून निघालेलं. जिकडे-तिकडे उडणाऱ्या हवाई छत्र्या आणि त्यांच्या चित्तथरारक कसरती. आकाशात सुळसुळणारे हजारो आकार... गरगरती चाकं, भिरभिरत्या पवनचक्क्या, फुलणारी फुलं आणि गळणाऱ्या पाकळ्या.

हिय्या!!

राहेल पुन्हा तळ्याकाठी परतली. तिथं काही नाकतोडे ध्यानस्थ बसलेले दिसले.

जाडजाड आणि पिवळसर.

तिनं एकाला हळूच हात लावला. त्यानं पापणी उघडून डोळे मिचकावले. मजेत होता बिचारा. मिटमिट... उघडमिट...

अचानक कुठूनसा एक शब्द भिरभिरत आला आणि राहेलच्या तनामनात शिरला.

या शब्दाचा नाद लागून एकदा कधीतरी ती आणि इस्था दिवसभर हेच बडबडत बसले होते आणि तिसरी सोफी मॉल.

गोल गोल गरगरणारं बुबुळ

काळ्या मण्याने लखलखणारं, ताणलेल्या त्वचेच्या भोकातून बाहेर डोकावणारं बुबुळ...

मिटमिट... उघडमिट...

टमिट टमिट उघडमिट...

टमिड उघडमिट...

डमिट डमिट

मिट मिट...

मिट्...

त्या तिघांनीही कुठल्यातरी जुन्यापान्या साड्यांचे अर्धे-अर्धे तुकडे नेसलेले. पुढाकार इस्थाचा. त्यानंच सोफी मॉलच्या निऱ्या काढून दिल्या, राहेलचा पदर नीट करून दिला, शिवाय स्वत:च्या कमरेभोवती चापूनचोपून साडी गुंडाळली, ती वेगळीच! तिघांनीही कपाळावर भल्यामोठ्या लाल टिकल्या चिकटवल्या होत्या. डोळ्यांत काजळ घालायला अम्मूचा सक्त विरोध; म्हणून मग ते धुवून काढण्याच्या प्रयत्नात तिघांच्याही चेहऱ्यांवर

काळेकाळे फराटे उठलेले. हिंदू स्त्रियांसारखं पावडर कुंकू करून नटता-नटता तिघांचाही एकूण अवतार माकडछाप झालेला.

सोफी मॉल इंग्लंडहून आली, त्याला जेमतेम सात-आठ दिवस झाले असतील, नसतील. ती मरून गेली अचानक, त्यालाही तब्बल आठवडा बाकी होता अजून; तेव्हाची गोष्ट. तोवर राहेल आणि इस्थाच्या तालमीत सोफी मॉल चांगलीच तयार झाली होती. शिवाय ती येण्यापूर्वी जुळ्यांच्या मनात तयार झालेलं गैरसमजांचं भूतही तिनं पार अगदी उतरवून टाकलं होतं.

उदाहरणार्थ :

(अ) 'तू माझा खरा बाप असलास, तरी माझं खरं प्रेम 'जो'वरच होतं... तुझा नंबर नेहमीच 'जो'च्या खाली राहील', असं तिनं चाकोला स्पष्टच सांगून टाकलं.

(त्यामुळं चाकोच्या मनात असो-नसो, बापाच्या प्रेमासाठी मनापासून आसुसलेल्या दोन जुळ्या मुलांना माया लावण्यासाठी चाको निदान मोकळा तरी झाला.).

(ब) रात्री झोपताना डोक्यावरच्या विरळ पांढऱ्या केसांची उंदराची शेपटी वळून देणे आणि अंगावरचे तीळ मोजणे या सन्माननीय कामांसाठी इस्था-राहेलऐवजी सोफी मॉलची नेमणूक करायची; असं माम्माचीनं ठरवूनच टाकलं होतं; पण या चालून आलेल्या सन्मानाला सोफी मॉलनं स्पष्ट शब्दात नकार दिला आणि माम्माचीला साफ धुडकावून लावलं.

शिवाय सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे –

(क) पाहुण्या मुलीचं मन जिंकून घेण्यासाठी चाललेली बेबी कोचम्माची धडपड, त्यासाठी तिनं पसरलेलं मायेचं जाळं, ओसंडून वाहणारं कौतुक यांकडे सोफी मॉलनं ढुंकूनसुद्धा बघितलं नाही आणि आपल्याला फशी पाडण्याचे, फूस लावण्याचे बेबी कोचम्माचे सगळे प्रयत्न अत्यंत धूर्त चलाखीनं उधळून लावले.

एवढंच नव्हे, तर आपल्यावरची अतिउच्च, विदेशी छाप पुसून, घरातल्या सगळ्यांनी चिकटवलेलं 'परी'पण विसरून सोफी मॉल फार पटकन जुळ्यांमध्ये मिसळली.

एकदा राहेल आणि इस्था सोफी मॉलला बरोबर न घेता नदीवर फिरायला गेले होते. ते दोघे परत आले, तेव्हा सोफी मॉल त्यांची वाट बघत एकटीच बागेत बसलेली... आणि रडून-रडून डोळे सुजलेले. कातरून-कातरून आकार दिलेल्या एका झाडाचं बेबी कोचम्मानं 'एकाकी' असं बारसं केलं होतं. त्या झाडाशेजारी बसून सोफी मॉल हमसून-हमसून रडत होती. दुसऱ्याच दिवशी राहेल आणि इस्थानं तिला आपल्याबरोबर नदीवर नेलं... वेलुथाच्या घरी!

आपापल्या साड्या सावरत तिन्ही मुलं उंच गवतातून वाट काढत, वाटेवरला चिखल रपारप तुडवीत वेलुथाच्या घरी पोचली. मग तिघांनीही मोठ्या झोकात स्वत:ची (नवी)

ओळख करून दिली.

सौ. पिल्लई, सौ. इपेन आणि सौ. राजगोपालन.

मग या पाहुण्या स्त्रियांसमोर आदरानं झुकत वेलुथानंही स्वत:चं नाव सांगितलं. अर्धांगवायूनं अंथरुणाला खिळलेला त्याचा भाऊ – कुट्टप्पेन गाढ झोपला होता. त्याचीही रीतसर ओळख करून दिली. त्यानं तिन्ही स्त्रियांचं आपल्या घरात प्रेमानं, सौजन्यानं स्वागत केलं. तिघींना नारळाचं पाणी प्यायला दिलं. वेलुथा 'कोचम्मा... कोचम्मा' म्हणूनच त्यांच्याशी गंभीरपणे बोलत होता. मग त्यानं हवापाण्याच्या गप्पा केल्या, नदीबद्दल काहीबाही सांगितलं. नारळाची झाडं नीट वाढत नाहीत, दिवसेंदिवस खुरटी होत चाललीत, असंही तो काळजीनं म्हणत होता. आयमेनेममधल्या तीन प्रौढ बायकांशी बोलावं, तसं सगळं चाललेलं. तोवर वेलुथाची कोंबडी किरकिरत घरात घुसली. तिच्याबद्दल थोड्या गप्पा झाल्या. मग वेलुथानं एक मोठ्ठा पेटारा उघडला. सौ. पिल्लाई, सौ. इपेन आणि सौ. राजगोपालन यांना आपली सुतारकामाची हत्यारं दाखवली. शिवाय लाकडाच्या उरल्यासुरल्या पट्ट्या तासून तिघींना एकेक लाकडाचा चमचा भेट दिला.

– आता इतक्या वर्षांनंतर हे सगळं आठवून राहेलला मनापासून हसू येत होतं आणि प्रौढ वयातलं मठ्ठ शहाणपण बाजूला ठेवून लहान मुलांच्या खेळात रंग भरणाऱ्या वेलुथाचं कौतुकही वाटत होतं. साड्यांची फडकी गुंडाळून आणि कपाळावर टिकल्या चिकटवून आलेल्या त्या तीन माकडछाप अवतारांना वेलुथानं खऱ्याखुऱ्या स्त्रियांसारखा मान दिला... त्यांचा खेळ विस्कटून न टाकता स्वत:चं 'मोठेपण' विसरून तोही त्यात शिरला आणि चौघांनी मिळून मज्जा केली. मुलांनी आपल्या जगात आपल्यापुरत्या उभारलेल्या एका गंमतगोष्टीला वेलुथानं उद्दामपणानं उधळून तर दिलं नाहीच; पण अति प्रेमानं कवटाळून विस्कटूनही टाकलं नाही.

तसं म्हटलं, तर अशा गंमतगोष्टी उधळायला, उद्ध्वस्त करायला असा कितीसा वेळ लागतो? कौशल्यानं विणत-विणत आणलेली विचारांची साखळी किंवा खूप कष्टानं जपलेली नाजूक पारदर्शी स्वप्नं... सगळंच संपवता येतं निमिषार्धात!!

...विचारांच्या गोफात नवे धागे गुंफणं, नुकत्या जन्मलेल्या कोवळ्या स्वप्नांना स्पर्शाची ऊब देणं मात्र फार अवघड असतं.

पण वेलुथाला किती सहज जमलं ते!

सगळा राडा झाला, त्याच्या फक्त तीन दिवस आधीची गोष्ट. अम्मूनं दिलेली बाटली शोधून त्यातला लालभडक रंग त्यांनी वेलुथाच्या नखांवर लावला होता. त्यानंही शांतपणे रंगवून घेतली आपली नखं. मागच्या दाराच्या व्हरांड्यात वादळ घुसलं, तेव्हा तो तसाच होता. नखांवर रंग थापलेला एक सामान्य सुतार.

स्वत:च्या उच्च जातीचा आणि अंगावरच्या खाकी वर्दीचा अभिमान ठासून भरलेले

उन्मत्त पोलीसवाले त्याच्याकडे बघून खदाखदा हसतच सुटले. एकानं पायानं ढोसत विचारलं,

'काय रे साल्या? ही कसली भानगड?'

तेवढ्यात दुसऱ्यानं दातओठ खाऊन अणकुचीदार खिळे ठोकलेला आपला बूट उचलला.

...मग असे हजारो बूट,

आणि लाखो पाय...

थिजलेल्या, कुजलेल्या तळयात धार धरून उभ्या असलेल्या त्या संगमरवरी मुलाच्या खांद्यावरून शेवटची किरणं आवरून घेत क्षितिजाशी टेकलेला सूर्य नजरेआड झाला. भक्ष्याला विळखे घालून ठार मारणाऱ्या अजगरासारखा अंधार वळवळत आला... आणि अख्खी बाग त्याच्या घशात गेली.

घरातले दिवे लागले.

आपल्या खोलीत टापटिपीनं अंथरलेल्या पलंगावर शांत बसलेला इस्था राहेलला खूप दूरवरून दिसत होता. समोरच्या भकास खिडकीतून त्याची नजर बाहेरच्या अंधारावर खिळलेली. त्या अंधारात बुडून घरातल्या प्रकाशाकडे पाहणारी राहेल त्याला दिसत नव्हती. अर्थातच.

...जणू एका गूढ, गहन, दुर्बोध नाटकात फसलेले दोन कलावंत. कथानक ठाऊक नाही... कुठून कुठं जायचं त्याची रूपरेषा नजरेसमोर नाही. आपापल्या भूमिकांचं ओझं पेलत अडखळत-अडखळत जात राहायचं पुढं. तिसऱ्याच कुणाच्या दु:खानं भरून वाहणारे डोळे पुसायचे... आणि आणखी कुणाच्या शोकाचा भार वाहायचा!

हे कसं बदलणार सगळं?

दु:खाचं ओझं आणि शोकाचा भार?

कसा हलका होणार?

...भल्यामोठ्या फीच्या बदल्यात एखाद्या मांत्रिकाकडे किंवा लांबलचक डिग्रीवाल्या प्रतिष्ठित मानसोपचारतज्ज्ञाकडे गेलं; आणि म्हटलं की 'उतरव सगळी ओझी' तर काय सांगणार तो?

'तुमच्या हातून कसलंही पाप घडलेलं नाही. उलट, तुमच्यावरच अन्याय झालाय. तुम्ही तर छोटी-छोटी मुलं होतात तेव्हा. जे झालं, ते थांबवणं तुमच्या हातांत नव्हतंच मुळी! तुम्ही स्वत:ला पापी का मानता? खरं म्हणजे तुम्हीच सोसलंय सर्वांत जास्त!'

...खरंच, असं विसरून जाता आलं असतं, तर?

जे थांबवणं आपल्या हातांत नव्हतंच, ते थांबवता आलं नाही, म्हणून मनात ठणकणारी ठुसठुस मिटवता आली, तर?

आपल्यावरच अन्याय झालाय, आपणच पिळवटून, विस्कटून गेलो आहोत... असे सहानुभूतीचे, समजुतीचे धागे जमवून एखादं अन्यायग्रस्त संतापाचं कवच विणता आलं असतं स्वत:भोवती, तर?... त्या संतापाच्या धगीत विरघळून गेलं असतं का मनातलं दु:ख?... आणि शोक?

...कदाचित!

मग नजरबंदी झाली असती आणि जे काही झालं, त्याचं भयंकर बोचकं डोक्यावरून उतरवून त्याची ठणकती गाठ तरी सोडता आली असती.

...जे घडलं, ते किती भयंकर होतं, हे पाहून थरकापल्या मनातला संताप मग उफाळून आला असता.

...आपल्यावर झालेल्या अन्यायाच्या भरपाईसाठी कदाचित दादसुद्धा मागता आली असती.

...पण इस्था आणि राहेलच्या गारढोण, थंड मनाच्या तळाशी कधीचा पुरलेला, गाडलेला राग आता शिल्लकच नव्हता उरला. त्या रागातली धुगधुगी कधीच विझलेली आणि दुसऱ्या चिकट हातात बुळबुळीत संत्र्यासारखी वळवळणारी वस्तू... तो ओलसर, गिळगिरीत स्पर्श कसा पुसायचा? कुठं ठेवायचं ते सगळं?

...फेकून द्यावं म्हटलं ओझं; तर ते त्यांच्या रक्तात रुजून गळवासारखं फुटलं होतं मानेवर आणि तसंच राहणार होतं. क्षणाक्षणाची किंमत मोजून वाहावं लागणार होतं.

...जन्मभर.

त्या दिवशी (आपल्याखेरीज) इतर अनेकांच्या हाताला रक्त लागलं, हे इस्थापन आणि राहेलला चांगलं ठाऊक होतं. छळणारे, शोषणारे, तुडवणारे, पिळवटून टाकणारे अनेक जण... पण भक्ष्य मात्र एकच.

...लालभडक रंगवलेली नखं आणि उघड्या पिळदार पाठीवरचं काळपट पिंपळपान... त्या पानामुळेच तर पाऊस यायचा लवकर.

तो गेला.

विश्वाच्या छाताडावर त्याच्या आकाराचं एक भलंमोठं भोक पडलं.

...आणि त्या भोकातून काळ्याकुट्ट चकचकीत डांबरासारखे अंधाराचे चिकट लोट भळभळत राहिले.

...त्यातूनच त्यांची आई झपकन निघून गेली. मागं वळून न बघता... निरोपसुद्धा न घेता. एकदम... अचानक. अंधाराच्या चिकट लाटांमध्ये गुदमरणाऱ्या, भेलकांडणाऱ्या मुलांना मागं सोडून.

हिंदकळणाऱ्या आयुष्याची होडी बांधावी काठाशी म्हटलं, तर जवळ दोरखंड नाही आणि विश्वासानं विसंबावं, असा किनाऱ्यावरला ठिय्या... तोही नाही.

खूप वेळानं चंद्र उगवला. चोहीकडून सरसरत धावलेल्या अंधाराच्या अजगरानं गिळलेलं जग थोडंसं फिकुटलं. गाई-म्हशींच्या पोटातला घास पुन्हा रवंथासाठी तोंडात यावा, तसा अजगराच्या घशातला अंधार उजळला.

राहेल अजूनही बागेतच होती.

हळूहळू वाऱ्याची दिशा बदलली आणि दूरवरून कुठूनतरी मृदंगम्चा घुमारा ऐकू येऊ लागला. कुणीतरी प्रेमानं 'भेट' द्यावी, तसा ओळखीचा आवाज... आणि त्याच्या आवतीभोवती गुंफलेल्या गोष्टी...

कोणे एके काळी आटपाट नगरात एक...

राहेल कान देऊन ऐकत राहिली.

स्वच्छ चांदण्या रात्री आयमेनेमच्या देवळातला हा आवाज कथकली नृत्याच्या कार्यक्रमाची वर्दी देत अख्ख्या पंचक्रोशीत पसरायचा... ते आठवलं आणि राहेल निघाली.

त्या मृदंगम्च्या घुमाऱ्यानं कसल्या आठवणी जागवल्या होत्या... उतरत्या पाख्याचं छप्पर, चुन्यानं रंगवलेल्या पांढऱ्याधोप भिंती, पोटात तेल भरून रात्रभर जळणारे चकाकते पितळी दिवे आणि त्या मंद प्रकाशात उजळून दिसणारं काळंभोर, तेल पिऊन चमकणारं जुनं लाकूड!

प्रकरण १०

नदी... होडीच्या गर्भातली!

कापलेले कडू भोपळे, चाकू-सुऱ्या आणि बोटांवर चढवायच्या रंगीबेरंगी 'निरोध'वाल्या फुग्यांनी भरलेले ट्रे...

छोटे-छोटे कांदे आणि लसणाची लठ्ठ पोती...

नुकत्याच तोडलेल्या कच्च्या काळ्या मिऱ्यांचे हिरवे ढीग...

डुकरांना खाऊ घालण्यासाठी साठवून ठेवलेल्या केळ्याच्या सालींचे डोंगर...

पॅराडाईज पिकल्सच्या रंगीबेरंगी लेबलांनी भरलेली कपाटं...

गोंद...

ब्रश...

साबणाच्या फेसाळ पाण्यात बुडवलेल्या रिकाम्या बाटल्यांची मोठमोठी लोखंडी घमेली...

मग लिंबाचं हे एवढं सरबत...

मग द्राक्षाचं...

सगळं ओलांडत-ओलांडत इस्था आत-आत घुसला.

आत सगळा अंधारच होता. जाळीच्या दारातून आणि छपरावरच्या काचेतून पाझरतील, तेवढेच मळकट प्रकाशाचे कवडसे. शिवाय व्हिनिगर आणि हिंग यांचा नाकात घुसणारा भपकारा; पण इस्थाला त्या वासाची सवय होती. त्याला आवडायचाच मुळी तो वास. शेवटी सगळीकडे फिरून-फिरून त्यानं चांगलीशी जागा शोधलीच. भिंतीला लागूनच केळ्यांचा (बेकायदेशीर) जॅम शिजवलेली एक मोठ्ठी लोखंडी कढई थंड करत ठेवली होती. ती कढई आणि भिंत यांच्यामधल्या सापटीत इस्था बसला.

केळ्यांचा जॅम अजून खदखदतच होता. शेंदरी द्रावणावर जमलेल्या गुलबट फेसाचे ढीग थोडे उसवत होते अधूनमधून... चिरडलेल्या, कुस्करलेल्या केळ्यांचे जीव छोट्या-छोट्या बुडबुड्यांनी वरून खाली सैरावैरा धावत होते... पण त्यांना कोण वाचवणार?

तो ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला माणूस कधीही येऊन टपकेल. कोणत्याही क्षणी. कोचिन-कोट्टायम बस पकडली की, आलाच आयमेनेमला. मग अम्मू त्याचं स्वागत करील कौतुकानं. त्याला चहा देईल किंवा कदाचित अननसाचं सरबत. बर्फ घातलेलं. पिवळं पिवळं. ग्लासात वळवळणारं.

कढईत ठेवलेला लांबलचक लोखंडी झारा पकडून इस्था खूप वेळ जॅम ढवळत राहिला.

त्या घट्ट, चिकट द्रावणावर जमलेल्या गुलबट फेसात तऱ्हेतऱ्हेचे आकार दिसत होते... आणि बघता-बघता विरघळून, मरून जात होते.

दुखावलेल्या, चिरडलेल्या पंखांचा कावळा.
घट्ट आवळलेल्या कोंबडीच्या नख्या.
दु:खानं पिळवटून गोलाकार वळवळणारा भोवरा.
– आणि त्यांना वाचवणारं मात्र कुणी नाही. कुणीच नाही.

लोखंडी कढईतला तो आटत चाललेला जॅम ढवळता-ढवळता इस्था दोन गोष्टींचा विचार करत होता –
(अ) कोणत्याही क्षणी काहीही घडू शकतं.
आणि दुसरं म्हणजे
(ब) आपण आपलं तयारीत राहिलेलं बरं.
विचार करून-करून हे दोन निष्कर्ष पक्के केल्यावर इस्था स्वत:वरच खूश झाला.
...विस्कटलेला कोंबडा डोक्यावर झुलवणारा, ओबडधोबड दातांचा, जॅम ढवळणारा जादूगार! मॅकबेथच्या चेटकिणींसारखा!
तो हसत होता खदाखदा.
...खालून विस्तव पेटतोय... आणि वर उकळणारा जॅम.

काळयाभोर कव्हराची, पांढऱ्या कण्यानं बांधलेली एक देखणी, नवीन वही अम्मूनं नुकतीच 'नव्या पाककृतीं'साठी घेतली होती. माम्माचीची हातखंडा पाककृती – केळयांचा जॅम त्या वहीत नीट लिहून घेण्याची परवानगी खुद्द अम्मूनंच दिल्यामुळं इस्था भलताच खूश झाला होता. त्यानं चांगल्यांतल्या चांगल्या अक्षरात कोरून कोरून पाककृती लिहून काढली.

केळयांचा जॅम
पिकलेली केळी कुस्करा. पुरेसं पाणी घालून हा गर चांगला नरम होईपर्यंत भरपूर आचेवर शिजवा.
पातळ फडक्यात घालून शिजवलेला गर चांगला पिळून घ्या.
तेवढीच साखर मोजून बाजूला ठेवा. गरातून पिळलेला केळयाचा रस शेंदरी
रंगाचा होईपर्यंत शिजवा आणि जवळपास निम्म्यानं आटवा.

जिलेटीन *(*पेक्टिन*)* करण्याची कृती *:*
प्रमाण *:* एकास पाच.
म्हणजे चार चमचे पेक्टिन असल्यास, वीस चमचे साखर.

– इस्थाला नेहमी वाटे, की तीन मजबूत हातोडे एकमेकांचे भाऊभाऊ असले

पाहिजेत... आणि पेक्टिन हा त्यातला धाकटा. मोठा हेक्टिन आणि मधला अॅबेडेन्गो. 'नोहाच्या मुलांच्या जिद्दीनं रिमझिमत्या पावसात ते तिघं एक भलंमोठ्ठं लाकडी जहाज बांधतायत.' असलं काहीतरी चित्र इस्थाच्या डोक्यात नेहमी तरळत असायचं. ते तिघं स्वच्छ दिसायचे त्याला... उलटून जाणाऱ्या क्षणाक्षणाशी झगडत जिवाचं रान करणारे... ढगांनी झाकोळून आलेल्या वादळी आकाशाच्या पोटात घुमणारा हातोड्यांचा आवाज... आणि शेजारच्याच अंधारलेल्या गूढ जंगलात प्रलयाच्या भीतीनं एकमेकांना बिलगून उभे असलेले प्राणी...

मुलगी-मुलगा.
मुलगी-मुलगा.
मुलगी-मुलगा.
...फक्त जुळ्यांना प्रवेश नव्हता.

पुढची पाककृती इस्थानं त्याच्या ऐटबाज वळणदार, तिरक्या अक्षरात लिहून काढली होती; पण अक्षरं आकार घेता-घेता कंटाळलेली आणि वाक्यात शिरायचं म्हणून भलतीच त्रासलेली. त्यामुळं तिरका झोक पुढं अधिकच तिरका तिरका होत गेलेला...

आटवलेल्या रसात पेक्टिनचं मिश्रण घाला. आणखी थोडा वेळ *(पाच मिनिटं)* शिजवा.
विस्तव चांगला मोठ्या आचेचा ठेवा.
मग साखर घालून घट्टसर होईपर्यंत ढवळा.
थंड होऊ द्या.
हा जॅम चवीला खूप छान लागतो आणि करायलाही सोप्पा... तुम्हाला खूप खूप आवडेल.

ऱ्हस्व-दीर्घाच्या चुका होत्याच थोड्याशा, शिवाय शेवटची ओळ इस्थानं स्वत:च्या मनानंच जोडलेली होती, 'हा जॅम चवीला खूप छान लागतो आणि करायलाही सोप्पा. तुम्हांला खूप-खूप आवडेल.'

जॅम ढवळता-ढवळता इस्थाच्या डोक्यातली चक्रं फिरतच होती. अचानक त्याच्या बुटांमधून काहीतरी सळसळत वर आलं आणि त्याला एकदम तिसरा विचार सुचला –

(क) होडी.

नदी पार करून जाण्यासाठी होडी... अक्कारा. सगळं सामानसुमान घेऊन पलीकडं जायचं, तर होडी लागणारच. किराणा माल, धान्यधुन्य, काड्याच्या पेट्या, कपडे, भांडीकुंडी, नेहमी लागणाऱ्या वस्तू. त्या नदीतून पोहून कशा नेता येतील?

इस्थाच्या अंगावर काटा उभा राहिला. कढईतला जॅम ढवळता-ढवळता त्याला काठी

रोवून होडी नदीत लोटल्यासारखंच वाटायला लागलं. गोलगोल फिरता-फिरता मागं-पुढं हेलकावे सुरू झाले. कढईतल्या चिकट शेंदरी नदीच्या लाटा उसळल्या आणि ओणम सणाच्या दिवशी होड्यांच्या शर्यतीत गाजणारं गाणं पॅराडाईज पिकल्सच्या फॅक्टरीत भरून ओसंडू लागलं.

थैय्य थैय्य थक, थैय्य थैय्य थोम...

एन्दा दा कोरांगाचा, चंडी इथरा थेंन्जाडू?
(माकडा माकडा हूप, तुझ्या शेंडीला तूप... तुझे कुल्ले कसे लाल!)

पॅन्डील थूरन पोयाप्पोल, नेराक्कमुथ्थीरी नीरंगी न्जा
(मद्रासला गेलो. तिथं पादलो... हगलो... हगलो, म्हणून रक्त आलं काल)

ओणमच्या गाण्यातली असली भोचक, अश्लील प्रश्नोत्तरं चालू असतानाच अचानक राहेलच्या हाका ऐकू आल्या...

'इस्थाऽ इस्थाऽ इस्थाऽऽऽ'

– इस्था ढिम्म हलला नाही. कढाईत थंड होणाऱ्या जॅमच्या नदीत होडीवरलं गाणं चालूच होतं.

थिय्योम
थिथोम
थराक्का
थिथोम
थीम थीम थीम...

– फॅक्टरीचं जाळीचं दार करकरत उघडलं. चुण्याचुण्यांचा झालरवाला फ्रॉक घातलेली, डोळ्यांवर लाल काचांचा पिवळा गॉगल चढवलेली, डोक्यावर टेंगुळं फुटलेली मुलगी दारातून आत डोकावत होती.

फॅक्टरीच्या आत सगळं लालमलाल... खारवलेली लिंबं लाल... तिखटामिठातल्या कैऱ्या लाल... छापील लेबलं भरलेलं कपाट लाल... आणि धुरकट, मातकट सूर्याचे आत घुसलेले कवडसेही लालम्लाल.

जाळीचं दार फटाक्कन बंद झालं.

'लव्ह इन टोकियो'मध्ये बांधलेलं कारंजं डोक्यावर मिरवीत राहेल आत आली. कसल्यातरी गाण्याचा आवाज तिला कधीपासून ऐकू येत होता. व्हिनिगरचा वास ओलांडून लोणच्याच्या बरण्यांच्या डोक्यावरून हवेत दरवळणारा एका स्त्रीचा तारस्वरातला आवाज... कुणी नन गातेय का?

जॅमनं भरलेल्या लोखंडी कढईवर ओणवलेला इस्था राहेलला खूप वेळानं दिसला.

'काय हवंय? कशाला आलीस इथं? –' तिच्याकडं ढुंकूनही न बघता इस्थानं प्रश्न केला.

'काही नाही –' राहेल म्हणाली.

'मग तडमडत आलीस कशाला इथं?'

– राहेल गप्पच बसली. काही वेळ विचित्र, भयाण आणि भांडकुदळ शांतता.

'तू हा जॅम का ढवळतोयस?' – राहेलनं विचारलं.

'मी काय वाट्टेल ते करीन. भारत हा एक स्वतंत्र देश आहे.'

– आता यावर कोण वाद करणार?

भारत हा एक स्वतंत्र देश होता मुळी.

तुम्ही मीठ बनवा... जॅम ढवळा... वाट्टेल ते करा. कोण अडवणार?

फॅक्टरीचं जाळीचं दार उघडून ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाला माणूस आला गपकन आत, तर त्याला कोण अडवणार? तो कधीही येऊ शकतो. वाट्टेल तेव्हा येऊ शकतो.

– आणि अम्मू त्याला अननसाचं पिवळं सरबत देऊ शकते. बर्फ घालून.

– कुणाला कोण अडवणार?... या स्वतंत्र देशात?

फॅक्टरीतल्या लोणच्याच्या बरण्यांना वरून चांगले घट्टमुट्ट दादरे बांधले होते. त्यांतल्याच एका बरणीवर बसून राहेलनं समोर पडलेल्या रंगीबेरंगी 'निरोध' टोप्या बोटांवर चढवून बघायला सुरुवात केली. छपराच्या आढ्यावर बसलेलं औसा घुबड दोघा जुळ्यांमध्ये पसरलेल्या सन्नाट्याच्या तेलकट तिखट वास घेत नजरा टवकारून होतं. रक्ताखेरीज भळभळणारा दोघांमधला ठणकाही त्याच्या नजरेतून सुटला नाही.

राहेलची बोटं आता रंगीबेरंगी झाली होती.

पिवळं बोटं... हिरवं बोट... निळं... लाल... आणि पुन्हा पिवळं बोट.

कढईतला आटत चाललेला जॅम ढवळत-ढवळत इस्था एकटक तिकडंच बघत होता.

राहेल अचानक उभी राहिली. दुपारची एक डुलकी काढणं राहूनच गेलं होतं शेवटी.

'कुठं चाललीस?'

'कुठंही जाईन... तुला काय करायचंय?'

राहेलनं फटाफट बोटांवरच्या रंगीत टोप्या काढून टाकल्या. तिची बोटं पुन्हा पहिल्यासारखी झाली. पुन्हा तोच पहिला 'बोटांचा रंग... ना पिवळा... ना हिरवा... ना निळा... ना लाल... ना पिवळा.

'मी अक्काराला चाललोय,' इस्था वर न बघता म्हणाला, 'तिथून हिस्टरी हाऊसमध्ये जाणारेय्.'

राहेल तत्क्षणी थांबली.

तिच्या काळजावर बसलेल्या त्या भोचक पतंगानं हलकेच आपले केसाळ पंख उघडले होते.

उघडले.

आणि मिटले.

आतल्या आत सगळा नुसता थरकाप.

'हिस्टरी हाऊसमध्ये? का पण?' – राहेलनं विचारलं.

'कारण कोणाच्याही बाबतीत कधीही काहीही घडू शकतं,' इस्था म्हणाला, 'आपण आपलं तयार राहिलेलं बरं.'

– यावर तरी काय बोलणार?

करी सैपूच्या त्या घराकडे सगळ्यांनी पाठ फिरवली होती. तिकडे कुणी म्हणता कुणी फिरकत नसे. 'त्या घराकडे डोळ्यांत तेल घालून नजर ठेवणारा मीच शेवटचा माणूस,' असा वेल्लय्या पाप्पेनचा दावा होता. त्या घरात कसलीतरी विचित्र भुताटकी आहे, असंही तो नेहमी म्हणायचा. 'हिस्टरी हाऊस'मध्ये एकदा खुद्द करी सैपूच्या भुताशीच आपली कशी गाठ पडली, हे त्यानं जुळ्यांना रंगवून- रंगवून सांगितलं होतं. साधारण दोनेक वर्षांपूर्वीची गोष्ट. क्षयाच्या खोकल्यानं हैराण झालेल्या त्याच्या बायकोसाठी – चेल्लासाठी – जायफळ आणि ताज्या लसणीचं चाटण करायचं, म्हणून जायफळं आणण्याकरता वेल्लय्या पाप्पेन नदीपलीकडे गेला होता. अचानक त्याला पेटलेल्या चिरुटाचा ओळखीचा वास आला (मग आठवलं, की पाप्पाचीसुद्धा याच ब्रँडचा चिरुट ओढायचे, म्हणून इतक्या पटकन तो वास ओळखता आला.). वास कुठून येतोय म्हणून वेल्लय्या पटकन मागं वळला आणि वासाच्या दिशेनं त्यानं हातातला कोयता भिरकावला. त्या कोयत्यात अडकलेलं करी सैपूचं भूत मग त्यानं रबराच्या झाडाला ठोकून टाकलं. वेल्लय्या पाप्पेन जुळ्यांना म्हणाला, 'ते अजूनही तिथंच आहे. अजून तो कोयता दिसतो... त्याची लखलखीत धार आणि पिवळट रक्त. करी सैपूचं ते भूत अजूनही रात्री-बेरात्री रडतं, 'सिगारेट द्या' म्हणून कळवळून ओरडतं, असंही वेल्लय्या पाप्पेननं जुळ्यांना सांगून टाकलं होतं.

वेल्लय्याला शेवटी जायफळाचं झाड सापडलंच नाही. शिवाय स्वत:साठी एक नवा कोयताही विकत घ्यावा लागला; पण त्याला या नुकसानाची पर्वा नव्हती. एक डोळा फुटका असूनही आपण पापणी लवायच्या आत मागं वळून नेम धरून कोयता फेकला आणि समलिंगी संभोगाची घाणेरडी सवय जडलेलं एक रक्तपिपासू, वखवखलेलं भूत कायमचं जेरबंद करून टाकलं, यातच तो जाम खूश होता.

– मोठ्या कौशल्यानं गुळवलेल्या त्याच्या या शौर्यगाथेवर लोकांचा विश्वास बसत होता. शिवाय रबराच्या खोडात रूतलेला कोयता तिथंच होता; तोवर ठीकच होतं

म्हणायचं सगळं.

वेल्लय्या म्हणायचा, मला ठाऊकेय प्रत्येक गोष्ट; पण मुद्द्याच्या गोष्टींचा त्याला साधा गंधसुद्धा नव्हता. त्याला हे नव्हतं माहीत, की करी सैपूच्या त्या घराला 'हिस्टरी हाऊस' म्हणतात... दारांना भलीथोरली कुलपं आणि खिडक्या सताड उघड्या. लांब लांब नखं वाढवून घरात फिरणारे पूर्वज तासन्तास भिंतीवरच्या गुबगुबीत पालींशी कुजबुजत बसतात. 'हिस्टरी हाऊस'च्या मागं एक व्हरांडा आहे आणि तिथं माणसांची उलटसुलट झाडाझडती घेऊन त्यांना त्यांच्या कर्माची फळं भोगायला लावण्याची व्यवस्था आहे, हेदेखील त्याला ठाऊक नव्हतं. केवळ नजरचुकीनं, हलगर्जीपणानं हातून घडलेले साधे-साधे अपराध सडत कुजत पडले, म्हणजे भयंकर प्रलय ओढवतो... बघता-बघता सगळं उद्ध्वस्त होतं... याची तर वेल्लय्याला साधी कल्पनाही नव्हती आणि हेही नव्हतं माहीत, की एके दिवशी पापपुण्याच्या जमाखर्चाचं पुस्तक उघडून इतिहास कस्सून झडती घेईल; तेव्हा वेलुथाला चांगली भरभक्कम बाकी चुकती करावी लागेल; आणि त्याची पावती इस्थाच्या कपाळावर अश्वत्थाम्याच्या भळभळत्या जखमेसारखी जन्मभरासाठी कोरली जाईल.

करी सैपू स्वप्नांची शिकार करायचा आणि त्यांचं रंगरूप पार बदलून टाकायचा, हेदेखील वेल्लय्याला ठाऊक नव्हतं. लहान मुलं केकवर चिकटवलेल्या मनुका आणि बेदाणे वेचून खातात; तशी तो जाणाऱ्या-येणाऱ्यांच्या मनातली स्वप्नं वरच्यावर खुडून घ्यायचा आणि त्या स्वप्नांचा खेळ मांडायचा. त्यातून जुळ्या मुलांच्या मनातली कोवळी-कोवळी स्वप्नं वेचून मटकावणं, त्याला फारच आवडायचं.

बिचारा वेल्लय्या पाप्पेन. हाडापेरानं थकलेल्या त्या वृद्ध, आंधळ्या माणसाला काहीच धड ठाऊक नव्हतं. तिचा अधिकृत प्रतिनिधी म्हणून नियती शेवटी आपल्यालाच निवडणार आहे आणि रक्तरंजित दहशतीनं थरारलेल्या आपल्या अश्रूंनीच अखेरच्या प्रलयाचा प्रारंभ होणार आहे; हे त्याला आधी कळलं असतं, तर ज्याला-त्याला आपल्या शौर्याच्या कहाण्या सांगत बिचारा गावभर दुडदुडत फिरला तरी नसता. नुकत्याच वयात आलेल्या नखरेल कोंबड्यासारखा वेल्लय्या पाप्पेन आयमेनेमच्या बाजारात मोठ्या तोऱ्यानं फुशारक्या मारत मिरवत होता. लोखंडाच्या चवीनं जीभ आंबली होती, तरीही तोंडात कोयता धरून आपण कसे नदीपार पोहून गेलो, पलीकडे पोचल्यावर काचेच्या (गहाणवट) डोळ्यांत शिरलेली नदीतली चिवट वाळू धुऊन काढण्याकरता क्षणभर गुडघे टेकले; तेवढ्यापुरताच तोंडातला कोयता कसा खाली ठेवला होता (पावसाळ्याच्या दिवसांत नदीच्या रोरावत्या प्रवाहात अशी वाळू नेहमीच असे), धुराचा वास नाकाला जाणवल्या क्षणी गर्रकन् वळून कसा आपण जीव तोडून त्या धुराच्या दिशेनं कोयता फेकला आणि भुताला कायमचं जेरबंद करून टाकलं, याची लांबलचक कहाणी भेटेल

त्याला सांगण्याचा वेल्लय्या पाप्पेननं सपाटाच लावला होता. सगळं कसं एका क्षणात, डोळ्याचं पातं लवतं न् लवतं तोच झालेलं; पण त्याची गोष्ट मात्र भलतीच लंबीचौडी.

नियतीच्या एकूण खेळात आपली भूमिका नेमकी काय आहे, हे वेल्लय्या पाप्पेनला उमजलं, तोवर फार उशीर झाला होता. आता मागं जाणंही शक्य नव्हतं. त्यानं स्वत:च त्याच्या पावलांचे ठसे पुसून टाकले होते. पावलांमागून सरपटत गेलेल्या झाडूच्या खुणासुद्धा दिसेनाशा झालेल्या... काहीच नव्हतं उरलं.

कोंडलेल्या फॅक्टरीत पुन्हा एकवार सन्नाटा पसरला... जुळ्यांभोवती पुन्हा घट्टमिटल्या मौनाचे वेढे पडले; पण हे मौन थोडं निराळं होतं... जुन्या, वृद्ध नदीच्या काठाशी नांदावं, तसं. समुद्रात जाळं पसरवून बसलेले धूर्त कोळी आणि पाण्यात फडफडणाऱ्या मासोळ्यांमध्ये असावा, तसा सन्नाटा.

'पण कम्युनिस्टांचा भुतांवर विश्वास नसतो,' करी सैपूच्या भुताचा प्रश्न सोडवण्यासाठीची गहनगंभीर चर्चा पुढं नेत इस्था म्हणाला पर्वतांच्या कुशीतून वाहणारे झरे असावेत, तसं त्या दोघांमधलं संभाषण. कधी दोन डोंगरांमधून खळखळत जाताना दिसायचं, तर कधी असायचं, पण काही ऐकूच यायचं नाही.

'आपण काय कम्युनिस्ट होणार आहोत का?–' राहेलनं विचारलं.

'व्हावं लागेल कदाचित,' इस्थानं वस्तुस्थिती सांगितली.

– तेवढ्यात कोचु मारियाच्या केकचे उरलेसुरले तुकडे खात फॅक्टरीच्या दिशेनं येणाऱ्या निळ्या सैन्याची कलकल कानांवर आली; त्यामुळं दोन्ही कॉम्रेड्सना आपल्या गुपिताचं लोणचं घालून बरणीच्या तोंडाला घट्ट दादरा बांधावा लागला.

औसा घुबडाच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात कैऱ्यांमध्ये चिणून भरलेल्या कम्युनिस्ट गुपिताचं लोणचं घातलेली बरणी बाजूला करून ठेवली गेली.

– मग संध्याकाळी काय काय करायचं, हेही ठरलं.

– कॉम्रेड राहेल दुपारची डुलकी काढण्याकरता घरी जाईल आणि अम्मूचा डोळा लागेपर्यंत जागी राहील.

– (बेबी कोचम्माच्या हातात खुपसलेला) तो लाल बावटा जिथं असेल, तिथून कॉम्रेड इस्था शोधून काढील आणि नदीकाठी राहेलची वाट बघत थांबेल.

आणि नंतर दोघेही.

(ब) तयारीत राहण्याची तयारी करण्यासाठी काय काय तयारी करावी, ते ठरवतील.

अम्मूच्या बेडरूममध्ये काळोख होता. लोणच्याचे डाग पडलेला चुण्याचुण्यांचा झालरवाला फ्रॉक हळूच येऊन खोलीच्या मधोमध उभा राहिला.

बाहेर तापलेलं ऊन, काहीशी सावध हवा आणि उष्म्याचे झोत. फ्रॉकच्याच रंगाची मॅचिंग चड्डी घातलेली राहेल अम्मूशेजारी पडलेली... टक्क जागी होती. पलंगपोसावर

‘क्रॉसस्टिच’नं भरलेल्या निळ्या फुलांची नक्षी रुतून अम्मूच्या गालावर तयार झालेलं डिझाईन राहेलला दिसत होतं. निळ्या फुलांच्या संध्याकाळचे सगळे निळे आवाज तिला ऐकू येत होते.

छतावर गरगरणारा पंखा. खिडकीवरच्या पडद्यांमागून क्षितिजावर उतरणारा सूर्य.

खिडकीभोवती घिरट्या घालणाऱ्या त्रस्त गांधीलमाशीची चिडकी, धोकादायक, चावरी गुणगुण.

काहीशा घाबरलेल्या पालीचे मिचमिचे डोळे.

मागच्या अंगणात कोंबडीच्या पिलांचा कालवा.

उतरत्या उन्हात वाळत पडलेल्या धुण्याचे सुकणारे आवाज. कुरकुरीत झालेले पलंगपोस. खळीचं पाणी पिऊन कडकडीत झालेल्या साड्या... पांढरा रंग आणि जरीची किनार.

पिवळ्या-पिवळ्या दगडांवरून तुरूतुरू धावणाऱ्या लाल मुंग्यांच्या रांगा.

उकाड्यानं त्रस्त होऊन दूर कुठेतरी हंबरणारी गाय. हम्माऽऽऽऽ

...आणि इंग्लिश साहेबाच्या दृष्ट, कावेबाज भुताचा वास. रबराच्या झाडात चिणलेला आणि येणाऱ्या-जाणाऱ्यांचा थांबवून अत्यंत ‘इंग्लिश सभ्यते’नं त्यांच्याकडे चिरुट मागणारा.

“एक्सक्यूज मी, तुझ्याकडे तो अंऽऽऽ ब्रॅण्डचा चिरुट नसेलच ना कदाचित... आहे का, हो?”

...मध्येच शाळेतल्या मुलांशी बोलणाऱ्या शिक्षिकेचा अतिप्रेमळ, आर्जवी स्वर.

ओऽऽ डियर.

...आणि तिची वाट पाहत थांबलेला इस्था. रेव्हरंड ई. जॉन आयपे यांनी थेट मंडालेहून आणून आयमेनेममध्ये नदीच्या काठावर लावलेल्या आंब्याच्या झाडाखाली.

त्या झाडाखाली इस्था आणि राहेल नेहमी बसत.

तिथंच बसला होता तो.

भुरकट, करडा असा कसलातरी मोठ्ठा ढीग. सगळीकडे शेवाळं पसरलेलं. मधूनमधून दगडफुलांच्या चांदण्या आणि कुठून कुठून तर नेच्याची रोपं उगवलेली. जे काही होतं, ते जमिनीत रुतत, रुजत चाललं होतं. लाकडाचा ओंडका म्हणावा, तर तोही नाही... आणि दगड धरून चालावा, तर तसंही नाही. गूढच सगळं.

विचारांची चक्री थांबण्यापूर्वीच खडबडून उठलेली राहेल नदीच्या दिशेनं धूम पळत सुटली होती.

...आधी स्वयंपाकघर... मग चुण्याचुण्यांचा अॅप्रन घातलेल्या गेंड्यासारखी ठार झोपलेली कोचु मारिया... या सगळ्याला ओलांडून घरासमोरच्या फॅक्टरीला वळसा

घालून हिरव्या उन्हातून धाव धाव धावणारे अनवाणी पाय... आणि त्यांच्यामागून भिरभिरत निघालेली पिवळी गांधीलमाशी...

कॉम्रेड इस्था तिथंच बसला होता.

झाडाखालच्या त्या नेहमीच्याच जागी.

हातातला लाल बावटा त्यानं शेजारीच जमिनीत रोवून टाकलेला. जणू चालतंबोलतं हलतंफिरतं प्रजातंत्र... कपाळावर कोंबडा झुलवणाऱ्या क्रांतीच्या ललकाऱ्याच!

इस्था बसला होता तो उंचवटा तोच, तसाच... शेवाळानं झाकलेला. छोट्या छोट्या नेच्याच्या फताड्या पानांखाली लपलेला.

त्याच्यावर टिचकी वाजवली, की आतून ठॉक् ठॉक्... पोकळ आवाज येत.

काहीतरी लांबुडकं होतं. इंग्रजीतल्या आठाच्या आकड्यासारखं.

...पण निश्चल.

पोटात नुसता शांततेचा कल्लोळ भरलेला. खोल बुडून आळसावत पसरलेली. कधी तरंगणारी... जोरानं हेलकावणारी, तर कधी अचानक झेप घालत सुळऽऽकन वळणारी शांतता!

– आणि भर दुपारच्या उन्हात पोरांनी कालवा करावा, तशी त्या शांततेवर भिरभिर भिरभिरणाऱ्या पतंगांची टोळी.

टोप्या काढून फेकलेल्या, उघड्या नग्न बोटांनी राहेलनं सहज म्हणून ती शांतता खरवडायला सुरुवात केली. तिथली नेच्याची रोपं उपटून फेकली... दगड बाजूला केले... रस्ता शोधत-शोधत बोटं आत-आत खोलवर गेली, तर एक ओलसर, दमट नांगर... त्यावर एक मोठ्ठी खाच... आणि इंग्रजीतल्या आठाच्या आकड्यासारखं लांबुडकं काहीतरी...

बोटं उसकत, उचकटत खाली खाली खोल गेली.

एक... दोन... साडेऽऽ माडेऽऽ तीनऽऽऽऽ

खरंच, एका क्षणात काहीही होऊ शकतं.

तिथे होती एक छोटीशी होडी-लांबुडका, लाकडी, पोकळ आकार.

इस्था बसला होता, त्या उंचवट्याच्या पोटातून राहेलनं शोधून काढलेली... होडी.

चंद्रप्रकाशात उतरलेलं अम्मूचं शरीर ऐन मध्यरात्री नदीपल्याड वाहून नेईल, अशी होडी... भरदिवसा ज्या माणसावर तिची मुलं जीव टाकत; त्या माणसावर भर रात्री सर्वस्व उधळण्यासाठी नदी ओलांडणाऱ्या अम्मूसाठीची होडी...

इतकी जुनी, की जमिनीच्या पोटात रुजून रुजून तिला मुळं फुटायची वेळ आली होती.

..औरस चौरस फांद्या पसरून उभं असलेलं होडीचं झाड. होड्यांची पानं-फळं म्हणून

मध्येमध्ये लटकलेल्या होड्याच होड्या. तळाशी सुकून गेलेल्या गवताचा होडीच्या आकाराचा निष्प्राण तुकडा.

वर्षानुवर्षं अंधाराच्या पोटात गुडूप बसलेलं ते गर्द, घनदाट जग एकाएकी उघडंवाघडं झालं. निराधार आणि पोरकं.

पांढऱ्या वाळवीचा बुजबुजाट.

जिकडे-तिकडे बिळं खोदून लपलेले पांढरट किडे.

पांढरट काड्यांची व्हायोलिन्स घेऊन ध्यानस्थ बसलेले पांढरे नाकतोडे.

...आणि त्या व्हायोलिन्समधून पाझरणारं पांढरं उदास, दुर्मुखलेलं संगीत.

कधीrची मरून पडलेली एक पांढरी गांधीलमाशी.

आणि उन्हाची धग लागताच आक्रसलेली, चुरगळलेली सापाची कात.

हे छोटंसं होडकं जाईल पुन्हा पाण्यात? राहील उभं नदीच्या छातीवर? की थकलं असेल पार; म्हातारं झालं असेल?... किंवा कदाचित मेलंसुद्धा असेल?

– जुळयांनी सहजच नदीकडं नजर टाकली.

मीनाचल.

भुरकट, हिरवी, खोल. पोटात मासे भरलेली. तिच्यात डोकावणारी झाडं... आकाश... आणि रात्री तुकड्यातुकड्यांनी विखुरणारी चंद्राची हजार प्रतिबिंबं.

पाप्पाचींच्या लहानपणी एकदा प्रचंड मोठं वादळ झालं होतं. त्या वादळात काठावरून उन्मळून पडलेलं चिंचेचं झाड अजून नदीच्या कुशीत तसंच विसावलेलं... आजूबाजूनं वाहणाऱ्या हिरवट काळपट पाण्यानं भिजून-भिजून विरघळलेल्या सालीचं नग्न झाड.

काठावरून थोडी खाली उतरणारी नदी त्यांच्या चांगल्या ओळखीची होती. तिथून पुढं मात्र रुंदावलेला खोल जबडा... वरवर गरगरणाऱ्या भोवऱ्याचं, आतून जबरदस्त खेच असलेलं खोल पाणी... सगळंच गूढ... भीषण... भीतीनं पोटात असा खड्डा, की काही कळायचंच नाही.

...पण त्या खोल खेचणाऱ्या भोवऱ्यांच्या आधी काठावरून नदीत उतरणाऱ्या (तेरा) निसरड्या दगडी पायऱ्यानंतरचा मऊ मऊ चिखल... कोमारकणम 'बॅक वॉटर'मधून संध्याकाळी वाहत येणारा झाडोरा... सुकल्या गवताच्या ओल्या काड्या आणि वाहतावाहता एकमेकात गुंतलेल्या काटक्यांचं जंजाळ... पायऱ्या उतरत- उतरत खाली गेलं, की पायांशी हुळहुळत येणारे छोटे छोटे मासे... सपाट पोटांचे पालथी, चंदेरी पराल, काट्याकाट्यांच्या गर्दीने भरलेले कुरी मासे आणि कधीकधी तर करीमीनसुद्धा.

हे सगळं त्यांना ठाऊक होतं. सगळयांशी मस्त मैत्रीही होती.

याच काठाजवळच्या उथळ पाण्यात चाकोनं त्यांना पोहायला शिकवलं होतं. आत

उतरायचं आणि चाकोच्या गरगरीत ढेरीभोवती हात मारत-मारत पाण्याची कारंजी उडवायची. एरवी भीती घालणाऱ्या पाण्याच्या कुशीत शिरलं, की आत किती मज्जा असते; हेदेखील त्यांना इथंच समजलं होतं.

याच काठाशी त्यांनी मासेमारीचेही पहिलेवहिले धडे गिरवले होते. तासलेल्या पिवळ्या बांबूला एक लांबलचक दोर बांधून वेलुथानं त्यांना गळ बनवून दिला होता. जांभळी जांभळी गांडूळं वेचून वेचून त्या गळाच्या टोकाला टोचायची आणि गळ नदीत टाकून तासन्तास मस्त मजेत बसून राहायचं.

कोळ्यांची मुलं आईच्या पोटातूनच शिकून येतात त्या 'सन्नाट्याच्या भाषे'चे धडे इस्था आणि राहेलनं याच काठावर पहिल्यांदा गिरवले... भरारा भिरभिरणाऱ्या पतंगांच्या उडत्या रोमहर्षक सुळकांड्यांमागून धावणारी नजरही याच काठावर 'तयार' झाली.

नदीनं त्यांना आणखीही खूप शिकवलं.

वाट पाहणं.

जे हवं, त्यावर अनिमिष नजर ठेवून असणं.

घट्ट मिटल्या ओठांनी मनातल्या मनात विचार करत राहणं, उलट्यासुलट्या विचारांचा गुंता सावरणं, सांभाळणं.

...आणि नदीतल्या माशाने हातातली बांबूची काठी खाली खेचली, की विजेच्या वेगानं झेप घेणं.

...म्हणून या काठावरच्या नदीशी चांगली मैत्री होती त्यांची; पण थोडं पुढं प्रवाहाच्या मध्यावर काय आहे, ते कधी कळायचं नाही. तिथं गरगरणारे भोवरे लांबून नुसते दिसले, तरी पोटात खड्डा पडायचा. भरतीचं पाणी वाढलं, की 'बॅक वॉटर'च्या लोंढ्यानं फुगलेल्या नदीत जबरदस्त 'खेच' असलेले भोवरे उलटे-उलटे मुसंडी मारून घुसायचे... आणि भरती ओसरली की वाहत्या प्रवाहाच्या दिशेनं सरसरत जायचे.

नदीच्या पोटात चालणारा हा गूढ कल्लोळ पार करून पल्याडच्या काठाकडे गेलं, की पाणी पुन्हा उथळ, प्रेमळ व्हायचं. कधीकधी त्याचा काळवंडलेला, गढूळ चेहरा दुर्मुखलेला दिसायचा. चेहरा असा खिन्न; आणि पोटात कुठून कुठून वाहून आलेल्या कुजल्या झाडोऱ्याचे ढीग सुळसुळत धावणाऱ्या माशांची फय्यर आणि टूथपेस्टसारख्या ओल्या, मऊ चिखलाची प्रचंड राड.

नदीच्या पोटातली सगळी गूढ वादळं पार करून पोहत-पोहत प्रवाह ओलांडण्याचा आणि पल्याडच्या किनाऱ्याला शिवून पुन्हा अल्याड येण्याचा पराक्रम इस्था-राहेलनं चाकोच्या देखरेखीखाली अनेकदा केला होता. आपण खरोखरच 'पल्याड' जाऊन आलो, या पराक्रमाची खूण म्हणून त्या काठावरचा एखादा दगड, छोटीशी डहाळी किंवा एखादं

पान मुठीत गच्च पकडायचं; की धापा टाकत-टाकत परतीचा प्रवास... बंद मुठीचे हात आणि पाय मारत नदीच्या कुशीतून पुढं पुढं सरकत अल्याडचा काठ.

– पण नदीचा मधला भाग आणि पल्याडच्या काठानं वाहणारा प्रवाह ही गमतीची गोष्ट नाही, एवढं दोघांना मनोमन ठाऊक होतं. अलीकडच्या काठावर आपण तासन्तास नदीशी खेळतो, तिच्या पोटात डुंबत हुंदडत राहतो... तसा खेळ 'त्या' नदीशी करू नये... 'ते' काहीतरी वेगळंच गंभीर प्रकरण आहे, याची जाणीव त्यांच्या मनात रुजली होती. मध्यापासून पुढच्या नदीविषयी दोघांच्या मनात 'भीती' तर होतीच, काहीसा धाक आणि आदरही होता. तिच्याशी 'खेळ' करण्याची हिंमत नव्हती; पण पोहत-पोहत जाऊन पटकन तिला स्पर्श करून यायला मजा वाटायची. तरीही होडीत आवश्यक तेवढं सामान भरून (म्हणजे ब – तयारीत राहण्याची तयारी करून तयार राहता येईल .) नदी ओलांडणं सोपं नव्हतंच तितकंसं.

– लांबवर पसरलेल्या नदीकडे दोघांनी एक उत्सुक नजर टाकली. अल्याडच्या काठावरून त्यांना पल्याडचं 'हिस्टरी हाऊस' दिसत नव्हतं. नदीच्या चमचमत्या प्रवाहापलीकडे सगळा काळोख आणि अस्ताव्यस्त वाढलेल्या रबराची गर्द झाडी... झाडांच्या कुशीत दडलेल्या किड्यांची किरकिर तेवढी दूरवरून ऐकू येत होती.

आजूबाजूचा कचरा साफ करून झालाच होता. इस्था आणि राहेलनं जोर लावून ती छोटीशी होडी उचलली आणि पाण्यापाशी नेली. पाण्याच्या स्पर्शानं अंगावर काटा आलेली होडी, नदीच्या पोटात गुदमरून क्षणभर श्वास घ्यायला, हवा, उजेड खायला वर आलेल्या चिडक्या-रडक्या माशासारखी पाण्यावर तरंगत राहिली. तिचं अंग आणखी थोडं घासून-पुसून स्वच्छ करायची गरज होती फक्त. बाकी जमिनीत मुळं रोवून उभी असली वर्षानुवर्षं, तरी पाण्यावर तरंगण्याचं रहस्य ठाऊकच होतं तिला.

निळ्या आकाशात भरार्‍या मारणार्‍या रंगीबेरंगी पतंगासारखी दोन आनंदी मनं खुशीनं नुसती ओसंडून वाहत होती. 'आपल्याला एक अख्खं नवं जग सापडलंय' या आनंदानं उधाणलेले त्यांचे पाय जमिनीवर ठरेनासे झाले होते... या उधाणाच्या लहरी बघता-बघता नदीत शिरल्या आणि हजारो-लाखो माशांना, निळ्यागर्द आकाशाला, काठावरून आत झुकलेल्या झाडांना पोटात घेऊन वाहणारी नदी हलकेच हसली. वाहत्या प्रवाहातल्या हिरवट कुजबुजाटाला तर आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या.

हळूहळू नदीच्या वाहत्या छातीवर होडी आत्मविश्वासानं तरंगू लागली आणि काठावरून प्रवाहात उतरणार्‍या सहाव्या दगडी पायरीवर स्थिरावली.

...म्हणून मग ओसंडत्या आनंदानं फुलून आलेले दोन भिरभिरते पतंगही नदीत तरंगत-तरंगत पाचव्या पायरीशी स्थिरावले.

होडीच्या खूप खाली, खोल खोल पाण्यात पोहणार्‍या जुन्या जाणत्या माशांना

एव्हाना सुगावा लागलाच होता. त्यांनी दोन्ही बाजूंच्या कल्ल्यांनी आपली तोंडं झाकली आणि प्रवाहावर तरंगणाऱ्या दृश्याकडे पाहत सगळे खो खो हसत सुटले.

काठाकाठानं तुरतुरणारी पांढऱ्या कोळयाची पांढुरकी मादी ध्यानीमनी नसताना होडीच्या गर्भातून अचानक नदीत पडली आणि शर्थीनं झुंजत-झुंजत अखेर नदीच्या पोटात खेचली गेली. या झुंजीत तिच्या पोटाशी लटकणारी पांढरट अंड्यांची पांढऱ्या टिंबाएवढी पिशवी फुटली. आतून शेकडो बाळं भसाभसा बाहेर आली. त्या पिसासारख्या हलक्या, इवलु इवलु बाळांना पोहताही येत नव्हतं आणि मिळेल ते गिळंकृत करायला टपलेल्या नदीच्या जबड्याभोवती वळवळूनसुद्धा आत जाता येत नव्हतं. मग नदीच्या हिरवट धावत्या पाण्यावर ठिपक्याठिपक्यांची नक्षी पसरली. वाहत-वाहत समुद्राकडे निघाली. आता थेट मादागास्कर गाठलं, की पाण्यात पोहणाऱ्या मल्याळी कोळयांचा नवा वंश सुरू!

खरं म्हणजे, कुणीच कुणाशी काहीच नव्हतं बोललं... तरीही प्रदीर्घ चर्चेअंती निर्णय घेतलेला असावा, तशा तडफेनं इस्था आणि राहेलने एकाच क्षणी हात उचलले आणि नदीच्या छातीवर स्थिरावलेली होडी खसखसून घासायला सुरुवात केली. कोनाकोपऱ्यांत लोंबणारी कोळयाची जाळी, अनेक वर्षांनंतर झालेल्या ओल्या स्पर्शानं आक्रसली. खरवड सोडून विरघळलेला चिखल, दगडफुलांच्या चांदण्या... असा सगळा ऐवज पाण्यात फेकून होडी नितळ, नग्न झाली. मग जुळयांनी तिला खेचत-खेचत काठावर आणली आणि उलटी करून थेट आपल्या डोक्यावर चढवली. दोघांनी मिळून घातलेली एक लांबुडकी टोपी आणि थेंबाथेंबानं गळणाऱ्या त्या टोपीच्या खालून तुरूतरू धावणारे चार पाय. तेवढ्या गडबडीत जमिनीत खोचून ठेवलेला लाल बावटा उपसून हातात घेत इस्था राहेलच्या मागून धावत सुटला.

वाऱ्यावर उडणारा लाल बावटा, भिरभिरत निघालेली गांधीलमाशी आणि चार पायांनी तुरूतुरू धावणारी होडी... ही सगळी मिरवणूक नदीच्या काठाकाठानं मळलेल्या ओळखीच्या पायवाटा शोधत-शोधत, वाटेतले खाजकुयलीचे पुंजके चुकवत-चुकवत, मुंग्यांच्या वारुळांनी बुजबुजलेल्या खड्ड्यांना अचूक वळसे घालत सुसाट निघाली. जमिनीचं पोट ओरबाडून बोचकारून आतली लाल माती उपसणाऱ्या गावकऱ्यांच्या कर्तृत्वानं तयार झालेला मोठा खंदक वाटेतच होता. त्यात साचून राहिलेलं मरतुकडं कुजकट पाणी, काठावरच्या मऊ चिखलाची धबधबीत राड, पाण्यावर पसरलेली हिरवट, विषारी तवंगाची चकमक आणि पोटात डासांच्या झुंडी पोसून कोणत्याही क्षणी चालत्या पायांना फसवणाऱ्या दगलबाज शेवाळयाचा बुजबुजाट... या चक्रव्यूहाच्या काठाकाठानं धावत होडी पुढं निघाली.

वाहत्या नदीचा पदर न सोडता हिरव्या-हिरव्या वळणांनी वाट धावत होती. दोन्ही

बाजूंना ओथंबून उभ्या झाडांच्या ओळी... उंच वाकलेले माड, ठेंगणेठुसके काजू, गरगरीत आम्रवृक्ष आणि काय काय.

पायांखालची वाट धावत धावत अखेर एका झोपडीपाशी पोचली... लाल-चुटूक मातीनं लिंपून काढलेल्या भिंती आणि जमिनीच्या पोटात चाललेली कुजबुज कान देऊन ऐकण्यासाठीच जणू पार अगदी पायांशी झुकलेलं गवताचं छप्पर. मातीनं लिंपलेल्या भिंतींचा रंग इतका खराखुरा, की जमिनीत रोवलेल्या बियाण्यातून उगवल्यासारखीच दिसत होती ती झोपडी. जणू पृथ्वीनं थोडा हात लांबवला, कुशीत हलकेच ढुशी देऊन एक बरगडी उंचावली आणि पोटात थोडीशी पोकळी भरून गवतानं शाकारलेला आपल्याच त्वचेचा एक उंचवटा उभारला... अशी लालचुटुक, पृथ्वीच्या पोटातून जन्मलेली झोपडी आणि अंगणात तीन केळीची झाडं... गव्हाळ, तुकतुकीत कांती आणि अंगाखांद्यांवर बहरलेली लांबलचक हिरवी-हिरवी अलवार पानं. अंगणाच्या सभोवार वाळल्या पानांनी विणलेल्या झापांच्या शिस्तबद्ध रांगा.

चार पायांनी तुरतुरणारी होडी धावत-धावत झोपडीपाशी आली. दाराशेजारच्या काजळलेल्या भिंतीवर लटकवलेला तेलाचा दिवा अजून कुणी लावलाच नव्हता. दार अर्धवट उघडं, किलकिलं... आणि आत सगळा अंधार. तेवढ्यात कुठूनशी एक काळी कोंबडी आली आणि चार पायांच्या पाहुण्या होडीकडे ढुंकूनसुद्धा न बघता सरळ आतल्या अंधारात निघून गेली. वेलुथा घरी नव्हता. वेल्लय्या पाप्पेनसुद्धा दिसत नव्हता कुठं; पण आत कुणीतरी होतं.

आतल्या अंधारातून पाझरणारे कण्हण्याचे आवाज घुमत होते अंगणात. त्यातलं विव्हळ एकटेपणही घेरून राहिलं होतं झोपडीभोवती. तो आवाज कण्हत, किंचाळत सांगत होता काहीतरी. कधी थकल्याभागल्या, एकाकी स्वरात... तर कधी किंचाळून! पूर्ण पिकून झाडाला लोंबकाळणारा पेरू कोणत्याही क्षणी खाली पडून जमिनीवर राडा करण्याच्या धमक्या देत असावा आणि त्याला उलट्या धमक्या घालून अटीतटीनं झाडावरच रोखून धरावं, तशी काहीतरी भयंकर अजिजी त्या किंकाळ्यांमध्ये ठासून भरलेली होती.

पा पेरा-पेरा-पेरा-पेराक्का
(हे पे-पे-प्पे-प्पे-पे-पेरू.)
इन्डे पराम्बील थूरल्ले
(इथे नको, नको, इथे नको घाण करू)
चेटेन्डे पराम्बील थूरीक्को
(जा पुढल्या दारी, माझ्या भावाच्या अंगणात)
पा-पेरा-पेरा-पेरा-पेराक्का

(तिथं तुझं हगणं-मुतणं बिनधास्त कर सुरू)

कधी अगदी मरतुकड्या आवाजात, तर कधी बेंबीच्या देठापासून जोर लावून कुट्टप्पेन-वेलुथाचा मोठा भाऊ ठो-ठो किंचाळत होता. छातीपासून खालचं शरीर लुळंपांगळं झालेलं. निर्जीव शरीराचा तो गोळा पसरून कुट्टप्पन ओलसर, कुबट अंथरुणात दिवसरात्र नुसता पडून असे. वेलुथा अनेक वर्षं घरीच नव्हता. उजाडलं की बापही कामाला निघून जायचा. मग अंथरुणावर उताण्या पडलेल्या कुट्टप्पनचं एकाकी विव्हळणं सुरू. दिवस सरले. वर्षं उलटली... ऐन उमेदीचे दिवस त्याच्या नजरेसमोरून भरभरत निघून गेले. त्याचं तारुण्य भरात आलं. आक्रसलं, आटलं आणि कुट्टप्पनकडे नजरसुद्धा न टाकता निर्जीव शरीरावरून ओघळून, गळून गेलं. सकाळपासून रात्रीपर्यंत कुट्टप्पन नजरेपलीकडल्या झाडांची गूढ सळसळ ऐकत झोपडीतल्या अंधारात पडून राहायचा. सोबतीला फक्त रुबाबदार मानेची कुर्रेबाज काळी कोंबडी. ती सतत आतबाहेर करीत राही, तेवढीच काय ती जिवंत जाग. कुट्टप्पनचे मिचमिचे अधू डोळे त्याच्या आईच्या आठवणीनं सारखे पाझरत राहत. त्याचं अंथरूण पसरलं होतं, त्याच कोपऱ्यात चेल्लानं अखेरचा श्वास घेतला होता. तिच्या मृत्यूच्या भयंकर आठवणींचे धागे गरगरत सरसरत आता कुट्टप्पनच्या गळ्याशी येऊ लागले होते. चेल्ला ठो ठो खोकत, रक्त ओकत, वेदनांनी तडफडत तडफडत मेली. जीव जाण्यापूर्वी तिची पावलं, ढोपरं, पाय कसे मरत-मरत गेले, हे कुट्टप्पनने डोळे विस्फारून पाहिलं होतं. कळवळणारी, विव्हळणारी दोन अशक्त पावलं हलके-हलके शांत होत गेली. त्यांच्यावर पसरलेली कातडी आक्रसली. निर्जीव, स्तब्ध झाली... आणि मेलीच. त्यानंतर मग खूप वेळानं चेल्लाचे उसळते श्वास विझले. पायाकडून विळखे घालत-घालत आईच्या अख्ख्या शरीरावरून सरपटत वर चढलेला हा मृत्यू कुट्टप्पनच्या मनातून कधीच पुसला गेला नाही. उलटणारे दिवस आणि सरणाऱ्या वर्षांबरोबर त्याच्या मनाभोवतीचे दहशतीचे काळेकुट्ट विळखे अधिकाधिक घट्ट होत राहिले. हळूहळू तो स्वत:च्या पायांकडे नजर रोखून बघायला लागला. अकस्मात येऊन झडप घालणाऱ्या मृत्यूच्या भीतीनं त्यानं स्वत:भोवती स्वत:च्याच नजरेचे कडेकोट पहारे बसवले. झोपडीच्या उघड्या दारातून बिनदिक्कत आत घुसणाऱ्या सापांना हाकलण्यासाठी त्यानं एक लांबलचक काठी अंथरुणाशी बाळगली होती. ती लांबवून कुट्टप्पन स्वत:ची पावलं सारखी ढोसून पाहायचा... पण त्याच्या निर्जीव पावलांना आतून काही कळायचं नाही. थोडीशी मान उंचावून बघितलं, तर पावलं 'दिसत', एवढाच काय तो पुरावा. मग कुट्टप्पन सारखा धडपडत-धडपडत पावलांकडे पाहत राही... पावलं 'आहेत' ना? त्यांना चिकटलेल्या पायांच्या काड्या शरीरापासून निखळून तर पडल्या नसतील?

– चेल्लाच्या मृत्यूनंतर तिच्या वळकट्या हलवून कुट्टप्पनची चिरगुटं त्याच कोपऱ्यात

सरकवली गेली. झोपडीतल्या 'त्या' कोपऱ्याला ताज्या मृत्यूचा वास होता. कुट्टप्पनला वाटे, हा कोपरा जणू मृत्यूनं स्वत:साठी राखूनच ठेवलाय. तिथं येऊन काय ती आवरासावर करायची आणि कोपऱ्यात सडत पडलेले प्राण घेऊन रस्ता धरायच्या! झोपडीत तर अगदी सरळ विभागणीच होऊन गेली होती. एका कोपऱ्यात वैल-चुली-रांधपाची व्यवस्था, एकात कपडेलत्ते, एका कोपऱ्यात गुंडाळलेल्या वळकट्या आणि एका कोपऱ्यात मरण... मुक्ती.

मृत्यूच्या कोपऱ्यात आल्या क्षणापासून नको असलेल्या गोष्टीची वाट पाहण्याच्या विचित्र वेडानं कुट्टप्पन पछाडला होता. आता कधी? नक्की कोणत्या क्षणी?... त्याला समजेनासं झालं होतं. चारपेक्षा जास्त कोपरे असलेल्या घरातली माणसं उरलेल्या कोपऱ्यांचं काय करत असतील? आपण नक्की कोणत्या कोपऱ्यात मरायचं, हे स्वत:च्या मर्जीनं ठरवता येत असेल का त्यांना? कुट्टप्पनच्या डोक्यातली किड्यांची वळवळ भलतीच वाढली होती.

– बाकी काही असो, आपल्या आईच्या वाटेने जाण्याची पाळी अख्ख्या कुटुंबात आपल्यावरच पहिल्यांदा येणार, हे त्यानं गृहीतच धरलेलं होतं; पण भविष्याची काही वेगळीच गणितं... कळणारच होती लवकरच.

आठवण अनावर झाली की, कुट्टप्पन सवयीनं आईसारखाच आतडी पिळवटून खोकायचा. छातीच्या वरचं त्याचं जिवंत शरीर गळाला लागून पाण्याबाहेर आलेल्या मरणोन्मुख माशासारखं तडफडायचं. आणि छातीच्या खालच्या निर्जीव शरीराचा गोळा शिशाच्या कांडीसारखा स्तब्ध पडून. हूं नाही, की चूं नाही. जणू कुणा तिसऱ्याचंच त्रयस्थ शरीर. कधीच मरून पडलेला; पण आत्मा कैदेत सापडल्यामुळं त्याच्या सुटकेची वाट बघत तिष्ठत राहिलेला... तिसराच कुणी.

कुट्टप्पनच्या आयुष्यात वेलुथासारखे भलते घोळ मात्र नव्हते. एक साधा सरळ, लिहिता-वाचता न येणारा निरक्षर, निर्बुद्ध परायार. फाटक्या चिरगुटावर झोपलेल्या त्याच्या शरीरावर छपरातल्या गवताच्या काड्या, भिंतींच्या गिलाव्यातून सुटलेली मातीची ढेकळं असं काय-काय पडे आणि घामाच्या ओल्या दुर्गंधीत विरघळून सडत, कुजत राही. कधीकधी तर छपरातून सांडलेले किडे आणि मुंग्याही कुट्टप्पनच्या शरीरावर बागडत. आधीच खचून गेलेलं त्याचं मन आणखी उदासीत बुडालं, म्हणजे झोपडीच्या चारही भिंती कट केल्यासारख्या हातात हात मिळवून त्याच्या शरीरावर ओणव्या होत आणि एखाद्या दुष्ट रक्तपिपासू डॉक्टरसारखं कुट्टप्पनचं शरीर पिळून-पिळून त्याचे उरलेसुरले श्वास खेचून, ओरबाडून घेत. कधी कधी त्या भिंतींना कुट्टप्पनचा भलताच पुळका येई. मग त्या मागं सरत-सरत आपले प्रेमळ हात इतके लांबच लांब पसरत, की कुट्टप्पनची कोंदट अंधारी झोपडी एकदम भल्यामोठ्या आलिशान महालासारखी औरस-

चौरस दिसायला लागे. त्या विचित्र पोकळीत किडा-मुंगीइतकंही महत्त्व नसलेलं आपलं क्षुल्लक अस्तित्व जाणवून मग कुट्टप्पन अधिकच घाबराघुबरा होई.

तो हमसून-हमसून रडला, तरी तोंडातून आवाज फुटत नसे. फक्त डोळे तेवढे पाझरत राहत.

हळूहळू वेडेपणाचं वादळ कुट्टप्पनभोवती घिरट्या घालू लागलं होतं. एखाद्या महागड्या हॉटेलात गिऱ्हाइकांच्या सिगारेटी पेटवीत आणि त्यांचे रिकामे ग्लास भरून देत वेटरनं धावत घुटमळत राहावं; तसे काही भ्रमिष्ट धागे झोपडीत घुसलेच होते. कुट्टप्पनच्या मनात स्वत:च्या पायांनी चालू शकणाऱ्या वेड्या, भ्रमिष्ट माणसांबद्दलची असूया काठोकाठ भरली होती. त्याला या माणसांचा हेवा वाटायला लागला होता. चालतेफिरते पाय परत मिळणार असतील, तर त्या बदल्यात स्वत:चं निरुपयोगी शहाणपण देऊन टाकायला काय हरकत आहे? असलाही 'सूज्ञ व्यवहार' उगीचच डोक्यात शिजत घातला होता.

जुळ्यांनी डोक्यावरची होडी खाटकन् खाली ठेवली आणि झोपडीतल्या काळ्याकुट्ट सन्नाट्याला क्षणात तडे गेले.

या भलत्या वेळी कोण? आवाज कसला? – कुट्टप्पनला काही कळेना.

झोपडीचं दार ढकलून इस्था आणि राहेल सरळ आत घुसले. मुलं इतकी छोटी असली, तरी त्यांना वाकूनच आत जावं लागलं. गांधीलमाशी मात्र बाहेरच थांबली आणि हुश्श करून भिंतीला अडकवलेल्या तेलाच्या दिव्यात आरामशीर बसली.

'आम्ही आलोय.'

आत सगळा अंधार.

तरीही झोपडी स्वच्छ होती. माशांच्या आमटीचा चमचमीत वास दरवळत होता आणि नुक्त्या विझलेल्या लाकडांचा तिखट, झोंबणारा धूर. आतल्या सगळ्या वस्तूंना कोमटसा ताप यावा, तसं उकडतही होतं; पण राहेलच्या पावलांखालची सारवलेली जमीन मात्र मस्त गारेगार. वेलुथा आणि वेल्लय्या पाप्पेननं आपापल्या वळकट्या गुंडाळून भिंतीशी रचून ठेवलेल्या. इकडून-तिकडे बांधलेल्या दोऱ्यांवर लोंबणारे कपड्यांचे पतंग. चुलीजवळ लाकडी फळ्या ठोकून केलेली एक छोटीशी मांडणी. त्यावर मातीची गाडगीमडकी, लहानमोठ्या काठ्यांना नारळाच्या करवंट्या बांधून केलेल्या पळ्या, डाव, चमचे आणि निळ्या रंगाची विचित्र कडा असलेल्या, चेमटलेल्या, चेपलेल्या तीन अॅल्युमिनियमच्या थाळ्या. जेमतेम उंचीच्या माणसाला फक्त मध्यभागीच नीट उभं राहता येई एवढं ठेंगणं, चारही बाजूंनी उतरत्या पाखांचं छप्पर आणि मागच्या अंगणात उघडणारं दार नावाचं छोटंसं फळकूट. त्या दारापुढं केळीच्या झाडांची हिरवट

कोवळी दाटी आणि एकमेकांत गुंतलेल्या हिरव्या पानांच्या मधूनमधून चमकत वाहणारी नदी. सुतारकामाचा सगळा मांडही मागच्याच अंगणात मांडलेला.

किल्ल्या नाहीत. किल्ली लावायला कुलपं नाहीत आणि कुलपं ठोकून बंद करावीत, अशी कपाटंही नाहीत.

ती कुर्रेबाज काळी कोंबडी तुरतुर तुरतुरत मागच्या अंगणात धावली आणि लाकडं तासून चौफेर पसरलेल्या गोल-गोल कुरळ्या सालांचा ढीग उकरत, उचकटत उगीचच इकडे-तिकडे फिरत राहिली. ती बहुतेक लोखंडी पदार्थांच्या 'डाएट'वर असावी. कचऱ्यात पडलेले कडी-कोयंडे, चुका-खिळे आणि जुनाट स्क्रू!

'अय्यो मॉन! मॉल! काय बघताय? माझ्याकडं? कुट्टप्पन म्हणजे एक मोठ्ठी टोपली आहे, असं वाटतंय नं?' – अपराधी, दुखावल्या आवाजातली भळभळती वेदना पुसता पुसत नव्हती.

झोपडीत शिरल्या-शिरल्या जुळ्यांना काही म्हणता काही दिसत नव्हतं. हळूहळू आतल्या अंधाराला डोळे सरावले. पहिल्यांदा कोपऱ्यातल्या चिरगुटांवर झोपलेला कुट्टप्पन दिसला.. अंधारात चमकणाऱ्या भुतासारखा! मोठमोठ्या बटबटीत डोळ्यांतली थकून, त्रासून पिवळी पडलेली... पांढरी बुबुळं अंथरुणात उबून-उबून दमट, कुबट झालेली निस्तेज पावलं... अर्धवट अपुऱ्या फाटक्या पांघरुणातून बाहेर डोकावणाऱ्या पावलांच्या तळव्यांवर अनेक वर्षांपूर्वी अनवाणी चालून-चालून जमलेले लाल मातीचे थर... काहीसे पुसट झालेले पण अजूनही टिकून असलेले! नारळ पाडण्यासाठी उंचच उंच माडांवर सरसरत चढताना परायार आपल्या पायांच्या घोट्यावर मजबूत दोरखंड बांधतात. माडाच्या सरळसोट खोडाला वेंगून घेण्यासाठी बांधलेल्या दोरखंडांचे घट्टे अजूनही कुट्टप्पनच्या पायांवरून पुसले नव्हते.

कुट्टप्पनची चिरगुटं अंथरली होती, त्याच्या मागच्या भिंतीवर लिपस्टिक आणि रूज लावलेल्या कनवाळू येशू ख्रिस्ताचं कॅलेंडर टांगलेलं. अंगावर पांघरलेल्या कपड्यांच्या आतून रंगीबेरंगी खड्यांनी कोरलेलं येशूचं हृदय झगमगत होतं. कॅलेंडरच्या खालच्या बाजूला तारीख-वार आणि महिन्यांचं गणित जुळवणाऱ्या पातळ, झिरझिरीत कागदाच्या आडव्या उडत्या पट्ट्या टाचलेल्या... लिपस्टिक आणि रूज लावलेल्या येशू ख्रिस्ताचा मिनी स्कर्टच! वर्षात येणाऱ्या बारा महिन्यांच्या बारा चुण्यांनी सजलेला स्कर्ट. त्यातली एकही चुणी अजून फाडलेली नव्हती.

'आयमेनेम हाऊस'मधून दिल्या गेलेल्या किंवा त्या घरातल्या श्रीमंत कचऱ्यातून उचलून आणलेल्या काही वस्तूही झोपडीत इथं-तिथं ठेवल्या होत्या. अर्धपोटी, गरीब घरात श्रीमंत, भरजरी सामान. कधीचं बंद पडलेलं एक घड्याळ, फुलाफुलांनी रंगवलेल्या पत्र्याची एक जुनाट गंजकी टोपली, हिरवट रेषारेषांनी सजलेले चांभारानं केलेल्या

दुरुस्तीच्या टाक्यांची झाडं अजून अंगावर वागवणारे पाप्पाचींचे बूट, इंग्लिश धाटणीचे महाल आणि गोऱ्या-गोमट्या, केसांची झुलपं उडवणाऱ्या देखण्या बायकांची हलक्या रंगातली चित्रं असलेले बिस्किटांचे डबे.

कोपऱ्यात कसलातरी डाग पडून वर बुरशी आली, म्हणून बेबी कोचम्मानं देऊन टाकलेलं एक पोस्टर येशू ख्रिस्ताच्या शेजारीच टांगलेलं. डबडबलेल्या डोळ्यांनी कुणालातरी पत्र लिहिणाऱ्या एका गोंडस इंग्लिश मुलीचं चित्र त्या पोस्टरवर होतं. चित्राखाली लिहिलं होतं, 'आय अॅम रायटिंग टु से, आय मिस यू.' पोस्टरवरची ती मुलगी मागच्या अंगणाकडे टक लावून बघत होती. जणू नुकताच वेलुथानं तिचा 'हेअरकट' केलाय आणि कापलेल्या कुरळ्या गोल-गोल बटा अंगणभर विखरून पडल्या आहेत.

कुट्टप्पनच्या अंगावर टाकलेल्या फाटक्या पांघरुणाखालून निघालेली एक प्लॅस्टिकची नळी पिवळट द्रवानं भरलेल्या मळकट बाटलीच्या पोटात नेऊन खुपसली होती. झोपडीच्या उघड्या दारातून येणाऱ्या प्रकाशात नळीचं पोट चमकलं आणि राहेलच्या मनात हळूहळू मान वर काढणाऱ्या प्रश्नाचं उत्तर कुणी न देताच तिला मिळालं. एकदम काहीतरी लक्षात आल्यासारखी ती पुढं सरसावली आणि स्टीलच्या एका जुनाट टमरेलातून तिनं मातीच्या खुज्यातलं पाणी आणून कुट्टप्पनला दिलं. हलकेच डोकं वर उचलून कुट्टप्पन सावकाश पाणी प्यायला. तरीही हनुवटीच्या दोन्ही बाजूंनी गळायचं, ते गळलंच.

आयमेनेमच्या बाजारात बसून गावगप्पा करणाऱ्या बुजुर्गांच्या थाटात इस्था आणि राहेल एकमेकांच्या समोर चवड्यांवर उकिडवे बसले.

काही वेळ सन्नाटा पसरला. दोघांच्याही डोक्यात दाराबाहेर ठेवलेल्या होडीशिवाय दुसरं काही शिरतच नव्हतं. आपल्याशी कुणीच बोलत नाही, हे लक्षात आल्यावर कुट्टप्पनला वाईट वाटलं. मग दुखावल्या आवाजात त्यानं स्वत:च सुरुवात केली,

'चाकोसरांची मुलगी आलीय म्हणे?'

'आली असेल,' – राहेलनं फटकन त्याचा प्रश्न तोडला.

'पण मग कुठंय ती?'

'आम्हांला काय माहीत? असेल इकडं-तिकडं कुठंतरी. तुला कशाला पंचाईत?'

'तिला तुम्ही घेऊन याल इथं?'

'ह्यॅ!! भलतंच काय?' – राहेल वैतागली.

'का पण?'

'ती फार नाजूक मुलगी आहे. घराबाहेर पडली आणि मातीनं मळून मेली, म्हणजे? तुला काय जातं 'तिला इथं आण –' म्हणायला?'

‘अच्छा अच्छा!’

‘आणि आम्ही कितीही म्हटलं ना, नेतो’ म्हणून, तरी तिला कुण्णीसुद्धा आमच्याबरोबर पाठवणार नाही... पण तुला तरी एवढं काय पडलंय? तिला काय असं सोनं लागलंय?’ – राहेलनं कुट्टपनला निर्वाणीचं सांगून टाकलं, ‘मुलगीसारखी मुलगी. तिला केस आहेत. पाय आणि दात आहेत... सगळं नेहमीसारख्खंच, रे! थोडीशी उंच आहे एवढंच फक्त!’

‘बास? एवढंच?’ – राहेलला काय म्हणायचंय ते कुट्टप्पनला बरोब्बर कळलं होतं.

‘सगळं तेच, नेहमीसारखंच असेल, तर मग तिला बघण्यात काय मजा?’

‘तेच तर सांगतेय ना!’– राहेल सुखावली.

‘काय रे कुट्टप्पा, समज, होडीला खालून भोकबिक पडलं असेल, तर मग वायाच जाते का ती होडी?’ – इस्थाला आता राहवत नव्हतं.

‘कोण म्हणतं? वाया कशी जाईल?’ कुट्टप्पन म्हणाला, ‘भोक किती मोठं आहे, त्यावर ठरणार ना शेवटी वाया जाईल, की दुरुस्त होईल ते? पण काय रे? तू का विचारतोयस? कुणाची होडी फुटलीय?’

‘अरे, आमचीच... ‘आमची’ म्हणजे, आम्हाला सापडलेली. बघायचीय का तुला?’

इस्था आणि राहेल झपाझप बाहेर गेले. दोघांनी मिळून वाकवाकून सावकाश छोटी होडी झोपडीच्या दारातून आत आणली. अंथरुणावर झोपलेल्या कुट्टप्पनला होडीचा गळका तळ नीट तपासून बघता यावा, म्हणून दोघांनी मिळून होडी उचलली आणि कुट्टप्पनच्या शरीरावर छपरालगत उचलून धरली. आधीच ओलसर दमट झालेल्या त्याच्या चिरगुटांवर ताज्या पाण्याचे आणखी चार थेंब ठिबकले.

‘हे बघा, आधी नेमकं कुठून गळतंय ते शोधायला लागेल,’ कुट्टप्पन म्हणाला, ‘नंतर मग ती भोकं बुजवून टाकायची.’

‘मग सॅन्डपेपर घ्यायचा आणि घासून घासून पॉलिश करायचं,’ – इस्था.

‘मग वल्हं बघायचं...’ – राहेल.

‘हां, मग वल्हं!’ – इस्था.

‘मग सुरू! झुम्म निघायचं होडीत बसून!’ – राहेल.

‘कुठं, पण?’ कुट्टप्पनला कळेना.

‘असंच, रे... जरा इकडं-तिकडं,’ इस्था टेचात म्हणाला.

‘पण जरा सावकाश हां!’ कुट्टप्पननं दोघांना अडवलं, ‘आपली नदी दिसते, तेवढी साधीसोपी नाही. कधीकधी तर ती भलतीच सोंगं करते.’

‘नदीची कसली सोंगं?’ – राहेलला कळेना.

‘अगऽऽऽ, नदीची सोंगं ना, जबरी एकदम! म्हणजे कधीकधी ती इतकी संथ, शांत दिसेल; की कुणीतरी म्हातारी अम्मूम्मा डुलत-डुलत चर्चमध्ये निघालीय, कधीकधी

आपण न्याहरीसाठी इडली आणि अप्पम् खातो ना, तशी! किंवा दुपारच्या जेवणातल्या कांजीसारखी. निघालीय आपली शांत. सावकाश. कुणाच्या अध्यात नाही की मध्यात नाही. नजर उचलून इकडं बघणं नाही, की तिकडं बघणं नाही.'

'अरेऽऽ पण मग खरी नदी असते कशी?'

'खरोखर ना?... दुष्ट एकदम आणि पिसाट! रात्र झाली, की चंद्र उगवल्यावर कशी अंगात आल्यासारखी उसळून धावत सुटते; ते आवाज मी ऐकतो ना अंथरुणावर पडल्या-पडल्या. तुम्ही जरा सांभाळूनच राहा तिच्यापासून. कधी काय करील आणि हातोहात फसवील, त्याचा नेम नाही.'

'पण मग ही खरीखुरी नदी खरंखरं काय काय खाते?'

'खाते?... काय वाट्टेल ते... आणि काय बरंऽऽ' एखाद्या इंग्लिश पदार्थाचं नाव हवं होतं, पण कुट्टप्पनला पटकन काही आठवेना.

'पायनॅपल स्लायसेस्...' राहेलनं सुचवून पाहिलं.

'हां, बरोबर! पायनापल स्लायसेस. शिवाय ती दारूपण पिते. व्हिस्की.'

'आणि ब्रँडी.'

'बरोब्बर. ब्रँडी.'

'आणि मग इकडं बघते, तिकडं बघते, अध्यात पडते, मध्यात पडते.'

'बरोब्बर.'

'आणि मग इतरांच्या नको त्या गोष्टींत स्वत:हून नाक खुपसते...'

तोवर मागच्या अंगणातल्या लाकडी कचर्‍यातून इस्थानं चार छोटे ठोकळे शोधून आणले होते. ते जमिनीवर नीट ओळीत मांडले आणि दोघांनी मिळून त्यांवर आपली होडी चढवली. मग घाईघाईनं दोघेही पाय उंचावून होडीत उतरले. आणि वल्हं हातात घेऊन खळाळत्या, उसळत्या पाण्यात सफर सुरू झाली... झुम्म!

थिय्य थिय्य थक थैय्य थैय्य थोम...

चमकत्या खड्यांनी मढवलेल्या हृदयाचा येशू ख्रिस्त शांतपणे त्यांच्याकडे पाहत होता.

त्याला काय, तो पाण्यावरून चालतच गेला होता; पण कोरड्याठाक जमिनीवरच्या निश्चल होडीत बसून केलेली उसळत्या पाण्यातली अशी भरधाव सफर... त्याला तरी जमली असती?

फ्रॉकला मॅचिंग चड्डी चढवून? 'लव्ह इन टोकियो'मध्ये बांधलेल्या डोक्यावरच्या कारंज्यासह? पायांत बूट चढवून आणि कपाळावर कोंबडे झुलवून? कल्पनेच्या या सुंदर राज्यातली सफर घडली असती त्याला?... कोण जाणे!

कुट्टप्पनला काय हवं-नको ते पाहावं, म्हणून हातातलं काम अर्धं सोडून घरी

परतणाऱ्या वेलुथाला वाटेतच गाण्या-बजावण्याचे आवाज ऐकू आले. उत्साहानं, आनंदानं ओथंबून वाहणाऱ्या कोवळ्या आवाजात दे धमाल गाणं चालू होतं.

माकडा माकडा हूप, तुझ्या शेंडीला तूप
तुझे कुल्ले कसे लाल?
मद्रासला गेलो, तिथं जोरानं हगलो
म्हणून रक्त आलं काल...

इस्थाच्या मनात दबा धरून बसलेलं ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या माणसाचं चिकट, पिवळं हसू क्षणभरासाठी का असेना उडून गेलं होतं. पाण्यावरून धावणाऱ्या होडीनं निर्भर आनंदाची उसळती कारंजीच फुलवली होती दोघांच्या मनात. हा आनंद इतक्या जोरानं उसळला, की मनात तरंगणारी भीतीची बोचकी गपकन् तळाशी गेली आणि मान टाकून झोपलेल्या कुत्र्यासारखी निपचित पडून राहिली. कुठं खुट्ट वाजलं, की खाटकन उठून त्वेषानं झडप घालण्यासाठी शिवशिवणारे दु:खाचे दात आतल्या आत वाजत होतेच.

झोपडीच्या दाराबाहेर रोवलेला लाल बावटा बघून वेलुथाला हसू फुटलं. उष्णकटिबंधातल्या एस्किमोसारखा तो कमरेत वाकून खुज्या दारातून आत शिरला. होडीत बसून आनंदानं भरारलेल्या दोन्ही मुलांना बघून नकळत त्याच्या काळजात कळ उठली. त्या विचित्र वेदनेचा अर्थ त्याला स्वत:लाच कळेना. असं का व्हावं? आणि आजच? दोन्ही मुलं त्याला रोजच दिसायची. त्याचं मुलांवर मनापासून प्रेमही होतं. पण मग... एकाएकी काय बदललं?

तो. त्याचं मन. त्याचं शरीर.

सगळंच.

अख्खा वेलुथाच.

आजवरच्या इतिहासाच्या डोळ्यांत धूळ फेकून सगळ्या रीतिरिवाजांना चकवणाऱ्या 'त्या' एका क्षणानं सगळी गणितं पार उलटीपालटी करून टाकली होती.

तिची मुलं... त्याच्या कानात हलकेच कुणी कुजबुजलं.

तिचे डोळे... तिचाच चेहरा... तिच्यासारखेच दात...

तिचीच मऊशार, चमकणारी नितळ कांती...

वेलुथानं प्रयत्नपूर्वक हे असले विचार मनातून निपटून, हाकलून काढले. तरीही, ते पुन्हा परतले आणि मान टाकून झोपलेल्या कुत्र्यासारखे त्याच्या मस्तकात निपचित पडून राहिले.

'हाऽऽहाऽऽहा,' घरात होडी वल्हवणाऱ्या छोट्या पाहुण्यांचं मन भरून स्वागत करत वेलुथा म्हणाला, 'होडीत बसलेले कोण बरं हे मच्छिमार?'

'इस्थापप्पीचाच्चेन कुट्टेप्पेन पीटर मॉन. मिस्टर अॅन्ड मिसेस् प्लीज टु मीट यू,'

करवंटी बांधलेल्या लांबलचक पळीचं वल्हं उंचावून हलवत राहेल आनंदानं ओसंडत म्हणाली.

मग इस्थानंही दुसरी करवंटी-काठी उंचावून आपलं वल्हं जोरानं हलवलं.

'कुठं चाललीय त्यांची होडी? कळेल का आम्हाला?'

'आफ्रिकाऽऽऽ आफ्रिकेला चाललीयऽऽऽ' न राहवून राहेल जोरानं ओरडली.

'किंचाळू नकोस.' इस्थानं तिला दटावलं.

मग वेलुथानं होडीच्या सभोवार जाणत्या नजरेची एक चक्कर टाकली. होडी कुठं होती, कशी मिळाली, तेही नीट सावकाशीनं ऐकून घेतलं. 'म्हणजे, ही होडी दुसऱ्या कुणाच्या मालकीची वगैरे नाहीय्ये हं,' राहेल थोडीशी चाचरत म्हणाली. कारण जमिनीखाली पुरून ठेवलेली होडी दुसऱ्या कुणाच्या मालकीची असूसुद्धा शकते, हे एकदम अचानकच तिच्या लक्षात आलं होतं.

'पण मग पोलिसांना कळवलं पाहिजे का?'

'मूर्खासारखं वाट्टेल ते बडबडू नको,' वैतागलेल्या इस्थानं पुन्हा तिला झापलं.

वेलुथानं होडीच्या फुगीर पोटावर एक खणखणीत टिचकी मारली आणि थोडासा तुकडा नखानं खरवडून बघितला.

'दणकट. चांगलंय लाकूड.' त्याच्या परीक्षेत होडीला भरपूर मार्क मिळाले होते.

'पण थोडा वेळ झाला की बुडते ना पाण्यात!' इस्था काळजीनं म्हणाला, 'कुठंतरी भोक पडलंय रे. काय करू या?'

'वेलुथापप्पीचाच्चेन पीटर मॉन, तू देशील दुरुस्त करून आमची होडी?' राहेल वेलुथाच्या गळयात पडली.

'बघू या,' वेलुथा सावरून म्हणाला, 'पण नदीत जाऊन वाट्टेल तो धिंगाणा घालाल, तर याद राखा.'

'नाही नं! शप्पथ, आम्ही असं काहीही नाही करणार. तू बरोबर असशील, तेव्हाच फक्त वल्ह्याला हात लावू. मग तर झालं? खरोख्खर. गळयाशप्पथ.'

'पहिल्यांदा भोकं कुठं पडलीयत, ते शोधून काढायला पायजे...' वेलुथाच्या डोक्यात चक्रं सुरू झालीच होती.

'आणि नंतर मग ती बुजवून टाकायची'– एखाद्या प्रसिद्ध कवितेचं तोंडपाठ कडवं पुढं नेल्यासारख्या हुकमीपणानं इस्था आणि राहेल उत्स्फूर्तपणे म्हणाले.

'पण किती दिवस लागतील?' इस्थाला धीर निघत नव्हता.

'होईल एखाद्या दिवसात,' वेलुथा म्हणाला.

'बास? एक दिवस? मला वाटलं. तू एक महिनाबिहिना म्हणतोस की काय!' इस्थानं टुणकन उडी मारली आणि वेलुथाच्या पाठुंगळी बसून त्याचे पापेच पापे घेतले.

मग सँडपेपर आणला गेला. त्याचे दोन सारखे तुकडे झाले. इस्था आणि राहेल लक्ष एकटवून बघता-बघता कामाला भिडले.

घास. घास. घस्सक.

होडीवर चिकटलेले पापुद्रेच्या पापुद्रे भराभर खरवडले जाऊ लागले. अनेक वर्षांची जुनाट वृद्ध धूळ वार्‍यावर उधळली आणि सगळयांच्या केसांत जाऊन बसली. कुट्टप्पनच्या डोक्यावर तर धुळीचा ढग आणि येशू ख्रिस्ताभोवती प्रार्थनांची धुळकट वलयं. इस्था-राहेलनं आपली होडी इतक्या जोरजोरानं जोरजोरानं घासली, की खरवडत खरवडत पातळ झालेला सँडपेपर वेलुथानं त्यांच्या बोटांवरून शेवटी उचकटून काढला.

'आता इथं बास. आपण बाहेर जाऊ या.' म्हणत वेलुथानं होडी उचलली आणि बाहेरच्या अंगणात आणून ठेवली.

भुकेनं कळवळलेल्या छोट्या पिलांनी खायला कधी मिळतंय, यावर नजर लावून बसावी, तसे इस्था आणि राहेलचे डोळे होडीवर अगदी खिळून राहिले होते.

वेलुथानं पुन्हा होडी उचलली आणि थोडीशी उंचावर ठेवली. मग लाकडाचा कस कसा जोखायचा आणि त्यातले चढउतार बघून कुठून कुठं घासायचं, हे दोघांना नीट समजावून दिलं. पुन्हा बोटांवर सँडपेपर चढले आणि नव्या उत्साहानं नवी घासाघास सुरू झाली. थोड्या वेळानं काहीतरी आठवून वेलुथा आत गेला; तेव्हा ती कुर्रेबाज काळी कोंबडीही वैतागानं तुरतुरत त्याच्यामागून झोपडीत शिरली... मरो ती तुमची होडी!... घासाघाशीनं कोंबडीबाई भलत्याच त्रासल्या होत्या.

पाण्यानं शिगोशीग भरलेल्या मातीच्या मडक्यात वेलुथानं एक मळकट टॉवेल बुडवला. बाहेर काढून (डोक्यातल्या नकोशा विचारांसारखं) त्यातलं पाणी पिळून टाकलं आणि कुट्टप्पनला दिला.

'चेहरा पूस नीट. मानेवर बघ केवढी धूळ साचलीय.'

'ते दोघं काही बोलले का तुला? मोर्च्यात तू दिसलास वगैरे?'– ओल्या टॉवेलनं मान पुसता-पुसता कुट्टप्पननं विचारलं.

'नाही. अजून तरी कुणी काही बोललं नाही; पण कधीतरी विचारतीलच. त्यांना ठाऊकेय सगळं.' – वेलुथा म्हणाला.

'ठाऊकेय? नक्की?'

वेलुथानं खांदे उडवले आणि कुट्टप्पनच्या हातातला टॉवेल घेतला. पाण्यात खळखळून चुबकला. आपटून धोपटून चांगला खळबळवला आणि नको तिथं भरकटणार्‍या स्वत:च्या मूर्ख मनाचा पिळा असावा, तसा दातओठ खाऊन घट्ट पिळला.

तिचा विचारच त्याला मनातून निपटून काढायचा होता. तिच्या द्वेषाची मुळं मनात रोवायची होती.

ती त्यांच्यातलीच आहे. त्यानं स्वत:ला समजावण्याचा प्रयत्न केला. रक्त शोषणाऱ्या, पिळून घेणाऱ्या त्यांच्यातलीच एक.

– पण काही जमत नव्हतं.

पुन्हा सारं परतून आलं. जीव ओवाळून टाकावा, असा 'तो क्षण' पुन्हा नजरेसमोर लखलखू लागला.

हसली की, तिच्या गालाला गोड खळ्या पडतात... तिची नजर सदैव आभाळातल्या कुठल्यातरी अज्ञात ठिपक्याशी गुंतलेली असते.

इतिहासाच्या बुलंद भिंतीला पडलेल्या बारीक फटीतून पुन्हा एकवार वेडी लहर सळसळत गेली. अर्ध्यामुर्ध्या क्षणात पुन्हा सगळं बदललं.

होडी घासता-घासता तास-दीड तास उलटून गेल्यावर अचानक राहेलला 'दुपारच्या डुलकी'ची आठवण झाली. तशी ती फाटकन उठली आणि अंगात आल्यासारखी धावतच सुटली. संध्याकाळच्या उन्हाच्या हिरव्या सावल्या तुडवत-तुडवत ती... तिच्यामागं तिचा भाऊ... आणि दोघांच्या मागून सुसाट उडत निघालेली गांधीलमाशी.

अम्मू उठली, तर नसेल दुपारच्या झोपेतून? तिला कळलं, की अख्ख्या दुपारभर मुलं नव्हतीच घरात... तर?

प्रकरण ११
द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज

एका सुंदर स्वप्नाच्या गर्भातली ऊर्जा घेऊन भरारलेला अम्मूच्या मनाचा पतंग त्या दुपारभर उंच आकाशात विहरत होता. चहू दिशांनी येणाऱ्या वाऱ्यांनी स्वप्नाच्या अर्धमिटल्या पाकळ्या फुलत, उमलवत नेल्या. आणि अम्मूच्या रंध्रारंध्रांतून लाखो फुलं उमलत राहिली. कोण जाणे कुठून एक हसरा, उमदा पुरुष आला. तेल घालून उजळलेल्या मंद दिव्याच्या स्निग्ध प्रकाशात त्यानं आपला एक हात अम्मूभोवती लपेटला होता. एकमेकांना घट्ट बिलगलेल्या दोन शरीरांभोवती उभ्या झालेल्या क्रुद्ध सावल्यांशी कसा लढणार तो?... अम्मूभोवती लपेटलेल्या हाताखेरीज त्याला दुसरा हातच नव्हता.

सावल्याही फक्त त्यालाच दिसत होत्या. त्यांच्या काळ्या तोंडातून गळणारे फुत्कारही फक्त त्यालाच ऐकू येत होते.

त्याचं नग्न शरीर फुलारून उठलेलं. काळ्याभोर, चमकत्या त्वचेखालून टरारलेने बरगड्यांभोवतीचे पुष्ट टोकदार स्नायू आणि त्यांच्या मध्येमध्ये काळसर मांसल खळगे. चौकोन पाडलेल्या खोल रेघांनी विभागलेल्या चॉकलेटच्या वडीसारखं शरीर. नग्न... हवंसं.

एक हात पसरून त्यानं तिला आपल्यापाशी ओढलं. घट्ट कवटाळून घेतलं. तेलात भिजलेल्या जुनाट वातीच्या प्रकाशात 'वॅक्स पॉलिश'नं रगडावं, तसं त्याचं शरीर चमकत होतं.

एका वेळी त्याला एकच गोष्ट करता आली असती. तिला घट्ट मिठीत घेतलं, तर तिच्या ओल्या उत्सुक ओठांना कुस्करणारं दीर्घ चुंबन घेता आलं नसतं. भोवती घोंघावणारं उष्ण वाफांचं तुफान शमवावं, म्हणून तिचे ओठ ओठांत घ्यावे, तर ती दिसलीच नसती. आणि ती दिसत राहिली नुसती नजरेसमोर तर तिचं अस्तित्वच मुळी जाणवलं नसतं.

तिलाही कुशीत शिरून त्याच्या छातीवर आपल्या लांबसडक बोटांनी तऱ्हेतऱ्हेचे स्पर्श गोंदता आले असते. आपल्या स्पर्शाच्या धगीत विरघळून, वितळून जाणारा त्याच्या नग्न त्वचेचा ताण अनुभवता आला असता. काही शोधणारी, चाचपणारी, उत्सुक अधाशी बोटं त्याच्या सपाट पोटावरून सरत घसरत खाली उतरली असती... काळ्याभोर फळ्यावरून सपाट पांढरा खडू घरंगळत जावा; तशी तिच्या नखांची भिरभिर नक्षी त्याच्या शरीरभर उठली असती. भाताच्या हिरव्या शेतातून भरारणाऱ्या सळसळत्या वाऱ्यासारखी. किंवा कदाचित चर्चच्या डोक्यावर निळ्या आकाशाच्या पोटातून विजेच्या वेगानं जाणाऱ्या जेट विमानांसारखी!

...अगदी सहज शक्य होता, हा स्पर्शाचा उत्सव! पण तिची स्तब्धता ढळली नाही. उधाणल्या शरीराच्या उष्ण वाफांशी लढत, झगडत तोही स्पर्शाविना कोरा... तसाच अतृप्त, कोरडा उभा राहिला. कारण शेजारी तेलात भिजून जळणाऱ्या दिव्यापलीकडे, पायांगती चाललेल्या सावल्यांच्या उग्र भीषण खेळाच्या भोवती घडीच्या खुर्च्या वर्तुळात मांडल्या होत्या. त्या खुर्च्यांवर बसलेले लोक चमकते खडे लावलेल्या चश्म्यातून एकटक समोर पाहत होते. प्रत्येकाच्या खांद्यावर तिरकस धरलेलं व्हायोलिन. त्यावर टेकलेल्या शेकडो, हजारो हनुवट्या आणि विशिष्ट कोनातून रोखलेले बो. सगळ्यांच्या पायांच्या सारख्याच घड्या. उजव्या पायावर डावा पाय. आणि वेगानं हलणारी डावी पावलं.

त्यांतल्या काही जणांच्या मांडीवर वर्तमानपत्रांच्या गुंडाळ्या होत्या. काही जणांकडे नव्हत्या. काही जण तोंडातल्या थुंकीचे बुडबुडे काढत होते. काही जण ओठ घट्ट मिटून बसलेले; पण सगळ्यांच्या डोळ्यांवर चढवलेल्या प्रत्येक काचेत तेलात भिजून जळणाऱ्या दिव्याची धगधगती प्रतिबिंबं.

सावल्यांच्या खेळाला भिडून खुर्च्यांचं वर्तुळ आणि त्या वर्तुळापलीकडे असंख्य निळ्या बाटल्या फुटून पडलेला टोकदार काचांचा खच... त्या काचांखाली गुदमरलेला, रक्ताळलेला समुद्रकिनारा. समुद्राच्या आत उसळणाऱ्या लाटा पोटात भरभरून निळ्या बाटल्या हलके-हलके किनाऱ्याशी येत होत्या. किनाऱ्यावरचा काचांचा खच वरवर लोटत, खेचत, फरफटत नव्या बाटल्यांची आदळआपट... भीषण टकरा आणि रक्तबंबाळ मृत्यू. एकमेकांवर आदळणाऱ्या काचांचे आवाज किनाऱ्यालगतच्या खडकांवर आपटून फुटत होते... आणि कुठूनतरी पाझरणाऱ्या जांभळट प्रकाशात मरून पडलेली जुन्या वृद्ध लाकडाची झुलती आरामखुर्ची.

काळाकुट्ट समुद्र. त्यावर तरंगणारे हिरवट फेसाचे शिळे गुच्छ. फुटलेल्या काचांवर गुजराण करणारे मासे.

शांत, संथ पाण्यावर विसावलेली रात्र आणि एखादी ठिसूळ चमकती कपची निखळावी; तसे आकाशातून भिरभिरत, चमकत येऊन लुप्त होणाऱ्या तुटल्या ताऱ्यांची राख. चंद्राचा मागमूसही नसलेल्या खिन्न, अंधाऱ्या आकाशात पतंगांची टोळी उठलेली.

त्याला एकच हात, तरीही पोहून प्रवाहापार होता आलं असतं.

त्याच्यामागोमाग तीही दोन्ही हातांनी पाणी कापत जाऊ शकली असती.

त्याच्या उघड्या त्वचेवर पांढरट, खारट तवंग... तिच्याही. त्याच्यामागं काहीच शिल्लक राहिलं नाही. अस्तित्वाच्या कोणत्याच खुणा. ओल्या वाळूत त्याची पावलं उमटली नाहीत... पाण्यावर पुसटसाही तरंग नाही. उघड्या, नग्न आरशातली प्रतिमा... तीही नाही.

तिलाही त्याच्या कुशीत शिरून त्याच्या उघड्या छातीवर गोंदता आले असते

तर्‌हेतर्‌हेचे स्पर्श. अगदी सहज शक्य होता हा स्पर्शाचा उत्सव... पण तिची स्तब्धता ढळली नाही.

ते दोघेही नुसते उभे होते.

उभेच.

कितीतरी वेळ.

शरीराला शरीर भिडवून.

त्वचेत त्वचा मिसळून.

तसेच.

नुसतेच.

तेवढ्यात कुठूनसा धावत आलेला वारा उन्मादानं तिच्या केसात घुसला आणि अचानक उधळलेली तिच्या लांबसडक केसाची लाट, हात तुटून पडलेल्या त्याच्या टोकदार भुंड्या खांद्यावर शालीसारखी पसरली.

एक मरतुकडी तांबू गाय ढुंगण हलवीत आली. बघता-बघता समुद्रात घुसली... शिंगांना पाणी लागू न देता, क्षणभरही मागं वळून न बघता पोहत-पोहत समुद्रापार झाली.

भर दुपारच्या स्वप्नात आभाळभर विहरणार्‌या अम्मूला धाप लागलाr होती. आपल्या स्वप्नाच्याच कुशीत ती क्षणभर विसावली.

निळ्या धाग्यांनी भरलेल्या पलंगपोसावरची गुलाबाची फुलं तिच्या गालांवर रुतून रुतून उमटली होती. तेवढ्यात आपल्या शांत, संथ, हव्याहव्याशा स्वप्नावर झुलणारे दोन उत्सुक चेहरे अम्मूला जाणवले. जणू काळजीनं धास्तावलेल्या काळ्याकुट्ट चंद्राचे दोन गोळेच.

'असं काय झालंय तिला? ती मरत्येय बिरत्येय, की काय?'– इस्थाच्या कानाजवळची राहेलची कुजबुज अम्मूला स्पष्ट ऐकू आली.

'अगं, मरत्येय कुठं? दुपारची डुलकी काढत्येय ना; त्यात काहीतरी भयंकर स्वप्न पडत असणार बहुतेक,' – इस्थानं ओळखलं होतं सगळं. नेहमीसारखंच!

'तिला खूप स्वप्नं पडतात... खूपच' – तो पुन्हा म्हणाला.

त्यानं तिला स्पर्श केला असता, तर तिच्याशी एका शब्दानं बोलता आलं नसतं... तिच्यावर प्रेम केलं असतं जीव ओतून; तर मग निखळून पडता नसतं आलं तिच्यापासून... तो बोलला असता भरभरून, तर काही ऐकूच नसतं आलं; आणि लढला असता जिवावर उदार होऊन, तर रक्तबंबाळ कपाळमोक्षाखेरीज दुसरं काहीच नसतं घडलं.

कोण होता तो? एक हात तुटून पडलेल्या भुंड्या धडाचा माणूस?... कोण असणार दुसरा? द गॉड ऑफ लॉस?... द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज?... मोठ्या मोठ्या तत्त्वांपायी

छोटे-छोटे आनंद गमावून बसलेला... साधंसं हसू हिरावून घेतलेला... बस आणि रेल्वेच्या डब्यात भरून राहिलेल्या आंबूस, गंजक्या वासासारखा... किंवा स्टीलचा चिमटा हातात घेऊन चटकफटक वाजवता-वाजवता वास मारणाऱ्या कंडक्टरच्या ओल्या चिकट हातांसारखा... दुसरा कोण?

'उठवू या का आपण? उठवू या तिला?' – इस्थाला आता राहवत नव्हतं.

खिडक्यांवर टांगलेल्या पडद्यांमधून खोलीत घुसलेली दुपारची उतरती किरणं अम्मूच्या लांबुडक्या ट्रान्झिस्टरवर आरामात पसरली होती. हाच ट्रान्झिस्टर कुशीत घेऊन अम्मू रात्रीबेरात्री नदीवर जायची (समोर द साऊंड ऑफ म्युझिक चालू असताना इस्थानं हातात धरलेली ती चिकट, लिबलिबीत वस्तूही त्या ट्रान्झिस्टरसारखी होती... लांबुडकी.).

उशीवर पसरलेले अम्मूचे मोकळे केस किरणांच्या रेघारेघांमध्ये गुंतून आणखी चमकत होते.

अम्मू मात्र तशीच. शांत... स्तब्ध. स्वप्नाच्या कुशीत विसावलेली. जाणिवांच्या सीमेवर रेंगाळणाऱ्या मुलांनी आत पाऊल टाकू नये, असं तिला फार वाटत असावं, कारण पापण्या घट्ट मिटलेल्या. दोन्ही कडांनी हसू ओघळत असलं, तरी ओठ बंद... मुडपलेले.

'गाढ झोपेत स्वप्न पडणाऱ्या माणसांना अजिबात चाळवू नये, असं अम्मूच सांगत असते सारखी' – राहेलला एकदम आठवलं, 'आणि असं जर केलं ना, तर ती माणसं दचकतात, त्यांना हार्ट-अॅटॅकसुद्धा येऊ शकतो, म्हणे!'

मग करायचं तरी काय?

शेवटी त्या दोघांनी पुष्कळ खलबतं केली. आणि ठरलं, की सरळ जाऊन अम्मूला हलवण्यापेक्षा हलके-हलके तिची झोप चाळवावी. मग दोघांनी मिळून उगीचच घसे खाकरले, कारण नसताना टेबलाचे ड्रॉवर्स धाडधाड उघडले. पुन्हा लावले, मोठ्यामोठ्यानं अर्थहीन कुजबुज केली, अम्मूला काही करून ऐकू जाईलच, एवढ्या आवाजात गाणी म्हटली, चपलांचा ढीग इकडून तिकडं हलवला. मोठ्यानं करकरणारं कपाटाचं दार उघडून पुन्हा लावलं.

स्वप्नाच्या कुशीत विसावलेली अम्मू शांत होती. मुलांबद्दलच्या जिव्हाळ्यानं भरून आलेल्या ओथंबल्या मनाला आतून ठणका लागला, तरी तिच्या चेहऱ्यावरची स्निग्धता ढळली नाही.

एक हात तुटलेल्या भुंड्या धडाच्या त्या तरुणानं फुंकर मारून दिवा विझवला आणि

इकडे-तिकडे पसरलेल्या वेड्यावाकड्या किनाऱ्यावरून लांब लांब टांगा टाकत दूर कुठल्यातरी सावल्यांच्या जंगलात तो दिसेनासा झाला.

ओल्या वाळूवर त्याच्या पावलांची एकही खूण उमटली नव्हती.

गोलाकार मांडलेल्या घडीच्या खुर्च्या फटाफट मिटल्या... समुद्राचं रौद्र उधाण शांत झालं. उसळलेल्या लाटांवरून इस्त्री फिरवावी, तशा त्या मान टाकून मुकाट्यानं किनाऱ्याशी येऊ-जाऊ लागल्या. लाटांच्या डोक्यावर हेलकावणारे फेसाचे गुच्छ विरले... किनाऱ्यावर येऊन कडाकडा फुटणाऱ्या बाटल्यांचा खळखळाट थांबला.

– आणि पुढील सूचना येईपर्यंत त्या रात्रीच्या खेळावर तात्पुरता पडदा पडला.

अम्मूनं हलकेच डोळे उघडले.

एक हात तुटलेल्या भुंड्या धडाच्या त्या रुबाबदार स्पर्श-कल्लोळातून स्वत:ला बाहेर खेचून जुळ्या मुलांच्या जगात परतून येईयेईतो तिला धाप लागली होती.

'तुला ना, भर दुपारी कसलंतरी भयानक स्वप्न पडत होतं.'– विस्फारल्या डोळ्यांनी तिच्या मुलीनं खरं काय ते सांगून टाकलं.

'अग, भयंकर वगैरे नव्हतं काही' – काही स्वत:शी, काही तिच्याशी बोलत अम्मू म्हणाली, 'छान होतं... स्वप्न.'

'इस्थाला तर वाटलं, की तू आता मरणार बहुतेक!'

'तुझा चेहराच इतका भयंकर दु:खी दिसत होता, की...' इस्थानं कारण लपवलं नाही.

'दु:खी कशी असेन, अरे? मी तर खूश होते. आनंदात होते' – अम्मू पटकन् बोलून गेली आणि तत्क्षणी तिला जाणवलं, खरंच खूप आनंदात होतो आपण!

'पण तू तुझ्या स्वप्नात खूश होतीस; म्हणजे खरोखरच होतीस का खूश? स्वप्नात जे घडतं, ते धरतात का खऱ्या आयुष्यात?'

'धरतात, म्हणजे?'

'म्हणजे स्वप्नातला आनंद... तो धरतात का खऱ्या आयुष्यात?'

विस्कटलेल्या केसांचा कोंबडा डोक्यावर झुलवणाऱ्या आपल्या मुलाला नक्की काय म्हणायचंय, ते अम्मूला बरोबर कळलं... आणि स्वप्नातल्या सुखानं हरखलेल्या काळजात नवी कळ उठली.

खऱ्या आयुष्यात ज्याची मोजदाद होते, तेच आणि तेवढंच खरं असतं.

– लहान मुलांच्या समजुतीच्या कक्षेमधलं साधंसोपं सूत्र! जे मोजता येतं, तेच... तेवढंच खरं!

समजा, स्वप्नात एखादा मासा खाल्ला; तर तो मोजायचा का? स्वप्नात खाल्लेला मासा खरोखरच खाल्ला, असं मानायचं का?

आनंदानं ओसंडणारा एक माणूस नजरेसमोरून चालत-चालत दिसेनासा झाला; पण त्याच्या पावलांची एकसुद्धा खूण उमटली नाही... तर? तो खरोखरच होता, आणि खरोखरच गेला, असं मानायचं का?

स्वप्नाचा अंमल तरळणाऱ्या नजरेनं अम्मूनं तिचा लांबुडका ट्रान्झिस्टर शोधला आणि घाईघाईनं त्याचं बटण पिळलं. 'चेम्मीन' नावाच्या सिनेमातलं एक गाणं लागलं होतं.

चेम्मीन ही एका गरिबाघरच्या दुर्दैवी मुलीची गोष्ट. तिचं एका तरुणावर प्राणापलीकडे प्रेम असतं; पण घरचे लोक तिची सगळी स्वप्नं पायदळी तुडवतात आणि शेजारच्याच किनाऱ्यावर राहणाऱ्या एका मच्छिमाराशी जबरदस्तीनं तिचं लग्न लावून देतात. आपल्या नवपरिणीत बायकोच्या पूर्वायुष्यातल्या प्रेमप्रकरणाचा सुगावा लागल्यावर तो मच्छिमार बेभान होतो आणि खवळलेल्या समुद्रात पिसाटल्यासारखी आपली होडी लोटतो. खवळल्या समुद्रात घोंघावणारं वादळ बघता-बघता रौद्रभीषण होतं... उधाणल्या लाटांच्या पोटात गरगरणारे भोवरे चहूबाजूंनी रोरावत येतात आणि वळवळणाऱ्या जिभा लांबवत समुद्राच्या कुशीत हेलकावणाऱ्या होडीला मटकावून खदाखदा हसतात. क्षणार्धात जिकडे-तिकडे मृत्यूचा ओला वास पसरतो.

समुद्रातल्या वादळानं गिळलेल्या त्या मच्छिमाराची बायको कपाळीचं कुंकू न पुसता आपल्या प्रियकराच्या कुशीत शिरते. 'एकत्र जगण्याचं' स्वप्न भंगलेले ते प्रेमीजीव 'एकत्र मरण्याची' शपथ मात्र तुटू देत नाहीत.

दुसऱ्या दिवशी पहाटे एकमेकांच्या मिठीत गुरफटलेले दोन मृतदेह किनाऱ्याला लागतात.

अखेरीस सगळे मरतात.

तो मच्छिमार, त्याची बायको, तिचा प्रियकर आणि या त्रिकोणात काही 'हात' नसूनही हकनाक जीवाला मुकलेला एक शार्क मासा.

वादळाच्या कळा सोसून शांत झालेला समुद्र सगळयांना पोटाशी घेतो.

खिडकीला लावलेल्या पडद्यातून खोलीभर गळणाऱ्या निळ्या अंधारात, गालावर 'क्रॉसस्टिच'चे गुलाब उमटलेली अम्मू आणि दोन्ही बाजूंनी तिला बिलगलेली दोन मुलं ट्रान्झिस्टरला कान लावून बसली होती. हलके-हलके त्या गाण्याचे सूर त्यांच्याही ओठांवर उमलू लागले.

जन्मोजन्मीच्या साथीची वचनं देणाऱ्या प्रियकरापासून दुरावलेली नववधू अनोळखी, अपरिचित माणसाशी लग्न करायला निघाली होती. तिच्या डोळ्यातून अखंड वाहणाऱ्या पाण्याचे भलतेच अर्थ लावत तिचा साजशृंगार करणाऱ्या बायका गात होत्या...

पंडोरु मुक्कुवन मुथिनू पोयी

(दर्यावर जाताना जोसात बापय गडी)

पंडिन्जरन कट्टाथू मुन्गी पोयी
(मावळतीच्या वादळानं गिळली त्याची होडी)

कुरकुरीत चुण्यांचा घोळदार फ्रॉक जमिनीवर ताठ उभा राहिलेला. बाहेरच्या अंगणात ताणलेल्या दोरीवर वाळणाऱ्या साड्या उन्हात भाजून आणखी चुरचुरीत झालेल्या. सोनेरी किनारीच्या पांढऱ्या साड्यांना घातलेली खळ गोळयागोळयांनी सुरकुतल्या चुण्यांमध्ये साठलेली. आता वाळलेल्या साड्या दोरीवरून ओढून, घड्या करून इस्त्रीला देण्यापूर्वी या पांढऱ्या गोट्या वेचून वेचून काढण्याखेरीज काही इलाजच नव्हता उरला.

अरयथी पेन्नु पिझाचु पोयी
(मावळतीच्या वादळानं गिळली त्याची होडी
भलत्यासंगं पळून गेली, बायको त्याची वेडी)

विजेच्या धक्क्यानं मरून पडलेल्या इट्टुमन्नूरमधल्या हत्तीवर (कोचू थोम्बन नव्हे) अंत्यसंस्कार करण्यात आले. महामार्गाच्या कडेलाच त्याच्यासाठी भलीमोठी चिता रचण्यात आली होती. संबंधित म्युन्सिपालिटीतल्या इंजिनिअर लोकांनी घाईघाईनं त्या हत्तीचे मौल्यवान सुळे कापले आणि कुणाला काही कळण्याच्या आत आपापसांत वाटूनसुद्धा घेतले. कुणी मोठा तुकडा पळवला. कुणा बिचाऱ्याला लहानसंच थोटूक मिळालं; पण भांडण्याची चोरी... वाटा मागण्याची चोरी. सगळंच गुपचूप. या कानाची, त्या कानाला खबर नाही. शेवटी चितेला चूड लावली गेली. आधी कुचंबत अडखळत धुगधुगणाऱ्या अग्नीला ऐंशी डबे शुद्ध तुपाचा जंगी खुराक मिळाल्यावर बघता-बघता ज्वाळा भडकल्या. धुराचे लोट उठले आणि आकाशाच्या पोटात उलटेसुलटे, वेडेवाकडे काळसर गुच्छ पेरीत हत्तीचं शव धडाडून जळू लागलं.

लांब उभं राहून ही आग बघणाऱ्यांना वेटोळी घालत-घालत आकाशाकडे झेपावणाऱ्या आकारांचे अर्थ लागता लागत नव्हते,

– आणि अचानक उसळलेला माश्यांचा थवा आवरता आवरत नव्हता.

अवनेय कडलम्मा कोन्डू पोयी
(भलत्यासंगं पळून गेली बायको त्याची वेडी
दर्याला मग उधाण आयले, तुटली जीवाची बेडी)

...मरणाचा वास लागून आजूबाजूच्या झाडांवर उतरलेल्या अस्पृश्य घारी आणि गिधाडं मेलेल्या हत्तीच्या अंत्यसंस्काराकडे डोळे लावून बसलेली... सगळा गोंधळ संपला,

की पोटातला चविष्ट ऐवज मिळेल. प्रचंड मोठी आतड्याची वेटोळी... किंवा निदान खरपूस भाजलेल्या यकृताचे चविष्ट तुकडे... मग या झकास मेजवानीवर भरपेट ताव मारू...

लाळ गाळणाऱ्या भुकेल्या चोचींना शेवटी थोडा का असेना, पण त्यांचा त्यांचा घास मिळालाच.

दोन्ही मुलं डोक्यापासून पायापर्यंत बारीक धुळीच्या किटणांनी माखलेली आहेत, हे अम्मूच्या लक्षात आलं, तशी ती चमकली. लहानमोठ्या केकच्या तुकड्यांवर पिठीसाखर भुरभुरावी, तशी इस्था आणि राहेलची अवस्था झाली होती. राहेलच्या काळ्याभोर केसात मधूनच भुरकट सोनेरी कुरळी बट चमकताना दिसली... वेलुथाच्या परसदारातलं लाकडाचं कुरळं साल. अम्मूनं पटकन ती भलती बट खेचली.

'कितीदा सांगितलंय तुम्हांला, त्याच्या घरी जाऊ नका म्हणून,' अचानक तिच्या कपाळावरची शीर तटतटून फुगली, 'तरी तुम्ही ऐकत नाही. उद्या काही भलती भानगड उद्भवली, म्हणजे?'

कसली भानगड?

ते मात्र अम्मूला ठाऊक नव्हतं.

तिनं त्याचं नाव मात्र घेतलं नाही.

तरीही तो आपल्या तिघांच्या एकान्तात, खाजगी विश्वात आला आहे... पडद्यातून प्रकाश गळणाऱ्या फिकुटल्या निळसर दुपारी त्याच्या अस्तित्वाचे उलट-सुलट टाके आपल्या खोलीभोवती, ट्रान्झिस्टरमधून वाहणाऱ्या त्या गाण्याभोवती आपसूकच वेढले आहेत, हे जाणवून तिच्या अंगावर शहारा फुटला. नाव न घेता अलगद मिसळलेल्या त्याच्या अस्तित्वामुळं पापणीआडचं स्वप्न आणि पल्याडच्या जगात काहीतरी 'बोली' होईल, 'करार' घडेल असं अम्मूला उगीचच वाटून गेलं. या असल्या कराराचा जन्म तसा अवघडच; पण आपली दोन मुलंच कदाचित हे अवघड बाळंतपण करतील... त्यांना ते जमलंही असेल; नसेल जमलं, तर भविष्यात कधी ना कधी जमेल, अशी वेडी आशा अम्मूच्या मनातून भुरभुरत गेली.

'तो' कोण आहे, हे तिला पक्कं ठाऊक होतं. 'गॉड ऑफ लॉस'... मोठ्यामोठ्या स्वप्नांच्या नादात छोटे-छोटे आनंद हातचे गमावून बसलेला... गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज!

एव्हाना गाणं संपलं होतं.

अम्मूनं खटका पिळून ट्रान्झिस्टर बंद केला.

पडद्यातून गळणाऱ्या प्रकाशाच्या रेषांची झालर लावलेल्या दुपारच्या शांततेत दोन्ही मुलं अम्मूला बिलगली. तिच्या कुशीतली उष्ण माया, तिच्या शरीराचा ओळखीचा गंध

लपेटून दोघांनी मस्त गुरगुटून घेतलं. उशीवर पसरलेले अम्मूचे मोकळे केस आपल्या चेहऱ्यावर ओढून घेताना त्यांना जाणवलं, की खरं म्हणजे, अम्मू नाहीच्चेय आपल्याजवळ. तिच्या स्वप्नानं तिला दूर कुठेतरी ओढून नेलंय. त्या भलत्या स्वप्नाचा अनोळखी अंमल अजून तिच्या नजरेत तरळतोय.

मग मात्र दोघांनीही अम्मूचा पुरता ताबा घेतला आणि दोन्हींकडून दोघांनी तिला कडकडून मिठी घातली. कमरेवर नेसलेली साडी आणि उभार छातीखालच्या ब्लाऊजची रेघ यांच्यामधल्या उघड्या नितळ पोटावर दोन छोटे हात येऊन विसावले. आपल्या गोऱ्यागोऱ्या तळव्यांच्या मागं, हाताच्या वर असलेल्या कातडीचा गव्हाळ रंग अगदी डिट्टो अम्मूच्या पोटाच्या रंगासारखा दिसतो, हे जाणवल्यावर दोघांनाही भारीच गंमत वाटली.

'इस्था, हे बघऽऽ' अम्मूच्या बेंबीपासून निघून डाव्या कुशीकडे उतरत जाणारी तिच्या पोटावरची एक चमकदार रेघ चिमटीत पकडून राहेलनं इस्थाचं लक्ष वेधलं.

'हे बघऽऽ, आम्ही दोघं इथंच लाथा मारायचो ना तुला? तुझ्या पोटात असताना?'

इस्थानंही त्या चमकदार रेघेवरून हळुवार बोट फिरवलं.

'कुठली बस होती गं अम्मू?'

'तोऽऽनाही का वळणावळणाचा रस्ता होता?'

'...आणि खूप पुढं आलेलं तुझं पोट हातात धरूनच बाबाला बसावं लागलं होतं?'

'...पण बसमध्ये तिकीट काढलं होतं का ग, तुम्ही?'

'...तुला दुखलं का ग, खूप?'

तेवढ्यात राहेलला वेगळंच काहीतरी आठवलं. आवाजाची पट्टी खाली उतरवत अगदी सहज चौकशी करावी, तसं तिनं विचारलं,

'त्याच्याजवळचा आपला पत्ताच हरवून गेला असेल का, ग?'

एकाएकी अम्मूचा श्वास अडला. तेवढं स्पर्शानं जाणवून इस्था चमकला आणि हलकेच त्यानं आपल्या हाताचं मधलं बोट अम्मूच्या पोटावरून सरकवत-सरकवत राहेलच्या मधल्या बोटाला टोचलं. राहेल काय ते समजली; आणि इकडून-तिकडून मनात आलेले पुढचे सगळे प्रश्नच त्या दोघांनी उडवून लावले.

'हे बघ... ही रेघ आहे ना, तिथं इस्थानं लाथ मारली होती पोटातून... आणि ही रेघ आहे ना, तिथं मी.' राहेलनं अम्मूच्या पोटावरचा चमकदार रेघांच्या वळयांची जबाबदारी समसमान वाटायला सुरुवात केली... 'ही रेघ माझी... आणि ही इस्थाची!'

अम्मूच्या पोटावरच्या एकूण सात रेघा त्या दोघांनी आपसांत वाटून घेतल्या. अचानक राहेलनं अम्मूच्या उघड्या पोटावर ओठ टेकले. तिथला मऊ लोण्यासारखा मांसल भाग तोंडात ओढून जोरानं चोखला आणि पटकन् वर उठून अम्मूच्या पोटावर उठलेली लांबट

गोल थुंकीची ओली नक्षी ती खूप वेळ पाहत बसली. त्या नक्षीभोवती राहेलच्या कोवळ्या दातांच्या हलक्या गुलाबी खुणाही उमटल्या होत्या.

सगळं इतक्या क्षणार्धात घडलं; की पोटाच्या लेकीनं कडकडून घेतलेल्या त्या मुक्यातली स्वच्छ, पारदर्शक मजा अम्मूच्या शरीरमनावर बघता-बघता फुलून, उमलून आली. निवळशंख पाण्यासारखा स्वच्छ, वासनांच्या किंवा अपेक्षांच्या सावल्यांनी मुळीच न डागाळलेला शुभ्र मुका.

...उत्तरं नसलेल्या लाखो प्रश्नांच्या ढगांनी वेढलेल्या त्या कडकडीत मुक्यापेक्षा केवढा वेगळा! एक हात तुटलेल्या भुंड्या धडाच्या हसऱ्या पुरुषाने स्वप्नात दिलेल्या धगधगीत चुंबनांपेक्षा किती निखळ!... आणि शांत!!

तिच्या शरीरावर इतके मनमानी खेळ चालले होते, की अम्मूला शेवटी वीट आला. मालकीहक्कानं मुलांच्या ताब्यात दिलेलं स्वत:चं शरीर तिला पुन्हा हवंसं झालं. अंगाखांद्यांवर लोंबणारी पिलावळ फार वळवळायला लागली, म्हणून एखाद्या लेकुरवाळ्या कुत्रीनं सगळ्यांना झटकून द्यावं, तसे अम्मूनं खांदे उडवले आणि शरीराशी लगडलेल्या मुलांना दूर केलं. ती पटकन् उठून बसली. पाठीवर सोडलेले मोकळे केस आवरून घट्ट बुचडा बांधला. पलंगावर सुस्तावलेले पाय खाली घेत भराभर खिडकीशी गेली आणि भर्रकन पडदा सरकवला.

खिडकीबाहेर कधीची ताटकळलेली संध्याकाळची उन्हं पटकन खोलीत घुसली. बघता-बघता आतला अंधार उजळला आणि पलंगावरच्या दोन झोपाळू चेहऱ्यांवर उतरत्या उन्हाचे चमकदार कवडसे नाचायला लागले.

तेवढ्यात बाथरूमच्या दाराची कडी आतून सरकवल्याचा आवाज आला.

अम्मू दिसेनाशी झाली होती.

बाथरूममध्ये लावलेल्या भल्यामोठ्या आरशासमोर ती उभी राहिली. तिच्या थकल्या शरीराभोवती नाचणारी भविष्यातल्या संकटांची जीवघेणी प्रतिबिंबं आरशात स्पष्ट दिसत होती.

थकलेली सुरकुतली त्वचा... पांढरट चिकट स्रावानं ओले झालेले निस्तेज डोळे... खोल गेलेल्या खंगल्या गालांवर रुतलेली पलंगपोसावरच्या फुलांची क्रॉसस्टिच नक्षी... भुसा भरून ओघळलेल्या पायमोज्यांसारखी दोन्हींकडून लोंबणारी छाती... आणि पांढरट, निस्तेज केसांचं आकारहीन भुरकुल.

वितळलेल्या बर्फाचे थर ओघळून जावेत, तशी गळून गेलेली, धुवट त्वचा.

आरशात जे दिसत होतं, ते बघून अम्मूचा थरकाप उडाला.

आयुष्याची दोरी संपत आली आहे, विसविशीत झाली आहे, या थंडगार जाणिवेनं

धास्तावल्या मनाभोवती पंजा आवळायला सुरुवात केली. हवा बदलतेय. प्रकाश उतरतोय. सावल्या घेरून येऊ लागल्या आहेत... डोक्यावरचं आकाश, भोवतीची झाडं, चंद्र-सूर्याचे चमकते गोळे सगळं विरघळत चाललंय. आता सगळयाची धूळ बनेल. वाळूचे डोंगर उभे राहतील. नाकातोंडांत वाळू भरेल. शरीराच्या अख्ख्या पोकळीत वाळूचं तुफान उठेल. बघता-बघता डोंगर सरेल. उद्ध्वस्त शरीर भुईसपाट होईल, जमिनीच्या पोटात खेचलं जाईल. आणि वर फक्त तुरुतुरु पळत बिळात लपणाऱ्या खेकड्यांच्या पाऊलखुणांसारखे वाळूचे गोळे गोळे रांगेनं धावत राहतील की संपलं सगळं!

अम्मूनं भराभर अंगावरचे कपडे ओढून काढले आणि लोंबणाऱ्या स्तनाच्या खाली एक टूथब्रश ठेवला. त्या घट्ट गोळयांमधली टूथब्रश धरून ठेवण्याची पूर्वीची शक्ती कधीच विरली होती. त्यामुळं विसविशीत स्तनांतून सुटलेला ब्रश ठपकन् खाली पडला. अम्मूनं उगाचच आपली छाती चाचपून पाहिली. गुबगुबीत उभार ओसरून मऊमऊ लोंबकळतं मांस तेवढं उरलं होतं. छातीवरची सुरकुतलेली काळी बोंडं तेवढी कडक. आक्रसलेल्या गोल शेंगदाण्यासारखी. बेंबीच्या खालचा उतरता उभार मात्र विस्कटला नव्हता फारसा. बेंबीपासून निघून दोन पायांच्या बेचक्यात काळया केसाळ त्रिकोणाकडे धावणारी रेघही अजून टचटचीत होती. रस्ता हरवलेल्या वाटसरूला नेमकी दिशा दाखवणारा बाण असावा, तशी... तिच्या नवख्या, अननुभवी प्रियकराला त्रिकोणात योग्य जागी घुसायला मदत करणारी!

अम्मूनं मानेवरचा बुचडा सोडला. त्यातून सुटलेले मोकळे केस उघड्या पाठीवरून कमरेकडे धावले. डोईवरचे केस तरी कितपत वाढलेत, हे बघायला अम्मू आरशासमोर पाठमोरी वळली. कुरळया केसांच्या अस्ताव्यस्त तुटक्या लाटा लोंबत होत्या. आतून मऊ पण वरून रखरखलेले, विस्कटलेले, निस्तेज केस जेमतेम तिच्या कमरेशी, ढुंगणरेषेपर्यंत पोचले होते. तिथून पुढे सुरू होणारे दोन गोल गरगरीत उभार झाकण्याइतपत शक्तीही केसांमध्ये उरली नव्हती.

बाथरूममध्ये फारच उकडत होतं. कोंडलेल्या गरम हवेनं अम्मूच्या त्वचेतून घाम उचकटून, पिळून काढला. आणि तिच्या उघड्या अंगावर चमकत्या हिऱ्यांच्या ओळी उठून उभ्या राहिल्या. हळूहळू ते हिरे भंगले आणि गळत, ओघळत राहिले. अंगभर घामाच्या नुसत्या धारा! पाठीवरून निघालेली एक धार मणक्यांच्या ओळीवरून वेगानं धावत ढुंगणाशी पोचली. तसा एक विचित्र शहारा फुटला. अम्मूनं सहज वळून कमरेमागच्या गोलांकडे पाहिलं. पूर्वीचा घट्टपणा उरला नव्हता. त्यावर इकडून-तिकडून चढलेले मांसाचे गोळे तेवढे टरटरून फुगलेले दिसत होते. तसं म्हटलं, तर ढुंगण मोठं नव्हतं फारसं; पण अम्मूचं बाकीचं शरीर इतकं लुकडं, की त्याला चिकटवलेलं ढुंगण दुसऱ्याच कुणा 'मालदार' बाईचं असावंसं दिसे.

आपल्या ढुंगणावर दोन्ही कुल्ल्यांच्या तळाशी एकेक टूथब्रश आरामात ठेवता येईल, या कल्पनेनं अम्मू स्वत:शीच खूश झाली. तिच्या शरीरात खूश होण्यासारखं निदान तेवढं तरी उरलं होतं. दोन्ही कुल्ल्यांमध्ये एकेक ब्रश घेऊन आयमेनेमच्या रस्त्यावरून आपण असेच नग्न चालत गेलो, तर काय काय गंमत होईल, असा विचार कुठूनतरी तिच्या मनात आला आणि अम्मू स्वत:शीच फिस्सकन हसली. हसता-हसता एकदम ठणका बसावा, तशी गप्प झाली. बाटलीत भरून मनाच्या तळाशी लपवून ठेवलेलं भ्रमिष्टपणाचं वेडसर भूत नजर चुकवून निसटलंय आणि अख्ख्या बाथरूममध्ये मजेत बागडत सुटलंय, हे जाणवल्यावर अम्मू आतून चरकली.

वेळी-अवेळी मान वर काढणार्‍या या भुताच्या भीतीनं आयुष्यभर अम्मूचा पिच्छा पुरवला होता.

माम्माची म्हणायची, हा वेडसरपणा आनुवंशिकच आहे. कधी कुठून उपटेल आणि कुटुंबातल्या कुणाची मानगूट धरील, सांगणं मुश्कील! पाथिल अम्माई... तिला वयाच्या पासष्टीत या भुतानं गाठलं आणि बिचारी अंगावरचे कपडे ओरबाडत सारखी नदीकडे धावत राहिली. शेवटी-शेवटी गावभर नागडी फिरायची. नदीतल्या माशांना गाणी ऐकवत बसायची. शिवाय थम्पी चाचेन! त्याचं तर भलतंच झालं. कधी काळी चुकून गिळलेला सोन्याचा दात परत मिळावा म्हणून तो रोज सकाळी आपली विष्ठा चिवडत बसायचा. आणि डॉ. मुथाचेन! त्या माणसानं इतका कहर केला; की त्याच्या स्वत:च्या लग्नातून त्याला उचलून पोत्यात बांधून घरी आणावं लागलं होतं.

...पुढे?

पुढे काय होईल?... भावी पिढ्या एकमेकांना काय सांगतील?

'होती एक अम्मू... अम्मू आयपे. एका दारुड्या बंगाल्याशी लग्न करून फसली. शेवटी वेडी झाली. आणि ऐन तरुण वयात कुठल्यातरी फालतू लॉजमध्ये मेली'...?

आपापसांत, रक्ताच्या नात्यात शरीरसंबंध होतात; म्हणून सीरिअन ख्रिश्चनांमधल्या अनेकांचं मानसिक संतुलन ढासळतं. त्यांना वेड लागतं, असं चाकोचं ठाम मत होतं; पण माम्माचीला ते मुळीच पटत नसे.

पाठीवर रुळणारे केस उचलून अम्मूनं त्यांच्या विरळ लांबुडक्या बटा चेहर्‍याभोवती गुंडाळल्या, आणि त्या केसांच्या मधून बारीक नजरेनं मृत्यूकडे धावणारी वाट ती खूप वेळ निरखत राहिली. देहदंड देणार्‍या एखाद्या मध्ययुगीन रासवट इसमानं, डोक्यावर बुरखा चढवून मरणाच्या दारात उभ्या असणार्‍या कैद्याकडे पाहावं, तशा थंड नजरेनं अम्मू खूप वेळ आरशातल्या प्रतिमांकडे निरखून पाहत होती. एक जितंजागतं अस्तित्व फासावर चढवायच्या तयारीत असलेला लोंबत्या विसविशीत छातीचा आणि हसताना गालांवर खळ्या पडणारा जल्लाद! आणि सीमेपल्याड युद्ध भडकलेलं असताना जुळ्यांना देता-देता

पोटावर उमटलेल्या त्या सात रेघा! जणू दु:खाचे, वेदनांचे व्रणच!

भविष्याकडे धावणारा रस्ता अम्मूला स्पष्ट दिसत होता. अखेरीस काय होणार, तेही आतून जाणवलं होतं. 'अखेरच्या क्षणा'च्या भयानक रूपानं तिच्या काळजाचा ठोका चुकवला नाही; पण तिथवर जाणारा रस्ता मात्र थरकाप उडवणारा होता. कुठे आलो, कुठवर जायचंय याच्या खाणाखुणा सांगणारा एकही मैलाचा दगड नाही... रखरखीत, भकास कडेला एकही झाड नाही. क्षणभर श्वास घ्यावा; तर सावलीचा एक ठिपका नाही. मऊ धुक्याचा ओला पदर नाही. गाणाऱ्या पक्ष्यांचा मागमूस नाही. चढउतार नाहीत, वळणंसुद्धा नाहीत. रस्ता सरळसोट धावत होता; आणि अखेरीस काय उभं आहे; ते कुठल्याही अडथळ्याविना स्पष्ट दिसू शकत होतं. हा सरळसोट स्पष्टपणा अम्मूला पेलवण्यापलीकडचा होता. बघता-बघता त्याचीच दहशत बसली. कसल्याच आशाअपेक्षा न उरलेल्या, उघड्यानागड्या भविष्याचं ते निर्लज्ज दर्शन तिचा थरकाप उडवू लागलं. 'उद्या आपल्या नशिबात काय वाढून ठेवलंय, ते न कळेल तर बरं... निदान आजचा श्वास तरी पोटभर घेता येईल,' असं तिला सारखं वाटे; पण भविष्याच्या रस्त्यावरचे सगळे पडदे उडून रानोमाळ झाले होते. सगळ्या सावल्या आटून, विरघळून गेल्या होत्या. उद्याचा... परवाचा दिवस नजरेआड ठेवणारी वळणं सरळसोट होऊन गेली होती. मृत्यूच्या दिशेनं धावणाऱ्या दृष्टीला कसला आडोसा म्हणून उरला नव्हता. आज काय, उद्या काय. पुढच्या महिन्यात... वर्षभरात... दहा वर्षांनी काय, ते स्पष्ट दिसायला लागलं होतं. व्हिनिगरमध्ये शिजलेल्या लोणच्याच्या बरणीतून येणाऱ्या नीरस, आंबूस वासाचं भविष्य अम्मूच्या श्वासात मिसळू लागलं होतं. हिरव्यागार तारुण्याला सुरकुत्या पडेतो आंबवून भविष्य मुरत घालणाऱ्या पॅराडाईज पिकल्सच्या लोणच्याचा वास!

चेहऱ्याभोवती गुंडाळलेल्या केसांच्या जंगलात भरकटलेल्या अम्मूनं थकून जाऊन बाथरूममधल्या आरशावर डोकं टेकलं. तिला खूप रडावंसं वाटत होतं; पण आतून काही फुटून आलंच नाही.

अश्रू हवे होते थोडेसे...

तिच्यासाठी.

'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'साठी

आणि धुळीनं माखून आईच्या स्वप्नाचं बाळंतपण करणाऱ्या तिच्या दोन बछड्यांसाठी.

त्या संध्याकाळी आतून तापलेल्या बाथरूममध्ये त्यांच्या रहस्यमय अनाकलनीय आईच्या नशिबाचे फासे उलटसुलट पडत होते. वेलुथाच्या परसदारात घासून चकचकीत केलेली होडी त्यांची वाट पाहत उभी होती. पिवळ्या चर्चमधली अजन्मा पाकोळी कधी एकदा आपण या जगात येऊ, म्हणून गर्भात कुचंबून थांबली होती. आणि अम्मूच्या

बेडरूममध्ये धिंगाणा घालणारा इस्था राहेलशी दंगामस्ती करीत 'खाली डोकं वर पाय' अशा अवस्थेत उभा होता.

निळ्या पडद्यांनी आच्छादलेली, खिडक्यांच्या तावदानाभोवती पाकोळ्यांचा पिंगा रंगवणारी ती बेडरूम... त्यांच्या आयुष्यातली जीवघेणी रहस्यं ऐकण्यासाठी ओठंगून उभ्या असलेल्या भिंतींची बेडरूम.

त्याच बेडरूममध्ये अम्मूला कोंडणार होता भविष्यकाळ. आणि नंतर अम्मू स्वत:च स्वत:ला करून घेणार होती बंद! सोफी मॉलचं शरीर दफन केल्यानंतर चारच दिवसांनी दु:खानं वेडापिसा झालेला चाको त्याच बेडरूमच्या दारावर मारणार होता लाथा... आणि कोसळलेलं दार मोडून पडणार होतं, उभ्या आयुष्यासारखं!

'चालती हो... चालती हो माझ्या घरातून! पुन्हा दिसलीस इथं, तर हाड न् हाड मोडून ठेवीन! नालायक साली, हरामखोरऽऽऽ'

माझं घर... माझे अननस... माझी लोणची.

त्यानंतर पुढे कितीतरी वर्षं राहेलला कायम एक स्वप्न पडत असे. एका बाईच्या प्रेताशेजारी गुडघे टेकवून बसलेला एक ढेरपोट्या, बिनचेहऱ्याचा पुरुष. तो त्या प्रेताचे केस उपटतोय... मेल्या शरीरातलं हाड न् हाड ठेचता ठेचता हात-पाय-बोटं – अगदी नखांपर्यंत येऊन पोचलाय. झाडावरची डहाळी काटकन मोडावी, तसं कानाचं हाड मोडतंय. खचाखच... खपाखप वार येतायत. हाडं तोडली-मोडली-तुडवली जातायत. पियानो वाजवणाऱ्या माणसानं समोरच्या काळ्या-पांढऱ्या नाजूक पट्ट्या निर्दयपणे मोडून काढाव्यात. त्यांचा खून करत सुटावं, तशी नुसती धुमश्चक्री चाललीय. (नंतर खूप वर्षांनी विद्युतदाहिनीसमोर उभी राहिलेली राहेल तळहाताच्या घामाचा फायदा उचलून चाकोच्या मजबूत पकडीतून सुटका करून घेणार असली, तरी) तिचं त्या दोघांवरही जिवापाड प्रेम आहे. पियानोवर आणि त्यावर थयथया नाचणाऱ्या त्या माणसावरही!

डोक्यात खून चढलेल्या त्या मारेकऱ्यावर... आणि त्याच्या शेजारी निपचित पडलेल्या प्रेतावरही!

बंद दारावर बाहेरून जोरदार धडका बसत राहतील. दार मुळातून उखडून कोसळून पडणार, या भीतीनं थरथरणाऱ्या हातांचं कापरं थोडं आवरावं, म्हणून गरज नसताना अम्मू राहेलच्या रिबिनींना दुमड मारून शिवत बसेल.

मग न राहवून ती दोन्ही मुलांना कुशीत ओढून घेईल. घाईघाईनं म्हणेल,

'तुम्ही दोघं सांभाळाल ना एकमेकांना? एकमेकांवर खूप प्रेम कराल ना? सांगा... वचन द्या!'

'प्रॉमिस!' राहेल आणि इस्था कसेबसे एखादा शब्द बोलतील. दोघांच्या संदर्भात 'एक' आणि 'मेक' असा फरक आहेच कुठं, हे सांगावंसं वाटेल त्यांना; पण ऐन वेळी शब्दच

सुचणार नाहीत.

ते दोघं आणि त्यांची आई. बधिर झालेले, संवेदनशून्य पुतळे. त्यांनी जे-जे काही केलं, ते सगळं परत येईल आणि हिरावून घेईल अख्खं आयुष्यच; पण ते नंतर. पुष्कळ पुढे...

नंतर...

शेवाळयानं भरलेल्या अंधाऱ्या विहिरीत घुमणाऱ्या घंटेच्या आवाजासारखा शब्द.

नंतर...

थरकाप उडवणारा... थरथरत कंप पावणारा. स्तब्ध बसलेल्या पतंगाच्या पायासारखा... केसाळ!

काय होतंय काही कळणार नाही. कशाची कशाला संगती लागणार नाही. सगळं निरर्थक... असंबद्ध! जणू प्रत्येक गोष्टीतला अर्थ खाली मान घालून पसार झालाय कुठल्याकुठे आणि आत्मा हरवून बसलेल्या निर्जीव शरीरासारखे पोकळ तपशील उरले आहेत मागे. एकमेकांपासून तुटलेले. अलग झालेले... अम्मूच्या हातातली चमकती सुई. राहेलच्या रंगीबेरंगी रिबिनी. क्रॉसस्टिचनं भरलेल्या पलंगपोसावरच्या सुरकुत्या. हळूहळू मोडत जाणारं दार... एकमेकांशी कसलं नातं नसलेल्या अशा असंख्य निरर्थक गोष्टी. जणू अस्तित्वाला अर्थ देणारी हुशारी... आयुष्याचे हरवले-विस्कटले तुकडे साधून देणारे नातेसंबंध... प्रतिमांचं प्रतिबिंबाशी असलेलं नातं... चमकत्या सुईचं प्रकाशाशी, कापडावरच्या सुरकुत्यांचं आतल्या धाग्यांशी, सुयांचं दोऱ्याशी, भिंतींचं खोलीशी, प्रेमाचं भीतीशी, रागाशी, खेदखंत आणि पश्चात्तापाशी असलेलं नातं हे सगळं हरवतंय एकाएकी. सगळे दुवे तुटलेले. सगळा अर्थ सरलेला.

'चंबूगबाळं आवर तुझं आणि नीघ... आत्ताच्या आत्ता चालती हो माझ्या घरातूनऽऽ' तुटलेल्या दाराच्या मोडक्या फळयांवर पाय रोवून रागानं बेभान झालेला चाको जीव खाऊन ओरडेल... किंचाळेल... त्याचा चेहरा बघता-बघता मोठा होईल. क्रूर... मोडक्या दाराची पितळी कडी त्याच्या हातात चमकत असेल... एकाएकी त्याचा तोच दचकेल... अडखळेल... थांबेल. ही एवढी हिंमत आपल्यात कुठून आली, हे त्याचं त्यालाच कळणार नाही. त्याची ती अवाढव्य शक्ती... नात्यांचा सौदा करण्याचा अधिकार... घरावरचा स्वयंघोषित मालकीहक्क... त्यातून आलेला रुबाब. आणि या कशाहीपेक्षा कित्येक पटीनं मोठं असणारं, सगळया जगण्यालाच चूड लावून देणारं त्याचं दु:ख! रक्तबंबाळ, जखमी मनातून पाझरणारा शोकाचा अंतहीन समुद्र!

...समोर उभा टोकदार तीक्ष्ण लाकडांचा लालभडक ढीग.

अम्मू वरून नेहमीसारखीच असेल... शांत, स्तब्ध; पण आतून पार मोडून गेलेली. ती मान खाली घालून रिबिनींना शिवण घालत बसेल. नजर उचलून वर बघण्याची हिंमत करणार नाही... मांडीवर रिबिनींचे उलगडलेले गुंडे... तिचं स्वत्वच शोषून घेणाऱ्या,

सगळे अधिकार हिरावून घेणाऱ्या त्या खोलीत... अम्मू गप्प! आतून हादरलेली... उद्ध्वस्त झालेली.

...ती खोली. हैदराबादच्या तज्ज्ञ डॉक्टरांचं पत्र आल्यावर त्याच खोलीत इस्थाच्या पाठवणीची तयारी होणार होती. अम्मू त्याची ट्रंक भरून देणार होती, आणि होल्डॉल... एक डझन पूर्ण बाह्यांचे सुती गंजिफ्रॉक, डझनभर बिनबाह्यांचे सुती गंजिफ्रॉक... 'इस्था, हे बघ प्रत्येकावर तुझं नाव लिहिलंय शाईनं...' त्याचे मोजे, लांबुडक्या पायांच्या पॅन्टी, रुबाबदार कडक कॉलरवाले शर्ट. त्याच्या कमरेचा पट्टा आणि बूट (त्यांच्या तळातूनच ती रागाची लहर उसळायची.) एल्व्हिस प्रिस्लेचे फोटो. कॅल्शियमच्या गोळ्या आणि बाटलीभर लाललाल गोड औषध. त्या औषधाच्या बाटलीबरोबर मोफत मिळालेला जिराफ. त्याच्या ज्ञानकोशाचे चार खंड... 'अरे राजा, तिथं गळ कशाला हवाय? मासे पागायला नदीच कुठंय मुळी?' ख्यातनाम कीटकशास्त्रज्ञ महाशयांनी दिलेली कफलिंक्स जडवलेल्या चेनच्या पिशवीतली बायबलची प्रत. त्याच्या चहाचा कप. साबणाची वडी. वाढदिवसाच्या आधीच आणलेलं, पण मुळीच उघडून बघायचं नाही, असा दम भरून दिलेलं प्रेझेंट. चाळीस कोरी अंतर्देशीय पत्रं... 'हे बघ इस्था, सगळ्या पत्रांवर मी आधीच पत्ते लिहून ठेवलेले आहेत. फक्त मजकूर लिहायचा. आणि घडी घालून नीट बंद करायचं. तुला घडी घालता येते, की नाही, ते आत्ताच बघून घे.' मग इस्था हळूच पुढे येईल. 'इथं घडी घाला' असं लिहिलेल्या ठिपक्याठिपक्यांच्या रेषेवर नीट घड्या घालून अम्मूकडं हसून पाहील... त्या लोभस पण एकाकी हसण्यानं अम्मू कळवळेल. तिचे डोळे पुन्हा पुन्हा भरून येतील.

'लिहिशील ना पत्र? नक्की लिहिशील? लिहिण्यासारखं विशेष काही नसलं, तरी... लिहिशील?'

'लिहीन. नक्की लिहीन.' इस्था पटकन म्हणून टाकेल. काय चाललंय ते त्याला नीटसं कळणारच नाही. याआधी कधीच नव्हती, इतकी संपत्ती अचानक आपल्या अधिकारात आल्याच्या जाणिवेनं तो थोडा गडबडलेलाच असेल. जमिनीवर उघडून ठेवलेल्या ट्रंकेत भरण्यासाठी हारीनं मांडून ठेवलेल्या, शाईनं त्याचं नाव लिहिलेल्या अनेक छोट्यामोठ्या वस्तू. सगळी त्याची व्यक्तिगत मालमत्ता. हे सगळं समजून घेणं एकूणात अवघडच असेल.

...त्याच खोलीत अनेक वर्षांनी राहेल परत येईल. तिच्या नजरेसमोर तिच्याच रक्तामांसाचा एक त्रयस्थ अबोल पुरुष अंघोळ करील. निळ्या साबणाची वडी चोळून आपटून-धोपटून कपडे धुवील.

हड्डीपसली एक झालेला... बारकुसा... मधासारखा गर्द तपकिरी रंगाचा. समुद्राची गुपितं डोळ्यांत भरून वावरणारा. कानाच्या पाळीवर पावसाचा टपोरा थेंब चिकटलेला.

इस्थापप्पीचाच्चेन कुट्टप्पेन पीटर मॉन.

प्रकरण १२
कोचू थोम्बन

देवळाच्या दिशेनं चेंडाचा आवाज वाढत चालला होता. रात्रीच्या नीरव शांततेत घुमणाऱ्या त्या आवाजाची वलयं अवघ्या आयमेनेमला वेढून वरवर सरकत होती. एकाकी, सुनसान आणि पावसाच्या रिपरिपीनं किच्च ओला झालेला रस्ता... आजूबाजूला मुकाट उभी झाडं... धापा टाकणाऱ्या राहेलनं मंदिराभोवतीची उंच पांढरी भिंत पार केली आणि समोरच्याच लाकडी दरवाजात मस्तक झुकवून ती आत शिरली. तिच्या हातात आठवणीनं आणलेला नारळ होता.

देवळात चोहीकडे पांढऱ्या भिंती... त्यावर चढलेले हिरवट शेवाळाचे झुबके आणि जिकडे-तिकडे पसरलेला ओलसर, गोडुस वास. चंद्राच्या क्षीण प्रकाशात देऊळ शांत, नि:स्तब्ध पहुडलं होतं. व्हरांड्याच्या कडेला बांधलेल्या दगडी ओट्यावर चटई टाकून एक बारकुळा पुजारी शांत झोपला होता. डोक्याशेजारी देवासमोरची दानाची पितळी थाळी... झोपण्याआधी आपलं स्वप्नच जणू त्यानं उशीभोवती रेखून ठेवलेलं असावं तशी! देवळाभोवतीच्या कुंपणाची भिंत केरकचऱ्यानं भरलेली. जिकडे-तिकडे कुजलेल्या निर्माल्याचे, प्रसादाच्या पत्रावळींचे ढीग आणि पावसाच्या पाण्याने रपरपलेली चिखलाची तळी... प्रत्येक तळ्यात आकाशातला एकेक चंद्र.

कोचु थोम्बनचं दिवसभरातलं सगळं धार्मिक काम एकदाचं संपलं होतं. एका भल्यामोठ्या लाकडी तुळईला साखळ्या लावून त्याला जखडून ठेवलं होतं. शेजारी त्याच्याच शेणाचा प्रचंड ढीग. दिवसभराचं काम संपवून कोचु थोम्बन विश्रांती घेत शांत पहुडला होता. झोपही लागली असावी बहुतेक. एक सुळा जमिनीवर टेकलेला, दुसरा आकाशातल्या चमकत्या तारांकडे रोखलेला. डोळे मिटलेले. राहेल पाय न वाजवता हळूच कोचु थोम्बनच्या जवळ गेली. त्याच्या अवाढव्य शरीरावरची एके काळची तुकतुकीत कातडी आता सुरकुत्या पडून लोंबत होती. त्यावरचं पहिलं तेजही ओसरलं होतं. राहेलला वाईट वाटलं. कोचु आता मोठा झाला होता. म्हातारपणाकडे झुकला होता. त्याचे सुळे भलतेच वाढले होते. त्याला कोचु थोम्बन तरी कसं म्हणायचं आता? तो तर वेल्लय्या थोम्बन झाला होता... मोठा, म्हातारा हत्ती!

राहेलनं कोचु थोम्बनसमोर नारळ ठेवला. सुरकुत्यांनी भरलेल्या जाड-जाड पापण्या हलकेच चाळवल्या. कसलीतरी हालचाल झाली. आपले मिचमिचे, म्हातारे डोळे उघडून कोचूनं समोर पाहिलं. आणि पुन्हा पापण्यांची कातडी ओढून तो शांत झोपून गेला. आकाशातल्या तारांना टोकणारा त्याचा तीक्ष्ण सुळा जरासुद्धा हलला नाही.

जून महिन्यात पावसाळा सुरू झाला, की कथकलीचे कार्यक्रम हळूहळू कमीकमी होत जात; पण तरीही मानाच्या ठिकाणी नर्तकांना उभं राहावंच लागे. या गावाहून, त्या गावाला प्रवास करणाऱ्या गटांना वाटेत लागणाऱ्या काही मानाच्या देवळांमध्ये नाचल्याशिवाय सीमा ओलांडताच येत नसत. आयमेनेममधल्या देवळाला असा परंपरागत मान नव्हता; पण तरीही आजकाल तिथे कथकलीच्या रात्रींची संख्या फारच वाढली होती. करी सैपूच्या इस्टेटीवर झगमगणाऱ्या हॉटेलात विदेशी पर्यटकांसमोर आपल्या कलेचा अपमान सोसून केवळ पैशांसाठी नाचणारे नर्तक, पापाचं परिमार्जन करायला आयमेनेमच्या देवळात येत. हॉटेलातल्या स्विमिंग पुलाशेजारची कापून, छाटून तोकडी केलेली रक्तबंबाळ नृत्यनाट्यं देवळात पुन्हा उभी राहत आणि रात्ररात्रभर मनसोक्त रंगत.

पंचतारांकित हॉटेलच्या बाजारू रंगमंचावर अर्धनग्न शरीरांनी गजबजलेल्या स्विमिंग पुलाशेजारी जे काही झालं; ते सगळंच या कलावंतांच्या मनात सलत असे. प्राणपणानं जपलेल्या पारंपरिक नृत्यकलेत केवळ पैशाच्या मोहासाठी आपण माती कालवतो आहोत, ही मन कुरतडणारी जाणीव त्यांना जगू देत नसे. मग ठरल्या पैशाची पाकिटं घेऊन आपापल्या गावी परत जाताना हे कलावंत आयमेनेमच्या देवळात बेभान नाचत. डोळ्यांवर कातडं ओढून बसलेल्या देवाची क्षमा मागत... पिढ्यान्पिढ्यांच्या नृत्यनाट्यांची कत्तल केल्याबद्दल, त्यातल्या देवादिकांच्या पुराणकथा मोडूनतोडून छाटून तीन मिनिटांच्या 'परफॉर्मन्स'मध्ये कोंबून बसवल्याबद्दल नाक घासत.

पहाट झाली, तरी या कलावंतांच्या नृत्यामधला बेभानपणा तिळमात्र ओसरत नसे. समोर गावकऱ्यांची हीऽऽऽ गर्दी, पण त्यातल्या जिवंत माणसांची संख्या कुणाच्या खिजगणतीत नसे. नृत्य... केवळ त्या आदिशक्तीसाठी! पापक्षालन म्हणून! मन कुरतडणारा अपराधीपणा मारून टाकता यावा, म्हणून!

देवळाचा सभामंडप चोहोंबाजूंनी उभ्या नक्षीदार खांबांनी सजलेला. डोक्यावर दोन्ही बाजूला उतरत्या छपराचे वृद्ध, पारंपरिक पाखे... तिथून आत गेलं, की गर्भगृह आणि मग गाभारा. हजारो वर्षांच्या गंधानं भरलेल्या गाभाऱ्यात बासरी वाजवणाऱ्या मग्न श्रीकृष्णाची गोजिरी मूर्ती.

...गाभाऱ्यासमोरच्या सभामंडपात कथकलीला रंग चढत होता. धुंद होऊन वाजणारा मृदंगम आणि त्या तालावर बेभान नाचणाऱ्या नर्तकांची रात्र रंगत चालली होती. उलटणाऱ्या एकेक प्रहराबरोबर नर्तकांच्या चेहऱ्यावर चढवलेल्या मुखवट्यांचे रंग फिकुटत होते... आणि बेभान पायांमध्ये कसलंसं पिसाटपण चढत चाललं होतं.

सभामंडपातल्या एका खांबावर मान टेकवून पायावर पाय टाकून राहेल कट्ट्यावर बसली. समोर इतका जल्लोश चालू असताना तिला आतून शांत वाटत होतं. चमकत्या

पितळी दिव्यांमधल्या लांबलचक वाती खोबरेल तेलात जळून- जळून आटत चालल्या होत्या. सुकल्या कापसात हलके-हलके चढत जाणारं तेल विझत आलेल्या ज्योतींना पुन्हा पुढं सारत होतं.

खरं तर, कथा सुरू होऊन पुष्कळ वेळ झालेला; पण मध्येच येऊन बसलेली राहेल हलकेच त्यात ओढली गेली आणि पुढच्या कथासूत्रात आपसूक गुंतत गेली... बघता-बघता त्या कथेचाच एक भाग झाली.

...हे तसं नेहमीचंच! कथेच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत काहीच 'गुप्त' नसणं, हेच तर महाकाव्यांच्या लोकप्रियतेचं खरं गुपित! कथकलीचं नृत्य बांधणाऱ्या आदिगुरूंनी हे रहस्य पुष्कळ पूर्वी अचूक हेरलं असावं. महाकाव्यात काय-काय घडतं, ते सगळंच सगळ्यांना ठाऊक असतं, ऐकलेलं असतं. तरी ते पुन्हा ऐकावंसं वाटतं, पाहावंसं... अनुभवावंसं वाटतं. चालू असलेल्या कथेत मधूनच कुठंतरी शिरावं आणि मागचे सगळे दुवे जोडून घेत वाहणाऱ्या कथेबरोबर पुढेपुढे जात राहावं. कसलीही गुंतागुंत नाही... मती गुंग करून टाकणारी रहस्यं नाहीत... चक्रावून टाकणारे शेवट नाहीत. पूर्वी पाहिलं, ऐकलं, अनुभवलं नाही, असं काहीच नाही. वर्षानुवर्षं आपण एकाच घरात राहावं आणि सवयीनं, परिचयानं, सहवासानं त्या घराचं आकर्षण वाढत जावं... मनात, जाणिवेत रुजत-भिनत जावं, तसं काहीसं! अशीच असतात महाकाव्यं, सवयीची, परिचयाची, तरी नित्यनूतन! प्रियकराच्या अंगाला येणाऱ्या बेभान उत्कट गंधासारखी! कथा कुठल्या वळणानं जाईल, शेवटी काय होईल, हे सगळं ठाऊक असतं, तरी जणू काहीच माहीत नसल्याच्या उत्कंठेनं आपण जिवाचे कान करून ऐकतो... एखाद्या दिवशी मरण अटळ आहे, हे ठाऊक असूनही जणू अमरपट्टा मिळाल्याच्या थाटात आपण रसरसून जगतो, तसंच! महाकाव्याचे सगळे धागे परिचयाचे असतात. कोण जगतं, कोण मरतं, कुणाचं प्रेम सफल होतं, कुणाच्या भाळी अखंड विरहाचा एकाकी शाप असतो... हे सगळं ठाऊक असतं, तरी पुन्हा पुन्हा ऐकावंसं वाटतं. नजर थकत नाही, तहान मिटत नाही.

अशी जादू ज्यांच्या पोटी असते, तीच महाकाव्यं!

कथकली नर्तकासाठी ही महाकाव्यं जन्मदात्या आईसारखी आणि पोटच्या मुलाबाळांसारखी! त्या महाकाव्यांच्या कुशीतच तो वाढतो... खेळतो... लहानाचा मोठा होतो... त्यातल्या कथासूत्रांमधूनच जग समजून घेतो... त्याच दृष्टीच्या खिडकीतून नातीगोती, रीतिरिवाज, सुख:दु:खं पाहायला शिकतो.

...आणि जन्माला घालणाऱ्या आईसारखी असणारी ही प्राचीन महाकाव्यं घेऊन रंगमंचावर उभं राहण्याची वेळ आली, की तो त्यांना पोटच्या मुलाबाळांसारखा अंगाखांद्यांवर खेळवतो. त्यांच्याशी चेष्टामस्करी करतो, खांद्यावरून उंच हवेत उडवून पुन्हा सफाईनं झेलतो, जमिनीवर रांगू देतो, म्हणता-म्हणता त्यांना घेऊन पुन्हा

आकाशात झेपावतो. महाकाव्यातल्या देवादिकांच्या वलयाला न घाबरता तो सगळयांची यथेच्छ टिंगलटवाळी करतो, गमतीजमती करतो आणि पुन्हा त्यांच्या चरणांवर अख्खं अस्तित्वच झोकून देतो. मुलांना चिडवावं, रडवावं आणि पुन्हा कवटाळून कुशीत घ्यावं, तसा हा खेळ... या खेळात रंगलेल्या नर्तकाला सर्व तऱ्हेचं स्वातंत्र्य असतं... अख्ख्या जगाची सफर तो अवघ्या काही मिनिटांत घडवून आणील; आणि झाडाच्या कुशीतून गळलेल्या एखाद्या पानाचं वर्णन समरसून रंगवील... हातपाय लांबवून झोपलेल्या माकडाच्या शेपटीrची गोष्ट तासन्तास सांगेल. शत्रूच्या रक्तानं भिजलेल्या घनघोर युद्धाच्या वर्णनानं श्रोत्यांच्या अंगावर भीतीचे शहारे फुटतात न फुटतात, तोच हा नर्तक अचानक किर्र जंगलात जाईल आणि डोंगरदऱ्यांच्या कुशीतून वाहणाऱ्या उष्ण झऱ्यांमध्ये न्हात बसलेल्या तरुणीचं ओलेतं सौंदर्य हळुवार, नाजूक शरीरभाषेतून साक्षात जिवंत करील... एका क्षणात तो खदाखदा हसत ऊत येऊन थयाथया नाचणारा राक्षस असेल, तर पुढच्याच क्षणी शेजाऱ्याच्या कानात चावट चहाड्या सांगणारा साधाभोळा मल्याळी खेडूत! उघड्या छातीनं बाळाला दूध पाजणाऱ्या ओल्या बाळंतिणीसारखा उत्तेजक, गूढ हसेल; तर कधी गोपींच्या खोड्या काढून गंमत बघणाऱ्या खट्याळ कृष्णासारखा खिदळेल! अपार आनंदाच्या पोटात दडलेली दु:खाची भळभळ क्षणात उघडी करून दाखवील... अलौकिक मानसन्मानाच्या, यशकीर्तीच्या उसळत्या समुद्रात तरंगणारे शरमिंद्या लांच्छनाचे मासे बघता-बघता जाळयात पकडील!

गोष्टी देवादिकांच्या; पण त्यांना गुंफणारे धागे मात्र मानवी हृदयं छिनून काढलेले.

कथकली नर्तकाइतकं अभिजात सौंदर्य क्वचितच अन्य कुणाच्या नशिबी असेल. कारण त्याचं शरीर हा त्याचा आत्माच! संपूर्ण अभिव्यक्तीचं एकमेव साधन. डोळयांमध्ये नजरेपलीकडचं काहीतरी. चेहऱ्यावर हलणाऱ्या रेषेरेषेत स्नायूंपलीकडचं काहीतरी... आणि मृदंगम्च्या ठेक्यावर झुलणाऱ्या शरीरात शरीरापलीकडचं पुष्कळच काही... अवघे प्राणच एकवटलेले. वयाच्या तिसऱ्या वर्षांपासून घासलेल्या, घोटलेल्या तालमीत तयार झालेल्या हाडामांसाच्या शरीरात 'गोष्ट सांगण्याची' जादू ठासून भरलेली... रंगीत मुखवट्याआडच्या चेहऱ्यावरचा हर-एक स्नायू जन्मभराच्या साधनेतून घडलेला आणि गोलाकार, गरगर फिरणाऱ्या झग्यामधून नाचणाऱ्या पायांमध्ये तर प्राणच फुंकलेले.

...पण आधुनिक जगातल्या मनोरंजनाच्या उथळ कल्पनांनी या कथकली नर्तकाला एकाएकी मोडीत काढून टाकलं. बघता-बघता तो कालबाह्य झाला, जुनाट ठरला. मुटकुळं उचलून अडगळीत फेकला गेला. त्याच्या पोटची मुलंच येता-जाता त्याचा उद्धार, उपहास करू लागली. 'उपाशीपोटी कसली डोंबलाची कला?' असे मस्तक फिरवणारे प्रश्न त्याच्या तोंडावर फेकले जाऊ लागले. आधुनिक जगातल्या नवख्या, नखरेल मोहांनी चेकाळलेली मुलं त्याच्यापासून तुटली, परंपरेला लाथाडून बाहेर पडली. आपल्या बापानं केलेल्या हर-

एक गोष्टीची त्यांना लाज वाटू लागली. कथकलीच्या साधनेचा श्रीगणेशा करायच्या वयात मुलांच्या आयुष्यात टी. व्ही. घुसला. नर्तनाची भिकारडी वाट न धरता त्याची मुलं बस कंडक्टर, कारकून होण्याच्या रस्त्यावरून सुसाट निघाली. चतुर्थ श्रेणी सरकारी कर्मचारी झाली. चपरासीगिरी करता-करता 'युनियनबाजी' शिकली. सगळे आधुनिक डावपेच शिकून जगण्याच्या लढाईत पारंगत झाली.

...आणि परंपरेची ओझी डोक्यावरून उतरवू न शकलेला जुना कलाकार नव्या जगात अधांतरी लोंबकळू लागला. गळयात पत्र्याचा डबा अडकवून तुफान गर्दीनं खचाखच भरलेल्या बसमध्ये फिरून चटकफटक चिमटा वाजवीत तिकिटं विकण्याची कला त्याला अवगत नव्हती. सायबाच्या टेबलावरची बेल वाजता क्षणी ढुंगणाला पाय लावून सायबासमोर हजर होण्याची लाळघोटी अजिजी कुठल्याच महाकाव्यानं त्याला शिकवली नव्हती. चहाचे वाफाळते कप आणि मारी बिस्किटांनी भरलेला ट्रे घेऊन अदबीनं झुकून उभं राहण्यासाठी त्याचा ताठ कणा वाकता वाकत नव्हता.

शेवटी वैतागून तो पैसे मिळवण्याकरता बाहेर पडला आणि कलेचा बाजार मांडून उभा राहिला. आपल्याजवळ जे आहे, ते विकल्याशिवाय रोजीरोटी चालणार नाही, हे जाणून पर्यटनाच्या आंतरराष्ट्रीय बाजारात त्यानं स्वत:चं दुकान थाटलं. गोष्टी 'सांगण्याची' अद्‌भुत क्षमता असलेल्या शरीराची रुपये-पैशातली किंमत ठरवली.

...आणि हलकेच त्याच्या गळयात 'रीजनल फ्लेवर'चं झगमगतं लेबल अडकलं.

करी सैपूच्या इस्टेटीवर उभ्या राहिलेल्या पंचतारांकित हॉटेलात एकमेकांच्या मिठीत गुरफटून गेलेल्या अर्धनग्न शरीरांपुढे त्याचे 'प्रोग्रॅम्स' सुरू झाले. गहन गूढ परंपरेच्या छाताडावर पाय रोवून महाकाव्यांचे तुकडे पडले. 'अटेन्शन स्पॅन' किती आहे, याच्या हिशेबावर कथकलीच्या कलेवराचे इमले उभे राहू लागले. ठरवून दिलेल्या मिनिटांच्या मर्यादेत 'तो' मन मारून नाचू लागला. नाच संपल्यावर पैसे गोळा करू लागला. कधी नव्हे ते त्याचे पाय दारूच्या अड्ड्यांकडे वळले. त्या नशेत दु:ख विसरायची भलती सवय जडली. विडीचा धूर पोटात गच्च भरून तो ठसका लागेपर्यंत हसू लागला.

...हे सगळं आवरलं, की तो परत फिरायचा. परतीच्या वाटेवर आयमेनेमच्या देवळात त्याची पावलं जखडल्यासारखी थांबायची. त्याच्यासारखेच इतर कुणीकुणी कुठून कुठून यायचे आणि श्रीकृष्णाच्या निळया मूर्तीसमोर बेभान नाचायचे. रात्र रात्र महाकाव्यं रंगायची. मनाला कुरतडणाऱ्या अपराधीपणाचा ताण हलके-हलके सैलावत जायचा.

राहेलच्या नजरेसमोर अशी रंगलेली रात्र उभी होती. रिकाम्या, भकास मनानं खांबाला टेकून बसल्या-बसल्या तिच्या बधिर जाणिवा हलकेहलके महाकाव्यात भिजत चालल्या होत्या.

गंगेच्या काठावर नेत्र मिटून प्रार्थना करणारा कर्ण... नजर ठरू नये, अशा तेजानं

झळाळून उठलेली त्याची कवचकुंडलं. सूर्यपुत्र कर्ण. दानशूर... आणि अद्वितीय योद्धा!

पण त्या रात्री दारूच्या नशेने झिंगलेल्या कर्णाचे पाय लटलटत होते. फाटलेल्या झग्यावर जिकडेतिकडे रफू केल्याची जाळी... डोईवरच्या जुनाट मुकुटातले चमकते खडे गळून उरलेली भोकं... वापरून-वापरून पांढरट डाग पडलेला, लूत भरल्या कुत्र्यासारखा दिसणारा वेल्व्हेटचा अंगरखा आणि भेगा पडून-पडून टणक झालेल्या टाचा अशा अवतारात तो अवतीर्ण झाला आणि बघता-बघता महाभारताचे धागे वेगानं उलगडू लागले.

...तो याहून वेगळा असता, तर? पुढे मागे मेकअपवाल्यांची पलटण.. तारखांचं बुकिंग पाहणारा चटचटीत हुशार एजंट... लाखो रुपयांचे आकडे लिहिलेल्या 'कॉन्ट्रॅक्टस्'नी भरलेली ब्रीफकेस... वरवर चढणारे नफ्याचे आकडे... असा सगळा थाट असता, तर? ...मग 'तो' कोण असता? भोंदू, तोतया. बक्कळ पैसा कमावणारा श्रीमंत पण खोटारडा विदूषक. दिलेली भूमिका निभावताना अभिनयाच्या पाट्या टाकणारा एक नट! तो 'नट' असता, 'श्रीमंत'ही असता; पण 'कर्ण' असता का? श्रीमंतीच्या शेंगेत भरलेल्या दाण्यासारखा लपून बसला असता कदाचित, तो आणि त्याची गोष्ट यांच्यामध्ये गराला फळापासून वेगळं करणाऱ्या टणक सालीसारखी पैशाची ऊब पसरली असती. अशा वेळी तो पोचू शकला असता गोष्टीच्या गर्भात? धुंडाळू शकला असता महाकाव्याचा तळ? आणि शोधू शकला असता तिथल्या रहस्यांची खाण?

– कदाचित नाही.

नाहीच!

पण दारूच्या अमलाखाली चढत्या रात्री रंगत चाललेला हा कर्ण असा कचकड्याचा नव्हता. श्रीमंतीच्या दरवळानं त्याची भूक मेली नव्हती. जगणं जाळणाऱ्या धगधगीत नैराश्यावर समृद्धीची पुटं चढली नव्हती. सांभाळावं, असं जवळ काहीच नव्हतं. गमावण्यासारखं अजून काही गवसलंच नव्हतं. दिवाळं वाजलेल्या सर्कसमध्ये खदखदून हसत इकडून-तिकडे सुळकांड्या मारणाऱ्या विदूषकाच्या थाटात तो झोकून देऊन पिसाटासारखा नाचत होता. त्याला दुसरा पर्याय नव्हता. अन्य गत्यंतरच नव्हतं. तोच त्याच्या आयुष्याचा रंग. तोच स्वभाव. त्यातच तो स्वत:ला झोकून देऊ शकायचा. स्वत:ला विसरून जाऊ शकायचा. तोच त्याच्या जगण्याचा आकार होता, रीत होती. रक्त-मांस शोषून कामाला जुंपणाऱ्या नृत्यातच सगळं प्रेम भरलेलं... पिसाटपण सामावलेलं... त्यातच सगळ्या आशाआकांक्षा, स्वप्नं आणि अपरिमित आनंद! एखाद्या भूमिकेत 'शिरण्यासाठी' भल्याभल्या नटांना स्वत:शीच झगडावं लागतं; पण इथं सगळा उलटाच कारभार! भूमिकेतून बाहेर येण्यासाठी रक्तबंबाळ तुंबळ युद्ध! तरीही पकडलेली मानगूट न सोडणारं हटवादी भूत. वर्षानुवर्षांच्या या युद्धात पराभव ठरलेला... आणि त्या

पराभवातच सामावलेली अत्युच्च विजयाची अफाट शक्ती!

तो 'हरला' होता, म्हणूनच खराखुरा 'कर्ण' होता. जगानं लाथाडलेला... एकटा... एकाकी कर्ण. अडगळीत जमा झालेला कर्ण. अन्नान्न गरिबीत वाढलेला सूर्यपुत्र. सगळी शस्त्रं हिरावून घेतलेल्या असहाय अवस्थेत, स्वत:च्याच भावाच्या हातून कपटानं मरण्यासाठीच जन्माला आलेला. अपार दु:खाचा राजमुकुट धारण करणारा सम्राट... गंगेच्या किनारी प्रार्थना करताना झोकांड्या खाणारा कर्ण.

काही वेळानं कुंती आली. स्त्रीवेषातला पुरुषच; पण खुपसा स्त्रीसारखाच दिसणारा. चालणंबोलणं नाजूक, वावरण्यात एक खानदानी आदब आणि वर्षानुवर्षं 'स्त्री-पार्ट' करून-करून, डोईवर पदर घेऊन-घेऊन स्नायूंवर चढलेली ऐटदार गोलाई... शिवाय पदराआड छातीचा उभार.

कुंतीलाही जरा जास्तच चढली असावी. तिचीही अवस्था कर्णासारखीच होती.

पण कर्णाला एक गोष्ट सांगण्याची जबाबदारी निभावल्याशिवाय कुंतीला कसं पडद्याआड होता येणार? ती सांगत राहिली... उत्सुक नजरेनं कर्ण कान देऊन ऐकत राहिला.

लालभडक, तांबारलेल्या डोळ्यांच्या कुंतीनं आधी थयथय नाचाची आवर्तनं पूर्ण केली. मग सुरू झाली अद्‌भुत वरदान मिळालेल्या एका तरुण कुमारिकेची गोष्ट. या कुमारिकेला मिळाला होता मंत्र! देवांपैकी कुणाशीही संग करून गर्भधारणा करून घेण्याचं सामर्थ्य असलेला हा मंत्र त्या कुमारिकेनं काही दिवस पदरातल्या निखाऱ्यासारखा जवळ बाळगला खरा; पण तिचा संयम फार दिवस टिकला नाही. तारुण्यसुलभ उत्सुकतेनं अचानक तिचे बंद ओठ विलग झाले. मंत्राचं एक आवर्तन उच्चारल्यावर नक्की काय होतं, ते पारखण्याची अनिवार इच्छा तिला परतवून लावता आली नाही.

...मग ती सुस्नात कुमारिका नगराच्या सीमेवरल्या मोकळ्या पटांगणात गेली. स्वर्गाच्या दिशेला नजर लावून ध्यानस्थ झाली आणि बघता-बघता तिच्या उतावीळ ओठांची कवाडं उघडून अद्‌भुत मंत्राचे शब्द स्रवत राहिले.

क्षणार्धात त्या कुमारिकेसमोर प्रकट झालेल्या सूर्यदेवांच्या अलौकिक तेजाचं वर्णन कुंती कर्णापुढे साक्षात उभं करीत होती. नशेमध्ये गुंग झालेल्या शरीराच्या झोकांड्या विसरून कर्ण मंत्रमुग्ध होऊन ऐकत होता.

तरुण, तेजस्वी सूर्यदेवाच्या पौरुषानं मोहित झालेल्या त्या अल्लड कुमारिकेनं आपलं सर्वस्व समर्पित केलं. त्या तेजोवलयात ती गुरफटत, विरत गेली... अपार सुखानं धुंदावली... हुंकारत राहिली.

नऊ महिन्यांनी त्या कुमारिकेच्या पोटी एक तेजस्वी पुत्र जन्माला आला. त्याच्या

संपूर्ण शरीरावर अलौकिक प्रभा पसरली होती. छातीवर सूर्यबिंबानं मढवलेलं सुवर्णाचं कवच आणि कानाच्या पाळ्यांशी लगडलेली कुंडलं!

बाळाला पाहता क्षणी त्या कुमारिकेच्या मनात उमाळा दाटून आला, रोमारोमांतून वात्सल्याची कारंजी उसळली, पण आपण 'कुमारी माता' आहोत, हे तिला विसरता येत नव्हतं.

कुंती म्हणाली,

'आपल्या आणि बाळाच्या कपाळी समाज लांच्छन लावेल, या भीतीनं तिनं मन घट्ट केलं आणि आपल्या नवजात पुत्राला टोपलीत घालून टोपली नदीच्या पात्रात सोडून दिली. नदीतून वाहत आलेलं ते बाळ अखेर अधिरथ नावाच्या एका सारथ्याला मिळालं. अधिरथानं त्या बाळाचा सांभाळ केला. नाव ठेवलं कर्ण.'

चमकलेल्या कर्णानं कुंतीच्या नजरेत नजर मिळवली. एखाद्या जखमी श्वापदासारखं जन्मरहस्य त्याच्या नजरेत कळवळून उठलं होतं. अश्रूंच्या लाटांमधून प्रश्नांचा पूर उसळला होता.

कोण होती ती? कोण होती माझी माता? ती कुठं असेल? कुठं असेल ती? मला घेऊन चला... घेऊन चला तिच्याजवळ...

कुंती मस्तक झुकवून उभी राहिली. तिचे डोळे भरून आले होते.

ती दुर्दैवी स्त्री इथंच आहे, पुत्रा... तुझी माता.

आनंदाचं उधाण आणि कडाडून दंश करणाऱ्या दु:खाची बेहोशी... स्वत:च्या अज्ञात जन्मरहस्याचा उलगडा झाल्याच्या आनंदानं उन्मळून गेलेल्या कर्णाचं पिसाट नृत्य.. अपमानित कटाक्ष... खदाखदा हास्य आणि भांबवलेले प्रश्न...

कुठं होतीस तू? कुठं होतीस इतके दिवस? मला हवी होतीस फार, तेव्हा का असा दुरावा धरलास? माझा हात कधी प्रेमानं हातात घेतलास? कधी हुंगलंस माझं जावळ? दिलेस तुझे स्तन माझ्या भुकेल्या ओठांत?... कधी शोधलंस तरी का मला? केलीस माझी काळजी? 'कुठं असेल आपला पुत्र? कसा असेल?' माझ्या आठवणीनं कधी पाणावले तुझे नेत्र?

कुंतीला काही सुचत नव्हतं. तिनं हलकेच आपल्या पुत्राचा राजबिंडा चेहरा ओंजळीत घेतला आणि जन्मभराची तहानेली माया एकवटून त्याच्या भुवईवर ओठ टेकले. कर्णाचा हिरवागर्द चेहरा... त्यावर रंगवलेले लालबुंद डोळे त्या स्पर्शानं शहारले... सगळ्या संवेदनांनी असोशीनं पिऊन घेतलेला तो स्पर्श विजेच्या वेगानं रोमारोमांत पसरला. या आनंदाच्या अपार लहरीचं काय करावं त्याला कळेना. एक दिग्विजयी योद्धा अर्भकाच्या निरागस नजरेनं मातेकडे फक्त पाहत राहिला.

कशी जगले तुझ्याविना, माझं मला ठाऊक राजा... हर-एक श्वासावर तुझंच नाव कोरलं होतं.

जन्मदात्रीच्या पहिल्यावहिल्या स्पर्शाचे तरंग कर्णाच्या शरीरात सर्वत्र पसरताना राहेल पाहत होती. हर-एक स्नायू जिवंत, बोलका झाला होता. वर्षानुवर्षांच्या विरहाची व्यथा सांगत होता. ती तगमग शांतवत शरीरभर पसरणारा तो स्पर्श... शहामृगानं गिळलेलं अंडं त्याच्या गळयातून खाली उतरताना दिसावं, तितका स्पष्ट, प्रवाही.

पण हे सारं अचानक, एकाएकी थांबलं.

इतक्या वर्षांनी भेटलेली आपली माता काही विशिष्ट हेतूनं आपलं मस्तक चुंबते आहे... गर्भरहस्यावरचा पडदा उचलून आपल्याला आपल्या रक्ताची ओळख देते आहे; कारण तिला आपल्या पाच पुत्रांच्या पांडवांच्या धमन्यांतून वाहणाऱ्या रक्ताची काळजी आहे, हे लक्षात येता क्षणी कर्ण जागच्या जागी थिजून गेला. मग कळवळला... संतापला! कौरव-पांडवांचं महायुद्ध चरमसीमेवर येऊन पोचलेलं असताना पांडवांचा प्राण घेऊ शकणारी शस्त्रं म्यान करण्याचं कपट मनात घेऊन आलेल्या मातेबद्दलची घृणा कर्णाच्या दोन्ही भुवयांच्या मध्ये गोळा झालेली राहेलला स्पष्ट दिसली. 'तू पांडवांचा ज्येष्ठ भ्राता आहेस,' हे सत्य अधोरेखित करता-करता एका महान योद्ध्यापासून आपल्या प्रिय पुत्रांचा बचाव करण्यासाठी धडपडणारी कुंती राहेलला कपटी वाटत राहिली. विलक्षण पेचात सापडलेल्या मातृत्वाची असहायता, तडफड पाहून राहेलच्या डोळयांत अश्रू उभे राहिले.

प्रेमामधल्या नीतिनियमांचा हिशेब मांडून कुंतीनं कर्णाचा धावा करायला सुरुवात केली होती.

'ते तुझे भ्राते आहेत, कुंतीपुत्रा... तुझ्याच रक्तामांसाचे... तुझेच! तू त्यांच्यासमोर युद्धाला उभा राहणार नाहीस. वचन दे मला, वचन दे.'

कर्णामधल्या योद्ध्याची मान वर्तमानाच्या जाणिवेनं उन्नत झाली. मातेला 'वचन' देऊन मित्राला दिलेला 'शब्द' खाली पाडता येणार नाही, हे त्याला जाणवलं होतं. अर्जुनासह ज्या पांडवांनी 'सूतपुत्र' म्हणून आपली हेटाळणी, निर्भर्त्सना केली; त्यांच्या सुरक्षेचं वचन देऊन ऐन रणातून म्ाघारी येणं शक्य नव्हतं. शिवाय सारं जग विरोधात असताना खंबीरपणे पाठराखण करणाऱ्या, स्वतंत्र साम्राज्य बहाल करणाऱ्या दुर्योधनाच्या पाठीत खंजीर खुपसण्याऐवजी त्यानं मृत्यू पत्करला असता. दुर्योधनाला दिलेला संपूर्ण निष्ठेचा शब्द न मोडता पांडवांचा सांभाळ? कर्णाच्या रंगीबेरंगी चेहऱ्यावरून जुन्याच विषादाची नवी लहर चमकत जाताना राहेलनं पाहिली.

मातेला विन्मुख कसं पाठवावं, या चिंतेत गढलेला दानवीर कर्ण अधिकाधिक गुंतत, गुरफटत गेला... आणि अखेर त्याच्या चेहऱ्यावर काहीसं निर्मम हास्य पसरलं. रणनीतीचा नवा फासा टाकत त्यानं कुंतीला वचन दिलं –

'माते, तुझे पाच पुत्र सदैव जिवंत राहतील, हा माझा शब्द आहे. मी युधिष्ठिराच्या वाटेला जाणार नाही. भीमाला स्पर्श करणार नाही. नकुल आणि सहदेव माझ्या अस्त्र-

शस्त्रांचं लक्ष्य ठरणार नाहीत... पण अर्जुन? त्याच्याबद्दल मी कशी खातरी देऊ? आम्हा दोघांपैकी कुणीतरी एक तुझ्याजवळ बाकी उरेल. एकतर माझ्या हातून अर्जुनाचा वध होईल किंवा तो तरी मला नष्ट करील.'

हवेत, कोण जाणे, काहीतरी बारीकसं बदललं. सुरकुत्या हलल्या. कसली तरी गुंतागुंत... हलकीशी खळबळ... राहेलला लगेच जाणवलं, इस्था आलाय.

ती जराही वळली नाही. नजर हलली नाही; तरी तिच्या 'आत' काहीसं सळसळलं. गरम, उबदार वाटत राहिलं. तो आलाय. इथंच आहे. माझ्याबरोबर.

इस्था दूरच्या एका कोपऱ्यात खांबाला टेकून स्वस्थ बसला. समोरच्या नाट्यावर त्याची नजर खिळली.

मग अख्खी उत्तररात्र ते दोघे तसेच बसून राहिले. सभामंडपातल्या मोठमोठ्या वाटोळ्या खांबांनी विभागलेले, पण एकाच गोष्टीत गुंतलेले. एकाच सूत्रानं बांधलेले आणि कुंतीला पाहता-पाहता दुसऱ्या कुणा आईच्या आठवणींनी दुखावलेले.

हवेतला गारठा खूप कमी झाला होता. गारठलेल्या, कुडकुडणाऱ्या शरीराला अचानक कसलीशी ऊब जाणवू लागली होती.

करी सैपूच्या इस्टेटीवरल्या झगमगत्या पंचतारांकित माहोलातली संध्याकाळ भलतीच वाईट गेली असणार. त्या संध्याकाळी मनाला पडलेली छिद्रं बुजावीत, झाल्या जखमा भरून याव्यात, म्हणून कथकलीचे नर्तक जीव तोडून नाचत राहिले. आयमेनेमच्या देवळातल्या उत्तररात्रीचा थरार कळसाला पोचला होता. मृदंगम्च्या नादात भरारलेल्या पायांना थांबणं जणू ठाऊकच नसावं, तसा कल्लोळ... बाहेरच्या भणाण वाऱ्यावादळातून बचाव करण्यासाठी भेदरलेल्या लहान मुलांनी स्वत:ला घरात कोंडून घ्यावं, दारं-खिडक्यांच्या फटीसुद्धा किलकिल्या करू नयेत... अख्ख्या जगण्याचा पालापाचोळा करून टाकणारा वारा आत घुसू नये, म्हणून धपापत्या काळजानं दबा धरून बसावं... तसे सगळे कलावंत बेभान नशेच्या कवचाआड घाबरून, धास्तावून लपले होते. उद्ध्वस्त अवशेषांच्या ढिगाऱ्यावरून मोठमोठाल्या भेदरल्या डोळ्यांचे उंदीर तुरूतुरू सैरावैरा पळत राहावेत, तसा कथकलीचा कल्लोळ उसळला होता.

एका कथेच्या पोटातून बघता-बघता दुसरी कथा उमलत होती. कर्ण शब्दम् – 'कर्णाची प्रतिज्ञा'पासून दुर्योधन वधम् – 'दुर्योधन आणि दु:शासनाच्या वधा'पर्यंत मृदंगम्चा घुमारा चढत उसळत चालला होता.

उगवतीची दिशा उजळली. पहाटे चारच्या सुमाराला भीमानं शेवटचा हात मारला आणि दु:शासनाला आपल्या भक्कम पायाखाली घेतलं. पांडव द्यूतात हरल्यानंतर याच नराधमानं द्रौपदीच्या वस्त्राला हात घातला होता. दुरपदकन्या त्या अपमानानं पेटून

धगधगून उठली. आपल्या पाच शूरवीर पतिराजांनीच आपल्याला पणाला लावलं होतं, याचा विसर पडलेल्या द्रौपदीनं 'दु:शासनाच्या रक्ताची आंघोळ करीन, तेव्हाच पाठीवर मोकळे सोडलेले केस बांधीन,' अशी प्रतिज्ञा केली होती. द्रौपदीच्या या अपमानाचा बदला घेण्याच्या प्रतिज्ञेनं फुरफुरणारे भीमाचे बाहू दु:शासनाचा कोथळाच फाडण्यासाठी कधीचे तहानलेले होते.

मृतदेहांचा खच पडलेल्या युद्धभूमीत अखेर भीमानं दु:शासनाला ललकारलं. सुमारे तासभर दातओठ खाऊन त्यांच्या तलवारींचा खणखणाट चालला होता. आजवरचे सगळे हिशेब चुकते करण्याच्या, हर-एक अपमानाचं उट्टं काढण्याच्या खुमखुमीनं लढणारे दोन्ही योद्धे अखेरीस काहीसे घामाघूम झाले. उत्तररात्र उलटल्यावर पितळी दिव्यांमधल्या ज्योती मंदावू लागल्या. आटलेल्या तेलातल्या कोरड्या वाती भुरूभुरू जळत विझू लागल्या, तसे भीम आणि दुर्योधन क्षणभर थांबले. जणू युद्धविरामच! भीमानं तेलाची बुधली उचलून दिव्यांच्या पोटात तेल भरलं, दु:शासनानं वातींवर धरलेली काजळी झाडली. मंदावलेल्या ज्योती सरसरून पेटल्यावर दोन्ही योद्धे पुन्हा नव्या खुमखुमीनं युद्धाला भिडले. मध्ये थोडी हवा खाल्ल्यामुळे दोघांचा दमसास पुन्हा परतून आला होता. बघता-बघता दु:शासन सभामंडप सोडून बाहेर धावला. देवळाभोवतीच्या प्रदक्षिणा मार्गावर फुरफुरत उधळला. त्याच्यामागोमाग भीमानं उडी ठोकली आणि गगनभेदी रणगर्जना करत दोघेही एकमेकांच्या मागे-पुढे जीव खाऊन धावत राहिले. आपटून, धोपटून, धक्के खाऊन दोघांच्या हातांतल्या पुठ्ठ्याच्या गदा फार चेपून गेल्या; तरी मनगटातली फुरफुर ओसरत नव्हती. लूत भरलेल्या कुत्र्याच्या त्वचेसारखे सोललेल्या वेल्व्हेटचे अंगरखे उडवत आणि कमरेशी बांधलेले गोलाकार फुगीर झगे सावरत चिखलाच्या रपरपीतून, दगडधोंड्यांच्या राशींमधून दोघे जीव खाऊन धावत होते. सुस्त झोपलेल्या हत्तीचं धूड आणि शेणाच्या ढिगांना तर कित्येक प्रदक्षिणा झाल्या. दु:शासनाला एका क्षणात जबर उधाण येई, तर दुसऱ्या क्षणी तो उन्मळून कोसळून गेल्यासारखा दिसे. वखवखल्या नजरेनं आपल्या सावजाकडे रोखून पाहणारा भीम मांजराच्या दुष्ट धूर्ततेनं त्याला खेळवत होता. दोघेही खच्चून प्यायले होते.

हळूहळू अंधारं आकाश उजळलं... लालसर गुलाबी रंगाची उलटी वाटी पृथ्वीच्या डोक्यावर ठेवावी तसं! विश्वाच्या छाताडावरचं हत्तीच्या आकाराचं भलंमोठं छिद्र झोपेतल्या झोपेत वैतागानं चाळवलं आणि पुन्हा जाड-जाड पापण्या डोळ्यांवर ओढून मुकाट्यानं झोपून गेलं. पहाट फुटता-फुटता भीमामधला पशू जागा झाला. त्यानं जोरात डरकाळी फोडताच दमून गेलेल्या वादकांना नवं अवसान चढलं. मृदंगम्चा खाली आलेला घुमारा पुन्हा सरसरून वर उठला आणि वातावरणात कसलीतरी भयानक दहशत उसळली. प्रेक्षकांच्या अंगावर 'आता काय होणार?' या प्रश्नाचा काटा सरसरून उठला.

ज्याच्या-त्याच्या डोळ्यांत भीती साकळली.

पहाटेच्या मंद प्रकाशात इस्थापन आणि राहेलच्या डोळ्यांदेखत भीमानं आपली प्रतिज्ञा पुरी केली. द्रौपदीला दिलेला शब्द खरा करून दाखवला. त्यानं दु:शासनाला जमिनीवर लोळवलं. शरीराला कंप सुटेतो बुलकून काढलं. कठीण लोखंडाचा तुकडा ऐरणीवर घेऊन कसलेल्या लोहारानं दातओठ खाऊन त्याच्यावर घण घालावेत आणि ऐरणीवरचा पत्रा पातळ होत जावा; तशी भीमानं दु:शासनाची चाळण केली. दु:शासन मरून पडल्यानंतर खूप वेळ भीम त्याला मारत सुटला होता. शेवटी तो स्वत:च दमला आणि त्यानं नखं रोवून दु:शासनाचा कोथळा फोडला. आतली आतडी बाहेर काढून त्वेषानं पिळली. मग तो पुढे वाकला आणि दु:शासनाच्या मृतदेहाचीच ओंजळ करून आतून उसळलेलं रक्त घटाघट प्यायला. रक्तानं माखलेला त्याचा चेहरा पिसाटासारखा खदखदून हसत होता. तोंडातून रक्ताच्या चिळकांड्या फुटत होत्या. त्याच्या चेहऱ्यावर थापलेलं रंगाचं रोगण पुसून लालभडक चुळा हनुवटीवर-मानेवर-तिथून अख्ख्या शरीरभर धावत सुटल्या होत्या. भरपूर रक्त पिऊन झाल्यावर तो तृप्त होऊन उठला. दु:शासनाच्या पोटातली लांबलचक आतडी त्यानं रक्तानं निथळणाऱ्या मफलरसारखी गळ्याभोवती गुंडाळली आणि लांबलांब टांगा टाकत गर्वानं फुलून आलेला भीम द्रौपदीकडे निघाला. दौपदीचा मुक्त केशसंभार दु:शासनाच्या ताज्या रक्तात भिजवून पवित्र करायची वेळ आली होती.

पहाट उगवली, तीच मुळी काहीतरी विचित्र पिसाटपणानं भारावल्यासारखी. तांबडं फुटलेल्या आकाशाच्या वाटीखालचं ते रक्तरंजित पिसाटपण इस्था आणि राहेलच्या चांगल्याच ओळखीचं होतं. आधी पाहिलेलं... अनुभवलेलं. वेगळ्या पहाटे... वेगळ्या रंगमंचावर... वेगळ्या थरारात गुरफटलेलं... पण तेच रक्तरंजित पिसाटपण! पायांतल्या बुटांचे टोकदार खिळे... त्यांना लागलेलं रक्त... आणि तो भर पहाटेचा उन्माद. एकीकडे धगधगून उसळणारं रक्तरंजित क्रौर्य, तर दुसरीकडे अत्यंत थंड डोक्यानं नि:शब्द कत्तल एवढंच काय ते!

इस्था आणि राहेल दोघेही निश्चल बसून होते. आत खड्डे पडलेले... भोवती शून्यवत मौनाचं घट्ट आवरण. एकाच नाळेनं जोडलेल्या दोघांच्या मध्ये फक्त एक खांब. दोघे वेगवेगळे... तरी एकाच कल्लोळानं थिजलेले! समोर जे घडत होतं, त्यात गुंतून, गुरफटून गेलेले. ती गोष्ट त्यांची होती... नव्हतीही; तरीही कथानकाच्या दलदलीत पाय मात्र फसले होते. आजूबाजूला उसळलेल्या कल्लोळात ठाणबंद केलेल्या घोड्यासारखी असहाय अवस्था.

तेवढ्यात कोचु थोम्बन उठला. आळसावलेली सोंड लांबवून त्यानं समोरचा नारळ फोडला आणि नव्या दिवसाची रीतसर सुरुवात केली.

तोवर कथकली नर्तकांनी आपलं दुकान आवरलं होतं. चेहऱ्यावरचा मेकअप उतरवून बायकोला पिटण्याकरता ते आपापल्या घराकडे चालते झाले. थुलथुलीत शरीराची कुंतीही आपली फुगीर छाती हलवत मागोमाग निघाली.

दिवस उजाडला. नव्यानं उगवलेल्या शहराला पोटात लपवून वरवर गावंढळपणाची मिजास मारणारं गाव जागं झालं. म्हातारऱ्या माणसानं उठल्या- उठल्या स्टोव्हला पंप मारायला सुरुवात केली. मिरी घातलेलं खोबरेल तेल तापवायला ठेवलं.

कॉम्रेड पिल्लई. तेच. आणखी कोण?

गंमत म्हणजे कॉम्रेड पिल्लईंनीच इस्था आणि राहेलची कथकलीशी गाठ घालून दिली होती. बेबी कोचम्माचा ठाम नकार मोडून काढून ते दोन्ही मुलांना घेऊन देवळात जात आणि रात्ररात्रभर चालणारे कथकलीचे कार्यक्रम आसुसून बघत. लेनिनबरोबरच इस्था आणि राहेललाही त्यांनी कथकलीची 'भाषा' समजावली. त्यातले संकेत शिकवले. या नृत्यशैलीची वैशिष्ट्यं शोधून त्यातला आनंद कसा लुटावा, तेही समजावलं. सहा वर्षांचे असताना जुळ्यांनी कॉम्रेड पिल्लईंबरोबर बसून हेच नृत्यनाट्य पाहिलं होतं. सूडाच्या भावनेनं पेटलेल्या, रक्ताची तहान लागलेल्या भीमाच्या रौद्र रूपाशी त्यांनीच मुलांची ओळख करून दिली. आधी मजा मजा करणारा साधासुधा भीम एकदम गुरगुरायला लागल्यावर घाबरून, गोंधळून गेलेल्या जुळ्यांना जवळ घेऊन कॉम्रेड पिल्लई म्हणाले होते,

'त्याच्या आत एक पशू दडलाय. त्या पशूला शोधतोय तो... हाका घालतोय...'

पशू 'कोणता', ते काही कॉम्रेड पिल्लईंनी सांगितलं नाही; त्यांना 'पशू'ऐवजी बहुतेक 'माणूस'च म्हणायचं असावं. एकदा सुडाचा निखारा फुलला, की जळून खाक झालेल्या पिसाट माणसाचं कसं भूत होतं, हे पशूला कुठलं ठाऊक असणार? आणि मानवी सुडाचा धगधगीत अंगार पशूला कसला पेलवणार?

आकाशातली गुलाबी महिरप हलके-हलके पुसत, विझत गेली. उन्हं चांगली कासराभर वर आल्यावर इस्था आणि राहेल मुकाट उठले. ते दोघं सभामंडपाच्या पायऱ्या उतरून खाली येतात; तोच कॉम्रेड के. एन. एम. पिल्लई वर चढत होते. तेलाचं मालिश केल्यामुळं चकाकणारं शुचिर्भूत शरीर. कपाळावर चंदनी गंधाचा ठिपका आणि जाईच्या फुलांनी ओसंडणारी सुगंधी ओंजळ! त्यांच्या तेलकट शरीरावर थांबलेल्या पाण्याच्या थेंबांच्या रांगा हिऱ्यांसारख्या लखलखत होत्या. सावकाश पावलं टाकत देवळात येता-येता इस्था आणि राहेलशी त्यांची गाठ पडली.

'ओहोऽऽ तुम्हीऽऽ' त्यांच्या आवाजातला आश्चर्यानं भिजलेला आनंद लपता लपत नव्हता.

‘भारतीय संस्कृतीला विसरला नाहीत अजून. वाऽऽ वाऽऽ छान वाटलं. गुडगुड. व्हेरी गुड.’

इस्था आणि राहेल काही न बोलता पायर्‌या उतरून खाली आले.

घराकडे जाणार्‌या वाटेवरून नि:शब्द चालत राहिले.

एकत्र.

तो आणि ती.

आम्ही आणि आपण.

प्रकरण १३
आशा... निराशा

सोफी मॉल आणि मार्गरिट कोचम्माला छान ऐसपैस राहता यावं, म्हणून आपली खोली त्यांना देऊन चाकोनं स्वत:चा बाडबिस्तरा पाप्पाचींच्या स्टडीमध्ये हलवला होता.

खोली तशी छोटीशीच. खिडकी उघडली, म्हणजे रेव्हरंड जॉन आयपेनी कधी काळी लावलेल्या रबराच्या झाडांची विस्कटलेली, खुरटलेली बाग दिसे. खोलीच्या एका दारातून मुख्य घरात जायचा रस्ता; आणि दुसरं दार या कानाची त्या कानाला खबर लागू न देता परस्पर घराबाहेर उघडणारं! (चाकोच्या 'शारीरिक गरजांना' येता-जाता यावं, म्हणून माम्माचीनं गुपचूप केलेली व्यवस्था.)

मोठ्या बिछान्याशेजारी ठेवलेल्या छोट्या कॅम्प कॉटवर सोफी मॉल झोपली होती. कण्हत कुंथत हलके-हलके घरघरणाऱ्या पंख्याचा आळसावलेला आवाज तिच्या डोक्यात भरून राहिला होता. निळसर भुरकट निळे डोळे कधीचे उघडे. तारवटलेले.

जागी.

टक्क जागी.

झोप उडून गेलेली...

कधीची.

'जो' अपघातात मेला, त्या दिवसापासून त्याच्या आठवणीखेरीज सोफीची झोप कधी चाळवली नाही.

– पण आज काहीतरी वेगळंच घडत होतं.

'जो'ची आठवण कुठं गेली, कुणास ठाऊक!

सोफी जागी झाली आणि पलंगावर पडल्या-पडल्या रिकाम्या, भकास खोलीत भांबावलेली नजर फिरवत राहिली. शत्रूच्या प्रदेशात फिरता-फिरता पकडल्या गेलेल्या एखाद्या गुप्तहेरानं कैदेतले दिवस मोजावेत... मोजता-मोजता नि:शब्द शिताफीनं स्वत:च्या सुटकेचे मनसुबे रचावेत... तसं!

जास्वंदीच्या वेड्यावाकड्या फुलांनी भरून ओथंबणारी ओंगळ फुलदाणी चाकोच्या टेबलावर उभी होती... चारी बाजूंच्या भिंती पुस्तकांनी भरून गेलेल्या... काचेच्या कपाटात तोडक्या-मोडक्या बाल्सा विमानांचे अवशेष ठासून भरलेले... शिवाय गयावया करणाऱ्या डोळ्यांच्या फुटक्या फुलपाखरांची मेलेली झुंड... आणि नतद्रष्ट लाकडी राजाच्या दुष्ट वर्चस्वाखाली झुरत-झुरत खंगून गेलेल्या लाकडी राण्या!

विचित्र सापळा.

त्यात फसलेलं जगणं.

फक्त तिची आई, मार्गरिटच सुटली त्यातून आणि जशी आली, तशी इंग्लंडला निघून गेली.

खोलीच्या मध्यभागी खुरडत खुरडत फिरणारा पंखा आणि त्या पंख्याभोवती पसरलेली खोली. अर्धवट भाजलेलं बिस्कीट असावं, तशा पिवळट रंगाची छोटी पाल... तिचे लुकलुकणारे डोळे... सोफीला अचानक 'जो'ची विसरलेली आठवण आली. आत खोल कुठेतरी ढवळलं. सोफीनं नकळत डोळे मिटून घेतले.

छतावर डुगडुगणारा पंखा तिच्या डोक्यात फिरू लागला.

खाली डोकं वर पाय अशी कसरत करत 'जो' हातांवर चालू शकायचा आणि सायकल घेऊन उतारावरून सुसाट सुटला, की घोंघावत आदळणारा वारा आपल्या शर्टात भरून घेऊ शकायचा.

सोफीच्या शेजारी मोठ्या पलंगावर मार्गरिट कोचम्मा शांत झोपली होती. पाठीवर झोपलेलं उताणं स्वस्थचित्त शरीर... पोटाशी दोन्ही हातांची मिठी. बोटं सुजलेली असावीत. 'वेडिंग रिंग'चे वळ आत घुसून दोन्ही बाजूंचं मांस वर उभारून आलं होतं. दोन्ही गालांवरची मांसल त्वचा दोन्ही बाजूंनी खाली ओघळलेली... त्यामुळे दोन टोकदार हाडांमधला चेहरा काहीसा शुष्क, भेसूर. चेहऱ्यापासून सुटलेल्या ओठांमध्ये फक्त दातांची चमक उरलेली आणि थोडंसं खिन्न हसू! एके काळी मार्गरिटच्या भुवया चांगल्या घसघशीत होत्या; पण नव्या फॅशनच्या आकर्षणामुळं तिनं जास्तीचे केस काढून टाकून दोन्ही भुवयांना बारीक धनुष्याकृती आकार दिलेला. डोळ्यांवरच्या त्या ताणलेल्या कमानींमुळे मार्गरिट झोपेतसुद्धा आश्चर्यचकित झाल्यासारखी दिसत होती. बाकीचे खरवडले गेलेले आविर्भावसुद्धा त्या कोरलेल्या भुवयांच्या कडेने बारीक-बारीक खुंट घेऊन उगवायला लागले होते. चेहऱ्यावर, कोण जाणे, कसला उद्रेक साठलेला... कपाळ चमचमत होतं... मिटल्या पापण्यांवरही कसलीशी चमक; पण त्या चमचमाटाच्या पोटातलं अशक्त, भेसूर दु:ख लपता लपत नव्हतं.

मार्गरिटच्या अंगावरचा निळ्या-पांढऱ्या नाजूक फुलांचा मऊसूत ड्रेसही तिच्याइतकाच थकला असावा. तलम धागे वितळून गोळा होत-होत आकसल्यासारखे तिच्या शरीराला घट्ट बिलगले होते. मिठी इतकी घट्ट, की त्यातून मार्गरिटच्या छातीवरचे दोन उभार, दोन्ही पायांमधली खोलगट खोबण सगळं स्पष्ट, उघड दिसत होतं. भारतातल्या उन्हाळ्यानं हैराण झालेल्या त्या कापडालाही मार्गरिटच्या बरोबरीनं डुलकी घ्यावीशी वाटत असावी... औरस-चौरस हातपाय पसरून ते निपचित पहुडलं होतं.

बिछान्याशेजारच्या छोट्या टेबलावर एका सुरेखशा फ्रेममध्ये मढवून मार्गरिट आणि चाकोच्या लग्नाचा फोटो मांडला होता. ऑक्सफर्डला चर्चच्या बाहेर काढलेल्या त्या फोटोत भुरभुरलेला बर्फही दिसत होता. रस्त्यावर, फूटपाथवर तर पांढऱ्याशुभ्र लाह्यांचा

नुसता खच. चाकोनं पंडित नेहरूंच्या थाटात पांढऱ्या चुडीदारवर काळी शेरवानी घातलेली... छातीवरच्या बटणापाशी लालचुटूक गुलाबाची कळी आणि उजव्या खिशातून डोकावणारं रुमालाच्या त्रिकोणी घडीचं रुबाबदार टोक! चाकोच्या काळयाभोर खांद्यावर बर्फाचा पांढरट भुरा पसरलेला. पायात चमकते ऑक्सफर्ड शूज; आणि चेहऱ्यावर थेट नेहरूंसारखं हसू! चाको अगदी मनापासून हसत होता... स्वत:वरच हसल्यासारखा!

मार्गरिट कोचम्मानं लांबलचक, पिसापिसांचा, गुबगुबीत पायघोळ गाऊन घातलेला आणि कुरळया केसांच्या भुरकुलावर उंच मुकुट! मार्गरिट चाकोच्या बरोबरीनं उंच होती. खांद्याला खांदे भिडवून एकमेकांना बिलगून उभं असलेलं ते नवजात, तरुण जोडपं आनंदानं ओसंडत होतं. दोघांच्याही चेहऱ्यावर एकमेकांबद्दलची ओढ आणि डोळयांत भविष्याची चमकती सूर्यबिंबं! मार्गरिटच्या गडद काळयाभोर भुवया एकमेकांत गुंतून पडल्यामुळे अधिकच दाट दिसत होत्या... आणि तिच्या अंगावरचा तो पांढराशुभ्र वधूवेश! जणू गडद काळया भुवया असलेला भलामोठा ढगच! चाको आणि मार्गरिटच्या मागे शिष्ट चेहऱ्याची एक भलीभक्कम बाई लांबलचक ओव्हरकोट घालून उभी होती... ती मार्गरिटची आई. आईसाहेबांच्या दोन्ही बाजूंना चुण्याचुण्यांचे घोळदार स्कर्ट, स्टॉकिंग्ज आणि एकसारखे 'बो' घातलेल्या दोन नाती उभ्या होत्या. तोंडावर हात ठेवून खिदळता-खिदळता त्या दोन्ही पोरट्यांना कसलं म्हणून भान उरलं नव्हतं. मार्गरिट कोचम्माची आईही तिरसट, त्रयस्थ नजरेनं कुठेतरी तिसरीकडेच बघत उभी होती... 'आपण नसतो इथं, तर बरं झालं असतं,' असा वैताग तिच्या चेहेऱ्यावरून लपता लपत नव्हता.

मार्गरिट कोचम्माच्या वडिलांनी तर या लग्नाला यायचं साफ नाकारलंच होतं. त्यांना 'इंडियन्स' अजिबात आवडत नसत. भारतीय वंशाची सगळी माणसं लबाड, कावेबाज, अप्रामाणिक आणि विश्वासघातकी असतात, यावर त्यांचा पक्का विश्वास होता. असल्याच एका नालायक भारतीयाशी आपल्या मुलीनं लग्न करावं, हे तर त्यांना बिलकूलच आवडलेलं नव्हतं.

– फोटोच्या उजव्या कोपऱ्यात रस्त्यावरून जाणारा एक सायकलस्वार या नव्या जोडप्याकडे पाहत थबकून उभा होता.

चाकोशी पहिल्यांदा भेट झाली, तेव्हा मार्गरिट कोचम्मा ऑक्सफर्डमधल्या एका कॉफीशॉपमध्ये वेट्रेस म्हणून नोकरी करत होती. तिचं घर होतं लंडनला. वडिलांची बेकरी होती आणि आई एका हॅट्स विकणाऱ्या माणसाची सहायक म्हणून काम करीत असे. तारुण्यात पाऊल ठेवलेल्या मार्गरिटला स्वातंत्र्याची तहान लागली होती. त्या ओढीनं ती घराबाहेर पडली आणि तिनं आपलं स्वत:चं स्वतंत्र आयुष्य सुरू केलं. आधी छोटीमोठी कामं करून पैसे साठवायचे... त्यातून 'टीचर्स ट्रेनिंग स्कूल'मध्ये नाव नोंदवायचं आणि प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर मग एखाद्या शाळेत शिक्षकाची नोकरी

शोधायची, असा बेत मार्गरिट कोचम्मानं ठरवला होता. ऑक्सफर्डच्याच दुसऱ्या एका कॉफीशॉपमध्ये काम करणाऱ्या मैत्रिणीबरोबर छोटा फ्लॅट 'शेअर' करून मार्गरिट राहत होती.

घरातून बाहेर पडल्यावर मार्गरिटला 'खरं जगणं म्हणजे काय?' ते कळू लागलं होतं. 'घराबाहेरच्या जगाशी लढायला शिक,' असं आई-वडील येता-जाता सांगत, त्याचा अर्थही समजायला लागला होता. मोडून टाकण्याची उबळ यावी, असे नियमच उरले नव्हते आणि बंड करायचं, तर स्वत:खेरीज दुसरा कुणी प्रतिस्पर्धी, विरोधकच शिल्लक नव्हता. त्यामुळं घरात परवानगी होती; त्यापेक्षा जरा चढ्या आवाजात ग्रामोफोन वाजवण्यापलीकडे मार्गरिटच्या स्वातंत्र्य उपभोगण्याची मजल जाता जात नसे. ज्या बंदिस्त, छोट्या आयुष्याचा वैताग येऊन ती घराबाहेर पडली होती; तसंच बंदिस्त आणि तेवढंच छोटं आयुष्य स्वतंत्रपणे जगणं एवढंच काय ते स्वातंत्र्य! यापलीकडे थरारक असं काही मार्गरिटच्या आयुष्यात घडतच नव्हतं.

...तेवढ्यात एका सकाळी चाको तिच्या कॉफीशॉपच्या पायऱ्या चढला.

ऑक्सफर्डच्या शेवटच्या वर्षातला उन्हाळा. चाको एकटाच होता. शर्ट चुरगळलेला... बटणं खाली-वर लावलेली... बुटांची मळकट लेस गाठीतून सुटून लोंबणारी... चपचपीत तेल लावून चप्पट विंचरलेले केस डोक्यावरच्या भोवऱ्याभोवती मागून गोलाकार उभे राहिलेले. चाकोचं बेंगरूळ ध्यान एखाद्या सुस्तावलेल्या साळिंदरासारखं दिसत होतं. विचित्र रंगाचा टाय... चुरगळलेला ढगळ कोट अशा अवस्थेत चाको कॉफीशॉपमध्ये शिरला, तरी चाकोची रुबाबदार उंची आणि त्याच्या शरीरात टरारलेले बळकट, पुष्ट स्नायू मार्गरिटच्या नजरेतून सुटले नाहीत. चाकोच्या एकंदर बेंगरूळ शरीरयष्टीत एक विचित्र आत्मविश्वास, स्वत:बद्दलची ऐट अगदी ठासून भरलेली होती... आणि आक्रसलेल्या भुवयांखालचे ते मिचमिचे, सुरकुतलेले बारीक डोळे! चश्मा घरी विसरून आलेल्या माणसानं दूरवरची अक्षरं वाचायचा निष्फळ प्रयत्न करावा, तसे डोळे मिचकावत, रोखून बघत चाको कॉफीशॉपमध्ये शिरला. चहाच्या किटलीला कड्या असाव्यात, तसे त्याचे दोन्ही कान बाहेर लोंबत, डोकावत होते. त्याचा एकूण गबाळगं्रथी अवतार आणि सशक्त, पुष्ट शरीर हे गणितही भलतंच विचित्र होतं. चुरगळलेल्या ढगळ कपड्यांच्या आत एक बऱ्यापैकी देखणा आणि चांगलाच सशक्त पुरुष राहतो, याची एकमेव खूण बाहेरून दिसत होती – चाव्ाâचे गोरटेले, गोबरे गाल!

गबाळग्रंथी, बेंगरूळ पुरुषांमध्ये निसर्गत:च एक अवघडलेपण असतं; पण चाकोला असल्या उदास अवघडलेपणाचा साधा स्पर्शसुद्धा झालेला नव्हता. कॉफीशॉपमध्ये त्यानं पाऊल ठेवलं, तेच मुळी उत्साहानं उसळत! आपल्याबरोबर एखादा जीवश्चकंठश्च मित्र आहे आणि त्याच्याबरोबर आपण धम्माल करतोय, अशा रुबाबात चाको वावरत होता.

त्यानं खिडकीजवळचं एक टेबल निवडलं. टेबलावर कोपर टेकवून दोन्ही तळहातांत हनुवटी उचलत तो गमतीगमतीनं रिकाम्या कॉफीशॉपकडे बघत बसला. पुढच्याच सेकंदाला तो समोरच्या टेबलाकडे पाहून हसेल आणि 'काय? कसं काय?' म्हणत खुर्च्यांची ख्यालीखुशाली विचारेल, असं वाटत होतं. त्यानं त्याच थाटात कॉफीची ऑर्डर दिली. ऑर्डर लिहून घेणाऱ्या दाट भुवयांच्या उंच वेट्रेसकडे मात्र त्याचं लक्षसुद्धा गेलं नाही.

टेबलावर आलेल्या वाफाळत्या, दुधाळ कॉफीत चाकोनं दोन अख्खे चमचे साखर ओतली; तेव्हा मार्गरिट थोडी दचकलीच.

नंतर चाकोनं फ्राईड एग्ज आणि टोस्ट मागवले. काही वेळानं आणखी कॉफी... शिवाय स्ट्रॉबेरी जॅम.

त्यानं दिलेली ऑर्डर ट्रेमध्ये भरून 'ती' परत आली, तेव्हा ध्यानीमनी नसताना चाकोनं धाडकन एक प्रश्न विचारला. जणू खूप वेळ गप्पा चालल्या आहेत... आणि मध्येच तुटलेली साखळी जोडून पुन्हा पुढे जायचंय –

'एका माणसाला जुळे मुलगे असतात.... ऐकलंयस तू त्याच्याबद्दल?'

'नाही' – एका शब्दात प्रश्न तोडत मार्गरिटनं चाकोचा ब्रेकफास्ट टेबलावर ठेवला. एकतर पुरुष... त्यातून अनोळखी आणि परदेशातला; त्यामुळं 'स्त्री-सुलभ' अलिप्ततेनं मार्गरिटनं चाकोला फारसा भाव दिला नाही. शिवाय कुठला माणूस... कुणाचे जुळे मुलगे... तिला काही म्हणता काही ठाऊक नव्हतं. अनोळखी पुरुषाशी असल्या भलत्या सलगीची तिची इच्छा नव्हती, तरीही चाकोनं आपलं घोडं पुढे दामटलंच –

'एका माणसाला दोन जुळे मुलगे होते. एकाचं नाव होतं पिट आणि दुसऱ्याचं स्ट्युअर्ट. पिट आशावादी होता आणि स्ट्युअर्ट पक्का निराशावादी.'

चाकोनं जॅमच्या बाटलीतल्या स्ट्रॉबेरीज् वेचून-वेचून प्लेटच्या एका कडेला ठेवल्या आणि लोण्यानं माखलेल्या टोस्टवर उरलेला जॅम पसरवला.

'मुलांच्या तेराव्या वाढदिवशी वडिलांनी निराशावादी स्ट्युअर्टला एक महागडं घड्याळ भेट दिलं. शिवाय सुतारकामाची हत्यारं आणि एक नवीकोरी सायकलसुद्धा दिली.'

– बोलता-बोलता नजर उंचावून चाकोनं मार्गरिट कोचम्माकडे पाहिलं.

'...आणि दुसरा मुलगा होता ना? पिट... आशावादी?... वाढदिवसाची भेट म्हणून त्याच्या अख्ख्या खोलीत घोड्याची लीद भरली.'

चाकोनं 'फ्राईड एग'चा तुकडा उचलून टोस्टवर ठेवला आणि हातातल्या चमच्याच्या मागच्या बाजूनं जॅमच्या दाट थरात फ्राईड एग घट्ट बसवून रुबाबात तुकडा तोडला.

'स्ट्युअर्टनं आपल्या भेटी उघडून पाहिल्या, तेव्हा तो जाम वैतागला. त्याला सुतारकामाची हत्यारं मुळीच नको होती. घड्याळ कितीही महागडं असलं, तरी त्याला

अजिबात आवडलं नव्हतं आणि नव्याकोऱ्या सायकलचे टायर्स बेंगरूळ आहेत, म्हणूनही तो वैतागला होता.'

मार्गरिट कोचम्मा चाकोची बडबड ऐकत क्षणभर तशीच उभी राहिली; कारण टेबलावरच्या विधियुक्त ब्रेकफास्टकडे एव्हाना तिचं लक्ष खिळलं होतं. जॅम आणि 'फ्राईड एग' लावलेले टोस्ट सुरीनं कापून नीट चौकोनी तुकड्यांत विभागले गेले होते. प्लेटच्या भोवती मांडलेल्या स्ट्रॉबेरीज् एकामागून एक कापल्या जात होत्या.

'वडील पिटच्या खोलीत गेले. त्यांना पिट कुठंच दिसला नाही; पण जोरजोरानं चाललेला त्याचा श्वास मात्र ऐकू येत होता. अख्ख्या खोलीभर घोड्याची लीद उधळली होती.'

– विनोदाचा शेवट जवळ यायला लागला, तशी चाकोनं हलके-हलके खिदळायला सुरुवात केली. हसता-हसता त्यानं पिवळ्या टोस्टच्या लाल चौकोनांवर स्ट्रॉबेरीचा एकेक तुकडा ठेवण्याचं काम हातात घेतलंच होतं.

'वडील वैतागून पिटला म्हणाले, 'अरे, हे तू आरंभलंयस तरी काय?'–

गोष्ट पुढे सरकत होती.

टोस्टच्या सुशोभित चौकोनांवर मीठ आणि मिरपूड शिंपडून झाली.

शेवटची 'पंच लाईन' टाकण्यापूर्वी चाको क्षणभर थांबला. मार्गरिट त्याच्या प्लेटकडे पाहून गालातल्या गालात हसायला लागली होती.

नजर उचलून तिच्याकडे कटाक्ष टाकत चाकोनं गोष्टीचं थबकलेलं घोडं पुढे दामटलं –

'घोड्याची लीद सगळीकडे पसरलेली. त्या ढिगातूनच आवाज येत होता. पिट म्हणाला. 'बाबा, ज्याअर्थी खोलीत एवढी लीद भरलीय; त्याअर्थी कुठंना कुठंतरी शेपटी असेलच ना! तीच शोधतोय!'

एका हातात काटा आणि एका हातात सुरी घेऊन चाको खुर्चीवर रेलून बसला आणि डोळ्यांतून घळाघळा पाणी येईतो पोट धरधरून हसत सुटला.

शुकशुकाट पसरलेलं कॉफीशॉप... आणि एका कोपऱ्यात बसून एकटाच ठो ठो हसणारा जाडा माणूस! नीट न ऐकल्यामुळं मार्गरिटला चाकोचा विनोद धड कळला नव्हता; तरीही ती मनापासून हसली. शेवटी दोघांचं हसणं एकमेकांत मिसळत राहिलं आणि गडगडाटाचे मजल्यामागून मजले चढत राहिले.

तेवढ्यात कॉफीशॉपचा मालक आला. चेहरा ओळखीचा नसलेलं एक (नकोसं) गिऱ्हाईक आणि शॉपमधली जेमतेम (असली-नसली सारखीच अशी) वेट्रेस वेड्यासारखे खिदळत बसलेत, हे बघून त्याच्या भुवया उंचावल्या.

तोवर आणखी एक (नेहमीचं) गिऱ्हाईक आलं होतं आणि कुणीतरी 'ऑर्डर' घ्यायला येईल, म्हणून ताटकळत, तिष्ठत बसलं होतं.

– शेवटी वैतागलेल्या मालकानं चांगली स्वच्छ असलेली ग्लासं मोठमोठ्यानं आवाज करीत पुन्हा चांगली खळबळून धुतली. काऊण्टरवर ठेवलेल्या काचेच्या भांड्यांची चाळवाचाळव केली, म्हणजे तरी मार्गरिट कोचम्माचं लक्ष जाईल; म्हणून त्यानं तेही केलं. अखेर त्याचे इशारे पोचले. स्वत:ला सावरत मार्गरिट कोचम्मा नवी ऑर्डर घ्यायला नव्या गिऱ्हाईकापाशी गेली. तरीही तिच्या पोटातली हसण्याची उबळ शमली नव्हती. ती ओठ मिटून आतल्या आत खिदळतेय हे सहन न होऊन त्या भुकेल्या गिऱ्हाईकानं मेन्यूकार्डाऐवजी तिच्याकडेच घुश्शानं पाहिलं. तो वैतागला असणार, हे स्पष्ट दिसत होतं.

तेवढ्यात मार्गरिटनं चोरून चाकोकडे एक कटाक्ष टाकला.

तोही तिच्याकडेच पाहत होता.

मग दोघेही पुन्हा एकदा हसले. नव्या मैत्रीची बीजं रुजली आहेत, हे त्या हसण्यात सरळ दिसत होतं.

चाकोनं आपला ब्रेकफास्ट संपवला, पैस चुकते केले आणि तो आला, तसा हसत-हसत निघून गेला.

रागावलेल्या मालकानं मार्गरिटची चांगली खरडपट्टी काढली. कॉफीशॉपमधल्या जुन्याच शिष्टाचारांबद्दल नव्यानं लेक्चर दिलं. 'आपलं चुकलंय' हे मार्गरिटला मान्य होतंच. तिनं पुन:पुन्हा माफी मागितली.

संध्याकाळी काम संपवून घरी जाताना मार्गरिटच्या मनात चाकोचेच विचार होते. 'आपण कसे वागलो,' हे लक्षात आल्यावर तिची तिलाच लाज वाटली. तिच्या वयाच्या इतर तरुणींसारखी मार्गरिट स्वभावानं छचोर नव्हती. एकदम अनोळखी पुरुषाबरोबर मोकळ्या मनानं बोलण्याचीही सवय नसताना आपण अशा वेड्यासारख्या हसत कशा सुटलो? – तिला कळेना. अपरिचित पुरुषाबरोबर इतकी जवळीक? हसू आलं, ते कशाचं, हेदेखील धड समजेना. त्या फालतू विनोदावर आपण हसलो नव्हतो; एवढं मात्र नक्की कळत होतं.

– मग तिला चाकोच्या खदखदून हसण्याची आठवण आली... आणि खूप वेळ ते हसू तिच्या डोळ्यांत तरंगत राहिलं.

कॉफीशॉपमध्ये चाकोच्या चकरा वाढू लागल्या.

त्याच्याबरोबर त्याचा तो 'अदृश्य मित्र' कायम असे आणि ओठांवरचं हसूही! दर वेळी त्याला 'सर्व्हिस' देण्याची संधी मार्गरिट कोचम्माला मिळायचीच, असं नाही; तरीही ती जिथं कुठं असेल, तिथून चाकोकडे पाहून हसायची. दोघांच्या नजरा एकमेकांत गुंतल्या की, दोघांना हसू फुटायचं आणि त्या पहिल्यावहिल्या 'संयुक्त हास्या'ची आठवण होऊन आतून आणखी उकळ्या फुटायच्या.

चुरगळलेला शर्ट घातलेलं तेलकट केसांचं साळिंदर केव्हा एकदा येईल, असं मार्गरिट

कोचम्माला वाटू लागलं. ती चाकोची वाट पाहू लागली. त्या वाट पाहण्यात अधीर उत्सुकता नसली, तरी एक अनाम जवळीक मात्र जरूर होती. चाको भारतातून आलेला 'र्‍होड्स स्कॉलर' आहे... तो जुनी महाकाव्यं आवडीनं वाचतो... असं काहीबाही तिला समजू लागलं होतं. ओळख होत होती... वाढत होती.

मार्गरिट कोचम्मानं चाकोशी रीतसर लग्न केलं; तरीही या माणसाची 'बायको' होणं आपण पत्करू, यावर तिचा स्वत:चाच विश्वास बसत नव्हता.

दोघांचं हिंडणंफिरणं सुरू झाल्यानंतर चाको वेळ साधून मार्गरिटला आपल्या खोलीवर घेऊन जाऊ लागला. हद्दपार केलेल्या एखाद्या असहाय, दीनवाण्या राजपुत्रासारखा चाको राहायचा. खोली अत्यंत घाणेरडी, ओंगळ... अस्ताव्यस्त पसरलेली पुस्तकं, दारूच्या रिकाम्या बाटल्यांचे ढीग, वास मारणारे पिवळट कपडे आणि सिगारेटच्या थोटकांचा कचरा! त्याच्या खोलीतलं कपाट उघडायचं, म्हणजे कपाळमोक्षच! पुस्तकं, कपडे, चपलांचे आत कोंबलेले ढीग कधी अंगावर कोसळतील आणि मोठ्यामोठ्या ठोकळ्यांएवढी जड पुस्तकं कुठून येऊन आदळतील, काही सांगता येत नसे. एरवी नीटनेटक्या राहणीची सवय असलेल्या मार्गरिटला चाकोची खोली म्हणजे वेड्यांच्या दवाखानाच वाटे; पण तिथं आली, म्हणजे भान विसरून ती चाकोच्या गबाळ्या खोलीकडे डोळेभरून पाही, आणि शिरशिरत्या अंगानं थंडगार समुद्राच्या कुशीत शिरावं, तशी स्वत:ला झोकून देई.

चुरगळलेल्या कपड्यांमधल्या या साळिंदराच्या आत एक कडवा मार्क्सवादी कम्युनिस्ट लपून बसलाय आणि त्या कम्युनिस्टाच्या काळजात कोंडलेल्या हळव्या प्रेमवीराची पार घुसमट होतेय, हे हळूहळू मार्गरिटला ओळखता येऊ लागलं होतं. त्या प्रेमवीराच्या हातातल्या मेणबत्त्या विसरल्या, उंची वाईनचे ग्लास फुटले... आणि हिर्‍याची वेडिंगरिंग हरवली, तरी फारसं मनाला लावून घ्यायचं नाही, असं तिनं स्वत:लाच समजावलं.

चाकोबरोबर तिचा प्रणय रंगू लागला. त्याच्या दमदार आवेगात बुडून जाता- जाता घुसमटल्या श्वासाची तृप्तता तिच्या शरीरावर पसरू लागली. ज्या शरीराबद्दल आधी तिला स्वत:लाच फारसं ममत्व नव्हतं: त्या शरीराचे सोहळे उमलू लागले. आपण एक सर्वसाधारण, जेमतेम दिसणारी मुलगी आहोत, असं तिला वाटत असे; पण चाकोच्या सहवासानं त्या सर्वसाधारण शरीरात जणू नवे प्राणच फुंकले. जुन्या मर्यादा गळून पडल्या. नजरेसमोर नवी क्षितिजं खुली झाली.

जगाची उत्पत्ती कशी झाली असावी? हे जग कशाच्या आधारानं, कसं चालतं? भविष्यात जगाचं काय होऊ घातलं आहे? इथंपासून 'जग कसं असावं?'– या स्वप्नरंजनापर्यंत विश्वात्मक गप्पा मारणारा मार्गरिटला भेटलेला पहिला पुरुष म्हणजे

चाको! तिला माहिती असलेले बाकीचे सगळे पुरुष कधीच असल्या विषयांच्या वाटेला जात नसत. एकतर ते आपापल्या नोकऱ्यांबद्दल बोलायचे, मित्रांबद्दल... किंवा मग समुद्रकिनारी जाऊन वीकएण्डला काय काय धमाल केली, त्याबद्दल.

स्वत:भोवतीच्या छोट्याशा जगापलीकडे, आपल्या देशाच्या सीमांपलीकडे पाहण्याचा हा थरार मार्गरिटसाठी सर्वस्वी नवीन होता. आपल्याभोवतीचं कवच फोडून ती हलकेहलके चाकोच्या जगात खेचली जाऊ लागली. हे सगळं जग आपलं आहे, आपल्यासाठी आहे, ही भावना चाकोच्या कम्युनिस्ट बौद्धिकांमुळं मार्गरिटमध्ये पुरेपूर भिनली. डिसेक्शन टेबलावर ठेवलेल्या एखाद्या बेडकासारखं जग आपल्यासमोर आहे. फक्त सुरी चालवण्याचा अवकाश; ताबडतोब जगाचं अंतरंग उलगडून पाहता येईल, असं चाकोइतक्याच खातरीने तिलाही वाटू लागलं.

लग्नापूर्वी जेमतेम वर्षभराचा सहवास; पण तेवढ्या अवधीत मार्गरिटवर पुरती जादू झाली. जी भावना आपण 'चाकोविषयीचं प्रेम' म्हणून जपतो आहोत; ते त्याच्याबद्दलचं 'प्रेम' नसून, स्वत:चा स्वत:ला शोध लागल्याचा 'आनंद' आहे, हे कळण्याएवढी ती सूज्ञ नव्हती. त्या अर्धवट, बालिश वयात कुठली तरी झालर कशाला तरी लागली आणि मार्गरिटला वाटलं, 'प्रेम' म्हणतात, ते हेच!

चाकोची तर गोष्टच वेगळी होती. 'मैत्रीण' म्हणून त्याच्या आयुष्यात आलेली मार्गरिट कोचम्मा ही पहिली स्त्री. संभोगाचं सुख काय असतं, ते मार्गरिटबरोबर बिछान्यात झोपल्यावरच चाकोला कळलं. एवढंच नव्हे, तर जिच्याबरोबर सुखदु:खं वाटून घ्यावीत, अशी तीच त्याची एकमेव 'दोस्त' होती. तिच्यामधली 'स्वयंपूर्णता' हा चाकोला आकर्षून घेणारा विशेष गुण. कोणत्याही इंग्लिश स्त्रीसाठी 'स्वयंपूर्ण' असणं ही खास नवलाची बाब नसली, तरी चाकोला मार्गरिटमधल्या या गुणाची विशेष कदर होती.

मार्गरिट येता-जाता गळ्यात पडत नसे. स्वत:चं शरीर संपूर्णपणे समर्पित करायची बायकी घाई तर तिच्यामध्ये मुळीच दिसली नाही. शारीरिक नात्यामध्ये असा लिप्ताळा न करण्याचा मार्गरिटचा निग्रह चाकोला मनापासून आवडत असे. चाकोबद्दल आपल्याला नक्की काय वाटतंय, याचा अदमास घेणाऱ्या मार्गरिटकडे बघताना त्याला एक हवीहवीशी हुरहुर, अनिश्चितता वाटत राही. अखेरच्या क्षणापर्यंत ही 'आपली' होईल की नाही, याबद्दलचा 'सस्पेन्स' कायम राहणंही चाकोला आवडत होतं. संभोगाचा उन्माद सरला, की तशाच नग्न अवस्थेत मार्गरिट चाकोच्या बिछान्यात उठून बसे आणि घड्याळाकडे नजर टाकीत म्हणे, 'बाप रे! बराच उशीर झाला... आय मस्ट बी ऑफ... निघायला हवं!' – स्वप्नातून पटकन वास्तवात उतरण्याच्या मार्गरिटच्या या रोखठोक शैलीवर चाको

फिदा होता. प्रणयानं चिंब भिजलेल्या रात्रीचा धुंद असर अंगावरून एखाद्या चादरीसारखा बाजूला करून भल्या सकाळी सायकल दामटीत कामावर निघालेली मार्गरिट चाकोला बेहद्द आवडत असे. दोघांमध्ये अनेक विषयांवर मतभिन्नता आहे, हे लक्षात आल्यावर समेटाचा प्रयत्न करण्याऐवजी चाकोनं वादविवादांना उत्तेजनच दिलं. मग कधीकधी तिचा तोल सुटे आणि चाकोची विधानं खोडून काढताना ती रागानं नुसती लालबुंद होऊन जाई. मग चाको तिची मजा बघत आतल्याआत हसत बसे.

मार्गरिटनं कधीही चाकोकडे जरुरीपेक्षा जास्त लक्ष दिलं नाही. प्रेमाचा अधिकार गाजवून त्याच्या खाजगी आयुष्यात ढवळाढवळ केली नाही. स्वत: टापटिपीची असूनही चाकोची खोली आवरण्याचा चंग बांधला नाही... या सगळ्या गोष्टींसाठी चाको तिचा विशेष उपकृत होता. मार्गरिट 'प्रेयसी'च राहिली, ती 'अतिप्रेमळ आई' झाली नाही. मार्गरिट आपल्यावर तसूभरदेखील अवलंबून राहत – राहणार नाही, या भरवशावर चाको निर्धास्तपणे अवलंबून राहू लागला. ती आपलं फार कौतुक करत नाही, म्हणून चाकोला तिचं विशेष कौतुक वाटू लागलं.

चाकोच्या कुटुंबाविषयी मार्गरिटला अगदीच वरवरची माहिती होती. तोही या विषयावर क्वचितच तिच्याशी बोलत असे.

खरंतर, ऑक्सफर्डमध्ये असताना चाकोला आयमेनेममधल्या घराची, तिथल्या माणसांची आठवण फारशी आलीच नाही. त्याच्या आयुष्याला प्रचंड वेग आला होता... त्या वेगात इतकं काही घडत होतं; की दूरवर असलेल्या आयमेनेमचा स्पर्शसुद्धा होणं कठीण! या झंझावातापुढे आयमेनेममधली नदी म्हणजे चुळकाभर पाणी... आणि त्यातले मासे म्हणजे एखाद्दुसरा ठिपका.

आईवडिलांशी सातत्यानं संपर्क ठेवण्याची चाकोला गरजच नव्हती. र्‍होड्स स्कॉलरशिप चांगली घसघशीत मिळे, त्यामुळे पैशाचा प्रश्न नव्हता. मार्गरिट कोचम्माविषयी वाटणार्‍या प्रेमाच्या प्रेमात पडल्यापासून तर त्याला दुसरं काही सुचेनासंच झालं होतं.

माम्माचीची पत्रं न चुकता येत. पाप्पाचींबरोबर झालेल्या प्रत्येक भांडणाचा बारीकसारीक तपशील पत्रात लिहिलेला असे, आणि शेवटी 'नवर्‍याला सोडून माहेरी परत आलेल्या अम्मूचं पुढे कसं होणार' याची चिंता. हा सगळा मजकूर चाकोला तोंडपाठ होता. त्यामुळं प्रत्येक पत्र संपूर्ण वाचण्याची तसदीही तो घेत नसे. माम्माचीनं पाठवलेली अनेक पत्रं तर फोडलीही जात नसत. पत्राला उत्तर वगैरे लिहिण्याचा तर प्रश्नच नव्हता.

ऑक्सफर्डमध्ये शिकत असताना चाको फक्त एकदाच आयमेनेममध्ये येऊन गेला (तेव्हाच माम्माचीच्या डोक्यात पितळी फुलदाणी घालणार्‍या पाप्पाचींचा हात त्यानं वरच्यावर पकडला होता... आणि झुलत्या लाकडी आरामखुर्चीचा मध्यरात्री खून झाला

होता.). तरीही पाप्पाचींच्या वागण्यातला विखारी दंश चाकोला जाणवला नाही. आईचं आपल्यावरचं प्रेम एका रात्रीत दुप्पट झालंय, हे कळलं नाही आणि नवऱ्याला सोडून परतलेल्या तरुण बहिणीच्या शरीरावरच्या उधाणाकडे लक्ष द्यायला तर चाकोला वेळच नव्हता. आल्या क्षणापासून त्याला परत जाण्याचे वेध लागले होते. बिछान्यात उठून बसणारी गोरीगोरी नग्न पाठ त्याला हाकारत होती. मार्गरिटशिवाय श्वास घेणंही मुश्कील झालं होतं.

चाको परत आल्यानंतरच्या हिवाळ्यात त्या दोघांनी लग्न केलं. मार्गरिटच्या कुटुंबीयांची संमती नव्हती आणि चाकोच्या कुटुंबीयांना तर काही माहितीच नव्हतं.

आपल्याबरोबर फ्लॅट 'शेअर' करणाऱ्या मैत्रिणीला मार्गरिटनं निरोप द्यायचा आणि चाकोला नोकरी मिळेपर्यंत दोघांनीही मार्गरिटच्या फ्लॅटमध्ये संसार थाटायचा, असं ठरलं.

लग्नाचा मुहूर्त कुठून निघाला कोण जाणे, पण याहून वाईट वेळ कदाचित नसतीच मिळाली.

एकत्र राहण्याचा ताण सोसत असतानाच मागोमाग पैशांची कडकी आली... आणि लगेचच दारिद्र्य! परीक्षेत दिवे लावलेल्या चाकोची स्कॉलरशिप थांबली होती आणि त्याच्या खर्चासकट फ्लॅटचं संपूर्ण भाडंही मार्गरिटला भरावं लागणार होतं.

बघता-बघता दिवस बदलले आणि चाकोचं पुष्ट शरीर ओघळत लवंडत इकडून-तिकडून सुटत गेलं. मांसाच्या लिबलिबित गोळ्यांच्या आड पूर्वीचे पुष्ट स्नायू दिसेनासे झाले. चाको शरीरानं एकदम उतरला.

लग्नाला वर्ष व्हायच्या आत विद्यार्थिदशेतल्या चाकोचा सुस्त आळशीपणा मार्गरिट कोचम्माला आवडेनासा झाला. दिवसभर काम करून संध्याकाळी घरी परतल्यानंतर फ्लॅटमधला गलिच्छ पसारा तसाच पडलेला असणार. चाको साधं अंथरूण-पांघरूण आवरणार नाही, कपडे धुणार नाही, खरकट्या भांड्यांना हात लावणार नाही. नव्याकोऱ्या सोफ्यावरचं कापड सिगारेटच्या ठिणग्यांनी जळलं, तरी त्याला काही वाटणार नाही. या सगळ्याची मार्गरिट कोचम्माला सवय होत गेली आणि सवय होता-होता मस्तकात तिडीक उठू लागली. नोकरी शोधण्याकरता इंटव्ह्यूला जायचं; तर आपला 'नवरा' नामक प्राणी शर्टाची बटणं नीट लावणार नाही, त्याला टायची गाठ नीट बांधता येणार नाही, बुटांची लेस ओवता येणार नाही; हे मार्गरिट कोचम्माला कळून चुकलं. जगाच्या वर्तमानाची, भविष्याची चिंता करणाऱ्या चाकोच्या वांझोट्या युक्तिवादाच्या बदल्यात त्याच्याकरता एक किरकोळ नोकरी आणि आपल्याकरता एक किमान स्वच्छ घर मिळेल तर बरं, असं मार्गरिटला वाटू लागलं.

'इंडिया टी बोर्ड' नामक एका कंपनीचं परदेशातलं काही फुटकळ काम चाकोला

मिळालं आणि जेमतेम पगाराच्या त्या नोकरीचं शेपूट धरून राहिलो, तर भविष्यात आणखी पुढे जाता येईल, अशा आशेनं मार्गरिट आणि चाको लंडनला जाऊन धडकले. तिथलं घर तर आणखीच छोटं, कोंदट होतं. पैशाची तंगीही पूर्वीपेक्षा जास्तच होती. या सगळ्या मनमानीला कंटाळून मार्गरिटच्या आईवडिलांनी तिचं नावच टाकलं.

लंडनमध्ये 'जो' भेटला; तेव्हा आपण गरोदर आहोत, हे मार्गरिटला नुकतंच समजलं होतं. 'जो' हा तिच्या भावाचा जुना शाळकरी मित्र. ते दोघे भेटले, तेव्हा मार्गरिट कोचम्मा गर्भारपणाच्या तेजानं नुसती झळझळून उठली होती. पुष्ट गालांवर लाली चढलेली आणि काळ्याभोर केसांत चमक! चाकोबरोबरच्या वैवाहिक आयुष्यात कितीही कडवडपणा भरलेला असला; तरी कुणाही गर्भार स्त्रीचं मन स्वत:च्या फुलत्या शरीरात रमत जातं, तशी मार्गरिटची अवस्था झाली होती. तृप्त आणि धुंद!

'जो' पेशानं जीवशास्त्रज्ञ होता. एका छोट्या प्रकाशनसंस्थेसाठी जीवशास्त्राचा शब्दकोश तयार करण्यात गुंतलेला 'जो' चाकोपेक्षा पूर्णत: वेगळा होता. जे-जे म्हणून चाकोकडे नव्हतं; त्या सगळ्यांनी परिपूर्ण!

शांत. स्थिरचित्त.

मिळूनमिसळून राहणारा.

आणि सडपातळ.

अंधाऱ्या खोलीत कोंडून पडलेल्या निस्तेज रोपट्यानं मान उंचावून प्रकाशाच्या दिशेनं झेप घ्यावी, तशी मार्गरिट कोचम्मा 'जो'कडे खेचली जाऊ लागली.

इंडिया टी बोर्डाचं काम संपल्यावर चाको पुन्हा बेकार झाला. प्रयत्न करूनही नोकरी मिळेना; तेव्हा त्यानं सरळ माम्माचीला पत्र लिहिलं. 'आपण लग्न करून बसलोय्' हे कळवलं आणि खर्चासाठी पैसे मागावले. पत्र मिळाल्यावर माम्माचीला रडू कोसळलं; पण फसवणुकीचं दु:ख बाजूला ठेवून तिनं गुपचूप आपले दागिने गहाण ठेवले आणि इंग्लंडला पैसे पाठवण्याची व्यवस्था केली. पैसे फारच तुटपुंजे होते... पण होते, एवढंच!

दरम्यान सोफी मॉलचा जन्म झाला होता. आपल्या आणि आपल्याबरोबर लेकीच्या आयुष्याचं भलं व्हायचं, तर चाकोला सोडण्यावाचून गत्यंतर नाही; एवढं मार्गरिट कोचम्माला समजून चुकलं होतं. तिनं चाकोकडे सरळ घटस्फोटाची मागणी केली.

भारतात सहजपणे नोकरी मिळणं शक्य आहे हे कळल्यावर चाको भारतात परतला. त्यानं पहिली काही वर्षं मद्रास ख्रिश्चन कॉलेजमध्ये प्राध्यापकी केली आणि पाप्पाचींच्या मृत्यूनंतर 'भारत बॉटल सीलिंग मशीन' घेऊन तो आयमेनेमला परतला. एव्हाना ऑक्सफर्डची मिजास उतरली होती. चाको मनातून पार मोडून गेला होता.

इतक्या वर्षांनी परतलेल्या लेकाचं माम्माचीनं मनभरून स्वागत केलं. तिनं त्याची खोली आवरली, सगळा पसारा मार्गी लावला, शर्टाची तुटलेली बटणं शिवली. जे पडेल,

ते काम केलं. वरून त्याच्या खोलीत रोजच्या रोज ताजी फुलं ठेवण्याची व्यवस्थाही केली. चाकोला हे सगळं कौतुक मनातून हवं होतं; पण वरवर त्यानं माम्माचीचा तिरस्कार करायला सुरुवात केली. कुणाला कळणार नाही अशा बेतानं तो माम्माचीला त्रासही द्यायला लागला. त्यानं मुद्दाम स्वत:च्या गलेलठ्ठ शरीराकडे दुर्लक्ष करायला सुरुवात केली. कमरेला चुरगळलेलं मुंडू नेसून वरतून फुलाफुलांचे भडक, टेरिलीन शर्ट घालायचे. पायांत स्वस्तातल्या स्वस्त घाणेरड्या प्लॅस्टिक स्लीपर्स घालायच्या आणि तशा मळकट, मवाली अवतारात गावभर हिंडायचं. माम्माचीकडे कुणी पाहुणे आले, नातेवाईक आले किंवा दिल्लीची जुनी मित्रमंडळी आली, की माम्माचीनं सजवलेल्या सुंदर डायनिंग टेबलाभोवती घिरट्या घालायला चाको अगदी एका पायावर तयार असे. मग उगीच इकडे-तिकडे बघत जुनी जखम खाजवत बसायचं किंवा उत्तमोत्तम चायना क्रोकरीनं भरलेल्या टेबलावर हाताचे कोपरे टेकवून खपल्या उचकटत राहायचं.

बेबी कोचम्माकडे येणारे पाहुणे – कॅथॉलिक, बिशप, चर्चमधले पाद्री – ही मंडळी चाकोची विशेष 'लक्ष्य' असत. यांच्यापैकी कुणीही सहज चहापाण्यासाठी म्हणून आलं, की काही ना काही कारण काढून चाको त्यांच्याभोवती घुटमळत राही. मध्येच पायांतल्या स्लीपर्स काढून तळपायावरचे पुवानं भरलेले फोड दाखवत बसायचा.

'महारोग्यावर दया करा, बाप्पाऽऽ'

– त्याच्या या विचित्र विनवणीकडे पाहुण्यांचं लक्ष जाऊ नये, म्हणून धडपडणारी बेबी कोचम्मा मग त्याच्या दाढीत अडकलेला बिस्किटांचा चुरा आणि केळयाच्या वेफर्सचे तुकडे काढीत बसे.

माम्माचीला आणखी त्रास देण्याची याहून भारी आणि जास्त मानहानिकारक आयडिया चाकोजवळ होती – स्मरणरंजन! तो रात्रंदिवस मार्गरिट कोचम्माच्या आठवणी काढत बसायचा. तिच्याबद्दल बोल बोल बोलताना चाकोचा ऊर कसल्यातरी विचित्र अभिमानानं भरून येई. जणू घटस्फोट घेऊन आपल्यापासून अलग झाल्याबद्दल चाकोला तिचं कौतुकच वाटत होतं.

'तिच्यामुळे मी सुधारलो. जास्त बरा माणूस झालो.'– असं चाकोनं म्हटलं, की माम्माचीजवळ बोलायला शब्दच उरत नसत. मग ती नाराजीनं, वैतागून माघार घेई आणि गप्प बसे.

मार्गरिट कोचम्मा नियमानं पत्र लिहून चाकोला सोफी मॉलची ख्यालीखुशाली कळवू लागली – 'जो'नं सोफीची सगळी जबाबदारी घेतलीय... तो तिच्यावर खूप प्रेम करतो आणि तीही त्याच्यामध्ये रमली आहे' – हे सगळं वाचून चाकोला आनंद व्हायचा आणि

तेवढंच दु:खही!

मार्गरिट कोचम्मा 'जो'बरोबर खूश होती. चाकोबरोबरच्या त्या अनिश्चित, जखमी दिवसांचे व्रण हळूहळू पुसत चालले होते. आता मार्गरिटला चाकोची आठवण यायची; पण प्रेमानं! पश्चात्तापाचे क्षण केव्हाच सरून गेले होते. आपण चाकोला आयुष्यभराचं भळभळतं दु:ख दिलं, याची तिला जाणीवही नव्हती. तिला वाटे, आपल्यासारखी सर्वसाधारण स्त्री निघून गेल्यामुळं चाकोसारख्या असामान्य पुरुषाच्या आयुष्यात असा काय फरक पडणार? – चाकोनं कधीही कुणाजवळ आपलं मन उघड केलं नाही, कधी कुणापाशी आपल्या जखमांचं प्रदर्शन मांडलं नाही. त्यामुळं मार्गरिटचं मनही पुष्कळ साफ झालं होतं. आयुष्यात हातून घडलेली एक चूक म्हणून चाको झालं-गेलं सगळं विसरून गेला असेल, असं मानायला जागा होती.

मार्गरिटनं चाकोला 'जो'बद्दल सांगितलं, तेव्हा तो काहीही न बोलता शांतपणानं पण दुखावल्या मनानं तिच्या आयुष्यातून निघून गेला. त्याच्याबरोबर त्याचा तो अदृश्य मित्र होता आणि ओठांवर तेच तसंच हसू!

मार्गरिट आणि चाकोचा पत्रव्यवहार सुरू राहिला. जाणाऱ्या-येणाऱ्या पत्रांबरोबर एक नवंच नातं रुजलं-वाढलं-बहरलं. मार्गरिट कोचम्मासाठी ही मैत्री म्हणजे आयुष्यातला मोठाच आधार होती. चाकोसाठी मात्र हा केवळ एक मार्ग होता. त्याच्या मुलीच्या आईशी संपर्क ठेवण्याचा आणि जिच्यावर जीव तोडून प्रेम केलं, अशा जगातल्या एकमेव स्त्रीशी जुळलेले उरलेसुरले धागे जपण्याचा... सांभाळण्याचा... एकमेव मार्ग!

सोफी मॉल मोठी झाली. शाळेत जायला लागली. तिच्या जबाबदारीतून थोडी सुटका झाल्यावर मार्गरिटनं टीचर्स ट्रेनिंग कोर्ससाठी नाव नोंदवलं आणि पुढे क्लॅपहॅममधल्या शाळेत शिक्षिकेची नोकरीही मिळवली. 'जो'च्या अपघाताची बातमी कळली, तेव्हा मार्गरिट शाळेच्या स्टाफरूममध्येच होती. डोक्यावरचं हेल्मेट काढून हातात घेतलेल्या, चौकोनी आणि गंभीर चेहऱ्याच्या एका तरुण पोलिसानं मार्गरिटला ती भयंकर बातमी सांगितली. त्याही प्रसंगात तो भलताच विनोदी दिसत होता. त्याला बघता क्षणी आपल्याला हसू फुटलं होतं, हे मार्गरिट कोचम्माला कधीही विसरता आलं नाही.

स्वत:साठी नाही, तर निदान मुलीसाठी तरी मन घट्ट करायला हवं, याची जाणीव ठेवून मार्गरिटनं तो प्रसंग मोठ्या धैर्यानं निभावून नेला. निदान धैर्यशीलतेचं नाटक वठवण्यात तरी ती पुष्कळशी यशस्वी झाली. आतून मोडून गेलेलं मन जमा करून हिमतीनं उभी राहण्यासाठी ती धडपडत होती. काही दिवस गेल्यावर लगेचच मार्गरिट शाळेत जाऊ लागली. सोफी मॉलचा दिनक्रम लवकरात लवकर पूर्वपदावर आणायचा; तर तिलाही घराबाहेर पडणं आवश्यकच होतं. सोफीची शाळा आणि मार्गरिटची नोकरी... 'जो'शिवायचं जगणं हलकेहलके सुरू झालं. अभ्यास झाला का करून? अंडं

खाऊन टाक पटकन... दूध पी... शाळा चुकवून कशी चालेल, बाळा?

मार्गरिटनं शाळेतल्या शिक्षिकेचा नेहमीचा मुखवटा आपल्या चेहऱ्यावर चढवला आणि मनातलं अपार दु:ख त्याच्याआड बेमालूमपणे लपवून टाकलं... विश्वाच्या छाताडावरचं शिक्षिकेच्या आकाराचं एक मोठ्ठं भोक... कडक, करारी आणि कधीकधी कानाखाली ठेवून देणारं!

– पण आयमेनेमला बोलावणारं चाकोचं पत्र आलं, तेव्हा मार्गरिटचा करारी मुखवटा थोडासा सरकला आणि आत कोंडलेल्या दु:खाची भळभळ बाहेर फुटली. त्या दोघांमध्ये कितीही काही झालेलं असलं, तरी चाकोइतकं जवळचं असं जगात दुसरं कुणी उरलंही नव्हतं. चाकोच्या पत्रातल्या आमंत्रणानं मार्गरिटला भूल घातली. आमंत्रण कसं टाळायचं, याचा विचार करता-करता चाकोच्या शब्दांमध्ये ती आणखीच फसत, विरघळत गेली. 'भारतात एकदा जाऊनच यावं... सोफीलासुद्धा खूप मजा येईल.' मार्गरिट स्वत:ला समजावत निर्णय अधिकाधिक पक्का करीत चालली होती.

दुसऱ्या नवऱ्याला एका भयंकर अपघातात गमावल्यानंतर लगेचच पहिल्या नवऱ्याकडे धावणं लोकांच्या नजरेत विचित्र दिसेल. मित्रमैत्रिणी, शाळेतले सहकारी आपल्यामागं आश्चर्यानं कुजबुजतील, हे ठाऊक असून मार्गरिट कोचम्मानं 'टर्म डिपॉझिट'मधली आपली बचत अर्ध्यावरच मोडली आणि विमानाची दोन तिकिटं खरीदली.

लंडन-बॉम्बे-कोचिन.

– आपला हा निर्णय इतका जीवघेणा ठरेल, याची मार्गरिटला अंधुकशीही कल्पना नव्हती. पुढे आयुष्यभर हा एक निर्णय झपाटल्यासारखा मार्गरिटचा पिच्छा पुरवत राहिला.

'आयमेनेम हाऊस'च्या दिवाणखान्यात लांबलचक बग्गीत ठेवलेला सोफी मॉलचा निश्चल देह.

ते भयंकर चित्र अखेरच्या क्षणापर्यंत मार्गरिटच्या स्मरणातून पुसू शकलं नाही.

कितीही लांब उभं राहिलं; तरी जाणवत होते सोफीचे थांबलेले श्वास. ती आजारी नाही, झोपलेली नाही. तिच्या शरीरातलं पाखरू उडून गेलंय हे जाणवत होतं – त्या इवल्या शरीराच्या थिजलेपणातून! सोफीचे दोन्ही पाय लाकडासारखे शुष्क होऊन वेडेवाकडे पसरले होते... मृत्यू! त्याचंच हे कारस्थान! आणि ही भयंकर स्तब्धता... थिजलेपणा!

नदीतली हिरवी झाडंझुडपं, ओल्या मातीची ढेकळं सोफीच्या लांबसडक तपकिरी केसांत साचून सुकली होती. सुरकुतलेल्या पापण्यांची टोकं माशांनी कुरतडली होती. नाचऱ्या, आनंदी अक्षरात 'Holiday' लिहिलेला सोफीचा जांभळा फ्रॉकही माशांनी

कुरतडून खाल्ला होता. खूप वेळ पाण्यात राहून-राहून गारठलेल्या, सुरकुतलेल्या धोब्याच्या बोटांसारखा अख्खा देहच गारठलेला... सुरकुत्यांनी भरलेला!

– हातपाय हलवून पाण्यात पोहोण्याचं शास्त्रच विसरून गेलेली गुबगुबीत, मत्स्यकन्या.

तिच्या मुठीत कवटाळलेलं चांदीचं अंगुस्तान अजून तिथेच होतं. भोवती गारढोण बोटांची घट्ट मिठी.

सोफी मॉलला घेऊन आयमेनेमला जाण्याचा बेत ठरवल्याबद्दल मार्गरिट कोचम्मा कधीही स्वत:ला माफ करू शकली नाही.

त्या दिवशी सोफी मॉल एकटीच घरी राहिली होती. परतीची तिकिटं 'कन्फर्म' करायला मार्गरिट कोचम्मा चाकोबरोबर कोचिनला गेली आणि त्याच दिवशी...

--

सकाळी नऊच्या सुमारास माम्माची आणि बेबी कोचम्माला पहिली खबर मिळाली – मीनाचल नदीच्या अगदी खालच्या रुंद प्रवाहात एका गोऱ्यागोमट्या मुलीचं प्रेत तरंगत आहे. कुठून वाहून आलं कोण जाणे, पण बॅकवॉटर्सच्या मुखाशी येऊन नदीतल्या झाडोऱ्यात अडकून बसलं आहे.

इस्था आणि राहेलचा अजून पत्ता नव्हता.

त्या दिवशी सकाळी तिन्ही मुलं रोजच्यासारखी दूध प्यायला स्वयंपाकघरात आली नव्हती. बेबी कोचम्मा आणि माम्माचीनं बराच वेळ मुलांची वाट पाहिली. अजून कुणाचा पत्ता नाही, त्याअर्थी भल्या सकाळी उठून मुलं नदीवर पोहायला गेली असणार हे उघड होतं. आदल्या रात्री तुफान पाऊस झाला होता. नदीला जास्त ओढ असणार हे लक्षात आल्यावर दोघींनाही मुलांची काळजी वाटली. बेबी कोचम्मानं कोचु मारियाला हाक घातली आणि मुलांना परत घेऊन येण्याकरता तिला नदीवर पाठवलं. काही वेळानं कोचु मारिया एकटीच परत आली. नदीकाठावर खूप फिरूनही तिला मुलं भेटली नव्हती. वेल्लय्या पाप्पेन येऊन गेल्यावर घरात जो काही धिंगाणा झाला, त्या भरात तिन्ही मुलं कुठं आहेत, त्यांंचं काय चाललंय याकडं कुणाचंच लक्ष नव्हतं. आपण शेवटचं मुलांना कधी पाहिलं, तेव्हा ती कुठं होती, काय करत होती. हेदेखील कुणाला आठवेना. रात्रभर मुलं घरीच परतली नसण्याची शक्यता होती. घरातल्या एकाही मोठ्या माणसानं आदल्या रात्री त्यांना पाहिलं नव्हतं.

अम्मू अजूनही बेडरूममध्ये कोंडून पडली होती. दाराला बाहेरून कडी आणि भलंमोठं कुलूप. किल्ल्या बेबी कोचम्माच्या कमरेशी लटकत होत्या. बेबी कोचम्मानं अम्मूला

बाहेरूनच हाक घातली. मुलं कुठं असतील? काही कल्पना आहे का?– विचारलं. मनातली भीती आवाजात उतरू नये, यासाठी प्रयत्न करूनही तिचे प्रश्न धास्तावलेलेच होते. सहज म्हणून विचारल्याचा आव असलेल्या त्या प्रश्नांच्या पोटातला हादरा जबरदस्त होता. बंद दाराआड जोरजोरानं आवाज होऊ लागले. जे घडतंय, त्याबद्दलच्या अविश्वासानं संतापलेली अम्मू रागानं बेभान झाली होती. घरातल्या वेड्या माणसाला खोलीत कोंडून घालावं, तशी आपली अवस्था करणाऱ्यांविरुद्ध तिच्या तनामनात संताप खदखदत होता. काय करावं, कळत नव्हतं. भावनांवर ताबा ठेवता तिचा तोल पार सुटला होता. मन उद्ध्वस्त झालं होतं. आतून उसळलेला रागाचा भडका पेलवत नव्हता.

पुढे अख्खं जगच कोसळलं. सोफी मॉलचा मृतदेह आयमेनेममध्ये आणला गेला. बेबी कोचम्मानं कुलूप उघडून अम्मूला बाहेर काढलं; तेव्हा अम्मूच्या डोळ्यांतला संतापाचा भडका क्षणात थिजला... काय झालंय हे समजून घेता-घेता भीतीचे शहारे उठले आणि क्षणाक्षणाचा हिशेब मांडत अम्मू वर्तमानात आली. हळूहळू संगती लागत होती. घेरून आलेल्या मरणगंधाचं कोडं सुटत चाललं होतं. गाठी-निरगाठी सरसर उकलत निघाल्या, तशी अम्मूच्या पोटात खड्डा पडला. दाराशी येऊन बाहेरून कुलूप वाजवणाऱ्या इस्था आणि राहेलनं आरडाओरडा चालवला होता. 'तुला का कोंडून घातलंय? का पण?' या प्रश्नाचे घण अम्मूच्या भडकल्या डोक्यात इतक्या जोरानं बसले, की संतापानं उसळत ती म्हणाली होती,

'तुमच्यामुळं! काट्यांनो, तुमच्यामुळं झालीय ही दुर्दशा!'

फक्त क्षणभरच तोल सुटला होता. संतापाच्या भरात आपण काय बोलून गेलो, हे अम्मूला आठवलं.

संताप पेलत नव्हता. त्या भरात अम्मू दाराबाहेरच्या मुलांच्या अंगावर जोरानं किंचाळली,

'तुम्ही जन्मालाच आला नसतात, तर उपकार झाले असते माझ्यावर! तुमच्यामुळं, तुमच्यामुळं धूळदाण झालीय माझी. तुमच्यापाठी धावत आले आणि सडत पडले या घाणेरड्या गावात. सत्यानाश झाला आयुष्याचा. दिलं असतं फेकून एखाद्या अनाथाश्रमात, तर सुटले असते कायमची! पण तेवढं कुठलं भाग्य? मुलं कसली, गळ्यातली धोंडं आहात तुम्ही. मला बुडवून माराल, तेव्हाच बापाचं नाव लावाल... नालायक साली कार्टींऽऽ'

– एकेका शब्दानिशी कोमेजत जाणारे मुलांचे चेहरे कोंडून घातलेल्या अम्मूला दिसले नाहीत. आपली अम्मू काय बोलतेय हे समजून घेता-घेता डोईवरच्या ऐटबाज कोंबड्यातले केस घाबरून उभे राहिले आणि 'लव्ह-इन-टोकियो'मध्ये बांधलेलं केसांचं कारंजं थरारलं. जुळ्यांची मती गुंग होऊन गेली होती. भीतीनं तोंडून शब्द फुटत नव्हता.

खोलवर कुठंतरी राग उसळत होता, लाज वाटत होती.

'चालते व्हाऽऽ'– बंद दाराआडून अम्मू किंचाळली. 'खबरदार पुन्हा तोंड दाखवाल तर! माझ्या पाठीची कटकट तरी संपेल... चालते व्हा... निघून जा इथून!'

– मुलं तत्काळ निघून गेली.

'मुलं कुठं आहेत?' या प्रश्नाला आदळआपटीशिवाय अम्मूकडून काहीच उत्तर मिळत नाही, हे लक्षात आल्यावर बेबी कोचम्मा लगबगीनं घरात धावली, तिच्या मनात एव्हाना चित्रविचित्र शंका यायला लागल्या होत्या. भीतीचा, दहशतीचा थरार घेरून आला होता. तिनं रात्रीच्या सगळ्या घटना आठवून त्यांच्याशी मुलांचं नाहीसं होणं जोडून, पडताळून पाहायला सुरुवात केली. हाती लागलेले निष्कर्ष, जे घडलं, त्याच्याशी सुसंगत असले; तरी ते ठार चुकीचे आहेत, अशी शंकासुद्धा धास्तावलेल्या बेबी कोचम्माला येणं शक्य नव्हतं.

आदल्या दिवशी भर दुपारीच अंधारून आलं होतं. संध्याकाळपासून घनघोर पावसाला सुरुवात झाली. कोचु मारिया उगीचच वैतागलेली होती. बाहेर पावसानं झड धरल्यावर तिनं दारं-खिडक्या ओढून घेतल्या आणि स्वयंपाकघरातल्या आपल्या बैठ्या स्टुलावर चढून रात्रीसाठी मासे साफ करायला सुरुवात केली. कोचु मारियाच्या हातातली सुरी सपासप चालू लागली, तशी तिच्या कानांतल्या कुनुक्कूंचे हेलकावे वाढले. खटाखट तासले जाणारे माशाचे खवले स्वयंपाकघरात चौफेर उडू लागले. भिंती... भांडीकुंडी... चहाची किटली... फ्रीजचं हँडल... जिकडेतिकडे माशाचे खवलेच खवले.

– तेवढ्यात स्वयंपाकघराच्या दारात वेल्लय्या पाप्पेन येऊन उभा राहिला. ओलाचिंब. पावसाच्या पाण्यात निथळणाऱ्या त्या शरीराला भीतीनं कापरं भरलं होतं. तोंडून शब्द फुटत नव्हता. एका (खऱ्या) डोळ्यात रक्त उतरलेलं. दुसरा निश्चल. दारू पिऊन आल्यासारखा तर्रर्र दिसत होता.

कोचु मारियानं ढिम्म लक्ष दिलं नाही. हातातला मासा साफ झाल्यावर तिनं कांद्यांचा ढीग चिरायला घेतला. दहा मिनिटं तशीच उलटल्यावर शेवटी वेल्लय्याला राहावेना. त्यानं जोरानं घसा खाकरला. 'कोणंय' म्हणून कोचु मारियानं वळून बघितल्यावर 'माम्माची कुठंय?' असं खुणेनंच विचारलं.

स्वयंपाकघरातल्या उंबरठ्यावर वेल्लय्याला बघताच कोचु मारियाच्या मस्तकात सणक गेली. वेल्लय्याला हुसकावून लावण्याकरता तिनं पन्नास तऱ्हा करून पाहिल्या; पण वेल्लय्या जागचा हलला नाही. त्याला काहीतरी महत्त्वाचं बोलायचं होतं; पण डोळे लालभडक, तारवटलेले आणि तोंड उघडलं, की ताडीचा घाणेरडा उग्र वास! हळूहळू त्याचा तोलही जायला लागला होता. कोचु मारिया मनातून थोडी चरकलीच.

वेल्लय्याला अशा अवस्थेत तिनं कधीच पाहिलं नव्हतं. काही वेळानं तिच्या थोडं-थोडं लक्षात यायला लागलं. वेल्लय्याला कुणाबद्दल बोलायचंय याचा थोडा अंदाज आल्यावर कोचु मारिया सावध झाली. मामला नाजूक आहे, तेव्हा माम्माचीला बोलावलेलं बरं! उंबरठ्यावर उभ्या असलेल्या वेल्लय्याला बाहेरच्या अंधाऱ्या व्हरांड्यात लोटून कोचु मारियानं स्वयंपाकघराचं दार घट्ट लावून घेतलं आणि ती माम्माचीला बोलवायला धावली.

बाहेर पावसानं आकांत मांडला होता. डिसेंबर महिन्यात मृगाचं नक्षत्र लागावं, तशा आवेगात अकाली सरी कोसळत होत्या. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांनी या पावसावर मोठमोठ्या बातम्या छापल्या आणि 'सायक्लॉनिक डिस्टर्बन्स' असा भलाभक्कम निष्कर्षही नोंदवला. पण तोवर 'आयमेनेम हाऊस'मधलं कुणीही वर्तमानपत्र वाचण्याच्या मन:स्थितीतच उरलं नव्हतं.

त्या महाभयंकर पावसामुळेच वेल्लय्या पाप्पेन आपल्या अस्पृश्य सीमा ओलांडून स्वयंपाकघराच्या दारापर्यंत धडकला होता. डोक्यात ताडीची झिंग, डोळ्यांत उतरलेलं रक्त आणि बाहेर कोसळणाऱ्या पावसानं मनात पसरवलेल्या भीतीच्या, दहशतीच्या अजस्र लाटा. त्यातून वेल्लय्या वृत्तीनं पक्का अंधश्रद्ध. इतक्या अवेळी आकाश फाटल्यासारखा कोसळणारा हा पाऊस म्हणजे अख्ख्या पृथ्वीला पोटात घेणाऱ्या प्रलयाची चाहूल तर नव्हे? भयंकर धास्तीनं त्याच्या मनात ठाण मांडलं होतं.

शरीराच्या झोकांड्या जात होत्या, 'प्रलय होणार' याखेरीज त्याच्या सुन्न बुद्धीला दुसरं काही जाणवत नव्हतं.

एका अर्थानं प्रलयाला सुरुवात झालीच होती.

कमरेला बांधलेल्या पेटीकोटवर फिक्कट गुलाबी गाऊन चढवून स्वयंपाकघरात आलेल्या माम्माचीनं दार उघडलं; त्या क्षणी अंधारात झोकांड्या खाणारा वेल्लय्या एका दमात पायऱ्या चढून वर आला. फुटक्या खोबणीत (माम्माचीच्या पैशानं) बसवलेला काचेचा (गहाणवट) डोळा काढून त्यानं तळहातावर धरला आणि ओरडून म्हणाला,

'परत घ्या... परत घ्या! संपलं सगळं... खल्लास!'

तुमच्या पैशानं हा डोळा बसवण्याची माझी लायकी नाही, तेव्हा तुमचा तुम्हांला परत घ्या अशी आर्जवं करत विव्हळणाऱ्या वेल्लय्या पाप्पेनची डाव्या डोळ्यांची खोबण मोकळी भकास दिसत राहिली. वरची पापणीही पार आतपर्यंत लोंबत होती.

'काय्ये? काय परत करतोयस?' आंधळ्या माम्माचीनं सहज हात पुढे केला. तिला वाटलं, सकाळी दिलेले किलोभर लाल तांदूळ वेल्लय्यानं परत करायला आणलेत.

'डोळा आहे तोऽऽ डोळाऽऽऽ' कोचु मारिया घाबरून माम्माचीच्या कानाशी जोरानं ओरडली. कांदे चिरताना तिच्या स्वत:च्या डोळ्यांत तिखट धुम्मस घुसलीच होती.

पण कोचु मारिया काय म्हणतेय ते ऐकेपर्यंत माम्माचीनं वेल्लय्याच्या तळहातावरल्या वस्तूला हात लावलाच होता.

त्या बुळबुळीत, थंडगार, टणक स्पर्शानं माम्माची शहारली. तिनं झटकन् हात मागं घेतला.

'झालंय काय तुला? पिऊन-बिऊन आलायस की काय?' माम्माचीला अचानक उसळत्या संतापाने घेरलं. बाहेर कोसळणाऱ्या पावसाच्या धिंगाण्यावर आवाज चढवून माम्माचीनं वेल्लय्याला धारेवर धरलं,

'लाज नाही वाटत? दारू पिऊन माझ्या घरात येतोस? या घराची पायरी चढायची हिंमतच कशी झाली तुझी?'

– संतापाच्या भरात माम्माची धडपडत मोरीवर गेली. अस्पृश्य डोळयाचा स्पर्श झालेला हात तिनं साबण लावून खसाखसा धुतला. परत खात्री करावी, म्हणून 'पवित्र' झालेल्या हाताचा वासही घेतला.

तोवर पाण्यानं निथळणाऱ्या वेल्लय्याची दया येऊन कोचु मारियानं त्याला अंग पुसण्याकरता एक जुन्यातला टॉवेल काढून दिला होता. त्या कोरड्या कपड्याच्या आशेनं वेल्लय्या आणखी दोन पायऱ्या चढून वर आला. पावसापासून आडोसा हवा, म्हणून अंग चोरत जवळपास स्वयंपाकघरात शिरला. इतका वेळ व्हरांड्यातल्या उतरत्या छपराखाली पावसाची झड लागून लागून कुडकुडलेल्या शरीरात थोडी ऊब आली. धीरही आला.

काही वेळानं भरकटलेलं डोकं ठिकाणावर आल्यानंतर वेल्लय्यानं मुठीत धरलेला आपला डोळा डाव्या खोबणीत जागच्या जागी बसवून टाकला आणि सुचेल तसं बोलायला सुरुवात केली.

तुमच्या अख्ख्या कुटुंबानं आमच्या पिढ्यान्पिढ्यांवर कसे डोंगराएवढे उपकार करून ठेवले आहेत; हेच तो कितीतरी वेळ माम्माचीला सांगत राहिला. केरळात कम्युनिस्ट आले आणि त्यांनी संपत्तीच्या समान वाटपाच्या गप्पा सुरू केल्या, त्याच्या कितीतरी आधी जॉन रेव्हरंड ई. आयपेनी वेल्लय्याच्या बापाला – केलनला – झोपडी बांधण्यासाठी जमिनीचा तुकडा लिहून दिला होता. माम्माचीनं पदरमोड करून वेल्लय्याचा कृत्रिम डोळा बसवायला मदत केली होती. शिवाय वेलुथाच्या शिक्षणाची व्यवस्थाही माम्माचीनंच केली. शिक्षण संपल्यावर त्याला नोकरीही दिली. या सगळया अनंत उपकारांबद्दल वेल्लय्या पुन्हापुन्हा माम्माचीचे आभार मानत राहिला. कृतज्ञतेनं नाक घासत राहिला.

वेल्लय्या दारू पिऊन दाराशी आल्याबद्दल माम्माची मनातून चिडली असली; तरी आपल्या कुटुंबाच्या दानशूरतेबद्दल स्तुतिपुराण ऐकताना मनातून सुखावली होती. पुढे तो

काय सांगणार याची उत्कंठा, चिंता वाटण्याऐवजी स्वत:चं कौतुक ऐकता-ऐकता माम्माची काहीशी सैलावत गेली.

एकाएकी वेल्लय्याला हुंदके फुटले.

तो हमसाहमशी रडायला लागला. स्वत:ला आवरणं त्याला मुश्कील झालं होतं. त्याच्या खऱ्या डोळ्यात अश्रूंचा बांध फुटला. एकाच गालावरून काळं पाणी धावत सुटलं. दुसरा काचेचा डोळा दगड होऊन माम्माचीकडे एकटक पाहत होता.

वेल्लय्या पुरता ढासळला.

'प्रेम' आणि 'निष्ठा' यांचा भयंकर खेळ त्यानं पाहिला होता. ते जीवघेणे क्षण त्याच्या नजरेसमोर उभे राहिले.

भीतीच्या थरारानं वेल्लय्या पुन्हा आक्रसला. त्याच्या तोंडून शब्द फुटेनासे झाले. शेवटी त्यानं माम्माचीला सगळं सांगून टाकलं.

त्यानं बघितलेलं, त्याच्या नजरेसमोर घडलेलं सगळं.

ऐन मध्यरात्री नदीपार करून पल्याडच्या काठाला जाणारी छोटी होडी.

एकमेकांना विळखा घालून, शरीराला शरीर भिडवून त्या होडीतून नदीत तरंगणारं जोडपं.

कोण होते ते दोघे? किती रात्री एकमेकांना भेटले?

नंतर मग दोघे मिळून पल्ल्याडच्या काठाला करी सैपूच्या घरात गेले. भुताटकीनं झपाटलेल्या त्या घरातल्या गोऱ्या साहेबाचा आत्मा दोघांमध्ये शिरला आणि नको ते घडलं.

(इस्था वर बसला असताना राहेलला सापडलेली) छोटी होडी नदीकाठी एका झाडाला बांधलेली असते. तिथून थोडं पुढे चाललं, की रबराचा मळा आणि पुढे करी सैपूचं ते घर!

...प्रत्येक रात्री ती होडी तिथं दिसते. अंधाऱ्या नदीवर शांतपणे हेलकावणारी... रिकामी... प्रणयाचा बहर आवरून परत येणाऱ्या जोडप्याची वाट पाहणारी! कधी कधी तर अख्खी रात्र तशीच जाते. भल्या पहाटे केव्हातरी एकमेकांच्या मिठीतलं ते जोडपं उगवतं. मग होडीची मुक्तता आणि परतीचा प्रवास!

'हे सगळं मी पाहिलंय स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलंय ... अख्ख्या गावाला ठाऊक आहे. जो तो कुजबुजायला लागलाय. जिकडं-तिकडं चर्चा होतेय.'

वेल्लय्या पाप्पेन सांगत होता.

सगळं सगळ्यांना ठाऊक होतं; फक्त माम्माचीच्या कानांवर पडण्याचाच अवकाश! म्हणून शेवटी मनाचा हिय्या करून तो स्वत:च सांगायला आला होता. इतक्या अनंत उपकारांच्या ओझ्याखाली असताना आपणाकडून कर्तव्यात कसूर घडायला नको, म्हणून!

ऐन मध्यरात्री एकमेकांना मिठी घालून नदीपार जाणारं ते जोडपं?

– त्याचा मुलगा,

आणि तिची मुलगी.

त्या दोघांनी मिळून सार्‍या मर्यादा ओलांडल्या होत्या. 'जे' कधीही घडणं शक्य नाही, अशा गोष्टीचा ध्यास घेतला होता. आणि 'ते' घडत होतं. रोज रात्री... अगदी पहाटेपर्यंत... खुले आम!

वेल्लय्या बोलत सुटला. बोलता-बोलता रडत होता. खोकल्यानं बेजार होऊन ओकार्‍या काढत होता. त्याचं तोंड हलत होतं. चेहरा विचित्र वेदनांनी पिळवटून, पिरगाळून निघाला होता.

हळूहळू माम्माचीच्या कानात दडे बसले. तो काय बोलतोय; काही ऐकू येईनासं झालं. बाहेर पावसाचा जोर प्रचंड वाढला होता. त्याची बेभान भणभण घरात घुसली होती. सगळ्या आवाजांचे जबरदस्त घण माम्माचीच्या मस्तकात ठणाणू लागले. त्या सैरभैर अवस्थेत स्वत:चीच किंचाळीदेखील तिला ऐकू आली नाही.

फिक्या गुलाबी गाऊनमध्ये गुंडाळलेले ते आंधळं म्हातारं शरीर एकाएकी उठून उभं राहिलं. पांढर्‍या केसांची उंदराच्या शेपटीएवढी वेणी पाठीवर संतापानं फिस्कारत होती.

माम्माचीनं सगळी शक्ती एकवटून उंबरठ्यावरच्या वेल्लय्या पाप्पेनला घराबाहेर ढकलून दिलं. बेसावध वेल्लय्या स्वयंपाकघराच्या पायर्‍यांवर कोसळला आणि गडगडत जाऊन खालच्या चिखलात वेडावाकडा अस्ताव्यस्त पसरला. मालक लोकांच्या घरात आपल्या अस्पृश्य अंगाला कुणी साधा स्पर्श करील, याचीही कल्पना बिचार्‍याला नव्हती. माम्माचीनं ढकलताच त्याच्या शरीराचं कापरं भरलेलं मुटकुळं कुठल्याकुठं उडालं.

वेल्लय्याला टॉवेल देऊन स्वयंपाकघरातल्या कामाकडे वळलेली बेबी कोचम्मा हा गोंधळ ऐकून पुन्हा दरवाजाशी धावली.

दाराच्या चौकटीवर हात रोवून संतापानं थरथरणारी माम्माची बाहेरच्या अंधारात जोरजोरानं थुंकत होती.

थूऽऽथूऽऽऽथूऽऽऽऽ

चिखलानं बरबटलेला वेल्लय्या तिच्यापुढे गडाबडा लोळत होता. 'माझ्या नालायक हरामखोर मुलाला मी जिवे मारीनऽऽ त्याचे हातपाय तोडीनऽऽ'... वेल्लय्याला याहून अधिक काही सुचत नव्हतं. क्षमा मागायला त्याच्याजवळ शब्द नव्हते.

माम्माची जीव तोडून किंचाळत होती.

'नालायकऽऽ खोटारड्या कुत्र्याऽऽऽ चालता हो, चालता हो इथूनऽऽऽ'

बेबी कोचम्मा समोर दिसल्यावर माम्माचीचा उरलासुरला तोलही सुटला. वेल्लय्या पाप्पेन काय म्हणतोय; ती सगळी भयंकर गोष्ट माम्माची घडाघडा सांगत सुटली.

संतापलेल्या डोळ्यांतून अखंड पाणी वाहत होतं. म्हातार्‍या, असहाय शब्दांना जीवघेणी धार चढली होती.

नक्की काय घडलंय, ते कळल्यावर बेबी कोचम्माच्या काळजाचा ठोका चुकला. संतापानं थरथरणार्‍या माम्माचीच्या अजून लक्षातही न आलेले अनेक भयंकर परिणाम तिच्या नजरेसमोरून विषारी काळसर्पासारखे सरसरत गेले... आणि पुढच्याच क्षणी एका क्रूर आनंदानं तिची नजर लकाकून उठली. आता काय वाट्टेल ते होईल. अम्मूच्या पापाचा घडा भरलाच होता; आता हा शेवटचा खडा! बरं झालं, देवानंच चांगली अद्दल घडवली. एकेक गाठ उलगडत जात होती, तसतशा बेबी कोचम्माला आतून उकळ्या फुटू लागल्या होत्या. अम्मू आणि वेलुथा. दोघांनाही भोगावी लागणार आपल्या कर्माची फळं! भर रस्त्यावर उधाणलेल्या मोर्च्यात वेलुथाच्या सहकार्‍यांनी केलेला अपमान, गाडीच्या उघड्या खिडकीतून आत घुसून कुणीतरी हातात खुपसलेला लाल बावटा... तो उंच फडकावण्याची बळजबरी... 'मोदालाली मारीकुट्टी' म्हणून केलेला उपहास... यातलं काहीही बेबी कोचम्मा विसरली नव्हती. तिच्या त्या भळभळत्या जखमेवर अचानक खपली धरली. फिट्टमफाट झाल्याच्या खुनशी आनंदानं चेहरा खुलला. पापानं उधाणलेल्या काळ्याकुट्ट समुद्रातून भलेपणाचं जहाज शुभ्र शिडं उभारून सफरीवर निघालं होतं.

त्या आनंदाच्या भरात बेबी कोचम्मा पुढे झाली. दु:खानं, संतापानं थरथरणार्‍या माम्माचीच्या खांद्याभोवती आपला भलाभक्कम हात प्रेमानं लपेटून घेत हळूच म्हणाली,

'मी सांगते, खरंच असेल. ती आहेच तशी. आपण काय करतोय याचा विचार करायची अक्कल आहे कुठं तिला? कुळबुडवी मेली? आणि 'तो'ही त्यातलाच. वेल्लय्या कशाला खोटं सांगेल?'

बेबी कोचम्मानं कोचु मारियाला हाक मारली. माम्माचीकरता पाणी मागवलं. शेजारचीच खुर्ची थोडी पुढे सरकवून त्यावर माम्माचीला बसतं केलं. वातावरणातला ताण थोडा निवळल्यावर वेलय्या पाप्पेनकडून पुन्हा पहिल्यापासून सगळी कहाणी वदवून घेतली. दर वाक्यानंतर प्रश्न विचारून अधिक माहिती काढून घेतली. कुणाची होडी? किती वेळा नदीपार जाते? कोणत्या वेळी? कधीपासून चाललीय ही सगळी भानगड?

सगळं सांगून वेल्लय्या पाप्पेन रिता झालाय, त्याच्याजवळ आता सांगण्यासारखं काहीही उरलेलं नाही याची खातरी पटल्यावर बेबी कोचम्मानं हातातला कासरा ढिला सोडला. सुन्न बसलेल्या माम्माचीकडे वळून ती म्हणाली,

'त्याला जाऊ दे आता. आज रात्रीच काय तो निर्णय लावू. पाणी गळ्याशी आलंच्चेय. बुडून मरण्याआधी हातपाय हलवायला हवेत.'

पुढे काय करायचं हे ठरवून झाल्यावर शाळकरी मुलीच्या छचोर उपाहासानं तिनं खांदे उडवले. नाक मुरडत, मान वेळावत म्हणाली,

'शीऽऽऽकाय ते मेले पारायार... तो वास सहनच कसा झाला तिला? ईऽऽ किती घाण येते अंगाला त्याच्या...'

बेबी कोचम्मानं हे वासाबिसाचं प्रकरण काढल्यावर पहिला धक्का पुष्कळसा ओसरला. प्राण कंठाशी आणणारा त्यातला थरारही काहीसा सैलावला.

बाहेर उधाणलेल्या पावसात भीतीनं थरथर कापणाऱ्या, गावठी दारू चढल्यामुळं झोकांड्या खाणाऱ्या वेल्लय्या पाप्पेनबद्दल माम्माचीच्या डोक्यात चढलेली सणकही उतरली... ओसरली. आणि तिच्या विस्फारल्या डोळ्यांपुढे उभी राहिली तिची लेक. नग्न. पापी! हमाली करायचीसुद्धा ज्याची लायकी नाही, अशा घाणेरड्या मवाली पुरुषाच्या मिठीत चिखलात लोळणारी!

माम्माचीच्या नजरेपुढल्या त्या भयानक चित्रात वेगवेगळे तपशील भरू लागले.

एका अस्पृश्य माणसाचा काळाबेंद्रा, रासवट हात आपल्या मुलीच्या उघड्या छातीवरून फिरतोय. दोन गोरेपान, टचटचलेले उंचवटे कुस्करतोय... त्याचं तोंड तिच्या तोंडावर... ओठांत ओठ... जिभेभोवती जीभ... दोघे उधाणले आहेत... श्वास जोरानं चाललाय... तो चेकाळलेला... तिचे चित्कार! फताड्या पसरलेल्या दोन गोऱ्यापान मांड्याच्यामध्ये खालीवर हलणारं, आदळणारं, जोरजोरानं ठोकणारं ढुंगण!

माम्माचीला मळमळून आलं.

उंबरठ्याशी जाऊन ती भडाभडा ओकली.

माजावर आलेली हडळ आणि हपापल्यासारखा तिच्याशी संग करणारा कुत्रा!

चाकोच्या संदर्भात 'पुरुषी शरीराच्या गरजा' समजून घेऊन गुपचूप त्या भागवण्याची व्यवस्था करणाऱ्या माम्माचीचा समजूतदारपणा लेकीच्या 'शारीरिक गरजां'चा प्रश्न आल्यावर एकाएकी संतापानं भडकून उठला.

घराण्याची प्रतिष्ठा धुळीला मिळाली होती. पिढ्यान्पिढ्यांचं पावित्र्य रातोरात घाणेरड्या चिखलात बरबटलं होतं (खुद्द बिशप अंत्योखनी आशीर्वाद दिलेला छोटा मुलगा पुन्नयन कुंजू, जागतिक कीर्तीचे कीटकशास्त्रज्ञ, शिवाय ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतला र्‍होडस स्कॉलर – केवढी उज्ज्वल परंपरा!). पिढ्यान्पिढ्यांची तपश्चर्या वाया गेली होती. मुलीनं कुळाला बट्टा लावला होता.

... आता कसा हा कलंक पुसणार?

जो तो बोटं दाखवणार... नावं ठेवणार... पाठ वळली, की कुत्सित हसणार.

लग्नाचा समारंभ असो, मी मरणाचा सोहळा; बारसं असो, की बाप्तिस्मा, यापुढे कुणीही कधीही आपल्या कुटुंबाला पूर्वीचा मान देणार नाही.

सगळे जण चेष्टा करतील. नावं ठेवतील. टोचून खातील.

पूर्वीचा मानमरातब... सन्मान... मोठेपणा... सगळं संपलं आता... पार धुळीला मिळालं.

माम्माचीच्या पोटात नव्यानं खड्डा पडला.

भविष्याचं भीषण, काळंकुट्ट चित्र हादरवून टाकणारं होतं.

तरीही इलाज नव्हता. भराभर पुढची पावलं उचलण्यावाचून गत्यंतर नव्हतं.

दोघी म्हातार्‍या कामाला लागल्या.

माम्माचीच्या धगधगत्या संतापाच्या ज्वाळांवर बेबी कोचम्मानं आपला 'बेत' शिजवला.

कोचु मारिया हाताखाली होतीच. तिघींनी मिळून अम्मूच्या बेडरूमला बाहेरून टाळं ठोकलं आणि आत बसल्या-बसल्याच तिला कोंडून टाकलं. लगोलग वेलुथाला बोलावणं धाडलं. वाट्टेल ते करून चाको परत येण्यापूर्वीच वेलुथाला आयमेनेममधून हाकलून लावलं पाहिजे, एवढंच दोन्ही म्हातार्‍यांना कळत होतं. चाकोचं डोकं भडकलं, तर तो काय करून बसेल, याचा काही अंदाजच करता येत नव्हता.

...पण तोवर वेळ निघून गेली होती.

पुष्कळशा गोष्टी हातांतून निसटल्या होत्या.

नियतीच्या चाबकाचा फटकारा चुकवणं कुणाच्याच आवाक्यात उरलं नव्हतं.

चाको आणि मार्गरिट कोचम्मा कोचिनहून परत यायच्या आत सगळं संपलं होतं.

नदीच्या प्रवाहात होडी हाकारणार्‍या कोळयांना झाडोर्‍यात अडकून तरंगणारी सोफी मॉल दिसली होती.

नेमकं झालं काय? कुठं?

भल्या पहाटे नेहमीप्रमाणे तो कोळी बाहेर पडला. किनार्‍याशी बांधलेली होडी सोडून नदीमध्ये हाकारली. रात्रभराच्या पावसानं आलेली सूज अजून ओसरली नव्हती. मातकट प्रवाहाचा वेगही आत खेचत, भोवर्‍यांमध्ये गरगरत पुढे धावत होता.

तेवढ्यात कसलेतरी झुबके वाहताना दिसले. रंग नेहमीपेक्षा वेगळा होता. लालसर तपकिरी. किनार्‍यावरच्या वाळूसारखा. कोळयाची नजर एकदम थबकली. हे काय वाहतंय? त्यानं पटकन आपलं वल्हं उचललं आणि समुद्राच्या दिशेनं वाहत निघालेला तो झुबका अडवला. हलकेहलके आपल्या दिशेनं ओढून घेतला.

ती एक सुरकुतलेली, आक्रसलेली जलपरी होती.

गारठलेली, थिजून गेलेली.

लालसर पिंगट केसांची.

जागतिक कीर्तीच्या कीटकशास्त्रज्ञाचं तरतरीत नाक घेऊन जन्माला आलेली!

तिच्या मुठीमध्ये चांदीचं अंगुस्तान घट्ट पकडलेलं होतं.

त्या कोळयानं जलपरीला वाहत्या नदीतून वर ओढून घेतलं. होडीत एका बाजूला आपला टॉवेल अंथरला. चमकत्या माशांच्या छोट्या ढिगाशेजारी जुनाट, फाटक्या टॉवेलवर जलपरी शांत निजली.

नदीच्या पोटात वल्हं रोवून कोळयानं होडी घराकडं वळवली आणि तो वेगानं माघारी निघाला.

थय्य थय्य थक, थय्य थय्य थोम!

नदीवर भरवसा ठेवणं केवढं चुकीचं आहे... कसे आपण बिनधास्तपणे तिच्या अंगाखांद्यांवर वावरतो...

कोळयाच्या धास्तावल्या मनात उलटसुलट विचारांचं तुफान उठलं होतं.

मीनाचलच्या मनात काय आहे, ते एकट्या देवाला ठाऊक! या नदीचं रहस्य माणसाला कधी कळणारच नाही. ती कधी कुणाचा घास घेईल, काय सांगावं?

झपाट्यानं घराकडं जाणाऱ्या त्या कोळयानं नकळत हात जोडले.

उधाणल्या नदीला नमस्कार केला.

भीतीनं तोंडचं पाणी पळालेली बेबी कोचम्मा कोट्टायमच्या पोलीस ठाण्यात पोचली आणि कुणाला काही न विचारता थेट इन्स्पेक्टरच्या समोर जाऊन उभी राहिली. लोणच्याच्या कारखान्यात काम करणाऱ्या एका (पारायार) कामगाराला कामावरून तडकाफडकी काढून टाकण्यावाचून कसा इलाज उरलेला नाही, हे तिनं इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यूला रंगवून-रंगवून सांगितलं. काही दिवसांपूर्वी 'त्या' कामगारानं आपल्या भाचीवर ब...ब... बलात्कार करण्याचा प्रयत्न केला होता, म्हणून मग... भाची घटस्फोटित आहे, दोन मुलांची आई आहे. तिच्यावर अतिप्रसंग? कसं सहन करणार? म्हणून मग...

बेबी कोचम्मानं सगळं उलटंपालटं करून टाकलं होतं. गावगप्पांना आळा घालायचा आणि घराण्याची उरलीसुरली इज्जत वाचवायची, तर वेलुथा आणि अम्मूमधल्या नात्याची मोडतोड करून इन्स्पेक्टर थॅमस मॅथ्यूच्या नजरेपुढं वेगळं चित्र उभं करण्यावाचून गत्यंतर नाही, एवढंच बेबी कोचम्माला समजत होतं. अम्मूला वाचवण्यापेक्षा घराण्याची इज्जत महत्त्वाची! पुढे अम्मू स्वत:च खरं काय ते सांगेल आणि स्वत:हून चारचौघांदेखत आपल्या इज्जतीचा पंचनामा करून घेईल, ही शक्यता बेबी कोचम्माच्या विचारात फिरकलीसुद्धा नाही. ती जे सुचेल ते बोलत गेली आणि नंतर तेच खरं आहे, असं तिला वाटायला लागलं.

घटना घडली, तेव्हाच पोलिसांना खबर का दिली नाही? म्हणून इन्स्पेक्टर मॅथ्यूनं

बेबी कोचम्माला उलटा जाब विचारला.

'हे पाहा, आम्ही घरंदाज कुटुंबातली माणसं आहोत,' बेबी कोचम्मा फणकार्‍यानं म्हणाली, 'असल्या गोष्टी चारचौघांत कशा बोलणार? इभ्रतीचा सवाल आहे. साहेब.'

एअर इंडियाच्या महाराजासारख्या मोठमोठ्या झुबकेदार मिशांच्या आडून मान हलवणार्‍या इन्स्पेक्टर मॅथ्यूला ही 'घराण्याच्या इभ्रतीची भानगड' क्षणार्धात पटली.

तोही बड्या इभ्रतदार घरचा होता. त्याला एक इभ्रतदार बायको होती. तिच्या पोटी जन्मलेल्या दोन इभ्रतदार मुली होत्या. त्या मुलींच्या कुंवार गर्भाशयात इभ्रतार पिढ्यांची रांगच्या रांग तयार होती...

'जिच्यावर अत्याचार झाले, ती बाई कुठाय?'

'ती घरी आहे, साहेब. इथं कशी येणार? तिला कळलं असतं, तर मलाही नसतं येऊ दिलं. घाबरलीय फार. शेवटी आईचं काळीज साहेब, मुलांची काळजी वाटणारच!'

पुढे खरी गोष्ट काय झाली, ते सगळं इन्स्पेक्टर मॅथ्यूला कळलं. एका अस्पृश्य पारायार तरुणानं इभ्रतदारांचं 'कुळशील' घेतलं खरं; पण ते त्यानं हिसकावलेलं नव्हतं, तर स्वत:हून स्वखुशीनं त्याच्या टणक शरीरामध्ये समर्पित झालं होतं, हे कळल्यावर इन्स्पेक्टर मॅथ्यूला नाही म्हटलं, तरी पुष्कळच धक्का बसला. सोफी मॉलचे अंत्यसंस्कार उरकल्यानंतर इस्था आणि राहेलला घेऊन 'खरं काय ते' सांगून टाकण्यासाठी अम्मू पोलीस स्टेशनमध्ये गेली; तेव्हा इन्स्पेक्टर मॅथ्यूनं हातातल्या लाकडी दंडुक्यानं तिची उभार छाती चाचपून पाहिली. तो केवळ 'पोलिसी बहाणा' नव्हता. भलतंसलतं सत्य सांगायला आलेल्या बाईला घाबरून गप्प बसवण्याचा तेवढा एकच हुकमी उपाय आहे, हे इन्स्पेक्टर मॅथ्यूला अनुभवानं चांगलं ठाऊक होतं. अम्मूला गप्प केल्याखेरीज झाला गोंधळ बिनबोभाट निस्तरणं सोपं नव्हतंच नाहीतरी.

त्याहीनंतर पुष्कळ पुढे गावगप्पांचा धुरळा खाली बसल्यावर इन्स्पेक्टर मॅथ्यूनं रीतसर कागद रंगवले, फायलीत डकवले आणि इतक्या हुशारीनं सगळी परिस्थिती हाताळल्याबद्दल स्वत:चंच अभिनंदन करून टाकलं.

...पण ते पुष्कळ पुढे.

धपापत्या उरानं बेबी कोचम्मा धावत आली, तेव्हा तिला काय सांगायचंय ते इन्स्पेक्टर मॅथ्यूनं नीट लक्ष ऐकून घेतलं.

बेबी कोचम्मा एकामागून एक वळसे देत, आडवे-उभे धागे विणत एक नवीनच गोष्ट सांगत होती.

'काल संध्याकाळी प्रचंड पाऊस पडत होता. जेमतेम सात वाजले असतील. अंधार पडता-पडता 'तो' एकदम घरात घुसला. धमकी द्यायलाच आला होता. पावसामुळं लाईट गेलेले. आम्ही घरातले कंदील, चिमण्या लावीत बसलो होतो. आमच्या घरातला कर्ता

पुरुष – माझा भाचा चाको आयपे – कोचिनला गेला होता. म्हणजे गेलाचय अजून... त्यामुळे आम्ही घरात एकट्याच आहोत, हे त्याला ठाऊक असणार. जिकडे-तिकडे अंधार. बाहेर पावसानं धिंगाणा मांडलेला आणि घरात आम्ही तिघी... बायकाच!'

बेबी कोचम्मानं अर्थपूर्ण श्वास घेतला. पावसाचं थैमान चालू असताना, अंधाऱ्या रात्री तिघी बायकाच असलेल्या एका भल्यामोठ्या घरात वासनेनं आंधळा झालेला अस्पृश्य पुरुष घुसणं हे किती भयंकर आहे; याची जाणीव इन्स्पेक्टर मॅथ्यूपर्यंत पोचणं आवश्यक होतं.

दोन-चार क्षण जाऊ दिल्यावर बेबी कोचम्मानं आपली कर्मकथा पुढे चालू केली.

'आम्ही त्याला सरळ सांगितलं. गुपचूप गावाच्या बाहेर निघून जा. नाहीतर पोलिसांना बोलवावं लागेल! पण तो नराधम कसला ऐकतो? त्यानं वाट्टेल ते बरळायला सुरुवात केली. 'तुझी भाची स्वत:हून आली आणि झोपली माझ्याखाली, म्हणाला! नालायक! जीभ कशी झडली नाही कोण जाणे! मग म्हणे पुरावा द्या. कशावरून आरोप करताय माझ्यावर, ते सांगा! कसले पुरावे द्यायचे? आणि हा कोण पुरावा मागणार? पण मेल्यांना कसली लाज म्हणून उरली असेल, तर शपथ! माझ्या तोंडासमोर हात नाचवत म्हणाला, 'गेले ते जुने दिवस! तुम्ही कुत्र्यासारखे राबवून घ्यायचात आम्हांला. आणि वाट्टेल तेव्हा ढुंगणावर लाथ मारून हाकलून द्यायचात! आता कायद्याचं राज्य आहे. तुमची मनमानी नाही चालणार आता...' आमच्या मिठावर पोसले मेले आणि आता उलट्या तोंडानं कायद्याची भाषा करतात?'

बेबी कोचम्माच्या गोष्टीला धार चढली होती. शब्द न् शब्द शब्दश: खरा वाटायला लागला होता. गोष्टीतले धागेही एकमेकांमध्ये बेमालूम गुंफले गेले होते.

...आपल्या 'परफॉर्मन्स'वर विशेष खूश होत बेबी कोचम्मा गोष्ट पुढे-पुढे नेत राहिली.

माम्माचीचा तोल सुटला. ती वेड्यासारखी धावत गेली आणि वेलुथाच्या कानाखाली भडकावून त्याच्या तोंडावर तिरस्कारानं थुंकली. त्याला वाट्टेल ते बोलली. यातलं काहीही बेबी कोचम्मानं आपल्या गोष्टीला जोडून घेतलं नाही.

वेलुथा काय म्हणाला, यापेक्षा कोणत्या भाषेत म्हणाला, ते जास्त संतापजनक आहे; म्हणून नाइलाजास्तव आपल्याला पोलीस ठाण्याची पायरी चढावी लागली, हे इन्स्पेक्टर मॅथ्यूला पटवून देणं अधिक महत्त्वाचं होतं. शेण खाल्लं, ते खाल्लं; पण त्याबद्दल पश्चात्ताप करण्याऐवजी, क्षमा मागण्याऐवजी नाक वर करून उलट्या धमक्या देण्याची हिंमत करावी? आणि तीही एका अस्पृश्यानं?

बघता-बघता बेबी कोचम्माच्या नजरेसमोर तिचा उपहास करणाऱ्या 'त्या' माणसाचा चेहरा उभा राहिला. भर उन्हातला मोर्चा. हातात खुपसलेला लाल बावटा... 'मोदालाली मारीकुट्टी'... आणि ते घाणेरडं हसणं!

स्वत:च्याही नकळत बेबी कोचम्मानं 'त्या' माणसाचा चेहरा वेलुथाच्या चेहऱ्यावर बसवला. बघता-बघता तिच्या अंगातला संताप उफाळला. शब्दांना धार आली.

इन्स्पेक्टर मॅथ्यूसमोर गोष्ट उलगडत होती.

वेलुथाच्या 'त्या चेहऱ्या'वरचा घाणेरडा उपहास, उन्मत्त, उद्धट भाषा, बेताल आरडाओरडा या सगळ्यानं आम्ही तिघी कशा घाबरतो; हे बेबी कोचम्मा पुन:पुन्हा सांगत राहिली. वेलुथाची कारखान्यातून झालेली हकालपट्टी आणि तिन्ही मुलांचं रातोरात गायब होणं, यात काहीतरी 'संबंध' असला पाहिजे... असलाच पाहिजे! रात्रीबेरात्री घरात घुसून घाणेरड्या शब्दांत धमक्या देणारा नालायक राक्षस वाट्टेल ते करू शकतो... वाट्टेल ते! 'त्या रात्री'च कसल्यातरी अमंगलाची चाहूल लागली होती, हेही बेबी कोचम्मानं इन्स्पेक्टर मॅथ्यूच्या कानांवर घालून ठेवलं.

मग तिनं आपली गोष्ट थोडी मागे नेली.

'खरंतर या वेलुथाला मी लहानपणापासून ओळखते. आमच्याच घरात वाढला. माझ्याच वडिलांनी – पुन्नयन कुंजु यांनी अस्पृश्यांसाठी सुरू केलेल्या शाळेत शिकला, खूप तपशील समोर येत होते. पुढे मग आयपे कुटुंबीयांनीच वेलुथाला सुतारकामाचं शिक्षण दिलं. त्याच्या आजोबांना राहण्याकरता घर बांधून दिलं. शक्य होतं, ते सगळं केलं. एवढे डोंगराएवढे उपकार केले, की त्यानं आपल्या कातड्याचे जोडे करून पायात घातले, तरी कमीच! – किती सांगू न किती नको, असं बेबी कोचम्माला झालं होतं.

'हेच चुकतं तुमचं... हेच!' इन्स्पेक्टर मॅथ्यू संतापानं म्हणाला, 'आधी या अस्पृश्यांचे नको तेवढे लाड करता तुम्ही. त्यांना पार अगदी डोक्यावर बसवून मिरवता. आणि शेवटी त्यांनी आपली जात दाखवली, की येता बोंबलत पोलिसांची मदत मागायला!'

मास्तरांनी दंडुका उगारल्यावर भेदरून गेलेल्या शाळकरी मुलीसारखी बेबी कोचम्मानं आपली पट्टी एकदम खाली उतरवली. नजर झुकवून खालच्या आवाजात गोष्ट पुढे सरकत राहिली.

गेल्या काही दिवसांपासून वेलुथाची लक्षणं ठीक नव्हतीच. तो उद्धट झाला होता. वाट्टेल ते बोलायचा. वर मान करून ताठ कण्यानं चालायचा. एकदा कोचिनला जाताना एका संतप्त मोर्च्यातही दिसला होता. हातात लाल बावटा घेऊन सगळ्यांच्या पुढे रुबाबात चालत होता. एवढंच काय, त्यानं नक्षलवाद्यांशी संधान बांधलंय. तो स्वत: 'नक्षलवादी' होऊ घातलाय, अशीही बोलवा होतीच मध्यंतरी. लोक त्याला बिचकून असत.

– शेवटचा तपशील ऐकताना इन्स्पेक्टर मॅथ्यूच्या चेहऱ्यावर अचानक काळजी पसरलीय, नकळत त्याच्या भुवया उंचावल्या आहेत, हे बेबी कोचम्माच्या लक्षात आलं नाही.

‘तरी मी चाकोला सांगत होते, नीट लक्ष ठेव या माणसावर; पण त्यानं मनावर घेतलं नाही...’ बेबी कोचम्मा उसासा टाकत म्हणाली.

‘– शेवटी सगळं भयंकर घडलं. स्वप्नातसुद्धा कल्पना नव्हती केली; असा प्रसंग ओढवला. एक सुंदर लेकरू, तर गेलंच हातचं; उरलेल्या दोघांचा अद्याप पत्ता नाही.’

बोलताबोलता बेबी कोचम्माचा धीर सुटला. ती टाहो फोडून हमसाहमशी रडत राहिली.

इन्स्पेक्टर मॅथ्यूनं तिला सावरलं. पोलीस स्टेशनचा खाकी वास असलेला कपभर चहा दिला.

बेबी कोचम्मा पुरती शुद्धीत आल्यावर त्यानं तिला आपल्या समोरच्या खुर्चीत बसतं केलं. आणि तिनं सांगितलेले बारीकसारीक तपशील नोंदवत एफ. आय. आर. लिहायला घेतला. सही-शिक्के झाले. कागद फायलीत लावता-लावता इन्स्पेक्टर मॅथ्यूनं कोट्टायम पोलिसांच्या वतीनं संपूर्ण सहकार्याचं आश्वासन बेबी कोचम्माला देऊन टाकलं. लवकरात लवकर त्या नराधमाभोवती कायद्याचे पाश आवळले जातील, याची खातरी दिली. दोन मुलांना घेऊन फरार झालेला वेलुथा कुठंही लपला असला; तरी दिवस मावळायच्या आत पोलीस त्याला जेरबंद करतील, याबद्दल इन्स्पेक्टर मॅथ्यूला पक्का विश्वास होता.

इन्स्पेक्टर मॅथ्यू भलता दूरदर्शी! त्यानं ताबडतोब हालचाली सुरू केल्या. ड्रायव्हरला बोलावलं आणि कॉम्रेड के. एन. एम. पिल्लईंना ताबडतोब पोलीस ठाण्यात हजर करण्याचा हुकूम सोडला. वेलुथाचे राजकीय लागेबांधे तपासून पाहणं गरजेचं होतं. इन्स्पेक्टर मॅथ्यू स्वत: पक्का काँग्रेसवाला पण मार्क्सवादी सरकारशी फुकटचा पंगा घेणं त्याला परवडलं नसतं.

कॉम्रेड पिल्लई घाईघाईनं आले. इन्स्पेक्टरसमोर (बेबी कोचम्माच्याच) खुर्चीत बसले. इन्स्पेक्टर मॅथ्यूनं सरळ फाईल उघडली आणि बेबी कोचम्मानं दाखल केलेला एफ. आय. आर. कॉम्रेड पिल्लईंना वाचायला दिला. मग हलक्या आवाजात दोघांचं बोलणं, गुप्त खलबतं झाली. कमीतकमी सांकेतिक शब्दांत, खाणाखुणांनी पुढचा प्लॅन ठरला. कशाचा अर्थ काय, ते दोघांना चांगलं ठाऊक होतं. उघड विचारविनिमयाची, शंकाकुशंकांची, समर्थनाची काही गरजच नव्हती. म्हटलं, तर त्या दोघांमध्ये छत्तीसचा आकडा; पण इन्स्पेक्टर मॅथ्यू आणि कॉम्रेड के. एन. एम. पिल्लई दोघेही एकमेकांना पुरते ओळखून होते.

दोघांमध्येही निरागसता नावाला नाही. औत्सुक्य तर कधीच संपलेलं. सगळ्या भावभावना गळून दोघेही पक्के ‘प्रौढ’ झालेले. कसले प्रश्न नाहीत... शंका नाहीत... संतापाचं नाव नाही. जग जसं आहे, तसंच ते असतं... आणि तसंच असणार, हे शहाणपण दोघांनीही अगदी कोळून प्यायलेलं. जगाचा कारभार (असा) कसा चालतो; याबद्दल

दोघांना काडीचं आश्चर्य वाटत नसे; कारण ते स्वत:च जग चालवणाऱ्या गटाचे प्रतिनिधी होते. एका भल्या-मोठ्या अजस्र यंत्राचे वेगवेगळे भाग सांभाळणारे दोन तंत्रज्ञ!

आपण वेलुथाला 'ओळखतो' एवढं सांगून कॉम्रेड पिल्लई गप्प बसले; पण 'वेलुथा कम्युनिस्ट पार्टीचा मेंबर होता. तो फरार झाला, त्या रात्री आपल्या घराचं दार त्यानं वाजवलं होतं. याचा अर्थ तो शेवटचा आपल्यालाच भेटला असणारं' हा सगळा तपशील कॉम्रेड पिल्लईंनी हुशारीनं गुलदस्त्यात ठेवला. वेलुथानं अम्मूवर बलात्कार केल्याचा आरोप धादान्त खोटा आहे, हे कॉम्रेड पिल्लईंना ठाऊक होतं; पण त्यांनी इन्स्पेक्टर मॅथ्यूसमोर चकार शब्दानं तोंड उघडलं नाही. 'माझ्या माहितीप्रमाणे वेलुथाला कम्युनिस्ट पक्षाचा अजिबात पाठिंबा नाही... त्यानं जे केलं असेल, त्याला तो एकटा जबाबदार आहे. कम्युनिस्ट पक्षातलं कुणीही त्याला पाठीशी घालणार नाही,' एवढं मात्र कॉम्रेड पिल्लईंनी स्पष्ट सांगून टाकलं.

कॉम्रेड पिल्लई निघून गेल्यावर इन्स्पेक्टर मॅथ्यूनं पुन्हा एकदा सगळं संभाषण आठवून बघितलं. मनातल्या मनात खऱ्या-खोट्याची शहानिशा केली. संदर्भ जुळवले. मध्ये काही 'गॅप' सापडतेय का, ते पाहिलं. अखेरीस समाधान झाल्यावर त्यानं सुस्कारा सोडला. पुढची व्यूहरचना ठरवली आणि हातांखालच्या सहकाऱ्यांना भराभर सूचना दिल्या.

कोट्टायमच्या पोलीस ठाण्यातलं काम आपटून बेबी कोचम्मा आयमेनेमला परतली. घराबाहेर प्लायमाऊथ उभी होती. मार्गरिट कोचम्मा आणि चाको कोचिनहून परतले असणार. तिच्या पोटात धस्स झालं.

पाण्यात फुगलेला सोफी मॉलचा मृतदेह व्हरांड्यात ठेवला होता.

आपल्या लाडक्या लेकीची ती अवस्था बघताच मार्गरिट कोचम्मानं किंकाळी फोडली. रिकाम्या सभागृहात एकाएकी पिशाचानं प्रवेश करावा आणि भयंकर थरकाप उडावा, तसं तिचं शरीर उन्मळून पडलं. दु:खातिरेकानं मार्गरिट कोचम्मा भडभडून ओकली आणि एकाएकी गप्प झाली. तिच्या रिकाम्या, भकास डोळ्यांत काही उमटेचना. एकाच वेळी दोन मरणांचा शोक पिसाटल्यासारखा तिच्यावर कोसळला होता. सोफी मॉल गेली... आणि तिच्याबरोबर 'जो' पुन्हा गेला... मेला... कायमचा हरवला. आता काही उरलंच नव्हतं. 'होमवर्क' पूर्ण करून घ्यायची घाई नव्हती. रोज सकाळचं अंडं खाण्याची धावपळ नव्हती. कुणीच नाही. फक्त रिकामं शून्य. जखमा भराव्यात, शोक विसरला जावा, म्हणून आनंदाचे काही क्षण शोधण्याकरता मार्गरिट कोचम्मा आयमेनेमला आली होती. आणि ध्यानीमनी नसताना तिचं सर्वस्व उधळलं गेलं होतं. क्षणार्धात काच तडकावी, तशी ती उभी कोसळली.

नंतर कित्येक दिवस तिच्या स्मरणसाखळया अस्पष्ट, अंधूक होत जवळपास दिसेनाशाच झाल्या होत्या. तासन्तास ती मिटल्या ओठांनी निश्चल बसून राही. शून्यात लावलेली रिकामी, भकास नजर आणि भयंकर वर्तमानाचा सामना करता- करता ओरबाडून रक्तबंबाळ झालेलं दुखरं मन! डॉ. व्हर्गिस येऊन तिला बघून जात. वेडाचे झटके सोसून-सोसून तिच्या धुमसत्या जीवाला निश्चल पण निर्दय धार चढली होती.

मार्गरिट कोचम्माला फुलासारखी जपण्याचा, सावरण्याचा प्रयत्न करणारा चाको डोळयांत प्राण आणून तिच्या भोवतीभोवती फिरत राही; पण तिला त्याचं अस्तित्व फारसं जाणवतच नसे. मार्गरिट कोचम्माच्या खोलीतून बाहेर पाऊल टाकलं की, चाको जंगली श्वापदासारखा चवताळून उठे. संतापानं थरथरणारं तुफान दारंखिडक्या मोडून आत घुसावं, तसा तो वेड्यासारखा 'आयमेनेम हाऊस'मध्ये धुमसत राही. एखाद्या क्षणी नजरेसमोरचा धूसर पडदा दूर झाला, की समोर दिसणारा चाको मार्गरिट कोचम्माला ओळखताच येत नसे. फार वर्षांपूर्वी भल्या सकाळी ऑक्सफर्डच्या कॉफी हाऊसमध्ये भेटलेलं बेंगरूळ साळिंदर कुठं, आणि संतापाचे फुत्कार टाकत घरभर फिरणारा हा पुरुष कुठं! संगती लावता-लावता थकून गेलेल्या मार्गरिट कोचम्माच्या नजरेसमोर पुन्हा अनोळखी अंधार पसरला, की सारंच त्यात विरघळून जाई.

पिवळ्या चर्चमधला अंत्यसंस्काराचा विधी मात्र तिला पुसटसा आठवत होता. मरणगंध असलेलं चर्चमधलं करुण संगीत. कुणाच्यातरी अंगावर चढलेली एक पाकोळी. धडाधड दारं लावल्याचा भीषण आवाज आणि घाबरलेल्या बायकांची कुजबुजही ताजी होती तिच्या स्मरणात. ऐन मध्यरात्री सगळे जिने करकरत मोडून पडावेत, तशा कर्कश आवाजातली रातकिड्यांची किरकिर... 'आयमेनेम हाऊस'मधला भीषण सन्नाटा आणि चढत जाणाऱ्या रात्रीबरोबर गडद होत जाणारी अशुभाची सावली!

दोन छोट्या मुलांवर आपण किती क्रूरपणानं तुटून पडलो होतो, हे मात्र मार्गरिट कोचम्मा कधी विसरली नाही. सोफी मॉलच्या मृत्यूला इस्थाच जबाबदार आहे, असा ग्रह करून घेत ती इस्थाच्या अंगावर धावून गेली. हे तिला कसं कळलं कुणास ठाऊक; कारण प्रत्यक्षात घडलेल्या अनेक गोष्टी कधीच तिच्यापर्यंत पोचल्या नाहीत.

खरंतर, उकळता जॅम ढवळता-ढवळता इस्थाच्याच मनात दोन विचार चमकून गेले होते. त्यानंच सगळी बंधनं झुगारली, नियम मोडले, वेलुथाला दिलेलं वचन खुंटीवर टांगलं आणि राहेलबरोबर सोफी मॉललाही होडीत बसवून संध्याकाळी होडी नदीत लोटायला सुरुवात केली. इस्थानंच आपल्या होडीवर मार्क्सवाद्यांचा लाल बावटा फडकावला आणि नदीपल्याडच्या हिस्टरी हाऊसमध्ये जा-ये सुरू केली. हिस्टरी हाऊसच्या मागच्या व्हरांड्यात तर त्यानं आपल्यासाठी नवं घर उभारण्याचा चंगच बांधला होता. इस्थानं त्या व्हरांड्यात गवत पसरवून दिलं आणि एकेक करून आपली

सगळी खेळणी 'नव्या घरात' आणून टाकली. मोठी गलोल, हवा भरून फुगवलेलं बदक, सैल झालेल्या बटणांचे डोळे लावलेला क्वान्टा कोओला.

...पावसानं थैमान मांडलेल्या रात्री अखेर हद्द झाली. बंद दाराआड कोंडून घातलेल्या अम्मूनं पार झिडकारून टाकल्यावर इस्थानं ठरवलं, आता या घरात क्षणभरसुद्धा थांबायचं नाही. घराबाहेर पडण्याची वेळ ती हीच!

...यातलं काहीच ठाऊक नसताना मार्गरिट कोचम्मानं सोफी मॉलच्या मृत्यूचं खापर नेमकं इस्थाच्या डोक्यावर फोडलं. कदाचित तिच्यामधल्या 'आई'ला सत्याची चाहूल लागली असावी.

औषधांच्या अमलाखाली झोपेच्या अंधारात डुबक्या मारून-मारून शीण आल्यावर अखेरीस ती टक्क जागी झाली. सगळं बळ एकवटून तिनं इस्थाला खसकन ओढलं आणि फाट्फाट् त्याच्या मुस्काटात लगावून द्यायला सुरुवात केली. काय होतंय ते कळून इतरांनी मोठ्या मुश्कीलीनं तिला शांत करण्यापूर्वी इस्था काळानिळा झाला होता.

...नंतर खूप दिवसांनी मार्गरिट कोचम्मानं अम्मूला पत्र लिहून तिची माफी मागितली. तोवर इस्था आपल्या बाबाकडे परतला होता आणि अम्मूही आपला बाडबिस्तरा आवरून घर सोडून निघून गेली होती. आयमेनेममध्ये उरली होती एकटी राहेल. मार्गरिट कोचम्माचं माफी-पत्र तिच्याच हातात पडलं.

'मी अशी कशी वागले, कुणास ठाऊक? कदाचित झोपेच्या औषधांचा अंमल असावा. त्या भरात मी जे केलं; त्याचा मला कसलाही हक्क नव्हता. त्या विचित्र, निर्दय वर्तनाची आता मला लाज वाटतेय. कृपया, मला माफ करा.'

आश्चर्य म्हणजे, वेलुथाबद्दल मार्गरिट कोचम्माला काही म्हणता काही आठवत नव्हतं. तिनं कधी त्याचा विचारच केला नाही. तो कसा दिसतो, हेसुद्धा तिच्या स्मरणात नव्हतं.

खरं म्हणजे, वेलुथाशी तिची कधी नीट ओळखच झाली नाही. तो काय करतो, कुठं राहतो, त्याच्यावर कसला प्रसंग ओढवला – यातलं काहीच तिला ठाऊक नव्हतं.

वेलुथा.

अखेरीस सगळं हरवून, गमावून बसलेला.

द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज!

त्याच्या पावलाच्या खुणा वाळूमध्ये उमटल्या नाहीत... पाण्यावर चुकार तरंग उठले नाहीत... अगदी आरशातसुद्धा त्याच्या प्रतिमेची खूण उरली नाही.

कोसळत्या पावसाचं तुफान पोटात घेऊन रोरावत वाहणारी नदी पार करून इभ्रतदार पोलिसांची तुकडी पल्याडच्या काठाला गेली, तेव्हा मार्गरिट कोचम्मा कुठली असणार त्यांच्याबरोबर?

कांजी घालून कडक केलेल्या खाकी पॅन्ट... कुणाच्यातरी टम्म खिशातलं पोलादी कडं!

नक्की काय घडलं, हे ज्याला माहितीच नाही, त्यानं ते त्याच्या बाबतीत घडलं, त्याची आठवण ठेवलीच पाहिजे, अशी सक्ती कशी करता येईल?

एका निळ्या संध्याकाळी विमानाच्या प्रवासाचा 'जेट लॅग' घालवण्याकरता स्वस्थ झोपलेली मार्गरिट कोचम्मा! – तिचं विश्व उद्ध्वस्त व्हायला अजून तब्बल दोन आठवड्यांचा अवकाश होता. कॉम्रेड के. एन. एम. पिल्लईंना भेटायला निघालेला चाको जाता-जाता बेडरूमच्या खिडकीशी थबकला. दूरदेशाहून आलेल्या आपल्या बायको ('एक्स वाईफ, चाकोऽ') – मुलीला हवं–नको बघणं त्याचं कर्तव्यच होतं. आत डोकावून पाहाण्याची फार इच्छा होती; पण शेवटच्या क्षणी त्याचं अवसान गळालं आणि तो आला, तसा घाईघाईनं पुढे सरकला. सोफी मॉल जागीच होती. तिनं चाकोला जाताना पाहिलं.

सोफी मॉल पलंगावर उठून बसली आणि खिडकीतून दिसणाऱ्या रबराच्या झाडांकडे एकटक पाहत राहिली. सूर्य मावळतीला उतरला होता. रबराच्या बागेवर घराची मोठ्ठी सावली पसरत चालली होती.

त्या सावलीनं काळवंडत जाणाऱ्या पानांच्या मागं झाडांच्या अंगावर सोललेल्या सालीचे ठिपके दिसत होते. सोलवटलेल्या जखमेतून पांढरं रक्त गळावं; तसा तासलेल्या दुखावल्या खोडातून रबर गळत होता. खाली बांधलेल्या नारळाच्या करवंट्या कच्च्या रबराच्या द्रावानं भरत आल्या होत्या.

सोफी मॉल पलंगावरून खाली उतरली आणि गाढ झोपलेल्या आईची पर्स धुंडाळायला लागली. तिला हवं होतं, ते पटकन मिळालं – एअरलाईन कंपनीनं सतराशे साठ स्टिकर्स चिकटवलेल्या आणि निरनिराळी लेबलं गळयात अडकवलेल्या मोठ्या बॅगेच्या किल्ल्या! जमिनीवर ठेवलेली बॅग सोफी मॉलनं फटकन उघडलाr. आतल्या वस्तू उसकून पाहाताना तिचे उत्सुक डोळे लकाकून उठत होते. चड्ड्या आणि ब्रेसियरची नीट लावलेली चळत तिनं विस्कटून टाकली. इस्त्री केलेले स्कर्टस्, ब्लाऊज, शॅम्पूच्या आणि क्रीमच्या बाटल्या, चॉकलेटचे डबे, सेलोटेपची गुंडाळी, छत्र्या, साबण, क्विनाईन आणि अॅस्पिरीनच्या गोळयांची पाकिटं शिवाय अॅन्टीबायोटिक्स!

'सगळं नीट घे... कोण जाणे, कधी कशाची गरज लागेल!' मार्गरिट कोचम्माच्या मैत्रिणीनं तिला शहाणासुरता सल्ला दिला होता. हे म्हणजे प्रवासाला निघणाऱ्या मैत्रिणीला तोच निरोप वेगळ्या शब्दांत सांगितल्यासारखं –

(अ) कोणाच्याही बाबतीत काहीही घडू शकतं.

तेव्हा

(ब) आपण आपलं तयारीत राहिलेलं बरं.

– खूप उचकपाचक केल्यावर शेवटी सोफी मॉलला हवं होतं, ते एकदाचं सापडलं.

– भावंडांसाठी तिनं आणलेली प्रेझेन्ट्स!

टॉब्लरोन चॉकलेटचे उंच त्रिकोणी तुकडे, पावलांजवळ रंगीबेरंगी असलेले पायमोजे आणि दोन बॉलपेनं. त्या पारदर्शी पेनांच्या वरच्या भागात भरलेलं पाणी हलवलं की, त्यात लंडनची मजा! बकिंगहॅम पॅलेस... बिगबेन... माणसांनी फुललेले रस्ते... कडेची मोठमोठी दुकानं. लाल रंगाची एक डबलडेकर बससुद्धा हवेच्या बुडबुड्याबरोबर मागं-पुढं धावताना दिसत होती. गर्दीनं गजबजलेल्या बॉलपेनमधल्या त्या रस्त्यावरचा शुकशुकाट मात्र भलताच विचित्र, अमंगल!

सोफी मॉलनं सगळी प्रेझेंट्स आपल्या गो-गो बॅगमध्ये भरली आणि बॅग काखोटीला मारून ती तडक बाहेर पडली. त्या प्रेझेंन्ट्सच्या बदल्यात तिला नवे मित्र मिळवायचे होते.

दुर्दैवानं ही मैत्री अधांतरी लटकत राहणार... अधुरी, अर्धवट. त्या मैत्रीच्या गोष्टीला पूर्णत्वाचं भाग्य नव्हतं; म्हणून सुरुवात फार पटकन झाली.

...शेवटी सोफी मॉल उरली फक्त आठवणीत.

तिला गमवण्याचं दु:ख मात्र अश्वत्थाम्याच्या जखमेसारखं कपाळावर कोरलं गेलं.

...जन्मभर वेदनेनं भळभळत राहण्यासाठी!

प्रकरण १४
काम हाच संघर्ष

रबराच्या बागेतल्या वळणदार पायवाटांवरून झपाझप पावलं टाकत जवळच्या रस्त्यानं चाको निघाला होता. कॉम्रेड के. एन. एम. पिल्लईंचं घर लवकरात लवकर गाठायचं म्हणजे घाई करायलाच हवी होती. एअरपोर्टवरचा कडक इस्त्रीचा सूट घालून चाको पायांखालची सुकली पातेरी तुडवीत झपाझप चालत होता. गळयाशी सैल केलेल्या गाठीचा टाय उडत-उडत पार अगदी खांद्यावर पोचलेला.

कॉम्रेड पिल्लई घरात नव्हते. कपाळावर चंदन-गंधाचा ठिपका लावलेली त्यांची पत्नी – कल्याणी बाहेर आली. बाहेरच्या खोलीतली एक पत्र्याची खुर्ची चाकोपुढे सरकवून तिनं त्याचं स्वागत केलं. चाकोला बसायला सांगून दारावरचा गुलाबी नायलॉन पडदा बाजूला करत ती आली, तशी घरात दिसेनाशी झाली. आतल्या खोलीत अंधार असावा. पितळी दिव्यावरची भगभगती ज्वाला तेवढी पडद्यातून दिसत राहिली. दरवाजाच्या चौकटीवर खोचलेल्या उदबत्त्यांचा गोडूस वास सगळीकडे गुदमरल्यासारखा पाझरत होता. तिथंच खिळयाला अडकवलेल्या एका लाकडी पाटीवर लिहिलं होतं.

श्रम म्हणजेच संघर्ष. संघर्ष म्हणजेच श्रम.

त्या छोट्याशा खोलीत चाको कसाबसा अंग चोरून बसला. चारही भिंतींनी त्याला जणू कोंडून घातलं होतं. त्याची अस्वस्थ चुळबुळ सुरू झाली. उगीचच इकडे-तिकडे बघत वेळ घालवण्याखेरीज दुसरा इलाज नव्हता. समोरच्या हिरव्या खिडकीत एक टॉवेल वाळत पडलेला. जेवणाच्या टेबलावर फुलाफुलांचा प्लॅस्टिकचा टेबलक्लॉथ अंथरलेला... टेबलावर निळसर कडांच्या काचेच्या बशीत ठेवलेली अपिकलेली केळी आणि त्या ढिगाभोवती घोंघावणारा चिलटांचा थवा! खोलीच्या एका कोपऱ्यात हिरव्याजर्द असोल्या नारळांची रास पडली होती. खिडकीतून आत येत जमिनीवर पडलेल्या उन्हाच्या कवडशाभोवती छोट्या मुलाच्या रबरी स्लीपर्स टाचा जुळवून ऊन खात होत्या. टेबलाशेजारी एक उंच काचेचं कपाट. आत ठेवलेल्या वस्तू दिसू नयेत, म्हणून काचेच्या दारांना आतून फुलाफुलांचे पडदे लावले होते.

भिंतीला खेटून ठेवलेल्या एका उंच लाकडी पलंगावर तपकिरी ब्लाऊज घातलेली, कमरेभोवती धुवट मुंडू गुंडाळलेली कॉम्रेड पिल्लईंची म्हातारी आई बसली होती. बिचारीचे पाय जमिनीपर्यंत पुरत नव्हते. खांद्यावरून लोंबत्या छातीवर पांढरा टॉवेल पांघरून काटकुळे पाय अधांतरी हलवीत आजीबाई बसल्या होत्या... भुरकुल झालेल्या डोक्यावर घोंघावणारी डासांची हीऽऽऽ झुंड! चेहऱ्यावरच्या सगळया सुरकुत्या एकत्र जमवून उजव्या तळव्यावर मान रोवून बसलेल्या आजींना फारसं दिसत नसावं.

मनगटापासून गुडघ्यांपर्यंत प्रत्येक अवयवावर सुरकुत्यांची जाळी. गळयाखालची कातडी तेवढी ताठ ताणलेली. त्यातून गळयातली गाठ हलताना स्पष्ट दिसत होती. नजर समोरच्या भिंतीवर खिळलेली आणि कफानं कोंदलेल्या छातीतून अखंड घुरघुराट. त्या गुरगुरण्याच्या तालावर म्हातारं शरीर मागं-पुढं झुलत होतं. लांबच्या प्रवासात एस. टी.त बसून-बसून वैतागलेल्या प्रवाशाची कळा चेहऱ्यावर!

आजीबाईंच्या डोक्यामागच्या भिंतीचा चौकोन तऱ्हेतऱ्हेच्या फोटोफ्रेम्सनी गजबजलेला. त्यांत कॉम्रेड पिल्लईंची एस.एस.सी, बी.ए. आणि एम.ए.ची सर्टिफिकिटं. कॉम्रेड पिल्लई ई. एम. एस. नंबुद्रीपादांना हार घालतायत, असा एक फोटो दुसऱ्या भिंतीवर टांगलेला. त्या फोटोत एक मायक्रोफोनचं बोंडकं. त्यावर 'अजंठा' असं लिहिलेलं.

पलंगाशेजारच्या टेबलावर ठेवलेला छोटा, फिरता पंखा लोकशाहीतल्या समतेच्या तत्त्वाला अनुसरून सर्वत्र सारखी हवा पसरवत होता. एकदा पिल्लई आजीबाईंच्या केसांचं भुरकुल उधळायचं, आणि एकदा चाकोचं! वाऱ्याचा झोत आला रे आला, की उडून जाणारे डास पंख्याची पाठ फिरताच पुढच्या क्षणी पुन्हा येऊन बसत होते. इमानेइतबारे रक्त पिणं चाललं होतं.

चाकोच्या समोरची खिडकी उघडीच होती. रस्त्यावरून जाणाऱ्या मोटारींचे टप, त्यावर ठेवलेलं सामान सगळं चाकोला दिसत होतं. तेवढ्यात बेकारीच्या नावानं ठणाणा करत किंचाळणारी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची एक जीप धडधडत गेली. जीपमध्ये लावलेल्या कर्ण्यावर इंग्लिश कोरस असलेलं मल्याळम गाणं कोकलत होतं.

नो व्हेकन्सी, नो व्हेकन्सी
कुठंही जा, काहीही करा
नो नो नो नो नो व्हेकन्सी

तेवढ्यात कल्याणी बाहेर आली. एका हातात वाफाळत्या फिल्टर कॉफीचा स्टेनलेस् स्टीलचा ग्लास आणि दुसऱ्या हातात मध्यभागी काळे ठिपके असलेल्या पिवळयाधम्म केळयांच्या वेफर्सनी भरलेली स्टेनलेस स्टीलची बशी.

'ते ओलासाला गेलेत. येतीलच आता' – चाकोला कॉफी आणि वेफर्स देता देता कल्याणी म्हणाली. तिनं कॉम्रेड पिल्लईंचा उल्लेख 'अठ्ठेम' असा आदरार्थी केला होता. अठ्ठेम म्हणजे 'ते'. कॉम्रेड पिल्लई तिला 'एडी' म्हणायचे. एडी म्हणजे 'काय, गं'... असं एकेरी संबोधन.

चमकती सतेज कांती आणि टपोऱ्या डोळयांची कल्याणी फारच सुंदर दिसत होती. नुकतीच न्हायली असावी. लांबसडक ओले केस तळाशी चार पेड वळून पाठीवर सैलसर मोकळे सोडले होते. तिच्या पुष्ट अंगात घट्ट रूतलेला लाल ब्लाऊज मागून चिप्प ओला झाला होता. अधिकच लाल दिसत होता. दंडावर रुतलेल्या ब्लाऊजच्या बाह्यांमधून

निसटलेलं पुष्ट मांस खड्डे पडलेल्या कोपरांभोवती एकवटलं होतं. पांढरं स्वच्छ मुंडू आणि खळ घालून कडक इस्त्री केलेली कावणी. कल्याणीच्या सुंदर देहाभोवती चंदनाचा आणि अंघोळ करताना अंगाला लावलेल्या हिरव्या चण्याच्या पिठाचा गंध घमघमत होता. कित्येक वर्षांनंतर पहिल्यांदाच चाकोनं अतिशय स्वच्छ, सभ्य नजरेनं कल्याणीकडं पाहिलं. एरवी ती दिसली, म्हणजे टरारून उठणारे त्याच्या शरीरातले फुगवटे आज शांत, स्वस्थ होते. आता त्याची बायको ('एक्स-वाईफ चाकोऽऽ) घरी आली होती. हातापायांवर, पाठीवर हलक्या रंगाचं वांग असणारी... सुंदर निळा स्कर्ट आणि स्कर्टच्या खाली निमुळते, डौलदार पाय असणारी!

– तेवढ्यात लाल चड्डी घातलेला लहानगा लेनिन दरवाजात येऊन उभा राहिला. एका पायावर जोर देत, एका हातानं गुलाबी पडद्याच्या लेसची गुंडाळी करत, आईच्या नजरेनं चाकोकडे टक लावून बघणारा घुमा लेनिन करकोच्यासारखा दिसत होता. सहा वर्षं पुरी झालेली. दिसेल ती वस्तू नाकात कोंबण्याचं वय पुष्कळच मागं पडलेलं.

'मॉनऽऽ इथं काय उभा राहिलास? जा, जाऊन लताला बोलावून आण'– कल्याणीनं त्याला घराबाहेर पिटाळायचा प्रयत्न केला.

- पण चाकोकडे लावलेली नजर न हटवता लेनिन हट्टानं तिथंच उभा राहिला आणि बेंबीच्या देठापासून किंचाळला,

'लताऽऽ लताऽऽऽ घरात येऽऽ अम्मा बोलवतेयऽऽ'

'लता म्हणजे आमची पुतणी. यांच्या मोठ्या भावाची मुलगी. कोट्टायमला असते,' – कल्याणीनं घरातल्या पाहुणीची ओळख करून देत चाकोला कौतुकानं सांगितलं, 'गेल्या आठवड्यात त्रिवेंद्रमला वक्तृत्व-स्पर्धा झाल्या ना, त्यात पहिलं बक्षीस पटकावलंन. हुशार आहे फार.'

बारा-तेरा वर्षांची, पण काहीशी आक्रमक भांडखोर दिसणारी एक मुलगी गुलाबी पडदा सारून बाहेरच्या खोलीत आली. पार अगदी घोट्यापर्यंत पोचून पावलांत अडखळणारा लांबलचक स्कर्ट आणि भविष्यात छातीवर येणाऱ्या उंचवट्यांसाठी आधीपासूनच दोन पोकळ जागा करून ठेवलेला ब्लाऊज तिनं घातला होता. तेलानं चपचपलेल्या केसांच्या दोन घट्टमुट्ट वेण्या. टोकाशी लाल रिबीन बांधून वर टांगलेल्या.

'तू ओळखतेस यांना?' कल्याणीनं चाकोकडं पाहात लताला विचारलं.

लतानं या खांद्यापासून त्या खांद्यापर्यंत मान हलवली.

'चाको सर. आपल्या फॅक्टरीचे मालक.'

बारा-तेरा वर्षांच्या मुलीला अजिबातच न शोभणाऱ्या शिष्ट कोरडेपणानं लतानं चाकोकडे नजर टाकली.

'लंडनला जाऊन ऑक्सफर्डमध्ये शिकून आलेत,' कल्याणीनं चाकोचं कौतुक करत

लताला सुचवलं, 'तुझं भाषण म्हणून दाखव ना त्यांना!'

– कसलेही आढेवेढे न घेता लता तयार झाली. दोन्ही पाय नीट जुळवले, ताठ हातांच्या मुठी वळल्या.

'अध्यक्ष महाराजऽऽ' - चाकोकडे वळून लता कमरेत झुकली.

'प्रिय परीक्षक, गुरुजन, आणि...'

- तिनं सवयीनं सभोवार नजर टाकली. त्या लहानशा कोंदट खोलीत हजारोंच्या संख्येत श्रोते जमले असावेत, अशा थाटात म्हणाली,

'माझ्या विद्यार्थिमित्रांनो...'

– पुढचा क्षण तिनं तसाच जाऊ दिला आणि हुकमी नाटकीपणानं म्हणाली,

'आज मी तुम्हाला सर वॉल्टर स्कॉट यांची 'लॉन्चिन्व्हर' ही कविता म्हणून दाखवणार आहे,'

– तिचे दोन्ही हात पाठीमागे गुंफले गेले. नजरेसमोर कसलासा पडदा यावा; तसे तिचे डोळे चाकोच्या डोक्याच्या वर स्थिर झाले. बोलता-बोलता शरीराला हेलकावे देत, वाक्यांतले चढउतार साधत श्रोत्यांवर कब्जा मिळवण्याचं घोटून पाठ केलेलं तंत्र ती नकळत वापरायला लागली. चाकोला आधी वाटलं, सर वॉल्टर स्कॉट यांच्या प्रसिद्ध कवितेचा मल्याळी भाषेतला अनुवाद ती म्हणून दाखवणार असेल; पण बघता-बघता शब्द भसाभस धावू लागले.. आधीच्या शब्दातलं शेवटचं अक्षर पुढच्या शब्दाच्या सुरुवातीला जोडून घेत लता सुसाट सुटलीच.

ओ यंग लोचिन वराज् स्कम आऊट ऑफ इ व्हेस्ट
थ्रू वॉल द् वाईड बॉर्डर हिज टीड वज् द् बेस;
टॅण्ड सॅवीसगुड ब्रॉडसॉड हिवेपन सॅडनन्
नदी रोड ऑल अनआर्मड्, अॅण्ड ही रोड ऑल ललोन

कवितेच्या अधेमध्ये पलंगावर बसलेल्या आजीबाईंचा गुरगुराट मिसळत होता; पण एकटा चाको सोडून कुणाचंच तिकडे लक्ष नव्हतं.

ही स्वॅम दी एस्क रिव्हर व्हेअर फॉर्ड देअर वॉज नन्
बटेअर ही अलाइटीड अॅट निदरबाय गेट
द् ब्राईडहॅड कनसेन्डिड, द गॅलन्ट केम लेक

कविता जेमतेम अर्ध्यावर आली असतानाच दमले-भागलेले कॉम्रेड पिल्लई घरी पोचले. कमरेचं मुंडू गुडघ्यापर्यंत वर ओढून बांधलेल्या कॉम्रेड पिल्लईंना धाप लागली होती. कपाळाच्या दोन्ही बाजूंनी घामाच्या धारा... टेरिलीनच्या शर्टाच्या दोन्ही काखांमध्ये घामाचे डाग. तिशी उलटून गेलेलं फिक्कट पिवळं, अशक्त, किडकिडीत शरीर; पण एकूणच काटकुळेपणाला अजिबातच न शोभणारी पोटाची गरगरीत ढेरी मात्र टम्म फुगलेली. तिकडे म्हातार्‍या आईच्या सुरकुतल्या कातडीतून डोकावणारी गळयावरची

फुगीर गाठ आणि इकडे यांच्या बारकुळया शरीरावर उगवलेलं पोटाचं टेंगूळ! पिल्लईंच्या खानदानालाच काहीतरी विचित्र शाप असावा, असं चाकोला वाटून गेलं.

कॉम्रेड पिल्लईंच्या वरच्या ओठाच्या डोक्यावर मधोमध मिशीची बारीक रेघ होती... जिवणीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत. डोक्यावरचे केस विरळ होत चाललेले. कपाळावरची काळी रेघ मागचा प्रदेश ओसाड करत पुढे-पुढे सरकत निघाली होती. तेल लावून चप्प भिजवलेले उरलेसुरले केस कॉम्रेड पिल्लईंनी मागे वळवले होते. तिशीतल्या तारुण्याची पुसटशीही निशाणी दिसत नव्हती. त्यात घरातल्या कर्त्या पुरुषाची जबाबदारी सहजपणे चालत आलेली.

घरात पाऊल टाकल्या-टाकल्या चाकोला बघून कॉम्रेड पिल्लई हसले आणि कमरेत झुकून त्यांनी पाहुण्याचं रीतसर स्वागतही केलं. आसपास आपली बायको आहे, म्हातारी आई आहे; याची जाणीवच नसल्यासारखे दोघींकडेही न बघता ते त्रयस्थपणे घरात शिरले.

आपली कविता पूर्ण म्हणायला परवानगी मिळेल, या अपेक्षेनं लता त्यांच्याकडे पाहत राहिली. नजरेनंच 'होकार' आला. लताची कविता पुढे धावत असतानाच कॉम्रेड पिल्लईंनी ओला झालेला घामट शर्ट अंगातून ओढून काढला आणि त्याच शर्टाचा बोळा करून दोन्ही काखा खसाखसा पुसल्या. त्यांचं काम झाल्यावर यांत्रिक सवयीनं कल्याणी पुढे झाली. तिनं नवऱ्याच्या हातातून शर्टाचा बोळा घेतला आणि एखादी मौल्यवान भेट असावी किंवा सुगंधी फुलांचा गुच्छ असावा, अशा श्रद्धेनं छातीशी कुरवाळला.

बिनबाह्यांचा गंजिफ्रॉक घातलेल्या कॉम्रेड पिल्लईंनी आणखी एक पत्र्याची खुर्ची पुढे ओढली आणि उजव्या मांडीवर डावा पाय चढवून ते चाकोच्या समोर बसले. पुतणीचं पारितोषिकप्राप्त वक्तृत्व संपेपर्यंत उजव्या तळव्यात मान रोवून कवितेच्या चढउतारांप्रमाणे पाय हलवत जमिनीकडे नजर लावून कॉम्रेड पिल्लई स्वस्थ बसून राहिले. रिकाम्या असलेल्या हातानं पार भेगा पडलेल्या डाव्या घोट्याला मसाज चालू होता.

लताची कविता संपल्यावर चाकोनं टाळया वाजवून मनापासून तिचं कौतुक केलं; पण पठ्ठी साधं हसलीसुद्धा नाही. पूर्व जर्मनीतल्या जलतरणपटूनं गल्लीबोळांतल्या फालतू स्पर्धेत उतरावं आणि आपलं कौतुक करणाऱ्यांची कीव करावी, तसा तिचा ताठा होता. ऑलिम्पिकमधल्या सुवर्णपदकावर लक्ष असल्यावर असल्या किरकोळ कोडकौतुकाची कसली आलीय मिजास? लतानं रुबाबात आपल्या काकांकडे पाहिलं. 'जाऊ का आता?' – असा प्रश्न त्या नजरेत होता.

पण तेवढ्यात कॉम्रेड पिल्लईंनी खूण करून लताला जवळ बोलावलं. तिच्या कानात कुजबुजल्यासारखं करीत ते म्हणाले,

‘हे बघ, पोथाचेन आणि मथ्थुकुट्टीकडे जा. त्यांना म्हणावं, तुम्हांला भेटायचं असलं, तर ताबडतोब बोलावलंय.’

चाकोला वाटलं, लताला सांगून कॉम्रेड पिल्लई घरातून आणखी फराळाचे पदार्थ मागवतायत. तो एकदम म्हणाला,

‘प्लीज नको, कॉम्रेड! आधीच उशीर झालाय. आणखी काही सांगू नका आणायला.’

– झालेला गोड गैरसमज तसाच ठेवत कॉम्रेड पिल्लई धूर्तपणानं हसत- हसत म्हणाले,

‘असं कसं? असं कसं? इतक्या दिवसांनी आला आहात... खाणंपिणं तर झालंच पाहिजे. एडी कल्याणी, एका बशीतून ते उण्डे घेऊन ये बरंऽऽ’

राजकारणात आपलं बस्तान बसवायला उतावीळ झालेल्या कॉम्रेड पिल्लईंनी पूर्वतयारीच्या दृष्टीनं जोरदार पावलं टाकायला सुरुवात केली होती. आपल्या मतदारसंघातल्या लोकांमध्ये पत निर्माण करायची, तर मिळेल ती संधी साधून आपलं ‘मोठेपण’ त्यांच्यासमोर सिद्ध करणं, त्यांना फारच गरजेचं वाटत होतं. चाको स्वत:हून भेटायला आल्याची संधी साधून गावातले पाठीराखे आणि पक्षकार्यकर्त्यांसमोर भाव मारून घ्यावा, असं कॉम्रेड पिल्लईंनी ठरवलं आणि पोथाचेन, मथ्थुकुट्टीला बोलावणं धाडलं. या दोघांनी काही दिवसांपूर्वी अत्यंत दीनवाणेपणानं कॉम्रेड पिल्लईंना साकडं घातलं होतं. कोट्टायमच्या हॉस्पिटलमध्ये आपल्या मुलींना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी कॉम्रेडे पिल्लईंनी शब्द टाकावा, अशी त्यांची विनंती होती. घरात चाको आलेला असतानाच हे दोघेही आले; तर त्यांना कॉम्रेडची पहिली मीटिंग संपेपर्यंत बाहेर वाट पाहावी लागेल. आपल्याला भेटण्याकरता दाराबाहेर लोकांची रांग लागलीय, हे कॉम्रेड पिल्लईंचं स्वप्न कधीचं अपूर्ण होतं. प्रत्यक्षात तसं घडवता आलं, तर आपण किती ‘कार्यमग्न’ आहोत, याचा उत्तम देखावा तयार होईलच; शिवाय बड्या भांडवलदारांचे प्रतिनिधी असलेल्या चाको आयपेंनी स्वत: कॉम्रेड पिल्लईंच्या घरी येऊन त्यांच्याशी चर्चा केली, ही बातमीही गावात पसरेल... एका दगडात दोन पक्षी मारण्याची ही सुवर्णसंधी साधावी, म्हणून कॉम्रेड पिल्लईंचा आटापिटा चालला होता.

तेवढ्यात आणखी एका स्टेनलेस स्टीलच्या बशीतून उन्डे आले. निरोप सांगायला लताही गेली होती. सगळं मनासारखं होतंय याचा अंदाज घेतल्यावर पिल्लईंनी सुरुवात केली.

‘सो कॉम्रेड! व्हॉट इज द न्युज? हाऊ इज युवर डॉटर अॅडजस्टिंग?’

– कॉम्रेड पिल्लई मुद्दाम इंग्लिशमध्येच बोलत होते.

‘ओहऽऽ फाईन! शी इज फास्ट अस्लीप नाऊ.’

‘ओहो! जेट लॅग... आय् सपोझ!’

– आंतरराष्ट्रीय प्रवासातली निदान एकतरी गोष्ट आपल्याला ठाऊक आहे. आणि ती

आपल्याला वेळेवर आठवली, म्हणून कॉम्रेड पिल्लई स्वत:वरच खूश झाले.

'तुम्ही ओलासाला गेला होतात म्हणे. तिकडे काय काम काढलंत? पक्षाची बैठक वगैरे...?' चाकोनं खडा टाकला.

'छे हो, मीटिंग कसली? माझी बहीण आहे ना, सुधा? तिचा पाय मोडला काही दिवसांपूर्वी. तिला घेऊन गेलो होतो औषधपाण्यासाठी. थोडी तेलं, मलमं वगैरे आणली तिकडून. तिचा नवरा असतो पाटण्याला. इथे सासू-सासर्‍यांकडे एकटीच असते ती. म्हणून जरा लक्ष द्यावं लागतं, एवढंच!'

तोवर लेनिननं दरवाजातली आपली समाधी मोडली आणि तो धावत येऊन वडिलांच्या दोन्ही पायांमध्ये उभा राहिला.

'मग? तू नाही का म्हणणार एखादी कविता?' – चाकोनं अगदी सहज लेनिनशी बोलण्याचा प्रयत्न केला, 'बाबांनी शिकवलीय की नाही?'

लेनिन एकटक चाकोकडे बघत होता. आपल्याला विचारलेले प्रश्न ऐकूच येत नसावेत; असा त्याचा चेहरा... कोरडाठाक.

'त्याला सगळं येतं, बरं का!' कॉम्रेड पिल्लईंनी चिरंजीवांची पडती बाजू उचलून धरली, 'फक्त बाहेरचं कुणी आलं ना, की तो बोलत नाही फारसा. एरवी अतिशय हुशार आहे... जीनियस!'

तरीही आपल्या मुलानं असं मुखस्तंभासारखं बसून राहावं, हे काही कॉम्रेड पिल्लईंना आवडलं नाही. मांडीत बसून गुडघ्यांशी खेळणार्‍या लेनिनला ते म्हणाले,

'लेनिन मॉन, कॉम्रेड अंकलना म्हणून दाखव बरं तुझ्या पपांनी शिकवलेली कविता... फ्रेन्ड्स रोमन्स कन्ट्रीमेन... आठवते?'

लेनिननं आठवायला सुरुवात केली. नाकातल्या नाकात तो कविता म्हणायचा प्रयत्न करायला लागला.

'कमॉन, लेनिन... इट्स ओन्ली अवर कॉम्रेड अंकल!'

शेक्सपिअरला जरा धक्का मारूनच चालू करण्याची गरज होती.

'फ्रेन्डस, रोमन्स, कन्ट्रीमेन, लेन्ड मी युवर... '

लेनिन तसाच रिकाम्या नजरेनं चाकोकडे पाहत उभा होता. कॉम्रेड पिल्लईंनी पुन्हा नव्यानं चावी दिली.

'... लेन्ड मी युवर? '

– लेनिननं पटकन समोरच्या बशीतून मूठभर वेफर्स उचलले आणि बाहेरच्या दरवाजातून तो धूम पळाला.

अंगणातल्या पायर्‍यांवर वर-खाली चढता-उतरताना तो धावत-धावत कविता आठवत होता. उगीचच मोठमोठ्यानं आरडाओरडा चालला होता. शेवटी त्याला थोडंसं

काहीतरी आठवलं. तत्क्षणी मोठी आरोळी ठोकून लेनिननं उंच उडी मारली. श्वास कोंडल्यामुळं त्याच्या तोंडून धड शब्दसुद्धा फुटत नव्हते. तरी तो ओरडला,

'लेन्ड मी यॉऽऽ इयर्स'

रस्त्यावरून एक बस जात होती. त्या खडखडाटावर आवाज चढवत लेनिनची कविता सुरू झाली.

आय कम टू बेरी सीझर, नॉट टू प्रेज हिम
दहन्व्हील दॅट मेन डू लीव्हज् आफ्टर देम
द गुडीसॉफ्ट इनटरड् विथ् देअर बोन्स्

कुठंही न अडखळता, न चाचरता लेनिननं एका दमात कविता म्हणून टाकली. गंमत म्हणजे, सहा वर्षांच्या लेनिनला त्या कवितेतलं अक्षरसुद्धा कळत नव्हतं. बाहेर अंगणात कविता म्हणणारा, धुळीनं माखलेला लेनिन! (भविष्यातला सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टर, बजाज स्कूटरवाला, एका मुलाचा बाप) त्याच्याकडे बघता- बघता कॉम्रेड पिल्लईंच्या चेहऱ्यावर अभिमान दाटून आला. ते कौतुकानं हसले.

'दर वेळी वर्गात पहिला येतो. या वर्षी तर नक्की त्याला डबल प्रमोशन मिळणार!' चाकोकडे पाहात कॉम्रेड पिल्लई खातरीने म्हणाले.

त्या टिचभर कोंदट खोलीत मोठमोठी स्वप्नं कोंबून-कोंबून भरली होती.

पडदे लावलेल्या काचांच्या कपाटात कॉम्रेड पिल्लईंनी काही का ठेवलेलं असेना, पण तिथं मोडक्या बाल्सा विमानांचा कचरा नव्हता, एवढं नक्की.

बिकट होती, ती चाकोची अवस्था.

या घरात पाय ठेवल्यापासून, खरं म्हणजे कॉम्रेड पिल्लई आले, त्या क्षणापासून चाकोच्या मनात कसल्यातरी विचित्र न्यूनगंडानं पाय पसरायला सुरुवात केली होती. एरवीचा सगळा ताठा चुरगळलेला, मन आतून मोडलेलं, स्वत:बद्दल त्याला एकदम तुच्छच वाटायला लागलं. सैन्यातल्या एखाद्या जनरलची हकालपट्टी करून अनेक वर्षं त्याच्या खांद्यावर झळकणारे कर्तृत्वाचे तारे काढून घ्यावेत, तशी चाकोची अवस्था झाली होती. त्याचं हसणं मंदावलं, बोलणं खुंटलं. कॉम्रेड पिल्लईंच्या घरात कुणी पहिल्यांदाच त्याला भेटलं असतं; तर हा माणूस घुमा, लाजाळू, बायल्या आहे, अशीच समजूत झाली असती.

रस्त्यावर लढायला उतरण्याची सवय असलेल्या कॉम्रेड पिल्लईंना बदललेल्या वातावरणाचा ताबडतोब अंदाज आला. त्यांच्या घरातली परिस्थिती तशी जिकिरीचीच होती. छोटंसं, कोंदट, घामट घर... पलंगावर बसून सदैव खोकणारी म्हातारी आई... काबाडकष्ट करणाऱ्या सामान्य लोकांचा शेजार... त्यांच्यातला सक्तीचा वावर! एरवी दुर्दैवाचे दशावतार वाटणारी ही परिस्थितीच आज आपली ताकद बनली आहे. क्रांतीची

ज्वाला भडकवायची, तर हीच दारू हवी; या लढ्यात ऑक्सफर्डला जाऊन शिकून आलेल्या चाकोची विलायती अक्कल काही कामाची नाही, हे लक्षात आल्यावर कॉम्रेड पिल्लईंचा आक्रसलेला कणा एकदम ताठ झाला. एरवीच्या दीनवाण्या डोळ्यांत तेजस्वी ठिणग्या फुलल्या.

...आणि आपल्या दीनवाण्या गरिबीची दारू ठासून भरलेली बंदूक त्यांनी सरळ चाकोच्या मस्तकावर टेकवली.

तोवर चाकोनं आपल्या खिशातून चुरगळलेल्या कागदाची एक मळकट घडी काढली होती. नव्या लोणच्याच्या बाटलीसाठी त्याला कॉम्रेड पिल्लईंकडून नवं लेबल छापून घ्यायचं होतं. त्या मळकट कागदावर त्यानं स्वत:च 'ले-आऊट' कसा असावा, याची काहीतरी विचित्र कल्पना चितारली होती. येत्या वसंतऋतूत बाजारात येऊ घातलेल्या 'सिंथेटिक कुकिंग व्हिनिगर'साठीचं लेबल! चाकोची चित्रकला भयानक असली; तरी त्यावरून कॉम्रेड पिल्लईंच्या तरबेज नजरेला काय कळायचं, ते कळलं. 'पॅराडाईज पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्'चा लोगो तर त्यांना पाठच होता. कथकली नर्तकाचं मोठं चित्र आणि त्याच्या घोळदार झग्याच्या खाली एक वाक्य – एम्परर्स ऑफ द रेल्म ऑफ टेस्ट! स्वादाच्या दुनियेचे अनभिषिक्त सम्राट! (कॉम्रेड पिल्लईंचंच बाळ.) 'पॅराडाईज पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्'साठी नेहमी वापरला जाणारा 'टाईपफेस' तर त्यांच्या नजरेतच बसलेला होता.

'डिझाईन तर सारखंच असणार. फक्त मजकूर बदलेल. बरोबर?' – कॉम्रेड पिल्लईंनी विचारलं.

'मजकूर बदलायचाय आणि लेबलच्या कडेची बॉर्डरसुद्धा. लाल रंगाची आहे ना आता, त्याऐवजी पिवळी पाहिजे. जर्द पिवळी.' – चाकोनं आणखी एक बदल सुचवला.

कॉम्रेड पिल्लईंनी डोळ्यांवरचा चष्मा उंच डोक्यावर सरकवला आणि कागदावरचा मजकूर वाचायला घेतला. चपचपीत केसांचं तेल लागून चष्म्याच्या काचांवर लगेच धुरकट चिकट ढग जमले.

'सिंथेटिक कुकिंग व्हिनिगर... सगळी अक्षरं कॅपिटल घ्यायची. बरोबर ना?'

'पर्शियन ब्ल्यू रंगात' – चाकोनं पुढचा तपशील पुरवला.

'प्रिपेअर्ड फ्रॉम अॅसेटिक अॅसिड?'

'ही अक्षरं रॉयल ब्ल्यू', चाको म्हणाला, 'खारवलेल्या मिरफळांच्या बाटलीसाठी आपण वापरली होती ना; तीच शेड घ्या.'

'नेट कन्टेन्ट, बॅच नंबर, मॅन्युफॅक्चरिंग डेट, एक्स्पायरी डेट, मॅक्सिमम रिटेल प्राईस... हे सगळं तसंच. रॉयल ब्ल्यू. बरोबर?'

चाकोनं मान हलवली.

‘वी हियरबाय सर्टिफाय दॅट द व्हिनिगर इन धिस बॉटल इज वॉरन्टेड टु बी ऑफ द नेचर अॅन्ड क्वालिटी व्हिच इट परपोर्टस् टु बी. इन्ग्रेडियन्ट्स वॉटर अॅन्ड अॅसेटिक अॅसिड’ – हे सगळं लाल रंगात... बरोबर?’

‘बरोबर? असा प्रश्नार्थक बुरखा पांघरून ठाम विधानं करणं ही कॉम्रेड पिल्लईंची कित्येक वर्षांची सवय होती.

राजकारणाच्या प्रांतात, व्यवसायाच्या संदर्भात ‘प्रश्न विचारणं’ त्यांना अजिबात आवडत नसे.

‘प्रश्न’ हे आपल्या अजागळ अडाणीपणाचं लज्जास्पद प्रदर्शन आहे, असं त्यांचं मत होतं.

व्हिनिगरच्या बाटलीचं लेबल कसं करावं, याची चर्चा संपेतो कॉम्रेड पिल्लई आणि चाको – दोघांच्याही डोक्यांवर डासांच्या झुंडी जमा झाल्या होत्या.

लेबल छापून ‘डिलिव्हरी’ कधी? – ती तारीखही दोघांनी चर्चेअंती नक्की केली.

‘कालचा मोर्चा जोरात झाला, म्हणे?’– ताकाला जाऊन भांडं लपवण्याची यशस्वी धडपड केलेला चाको अखेरीस मूळ मुद्द्यावर आला.

‘कॉम्रेड, जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत कसला जोर न् कसलं काय? नुसती गर्दी जमली म्हणजे मोर्चा यशस्वी; असं कुठं असतं का?’ कॉम्रेड पिल्लईमधल्या भावी नेत्याला शब्द फुटले... ‘जोवर मागण्या पदरात पडत नाहीत, तोवर संघर्ष चालूच राहिला पाहिजे.’

‘पण मोर्च्याला एकूण प्रतिसाद चांगला होता –’ त्यांचाच सूर पुढे ओढत चाकोनं विषयाला आणखी गती दिली.

‘प्रतिसाद तर असणारच हो, प्लॅनिंगच तसं होतं मोर्च्याचं –’ कॉम्रेड पिल्लई अभिमानानं म्हणाले,

‘पार्टीच्या हायकमांडला मागण्यांचं निवेदन दिलंय, बघू या आता काय होतं, ते! वी हॅव ओन्ली टु वेट अॅन्ड वॉच; नाही का?’

‘काल आम्ही निघालो होतो ना, तर रस्त्यातच भेटले आम्हांला,’ चाको म्हणाला, ‘आमच्या समोरूनच गेला सगळा मोर्चा.’

‘कोचिनला जाताना गाठ पडली तुमची... बरोबर?’ कॉम्रेड पिल्लईंनी प्रश्नार्थक विधान केलं. ‘पण मला कार्यकर्त्यांनी दिलेल्या खबरीनुसार त्रिवेंद्रम्चा प्रतिसाद जास्त जबरदस्त होता.’

‘अहो, पण कोचिनलाही काही कमी नव्हते मोर्चेकरी. हजारभर असतील... जास्तच,’ चाकोनं कॉम्रेड पिल्लईंना खातरी देत म्हटलं, ‘एवढी गर्दी होती मोर्च्यात; माझ्या भाचीनं वेलुथालासुद्धा पाहिलं... लाल बावटा घेऊन चालला होता.’

‘अच्छा?’

– कॉम्रेड पिल्लई ध्यानीमनी नसताना अचानक अवघड खिंडीत अडकले.

वेलुथाबद्दल कधी ना कधीतरी चाकोशी स्पष्ट बोलून टाकावं, असं कधीपासून त्यांच्या मनात होतं. सोयीची वेळ बघून थोड्या कौशल्यानंच विषयाला हात घालायला हवा होता; पण तो विषय एकदम असा डोक्यावर आदळेल, याची कल्पना नव्हती. पलंगाशेजारच्या टेबलावर फिरणाऱ्या पंख्यासारखं कॉम्रेड पिल्लईंचं मन इकडून-तिकडे हेलकावलं. आयता विषय निघालाच आहे, तर एकदाच काय तो तुकडा तोडून मोकळं व्हावं, की दुसऱ्या योग्य संधीची वाट बघत आत्ता गप्प बसावं, हे कॉम्रेड पिल्लईंना पटकन ठरवता येईना. शेवटी त्यांनी मनाचा कौल स्वीकारला आणि आलेली संधी हातची घालवू नये, असा निर्णय करून टाकला.

'वेलुथा ना? ही इज अ गुड वर्कर' – शब्द जरा जपून निवडायला हवेत, हे जाणवून ते पटकन म्हणाले, 'धडाडी तर आहेच; पण हुशारही आहे पठ्ठा. बुद्धिमान.'

'खरंय. ही इज अ गुड वर्कर,' चाकोनं अनुमोदन देऊन टाकलं, 'त्याच्यासारखा बुद्धिमान सुतार या पंचक्रोशीत सापडायचा नाही. शिकला असता, तर इंजिनिअरच व्हायचा –'

'नॉट दॅट वर्कर कॉम्रेड'– कॉम्रेड पिल्लईंनी चाकोची गडबड सुधारली, 'पार्टी वर्कर... धडाडीचा पक्ष कार्यकर्ता आहे वेलुथा, असं म्हणालो मी!'

कॉम्रेड पिल्लईंची आई पलंगावर बसल्या-बसल्या मागं-पुढे झुलत होती. घशातला गुरगुराट सुरूच होता. त्या गुरगुरण्याच्या अखंड लयीवरच जणू सगळं घर चालत होतं. एक अखंड आवाज, घड्याळाची टिक्-टिक् असावी, तसा. त्या आवाजाची इतकी सवय झालेली, की तो असतो, तेव्हा जाणवतसुद्धा नाही; पण थांबला; तर मात्र श्वास अडतो.

'पार्टीचा कार्यकर्ता? म्हणजे कार्ड होल्डर?'

'ओ येसऽऽ' कॉम्रेडी पिल्लईंनी शांतपणे मान हलवली, 'ही इज अ कार्ड होल्डर.'

चाकोच्या केसांमधून निघालेली घामाची धार त्याच्या पाठीवरून धावत पार कमरेपर्यंत पोचली. चिकट, घामट केसांमध्ये पार किचकिचाट झाला होता. डोक्यावर लाखो मुंग्या हुळहुळताय्त, असं वाटत होतं. चाको खूप वेळ दोन्ही हातांनी डोकं खाजवत राहिला.

'ओरु कारयम् पारापट्टे?' – कॉम्रेड पिल्लईंनी इंग्रजीमधून एकदम मल्याळममध्ये उडी मारली. त्यांच्या आवाजालाही गुप्त खलबतांचा वास येऊ लागला होता.

'हे सगळं मी तुझा मित्र म्हणून बोलतोय, चाको. तुझ्या-माझ्यातच ठेवायचं. ऑफ द रेकॉर्ड.'

पुढे बोलण्यापूर्वी क्षणभर थांबून कॉम्रेड पिल्लईंनी चाकोचा अंदाज घेतला. डोकं खाजवल्यामुळं नखात घुसलेला पांढरा तेलकट कोंडा उचकटून काढण्यात चाको गर्क

होता.

'हा खालच्या जातीचा नालायक माणूस कधी ना कधीतरी तुझ्या जिवावर उठेल, लक्षात ठेव,'– कॉम्रेड पिल्लई खालच्या पट्टीत कुजबुजल्यासारखं बोलत होते. 'त्याला दुसरी कुठली तरी नोकरी शोधून दे आणि हाकल इथून. नाहीतर हे प्रकरण भारी पडेल पुढे.'

वेलुथाबद्दलचा संवाद अशा भलत्याच वळणावर येईल, याचा अंदाज नसलेला चाको एकदम लटपटलाच. वेलुथाचं नक्की काय चाललंय हे जाणून घ्यावं, एवढाच त्याचा उद्देश होता; पण गोष्टी या थराला गेल्या असतील, याची कल्पना नव्हती. वेलुथाच्या विषयावरून कॉम्रेड पिल्लईंशी मतभेद होतील, ते आपल्याशी वाद घालतील, अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र काही वेगळंच घडत होतं. एका कावेबाज कटाची आखणी चालली होती. त्यात आपल्यालाही गोवण्याचा प्रयत्न होतोय हे लक्षात आल्यावर चाको ताडकन म्हणाला,

'वेलुथाला हाकलून द्यायचं? का म्हणून? तो कम्युनिस्ट पार्टीचा कार्ड होल्डर असला, तर माझं काय बिघडतं? मी कोण विरोध करणारा? थोडी उत्सुकता होती, म्हणून तुम्हाला विचारलं, एवढंच! पण मी सांगतो, तो अजमावून बघत असणार स्वत:ला, आधी नीट अंदाज येईल आणि मगच राजकारणात उतरायचं की नाही, हे ठरवेल. तेवढी अक्कल आहे त्याला, माझा विश्वास आहे वेलुथावर. त्याला कशाला हाकलायला सांगता?'

– चाकोचा पारा चढत चालला होता.

'तसं नव्हे, रे...' त्याची समजूत घालत कॉम्रेड पिल्लई म्हणाले, 'तो माणूस म्हणून फार उत्तम असेल; पण इतर कामगार त्याच्यावर चिडलेत, त्याचं काय करणार? वेलुथाबद्दल तकरारी घेऊन तुझ्या कारखान्यातले इतके कामगार माझ्याकडे येतात, की काय सांगू? यू सी कॉम्रेड, खेड्यापाड्यांत रहायचं, तर पार अगदी खोल रुजलेला जातीपातीच्या राजकारणाकडे डोळेझाक करून कसं चालेल?'

– तेवढ्यात कल्याणी बाहेर आली. दमून आलेल्या नवऱ्यासाठी आणलेला गरम कॉफीचा वाफाळता ग्लास तिनं टेबलावर ठेवला.

'आता ही कल्याणी, तिचंच उहारण घेऊ!' – कॉम्रेड पिल्लईंनी पवित्रा घेतला,

'ही या घराची मालकीण. अस्पृश्य माणसानं या घराच्या सावलीतसुद्धा फिरकायचं नाही, असा तिचा हुकूम आहे. तिच्यापुढे माझंसुद्धा काही चालत नाही. बाहेर जाऊन मी साम्यवादावर घसा ताणून बोलेन; पण माझ्या घरात अस्पृश्यांना प्रवेश नाही. मी जगाला उपदेशाचे डोस पाजतो; पण स्वत:च्या बायकोसमोर बोलती बंद. अखेर तिच्या मनाचा विचार मला केलाच पाहिजे. ऑफ कोर्स इनसाईड द हाऊस शी इज बॉस!' कॉम्रेड पिल्लईंनी बायकोकडं वळून खट्याळ हसत विचारलं,

‘काय, खरं ना? अल्ले एडी कल्याणी?’

– कल्याणी एकदम लाजली. खाली बघत मान डोलावून गोड हसली.

‘बघ तिला इंग्रजी उत्तम समजतं. बोलता मात्र येत नाही.’ – कॉम्रेड पिल्लईंनी खूश होत जाहीर करून टाकलं.

चाको वैतागला होता. तो कसाबसा हसला.

‘माझे कामगार तुमच्याकडे येतात तकरारी घेऊन...?’

‘येस करेक्ट.’ कॉम्रेड पिल्लई सावरून बसले.

‘एनीथिंग स्पेसिफिक?’

‘तसं विशेष काही नाही; पण कॉम्रेड, तू एकट्या वेलुथाचे लाड करतोस, ते इतरांच्या डोळ्यांवर येणारच. त्यांना वाटतं, की का म्हणून हा भेदाभेद? वेलुथा सुतारकाम करत असेल, इलेक्ट्रिक फिटिंग्ज करत असेल, ऑर व्हॉटेव्हर इट इज, शेवटी तो अस्पृश्यच! कितीही कर्तबगार असला, तरी त्याची जात थोडीच बदलणारेय? मी सांगितलं सगळ्यांना, की जातीपातीचा जुनाट विचार आता काढून टाका मनातून; पण पिढ्यान्पिढ्याची पार जन्मापासूनची सवय; अशी एकदम कशी जाईल? हे बघ, सामाजिक परिवर्तन ही वेगळी गोष्ट आणि व्यवहारात काय चालतं ही वेगळी गोष्ट. तेव्हा जरा सावध राहा. काही दिवसांसाठी त्याला पाठवून दिलं गावाबाहेर, तर काय असं बिघडणारेय?’

‘माय डियर फेलो,’ – चाकोनं एव्हाना आपला निर्णय ठरवला होता, ‘वेलुथाला मी कुठंही पाठवणार नाही. तो इथंच राहील. तो माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा माणूस आहे. त्याच्याखेरीज आमची अनेक महत्त्वाची कामं अडून बसतील आणि ते मला मुळीच परवडणार नाही. शिवाय सगळ्या अस्पृश्यांना गावाबाहेर घालवलं, तरी मूळ प्रश्न सुटेल अशा भ्रमात राहू नका. जातीवरून माणसाची कर्तबगारी मोजण्याची ही हरामखोर प्रवृत्ती मुळातूनच कापून काढली पाहिजे.’

चाकोनं आपल्याला ‘माय डियर फेलो’ म्हणून संबोधावं, हे काही कॉम्रेड पिल्लईंना आवडलं नव्हतं. सायबाची भाषा वापरून सरळ आपला अपमान करण्याचाच चाकोचा हेतू असावा, या अंदाजानं कॉम्रेड पिल्लई चिडले. एकतर अपमान झालाच होता, शिवाय इंग्रजीत बोललं म्हणजे आपल्याला कळणार नाही या भावात चाकोने आपला पार कचरा केला, हे लक्षात आल्यावर तर कॉम्रेड पिल्लईंचा मूडच गेला.

‘तू म्हणतोस ते बरोबर असेलही; पण सामाजिक परिवर्तनाच्या बाबतीत ‘पी हळद आणि हो गोरी’ अशी घाई करून चालत नाही हे लक्षात ठेव.’ – कॉम्रेड पिल्लईंनी कडवट हसून चाकोला सुनावलं, ‘तुझी ऑक्सफर्डची अक्कल इथं चालवायला जाशील, तर फुकट मार खाशील. हे इंग्लंड नव्हे. तू ‘नॉन्सेन्स’ म्हणून ज्या गोष्टी हसण्यावारी उडवून

लावतोस ना, तो इथल्या जनतेसाठी जगण्या-मरण्याचा प्रश्न आहे – लक्षात ठेव!'

वडिलांसारखा काटकुळा आणि आईचे टपोरे डोळे सहीसही उचललेला लेनिन पुन्हा एकदा धापा टाकत दरवाजात येऊन उभा राहिला. मार्क अॅन्थनीचं प्रसिद्ध भाषण तोंडपाठ म्हणून झालं... आधीची कविताही अर्धीमुर्धी म्हणून झाली. अंगणात एवढा आरडाओरडा करून कुणीसुद्धा आपल्या पाठांतराकडे लक्ष देत नाही, हे लक्षात आल्यावर सगळं सोडून लेनिन घरात धावला. कॉम्रेड पिल्लईंच्या दोन गुढग्यांमधली पूर्वीची जागा त्यानं पुन्हा पटकावली.

कॉम्रेड पिल्लईंच्या डोक्यावर घोंघावणाऱ्या डासांच्या झुंडीकडे लक्ष जाताच लेनिन रक्तरंजित शिरकाणासाठी सज्ज झाला. त्यानं जोरजोरात हात फिरवत फाटाफट टाळ्या पिटायला सुरुवात केली. छोट्या-छोट्या तळव्यांवर डासांच्या ताज्या मृतदेहांचे ढीग जमले. काहींच्या पोटातून तर गरम-गरम रक्त ठिबकत होतं. खूश झालेल्या लेनिनने आपला पराक्रम वडिलांना दाखवला. कॉम्रेड पिल्लईंनी वैतागून कल्याणीला हाक मारली आणि रक्तरंजित चिरंजीवांना स्वच्छ धुण्यासाठी तिच्या हाती सोपवलं.

– पुन्हा एकवार शांतता पसरली.

म्हातारऱ्या आजीबाईंचा गुरगुराट तेवढा ऐकू येत होता.

तेवढ्यात पोथाचेन आणि मथ्थुकुट्टी यांना पुढे घालून लता आली. तिनं दोघांनाही अंगणात बसायला सांगितलं.

बाहेरच्या खोलीचं दार अर्धवट उघडंच होतं. अपेक्षित 'श्रोते' बाहेर आले आहेत हे कळताच आंग्ल भाषेचा आग्रह सोडून कॉम्रेड पिल्लई एकदम मल्याळम्वर घसरले. आत काय चाललंय, ते बाहेर कळणं आवश्यकच होतं. म्हणून मग त्यांनी आवाजाची पट्टीही थोडी वाढवली.

'कामगारांचे न्याय्य प्रश्न सोडवून घेण्यासाठी, त्यांच्या मागण्या मांडण्यासाठी संघटनेसारखं दुसरं प्रभावी व्यासपीठ आहेच कुठं? – तेव्हा संघटना असलीच पाहिजे आणि इथं तर कारखान्याचा मालक स्वत:च 'कॉम्रेड' असताना कसली आडकाठी? सगळ्या कामगारांनी एकत्र येऊन संघटना स्थापन केली पाहिजे. एवढंच नव्हे, तर आपली संघटित ताकद पार्टीच्या मागे उभी केली पाहिजे –' कॉम्रेड पिल्लईंमध्ये अचानक जाहीर सभेतल्या दणदणीत भाषणबाजीचा शिरकाव झाला.

'मी केला त्याचाही विचार.' चाकोला बोलणं भागच होतं, 'मी तर स्वत:च आमच्या कामगारांची संघटना बांधायला तयार आहे. सगळे कामगार गुप्त मतदानानं त्यांचा नेता निवडतील.'

'पण कॉम्रेड, त्यांच्यामधली क्रांतीची ज्वाला आपोआप भडकली पाहिजे. ते जास्त उचित होईल –' कॉम्रेड पिल्लईंनी सुधारणा सुचवली.

‘तू त्यांना एकत्र आणू शकतोस. त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करू शकतोस. पण अखेरीस त्यांचा लढा त्यांना स्वत:लाच लढावा लागेल ना? दुसऱ्याच्या चुलीवर आपल्या क्रांतीची पोळी भाजता येत नसते. तुझ्या कारखान्यातल्या कामगारांना पहिल्यांदा मनातली भीती निपटून काढावी लागेल.’

‘भीती कुणाची? माझी?’ – आता चाकोला हसू येत होतं.

‘तुझी भीती नाही रे राजा. माय डियर कॉम्रेड, वर्षानुवर्षं त्यांच्यावर जो जुलूम झाला, त्याच्या दहशतीची भीती.’

– एव्हाना कॉम्रेड पिल्लईंचा आवाज चांगलाच तापला होता. त्यांनी ‘माओ काय म्हणाला होता,’ ते मल्याळम्मध्ये सांगायला सुरुवात केली. वक्तृत्वस्पर्धेतलं पुस्तकी, शब्दबंबाळ भाषण तोंडपाठ म्हणून दाखवणाऱ्या त्यांच्या पुतणीसारखा त्यांचाही चेहरा एका विचित्र अवघडलेपणानं फुलून आला होता.

– ‘क्रांती म्हणजे वरण-भाताचं जेवण नव्हे. क्रांती म्हणजे प्रस्थापित साम्राज्यशाहीविरुद्ध सामान्य जनतेचा उठाव. एका वर्गाची जुलूमशाही उलथवून लावणाऱ्या दुसऱ्या वर्गाचं रक्तरंजित बंड.’

सिंथेटिक कुकिंग व्हिनिगरच्या नव्या बाटल्यांसाठी नवी लेबलं छापून देण्याचं कंत्राट एका बड्या भांडवलदाराकडून पदरात पाडून घेतल्यानंतर कॉम्रेड पिल्लईंच्या नजरेसमोरची क्रांतीची स्वप्नं अधिकच लखलखून उठली. प्रस्थापितांची जुलूमशाही उलथवून लावणाऱ्या क्रांतिकारकांच्या गटातून त्यांनी (आपल्यापुरती) गुपचूप चाकोची उचलबांगडी केली आणि सशस्त्र क्रांतीनंतर उलथून पडणाऱ्या गटामध्ये त्याला ढकलून दिलं.

सोफी मॉल आयमेनेममध्ये आली, त्याच दिवशी संध्याकाळी शेजारी-शेजारी मांडलेल्या दोन पत्र्यांच्या खुर्च्यांवर बसून चाको आणि कॉम्रेड पिल्लई केळयांचे वेफर्स खात, गरमगरम कॉफी पीत खूप वेळ गप्पा मारत बसले होते. टाळूला चिकटणारा खारट वेफर्सचा पिवळा चिकटा जीभ उंचावून सोडवता-सोडवता त्यांचा बराच वेळ गेला.

एक उंच काटकुळा, शिडशिडीत माणूस.

आणि दुसरा गोलमटोल, गरगरीत सुखवस्तू.

येऊ घातलेल्या युद्धातले दोघे कट्टर हाडवैरी.

ज्याची खुमखुमी कॉम्रेड पिल्लईंना स्वस्थ बसू देत नव्हती; त्या युद्धाचा भडका उडाला खरा, पण पुरेसा पेट घेण्याआधीच सगळया ठिगण्या विझल्या आणि झगमगत्या कागदात गुंडाळलेलं युद्धातल्या विजयाचं मानचिन्ह ध्यानीमनी नसताना चांदीच्या ताटातून कॉम्रेड

पिल्लईंच्या हाती आलं. युद्धाचा बिगुल जेमतेम वाजला असेल-नसेल, पॅराडाईज पिकल्सनं लगेच पांढरा बावटा दाखवला आणि भांडवलशाहीचं एक भलंमोठं प्रतीक कुठलाही विरोध – साधी कुरकुरसुद्धा न करता गडगडत खाली आलं. इतक्या निर्विवाद विजयानं कॉम्रेड पिल्लईंना खरं तर आनंदाच्या उकळ्या फुटायच्या; पण ते मनातून भलतेच खट्टू झाले. युद्धातल्या विजयापेक्षा विजयापर्यंत जाणारा घनघोर संग्राम आपल्याला हवा होता, हे त्यांना उमजलं; तोवर वेळ टळून गेली होती. या रक्तरंजित संग्रामाच्या उन्मत्त घोड्यावर बसून थेट विधानसभेत दौडत जाण्याची त्यांची स्वप्नं भंगली आणि एवढ्या निर्विवाद विजयानंतरही पराभूत झालेले कॉम्रेड पिल्लई होते तिथेच राहिले.

गड हाती आला असला, तरी 'सिंह' निसटलाच होता. त्यामुळे अंडी पण फुटावीत आणि ऑम्लेटही जळून जावं अशा विचित्र कोंडीत कॉम्रेड पिल्लई सापडले.

पॅराडाईज पिकल्सच्या प्रकरणात कॉम्रेड पिल्लईंनी कुठून कोणत्या चाव्या फिरवल्या, याची खबर मात्र कुणालाही लागली नाही. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पॅराडाईज पिकल्सला घेराव घातला, तेव्हा 'अस्पृश्यांचे हक्क' या विषयावर कॉम्रेड पिल्लईंनी अत्यंत प्रक्षोभक, विषारी भाषणं केली होती, एवढा तपशील सोडला, तर 'बाकी काय झालं' हे खुद्द चाकोलासुद्धा ठाऊक नव्हतं. ही माहिती खोडून काढण्यात त्याला काही रसही नव्हता. सोफी मॉलला गमावून बसलेला चाको दु:खानं वेडापिसा झालेला. सगळं जगणंच उद्ध्वस्त करून टाकणाऱ्या त्या वेदनेखेरीज त्याला दुसऱ्या कशाचीही शुद्ध उरली नव्हती. कसल्यातराr भयंकर मानसिक धक्क्यानं कोलमडून गेलेलं मूल खाणं-खेळणं विसरून एकदम गप्प-गप्प होऊन जातं, तशी चाकोची अवस्था झाली होती. त्यानं त्याची सगळी 'खेळणी' फेकून दिली आणि दुखावल्या मनानं तो मुका होऊन गेला. लोणच्यांच्या दुनियेचा अनभिषिक्त सम्राट होण्याची त्याची स्वप्नं मोडक्या विमानांचे अवशेष भरलेल्या काचेच्या कपाटात पार तळाशी भिरकावली गेली. पॅराडाईज पिकल्सला टाळं लावल्यानंतर बँकांची कर्जं फेडण्याकरता भाताची शेतं विकावी लागली. नंतर उरल्यासुरल्या जमिनींचे तुकडे मोडून खात कुटुंबाचं अन्नपाणी चालवावं लागलं. सगळं सोडून चाको कॅनडाला निघून गेला, तेव्हा घरालगत असलेली रबराची बाग आणि परसदारी लावलेली नारळाची झाडं एवढीच उत्पन्नाची साधनं उरली होती. एकेक करून घरातल्या माणसांना गळती लागली. कुणी घर सोडून गेलं, कुणाला मृत्यूनं ओढून नेलं, खूप वर्षांनी कुणी पुन्हा परतून आलं. मागं उरल्या फक्त दोघी – बेबी कोचम्मा आणि कोचु मारिया. वर्षाअखेरीस हाती येणारे थोडेफार पैसे पुरवून- पुरवून दोन्ही म्हाताऱ्या आपापले जीव जगवत राहिल्या.

...खरं तर या सगळ्या अधोगतीला एकटे कॉम्रेड पिल्लईच जबाबदार होते, असं मात्र

नव्हे. पॅराडाईज पिकल्सला टाळं लागल्यावर एकामागोमाग एक बुरूज ढासळत जातील आणि सगळं कुटुंब देशोधडीला लागेल असं त्यांना चुकूनसुद्धा वाटलं नव्हतं. नियतीनं सहज देऊ केलेली एक संधी कॉम्रेड पिल्लईंनी झडप घालून साधली एवढंच.

माणसाच्या जगण्यापेक्षा मरणाला जास्त किंमत देणाऱ्या समाजात राहावं लागणं, हा काही कॉम्रेड पिल्लईंचा एकट्याचा दोष नव्हता.

माम्माची आणि बेबी कोचम्माशी निकराचा झगडा झाल्यावर ऐन पावसाच्या 'त्या रात्री' वेलुथानं कॉम्रेड पिल्लईंच्या घराचं दार वाजवलं होतं. त्या रात्री दोघांमध्ये काय बोलणं झालं, हे गुपित मृत्यूच्या कुशीत अखेरपर्यंत सुरक्षित राहिलं.

– त्या शेवटच्या विश्वासघातानंच वेलुथाला रातोरात नदी ओलांडणं भाग पाडलं होतं.

डोळ्यात बोट घातलं, तरी दिसू नये इतका घनगर्द काळोख दाटून आलेला असताना, रोंरावत वाहणाऱ्या नदीचा प्रवाह कापत वेलुथा झपाट्याने निघाला होता.

...नियतीच्या भेटीला!

मरणाच्या मिठीत!!'

ग्

नादुरुस्त झालेलं कॅनिंग मशिन एकदाचं ठीकठाक करून मिळाल्यावर वेलुथानं शेवटची बस पकडली आणि तो कोट्टायमहून निघाला. आयमेनेमच्या बसस्टॉपवर उतरल्या-उतरल्या त्याला तिथे पॅराडाईज पिकल्सचे कामगार दिसले. तो सहज म्हणून त्यांच्याजवळ गेला, तर ते त्याची वाटच बघत होते. एक जण भुवई उडवून विषारी हसत म्हणाला, 'तुझ्यासाठी निरोप आहे. माम्माचीनं ताबडतोब घरी बोलावलंय.'

– 'आयमेनेम हाऊस'मध्ये काय हंगामा उभा राहिलाय, याची वेलुथाला किंचितही कल्पना नव्हती. दारूच्या नशेत आपल्या बापानं गवताच्या गंजीत काडी टाकलीय, हेही त्याला ठाऊक नव्हतं.

एवढंच काय, पण एका तांबारल्या डोळ्यात दारूचा अंमल उतरलेला, संतापानं धुमसणारा आपला बाप एका हातात नागडी कुऱ्हाड घेऊन झोपडीच्या दाराशी दबा धरून बसलाय, आपली वाट पाहतोय, याचीही त्याला गंधवार्ता नव्हती.

वेलुथा कधी परतेल याची वाट पाहात नरभक्षक क्रूर वाघासारखा पवित्रा घेऊन बसलेला वेल्लय्या पाप्पेन... आणि अंथरुणावर पडल्या-पडल्या रडतभेकत गयावया करणारा, बापाची समजूत घालघालून थकलेला कुट्टप्पन!

गलितगात्र झालेल्या कुट्टप्पनचे कान सतत बाहेरचा वेध घेत होते. दुरून पाय वाजले, आसपासचा झाडोरा सळसळला, वाटेवर पसरलेली वाळकी पानं कुरकुरली की जोरानं बोंब ठोकायची आणि घरात काय वाढून ठेवलंय याची कल्पना नसलेल्या वेलुथाला बाहेरच्या बाहेर पळवायचं.

...एवढंच आता शक्य होतं.

कोट्टायमहून आल्या-आल्या वेलुथा घरी गेला नाही. तो सरळ 'आयमेनेम हाऊस'च्या दिशेनं निघाला आणि नेहमीच्या सहजतेनं नेहमीची पायरी चढला. घरात सगळा धिंगाणा. वेलुथाला बघताच त्या जाळात आणखी तेल ओतलं गेलं. गोंधळलेल्या वेलुथाला पुढच्याच क्षणी कल्पना आली.

...हे युद्ध इतक्या तातडीनं – अगदी आत्ताच – उभं राहील याचा अंदाज त्याला अर्थातच नव्हता. पण कधी ना कधीतरी भडका उडणार हे ठाऊक होतं. जे अपरंपार सुख भोगलं, त्याची फळं भोगण्यावाचून सुटका नाही, एवढं समजत होतं. नियतीचे फटके चुकणार नव्हतेच. त्यासाठी मनामधली बांधाबांध तर कधीची चालू झाली होती.

वेलुथाला बघताच माम्माची त्वेषानं त्याच्यावर धावून गेली. तिचा धगधगीत विखार झेलत वेलुथा काही न बोलता शांतपणानं उभा राहिला. माम्माचीनं हरतऱ्हांनी त्याला ढोसलं, डिवचलं, फटकारलं, तरी त्याच्या तोंडून एकही शब्द बाहेर पडला नाही. हा उद्रेक का आहे, कशाचा आहे, हे त्याला नीट ठाऊक होतं.

...योग्य वेळेची वाट पाहात वेलुथा स्वस्थ उभा राहिला.

वेलुथा आला आहे हे कळताच माम्माची तीरासारखी उठली. आंधळ्या अशक्त डोळ्यांमध्ये उतरलेल्या संतापाला दिशांची पर्वा नव्हती. वाट फुटेल, तिकडे भेलकांडत जात तिनं गरळ ओकायला सुरुवात केली. सरकत्या दारासमोर गलिच्छ शिव्यांचा कडाका फुटला. उद्रेकाचे आसूड उठले. माम्माची भलतीकडेच तोंड करून बंद दारालाच फैलावर घेतेय हे लक्षात आल्यावर बेबी कोचम्मा पुढे झाली. माम्माचीच्या कोसळलेल्या खांद्याभोवती हात टाकून तिने विषारी विखाराचा मोहरा अंधारात उभ्या असलेल्या वेलुथाच्या दिशेनं वळवला.

– माम्माचीला यातलं काही समजत नव्हतं. संतापाखेरीज अन्य कसली शुद्धच उरली नव्हती. डळमळते पाय नीट रोवून तिनं नव्या दमानं लाखोली वाहायला सुरुवात केली.

चौफेर गरगरणारे, संतापानं रडणारे रिकामे डोळे, पिळवटलेला चेहरा आणि पिसाटल्यासारखे हवेत नाचणारे हात...

भडाभडा बोलत सुटलेल्या माम्माचीच्या तोंडातून गळणाऱ्या थुंकीचे फवारे वेलुथाच्या चेहेऱ्यावर उडत होते. तेवढ्या घनघोर संग्रामातही माम्माचीच्या थुंकीला येणारा शिळ्या चहाचा आंबूस दर्प वेलुथाला जाणवला.

बेबी कोचम्मा माम्माचीच्या मागं सावलीसारखी उभी होती. एक शब्दही न बोलता चौफेर बरसणारा माम्माचीच्या संतापाचा पिसाट झोत वेलुथाच्या दिशेनं वळवत राहण्याचं काम तिनं चोख बजावलं. शाबासकी द्यावी, तशा थाटात एक हात माम्माचीच्या पाठीवर ठेवून दुसरा हात तिच्या खांद्याभोवती वेढून घेत जळून खाक

झालेल्या गवताच्या गंजीत बेबी कोचम्मा नव्या काड्या पेटवून टाकत राहिली. जाळ कुठून कसा भडकवला जातोय, हे माम्माचीला अर्थातच कळलं नाही.

खळ लावून कडक केलेल्या कुरकुरीत साड्या नेसून रोज संध्याकाळी आपल्याच मस्तीत व्हायोलिन वाजवत बसणाऱ्या एका घरंदाज स्त्रीला – माम्माचीला – इतक्या घाणेरड्या, अश्लील शिव्या येतात कशा? – हे रहस्य मात्र त्या रात्री कुणालाही उलगडलं नाही. बेबी कोचम्मा, कोचु मारिया तर थक्कच झाल्या होत्या. भलंमोठं टाळं ठोकलेल्या बेडरूममध्ये कोंडून ठेवलेल्या अम्मूनं दाराला कान लावून सगळा तमाशा ऐकला. तिच्याही अंगावर शहारे फुटले.

'चालता होऽऽ'

– बोलणं संपत आल्यावर माम्माची वेलुथाच्या अंगावर जोरानं ओरडली.

'उद्या सकाळी इथं दिसलास; तर रस्त्यावर हिंडणाऱ्या कुत्र्यांना पकडून त्यांचं लिंग कापतात; तशी तुझी अवस्था करीन. ठेचून टाकीन तुला. खच्ची करीन. याद राख, फुकटचा मरशील.'

'ठीक आहे. ते आपण उद्या बघू.'

– वेलुथा शांतपणे फक्त एवढंच बोलला.

त्याचे हेच शब्द बेबी कोचम्मानं फिरवले, शिजवले आणि धमकावणीचा नवा मालमसाला भरून कोट्टायमच्या पोलीस ठाण्यात इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्युला ऐकवले.

– 'तो म्हणाला, बघून घेईन.'

संतापाचं ओझं पेलवेनासं झाल्यावर माम्माची वेलुथाच्या तोंडावर पचकन् थुंकली. ते पिवळट चिकट गरळ वेलुथाचा चेहरा माखून पार त्याच्या मानेपर्यंत ओघळलं.

– तरीही तो तसाच उभा होता.

शांत.

माम्माचीचं बोलून संपलं, तसा तो शांतपणे वळला आणि जसा आला तसा पायऱ्या उतरून घराबाहेर पडला.

त्याच्या सगळ्या जाणिवा बधीर झाल्या होत्या. मन गोठून गेलं होतं.

राग, संताप, प्रेम, बदला सगळ्या भावनांची उचंबळणारी टोकं छाटली जाऊन पार सफाचट झाली... थिजली आणि कोणत्याही मशिनबरोबर येणाऱ्या सचित्र माहितीपत्रकासारखी मनभर पसरली. काय झालं म्हणजे काय करायचं याचं कोष्टक त्यात तयार होतंच. वेलुथाच्या मनानं माहितीपत्रकात नकळत प्रत्येक गोष्टीची नोंद केली. त्यावर लेबलं लावली. बेरीज-वजाबाक्या सुरू झाल्या. समीकरणं मांडली-सोडवली जाऊ लागली.

अंगणाच्या फाटकातून वेलुथा बाहेर पडला, त्याच्या मनात प्रतिमा उमटली –फाटक

फाटक, रस्ता, दगडधोंडे, आकाश, पाऊस

फाटक.

रस्ता.

दगडधोंडे.

आकाश.

पाऊस.

अंगावर पावसाची सर कोसळत होती. उष्ण, उबदार वाटत राहिलं. चिखलात रपरपणारी पावलं पुढे सरकत राहिली. पायाखालची वाट आपल्याला कुठं घेऊन चाललीय, ते वेलुथाला नीट कळत होतं. पुढे धावणाऱ्या वाटेचं वळण. प्रत्येक झाड. प्रत्येक पान. अंधारलेल्या कोंदट आकाशातला हरेक ढग. पुढे पडणारं प्रत्येक पाऊल – वेलुथाच्या मनात प्रत्येक क्षणाची स्वतंत्र नोंद होत होती. सगळ्या गोष्टी सुट्या सुट्या जाणवत होत्या.

कु-कु कुक्कुम थिवन्दी,

कुकी पाडुम थिवन्दी

रापकल ओडम थिवन्दी,

थलन्नू नीलक्कम थिवन्दी

– शाळेत शिकलेली पावसाची कविता वेलुथाला अचानक आठवली. कित्येक वर्षांपूर्वीचे शब्द जसेच्या तसे ओठावर येत राहिले.

– मग त्यानं मोजायला सुरुवात केली. काहीतरी – खरं म्हणजे काहीही!

एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात, आठ, नऊ, दहा, अकरा, बारा, तेरा, चौदा, पंधरा, सोळा, सतरा, अठरा, एकोणीस, वीस, एकवीस, बावीस, तेवीस, चोवीस, पंचवीस, सव्वीस, सत्तावीस, अठ्ठावीस, एकोणतीस...

मनातलं चित्र हळूहळू धूसर होत होतं. त्यातल्या ठळक रेषा एकमेकांत मिसळून मोठमोठे डाग पडत चालले होते. आधीच्या सुस्पष्ट सूचना, 'काय झालं म्हणजे काय करावं' या माहितीचं कोष्टक अर्थहीन व्हायला लागलं होतं. बघता- बघता नजरेसमोर पसरलेला वळणावळणाचा रस्ता अचानक उभा राहून वेलुथाच्या गळ्यात पडला. अंधार अधिक घनदाट होत चालला होता. त्याचा चिकट विळखा चोहोबाजूंनी वळवळत येऊ लागला. पाण्याच्या खालून पोहताना उलटे प्रवाह ढकलता-ढकलता दमसास संपावा, तशी वेलुथाची अवस्था झाली. गिळू पाहणारा अंधाराचा अजगर मागं लोटणं सोपं नव्हतं.

शेवटची घंटा... वाजतेय...

आतल्या कुण्या आवाजानं वेलुथाला इशारा दिला.

कहाणीच्या शेवटाची सुरुवात झाली आहे...

– अचानक वेलुथाचं थकलंभागलं मन त्याच्या शरीरातून निसटलं... मस्तकाच्या वर घिरट्या घालत, घुटमळत फिरता-फिरता त्याची निरर्थक चर्पटपंजरी सुरू झाली. वेलुथाला वाट्टेल ते सल्ले मिळू लागले. वाट्टेल ते इशारे... वाट्टेल त्या धमक्या...

त्या वळवळणाऱ्या, वरच्यावर घोंघावणाऱ्या मनानं खाली वाकून पाहिलं –

अंधाऱ्या रात्री, भर पावसात एका तरुण माणसाचं शरीर चालत निघालं होतं. इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा त्या शरीराला सगळयात पहिल्यांदा झोप मिळाली, तर हवी होती.

आत्ताच्या आत्ता झोपून जावं,

आणि जाग यावी ती एकदम नव्या जगात!

त्याच्या श्वासामधून शरीरात जाणाऱ्या हवेत तिच्या सुकुमार, तरुण शरीराचा गंध मिसळला होता... तिचं शरीर पुन:पुन्हा त्याच्या शरीरात मिसळत, समर्पित होत होतं... आता कदाचित ती दिसणार नाही... त्याला पुन्हा कधीही भेटणार नाही... ती कुठे असेल?... चवताळलेल्या हिंस्र वाघांनी तिचं काय केलं असेल? कशी असेल ती? दुखावली असेल? रक्तबंबाळ झाली असेल?

वेलुथा अखंड चालत राहिला. कोसळणाऱ्या पावसाची क्षिती नव्हती. कसली... कसलीच तमा नव्हती.

त्याच्या चेहेऱ्यावर पसरलेली माम्माचीची पिवळट, चिकट थुंकी पावसानं धुवून नेली, तरी त्याच्या घशाशी काहीतरी गिळगिळत होतं. कुणीतरी आपलं डोकं उचकटून, खेचून काढलं आणि त्या भोकातून शरीरात भडाभडा ओकलं असं वाटत होतं. त्या ओकारीचे गोळेगोळे आतल्या आत बदाबदा गळत होते. शरीरभर घाणेरडा, आंबूस वास पसरला होता. इतका पाऊस पडूनही काही उपयोग नव्हता.

– आता पुढे काय करावं लागेल हे त्याला पक्कं ठाऊक होतं. मनातल्या 'कोष्टकानं' त्याला पुढची चाल कधीच सुचवली होती. का कुणास ठाऊक; पण कॉम्रेड पिल्लईंना भेटलं पाहिजे, एवढंच आतून वाटत होतं. त्याचे पाय त्याला लकी प्रेसच्या दिशेनं घेऊन गेले. प्रेस बंद होती. तिथून तो वळला. मधलं छोटं अंगण ओलांडून कॉम्रेड पिल्लईंच्या घरापाशी पोचला.

– हात उचलून बंद दारावर टकटक करण्याएवढीही शक्ती त्याच्यात उरली नव्हती.

जेवण नुकतंच संपवून दह्यानं भरलेल्या वाटीत पिकलेलं केळं कुस्करत कॉम्रेड पिल्लई निवांत बसले होते; तेवढ्यात वेलुथानं दार वाजवलं. कल्याणी दार उघडायला वळली.

कल्याणी परत आली, ती संतापलीच होती. तिला घट्ट मिठीत आवळवावं आणि दोन्ही हातांनी तिची उभार छाती कुस्करून खूप वेळ चोखत बसावं, असं कॉम्रेड पिल्लईंना फार वाटलं; पण त्यांची बोटं कुस्करलेल्या केळयाच्या गरानं माखली होती; आणि इतक्या रात्री दारावर कुणीतरी अनाहूत टपकला होता. कल्याणी आली, तशी वैतागून पलंगावर

बसली. अंगठा चोखत आजीच्या शेजारी झोपून गेलेल्या लेनिनला उगीचच थोपटत राहिली.

'कोणेय?'

'तोच... वेल्लय्याचा पोरगा... अस्पृश्य! काहीतरी तातडीचं काम आहे, म्हणतोय.'

कॉम्रेड पिल्लईंनी सावकाश आपली दही-केळ्याची वाटी संपवली. हात निपटून-निपटून चाटून खाल्ले. कल्याणी एका स्टीलच्या भांड्यात पाणी घेऊन आली. कॉम्रेड पिल्लईंनी ताटातच हात धुतले. त्यांच्या ताटातल्या उरल्यासुरल्या गोष्टी – एक लांबलचक लाल मिरची, चोखून चोखून खाल्लेल्या शेवग्याच्या शेगांची लांबट हिरवी सालं – सगळं दहीकेळ्याच्या आंबसरगोडूस पाण्यात तरंगायला लागलं. सगळं शिस्तशीर आटपल्यावर कल्याणी कोरडा टॉवेल घेऊन आली. कॉम्रेड पिल्लईंनी हात पुसत तृप्त, भरपेट ढेकर दिली आणि ते बाहेरच्या दरवाजाकडे वळले.

'एन्डा? एवढ्या रात्री?'

– वेलुथानं कारण सांगितलं. आपले शब्द समोरच्या भिंतीवर आपटल्यासारखे कॉम्रेड पिल्लईंच्या कानावर आदळून जसेच्या तसे परत येताहेत, हे त्याला जाणवल्यावाचून राहिलं नाही. नक्की काय घडलं, ते शिस्तशीर सांगण्याचा आटोकाट प्रयत्न करूनसुद्धा आपले शब्द सुटताहेत, मुद्दे निसटताहेत हे त्याला कळत होतं. असा अर्धवट संवाद... आणि ज्याच्याशी बोलायचं तो लहानखुरा, शिडशिडीत माणूस जणू काचेची भिंत घातल्यासारखा घुम्म उभा.

'हे बघ, हे काही शहर नव्हे. छोटं गाव आहे,' – अखेर कॉम्रेड पिल्लईंनी मौन सोडलं.

'कुठलीही गोष्ट फार काळ लपवता येत नाही. लोकं बोलतात. तुझ्याबद्दल काय बोलतात, ते मीसुद्धा ऐकलंय. तेव्हा काय चाललंय, ते मला ठाऊक नाही असं समजू नकोस.'

– आपण काय बोलतोय, त्याचा या माणसावर काडीचाही परिणाम होत नाही, हे वेलुथाला पुन्हा एकदा झणझणीतपणे जाणवलं. त्याचेच शब्द त्याच्याचकडे परत येऊन त्याच्याच गळ्याभोवती विषारी सर्पासारखे विळखे घालून लोंबू लागले होते.

'हे बघ कॉम्रेड, शेवटी आयुष्य तुझं आहे. त्याचं तू काय वाट्टेल ते कर –' कॉम्रेड पिल्लईंना आता आपला निर्णय सुनावायची घाई झाली होती.

'– पण कार्यकर्त्यांच्या व्यक्तिगत जीवनातल्या भानगडी निस्तरायला पक्षाची स्थापना झालेली नाही, हे लक्षात ठेव.'

– हळूहळू कॉम्रेड पिल्लईंचं शरीर दरवाजातून विझत, विरघळत गेलं. अदृश्य झालं. फक्त करडा, कडवट आवाज तेवढा शिल्लक राहिला. तापलेल्या कढईत भाजके शेंगदाणे तडतडावेत, तसे रिकाम्या दारातून घोषणांचे लाल आवाज फटफटत राहिले –

असल्या गोष्टींमध्ये लक्ष घालणं पार्टीच्या हिताचं नाही.

व्यक्तिगत हितसंबंधाची जपणूक करणं पार्टीच्या नियमात बसत नाही. ते अनैतिक आहे.

पार्टीची शिस्त तोडून वेडंवाकडं काहीतरी करणं म्हणजे पार्टीच्या एकोप्यात फूट पाडणं.

– खूप वेळ ही फटफट चालू राहिली.

मोठीमोठी वाक्यं हळूहळू अर्धवट तुटली.

शेवटी फक्त एकेरी शब्दच शिल्लक उरले.

क्रांतीची पायवाट –

वर्गशत्रूंचा बिमोड –

रक्त शोषणारे भांडवलशहा –

ठिणग्या –

स्फोट –

– क्रांतीच्या सापानं वळून पुन्हा एकदा आपलीच शेपूट आपल्या दातात पकडली होती.

– धर्म न मानणारा धर्म स्वत:वरच उलटला होता.

मानवी मनानं रचलेले इमले मानवी स्वभावाच्या एका फटकाऱ्यानिशी जमीनदोस्त झाले होते.

दार बंद करून कॉम्रेड पिल्लई घरात आपल्या बायकोच्या कडवट धर्माभिमानी कुशीत परत आले. त्यांना आता आणखी एक केळं खावंसं वाटत होतं.

'काय झालं? कशाकरता आला होता?'

– टेबलावरच्या बशीतलं केळं उचलून देत कल्याणीनं कॉम्रेड पिल्लईंना विचारलं.

'कुठूनतरी 'त्यांना' कळलीय सगळी भानगड. कुणी सांगितलं कोण जाणे, पण 'कामावरून काढून टाकलं' म्हणत होता.'

'एवढंच ना? गळ्यात फास बांधून झाडावर उभा लटकवला नाही, हे नशीब समज म्हणावं!'

'...पण कायतरी भयंकर घडणारसं दिसतंय. त्याचं लक्षण काही मला ठीक वाटलं नाही,' केळं सोलता-सोलता सुस्कारा टाकत कॉम्रेड पिल्लई हलक्या आवाजात म्हणाले.

'त्याची नखं कुणीतरी लाल रंगानं रंगवलेली दिसली मला.'

पावसात चिंब भिजलेला वेलुथा कितीतरी वेळ बाहेर रस्त्यावर एकटाच उभा होता. रस्त्याच्या कडेला असलेल्या एकुलत्या एका खांबावरून पाझरणारा ओला अंधूक उजेड सहन न होऊन त्याला गरगरून झोप आली. पापण्या ताणून डोळे उघडे ठेवून-ठेवून तो

थकला होता.

'उद्या काय ते बघू.'

– त्यानं स्वत:लाच समजावलं.

'पाऊस थांबला की मग...'

– गळयात बांधलेल्या साखळीमागे कुत्र्यानं फरफटत जावं, तसं त्याच्या पायांनी वेलुथाला नदीच्या दिशेनं ओढून न्यायला सुरुवात केली.

– जणू नियतीच एका कुत्र्याला खेचून नेत होती.

प्रकरण १५
नदी पार...

मध्यरात्र उलटून गेलेली. नदीचा बहाव वाढला होता. बरसत्या पावसाशी संग करून टपोरल्या पोटानं ती समुद्राच्या दिशेनं धावत निघाली होती. काळ्याशार पाण्यात तरंगणारं रात्रीचं ढगाळ आकाश, तळहाताएवढी मोठीमोठी पानं, तुटून दुभंगून गरगरत खाली आलेल्या झाडांच्या फांद्या... अशा कितीतरी 'तुफान-भेटी' पोटाशी कवळून नदी निघाली होती.

हलके हलके पावसाचा जोर ओसरला.

बरसती सर नुसतीच झिरमिरत, टपटपत राहिली... आणि अशीच केव्हातरी थांबली.

दमला-भागला वारा पुन्हा कुठूनतरी सळसळत आला. भिजून चिप्प झालेल्या झाडांच्या कुशीत घुसला. झाडांच्या कुशीत पुन्हा एकदा पावसाला उधाण आलं.

आकाशातल्या ढगांची गर्दी थोडीशी ओसरल्यावर नदीकडे डोकावून पाहणाऱ्या अशक्त, अंधूक चंद्राला एक तरुण माणूस दिसत होता.

काठावरून नदीत उतरणाऱ्या तेरा दगडी पायऱ्यांपैकी सर्वांत वरच्या पायरीवर बसलेला.

अतिशय शांत होता... कोवळ्या तरुण रक्ताचा...

वादळाच्या रात्री उधाणलेल्या पावसात चिप्प भिजलेला.

– अचानक तो उठून उभा राहिला.

कमरेला बांधलेलं पांढरं मुंडू सोडलं.

लांबलचक पिळा करून घट्ट पिळलं.

– आणि ओल्या डोक्याभोवती फेटा बांधावा, तसं गुंडाळून टाकलं.

संपूर्ण नग्न... नागडा.

तशाच उघड्या अंगानं तेरा पायऱ्या उतरून तो वाहत्या नदीत शिरला. छातीइतकं पाणी येईतो चालत राहिला. मग पाण्यात झेपावत, सवयीनं, सरावानं हात मारत पोहत-पोहत पुढे जाऊ लागला.

चंद्राच्या प्रकाशानं झगमगणाऱ्या नदीच्या चंदेरी चिरफळ्या उडवत त्याचे तरबेज हात झपाट्यानं पाणी कापू लागले.

अवघ्या काही मिनिटांतच तो नदीपार पोचला.

पल्याडच्या काठावर येऊन पाण्यानं निथळत उभा राहिला... आजूबाजूला पसरलेल्या रात्रीइतकाच काळाकभिन्न!

'हिस्टरी हाऊस'कडे जाणाऱ्या वाटेवर त्याने पाऊल ठेवलं.

– मागे पडलेल्या पाण्यात त्याच्या नावाची एकही लाट उरली नव्हती.

किनाऱ्यावरच्या मऊ चिखलात त्याच्या पावलांची एकही खूण उमटली नव्हती.

डोक्याचा फेटा सोडून त्यानं ओलंचिप्प मुंडू अंगभर पसरलं. धावत आलेल्या वाऱ्यानं दंगामस्ती करून मुंडूला आपल्या अंगाखांद्यावर घेतलं. हवा भरलेल्या शिडासारखा पोकळ पांढरा गुब्बारा तयार झाला.

त्याला अचानक सुटल्यासारखं, आनंदी वाटत होतं.

वाईटात वाईट काय घडायचं, ते एकदा घडूनच जाऊ दे.

– त्यानं स्वत:शीच विचार केला.

म्हणजे मग सगळं सुधारेल. चांगलं होईल.

– तो शांतपणे पावलं उचलीत निघाला.

'हार्ट ऑफ डार्कनेस'च्या दिशेनं...

अंधाराच्या काळयाभोर उदरात!

– एकटा... मध्यरात्री भटकणाऱ्या एकाकी लांडग्यासारखा...

'द गॉड ऑफ लॉस'

'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज.'

नखांना लावलेला लाल रंग सोडला,

...तर बाकी नागडा! नग्न!!

प्रकरण १६
काही तासानंतर...

नदीकाठी तीन मुलं.

एक जुळ्यांची जोडी.

आणि देखण्या मखमली पिनॅकोवर 'Holiday' लिहिलेली एक छोटीशी, गोंडस मुलगी.

झाडोऱ्याची मंद सळसळ... चिंब ओल्या पानांचे चटकफटक आवाज... खिन्न बांबूंचे नदीवर झुकलेले लांबलचक सुळके 'पुढे काय होणार' त्याची चाहूल लागल्यासारखे शोकमग्न.

गर्द काळ्या नदीचा खोल, सुस्त बहाव.

वरवर बघितलं, तर काही अंदाजच येणार नाही अशी... पोटात मृत्यूची विवरं घेऊन सुस्तावलेली गूढ नदी...

नदीवर आल्याआल्या इस्था आणि राहेलनं कामाला सुरुवात केली. छोटी होडी दडवून ठेवण्याची गुप्त जागा ठरलेली होती. तिथे रचलेला पालापाचोळा बाजूला करून त्यांनी होडी बाहेर ओढली.

वेलुथानं बनवून दिलेली दोन छोटी वल्ही एका झाडाखाली पुरून ठेवली होती, तीही बाहेर काढली.

इस्था आणि राहेल. दोघांनी किनाऱ्यावरची होडी नदीत लोटली आणि सोफी मॉलला नीट चढता यावं म्हणून वल्ही रोवून होडी नीट तोलून धरली. आजूबाजूच्या अंधारावर विश्वास ठेवून त्यांनी किनारा सोडला. नदीत उतरणाऱ्या तेरा दगडी पायऱ्या ओलांडून आपण नीट धारेला लागू याची तर पक्कीच खातरी होती.

एकटी सोफी मॉल तेवढी भेदरली होती. पाण्यात डुचमळणाऱ्या सावल्यांची तिला खूप भीती वाटत असावी. फ्रीजमधून गुप्ाचूप लांबवलेला भरपूर खाऊ तिनं पाठीवर लटकवलेल्या पिशवीत भरून घेतला होता. पाव, केक आणि बिस्किटांची चंगळ होती.

जुळ्यांच्या डोक्यात आधीच एक विचित्र ओझं ठासून भरलेलं. अम्मू म्हणाली होती,

'काट्यांनो, तुम्ही जन्मालाच आला नसतात तर सुटले असते मी! मूर्ख म्हणून तुम्हांला सांभाळलं. दिलं असतं अनाथाश्रमात फेकून, तर ही अवस्था झाली नसती माझी. मुलं कसली? गळयातली धोंड आहात तुम्ही माझ्या!'

– हा विखार पेलता-पेलता आक्रसून गेलेल्या जुळ्यांना घराबाहेर पडताना बरोबर काही घ्यावं, असं मुळी वाटलंच नाही. ऑरेंजड्रिंक-लेमनड्रिंकवाल्या माणसानं इस्थाबरोबर जे काही केलं, ते बरंच केलं म्हणायचं. त्यामुळेच तर घरापासून दूर आपलं एक वेगळं घर तयार केलेलं बरं, ही अक्कल इस्थाला सुचली. जांभळ्या रंगाचा उकळता

जॅम ढवळता-ढवळता इस्थाला ते दोन विचार सुचले. नंतरच्या दोन आठवड्यांत राहेलला हाताशी घेऊन इस्थानं बरीच जुळवाजुळव करत आणली होती. काडेपेट्या, बटाटे, पोचे आलेलं एक जुनंपानं फ्रायपॅन, हवा भरून फुगवलेलं बदक, तळव्याशी रंगीबेरंगी तुकडे असलेले मोजे, लंडनच्या रस्त्यावर धावणारी बस – पोटात भरलेली बॉलपेनं आणि सैल झालेल्या बटणांचे डोळे लावलेला क्वान्टा कोओला.

'पण समज, की अम्मूनं आपल्याला शोधून काढलं आणि घरी परत येण्यासाठी खूपच विनंत्या केल्या, तर?'

'मग जायचं घरी... पण अम्मूनं विनंती केली तरच जायचं.'

– इस्थानं ठरवून टाकलं होतं.

सोफी मॉलनं हट्ट करून दोघांना पटवलं. 'मला घेऊनच चला तुमच्याबरोबर' म्हणून ती मागेच लागली. घरातली मुलं – सगळी मुलं – एकाच वेळी घर सोडून गेली, तर मोठ्या माणसांना चांगली अद्दल घडेल, म्हणून आपल्याला बरोबर नेणं आवश्यकच आहे, असं सोफी मॉलनं परत-परत सांगितलं. 'पाईड पायपर' सगळ्या मुलांना आपल्यामागे घेऊन गेला, तेव्हा हॅमलिनमधले सगळे आई-बाबा आणि मोठी माणसं खूप रडली. आपल्या घरी पण तेच घडेल, हे सोफी मॉलचं म्हणणं जुळ्यांना पटकन पटलं. घरातली माणसं इकडे शोधतील, तिकडे शोधतील... शेवटी 'तिन्ही मुलं मेली' म्हणून खूप रडत घरी परत येतील, तेव्हाच आपण जायचं, म्हणजे सगळ्या मोठ्यांना मुलांची किंमत कळेल... मग सगळे आपल्यावर खूप प्रेम करतील, सारखे आपल्या आवतीभोवती राहतील – असं एक छान गणित सोफी मॉलनं मांडून दाखवलं. शेवटी 'तुम्ही मला आपल्याबरोबर नेलं नाहीत, तर घरचे लोक मला एकटीला टोचून खातील, शिक्षा करतील, उपाशी ठेवतील. मग नाइलाजाने तुम्ही कुठे लपलायत ते मला सांगावं लागेल' – अशी शक्यताही नीट समजावून दिली.

सोफी मॉल होडीत बसली.

मग राहेल चढली.

आणि कसबी नावाड्याच्या थाटात इस्थानं आपली जागा घेतली. पायरीला पाय लावला आणि दोर सोडून होडी पाण्यात लोटली.

खोल पाण्यात गेल्यावर होडीला चांगलेच हेलकावे बसू लागले. इस्था सावरून बसला. त्याने प्रवाहाच्या उलट्या दिशेनं वल्हं मारायला सुरुवात केली. वेलुथानं दिलेला धडा इस्थाला शब्दश: आठवत होता *(ज्या दिशेला जायचं, तीच दिशा धरली पाहिजे.)*.

पुढे अंधार गडद झाला. आजूबाजूचं काहीच दिसत नव्हतं. आपली दिशा चुकली आहे, गर्दीनं गजबजलेल्या महामार्गावर भलतीच 'लेन' पकडावी, तशी अवस्था झाली आहे, हे कुणालाच दिसणं शक्य नव्हतं. झाडांच्या तुटक्या फांद्या, वरून वाहत आलेले ओंडके

आपल्या दिशेनं रोंरावत येताहेत, हेही कळत नव्हतं.

नदीच्या पोटात, मधली खोली पार करून मुलांची होडी पुढे गेली. पल्याडचा किनारा दिसतो न् दिसतो, तोच वाहत आलेल्या एका ओंडक्याशी टक्कर होऊन कुणाला काही कळायच्या आता होडी कलंडली. हा प्रकार याच्याआधीही पुष्कळदा झाला होता. पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज चुकून होडी कलंडली की, सरळ हातपाय मारायला सुरुवात करायची आणि उलट्या होडीचा तराफा करून तरंगत-तरंगत नदीपार व्हायचं, याचा जुळ्यांना उत्तम सराव होता.

...पण या वेळी मात्र काळ्याकुट्ट अंधारात हातून सुटलेली होडी प्रवाहाबरोबर वाहत कधी पुढे निघून गेली, हे इस्था आणि राहेलला कळलंसुद्धा नाही. मग दोन्ही मुलं जीवाच्या करारानं पोहत-पोहत किनाऱ्याशी पोचली. होडीचा तराफा मदतीला नसताना एकेकट्यानं पाण्यात पोहणं किती कष्टाचं असतं, हे त्यांना पहिल्यांदाच कळत होतं.

किनाऱ्यावर उभ्या असलेल्या झाडाची नदीवर झुकलेली फांदी पकडून, इस्थानं एक लांबलचक लोंबकळी घेतली. डोळे बारीक करत नजरेच्या टप्प्यातला प्रवाह न्याहाळून तो झपकन परत आला आणि खाली उतरला.

'काहीच दिसत नाहीये, राहेल. आपली होडी गेली बहुतेक वाहून.'

–तोवर चिखलात बरबटलेली राहेल धापा टाकत किनाऱ्यावर आली होती. तिनं इस्थाला हात देऊन चिखलातून वर खेचलं.

नाकातोंडात पाणी गेलेलं. उडणारी छाती आणि फुललेला श्वास.

अर्धं मिनीट स्वस्थ उभं राहिल्यावर नक्की काय झालंय, ते हळूहळू लक्षात यायला लागलं. इतकी छान होडी वाहून गेल्याचं दु:ख तर होतंच.

'होडी गेली ती गेलीच; पण आपला सगळा खाऊसुद्धा ओला झाला असेल नं?' – राहेल सोफी मॉलला म्हणाली. मागून काही उत्तरच आलं नाही.

– एक विचित्र शांतता.

राहेल धसकली.

सोफी मॉल?

'सोफी मॉलऽऽऽ'– समोरच्या वाहत्या नदीकडे बघून राहेलनं जोरात हाकारा घातला.

'इकडे आहोत आम्ही... लिंबाच्या झाडाजवळ. तू कुठेयस? कुठेयस तू सोपâी मॉल?'

– नदी शांतच होती.

समोरून कसलाच आवाज उमटला नाही.

उत्तर आलं नाही.

राहेलच्या मनात दबा धरून बसलेल्या पाप्पाचींच्या पतंगानं आपले काळपट, खिन्न, केसाळ पंख हलकेच उघडले.

आत.

बाहेर.

मग हळूच पाय उचलला.

वर.

खाली.

काय झालं आहे, हे कळताच इस्था आणि राहेल त्या किर्रऽऽ अंधारात वेड्यासारखे धावत सुटले. दोघांनीही प्राण कंठाशी येईपर्यंत सोफी मॉलला हाका मारल्या.

– पण ती निघून गेली होती.

शांत संथ प्रवाहाबरोबरच... समुद्राच्या दिशेनं.

भुरकट हिरवट पाण्यातल्या माशांबरोबर... आभाळ आणि झाडांबरोबर... मध्यरात्री विखरून पडलेल्या चंद्राच्या असंख्य तुकड्यांबरोबर...

नदी शांत होती.

कसल्याही वादळाची खूण नाही. लाटा नाहीत. पोटातून उफाळणारे भोवरे नाहीत. भोवऱ्यातून भळभळणारं दु:ख नाही. सगळा सन्नाटा.

...आणि एक शांत, सहज स्वीकार!

होडी कलंडली.

त्यातून एक गठुळं पडलं.

जे मिळालं, ते पोटात घेऊन मीनाचल शांत वाहत राहिली.

एक छोटीशी भेट. क्षणभर चमकून पुन्हा विझलेलं सूर्यबिंब... आणि छोट्याशा मुठीत घट्ट पकडलेलं एक चांदीचं अंगुस्तान.

पहाटेचे चार वाजले, तरी अंधार उजळला नव्हता. शेवटी थकली-भागलेली, घाबरलेली, चिखलात लडबडलेली, थंडीनं कुडकुडणारी दोन मुलं कसेबसे पाय ओढत हिस्टरी हाऊसपर्यंत पोचली.

मागच्या व्हारांड्यात आधीच अंथरून ठेवलेल्या, गवताच्या चटईवर दोघांनी थकून अंग टाकलं.

हवा भरलेलं बदक आणि सैल डोळ्यांच्या क्वान्टा कोओला अस्वलाबरोबर भीतीनं दातखिळी बसलेले, हादरून गेलेले दोन ओलेचिप्प जीव पाय पोटाशी घेऊन निपचित पडून राहिले.

‘ती मेली असेल का रे एव्हाना?’

– इस्था काही बोलला नाही.

‘काय होईल आता?’

‘काय होणार दुसरं? आपल्याला तुरुंगात जावं लागणार.’

– इस्थाला सगळं ठाऊक होतं.
लिट्ल मॅन... ही लीव्हड् इन कॅरव्हॉन... डमडम...

हिस्टरी हाऊसच्या व्हारांड्याशेजारच्या सावलीत आणखी कुणीतरी झोपलं होतं.
एकटं.
एकाकी लांडग्यासारखं.
काळयाभोर पाठीवर तपकिरी पर्णखुण.
त्या शुभशकुनामुळेच तर पाऊस वेळेवर यायचा.
– पण इस्था आणि राहेलला काहीच दिसलं नाही.
ते एकटेच होते.
एकेकटे.

प्रकरण १७
कोचिन हार्बर टर्मिनस

घाणेरड्या, गलिच्छ कुबट 'आयमेनेम हाऊस'मधल्या आपल्या स्वच्छ, नीटनेटक्या खोलीत इस्था बसला होता.

आजूबाजूला अंधार आणि बिछान्यावर इस्था. सरळ, ताठ मानेनं बसलेला. खांदे ताणलेले. दोन्ही हात मांडीवर शिस्तीत ठेवलेले.

'इन्स्पेक्शन'ला बसल्यासारखा.

किंवा अटक करायला येणाऱ्या पोलिसांची वाटच बघत असल्यासारखा.

नुकतीच इस्त्री करून झाली होती. टेबलावर कपड्यांच्या घड्या नीट रचून ठेवलेल्या. त्यानं राहेलच्या कपड्यांनाही इस्त्री करून टाकली होती.

खूप वेळापासून पावसाची रिपरिप चालू होती. रात्रीचा कंटाळवाणा, लोचट पाऊस. बाकीचे सगळे बॅण्डवाले आपापला सराव संपवून झोपायला गेले, तरी कुणीतरी एक अवलिया खूप वेळ ड्रम बडवत राहावा... तशी पावसाची अखंड रिपरिप.

इस्थाच्या खोलीबाहेर, 'पुरुषाच्या गरजा भागवण्यासाठी' बसवलेल्या स्वतंत्र दारापलीकडच्या पोर्चमध्ये प्लायमाऊथच्या दिव्यांभोवतीची चंदेरी पट्टी मधूनच चमकत होती. चाको कॅनडाला निघून गेल्यानंतर कित्येक वर्षं बेबी कोचम्मानं जुन्या प्लायमाऊथची देखभाल केली. रोज धुणं-पुसणं चालू राहिलं. कोट्टायमच्या म्युनिसीपालटीत कचऱ्याची घंटागाडी घेऊन गल्लोगल्ली फिरून कचरा जमवणारा कोचु मारियाचा मेव्हणा आठवड्यातून दोनदा येऊन गाडीला बाहेरची हवा दाखवून आणत असे. तो निघून गेला तरी, त्याच्याबरोबर आलेली कोट्टायमच्या कचऱ्याची दुर्गंधी खूप वेळ मागे रेंगाळत राही. जेमतेम पगारावर बड्याघरी काम करण्याचा रुबाब मारणाऱ्या मेहुणीचा नक्षा उतरवण्याची संधी आणि जुन्या प्लायमाऊथची थकलीभागली बॅटरी 'चार्ज' करण्याचं श्रेय कोण कशाला सोडेल?

पुढे बेबी कोचम्माच्या डोक्यात टी. व्ही.चं खुळ घुसलं आणि तिनं फ्लायमाऊथचा नाद सोडून दिला. जीव की प्राण करून वाढवलेल्या बागेकडे तर ढुंकूनही पाहिनाशी झाली.

...टुटी-फ्रुटी!

वर्षांमागून वर्षं उलटली. दर पावसाळ्यात गाडीची सपाट चाकं जमिनीत अधिकाधिक रूतत गेली. संधिवात झालेल्या कोंबडीनं शरीराला विचित्र बाक देऊन वर्षानुवर्षं अंडी उबवत बसावं, तशी प्लायमाऊथची अवस्था झाली होती... उठून उभं राहण्याची इच्छा नाही, चार पावलं चालण्याची शक्ती नाही. हळूहळू तिच्या गंजलेल्या

चाकाभोवती गुडघाभर गवत वाढलं. गाडीच्या टाळक्यावर टांगलेला 'द पॅराडाइज पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्'चा साईनबोर्ड सडला, कुजला आणि शेवटी मोडून पडलेल्या मुकुटासारखा वरच्यावर लटकत राहिला.

ड्रायव्हरच्या खिडकीबाहेर लावलेल्या, पारा उडालेल्या आरशात आपलं रूपडं बघण्यासाठी सरपटत, गंजलेल्या पत्र्याला विळखे घालीत वर चढणाऱ्या वेलींमध्ये एकच स्पर्धा लागली होती.

प्लायमाऊथच्या मागच्या सीटवर एक चिमणी मरून पडलेली. घरटं बांधण्यासाठी मऊमऊ स्पंजचा एखादा तुकडा मिळाला तर पाहावा, या आशेनं कुठल्यातरी एका भोकातून गाडीत घुसलेल्या चिऊताईंना बाहेर यायचा रस्ता मात्र अखेरपर्यंत शोधता आला नाही. खिडकीवर चढवलेल्या धुरकट काचांवर चोच आपटून-आपटून चिमणीनं आकांत मांडला; पण कुणाचंही तिकडे लक्ष गेलं नाही. शेवटी दोन्ही पाय वर करून ती मरून पडली.

दिवाणखान्यातला टी. व्ही. अखंड चालू होता. हिरव्या-निळया मुंग्यांचा तो प्रकाश पांघरून पाय पोटाशी घेतलेली बेबी कोचम्मा निवांत झोपली होती.

अमेरिकेतले काही पोलीस अर्धवट वयाच्या एका बंडखोर, नतद्रष्ट तरुणाला बेड्या घालून जीपमध्ये कोंबून बसवत होते.

रस्त्याच्या कडेचा फुटपाथ रक्तानं माखलेला.

पोलिसांच्या जीपचे लाईट लागले आणि सायरन वाजवत जीप सुरू झाली. उद्ध्वस्त झालेली एक बाई घाबरलेल्या नजरेनं मुलाकडे पाहात होती. त्याची आई असावी.

पोलिसांच्या पकडीतून सुटण्यासाठी त्या मुलाने आकांत मांडला होता. चेहरा रक्तानं माखलेला. टी शर्टही पुढून रक्तात भिजलेला. जणू हनुवटीखाली गळयात बांधलेलं लाल लाळेरंच! रागानं गुरगुरणारे दात रुतून त्याच्या कोवळया गुलाबी ओठांवर रक्ताचा थेंब टचटचून उठला होता.

तो लांडग्यासारखा चवताळून उठलेला. जीपमध्ये बंद केल्यावरही कॅमेऱ्याच्या दिशेनं चाललेला त्याचा आरडाओरडा थांबला नव्हता.

'आयॅम फिफ्टीन इयर्स ओल्ड अॅन्ड आय विश, आय वेअर अ बेटर पर्सन दॅन आय अॅम. बट आयॅम नॉट. डु यु वॉन्ट टू हियर माय पॅथेटिक स्टोरी?'

– बोलता-बोलता जीप हलली, तसा तो कॅमेऱ्याच्या दिशेनं पचकन थुंकला.

टी. व्ही.च्या अख्ख्या पडद्यावर त्याची थुंकी पसरली आणि ओघळून ओघळून खाली गळत राहिली.

बेबी कोचम्मा जागी होती.

आपल्या खोलीत बसल्याबसल्या लिस्ट्रीन माऊथवॉशच्या जहिरातीतलं कुपन भरत होती. ते कुपन भरलं की, अर्धा लीटर माऊथवॉशच्या नव्या बाटलीवर दोन रुपयांची घसघशीत सूट मिळणार होती आणि 'लकी विनर्स'करता दोन हजार रुपयांचं गिफ्ट व्हाऊचर होतं, तेही कदाचित आपल्याला मिळेल, असा बेबी कोचम्माचा होरा होता.

खोलीतल्या दिव्याभोवती पिंगाणी भिरभिरू लागली. त्यांचा त्रास फारच वाढल्यावर बेबी कोचम्माने सरळ दिवे बंद केले आणि पाणी घातलेल्या एका पसरट ताटलीतली मेणबत्ती लावली. ताटलीतलं पाणी आधीच पिंगाण्यांच्या तरंगत्या मृतदेहांनी भरलं होतं. त्यात आता आणखी नव्या मृतदेहांची भर!

रूजचे गोळे थापलेले बेबी कोचम्माचे गाल आणि रंगवलेला चेहरा, मेणबत्तीच्या मंद प्रकाशात भलताच उजळला होता. मस्कारा थोडा इकडेतिकडे फासटलेला, आणि दागिन्यांची झळझळ.

डोळे बारीक करकरूनही काही दिसेना; तेव्हा बेबी कोचम्मानं हातातलं कुपन मेणबत्तीपुढे धरलं.

'तुम्ही नेहमी कोणत्या कंपनीचा माऊथवॉश वापरता?'

– 'लिस्ट्रिन.'

– थरथरत्या हातांनी वेड्यावाकड्या अक्षरात बेबी कोचम्मानं लिहून टाकलं.

'हाच माऊथवॉश का वापरता? कारणं सांगा.'

या प्रश्नावर बेबी कोचम्माला फारसा विचारच करावा लागला नाही.

टॅन्जी टेस्ट... फ्रेश ब्रीद

टी. व्ही.वरच्या जाहिराती पाहून-पाहून अशी तिखटमिठाची, चुरचुरीत भाषा तिला जमायला लागली होती.

मग कुपनमधल्या रिकाम्या जागेत तिनं आपलं नाव लिहिलं. म्हातारया वयामधून बरीच वर्षं वजा करून एक तरुण थाप ठोकली.

व्यवसाय या कॉलमपुढे तिने रुबाबदार इंग्रजीत लिहिलं –

ऑर्नामेन्टल गार्डनिंन (डिप्लोमा) रॉचेस्टर युनिव्हर्सिटी, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका.

– पूर्ण भरून झालेलं कुपन तिनं एका रिकाम्या पाकिटात घातलं. वर लिहिलं –

रि ला य ब ल मे डि को ज्, को ट्टा य म

सकाळी बेकरीतून क्रीम बन्स आणायला कोचु मारिया कोट्टायमला जाईल, तेव्हा तिच्याबरोबर पाठवून देऊ, असा विचार करून बेबी कोचम्मानं आपलं पाकीट नीट जपून ठेवलं.

मग तिनं गडद तपकिरी रंगाची एक डायरी काढली. त्या डायरीच्या पोटातच एक पेन

अडकवलेलं होतं. १९ जून या तारखेचं पान काढून तिनं लिहायला सुरुवात केली. काय लिहायचं, ते कित्येक वर्षांपासून ठरलेलंच होतं –

आय लव्ह यू... आय लव्ह यू...

– कंटाळा येईपर्यंत तेच लिहायचं.

डायरीच्या प्रत्येक पानावर तेच.

आणि आजवर लिहिलेल्या प्रत्येक डायरीत तेच.

बेबी कोचम्माकडे अशा डायऱ्यांनी खचाखच भरलेली एक भलीमोठी ट्रंकच होती. त्या ट्रंकेशिवायही आणखी कुठल्या-कुठल्या बोचक्यात तिच्या डायऱ्या होत्या. काही डायऱ्यांमध्ये काही पानावर रोजचा जमा-खर्च, 'आज' करायच्या कामांच्या याद्या, आवडत्या टी. व्ही. सिरिअलमध्ये खास आवडलेले डायलॉग्ज असं काय काय भरलेलं होतं; पण मजकूर कोणताही असला, तरी प्रत्येक पानाची सुरुवात त्याच शब्दांनी – आय लव्ह यू... आय लव्ह यू...

ऋषिकेशच्या उत्तरेला असणाऱ्या आश्रमात कावीळ झाल्यानं फादर मुलीगनचा मृत्यू झाला, त्याला चार वर्षं उलटून गेली होती. नीट मुद्द्यापुराव्यानिशी हिंदू धर्माची विचारधारा खोडून काढता यावी, या धर्माची टिंगल करता यावी म्हणून फादर मुलीगननी हिंदू पोथ्या-पुराणांच्या अभ्यासाला सुरुवात केली होती. अभ्यास सुरूच राहिला आणि त्यांच्याही नकळत अभ्यासाचे हेतू बदलत गेले. उपहासाची जागा औत्सुक्यानं घेतली आणि फादर मुलीगन हिंदू तत्त्वज्ञानाकडे आपसूक ओढले गेले. पंधरा वर्षांपूर्वीच त्यांनी रीतसर हिंदू धर्म स्वीकारला. स्वत:ला 'वैष्णव' म्हणवून घ्यायला सुरुवात केली आणि पुढचं सगळं आयुष्य विष्णुभक्तीमध्ये घालवायचं, असं ठरवून टाकलं. आश्रमात राहायला गेल्यानंतरही त्यांनी बेबी कोचम्माशी संपर्क ठेवला होता. दर दिवाळीला ते आवर्जून पत्र पाठवत आणि नववर्षाचं शुभेच्छापत्रही न चुकता बेबी कोचम्माला मिळत असे. एका आध्यात्मिक चर्चासत्रात पंजाबी विधवा स्त्रियांच्या गटासमोर भाषण करतानाचा आपला फोटोही फादर मुलीगननी काही वर्षांपूर्वी बेबी कोचम्माला पाठवला होता. सगळ्या बायका एकजात मध्यमवर्गीय... पांढऱ्याधोप साड्या आणि डोक्यावरून हातभर पदर ओढलेला. फादर मुलीगन मात्र भगव्या वेषात होते. पार छातीच्या खाली रूळणारी रुबाबदार पांढरीशुभ्र दाढी आणि कपाळावर रेखलेला भगवा कुंकुमतिलक. फोटोमध्ये फादर मुलीगनचं हे रूप बघून क्षणभर बेबी कोचम्माचा विश्वासच बसेना.

– तो फोटो बेबी कोचम्मानं काही दिवस जवळ ठेवला आणि नंतर फाडून टाकला.

फादर मुलीगननी अखेर आपला कडवा धर्माभिमान बाजूला ठेवला, सगळ्या शपथा, प्रतिज्ञा मोडून टाकल्या; पण 'आपल्यासाठी' नव्हे – तर दुसऱ्या शपथांसाठी, दुसऱ्या

प्रतिज्ञांसाठी – याचा बेबी कोचम्माला फार त्रास झाला. ती मनातून दुखावली गेली. एखाद्याच्या स्वागतासाठी जीव तोडून दोन्ही हात पसरायचे आणि आपल्याकडे येणारी ती प्रिय व्यक्ती आपल्याकडे ढुंकूनही न बघता कुणा तिसऱ्याच्याच मिठीत शिरलेली पाहायची... या अपेक्षाभंगाचं दु:ख बेबी कोचम्माला क्लेश देऊन गेलं.

फादर मुलीगनच्या मृत्यूची वार्ता कळल्यानंतरही बेबी कोचम्माच्या डायरीतला मजकूर बदलला नाही. फादर मुलीगन शरीरानं हयात असले अगर नसले, तरी बेबी कोचम्माच्या दृष्टीनं फरक पडत नव्हता. उलट त्यांच्या मृत्यूनंतरच फादरच्या आठवणींचा सहवास तिनं खुल्या मनानं पुरेपूर उपभोगला. त्यांच्या हयातीत गमावलेला 'सहवासाचा आनंद' बेबी कोचम्मानं त्यांच्या मृत्यूनंतर लुटला. आठवणीतले का असेनात; पण फादर मुलीगन आता तिचे 'एकटीचे' होते. दोघांमधली धर्माची भिंत उरली नव्हती, त्यांच्या भोवती-भोवती घोटाळणाऱ्या नन्सबद्दलचा सवतीमत्सर संपला होता. फादर मुलीगनना बेबी कोचम्मापासून दूर ओढणारे साधू-संत आणि स्वामीही आता उरले नव्हते. फक्त दोघांचं जग – (आठवणीतले) फादर मुलीगन आणि बेबी कोचम्मा!

हळुवार प्रेमानं का असेना, पण फादर मुलीगननी आपल्याला नाकारलं, झिडकारलं होतं, या वेदनेचा डंख त्यांच्या मृत्यूनंतर उसवला, कमी झाला. आता आठवणीतले फादर मुलीगन बेबी कोचम्माचा अनुनय करू लागले. कुणाही तरुणानं आपल्या प्रेयसीला रिझवावं, तसं तिला रिझवू लागले. त्यांच्या मृत्यूची बातमी कळताच बेबी कोचम्माने त्यांची लांबलचक दाढी कापून टाकली. अजागळ भगवे कपडे ओढून काढले आणि फादर मुलीगनच्या अंगात 'कोका-कोला'ची रुबाबदार अक्षरं लिहिलेली, मॉडर्न कफनी चढवली (फादर मुलीगनचे कपडे बदलताना त्यांचं ते ख्रिस्तासारखं कणखर शरीर पाहून बेबी कोचम्माच्या अंगावर रोमांचही उभे राहिले. आतून-आतून कसल्या उष्ण लाटा धावत आल्या.).

कपडे बदलून झाल्यावर बेबी कोचम्मानं फादर मुलीगनच्या हातातलं भिक्षापात्र हिसकावून फेकलं. त्यांच्या पायातल्या बोचऱ्या, हिंदू खडावा काढून आधुनिक फॅशनचे आरामदायी सँडल्स घातले. आता बेबी कोचम्माचे फादर मुलीगन, दर गुरुवारी दुपारचं भोजन करायला येणाऱ्या रुबाबदार पुरुषोत्तमासारखे दिसू लागले होते.

मग दर रात्री, रात्री मागून रात्री, वर्षामागून वर्षं, डायरीमागून डायरी मागून डायरी तिनं एकच घोशा लावला; आय लव्ह यू. आय लव्ह यू...

मनात होतं, ते सगळं लिहून झाल्यावर बेबी कोचम्मानं कण्यामधल्या खोबणीत पेन अडकवून टाकून डायरी बंद केली. चष्मा काढला, जिभेचं टोक लावून दातांच्या कवळ्या काढल्या, हिरड्यांना लगटून दात नीट बसावेत म्हणून कवळ्यांना आतून लावलेली चिकट गम नखानं खरवडून काढली आणि लिस्ट्रिन माऊथवॉशनं भरलेल्या एका छोट्या ग्लासात

कवळया टाकल्या. सगळे दात डुबकी मारून ग्लासच्या तळाशी जाऊन बसले आणि त्या दातांनी प्रार्थना पुटपुटावी तसे बुडबुडे उसळून वर आले. खूप वेळ लिस्ट्रिन माऊथवॉशच्या पृष्ठभागावर तरंगत राहिले. नंतर मग बेबी कोचम्माचं ठरलेलं पेय - गोटी बसवलेल्या बाटलीतला फसफसता सोडा.

उशीवर डोकं ठेवून पांघरुणात शिरलेली बेबी कोचम्मा खूप वेळ टक्क जागी होती. राहेल इस्थाच्या खोलीतून बाहेर पडली की नाही? – कसलातरी आवाज येईल म्हणून तिचे कान टवकारले होते. त्या दोघांचा त्रास काही संपत नव्हता. विचित्र, अवघडल्यासारखं झालं होतं. काही दिवसांपूर्वी एका सकाळी (थोडी ताजी हवा श्वासात भरून घ्यावी म्हणून) बेबी कोचम्मानं खिडकी उघडली, तर समोर इस्था आणि राहेल. ते दोघे कुठूनतरी नुकतेच परत येत होते. म्हणजे अख्खी रात्र त्यांनी एकमेकांबरोबर बाहेरच घालवलेली असणार. ही भावंडं कुठं गेली असतील? त्यांना आता इतक्या वर्षांपूर्वीचं काय-काय आठवत असेल? कधी एकदाची जातील या घरातून? आणि रात्र रात्र एकत्र बसून कसली खलबतं चालतात दोघांची?

– खूप वेळानं बेबी कोचम्माला झोप अगदी अनावर झाली. उलटसुलट विचार करून-करून ती आधीच थकली होती. त्यात आणखी किती वेळ आवाजाचा कानोसा घेणार? बाहेर पावसाची रिपरिप आणि घरातल्या टी. व्ही.चा आवाज, यांमुळे आपल्यालाच काही ऐकू आलं नसेल... राहेल कधीच आपल्या खोलीत जाऊन झोपली असणार! – बेबी कोचम्मानं स्वत:चीच समजूत घातली, तेव्हा कुठं तिचा डोळा लागला.

राहेल झोपली नव्हती.

ती जागी होती.

इस्थाच्या बिछान्यावर.

बारकीशी, काटकुळी, खूपच लहानखुरी, तरुण तरतरीत दिसत होती.

बिछान्याशेजारच्या खिडकीकडे तोंड करून झोपली होती. बाहेर पावसाचं थैमान. जोरानं कोसळणारी सर खिडकीच्या गजांवर आपटून फुटत होती. दाराच्या फटा।तून आत घुसणारे बारीक तुषार राहेलच्या चेहऱ्यावर बसत होते. तिचा उघडा, गोरा दंडही एव्हाना पुष्कळसा भिजला होता.

राहेलनं घातलेला बिनबाह्यांचा पिवळा टी शर्ट तेवढा उजळून दिसत होता; आणि कमरेखालची निळी जीन्स अंधारात विरघळून गेलेली.

निरव शांतता.

ओलीचिंब, दमट हवा... झोंबरा गारठा.

– आणि बोलण्यासारखं काही नाही.

बिछान्याच्या अगदी टोकाशी बसलेला इस्था मान न वळवतासुद्धा राहेलला पाहू शकत होता.

तिची आकृती.

हनुवटीखालून गालांपर्यंत जाणारी धरधरीत रेघ.

गळ्यापासून खांद्यापर्यंत पसरलेले छोटे, डौलदार पंख असावेत अशी तिची कॉलर-बोन्स.

त्वचेच्या आवरणात लपून बसलेला जणू एक छोटुला पक्षीच.

तिनं मान वळवली आणि इस्थाकडे पाहिलं. तो ताठ बसला होता. इस्त्रीचं काम नुकतंच हातावेगळं झालं होतं.

त्याच्या मनात मायेचा, प्रेमाचा पूर.

तिचे सुंदर केस, छोटेसे पण तेजस्वी तरतरीत हात.

ती...

– त्याची बहीण

अचानक त्याच्या डोक्यात कसला तरी आवाज सुरू झाला... चकाकत्या रुळावरून धडधडत जाणाऱ्या रेल्वेचा आवाज... चमकणारे मिटणारे, उघडझाप करीत धावणारे खिडकीतल्या प्रकाशाचे चौकोन.

खिडकीत बसणाऱ्याच्या चेहेऱ्यावर पडतात... रेल्वे धावते त्या गतीनं धावतात.

– इस्था पुन्हा एकदा सावरून बसला.

ताठ.

तरीही त्याला ती दिसत होती.

अम्मूच्याच त्वचेमध्ये वाढली असावी तशी... अम्मूसारखीच... अम्मूच!

अंधारात चमकणारे पाणीदार डोळे, छोटंसं सरळ नाक. घट्ट जिवणी. कसला तरी घाव बसला असावा तशा दुखऱ्या दु:खानं मिटून घेतलेले ओठ.

खूप वर्षांपूर्वी एका पुरुषानं – बोटात अंगठ्या घातलेल्या पुरुषानं – हाताच्या जोरदार फटक्यानं चेचून काढले असावे असे हुळहुळे... पण सुंदर ओठ.

त्यांच्या देखण्या, डौलदार आईचे – अम्मूचे ओठ.

त्या ओठांनीच रेल्वेच्या खिडकीतून त्याच्या हातांचा मुका घेतला होता.

मद्रासच्या दिशेनं निघालेल्या मद्रास मेलचा फर्स्ट क्लासचा डबा.

'बाय इस्था, गॉडब्लेस...'

– ते ओठ पुढचं काही बोलूच शकले नव्हते.

रडू फुटलेले... तरीही वरवर हसणारे अम्मूचे ओठ.

– तीच शेवटची भेट.

पुन्हा त्याला अम्मू दिसली नाही.

कोचिन हार्बर टर्मिनसच्या प्लॅटफॉर्मवर रेल्वेच्या 'त्या –' खिडकींकडे डोळे लावून उभी असलेली अम्मू. तिच्या सतेज कांतीवरचा एरवीचा झळाळ पार लुप्त झालेला... फिकट चेहरा, म्लान... खिन्न... आणि निरोपाची नजर! स्टेशनवरच्या न्यूऑन साईन्सच्या झगमगाटात अम्मू अधिकच आक्रसलेली दिसत राहिली. दोन्ही बाजूला जाणाऱ्या-येणाऱ्या रेल्वे गाड्यांचे अजस्र देह धापा टाकत उभे... स्टेशनवरच्या अंधाराला बाटलीत बंद करून ठेवणाऱ्या बुचांसारखे!

मद्रास मेल.

फ्लाईंग राणी.

अम्मूचं बोट धरून कंटाळलेल्या चेहऱ्याची राहेल... इकडेतिकडे भिरभिरणारा डास बांधून ठेवावा तशी! विमानतळावरच्या चुण्याचुण्यांचा रुबाबदार फ्रॉक रेल्वे स्टेशनवर फार विस्कटून, मळून गेला होता. आजूबाजूला घोंघावणारे स्टेशनवरच्या घाणेरड्या वासाचे किळसवाणे ढग पांगवण्यासाठी राहेल उगीचच एक पाय प्लॅटफॉर्मवर आपटत दुसऱ्या पायावर उभी. शेवटी अम्मू चिडून ओरडली.

स्टॉप्पीट.

सो, शी स्टॉप्पीटेड.

दोघींच्या भोवती ओसंडून वाहणाऱ्या गर्दीचा मळकट समुद्र.

आरडाओरडा, घाईगर्दी, धावपळ, विक्रेत्यांचा कलकलाट, पोरांचे हट्ट, सामानाचे डोंगर, घामेजलेले हमाल, थुंकणारी, हगणारी-मुतणारी, जन्ता येणं-जाणं, भीक मागणं, रिझर्व्हेशन्स चेकिंग, घासाघीस, वादविवाद, तंटेबखेडे, घाणेरडा वास, कर्कश्श किंचाळ्या.

स्टेशनात घुमणारे नेहमीचे आवाज.

चहा-कॉफीची पिंप घेऊन फिरणारे फेरीवाले.

गुळगुळीत महागड्या मासिकांचे गठ्ठे वाहणाऱ्या, जे स्वत:ला स्वप्नातदेखील खाता येणार नाहीत, असे चमचमीत, चुरचुरीत अन्नपदार्थ विकणाऱ्या, उपासमारीनं पोटं खपाटीला गेलेल्या पोरांचे भुकेले लोंढे.

चॉकलेट्स, मिठाया, सिगारेटसारख्या लांबुडक्या गोळ्या.

ऑरेंजड्रिंक –

लेमनड्रिंक –

कोकाकोलाफॅन्टाईसक्रीमरोझमिल्क.

गोबऱ्या गालांच्या गुलाबी बाहुल्या.

पिवळीधम्म फ्रेम असलेले लाललाल काचांचे गॉगल्स.

किती वाजलेत, ते एकदाच पक्कं रंगवून टाकलेली खेळण्यातली घड्याळं.

जुनाट मोडक्या टूथब्रशची भलीमोठी टोपली.

– कोचिन हार्बर टर्मिनस.

स्टेशनभर पसरलेला अशक्त पिवळट प्रकाश. त्यात भुतासारखे भटकणारे हाडांचे सापळे. गेल्या वर्षीच्या दुष्काळानं पार पेकाटात लाथ घातलेल्या बेघर, भुकेल्या, माणसांचे तांडे. कोणे एके काळी पेकिंगच्या गळयातला ताईत असलेल्या कॉम्रेड ई. एम. एस. नंबुद्रीपाद यांनी सर्वसामान्य जनतेची क्रांती पुष्कळ पुढे ढकललेली.

जिकडेतिकडे घोंघावणाऱ्या माशांचे थवे...

निळी फेडेड जीन्स घातलेला निळया डोळयांचा एक गोरागोमटा देखणा माणूस, बोटं झडून गेलेल्या, ओढून फेकलेल्या सिगारेटच्या थोटकांच्या ढिगातून तंबाखू काढून घेणाऱ्या किळसवाण्या महारोग्याशी टाईमपास गप्पा मारत उभा होता.

'तुम्ही कधी आलात इकडं?'

जणू काही आलिशान बंगल्यांची श्रीमंती वसाहत सोडून, तो महारोगी गंमत म्हणून स्वत:च्या मर्जीनं स्टेशनात घर करून राहायला आला असावा.

सामानाचं वजन करणाऱ्या लालभडक काट्यावर बसलेल्या एका माणसानं सहज म्हणून एका पायावरचं मुंडू वर उचललं. गुडघ्याच्या खालचा पाय लाकडी... भरभक्कम पावलावर भलामोठा बूट आणि बुटाच्या वर निम्म्या पोटरीपर्यंत रंगवलेला पांढरा मोजा. मोज्याच्या वर पोटरीपासून गुडघ्यापर्यंतचा पाय गोरापान. गुलाबी. (माणसाचं शरीर कारखान्यात तयार करताना देवाच्या चुका माणसानं का कराव्यात?). लाकडी पायाच्या पोकळ पोटात त्या माणसानं आपलं तिकीट, मळका टॉवेल, पोचे आलेला स्टीलचा ग्लास असं काय काय ठेवलं होतं. शिवाय त्याच्या शरीराच्या वासांचा मोठ्ठा ढग, जन्मभराची गुपितं, त्याच्या प्रेयसीच्या सहवासातले क्षण, भन्नाट मूर्खपणा आणि वेडी आशा... अफाट आनंदाचे मोजके कण... रक्तामांसाचा त्याचा खराखुरा पाय मात्र उघडाच होता आणि त्याच्यावर माश्यांचा घोंघट.

तो सावकाश उठला आणि पायाच्या पोटात ठेवलेल्या स्टेनलेस स्टीलच्या ग्लासमध्ये चहा घेऊन आला.

तेवढ्यात एक म्हातारी बाई भडाभडा ओकली. पिवळट, चिकट उलटीचं ते आंबूस तळं ओलांडून पुढे निघून गेली.

गजबजत्या स्टेशनवरचा अखंड कलकलाट.

सर्कसच.

व्यापारउदिमाचा चमकता हंगामा चाल करून आला आणि स्टेशनवरचं जग मनातली

निराशी बोचक्यात बांधून, पाय पाठीशी लावून प्रचंड वेगानं पळत सुटलं... सगळीकडे झगमगाट पसरला.

पण जुळ्या मुलांना घेऊन या सर्कशीचा आनंद मनसोक्त लुटावा अशी अम्मूची अवस्था नव्हती. गाडीत बसून खिडकीच्या काचेतून गंमत बघावी, तर प्लायमाऊथ नव्हती. काहीच नव्हतं.

त्या तिघांनी सर्कसच्या वातावरणात उड्या घेतल्या, तेव्हा त्यांना वाचवणारी मोठमोठी जाळीदेखील शिल्लक उरली नव्हती.

मोडक्या दरवाजाची तुटलेली मूठ हातात घेऊन, गरागरा फिरवीत चाको संतापानं अम्मूच्या अंगावर ओरडला होता –

'सामान बांध आणि चालती हो. आत्ताच्या आत्ता तोंड काळं कर.'

मांडीवर रिबिनींचे वळवळते साप घेऊन, गरज नसताना, थरथरत्या हातानं त्यांची तोंडं शिवण्याचा प्रयत्न करत बसलेली अम्मू इतकी दचकली, की मान वर करून पाहायची हिंमत झाली नाही.

पण राहेलनं वर पाहिलं.

चाको निघून गेला होता.

...मोडक्या दाराच्या चौकटीत एक भयंकर अकराळविकराळ राक्षस!

तिचं मन धसकलं. धास्तावलं.

पांढरेधोप कपडे घातलेल्या एका सुटाबुटातल्या रुबाबदार माणसानं प्लॅटफॉर्मवरच्या फेरीवाल्याकडून रेल्वेत ओढण्याकरता सिगारेट विकत घेतल्या.

सिझर्स सिगारेट्स

तीन पाकिटं.

For Men of Action

Satist Action

– तोच माणूस इस्थाला आपल्याबरोबर नेणार होता. इस्थाचा एस्कॉर्ट.

मद्रासला निघालेले ओळखीचे गृहस्थ – श्रीयुत कुरियन मॅथ्येन.

इस्था एवढ्या मोठ्या माणसाबरोबर चाललाय; तर घरातल्या कुणी जायची गरज नाही. उगीच कशाला आणखी एका तिकिटाचे पैसे खर्चायचे, असं म्हणून माम्माचीनं इस्थाच्या सोबतीचा प्रश्न निकालात काढला होता.

मद्रासपासून कोलकात्यापर्यंतचं तिकीट इस्थाचा बाबाच काढणार होता.

आणि अम्मू?

तिच्यावर तर तिकिटाऐवजी (मिळाला तर) थोडासा वेळ विकत घेण्याची वेळी आली

होती.

एकाएकी सगळं कोसळून पडलेलं.

ते सावरता-सावरता सामानसुमान आवरून घराबाहेर पडायचं... स्वत:च्या पायावर उभं राहायचं... दोन्ही मुलांना आपल्याबरोबर घेऊन राहाणं परवडेल इतपत मिळकतीची तजवीज करायची.

– तोवर जुळ्यांपैकी एका मुलाला 'आयमेनेम हाऊस'मध्ये राहायची परवानगी होती.

दोघांपैकी... एक चालेल... पण दोघं नको.

एकत्र राहिली की दोघं वाट्टेल तो धिंगाणा घालतील.

पुन्हा त्यांच्या डोळ्यात सैतान उतरला तर?

– दोघांना एकमेकांपासून वेगळं करण्याखेरीज गत्यंतर नाही. कोण सांभाळणार नस्ती पीडा?

कदाचित त्यांचं बरोबर असणार.

– बॅग भरून उरलंसुरलं सामान होल्डॉलमध्ये कोंबता-कोंबता अम्मूच्या मनात विचार आला.

मुलाला नीट वाढवायचं, तर त्याचा बाप असायलाच हवा... हेही कदाचित खरं असेल.

पांढऱ्याधोप सुटाबुटातल्या त्या रुबाबदार माणसाची जागा इस्थाच्या पलीकडल्या कुपेमध्ये होती. 'एकदा गाडी सुटली, की मग जागांची अदलाबदल करून एकत्र बसू,' असं सांगून तो माणूस आपल्या कुपेकडे निघून गेला.

– तिघांचं छोटं कुटुंब पुन्हा एकटं... एकाकी पडलं.

या तिघांवर काय दुर्दशा कोसळलीय; ते त्या माणसाला ठाऊक होतं. यातून त्यांची सुटका नाही. जातील तिथे पुन्हा तेच त्यांच्या बोडक्यावर बसणार... वाकड्या झालेल्या मेणबत्तीतून ओघळणाऱ्या मेणासारखं आयुष्यभर दुर्दैव त्यांच्यावर गळतच राहणार, हेदेखील त्याला ठाऊक होतं.

त्याला का सगळ्यांनाच कळलं होतं.

सोफी मॉलचा मृत्यू, खून आणि अपहरणाचा गंभीर आरोप असलेल्या एका पारायार जातीच्या तरुणाचं पोलिसांशी झालेलं 'एन्काऊन्टर,' नंतर आयमेनेममधल्या 'पॅराडाईज पिकल्स अॅन्ड प्रिझर्व्हज्' कारखान्याला कम्युनिस्ट पार्टीच्या कार्यकर्त्यांनी घातलेला वेढा, दीनदलितांचे कैवारी म्हणवून घेणाऱ्या कॉम्रेड के. एन. एम. पिल्लईंनी संतप्त कार्यकर्त्यांसमोर घसा फोडून केलेली उग्र भाषणं, 'तो' तरुण पार्टीचा सक्रिय कार्यकर्ता होता, म्हणून त्याला खोट्या आरोपात गोवलं गेल्याचा घणाघाती आरोप, कारखान्याच्या व्यवस्थापनाला 'तो' नकोच होता; म्हणून पोलिसांच्या संगनमतानं त्याला जीवे

मारण्याचा कट करण्यात आल्याचा आरडाओरडा, जोरदार घोषणाबाजी, 'मुर्दाबाद'चे नारे.

हे सगळं सगळ्या वर्तमानपत्रांमध्ये छापून आलं होतं.

...म्हणजे प्रकरणाची अधिकृत बाजू!

इस्थाला आपल्याबरोबर घेऊन जाणाऱ्या त्या रुबाबदार माणसाला 'दुसरी बाजू' अर्थातच ठाऊक नव्हती.

हेही ठाऊक नव्हतं, की रात्रभर पडलेल्या पावसाचं पाणी पोटात घेऊन रोरावत वाहणाऱ्या मीनाचलच्या छातीवर पाय रोवून इभ्रतदार, उच्चवर्णीय पोलिसांची एक तुकडी या किनाऱ्यावरून त्या किनाऱ्यावर गेली. ओलीचिंब झूडपं ओलांडत, रपरपीत चिखल आणि झाडोरा तुडवीत 'हार्ट ऑफ डार्कनेस –'च्या दिशेनं झेपावली.

प्रकरण १८
द हिस्टरी हाऊस

रात्रभर पडलेल्या पावसाचं पाणी घेऊन रोंरावत वाहणाऱ्या मीनाचलच्या छातीवर पाय रोवून इभ्रतदार उच्चवर्णीय पोलिसांची एक तुकडी या किनाऱ्यावरून त्या किनाऱ्यावर गेली. ओलीचिंब झुडपं ओलांडत, रपरपीत चिखल आणि झाडोरा तुडवीत 'हिस्टरी हाऊस'च्या दिशेनं झेपावली. कुणातरी एकाच्या खिशात हातबेड्यांचा लोखंडी खणखणाट सुरू होता.

प्रत्येकाच्या पायावर कांजी घालून कडक केलेल्या खाकी हाफपॅन्टस्, पायाखालून धावणाऱ्या उंच गवताच्या शेंड्यांना वरून गोल स्कर्ट शिवला असावा, तशा! हे गोल गोल स्कर्ट एकेकटे धावत होते, त्यांच्या पोटातल्या पायांशी त्यांचा जणू संबंधच नव्हता, पॅन्ट स्वतंत्र. पॅन्टीतला पाय स्वतंत्र.

एकूण सहा जण होते. शासनाने निष्ठावंत सेवक.

Politeness

Obedience

Loyalty

Intelligence

Courtesy

Efficiency

निवडून-निवडून वेचक सद्गुणांची माळ आपल्या नावातच मिरवणारे कोट्टायमचे POLICE.

डोक्यावर कसल्यातरी विचित्र टोपलीसारखं शिरस्त्राण घातलेले नव्या जमान्यातले राजपुत्र. टणक पुठ्ठ्याची कळा आलेल्या खाकी कापडाचे सहा कटआऊटस्. चपचपीत केसांचे तेलकट डाग पडलेल्या सहा अजागळ खाकी टोप्या.

आतून विस्तवाचा जाळ.

खदखदून शिजलेला 'बेत.'

नक्की काय करायचंय; त्याचा पक्का आराखडा.

उंच वाढलेलं गवत तुडवत बारा पाय पुढे-पुढे धावत होते. बारा केसाळ पोटऱ्यांमध्ये अडकलेले कित्येक छोटे-मोठे किडे उगीचच रगडले गेले... घाणेरड्या मोज्यांच्या भोकाभोकाच्या छातीवर कित्येक गवतफुलं चिकटून बसली. लोखंडी नाल ठोकलेल्या इभ्रतदार चामड्याच्या उच्चवर्णीय बुटांखाली अनेक श्वास चिरडले, फरफटून मेले. वाळलेल्या कडक गवताचे रक्त काढणारे धारदार फर्राटे उठलेल्या पायांना मरणाची खाज

यायला लागली होती. ओल्या चिखलाच्या दलदलीतून पुढे धावताना रपारप आवाज येत होते.

पुढे पाय थकले. वेग मंदावला. ओले कपडे झटकून वाळत घालावेत, तसे आकाशाच्या पोटात पंख वाळवणाऱ्या झाडांवरच्या पक्ष्यांना ओलांडून पुढे जाता- जाता अनेकांची सावध झोप चाळवत होती. बगळे, करकोचे नदीकाठी वस्ती करणारे करढोक, नृत्यासाठी आसुसलेले सारस पक्षी, तिखट नजरेचे जांभळट बगळे... कानठळ्या बसवत मधूनच उठणाऱ्या व्रॅक व्रॅक व्रॅक च्या आरोळ्या... घरट्यात उबवणीला बसलेल्या पक्षिणी आणि त्यांच्या पंखाखालची अंडी.

पूर्वेला तांबडं फुटू लागलं होतं.

भयंकर भविष्य पोटात घेऊन काळ्याकुट्ट चेहऱ्याचा शुभ्र दिवस उजाडू घातला होता.

नदी ओलांडून, काठावर साचलेली तळी मागे टाकून म्हाताऱ्या-कोताऱ्या झाडांमधून वाट काढत ते भराभर चालत होते. बदबदीत जाडीची मनीप्लॅन्टस्... रानटी मिरवेली...

गवताच्या लांबलचक पात्यावर तोल सावरत मजेनं बसलेला इवलुसा निळा किडा.

एवढ्या प्रचंड पावसाशी दोन हात करून वाऱ्यावादळाशी झुंज देऊन चिवटपणे टिकून राहिलेली, या झाडापासून त्या झाडापर्यंत पसरलेली कोळ्यांची जाळी.

सगळी पानं फाटून गेलेल्या, झिरमिळ्या झालेल्या गोऱ्यापान केळीच्या कुशीत लटकणारं तपकिरी पांघरुणात लपेटलेलं केळफूल.

पानापानांवर अडकून पडलेले लाखो थेंब.

– जंगलांच्या मखमली पेटीतले झगमगते हिरेच!

काळसर लाल रंगाच्या किरमिजी फुलपाखरांचं प्रणयाराधन ऐन बहरात आलेलं. ओल्या हवेत भिरभिरत उडताउडता अर्ध्या क्षणाचा बेभान संभोग...

एकावर एक बसलेली फुलपाखरं... पुन्हा त्यांचं अलग होणं आणि उडता- उडता पुन्हा एकमेकांवर चिकटणं... हे सगळं एका चाणाक्ष पोलिसाच्या नजरेनं बरोबर टिपलं. त्याला कळेना, च्यायला ही पाखरं झवतात तरी कशी?

कोणाच्या कशात कोणाचं काय जातं? कुठून जातं?

– पण क्षणभरच. तो झपकन सावरला आणि भलते विचार झटकून फटकन् पोलीस झाला.

बारा पाय

पुढे चालू

धुव्वाधार पावसानं जागच्या जागी थिजून गेलेली मुंग्यांची वारुळं... 'पॅराडाइज पिकल्स'च्या दारावरचे पेंगुळलेले पहारेकरी ढासळत-ढासळत जावेत; तसे वारुळांचे ढीग –'

ओल्या हवेत मधुर सुरांच्या लडी वाहाव्यात, तशी मजेनं बागडणारी फुलपाखरं.

मोठमोठी नेचाची पानं.

भाबड्या नजरेचा एक कावेबाज सरडा.

कसलीकसली बटबटीत, भैताड फुलं...

आसरा शोधण्याकरता थैमान घातल्यासारखी लुटलुटत धावणारी रानकोंबड्यांची फौज...

वेल्लय्या पाप्पेनला शेवटपर्यंत न सापडलेलं जायफळाचं झाड...

कुठून-कुठून वाहून आलेल्या गाळानं चोंदलेला, हिरव्या सापासारखा सुस्त पसरलेला नाला.. त्याच्या पोटात घुसलेली झाडाची फांदी...

हातातल्या बांबूच्या लाठ्या गरागर फिरवीत एकामागून एक गोष्टी ओलांडत, तुडवत पोलीस ठरल्या दिशेनं धावत होते.

जणू जादूची कांडी हातात घेतलेल्या केसाळ पर्‍याच!

हळूहळू उजाडत होतं. झाडांच्या फांद्यांमधून वाट शोधत पहिली-वहिली किरणं किर्रर्रऽऽ जंगलात पाझरायला लागली होती. रातकिड्यांची कर्कश्श किरकिर शेवटची अस्ताई घेतल्यासारखी टीपेला पोचलेली.

रबराच्या झाडावर रात्रभर गुपचूप बसलेल्या खारुताईंची लगबग सुरू झाली होती. जिकडेतिकडे खाचा पाडलेल्या रबराच्या जखमी फांद्यांवरून वाट शोधत भिरभिरणार्‍या खारुताई कोवळं उन्ह खाण्यासाठी छानशी जागा शोधत असाव्यात.

साल तासून केलेले जुने घाव पुष्कळसे भरत आलेले... त्यातून पाझरणारी रबराची धार आटल्यावर बाटलीचं बूच बंद करावं, चिघळलेली जखम भरून यावी तसं!

... असा कित्येक एकरांचा पट्टा.

आणि पुढे जंगल छाटून साफसूफ केलेल्या गवताळ चौकोनावर ते घर.

द हिस्टरी हाऊस.

सताड उघड्या खिडक्यांचं, कडेकोट दारांचं...

थंडगार स्पर्शाची काळीशार दगडी जमीन. भरतीच्या लाटांवर डोलणार्‍या जहाजांसारख्या भिंतीवरून धावणार्‍या गूढ सावल्या. भिंतीवर टांगलेल्या जुन्याच चित्रांच्या मागे कोळीष्टकांच्या चिकट जाळ्यात लपलपणार्‍या जाडजाड शेपट्यांच्या, पांढर्‍याधोप, किळसवाण्या पाली... लांबचलांब वाढलेली नखं सावरत धडपडत चालणारे, जख्ख म्हातारे झाले, तरी एकमेकांमध्ये काहीतरी कुजबूज करणारे, जुनाट नकाशांसारखा कुजकट वास येणारे पूर्वज...

असं घर...

जिथे साधीसुधी स्वप्नं पुरली जातात जमिनीच्या पोटात खोल आणि नवीनच काही

उगवून येतं त्यांच्या गर्भातून... असं घर.

धारदार कोयता फेकून झाडाच्या पोटावर ठोकलेल्या गोऱ्या सायबाच्या भुताचा नक्षा, डोक्यावर ऐटबाज केसांचा कोंबडा मिरवणाऱ्या एका चालत्याफिरत्या प्रजातंत्रानं पार उतरवून लावला आणि आपल्या शेजारच्या जमिनीत उंच फडकता लाल बावटा रोवला... असं घर!

पोलिसांची पलटण येतेय असं दिसल्यावर त्या म्हाताऱ्या, गोऱ्या इंग्लिश भुताची आर्जवं सुरू झाली.

'एक्सक्यूज मी, वुड यु... यु वुडन्ट हॅपन्ड टु... म्हणजे तुमच्याकडं नसणारच माझ्या ब्रॅन्डचा सिगार... ना? नसणार ना? नसणारच... आय डीडन्ट थिंक सो.'

द हिस्टरी हाऊस –

तिथेच येणार होतं बीभत्स दहशतीचं क्रूर तुफान... आणि गाडलं जाणार होतं जमिनीखाली... पुढे कित्येक वर्षं जिवंत निखाऱ्यासारखी धगधगत राहणार होती ती दहशत... भाज्या चिरता-चिरता, शिजवता-तळता, उकडता-उकडता मजेत गुणगुणणाऱ्या हॉटेलमधल्या स्वयंपाक्यांच्या पायाखालचा जळता निखारा... कणा मोडून झुकून उभे असलेले जुने कम्युनिस्ट क्रांतिकारक, कणाकणानं मरत मरत जगणारं कथकली नृत्य, केरळच्या सांस्कृतिक इतिहासाचं खेळणं करून मौजमजा करणारे पर्यटक.

आणि पायाखाली जळता निखारा.

कित्येक वर्षांपूर्वी खोल गाडल्या गेलेल्या दहशतीचा.

घर फार सुंदर होतं.

पांढऱ्याशुभ्र भिंतींचं, लालचुटूक छपराचं.

पृथ्वीच्या पोटात मोठमोठाले ब्रश बुडवून नैसर्गिक रंगांनी रंगवलेलं.

शेवाळ्यासारखा तजेलदार हिरवा.

मातीसारखा तरतरीत तपकिरी.

कोळशाच्या कणातून पाझरलेला कुट्ट काळा.

घर होतं, त्यापेक्षाही जास्त जुनं दिसावं म्हणून कोण धडपड!

जणू खोल समुद्राच्या तळातून मोठ्या कष्टानं वर काढलेला जुना जादूचा पेटाराच.

ठिकठिकाणी माशांनी कुरतडल्याच्या खुणा..

फटीफटीत छिद्राछिद्रात घट्ट चिकटून बसलेला गाळ... हजारो वर्षं मुलाला दुपट्यात गुंडाळून ठेवावं तसं शांत, गुप्त ठिकाणी, समुद्राच्या पोटात पडून राहिलेलं प्राचीन घर... आता कुठे दारंखिडक्या उघडल्या आहेत आणि सगळीकडे हवेचे बुडबुडे फुटताहेत.

सगळं बदललं होतं. अधिक जुनं वाटावं म्हणून.

चोहोंबाजूंनी धावणारा व्हरांडा.

सगळ्या खोल्या एकाकी, खोल्यांमधले कोनाडे अंधारात बुडालेले. उलट्या ठेवलेल्या होडीचे काठ धरधरीत वळणानं जमिनीकडे उतरावेत; तसं थेट कललेलं उतरतं छप्पर. कधी काळी उभ्या केलेल्या पांढऱ्याधोप खांबांच्या आधारानं छप्पर तोलणारे वासे मधूनच वाकलेले, त्यामुळे मध्येच मोठ्ठ्या जांभईसारखं एक लांबलचक कंटाळवाणं भोक.

अ हिस्टरी होल इन हिस्टरी हाऊस.

नियतीच्या छाताडावरचं मोठ्ठं भोक.

संध्याकाळ झाली की, त्याच भोकातून वटवाघळांच्या झुंडी बाहेर पडत आणि कारखान्याच्या चिमणीतून बाहेर पडणाऱ्या काळ्याकुट्ट धुरासारखे रात्रीच्या पोटात पसरत.

पहाट फुटली, की जगभरच्या बातम्या घेऊन झुंडी घराकडे परत येत. सिनेमाची फिल्म पुढून मागे धावावी; तसा चिमणीतून फुटणारा काळा धूर परत चिमणीवर ढगासारखा जमे आणि वेगानं चिमणीतून आत जाई.

मग अख्खा दिवस वटवाघळांच्या झुंडी झोपून राहात.

अख्ख्या छपरावर जणू काळी लोकर पसरलेली आणि जमिनीवर टपटपणारा पांढऱ्या विष्ठेचा सडा.

आजूबाजूला देवाबिवाची जागा नाही ना हे बघून पोलिसांची पलटण एकदम थांबली.

खरंतर त्याची गरज नव्हती, पण इभ्रतदार उच्चवर्णीयांच्या सवयी पोलीस झाले, तरी कशा सुटणार?

एका पडक्या भिंतीचा आडोसा धरून सगळे एका लायनीत उभे राहिले.

मुताची धार.

खालच्या दगडांवर गरमागरम पिवळा फेस.

पोलिसांचं मूत.

सहा धारांनी फेसाळत धावणाऱ्या पिवळ्या पिवळ्या मुंग्यांचे सहा ओघळ... सहा तळी.

रोखून धरलेला ताण सैलावल्यावर सहा सुटकेचे श्वास.

एकदाची सुटका झाल्यावर गुडग्यावर सरपटत-सरपटत सगळे जण 'त्या' घराच्या दिशेनं निघाले. डिट्टो सिनेमातले पोलीस... सावकाश, दबा धरून एकेक पाऊल उचलत, उभ्या गवताला बुटाखाली चिरडत निघालेले. हातात साधे लाकडी दंडुके आणि मनात धडधडणाऱ्या मशिनगन्स. इभ्रतदार जनतेची लाज राखण्याची जबाबदारी येऊन पडलेले सडपातळ पण सशक्त खांदे पार खाली झुकलेले.

एकूण बारा डोळ्यांना अखेर सावज दिसलं.

‘हिस्टरी हाऊस’च्या मागच्या व्हरांड्यांत.

विस्कटलेला भांग, ‘लव्ह इन टोकियो’मध्ये बांधलेलं उसळतं कारंजं.

आणि दुसऱ्या कोपऱ्यात एक सुतार. लांडग्यासारखा. एकटा... एकाकी, नखांवर लालभडक रंग लावलेला.

गाढ झोपलेला. कावेबाज इभ्रतदार उच्चवर्णीयांच्या लबाड कपटाची खिल्ली उडवावी इतका गाढ.

सहा जण काहीसे चक्रावलेच.

त्यांच्या डोक्यात दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रातले मथळे नाचत होते.

नरभक्षक अतिरेकी पोलिसांच्या जाळयात.

या मथळयासाठीच पोलिसांच्या ‘सावजा’ला भलीमोठी किंमत चुकवावी लागली.

कमरेत बुटाची सणसणीत लाथ घालून त्यांनी वेलुथाला उठवलं.

झोप चाळवता-चाळवता कळवळून उठलेल्या किंकाळीमुळे इस्थापन आणि राहेल चमकलेच.

आरडाओरडा. किंकाळया...

दोघांच्याही पोटात भयंकर भीतीनं एकदम खड्डा पडला. दातखीळ बसली. श्वास थांबला.

तोवर लाथाबुक्क्यांनी तुडवातुडव ऐन भरात आलेली. मरणप्राय किंचाळया. बरगड्या पिचल्याचे आवाज. रक्त फोडणारे वळ...

दोन मुलं डोळे फाडफाडून समोरच्या क्रूर धिंगाण्याकडे बघत राहिली.

मग कळलं, त्या माणसाला आपण ओळखतो.

तो वेलुथा आहे. वेलुथाच.

तो इथं कसा? आला कुठून? इतका मार का खातोय? त्यानं असं काय केलं असेल? पोलिसांनी त्याला इकडे कुठे आणलं?

चामडीवर फटाफट उठणारे दंडुक्याचे आवाज त्यांना ऐकू येत होते.

मोजून सगळी हाडं खिळखिळी करणाऱ्या चामडी बुटांच्या लोखंडी लाथा.

दातांमधून रक्ताच्या चिळकांड्या उडवणाऱ्या बलिष्ठ मुठींचे निर्दय ठोसे.

काळयाभोर सपाट पोटात घुसलेल्या लाथांनी कळवळणाऱ्या वेलुथाचं आक्रंदन.

काहीच ऐकवत नव्हतं.

काही जणांनी त्याचं मुस्काट फोडलं... केसांचे बुचडे हातात धरून सिमेंटच्या खांबावर डोकं थाडथाड आपटलं... कवटी फुटून, चिळकांड्या उडाल्या, त्याचा आवाजसुद्धा या घमासान युद्धात ऐकू आला नाही. तुटलेल्या बरगडीचं टोक घुसून फुफ्फुसाच्या चिरफळया उडाल्या. नाकातोंडातून लालभडक रक्ताचे लोट सुरू झाले... आता तर वेदना

जाणवेनाशाच झाल्या होत्या. लोखंडी टाचांखाली चिरडला जाणारा रक्तामांसाचा लगदा थंड पडत, थिजत चालला होता.

भीतीनं ओठ निळे पडलेली दोन भेदरलेली मुलं डोळे फाकून एकटक समोर पाहत होती. काहीतरी जाणवत होतं; पण काय चाललंय त्याचा अर्थ लागत नव्हता.

पोलिसांचं काम अत्यंत शांत शिस्तबद्धतेनं सुरू होतं. रागानं दातओठ खाणं नाही, त्वेषानं लाथा उगारणं नाही. राग असलाच; तर मनात, कृतीत नाही. कृती अगदी ठरवून केल्यासारखी.

शिस्तबद्ध.

संतापाची उगीच उधळमाधळ नाही.

आतून त्वेष; पण वरून अगदी थिजलेला बर्फ.

एक बाटली घ्यावी आणि सहज म्हणून बूच उघडावं...

वाहत्या नळावर हात टाकून सहज म्हणून त्याची मुंडी मुरगाळावी.

फटापट अंडी फोडावीत आणि सहज म्हणून तापल्या पॅनवर ऑम्लेट टाकावं.

तसं चाललं होतं.

या सहा जणांचा वेलुथाशी काय संबंध? नियतीनंच त्यांना कामाला जुंपलंय, हे कळण्याची अक्कल दोन्ही लहानग्यांना नव्हती.

कशी असणार?

त्या सहा जणांना नियतीनंच पापपुण्याची वसुली करायला पाठवलंय... ज्यांनी-ज्यांनी कायदा मोडला, त्यांना-त्यांना धडा शिकवण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडलीय; त्याला 'ते' काय करणार?

हे कसं कळणार?

तरीही मुलांच्या मनात काहीतरी जळत होतं, तुटत होतं.

कसलीतरी विचित्र भीती.

त्यांच्या आजवरच्या निरागसतेला पायदळी तुडवणाऱ्या रक्तबंबाळ तिरस्काराची भीती.

अनामिक, अदृश्य भीती.

मानवी वसाहतींना निसर्गाच्या प्रकोपाची असावी, स्त्रियांना पुरुषांची असावी, गोरगरिबांना भांडवलदारांची असावी, तशी भीती.

भयंकर. पण सांगता न येणारी.

आतल्या आत रक्त काढणारी, पण वरवर न दिसणारी.

जे डोक्यावर घेऊन नाचताही येत नाही आणि पायाखाली तुडवताही येत नाही, त्याचा चोळामोळा करून फेकण्याचं कपट नेहमीच शिजत असतं पुरुषांच्या मनात.

जणू तीही एक गरजच.

पुरुषांच्या शरीराची.

त्या सकाळी इस्थापन आणि राहेलनं जे काही पाहिलं, तो साधासुधा तमाशा नव्हता. रक्त फोडणाऱ्या हाणामारीचा खरा चेहरा त्यांना दिसला नाही, कळला नाही.

ती नुसतीच हाणामारी नव्हती.

वाट्टेल त्या मार्गानं स्वत:चं प्राबल्य सिद्ध करण्यासाठी धडपडणाऱ्या मानवी स्वभावाचं एक क्रूर, रक्तरंजित प्रत्यंतर.

लढाई नाही, युद्ध अगर वंशहत्त्या नाही.

पण तसंच काहीसं.

कदाचित त्या पलीकडचं.

शिस्तबद्ध. आखीव-रेखीव. जसं ठरवलं, तसं.

देवाच्या इच्छेचा, नियतीच्या खेळाचा छद्मी वेष पांघरून माणसानं घातलेला आपल्या रक्तरंजित इतिहासाचा बेभान धिंगाणा.

आणि तोही अजाण, अल्पवयीन प्रेक्षकांसमोर.

अपघातानं घडलं असं काही नव्हतं.

योगायोगानं, प्रसंगच तसा आला म्हणून घडलं, असंही काही नव्हतं.

व्यक्तिगत देण्याघेण्याचा हिशेब मिटवण्याची ती खुमखुमीही नव्हती.

जे घडतं आहे, त्याचंच प्रतिरूप. जगण्याच्या कालखंडाचा ठसा... जे जगतायत त्यांच्याच पाठीवर चरचरून उमटवलेला.

नियतीचा स्वत:चाच आविष्कार.

रक्तानं माखलेला एकपात्री प्रयोग.

तिचंच बेभान नृत्य. खदाखदा हसणं.

आणि रंगमंचावर रक्तामांसाचा हा एवढा चिखल.

व्यक्तिगत खुन्नस काढायची म्हणून 'त्यांनी' वेलुथाला तुडवला असता, कोण्या कारणानं चवताळून त्याच्यावर तुटून पडले असते, तर वेलुथाच्या भविष्याचा पक्का फैसला कधीच झाला असता; पण तो त्यांच्या नात्यातला नसला, तरी किमान त्यांच्या जातीचा – म्हणजे माणूस – होता. शिवाय त्याला एकट्याला अटक करून मामला खतम करण्याऐवजी उच्चवर्णीय इभ्रतदार दहशत पसरवण्याची 'असाईनमेन्ट' त्यांना निभवायची होती. त्यामुळे काय करावं, किती शिक्षा द्यावी, किती हाडं तोडावी, किती रक्त फोडावं, याचं काही मोजमापच नव्हतं.

एरवी धार्मिक दंगली काबूत आणण्यासाठी दंगलखोरांवर तुटून पडणाऱ्या, भर रस्त्यावर रक्ताची होळी खेळणाऱ्यांना कंठस्नान घालणाऱ्या इभ्रतदार पोलिसांच्या

उच्चवर्गीय पलटणीनं त्या सकाळी जरा हात राखूनच पाय चालवले.

संयमच होता. उन्मादाचं नाव नाही.

बेजबाबदार कृत्यातही जबाबदारी पक्की. उगीच बेबंद अराजक नाही.

त्यांनी त्याचे केस उपटले नाहीत. त्याला जिवंत जाळलं नाही.

त्याच्या जांघेतल्या लोंबत्या गोट्या कापून त्याच्याच तोंडात कोंबल्या नाहीत.

त्याच्यावर बलात्कार केला नाही.

मुस्काट फोडलं, पण डोकं उडवलं नाही.

साथीच्या रोगाचा फैलाव आटोक्यात आणण्याची जबाबदारी नव्हतीच त्यांच्यावर.

रोगप्रतिबंधक लस खुपसली समाजाच्या दंडावर की संपलं!

ज्याच्यावर इतकं प्रेम केलं, तो माणूस हिस्टरी हाऊसच्या त्या मागच्या व्हरांड्यात, डोळ्यांदेखत तुडवला जाताना पाहिल्यावर, सौ. इपेन आणि सौ. राजगोपालन यांना आणखी दोन (नवीन) धडे शिकायला मिळाले.

धडा क्रमांक एक –

माणसाचा रंग अगदी कुळकुळीत काळा असेल, तर त्याच्या शरीरातून कितीही रक्त वाहिलं, तरी ते नीट दिसतच नाही (डम डम).

आणि

धडा क्रमांक दोन –

...पण तरीही रक्ताचा वास येतो.

गोड्स.

कुजलेल्या गुलाबाचा गंध वाऱ्याबरोबर वाहात यावा, तसा *(*डम डम*)*

'माडीयो*?'*

– नियतीच्या सूत्रधारांपैकी एकानं विचारलं.

'माडी आयिरीक्कुम*'* – दुसरा म्हणाला.

बास*?*

बास!

सगळा घोळका बाजूला झाला. एखाद्या कारागिरानं आपली कलाकृती पूर्ण झाल्याचा श्वास टाकून नंतर दमल्याभागल्या समाधानानं तिच्याकडं पाहावं, तिची नीट परीक्षा व्हावी म्हणून काहीसं लांब जाऊन पाहावं,

तसे 'ते' थोडे लांब-लांब झाले.

ईश्वरानं आपल्या कक्षेतून हाकलून लावलेली, मार्क्सनं वाऱ्यावर सोडलेली, स्त्रीनं आणि पुरुषानं हद्दपार केलेली (आणि काही वेळातच) मुलांपासूनही तुटणारी 'ती

कलाकृती’ लोळागोळा होऊन जमिनीवर पडली होती.

वेलुथा.

अर्धवट शुद्धीत होता, पण नि:शब्द, निश्चल –

कुठेच. कसलीच हालचाल नाही.

कवटीला एकूण तीन ठिकाणी तडे गेलेले. नाक आणि दोन्ही खांद्यांचा चेंदामेंदा झालेला. चेहरा तर ओळखता येऊ नये इतका चेचलेला, विद्रूप, रक्तबंबाळ. पोलादी मुठींचे ठोसे बसून वरचा ओठ पुरता फाटलेला आणि रक्त ओकून बाहेर उपटल्या गेलेल्या सहा दातांपैकी तीन खालच्या ओठात घुसलेले. त्याचं ‘सुंदर’ हसू रक्ताच्या चिळकांड्यांनी कधीच गिळून टाकलं होतं. चार तुटलेल्या बरगड्यांची टोकं घुसून घायाळ झालेल्या फुप्फुसानं शेवटचे श्वास मोजायला सुरुवात केलेली... त्यामुळे तोंडातून रक्ताचा लोंढा. धपापत्या नाकाभोवती ताज्या, उष्ण रक्ताचे फेसाळ बुडबुडे, फुग्यासारख्या फाटकन फुटलेल्या आतड्यात तर केव्हाचा रक्तस्राव सुरू झालेला, पोटामधल्या पोकळीत रक्ताची थारोळी साठत चालली होती. पाठीचा कणा दोन ठिकाणी मोडलेला... त्यामुळे उजवा हात पार लुळा पडला होता आणि मूत्राशय, गुद्द्वारावरचं नियंत्रणही संपुष्टात आलं होतं. दोन्ही पाय निकामी झालेले आणि गुडघ्यांच्या वाट्यांचा चक्काचूर.

तरीही नियतीच्या एका सूत्रधारानं खिशातून बेड्यांची दोन थंडगार वेटोळी बाहेर काढली.

पुन्हा तोच आंबूस वास. रेल्वेतून जाताना येणारा, लोखंडाचे चिमटे वाजवून वाजवून हिरवट झालेल्या बस कंडक्टरच्या बोटांना चिकटलेला.

बेड्या घालायची वेळ आली, तेव्हा ‘नियमीचे सूत्रधार’ एकदम चमकलेच.

‘त्याच्या’ नखांवर लाल रंग होता.

एकानं ‘त्याचा’ लुळापांगळा हात चिमटीत धरून उचलला आणि त्याची लालभडक नखरेल नखं इतरांसमोर नाचवली. सगळे खदाखदा हसले.

‘ही काय भानगड?’

‘एसी डीसी?’

एकानं हातातला दंडुका उचलला आणि लोळागोळा होऊन वेडंवाकडं पडलेलं वेलुथाचं सुरकुतलेलं लिंग दंडुक्यानं चाचपलं.

‘काय आहे एवढी भानगड, सांग तरी... फुगवला म्हणजे केवढा फुगतो तुझा लंड?’

सगळे पुन्हा खदखदले.

दंडुकेवाल्यानं गंमत म्हणून आपला बूट उचलला आणि वेलुथाच्या जांघेत सुरकुतलेल्या फुग्यावर खाचकन् मारला.

वेळ झाला होता.

काम उरकायला हवं होतं.

नियतीच्या सूत्रधारांनी वेलुथाचे दोन्ही हात गोळा करून त्याच्या पाठीशी खेचले आणि बेड्या ठोकल्या.

क्लिक.

क्लिक.

त्याच्या पाठीवर पानाची खूण अजून जिवंत होती, त्या शुभचिन्हाच्या बरोबर खालीच वेलुथाचे दोन्ही हात बंदिवान झाले.

तेच पान.

ज्याच्यामुळे मान्सूनचा पाऊस न चुकता वेळेवर यायचा.

लोखंडी बेड्यांच्या खाली, दोन्ही कुल्ल्यांवर मोठीमोठी टेंगळं आली होती.

'हा 'तो' नसेलच' – राहेल न राहवून इस्थाच्या कानात कुजबुजली, 'मी सांगते हा त्याचा जुळा भाऊ असणार नक्की. उरूम्बन. कोचीला राह्यचा ना, तो!'

राहेल जे म्हणत होती, ते उडवून लावणं जीवावर आलेला इस्था गप्पच बसला.

तेवढ्यात चाहूल लागली.

कुणीतरी अगदी हळू आवाजात, प्रेमानं त्यांच्याशी बोलत होतं.

एक इभ्रतदार पोलीस.

इभ्रतदार घरातल्या मुलांशी बोलत होता.

इभ्रतीनं, अर्थातच.

'मॉन, मोल तुम्ही ठीक आहात ना? त्यानं काही केलं तर नाही तुम्हांला?'

दोन्ही मुलं एकाच वेळी नाही; पण एकदम बोलून गेली.

'हो... म्हणजे नाही.'

'डोन्ट वरी. आता आम्ही आहोत ना?'

सगळं कामधाम आटोपल्यावर पोलिसांनी सहज इकडेतिकडे नजर फिरवली, तर त्यांना काय-काय भलतंभलतं दिसलं.

गवताची चटई.

भांडीकुंडी. ऑम्लेटचं पॅन.

हवा भरून फुगवलेलं बदक.

सैल झालेल्या डोळ्यांचा क्वान्टा कोओला.

लंडनचे झगमगते रस्ते पोटात भरलेली बॉलपेनं.

वेगळे, रंगीबेरंगी तळवे असलेले सॉक्स.

पिवळ्या फ्रेममध्ये बसवलेला लालभडक प्लॅस्टिकच्या काचांचा गॉगल.

आणि एक प्लॅस्टिकचं घड्याळ.

‘किती वाजले?’ ते त्याच्यावर एकदाच रंगवून टाकलं होतं.

‘कुणाचे आहे हे सामान? कुठून आणलं? कुणी आणलं?’

– प्रश्नात जरा जास्तच काळजी होती.

आणखी एका नव्याच भीतीचा खड्डा पोटात.

इस्था आणि राहेलनं घाबरून एकमेकांकडं बघितलं.

तोवर पोलिसी नजरांची नजरानजर झालीच होती.

अशा वेळी काय करायचं, ते त्यांना बरोबर ठाऊक असतं.

क्वान्टा कोओला त्यांनी आपल्या मुलांसाठी घेतला. पेनं उचलली. सॉक्सही खिशात कोंबले.

रंगीबेरंगी सॉक्स घालून मिरवणारी पोलिसांची मुलं...

हवा भरून फुगवलेल्या बदकाच्या पोटात कुणीतरी पेटती सिगारेट खुपसली.

फाट्.

उरल्यासुरल्या रबरी चिंध्या फेकून दिल्या.

युसलेस बदक. पटकन ओळखता येईल असं. पायजेच कशाला?

लालभडक प्लॅस्टिकच्या काचांचा पिवळा गॉगल एकानं गंमत म्हणून आपल्या डोळ्यांवर चढवला... बाकीचे पोटधरून हसले, म्हणून पुष्कळ वेळ तसाच ठेवला.

घड्याळाकडे मात्र कुणाचंच लक्ष गेलं नाही. हिस्टरी हाऊसच्या मागच्या व्हरांड्यात ते तसंच पडून राहिलं.

चुकीची वेळ नोंदवली गेली.

दोनला दहा कमी.

आणि ‘ते’ आले तसे निघून गेले.

खिशात खेळणी भरलेले नियतीचे सहा सूत्रधार.

जुळ्यांची जोडी.

आणि ‘गॉड ऑफ लॉस.’ ‘गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज.’

त्याला चालता येत नव्हतं, म्हणून नियतीच्या कर्तव्यदक्ष, कर्तबगार सूत्रधारांनी त्याला आपल्या मागून फरफटत नेलं.

काय झालं नक्की, ते कुणीही पाहिलं नाही.

वटवाघळांचं काय?

– बिचारी आंधळीच असतात.

प्रकरण १९
अम्मूला वाचवताना...

कोट्टायम पोलीस ठाण्यातली गोष्ट. इन्स्पेक्टर थॅमस मॅथ्यूनं मोठ्या आवाजात दोन कोकाकोलांची ऑर्डर दिली. त्याच्या हाताखालचा कॉन्स्टेबल प्लॅस्टिकच्या ट्रेमध्ये कोकाकोलाच्या दोन बाटल्या आणि दोन स्ट्रॉ घेऊन आला.

थॉमस मॅथ्यूसमोरच्या कळकट टेबलावर कागदांचे गठ्ठे आणि फायलींचे डोंगर. त्यापलीकडे बसलेल्या दोन छोट्या मुलांचे अर्धे चेहरेच त्याला जेमतेम दिसत होते.

कॉन्स्टेबल ट्रे घेऊन पुढे झाला.

चिखलात लडबडलेल्या दोन्ही मुलांना एकेक कोकाकोला स्ट्रॉसह मिळाला.

इस्थाच्या मनात पुन्हा एक दहशतीचं पिलू वळवळलं. जेमतेम दोन आठवडे व्हायच्या आतच पुन्हा एकदा कोल्ड्रिंकच्या गारेगार बाटलीत ठासून भरलेली थंडगार भीती त्याच्या ओठाला लागणार होती. कोकाकोलाबरोबर दर वेळी या भानगडी कशा उपस्थित होतात, इस्थाला कळेना.

बाटलीतून सळसळत आलेली झोंबरी फसफस त्याच्या नाकात गेली. ती जळजळ सहन न होऊन त्याला ढेकर आल्यावर शेजारी बसलेली राहेल खुदुखुदु हसली. ती मजेत कोकाकोला पीत होती. स्ट्रॉनं फुंकून फुंकून बाटलीच्या तळाशी बुडबुडे फुटेपर्यंत तिनं भुरकून कोकाकोला प्यायला. शेवट शेवटचे घोट तिच्या मळक्या फ्रॉकवर सांडले. पायाखालची जमीनही अगदी चिकट होऊन गेली. भिंतीवर टांगलेल्या बोर्डवरची

अक्षरं मोठ्यामोठ्यानं वाचायची इस्थाला हुक्की आली.

'SSenetiloP' त्यानं सुरुवात करून दिली.

'ssenetiloP ecneidebO'.

'ytlayoLenegilletn I' राहेलनं पुढची अक्षरं जोडली.

'ysetruoC'

'ycneiciffE'

इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यू शांतपणे काय चाललंय ते बघत होता. मुलांमधल्या चित्रविचित्र, विसंगत संवादाचा अर्थ त्याच्या जाणिवेतून सुटला नाही. खूप तणावाखाली असलेली माणसं त्या काचातून सुटण्याची धडपड करताना काहीही असंबद्ध वागतात... बोलतात, हे त्याला अनुभवानं ठाऊक होतं. त्यामुळे समोर काय चाललंय ते त्यानं चालू दिलं आणि योग्य वेळ साधून अगदी साधे, निरुपद्रवी प्रश्न मोठ्या हुशारीनं फेकले.

‘तुझा वाढदिवस कधी असतो रे मॉन?’

‘मॉल, तुला कोणता रंग आवडतो गं?’

करता-करता हळूहळू रीतसर प्रक्रिया सुरू झाली. थॉमस मॅथ्यूचे सहकारी असलेल्या नियतीच्या सूत्रधारांनी त्याला एकेक करून सगळा शिस्तशीर रिपोर्ट दिला होता. हिस्टरी हाऊसच्या मागचा व्हरांडा, तिथली गवताची चटई, भांडीकुंडी आणि मुख्य म्हणजे खेळणी.

थॉमस मॅथ्यूला फारसं आश्चर्य वगैरे वाटलं नाही. त्यानं ताबडतोब ड्रायव्हरला बोलावलं आणि बेबी कोचम्माला जीपमध्ये घालून आपल्यासमोर हजर करण्याचा हुकूम दिला. बेबी कोचम्मा येईल, तेव्हा दोन्ही मुलं तिला दिसणार नाहीत याची कडेकोट व्यवस्था केल्यावरच त्यानं कामाची फाईल पुढे ओढली.

बेबी कोचम्मा आली. मान वर करून तिच्याकडे बघण्याचीसुद्धा तसदी न घेता इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यू कोरड्या आवाजात म्हणाला,

'बसा.'

कायतरी भलतंच होऊन बसलं आहे, याचा अंदाज आल्यामुळे धास्तावलेली बेबी कोचम्मा कशीबशी बसली.

'मिळाली का मुलं? काय झालं? ठिकेय ना सगळं?'

'सगळं काय, काहीही ठीक नाहीये. नथिंग इज ऑल राईट.' इन्स्पेक्टरनं तिला फटकारलं.

त्याच्या डोळ्यातला परकेपणा, आवाजातली निर्विकारी जरब... बेबी कोचम्मा एकदम चमकलीच. या आधी भेटलेला, वाट्टेल ती मदत करायला तयार असलेला इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यू 'हा' नव्हे, एवढं तिला पटकन कळलं. काहीतरी भयंकर घडलं असणार, या जाणिवेनं तिचा आत्मविश्वास पार ढासळून गेला. खुर्चीतल्या खुर्चीत ती पुन्हा सावरून बसली.

इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यूनं थोडक्या, पण स्पष्ट शब्दात तिला 'काय झालंय' त्याची कल्पना दिली.

तिनं दाखल केलेल्या एफ.आय.आर.वर विसंबून, त्यातला तपशील खरा मानून कोट्टायम पोलिसांनी ताबडतोब 'अॅक्शन' घेतली. त्या अस्पृश्य तरुणाला ताब्यात घेताना झालेल्या 'एन्काऊन्टर'मध्ये तो गंभीररीत्या जखमी झाला आहे. रात्र काढील की नाही ठाऊक नाही. अशा अवस्थेत 'लॉकअप'मध्ये ठेवलाय; पण मुलं जी कहाणी सांगतात, ती एफ.आय.आर.शी अजिबात जुळत नाही. 'आम्ही स्वत:च होडी घेऊन नदीत गेलो होतो. अपघातानं होडी कलंडली आणि सोफी मॉलला पोहता येत नसल्यामुळे ती बुडाली,' असं मुलांचं म्हणणं आहे. हे जर खरं असेल, तर पोलिसांवर मोठंच किटाळ येईल. 'कायद्याच्या नजरेत निष्पाप असलेल्या तरुणाचा पोलिसांच्या मारहाणीनं मृत्यू' ही खरी बातमी उद्या फुटली, तर कोट्टायम पोलिसांना बाहेर तोंड दाखवायला जागा

राहणार नाही. तो अस्पृश्य आहे हे खरं असलं, उद्धटपणानं वागला हेही खरं असलं, तरी तेवढं पुरेसं नाही. कायद्यापुढे गुन्हा सिद्ध करण्याकरता सबळ पुरावा कुठाय?

'बलात्काराचा प्रयत्न?' बेबी कोचम्मानं घाबरत-घाबरत सुचवून पाहिलं.

'पण जिच्यावर बलात्काराच्या प्रयत्न झाला, तिची कम्प्लेन्ट कुठेय? तिनं काही लेखी दिलंय? आणलंय तुमच्याबरोबर?'

आता इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यूचा पारा चढला होता. त्याने बेबी कोचम्माची सालं काढायला सुरुवात केली.

आपण पुरते फसलो आहोत, हे लक्षात आल्यावर बेबी कोचम्माला कापरं भरलं. डोळ्यांत भीतीचा थरार उमटला. चेहेऱ्यावरची रेघ न् रेघ पिळवटली. तिच्या घशाला कोरड पडली आहे हे लक्षात आल्यावर इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यूनं पाण्याचा ग्लास पुढे सरकवला.

'हे पाहा, द मॅटर इज व्हेरी सिम्पल. एकतर जिच्यावर बलात्काराचा प्रयत्न झाला, त्या बाईनं इथं हजर झालं पाहिजे, रीतसर तकरार नोंदवली पाहिजे. ते शक्य नसेल, तर मग पोलीस आणि साक्षीदारांच्या उपस्थितीत मुलांनी नीट 'जबाब' दिला पाहिजे. 'त्यानंच आम्हांला पळवून नेलं होतं,' असा जबाब मुलांनी नोंदवला, तरच ही भानगड बिनबोभाट निस्तरता येईल. नाहीतर...'

बेबी कोचम्मा धसकली. तो एकच वांझोटा क्षण तिला भयंकर वाटला.

'नाहीतर, खोटा एफ. आय. आर. नोंदवून पोलिसांची दिशाभूल केल्याच्या आरोपाखाली तुमच्याच हातात बेड्या ठोकल्या जातील. क्रिमिनल ऑफेन्स, कळलं?'

– बेबी कोचम्माला घाम फुटला. तिच्या निळ्या ब्लाऊजच्या पाठीवर मोठेमोठे निळे धब्बे पडले. थॉमस मॅथ्यूनं तिला आणखी घोळात घेतलं नाही, कारण आपलाही हात दगडाखाली सापडला आहे, तशीच वेळ आली, तर नोकरी सोडून घरी बसावं लागेल, हे कळण्याएवढी 'पोलिसी अक्कल' त्यालाही होतीच. राजकीय कार्यकर्त्यांनी वातावरण एवढं तापवलेलं असताना कॉम्रेड के. एन. एम. पिल्लई ही संधी सोडणार नाहीत, हे तर स्पष्टच होतं. थॉमस मॅथ्यू स्वत:वरच चिडला होता. कसलाही विचार न करता एका फालतू बाईच्या शब्दावर विसंबून एवढी तडकाफडकी अॅक्शन घेतल्याबद्दल त्यानं स्वत:लाच लाख शिव्या हासडल्या; पण आता वेळ निघून गेली होती. झालेला घोळ निस्तरण्यापलीकडे दुसरा पर्याय उरला नव्हता.

थॉमस मॅथ्यूनं खुर्चीच्या पाठीवर टाकलेला छोटा टॉवेल उपसून काढला आणि बटणं सोडलेल्या शर्टाच्या आत हात घालून घामेजलेल्या काखा खसखसून पुसून काढल्या. छातीवरच्या घाम निपटून टाकला.

पोलीस ठाण्यात तशी शांतताच होती. इकडून-तिकडे जाणाऱ्या-येणाऱ्या खाडखाड

बुटांची किरकोळ टकटक, 'पोलीस इन्टरॉगेशन' चाललेल्या कुठल्यातरी कोठडीतून मध्येच फुटणाऱ्या किंकाळ्या... बास! बाकी सगळं शांतच होतं.

'मुलं ऐकतील आपलं. आपण सांगू तसा जबाब देतील,' बेबी कोचम्मानं एकमेव 'शक्य पर्याय' पडताळून पाहण्याचा निर्णय घेतला. 'पण मला एकदा त्यांच्याशी बोलू द्या. एकटीला.' तिनं अटही घातली.

'ठीकय. अॅज यु विश. भेटून बघा तुम्ही.'

इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यू उठून उभा राहिला.

'पाचच मिनिटं. त्यांची जबानी घेण्याआधी फक्त पाचच मिनिटं मला मुलांना भेटू द्या.'

इन्स्पेक्टरनं मान हलवली.

आणि निघून गेला.

बेबी कोचम्मानं घाम पुसला. मान उंचावून वर आढ्याकडे बघितलं. गळ्याखाली लोंबणाऱ्या मांसाच्या लिबलिबीत घामट वळ्यांवरून पदर फिरवला. गळ्यातला क्रॉस उचलून ओठाशी लावत चुंबन घेतलं. तिचे ओठ प्रार्थना पुटपुटत होते.

'हे मेरी, फुल ऑफ ग्रेस.'

पण त्यात जीव नव्हता.

नेहमीच्या प्रार्थनेनं तिला नेहमीसारखं बळ दिलं नाही.

दार उघडलं. भेदरलेली मुलं आत आली. अंगावर वाळलेल्या चिखलाची करवड आणि कोकाकोलाचे ओले, आंबडगोड डाग.

समोर बेबी कोचम्माला बघून इस्था आणि राहेलला नकळत थोडा धीर आला. धक्काही बसला.

दोघांच्याही 'आत' बसलेल्या केसाळ पायांच्या पतंगाची हालचाल हलके हलके चालूच होती.

ही इथं का आली असेल? आणि अम्मू?

अम्मू कुठेय? अजून कोंडूनच ठेवलेलं असेल का तिला?

बेबी कोचम्मानं काहीही न बोलता भांबावलेल्या मुलांकडं नुसतं पाहिलं. थोडा वेळ तसाच जाऊ दिला. मग तोंड उघडलं, तर तिचा घोगरा, कर्कश्श आवाज मुलांना ओळखूच येईना.

'कुणाची होती ती होडी? तुम्हांला कुठून मिळाली?'

'आमचीच होती. आम्हांला सापडलेली. मग वेलुथानं स्वत: दुरुस्त करून दिली.' राहेलनं सांगून टाकलं.

'किती दिवसांपासून चाललेत हे प्रकार?'

'सोफी मॉल आली ना, त्या दिवशी, त्याच दिवशी सापडली होडी.'

‘म्हणून तुम्ही घरातल्या वस्तू चोरल्यात आणि होडीत भरून नदीच्या पलीकडे नेल्यात?’

‘पण आम्ही खेळत होतो फक्त.’

‘खेळ? याला तुम्ही खेळ म्हणता?’

बेबी कोचम्मानं भेदरलेल्या मुलांवर नजर रोखली. अपेक्षित परिणाम होऊ घातला आहे, याचा अंदाज आल्यावर हातातलं हुकमाचं पान फेकलं,

‘त्या सुंदर गोऱ्यापान मुलीचं प्रेत तिकडे घरात पडलंय. नदीतल्या माशांनी तिचे कान, नाक सगळं खाऊन टाकलंय. तिची आई तिकडे वेड्यासारखी रडतेय. याला तुम्ही खेळ म्हणता?’

तेवढ्यात कुठूनसा भरार वारा आला. खिडक्यांवरचे कळपट पडदे एकदम फुगले आणि उडायला लागले. समोरच्या खिडकीतून राहेलला बाहेरचं सगळं दिसलं... खूपशा जीप रांगेत उभ्या आहेत... माणसांची ये-जा चाललीय. एक माणूस आपल्या मोटारसायकलला कीक मारून मारून दमलाय. दर वेळी त्यानं कीकवर पाय ठेवला की, त्याच्या डोक्यावरचे हेल्मेट तिरकं होऊन खाली पडतंय...

बाहेर सगळी घाई-गंमत.

इन्स्पेक्टरच्या खोलीत मात्र भीती आणि दहशत ठासून भरलेली... पाप्पाचींच्या पतंगाची, त्याच्या केसाळ पंखांची उघडझाप...

‘एका माणसाचा जीव घेणं किती भयंकर असतं, याची अक्कल आहे तुम्हांला?’ बेबी कोचम्माच्या आवाजाला चांगलीच धार चढली होती, ‘अशा माणसांना खुनी म्हणतात खुनी. हे सगळ्यात भयंकर पाप आहे. देवसुद्धा माफ करत नाही खुनी माणसांना. होतं ना ठाऊक? होतं ना?’

दोन डोकी वरून खाली... खालून वर हलली.

‘आणि तरीही... तरीही तुम्ही सोफी मॉलला मारलंत?’ – दोन्ही जुळ्या पोटात खड्डा पडला. जे काही झालं, त्याचा हा अर्थ पहिल्यांदाच कळत होता.

‘खुनी आहात तुम्ही. यु आर मर्डरर्स.’

हे थेट शब्द दोघांच्याही ‘आत’ पुरते भिनावेत म्हणून बेबी कोचम्मानं जरा श्वास घेतला.

‘जे झालं, तो ‘अॅक्सिडेन्ट’ नव्हता, हे मला चांगलं ठाऊक आहे. तुम्ही पहिल्यापासूनच तिचा द्वेष करायचात. तुम्हांला ती नजरेसमोर नको असायची. जळायचात तुम्ही तिच्यावर. जळायचात की नाही? उद्या कोर्टात खटला उभा राहिला आणि न्यायाधीशांनी मला विचारलं, तर हे सगळं मला सांगावंच लागेल. खोटं कसं बोलणार कोर्टात? मी कधी खोटं बोलते?’

बेबी कोचम्मानं शेजारची खुर्ची थोडी जवळ ओढली आणि मुलांना बोलावलं,

'या इथं बसा माझ्याजवळ.'

एकाच खुर्चीत चार घाबरलेले कुल्ले कसेबसे चिवळून बसले.

'कडक शब्दात ताकीद दिलेली असताना, सगळे नियम मोडून घरात कुणालाही न सांगता, तुम्ही मुलं-मुलं नदीवर गेलात, हे मला कोर्टात सांगावं लागेल. तिला पोहता येत नाही, हे माहीत असूनसुद्धा तुम्ही तिला जबरदस्तीनं आपल्याबरोबर नेलंत आणि खोल पाण्यात होडी गेल्यावर तुम्ही दोघांनी मिळून तिला नदीत ढकलून दिलंत, कारण ती तुम्हांला नकोच होती. जे झालं, तो काही अपघात नव्हता. बरोबर?'

बेबी कोचम्माच्या गोष्टीकडे कान लावलेले चार डोळे भीतीनं टचकन भरून आले. मग पुढे... पुढे काय झालं?

'तर आता तुम्हांला तुरुंगात खडी फोडायला जावं लागेल,' बेबी कोचम्मा शांतपणे म्हणाली, 'तुम्ही तर जालच, पण तुमच्यामुळे तुमच्या अम्मूलासुद्धा तुरुंगात जावं लागेल. चालेल? चालेल तुम्हांला? होऊ दे का असं?'

घाबरलेले डोळे फक्त बघतच राहिले.

'तुम्हांला तिघांनाही वेगवेगळ्या तुरुंगात ठेवतील. भारतातले तुरुंग म्हणजे काय असतं; ठाऊकेय?'

दोघांनीही माना हलवल्या.

तुरुंग म्हणजे काय, हे खरंच ठाऊक नव्हतं.

आता पक्की मांड बसली होती.

बेबी कोचम्माला हुरूप आला तिनं रंगवून-रंगवून पुढची गोष्ट रचायला सुरुवात केली. तुरुंगात कसं जगावं लागतं, तिथे काय वातावरण असतं, हे सांगताना तर तिच्या कल्पनाशक्तीला विशेष बहर आला होता. झुरळांनी बजबजलेला भात, संडासात भरून वाहणारे छी छी चे पिवळे डोंगर, रात्री रक्त पिणारे ढेकूण आणि येता-जाता रक्त फुटेपर्यंत पोलिसांचा मार. त्या दोघांमुळे अम्मूला जवळजवळ अख्खं आयुष्य तुरुंगातच राहावं लागेल. मग ती म्हातारी होईल. तिचे केस पांढरेपांढरे होतील, केसात उवा भरतील. बहुतेक ती तुरुंगातच मरेल, पण जगली-वाचली, तर शिक्षा संपवून बाहेर येईल तेव्हा बहुतेक वेडीच झालेली असेल.

भविष्यात काय काय वाढून ठेवलंय याचं जास्तीतजास्त भीषण चित्र मुलांपुढे उभं करता-करता बेबी कोचम्माला आतून उभारी वाटायला लागली होती. तिनं शक्य तेवढे काळे फराटे ओढले. सुटकेच्या आशेच्या सगळ्या शक्यता कशा संपल्या आहेत हे पटवून दिलं आणि पक्का बंदोबस्त झाल्यावर जादूची कांडी फिरवणाऱ्या परीच्या थाटात एक, एकमेव उत्तर मुलांसमोर ठेवलं. 'ईश्वराच्या दरबारात तुमच्या गुन्ह्याला माफी नसली,

तरी इथं पृथ्वीवर काहीतरी तात्पुरता उपाय काढता येईल... मी सांगेन तसं तुम्ही वागलात, तरच अम्मूला वाचवता येईल. नाहीतर अम्मूला जन्मभर खडी फोडावी लागणार. तुमच्यामुळे तिला तुरुंगातली मारहाण सोसावी लागणार.'

समोरचे चार डोळे हळूहळू मोठे-मोठे होत होते. त्या विस्फारल्या नजरेत ओली भीती तरळू लागली, तसा बेबी कोचम्माचा चेहरा फुलत गेला.

'नशीब!' तिनं पुढचं पाऊल टाकलं, 'तुमचं नशीब म्हणून पोलिसांच्या हातून एक चूक घडलीय –' – अर्धं मिनीट मध्ये तसंच गेलं.

'ठाऊकेय, कोणती चूक? ठाऊकेय?'

इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यूच्या टेबलावर ठेवलेल्या काचेच्या पेपरवेटकडे इस्था टक लावून पाहत होता. त्या पेपरवेटमध्येही पोलिसांच्या जाळयात सापडलेले आरोपी कोंडून ठेवलेले! स्वत:भोवती गिरक्या घेणारा एक तरुण आणि त्याच्या कमरेभोवती हात टाकलेली एक तरुणी. तिनं पांढराशुभ्र, घोळदार झगा घातलेला आणि झग्याच्या खाली दोन निमुळते पाय.

'ठाऊकेय का, पोलिसांची कोणती चूक ते?'

पेपरवेटमधल्या गिरक्यांच्या नृत्याचं संगीत एव्हाना माम्माचीच्या व्हायोलिनमधून ऐकू येऊ लागलं होतं.

रा-रा-रा-रा-रम

परम-परम

'हे पाहा,' बेबी कोचम्माची गाडी थांबता थांबत नव्हती, '–आता जे झालं ते झालं. 'त्याला' इतकं मारलंय, की एवीतेवी 'तो' मरणारच. इन्स्पेक्टरच्या मते 'तो' उद्याची सकाळ तरी पाहील की नाही कुणास ठाऊक! त्यामुळे आता पोलिसांना 'त्याच्याबद्दल' काय वाटेल ते वाटलं, तरी कसलाही फरक पडणार नाही. कारण, काही झालं, तरी तो मरणारच. आता, अशा मरणाऱ्या माणसाखातर तुम्ही स्वत: तुरुंगात जाणार का आणि तुमच्या अम्मूला शिक्षा भोगायला लावणार का, हा खरा प्रश्न आहे. तेव्हा, काय ते ठरवा. आत्ताच.'

पेपरवेटच्या पोटात हवेचे खूपसे बुडबुडे भरले होते. त्यामुळे ते जोडपं खोल पाण्यात शिरून नृत्य करतंय, असंच वाटत होतं. दोघंही खूप आनंदात दिसत होते. कदाचित, ते लग्न करणार असतील एकमेकांशी. पांढऱ्याशुभ्र झग्यातली नाजूक नवरी आणि काळा सूट घातलेला, गळयात टाय बांधलेला रुबाबदार नवरा. दोघंही कधीपासून एकमेकांच्या डोळयांत खोल बघत होते. आनंद नुसता ओसंडून वाहात होता.

'तुम्हांला तुमच्या अम्मूला वाचवायचं असेल, तर एकदम सोप्पंय! ते मिशावाले काका जसं सांगतील तसं करायचं, बस्स! ते काका तुम्हांला एक प्रश्न विचारतील. फक्त एकच

प्रश्न. तुम्ही मान हलवायची आणि 'हो' म्हणायचं, की संपलं! लगेच आपण घरी जाऊ. एवढं केलं तरी पुरे. मग तुमच्या अम्मूला कुणीही शिक्षा करणार नाही.'

इस्थाचं लक्ष कुठंय, त्यावर बेबी कोचम्माची बारीक नजर होती. टेबलावरचा तो पेपरवेट उचलावा आणि खिडकीतून बाहेर फेकून द्यावा, असं तिला हज्जारदा वाटलं. हृदयातली धडधड अजून पुरती थांबली नव्हती.

'मग?' शेवटच्या निर्णायक टप्प्यावर आपण येऊन पोचलो आहोत, हातातला वेळ संपत आलाय याचा जबरदस्त तणाव तिच्या शब्दाशब्दांत पुन्हा उमटू लागला होता.

'काय ठरलं तुमचं? त्या इन्स्पेक्टरला काय सांगू मी? अम्मूला वाचवायचंय आपल्याला, की ती गेली तुरुंगात खडी फोडायला तरी चालणारेय?'

काय करताय?

डुकरांना आंघोळ घालायचीय? की मासे मारायला नदीवर जायचंय? मासे मारायला नदीवर जायचंय की डुकरांना आंघोळ घालायचीय?

जुळ्या मुलांनी प्रथमच सरळ नजरेनं बेबी कोचम्माच्या डोळ्यात थेट बघितलं.

घाबरलेल्या आवाजात दोघं एकत्र नाही, पण एकदम म्हणाली,

'अम्मूला वाचवायचंय!'

– त्यांचं हे उत्तर जन्मभर त्यांच्या डोक्यात किड्यासारखं वळवळत राहणार होतं.

त्यांचा हा निर्णय अगदी मरेपर्यंत त्यांचा पाठलाग करीत राहणार होता.

मरेपर्यंत आयुष्याच्या हर-एक टप्प्यावर... मुलं असताना, 'तरुण' झाल्यावर, तारुण्य संपवून प्रौढावस्थेत जाताना आणि त्याहीनंतर.

फसवणूक करून, लांडीलबाडीनं हा निर्णय त्यांच्या गळ्यात मारण्यात आला होता का? बळजबरी झाली होती का? सक्ती?

खरंतर, हो.

फसवणूक होती. बळजबरी आणि लांडीलबाडी तर होतीच होती.

पण म्हटलं तर, मामला इतका सोपा नव्हता.

दोघांनाही पक्कं ठाऊक होतं, की पर्याय फसवणुकीनं दिलेले असले, तरी आपल्यासमोर पर्याय होते आणि त्यातून निर्णयाची निवड आपली आपण केली... अगदी काही सेकंदात!

बेबी कोचम्माचं वाक्य संपता-संपता दोघांनी तिच्याकडे पाहिलं आणि दोघंही एकत्र नाही, पण एकदम म्हणाली,

'अम्मूला वाचवायचंय.'

'आम्हांला वाचवा. आमच्या आईला वाचवा.'

बेबी कोचम्माचा ताणलेला चेहरा क्षणात आनंदानं फुलून आला. सुटकेचा सुस्कारा तिच्या शरीरातून इतक्या वेगानं धावत गेला, की एकदम तिला संडासलाच व्हायला

लागलं.

तिनं ताबडतोब इन्स्पेक्टर मॅथ्यूच्या केबिनचं बंद दार उघडलं आणि वेगानं बाहेर जाऊन मॅथ्यूला शोधून आणलं.

'शहाणी आहोत मुलं. तुम्ही जे सांगाल, तसं करतील.'

बेबी कोचम्मानं घाईघाईनं निर्णय सांगून टाकला.

'ठीक. पण दोघं नको. दोघांपैकी एक जण कुणीतरी चला माझ्याबरोबर.' इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यूनं पुन्हा एकदा पर्याय दिला, 'कोण येतंय? मॉन? मॉल? कुणीही चालेल.'

'इस्था. तू जा रे.'

या वेळी बेबी कोचम्मानंच पर्याय निवडला. त्यातल्यात्यात इस्थावरच तिचा अधिक बरा विश्वास होता. तोच त्यातल्या त्यात विनम्र, आज्ञाधारक, सांगितलेलं ऐकणारा आणि जरा अधिक जबाबदार.

'तू जा, इस्था... शाणा तो माझा राजा!'

इस्था गेला.

अॅम्बॅसिडर ई. पेल्व्हीस... डबडबलेल्या डोळयांचा आणि विस्कटलेल्या केसांचा. सोबत उंचनिंच धिप्पाड पोलीसवाला आणि त्याच्या शेजारी हा छोटासा, बुटका. दोघेही निघाले... कोट्टायम पोलीस ठाण्याच्या अंधाऱ्या तळघरात. दगडी जमिनीवर दोघांचीही पावलं चटफट चटाक्फट वाजत वाजत दूर गेली.

इन्स्पेक्टरच्या केबिनमध्ये राहेल एकटीच उरली. शेजारच्या संडासात इन्स्पेक्टरच्याच 'पॉट'वर बसलेल्या बेबी कोचम्माच्या पोट साफ होण्याचे लदबद आवाज राहेलला स्पष्ट ऐकू येत होते.

'संडासातला फ्लश चालतच नाहीये.' बाहेर आल्या-आल्या बेबी कोचम्मा वैतागून किचकिचली, 'असला कसला घाणेरडा संडास?'

इन्स्पेक्टर परत आला, की त्याला संडासात तरंगणारे पिवळट पिवळट गोळे जसेच्या तसे दिसतील, या कल्पनेनं बेबी कोचम्माला फारच लाजिरवाणं वाटत होतं.

तळघरातल्या कोठडीत भीषण अंधार पसरलेला. इस्थाला काही म्हणता काही दिसत नव्हतं. कण्हल्यासारखा आवाज तेवढा येत होता. खूप खोल गेलेल्या, घुसमटलेल्या श्वासाचा आवाज. सगळीकडे इतकी आंबूस घाण, की इस्थाला ओकारीच आली.

तेवढ्यात कुणीतरी खटका ओढला.

सगळीकडे भगभगीत प्रकाश.

एका कोपऱ्यात लोळागोळा झालेल्या वेलुथाचं रक्तबंबाळ मुटकुळं पडलं होतं.

तो जवळपास नागडाच होता. रक्त आणि चिखलाचं बरबरटलेलं कमरेचं मुंडू पार अस्ताव्यस्त. एखादं गुपित फुटावं, तसं डोक्यातून भळभळणारं रक्त... प्रचंड मारहाणीनं

सगळा चेहरा भप्प सुजलेला आणि लहानशा वेलीला मोठ्ठा भोपळा धरावा, तसं आक्रसलेल्या, चोळामोळा झालेल्या शरीराला चिकटलेलं गोल गरगरीत डोकं... विकट, विचित्र हसणारा, चेचलेला रक्तबंबाळ भोपळाच. त्याच्या शरीराभोवती साचलेल्या लघवीच्या तळयातूनच पोलिसांच्या बुटांची ये-जा... त्या लघवीत वरचा भगभगीत बल्बही स्पष्ट दिसत होता.

मेलेला मासा अधांतरी तरंगावा, तशी इस्थाच्या पोटातली भीती सळसळून वर आली.

एका पोलिसानं बुटाच्या लाथा मारून वेलुथाचं मुटकुळं गदागदा हलवून बघितलं.

प्रतिसाद शून्य.

इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यू उकिडवा बसला आणि हातातल्या जीपच्या किल्ल्यांचा जाडजुड जुडगा वेलुथाच्या तळपायावरून फिरवला.

सुजलेले, रक्तबंबाळ डोळे हलकेच किलकिले झाले. त्या थकल्या डोळयांना आधी काही कळेचना. मग सावकाश नजर स्थिर झाली, तर एक लाडका चेहरा दिसला. नजरेवरच्या रक्ताचा पातळ थर ओलांडून काही वेळानं ओळख पटली.

त्या मुटकुळयातलं काहीतरी आपल्याकडे बघून हसलं, असं इस्थाला जाणवलं.

चेहरा नाही, ओठही नव्हेत, वेगळंच काहीतरी हसलं. कदाचित त्याचं कोपर असेल;

किंवा खांदा!

इन्स्पेक्टरनं त्याचा ठरलेला प्रश्न विचारला.

इस्थानं मान हलवली,

आणि ठरलेलं उत्तर दिलं.

त्याच क्षणी इस्थामधलं हसतं-खेळतं मूल पाय न वाजवता हलकेच बाहेर निसटून गेलं.

बाण घुसावा; तसा सन्नाटा इस्थाच्या 'आत' घुसला.

आणि सगळंच शांत, सुनसान झालं.

कुणीतरी पुन्हा खटका ओढून दिवा विझवला.

त्यानंतर पुन्हा कधीही वेलुथा दिसला नाही.

पोलिसांच्या जीपमधून आयमेनेमला परत जाताना बेबी कोचम्मा वाटेत 'रिलायबल मेडिको'ज् समोर थांबली. तिनं धावत जाऊन काम्पोजच्या गोळया आणल्या. दोन्ही मुलांना दोन दोन गोळयांचा खुराक चारला आणि वरून पाणी पाजलं.

चुंगमचा पुल येईतो दोघांच्याही डोळयांवर चांगलीच झापड आली होती. तशा पेंगुळल्या अवस्थेत इस्था राहेलच्या कानात पुटपुटत होता –

'तू म्हणतेस ना, तेच बरोबरेय. तो 'तो' नव्हताच मुळी. उरुम्बन होता. त्याचा भाऊ.'

'थॅन्ग गॉड,' राहेलने सुस्कारा टाकला.

'पण मग तो कुठं असेल आता?'

‘तो ना? गेला असेल पळून आफ्रिकेला.’

आफ्रिकेच्या कहाणीवर विश्वास ठेवून गाढ झोपलेली दोन मुलं त्यांच्या आईच्या ताब्यात देण्यात आली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ही कहाणी मुलांकडून अम्मूला समजेतो फार उशीर झाला होता.

वेळ टळून गेली होती.

असल्या गोष्टीत पोलिसांचे अंदाज चुकत नसतात. त्यातून इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यू पक्का मुरलेला. तो म्हणाला तसंच झालं.

वेलुथानं ती सकाळ पाहिली नाही.

आदल्या रात्रीच कधीतरी सगळं संपलं होतं.

मध्यरात्र उलटल्यानंतर पोलीस कोठडीतून मृत्यूचा वास सुटला.

...आणि एकमेकांना कुशीत घेऊन निळ्या क्रॉसस्टीचच्या पलंगपोसावर झोपलेलं ते छोटंसं कुटुंब?

...मृत्यू तिथवर पोचला नाही, हे खरं.

...फक्त तिथलं ‘जगणं’ संपलं.

आणि वास सुटला.

सगळं सुख करपून गेल्याचा वास!

सोफी मॉलचे अंत्यसंस्कार पार पडल्यानंतर दोन्ही मुलांना घेऊन अम्मू कोट्टायम पोलीस ठाण्यात गेली आणि इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यूनं तिच्या छातीवरचे दोन उभार आंबे चाचपून बघितले, तेव्हा वेलुथाच्या मृतदेहाची विल्हेवाट लागली होती. गावातले बेवारशी भिकारी मेले, की त्यांची प्रेतं फेकण्याचा एक ठरलेला खड्डा होता... तिथेच! आपल्याकडचे सगळे मुडदे त्याच खड्ड्यात फेकण्याची पोलिसांची प्रथाच होती.

सोफी मॉलचे अंत्यसंस्कार झाल्यावर कुणालाही न सांगता सवरता अम्मू थेट कोट्टायमच्या पोलीस ठाण्यात गेली होती, हे कळल्यावर बेबी कोचम्मा हादरलीच. एक गोष्ट पक्की गृहीत धरून बेबी कोचम्मानं तिच्या सगळ्या चाली खेळल्या होत्या. अम्मू कितीही चिडली, घरात तिनं कितीही धिंगाणा घातला, तरी वेलुथाबरोबर असलेले आपले ‘संबंध’ चारचौघांत उघडपणे कबूल करण्याची हिंमत तिला होणार नाही... ‘असा आततायी मूर्खपणा केला, तर आपल्याबरोबर आपल्या मुलांचंही आयुष्य बरबाद होईल,’

इतकं समजण्याची अक्कल अम्मूमध्ये नक्की असणार, याची बेबी कोचम्माला पक्की खातरी वाटत होती.

नेमका तिथेच डाव फसला.

अम्मूच्या स्वभावातला विचित्र, निसरडा गुंता बेबी कोचम्माला समजणं शक्य नव्हतं.

मुलांवर अपरंपार प्रेम करणाऱ्या आईचं समर्पित, महन्मंगल मातृत्व आणि पाठीवर स्फोटकं बांधून बेचिराख मरणाला हाकारणारा बेपर्वा संताप.

दोन्ही गोष्टी अम्मूमध्ये ठासून भरलेल्या.

ती थेट पोलीस ठाण्यात जाब विचारायला गेली होती, हे ऐकून बेबी कोचम्माच्या पायाखालची जमीनच सरकली.

इन्स्पेक्टर थॉमस मॅथ्यू असताना आपल्याला थेट धोका नाही एवढा दिलासा तिला आतून वाटत होता; पण 'तो' आहे, तोवर ठीक. उद्या त्याची बदली झाली म्हणजे? मिटवून टाकलेल्या केसची फाईल पुन्हा उघडली गेली आणि पाळंमुळं खणून काढायची ठरली, तर?

बाहेर वातावरण पेटलं होतं.

कॉम्रेड के. एन. एम. पिल्लई आपल्या कार्यकर्त्यांसह पॅराडाइज पिकल्सच्या गेटबाहेर ठाण मांडून बसले होते. घोषणाबाजी जोरजोरानं सुरू होती. एकाही कामगाराला कामावर येऊ दिलं जात नव्हतं. पॅराडाइज पिकल्सच्या मागच्या अंगणात पसरून ठेवलेल्या कैऱ्या, केळी, अननस आणि आलं-लसणीचे ढीग कुजायला लागले होते.

अशा वातावरणात, वाट्टेल ते घडू शकेल, या विचारानं हबकलेली बेबी कोचम्मा पुन्हा कामाला लागली.

अम्मूला ताबडतोब आयमेनेममधून हाकलून लावणं, एवढा एकच पर्याय तिला सुचत होता.

...या असल्या कामात बेबी कोचम्माचा हात कोण धरू शकणार?

लोकांच्या बागेतलं खतपाणी घालून आपलं शेत पिकवण्याचा अनुभव तिच्यासाठी नवा नव्हता.

छोटं भोक कुरतडून-कुरतडून उंदरानं धान्याच्या कोठारावर हल्ला चढवावा, तसा बेबी कोचम्मानं चाकोचा शोक दातात धरला आणि ती पटकन आत घुसली. आत शिरल्यावर तिनं तातडीनं पेरणी करून टाकली. दु:खानं वेड्यापिशा झालेल्या चाकोच्या मनात 'बदल्याचं' रोप पटकन रुजलं. सोफी मॉलच्या मृत्यूला अम्मू आणि अम्मूची दोन्ही मुलंच जबाबदार आहेत, हे चाकोला पटवून देणं अजिबातच अवघड नव्हतं.

अम्मूला कोंडून घातलेल्या खोलीचं दार फोडून संतप्त, दुखावल्या बैलासारखा आत घुसला तो चाको! पण त्याच्या नाकातली वेसण खेचली होती दाराआड उभ्या असलेल्या

बेबी कोचम्मानं.

अम्मूनं चंबुगबाळं आवरून तातडीनं घरातून चालतं व्हावं...

इस्थाला परत पाठवून द्यावं...

हे सगळं तिचं डोकं होतं.

चाको फक्त बोलला.

आणि तसं झालं.

प्रकरण २०
मद्रास मेल

कोचिन हार्बर टर्मिनसवर उभ्या असलेल्या मद्रास मेलच्या भणाण खिडकीत इस्था एकटाच उरला – अॅम्बॅसिडर ई. पेल्व्हिस. डोक्यावर केसांचा कोंबडा काढलेला वरच्याकडेचा मैलाचा दगड.

त्याच्या पोटात एकाएकी ढवळून आलं. एकदम गोळेगोळे उठून मळमळल्यासारखं. समुद्रावरच्या भन्नाट खार्‍या वार्‍याच्या वासाचं, हिरवट-हिरवट लाटांचं, जडजड आणि प्रचंड हलकं असं काहीतरी विचित्र-विचित्र वाटायला लागलं. त्याचं नाव घातलेली त्याची ट्रंक त्याच्या पायाशी सीटखाली सरकवून ठेवलेली होती. टोमॅटो सॅण्डविचचा डबा आणि उडणार्‍या गरुडाचं चित्र काढलेला 'ईगल थर्मास' समोरच्या छोट्या टेबलावर.

समोरच्या सीटवर गडद हिरव्या-जांभळ्या रंगाची कांजीवरम् नेसलेली खादाड बाई बसली होती. साडीची झगमग आणि दोन्ही नाकपुड्यांवरच्या टपोर्‍या हिर्‍यांचा लखलखाट. तिनं आपल्या हातातला बॉक्स पुढे करून त्यातले पिवळेधम्मक लाडू इस्थाला देऊ केले.

इस्थानं जोरात मान हलवून नको म्हटलं, तशी चश्म्याआडचे मिचमिचे डोळे मिचकावत, हवेत उडणारे मुके घेत ती बाई इस्थाला आग्रहानं म्हणाली,

'घे रे ऽऽ एकतरी खाऊन बघ लाडू. गोड आहे मस्त,' हे सगळं तिनं तामीळमध्ये सांगितलं. रोम्बो मधुरम्

काय म्हणाली, त्याचं इंग्रजी भाषांतर केलं.

तरीही इस्थाचा नकार कायम होता. त्यानं पुन्हा मान हलवली. त्या बाईला कसला उमाळा आला कोण जाणे, ती पटकन पुढे झाली आणि इस्थाच्या केसात लाडानं हात फिरवून त्याचा रुबाबदार कोंबडा तिनं पार विस्कटून टाकला. तिचं अख्खं कुटुंब (नवरा आणि तीन मुलं) पक्कं खादाड दिसत होतं. जिकडेतिकडे पिवळ्या लाडवांचा चुरा सांडलेला. सीटवर, पायाखाली सगळीकडे.

डोक्यावरचा निळा दिवा अजून लागला नव्हता.

खादाड बाईच्या मुलानं तडफडून-तडफडून खटका ओढला. लगेच त्या खादाड बाईनं दिवा मालवला आणि आपल्या नतद्रष्ट चिरंजीवांना चांगलं झापलं – निळा दिवा रात्री झोपताना लावायचा असतो. दिवसाउजेडी नाही.

फर्स्ट क्लासच्या डब्यातल्या सगळ्या गोष्टी हिरव्या रंगाच्या होत्या. सीट, झोपायचं बर्थ, पायाखालची जमीन, संकटसमयी ओढायची साखळी – सगळं हिरवं गडद हिरवा... फिकट हिरवा.

TO STOP TRAIN PULL CHAIN – हेसुद्धा हिरव्या रंगातच सांगितलं होतं.

OT POTS NIART LLUP NIAHC – इस्थानं मनातल्या मनात हिरवा विचार केला.

खिडकीपलीकडे उभ्या असलेल्या अम्मूनं उघड्या खिडकीच्या गजांमधून इस्थाचा हात घट्ट धरला होता.

'हे बघ, खिशातलं तिकीट नीट जपून ठेव,' आतलं रडू आतल्या आत दाबून ठेवणारे अम्मूचे केविलवाणे ओठ इस्थाशी बोलत होते,

'ते कधीही येतील आणि तिकीट विचारतील.'

इस्थानं मान हलवली.

खिडकीच्या बाहेर मान उंचावलेली अम्मू आणि स्टेशनवरच्या घाणीनं वैतागलेली छोटी राहेल. तिघांचीही मनं पहिल्यांदाच एका अनामिक, अबोल, धास्तावलेल्या भावनेनं बांधली गेली होती. आपण इतकं प्रेम केलं म्हणूनच 'तो' प्राणाला मुकला... मेला. आपणच मारलं त्याला. आपल्या प्रेमानं मारलं...

तिघांनाही तेच वाटत होतं पण वेगवेगळं. अपराधीपणाच्या भावनेनं तिघांच्याही पोटात खड्डे पडले होते, पण वेगवेगळे. तिघांच्याही हातावर रक्ताचे डाग. वेगवेगळे.

हे सगळं कुठल्याच वर्तमानपत्रात छापून आलं नाही.

जे झालं, त्यात अम्मूचा वाटा नक्की काय होता, हे जुळ्यांना पुढे पुष्कळ वर्षांनी समजलं.

सोफी मॉलचे अंत्यसंस्कार झाले, तेव्हा आणि त्यानंतर इस्था परत जाईतो अम्मू सतत रडवेली दिसे. डोळे सुजलेले, आवाज बसलेला, गप्प गप्प. मुलांना वाटलं, अम्मू आपल्यावरच रागावलीय. आपण नीट वागलो नाही म्हणून बहुतेक रडतेय. त्या अश्रूंचा अर्थ मुलांना कळलाच नाही. त्यातल्या शोकाचे नाजूक धागेही सोडवता आले नाहीत.

'हे बघ, डब्यातले सॅण्डवीच लवकर खाऊन टाक. नाहीतर ते ओले, चामट होतील.' अम्मू सांगत होती, 'आणि पोचल्यावर पत्र लिहायचंय... नक्की. विसरू नकोस.'

अम्मूनं इस्थाच्या नखांकडे निरखून पाहिलं आणि कडेला साचलेला काळा चिकटा आपल्या अंगठ्याच्या टोकदार नखानं उचकटून काढला.

'हे बघ, माझ्या लाडक्या बाळाला नीट सांभाळ. त्याची छान काळजी घे. मग मी येईन आणि त्याला घेऊन जाईन.'

'पण कधी, अम्मू? कधी येशील तू त्याला न्यायला?'

'लवकरच. लवकरच येईन.'

‘पण म्हणजे कधी? नक्की सांग नाऽऽ’

‘अरे खरंच येईन, माझ्या राजा. लवकर येईन.’

‘पण म्हणजे कधी? पुढच्या महिन्याच्या नंतरच्या महिन्यात? येशील? सांग ना, अम्मू! येशील?’

इस्थानं मुद्दामच जरा जास्त उडी मारली होती.

पुढच्या महिन्याच्या नंतरच्या महिन्यात? त्याला वाटलं अम्मू म्हणेल, ‘छे रेऽऽ इतका उशीर करून कसं चालेल? त्याच्या आधीच येईन मी. अभ्यास बुडेल ना तुझा!’

‘हे बघ, मला नोकरी मिळाली रे मिळाली, की मी लगेच येईन,’ अम्मू म्हणाली.

‘म्हणजे कधीच नाही... दॅट विल बी नेव्हरऽऽ.’

– न पेलवणारी भीती पुन्हा घेरून आली. हिरवट-हिरवट लाटांचं, जडजड आणि प्रचंड हलकं असं काहीतरी विचित्र वाटायला लागलं.

दोघांमध्ये काय बोलणं चाललंय त्याकडे गुपचुप कान लावून बसलेली ती खादाड बाई एकदम आपल्या मुलांकडे वळली आणि तामीळमध्ये खेकसून म्हणाली,

‘बघाऽऽ इतका छोटा मुलगा किती छान इंग्रजीत बोलतोय!’

‘बट दॅट विल बी नेव्हर,’ मोठ्या मुलीनं इस्थाचं वाक्य स्वत:शीच उच्चारून पाहिलं, ‘एन – ई – व्ही – ई – आर् – नेव्हर.’

‘बट दॅट विल बी नेव्हर’चा अर्थ होता पुष्कळ लांब. म्हणजे अगदी आत्ताच नाही किंवा अगदी उद्या-परवा, लवकरच नाही. ‘नेव्हर’ म्हणजे खूप लांब... पुष्कळ दिवसांनी.

‘नेव्हर’ म्हणजे ‘कधीच नाही, नॉट एव्हर’ असं म्हणायचंच नव्हतं त्याला.

पण शब्दांचे खेळ चालतातच स्वतंत्रपणे. ते वेगळ्या अर्थासाठी येतात आणि वेगळाच अर्थ निर्माण करून, मागे ठेवून निघून जातात.

बट, दॅट विल बी नेव्हर.

‘नेव्हर’ आणि ‘नॉट एव्हर’ मध्ये फरकच कुठंय फारसा? एक ‘ओ’ आणि एक ‘टी’ काढून घेतली की झालं! NotEver - Never!

ही काढाकाढी नेहमीच चालते.

कोण करतं?

ते.

ते कोण?

सरकार.

माणसांनी चांगलं वागावं म्हणून त्यांना तुरुंगात डांबणारं सरकार.

त्यांनी करायचं ते केलं. शेवटी व्हायचं ते झालंच.

Never- Not Ever.

अम्मूच्या छातीत बसून खसाखसा ठसकणारा तो माणूस एकदम गप्प झाला, हा खरं म्हणजे त्याचाच दोष होता. कुठल्यातरी परक्या गावातल्या अनोळखी लॉजमध्ये मायेचं कुणीही जवळ नसताना, उघड्या पाठीवर झोपून मानेशी मान घासणारं कुणीही नसताना एकट्या, एकाकी अम्मूचा प्राण गेला; कारण तोच!

तोच तर म्हणाला होता,

बट, दॅट विल बी नेव्हर, अम्मू!

म्हणजे, आपण कधीच... कधीच भेटणार नाही.

'वेड्यासारखं नको करू, इस्था. मी खरंच येईन, लवकर येईन.' खिडकीबाहेर अम्मूचे हलते ओठ इस्थाची समजूत काढत होते.

'मग आपण शाळा सुरू करू. त्यात मी शिक्षिकेचं काम करीन. तू आणि राहेल त्याच शाळेच्या वर्गात बसाल.'

'आणि ती शाळा आपल्याला नक्की परवडेल, कारण ती मुळी आपलीच असेल.'

इस्था एकदम उत्साहानं उसळत म्हणाला.

'आपली शाळा' असल्याचे अनेक फायदे त्याला एका फाटक्यात दिसायला लागले होते. फुकटच्या बसमधून फुकट फिरायचं. अंत्यसंस्कार फुकट... शिक्षण फुकट... सगळं फुकट... डम डम!

'मग आपण आपलं स्वत:चं एक घर बांधू.' अम्मू म्हणाली.

'छोटुसं घर.' राहेलचे डोळे आनंदाने चमकत होते.

'आपल्या शाळेत मोठ्ठे वर्ग असतील. प्रत्येक वर्गात मोठ्ठे मोठ्ठे फळे'– इस्थाला खूप पुढचं पुढचं सगळं दिसायला लागलं होतं.

'आणि खडू पण असेल.'

'मग राहेलबाई मुलांना शिकवतील.'

'आणि योग्य तेवढीच, बरोब्बर शिक्षा देतील.'

इस्था परत गेला; या दिवशी त्या सगळ्यांनी बघितलेलं स्वप्न हे एवढंसंच होतं. खडू... फळे... आणि योग्य तेवढीच, बरोब्बर शिक्षा. बास!

सगळे अपराध पोटात घालून उदार अंत:करणानं सोडून द्यावं, अशा सहज सोप्या सुटकेची अपेक्षाच नव्हती. जो अपराध घडला, त्याच्या प्रमाणात योग्यती, उचित शिक्षा मिळावी एवढीच अपेक्षा होती. तयार घरामधल्या तयार बेडरूमच्या भिंतीत आधीपासूनच ठोकून बसवलेली तयार कपाटं असतात, तशा 'तयार शिक्षा' असू नयेत; आणि त्या 'तयार' कपाटात जन्मभर उलथापालथ करत राहावी लागते; तसे त्या तयार शिक्षांचे परिणाम जन्मभर भोगावे लागू नयेत; एवढंच फक्त वाटत होतं.

कसलीही 'वॉर्निंग' न देता, एका क्षणी अचानक मद्रास मेल हलली आणि पुढे निघाली.

स्वत:वरची धूळ झटकत, सुरकुत्या मोडत... सावकाश!

इस्थाचे डोळे विस्फारले, पाणावले.

चालत्या गाडीबरोबर प्लॅटफॉर्मवरून अम्मूचे पाय हलके-हलके मागे पडू लागले. तरीही घट्ट धरून ठेवलेल्या तिच्या हातात इस्थाची नखं फरफटत रुतली. मद्रास मेल वेग घेत होती. चालता चालता अम्मूनं नकळत धावायला सुरुवात केली.

'गॉडब्लेस, माय बेबी... राजा, नीट जपून राहा रे. मी येईन... लवकर येईन तुला न्यायला.'

'अम्मूऽऽ.'

– हातातला हात सुटल्या क्षणी काय बोलावं इस्थाला कळेना.

बोटात गुंफलेली बोटं सुटली.

हातातून हात सुटला.

झपाट्यानं दूर गेला. दिसेनासा झाला...

'अम्मूऽऽ उलटी होतेय... उलटी होतेय मला...' मद्रास मेलच्या तुफान खडखडाटात इस्थाचा आवाज त्याला स्वत:लासुद्धा ऐकू आला नाही.

कमरेला पट्टा... पायात बूट... कपाळावर विस्कटल्या केसांचा उलटा उडणारा कोंबडा...

एल्व्हिस द पेल्व्हिस.

गेला निघून.

त्याचा आवाज फक्त मागे राहिला.

प्लॅटफॉर्मवर धावून-धावून थकलेली राहेल जीव एकवटून जोरजोरानं त्याला हाका मारत राहिली.

मद्रास मेल केव्हाच निघून गेली होती.

कोंदटलेल्या प्लॅटफॉर्मवर भगभगीत प्रकाश पसरला.

तब्बल तेवीस वर्षांनंतर पिवळा टी शर्ट घातलेली राहेल... इस्थाबरोबर बसलेली.

भोवती अंधार.

त्याच्याकडे वळून राहेलनं त्याला हाकारलं,

'इस्थापप्पीचाचेन कुट्टप्पेन पीटर मॉन...'

ती बोलत राहिली... हलके-हलके हाकारत, कुजबुजत राहिली.

ओठ हलत राहिले.

त्यांच्या देखण्या आईचे सुंदर, नाजूक ओठ.

पाठीच्या कण्याला एकही सुरकुती न घालता इस्था सरळ, ताठ बसला होता. जणू कुणीही कधी येईल आणि अटक करून नेईल... आपण तयारीत असलेलं बरं... अशा अविर्भावात. ताठ आणि निश्चल.

त्यानं सहज राहेलच्या ओठांवर बोट ठेवलं.

बोलू नकोस. शूऽऽऽ

त्याचं बोट ओल्या ओठांच्या नाजूक महिरपीवरून गोलाकार फिरलं.

ओठ थरथरत विलग झाले.

आतल्या शुभ्र कळ्या.

आसुसल्या ओठांनी त्या कापर्‌या, उष्ण बोटांचं चुंबन घेतलं.

राहेलनं इस्थाचा हात धरला.

आणि आपल्या गालावर ठेवला.

घट्ट.

पावसानं कुस्करलेला थंडगार गाल त्या हाताखाली पुन्हा एकदा...

मग ती उठून बसली. त्याच्याभोवती आपले हात वेढून घेतले आणि त्याचं शरीर कवळून आपल्याजवळ ओढलं.

तोही पलंगावर पहुडला.

आणि तीही.

दोघंही कितीतरी वेळ तसेच पडून राहिले.

गडद अंधारात टक्क जागे.

भोवती सगळी भकास पोकळी... निरर्थक शून्य.

आणि त्यांचं वय हे असं.

ना धड म्हातारपण आलेलं... ना धड तारुण्य उरलेलं.

कधीही काहीही होईल असं.

योगायोगानं भेटलेले अनोळखी प्रवासी.

साता जन्माचा फेरा सुरू झाला, त्याआधीची ओळख फक्त. गर्भातली नाळ.

पुढे काय काय झालं, ते सुटं सुटं करून, नीट उलगडून, समजेल असं सांगणं कठीण.

माम्माचीच्या भाषेत फरक सांगणं तर अवघडच. प्रेमापासून संभोग वेगळा करता येईल, भावनांमधून गरजा वेगळ्या काढता येतील, असं काही नाही.

नाहीच.

एवढंच फक्त, की राहेलच्या नजरेत 'ती त्रयस्थ झाक' आली नाही.

शरीराचे सोहळे चालू असताना तिच्या डोळ्यातल्या कुणीतरी खिडकीपल्याडच्या समुद्रात नजर गुंतवली नाही.

भर धुक्यात टोपी घालून चालणाऱ्या कुणा त्रयस्थाच्या पावलांभोवती नजर गुरफटली नाही.

आणि दुसरं म्हणजे –

खूप गारठा होता आजूबाजूला आणि भन्नाट पावसाची ओल.

बाकी हवेत सन्नाट. पण मग म्हणायचं काय?

काय घडलं नक्की? पावसाच्या त्या रात्री?

एवढंच फक्त, की

बाहेर पाऊस ओसरलेला, तरी डोळ्यातल्या पाण्याला खळ नव्हता. खूप वर्षांचे हुंदके, उमाळे उसळून आतल्याआत फुटत होते... एकाच्या पोटात दुसऱ्यानं बसावं तसा सन्नाट्याच्या कुशीत शिरलेल्या निरर्थक भकास पोकळ्यांचा ढीग एकात एक गुंतून स्वस्थ पडलेल्या चमच्यांच्या राशीसारखा.

एवढंच फक्त,

की दोन्ही शरीरांमध्ये श्वासांचं उधाण आणि गळ्याशी दाटलेलं तुफान.

एवढंच फक्त,

की गडद, तपकिरी रंगाच्या उघड्या खांद्यावर रोवलेल्या दातांचे अर्ध गोलाकार व्रण.

सगळं संपलं, उधाणून ओसरून गेलं, तरी एकमेकांना घट्ट बिलगलेली दोन शरीरं.

त्या दोघांमध्ये उधाण होतं,

पण भेसूर दु:खाच्या किळसवाण्या चेहऱ्याचं.

तेवढंच वाटून घेतलं त्यांनी... जे दिलं-घेतलं, त्यात आनंदाचे कण नव्हतेच...

त्या रात्री.

आणि एवढंच, की

त्या रात्री पुन्हा एकदा प्रेमानं कायदेकानून मोडले, दोन उधाणल्या शरीरांखाली चुरगळले, तुडवले...

प्रेम कुणावर करावं, कुणी... कधी आणि किती करावं,

याला काही धरबंदच राहिला नाही.

त्या रात्री.

पॅराडाईज पिकल्स आणि प्रिझर्व्हज्.

कधीची बंद पडलेली.

कोळ्यांची जाळी आणि धुळीचे थर.

दरवाजे मोडकळीला आलेले. त्यांच्या फटींमधून उंदीर-घुशींची ये-जा...

लोणच्याच्या बरण्या कोळयाच्या जाळयांनी वेढलेल्या. एक सोडून सगळया बरण्या रिकाम्या.

एका बरणीच्या पोटात घट्ट झालेल्या पांढऱ्याधोप चुऱ्याचा ढीग.

फॅक्टरीच्या आत बारवर बसणाऱ्या घुबडाच्या हाडांची पूड.

ते कधीचं मेलं आणि खारात पडलेल्या लोणच्यासारखं बरणीत भरून राहिलं.

खारवलेलं घुबड.

सोफी मॉलनं एकदा विचारलं होतं,

'चाको, पक्षी म्हातारे झाले की जातात कुठं? आकाशातून उडता-उडता मेलेले पक्षी खाली कसे पडत नाहीत?'

– तिच्या प्रश्नाचं उत्तर.

खारवलेलं, लोणच्याच्या बरणीत भरलेलं घुबड.

किंवा मेलेल्या घुबडाचं लोणचं.

सोफी मॉल आयमेनेममध्ये आली, त्याच दिवशी बेबी कोचम्माच्या बागेत, तळयाकाठी फिरताना आकाशात भिरभिरणाऱ्या घारी बघून तिने चाकोला विचारलं होतं,

– सोफी मॉल. बेलबॉटम, डोक्यावर हॅट घातलेली आणि पहिल्यापासून लाडाकोडात वाढलेली...

'हार्ट ऑफ डार्कनेस'मधून फिरताना मार्गरिट कोचम्माने कुणाच्याही बाबतीत काहीही घडू शकतं हे ठाऊक असल्याने सोफी मॉलला औषध घेण्यासाठी घरात बोलावलं.

तिच्यासाठी गोळयांची माळ तयार होती.

साध्या तापाच्या गोळया, मलेरियाच्या गोळया, जुलाबाच्या गोळया.

पाण्यात बुडून मरण्याच्या रोगावर मात्र तिच्याजवळ गोळी नव्हती.

गोळया घेईतो जेवायची वेळ झालीच.

इस्था बोलवायला आला, तेव्हा सोफी मॉल वैतागून म्हणाली, 'सपर, सिलीऽऽ'

मुलांसाठी वेगळं, छोटंसं टेबल मांडलं होतं.

मोठ्या माणसांकडे पाठ करून सोफी मॉल जेवायला बसली. तिच्यासमोर इस्था आणि राहेल.

ताटातलं अन्न चिवडता-चिवडता सोफी मॉलनं तोंड वेंगाडायला सुरुवात केली. आधी कधीच न खाल्लेले विचित्र पदार्थ ती कसेबसे पोटात ढकलत होती. प्रत्येक घास अर्धा चावून जिभेच्या टोकावर बाहेर काढायचा आणि आंबूस उलटी गिळावी तसं आंबट तोंड

करून घशाखाली ढकलायचा...

सोफी मॉलचं बघून राहेलनंही तशी गंमत केली. तिचं वेंगाडलेलं तोंड अम्मूच्या नजरेतून सुटलं नाही.

अम्मूनं बखोटी धरून राहेलला पानावरून उठवलं आणि हात धुवून झोपायला पिटाळलं.

राहेलला पलंगावरच्या पांघरुणात गुरगुटून झोपवल्यावर अम्मूनं खोलीतला दिवा मालवला. गाल अजिबात ओले न करता वरच्यावरच राहेलचा मुका घेतला. त्या मुक्यावरून राहेलला जाणवलं, अम्मूचा पारा फारसा चढलेला नसणार.

'अम्मू, तू रागावली नाहीयेस ना गं?'

– अम्मूनं परत तिला मिठीत घेतलं.

'नाही सोन्या, मी नाही रागावले'... राहेलच्या गालावर ओठ टेकवत अम्मू हसून म्हणाली. 'गुड नाईट स्वीटहार्ट, गॉड ब्लेस यू...'

'गुडनाईट अम्मू. इस्थाला लवकर पाठवून दे.'

– लेकीचा निरोप घेऊन घाईघाईनं निघालेल्या अम्मूला मागून हाक आली,

'अम्मूऽऽ'

'काय गं?'

'आपण एकमेकींच्या आहोत ना गं? तू आणि मी?'

– अम्मूचे पाय थबकले.

बेडरूमच्या दाराशी टेकून ती कितीतरी वेळ अंधारातच उभी राहिली.

तिला पुन्हा जेवणाच्या टेबलाशी जावंसंच वाटत नव्हतं...

गोरी मुलगी आणि तिची आई...

आकाशातून उतरलेल्या जणू पर्‍याच असाव्यात, तसं अख्खं घर त्यांच्याभोवती पिंगा घालत होतं. त्यांच्या कौतुकाला काही सीमाच उरली नव्हती.

– आता त्यातल्या एक जरी शब्द कानावर पडला, चाकोचं लोचट हसणं एकदा जरी दिसलं, किंवा माम्माचीच्या चेहेर्‍यावर मधूनच तरंगणारी लैंगिक असूयेची भुकावली झाक दिसली, किंवा नवर्‍याला सोडून माहेरी परतलेली बाई आणि तिच्या मुलांना पायपुसण्याइतकीही किंमत कशी नसते, हे परत-परत टोचून सांगणारे बेबी कोचम्माचे टोमणे पुन्हा कानावर पडले, तर त्या धगीत आपण जळून, होरपळून, मरून जाऊ, असं अम्मूला वाटत राहिलं.

ती खूप वेळ तशीच उभी राहिली.

बेडरूमच्या दाराला टेकून.

अंधारात थिजल्यासारखी.

संध्याकाळी उघड्या डोळ्यांनी पाहिलेलं सुंदर स्वप्न समुद्रात उभ्या राहाणाऱ्या लाटेसारखं तिच्या मनात फुलून, उसळून आलं.

धारदार कड्यासारखे तासलेले खांदे असलेला, काळ्याभोर... टणक... खारट शरीराचा एक रुबाबदार पुरुष किनाऱ्यावरची वाळू तुडवीत हसत हसत तिच्याकडेच येत होता...

एकच हात असलेला, रुंद केसाळ छातीचा पुरुष.

कोण होता तो?

कोण असेल?

'द गॉड ऑफ लॉस.'

'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज.'

मोठ्या-मोठ्या तत्त्वांपायी साधे-साधे आनंद गमावून बसलेला.

त्यानं तिला स्पर्श केला असता, तर एका शब्दानं तिच्याशी बोलता आलं नसतं. तिच्यावर प्रेम केलं असतं जीव ओतून, तर मग निखळून नसतं पडता आलं तिच्यापासून... तो बोलला असता भरभरून, तर काही ऐकूच नसतं आलं, आणि लढला असता जीवावर उदार होऊन तर रक्तबंबाळ कपाळमोक्षाखेरीज दुसरं काहीच नसतं घडलं.

– एकाएकी अम्मूच्या शरीरात तुफान उठलं.

तिला तो हवा झाला.

तिच्या शरीरातल्या कणाकणानं, त्याच्या शरीराखाली चुरगळून, कुस्करून जाण्यासाठी तडफडून आकांत मांडला.

– ती तशीच बाहेर पडली.

आणि जेवायला गेली.

प्रकरण २१
जगण्याचं मोल

रात्र चढत चालली होती.

डोळे मिटून स्वस्थ पडलेल्या 'आयमेनेम हाऊस'मध्ये निजानीज झाली.

कमरेला बांधलेल्या पांढऱ्याशुभ्र परकरावर, चाकोचा एक जुना शर्ट चढवून, हलक्या पावलांनी अम्मू बाहेरच्या व्हारांड्यात आली.

खाली-वर येरझाऱ्या.

चुटपुट.

अस्वस्थता.

काय करावं सुचत नव्हतं.

शेवटी थकलीभागली अम्मू, उदास चेहऱ्यानं व्हरांड्यात वेताच्या खुर्चीवर स्वस्थ बसली.

डोक्यावर बटबटीत डोळ्यांच्या गण्याचं मुंडकं. दोन्ही बाजूला पुन्नयन कुंजू आणि अलीयुट्टी अम्माचीच्या व्यक्तिचित्रांच्या तसबिरी.

अम्मूची जुळी मुलं शांत घरात शांत झोपली होती. दिवसभर फार दमणूक झाली, की ते दोन छोटे सैतान डोळे अर्धवट उघडे ठेवून झोपून जात. ही सवय त्यांच्या बाबाकडून उचललेली.

हातातला छोटा ट्रान्झिस्टर अम्मूनं सुरू केला. कुणीतरी पुरुष गात होता... याआधी कधीच न ऐकलेलं ते इंग्लिश गाणं रात्रीच्या गडद अंधारात हलकेहलके झिरपत राहिलं.

ती तशीच बसून राहिली.

रात्रीच्या आभाळात लुकलुकणाऱ्या चांदणीसारखी.

समोर भलीमोठी बाग... विखारी द्वेषानं ठासून भरलेल्या कडूजहर आत्याबाईने लावलेला झाडाझुडपांचा पसारा.

रेडिओवरचं गाणं सुरूच होतं.

रात्रीच्या स्तब्ध गारव्यावरून तरंगत-तरंगत एक आवाज येत होता.

वाटेतली तळी ओलांडत... नद्यांचं पाणी कापत, सुस्तावल्या झाडांच्या माथ्यांवरून.. पिवळ्या चर्चला वळसा घालून... वाटेतली शाळा मागे टाकत... मातीच्या रस्त्यावर खाचखळग्यांमध्ये टप्पे खात आलेला 'तो आवाज' व्हरांड्याच्या पायऱ्या चढून थेट तिच्यापर्यंत पोचत होता.

तिला हाकारत होता.

गाणं ऐकता-ऐकता समोरच्या दिव्यावर झेपावणाऱ्या किड्या-पाकोळ्यांचा खेळ ती

खूप वेळ पाहात राहिली. हवेत भरारणाऱ्या त्या पाकोळ्यांनी जळून मरण्याकरता नुसता आकांत मांडला होता.

गाण्याचे शब्द तिला पहिल्यांदाच कळले.

...आणि आतल्याआत स्फोट व्हावा, तसं क्षणात काहीतरी चमकलं.

देअर इज नो टाइम टू लूज
आय हर्ड हर से,
कॅश युवर ड्रीम्स बिफोर
दे स्लीप अवे
डाईंग ऑल द टाइम
लूज युवर ड्रीम्स अॅन्ड
यु विल् लूज युवर माईन्ड...

मुठीतल्या स्वप्नांची वाळू घरंगळून जायला किती क्षण लागतात? ...त्याआधीच पकडा तुमची स्वप्नं... वाचवा त्यांना, रुजवा स्वत:च्या आत... येऊ द्या तुमच्या स्वप्नांना फुलांचा बहर... ती हरवली तुमच्या हातून, तर संपून जाईल तुमचं अस्तित्वच! खुर्चीत बसल्या-बसल्या अम्मूनं गुडघे पोटाशी घेतले... त्यांच्याभोवती मिठी घालून हनुवटी टेकली.

गाण्यातल्या शब्दांचा अर्थ...

हातून निसटणाऱ्या स्वप्नांची गोष्ट...

या योगायोगावर तिचा विश्वास बसेना.

हलके-हलके असर चढत चालला होता.

त्या भरात नजर उचलून तिनं समोर बागेकडे पाहिलं. रात्रीचा फेरफटका मारायला निघालेलं औसा घुबड झपकन तिच्या नजरेसमोरून सरकत गेलं. बागेतली अॅन्थुरियमची फुलं काशाच्या गोळीबंद थेंबांसारखी चमकत होती.

गाणं संपून खूप वेळ झाला, तरी ती तशीच बसून राहिली.

...एका क्षणी चेटूक झाल्यासारखी एकदम उठली आणि ताडकन खुर्ची ढकलून निघाली.

...तत्क्षणी पायातला गुंता सोडवून, जगण्याच्या कैदेतून तिला बाहेर पडायचं होतं.

जायचं होतं फुलांच्या देशात!

एखाद्या रसायनाच्या भुलवणाऱ्या वासाचा माग काढत भुकेल्या किड्यानं पुढे-पुढे सरपटावं, तशी ती अंधार कापत निघाली.

स्वप्नांच्या दिशेनं.

नदीकडे जाणारी वाट तिच्या पावलांना ठाऊक होती. चालता-चालता वेग वाढला आणि झाडोरा तुडवता-तुडवता ती नकळत धावत सुटली.

मीनाचलच्या काठाशी पोचली, तेव्हा तिचा श्वास फुलला होता. धाप लागली होती.

अचानक तिला हुंदका फुटला. जणू, खूप उशीर झाला होता... वेळ गाठली नाही, तर सगळं आयुष्यच जळून खाक होणारं होतं.

जणू तिला ठाऊकच होतं,

तो आला असेल...

वाट बघत कधीचा थांबला असेल...

...आणि आपण?

त्याला जणू ठाऊकच होतं, की ती येईलच...

खरंच ठाऊक होतं त्याला,

की ती येईल. नक्की येईल.

बेसावध क्षणी नेमका डाका पडला – घराण्याच्या चारित्र्याची पावलं घसरली आणि जुनापाना इतिहास सोलला, ओरबाडला गेला, 'त्या' संध्याकाळीच कळलं होतं त्याला.

चाकूचं लखलखतं पातं घुसावं, तशी एक नवीकोरी जाणीव त्याच्या मनात घुसत, उतरत गेली होती.

तिच्या मुलीला तो अंगाखांद्यावर खेळवत होता, त्या संध्याकाळी.

'आता तू फक्त 'देत' राहण्याची गरज नाही, आता माझ्याकडून तू काही भेटी 'घेऊ' शकतोस... मी त्या तुला देईन...' असं तिनं नजरेनं सांगितलं त्या संध्याकाळी.

तिचे तांबूस गोरे नितळ दंड,

उघडे खांदे,

हसली की गालावर फुलणारी खळ्यांची गोड फुलं.

आणि नजरेत भरारणारी कसली वेगळीच छटा.

हे सगळं...

छोट्या होड्या, आणि लाकडी पवनचक्क्यांच्या बदल्यात?

तो अजून आला नव्हता.

पाण्यात उतरणाऱ्या दगडी पायऱ्यांवर अम्मू स्वस्थ बसून राहिली.

पोटाशी घेतलेल्या गुडघ्यात डोकं खुपसून.

कितीतरी वेळ.

सगळाच वेडेपणा.

इतक्या कशा भुललो आपण? एवढी कशी खातरी वाटली?

...की, तो येईल?

खोल नदीपात्रात पाठीवर उताणा झोपलेला वेलुथा चमचमणाऱ्या आकाशाकडे

पाहात संथपणे पाण्यावर तरंगत होता. अर्धांगवायूनं लुळा पडलेला भाऊ आणि एका डोळ्यानं आंधळ्या झालेल्या बापाला जेवू-खाऊ घालून झालं होतं. घरातली झाकपाक, निजानीज झाल्यावर वेलुथा बाहेर पडला आणि स्वत:चं थकलं शरीर त्यानं पाण्यावर झोकून दिलं. आता त्याचा तो मुखत्यार होता.

काठाकाठानं वाहणारा ओंडका... डोळे मिचकावून मंद हसणारी मगर... नदीवर वाकलेली नारळाची झाडं... सगळ्यांचं वेलुथाकडे लक्ष होतं.

पिवळ्या बांबूंच्या ओल्या बनातून उगीचच एखादा हुंदका फुटत होता आणि छोट्या-छोट्या नखरेल माशांची उगीचच तुरतुरणारी झिम्मड.

वेलुथा झटकन उलटा झाला आणि नदीचा प्रवाह कापत वरवर पोहत निघाला. जाताजाता शेवटची नजर टाकावी म्हणून त्याने किनाऱ्याकडे पाहिलं... सगळाच वेडेपणा... एवढे कसे भुललो आपण? एवढी कशी खातरी वाटली?... की, ती येईल?

...त्याच्या नजरेला काहीतरी दिसलं,

म्हणून परत पाहिलं... तर,

ती!

पाण्यात पडल्यापडल्या अपरिमित आनंदाची लाट सरसरत त्याच्या शरीरात धावली.

आता तरंगत राहाणं शक्य नव्हतं.

हात-पाय मारून पोहण्याइतकी ताकदच उरली नव्हती.

नदीच्या खोल पात्रात तो सरळ उभा राहिला आणि जीव एकवटून किनाऱ्याकडे धावत सुटला. भोवती काळाकुट्ट अंधार.

नदीच्य्ाा कुशीतून वेगानं सरकत येणारं त्याचं डोकं तिला ओळखताच आलं नसतं.

असेल कसलातरी गोळा... किंवा वरून वाहात आलेला नारळ.

– आणि ती बघतही नव्हती नदीकडे.

गुडघ्याभोवती वेढून घेतलेल्या हातांच्या मिठीत मान खुपसून कधीची बसली होती.

त्याचं मात्र तिच्याचकडे लक्ष होतं.

तो बघत... बघतच राहिला. मनसोक्त.

आपण एका काळ्याकुट्ट बोगद्याच्या दिशेनं निघालो आहोत... आतल्या काळोखात गुदमरून घुसमटून जाऊ... बाहेर पडेपडेतो आपल्याला सर्वस्व गमावून बसावं लागेल, हे कळलं असतं त्याला, तर तो थांबला असता? परत फिरला असता? माघारी वळला असता?

कदाचित.

कदाचित नसताही वळला.

कसं सांगणार?

...वेलुथा धावता-धावता नकळत पुन्हा पाण्याच्या कुशीत शिरला. सवयीनं हात-पाय हलत राहिले. पाणी कापत-कापत तो काठाच्या दिशेनं निघाला...

पाण्याच्या पृष्ठभागावर कसलीच हालचाल दिसत नव्हती. नदीच्या पोटातून वेलुथाचं घट्ट, गोळीबंद शरीर हलके-हलके पुढे झेपावत होतं.

तो काठाशी पोचता-पोचताच तिनं योगायोगानं नजर उंचावली.

काठावरला चिखल ओलांडून निथळत्या शरीरानं त्या दगडी पायऱ्यांवर पाऊल ठेवलं आणि ओला अंधार कापत तो झपाझप तिच्याकडे निघाला.

त्याच्या धावत्या पावलांमधल्या आत्मविश्वासाकडे ती भारावल्यासारखी बघत राहिली. मुक्त स्वातंत्र्याचा तो निर्भर आविष्कार अनोळखीच होता तिच्यासाठी.

मग एकदम लक्षात आलं,

नदीच्या भोवती बांधलेलं हे सगळं जगच 'त्याचं' आहे. तो इथला राजा आहे.

इथलं पाणी, काठावरला चिखल, झाडंझुडपं, पाण्यातले मासे आणि आकाशातील नक्षत्रं... ही सगळी 'त्याची' संपत्ती आहे. इथं तो त्याच्या मनासारखा जगणार.

डोळ्यांत उतरलेल्या निर्भर स्वातंत्र्याचं तेज पाणी चढलेली तिची नजर, धावत येणाऱ्या त्याच्या नग्न शरीरावर रुतून बसली.

किती घट्ट आणि गोळीबंद शरीर.

टरारून फुगलेले स्नायू.

आणि अधलेमधले खड्डे-खळगे.

आजवर त्यानं रंधे मारमारून तासलेल्या लाकडांची प्रमाणबद्ध चकाकी... ठोकलेल्या प्रत्येक खिळ्याचा अणकुचीदार रुबाब आणि लाकूड रंधून त्यातून घडवलेल्या हर-एक वस्तूचा डौल...

...सगळं त्याच्या शरीरात ठासून भरलं होतं.

पाण्यानं निथळणाऱ्या त्या शरीरातलं डौलदार पुरुषत्व...

...ती टक लावून बघतच राहिली.

कमरेवर फक्त एक पांढरं फडकं लावलेलं, दोन पायांच्या मधोमध सपाट पोटावर त्याची गाठ.

त्या फडक्याची निथळती टोकं पिळून, त्यानं मानेला हिसका देत केसातलं पाणी झटकलं. इतक्या काळ्याकुट्ट अंधारातही त्याचं शुभ्र मोतिया हसू मंद चमकत होतं. लहानपणी तो असाच हसायचा. तेवढंच फक्त बरोबर घेऊन त्यानं उधाणल्या तारुण्यात पाऊल ठेवलं होतं.

दोघांच्या नजरा परस्परांमध्ये गुंतल्या.

मनातलं विचारांचं वेडं वादळ कधीच शमलं होतं.

ती वेळ आली आणि निघूनही गेली.

सगळा हलकल्लोळ थांबला... निवला.

...आता 'निखारा' फुलू लागला होता.

पाण्यानं निथळणारं त्याचं शरीर तिच्यासमोर उभं राहिलं. अख्खी नदीच जणू त्याच्यामधून ठिबकत होती.

ती तशीच बसून राहिलेली.

पायऱ्यांवर. निस्तब्धपणे.

नजरेसमोर चिंब ओली ज्वाळा.

मध्यरात्रीच्या चंद्रप्रकाशात तिचा चेहरा काहीसा मंद... पण उजळलेला.

तेवढ्यात कुठूनशी गार वाऱ्याची झुळूक आली आणि त्याचं ओलं उघडं अंग शहारलं. एकाएकी 'आत' काहीतरी थरारून उठलं. घावावर घाव बसत राहिले.

काहीतरी भयंकर अपराध घडलाय. तिचं मन ओळखण्यात काहीतरी गफलत झाली असणार... नक्की. आपण उगीचच भलत्यासलत्या कल्पना केल्या. काय वाट्टेल ते गृहीत धरलं. हा सगळा एक सापळा नसेल कशावरून? आजूबाजूच्या झाडाझुडपात दबा धरून बसलेल्या नजरा पाहात असतील आपल्याकडे. मग झेपावतील क्रूर लांडग्यासारख्या... त्यांना शिकार करायची असणार आणि सावजाला पल्ल्यात गाठता यावं म्हणून हे सुंदर 'आमिष' बसवून ठेवलं असेल काठावर... याशिवाय काय घडणार दुसरं? जे मनात आहे आपल्या, ते खरं कसं असेल? 'त्यांनी' तर मोर्चातही पाहिलंय आपल्याला...

आत कळवळणाऱ्या मनाचा लगाम खेचत त्याचं शरीर पुढे झालं. खरंतर सहज, नेहमीसारखं बोलायला हवं होतं; पण आवाजात कसलीतरी विचित्र उष्ण खरखर आलीच.

'अम्मुकुट्टी... काय विशेष? आज इकडे कुठं?'

न बोलता ती उठली आणि त्याच्या शेजारी जाऊन उभी राहिली.

क्षणात त्याला बिलगली.

तो तसाच स्तब्ध उभा होता. तिला कवळून मिठीत घेण्याची शुद्धच नव्हती उरली.

हीव भरलेलं त्याचं शरीर थरकापलं होतं. थंडी वाजत होती... अनाम दहशतीचे दंश झोंबत होते... आणि दोन मांड्यांमध्ये उसळलेल्या आगीचा भडका हाडामांसात भिनत सुटला होता. घाबरलेल्या मनाचा चोळामोळा करून समोरच्या 'आमिषावर' तुटून पडण्यासाठी त्याचं शरीर चवताळून उठलं होतं.

त्याला ती हवी होती.

तातडीनं.

त्या... त्याच क्षणी.

त्याच्या निथळत्या शरीराच्या ओलाव्यात तिचा शुष्क कोरडेपणा विरघळत गेला आणि हात पसरून तिनं त्याला घट्ट मिठीत घेतलं. तिची बोटं त्याच्या पाठीवर नाचायला लागली... नखांच्या कडा आत-आत रुतत निघाल्या.

त्या हव्याहव्याशा वेदनांनी चित्कारलेल्या त्याच्या मनात नवंच युद्ध पेटलं. जास्तीतजास्त काय होईल? सगळं सोडून रस्त्यावर यावं लागेल, नोकरी जाईल. घर तुटेल. खाण्यापिण्याचे वांधे होतील. आयुष्य उद्ध्वस्त होईल. याच्यापेक्षा वाईट काय होईल?

त्याच्या मनातल्या या युद्धाची खडाजंगी तिला ऐकू येत होती. तिनं त्याच्याभोवती आपली मिठी अधिकच घट्ट केली... त्याला आणखी जवळ ओढून घेतलं... हलके हलके शांत होऊ दिलं.

...तसा तो धगधगून उठला.

तिनं आपल्या शर्टाची बटणं काढली आणि तो विचित्र दुरावा अंगातून उपसून दूर भिरकावून दिला.

दोन शरीरं पुन्हा एकमेकांना भिडली,

...आणि खूप वेळ तशीच बिलगून उभी राहिली.

तिचा गव्हाळ रंग भिनत गेला त्याच्या काळया कुळकुळीत रंगात... आणि शरीराचा मऊ मांसल ऐवज बिलगला त्याच्या टणक स्नायूंशी... फुगीर उंचवट्यांशी... खोल खळग्यांशी! तिच्या उभार पुष्ट स्तनांची टचटचलेली टोकं टेंभुरणीच्या लाकडासारख्या त्याच्या भरदार छातीत घुसून दुखावली... कळवळली आणि चित्कारून उठली.

त्याच्या अख्ख्या शरीराला नदीचा गंध येत होता... आणि बेबी कोचम्माचं पित्त खळवळून टाकणारी 'ती' अस्पृश्य घाण!

उंचावलेल्या मानेनं अम्मूनं वेलुथाच्या गळयाशी विळखा घातला... त्याच्या मानेवर जीभ फिरवली. ओल्या खारट चवीची शिरशिरी उठून बेभान झालेल्या अम्मूनं त्याच्या कानाची पाळी ओठात घेऊन चोखली... त्याचं मस्तक जोरानं खाली ओढलं आणि ओठात ओठ गुंतवून दीर्घ चुंबन घेतलं.

तिचे ओठ आसुसले होते.

त्यांनाही कधीची तहान लागलेली होती.

त्यानं जोरानं तिला आवळलं आणि तिच्या थरारत्या ओठांवर ओठ टेकले.

आधी हलकेच. सावधपणे.

...पुढच्या क्षणी तोही बेभान झाला.

त्याचे आधाशी ओठ तिला चोखू लागले.

तोवर त्याच्या हातांमध्ये निखारे रसरसले होते. त्यानं हलकेच तिचं ढुंगण चाचपलं. इतकं हळू, अलवार... की त्याच्या तळहातावरची त्वचा जाणवत होती त्या स्पर्शातून... काहीशी खरखरीत, घट्टे पडलेली!

आतल्या उधाणाला रोखून धरत तो हलके-हलके तिला मिठीत घेत होता... आपल्या ओठांचा दंश टोचू नये, इतक्या नाजूकपणानं तिला चुंबत, चोखत होता.

त्या अनोख्या स्पर्शानं ती पिसासारखी हलकी झाली. आपलं शरीर विरघळत चाललं आहे, हे तिला जाणवत होतं. जिथे त्याचा स्पर्श होईल; तेवढीच फक्त शरीराची उरलीसुरली खूण; बाकी फक्त ढग... धूर.

त्याच्या शरीरातला लाव्हा हलकेहलके उफाळत होता. तिला कवेत घेत होता.

तिच्या उभार कुल्ल्यांवर उतरलेले त्याचे हात अचानक शिवशिवले... त्या हातांनी जोरात तिची कंबर आपल्या दिशेनं खेचली... आपटली... पुन्हापुन्हा... तिथल्या उष्ण आगीचे चटके क्षणात तिच्या मांडीत घुसले... तो तिला सांगत राहिला.

तू हवीयस मला. आत्ता हवीयस.

दोन बिलगलेल्या शरीरांचं नग्न नृत्य सुरू झालं... त्या उधाणल्या थरारामागे छुप्या दहशतीची भुतं नाचत होती. त्या भुतांना न जुमानता दोन तहानेल्या शरीरांनी एकमेकांना कवळत, चोखत, काही देत... काही घेत स्वत:ला झोकून दिलं. चित्कार आणि हुंकारांनी श्वास फुलले. येऊ घातलेल्या अफाट सुखाच्या जाणिवेनं नजरा जडावल्या.

या सुखाच्या हर-एक क्षणासाठी जन्मभराच्या दु:खाची किंमत चुकवावी लागणार, हे जणू ठाऊकच होतं दोघांना. सुखाच्या शोधात ते जितके पुढे जातील, तितकी वेदनांची फरफट जास्त.

...म्हणून क्षणभरच उधाण थांबलं.

हात आखडले.

शरीर आक्रसलं.

वाटलं, पुरे! थांबावं! हीच सीमा. पल्याड नको.

– पण त्या रोखल्या क्षणाच्या थंडगार स्पर्शानं निखारे अधिकच धगधगून उठले. एकमेकांना चाचपडणाऱ्या बोटांवरची दुराव्याची, अनोळखी आवरणं गळून पडली आणि तुफान उठलं, दडपून, कोंडून ठेवलेल्या भुका खवळल्या. उधाणलेली गात्रं न् गात्रं आक्रोश करू लागली.

नदी कधीची वाहात होती. सळसळत्या रेशमाचा प्रवाह धावावा तसा तिचा बहाव धाग्याधाग्यांनी पुढे सरकत होता. बांबूच्या बनातून अजूनही हुंदके ऐकू येत होते.

वाहत्या नदीच्या प्रवाहावर कोपर टेकवून विसावलेली रात्र नजर रोखून धपापत्या उरानं समोरच्या नग्न युगलाकडे पाहात होती.

ते दोघं एका आंब्याच्या झाडाखाली विसावले.

होड्यांची पानं, होड्यांची फुलं आणि फळं म्हणून अध्येमध्ये लटकलेल्या होड्याच होड्या असलेलं एक होडीचं झाड चालत्या-बोलत्या हलक्या-फिरत्या प्रजातंत्रानं तिथून नुकतंच उचकटून नेलं होतं.

एक गांधीलमाशी. जमिनीत रोवलेला लाल बावटा. कपाळावर झुलणाऱ्या केसांचा कोंबडा. 'लव्ह इन टोकियो' मधून उसळणारं कारंजं.

वर्षानुवर्षं अंधाराच्या पोटात गुडूप बसलेलं ते गर्द, घनदाट 'होडीचं जग' एकाएकी उघडंवाघडं पडलं आणि झाडाखालून निघूनही गेलं.

पांढऱ्या वाळवीचा बुजबुजाट.

जिकडे-तिकडे बिळं खोदून लपलेले पांढरट किडे. पांढरट काड्यांचं व्हायोलिन घेऊन ध्यानस्थ बसलेले पांढरे नाकतोडे.

...आणि त्या व्हायोलिनमधून पाझरणारं पांढरं, उदास, दुर्मुखलेलं संगीत.

...सगळं कधीचं निघून गेलं होतं.

झाडाखाली उरला होता लांबुडक्या होडीच्या आकाराचा स्वच्छ जमिनीचा तुकडा... साफसूफ केलेला... प्रणयासाठी सिद्ध असलेली भूमीच! जणू इस्थापन आणि राहेलनंच या प्रणयी युगुलासाठी सगळी सिद्धता करून ठेवली होती. दोघांचा संभोग घडावा म्हणून आंब्याचा झाडाखाली शय्या अंथरली होती. गर्भातच कळवळणारं, घुसमटणारं अम्मूचं स्वप्न जन्माला यावं म्हणून सुईणपण निभावलं होतं.

अंगावरचं वस्त्र न् वस्त्र उतरवून नग्न झालेली अम्मू निजलेल्या वेलुथावर हलकेच स्वार झाली. त्याचे उष्ण ओठ तिनं आपल्या ओठात घेतले. मांसल जिभेच्या स्पर्शानं वेडावलेल्या वेलुथानं अम्मूचे मोकळे केस तिच्या दोन्ही खांद्यावरून पुढे ओढले आणि एकमेकांना खोलखोल शोषून घेणाऱ्या दोन मस्तकांभोवती तंबूसारखे पसरले. बाहेरच्या जगाची नजर चुकवून आपल्याआपल्यात काही करायचं असलं म्हणजे तिची मुलंही अम्मूचे केस असेच स्वत:भोवती वेढून घेत.

त्याचे ओठ चोखत-चोखत तिचं नग्न शरीर त्याच्यावरून घसरत-घसरत थोडं खाली सरकलं. फुगवट्यांना कुस्करत, खड्डे-खळग्यांमध्ये रेंगाळत ती हलके हलके त्याच्याशी भिडत, हुंकारत राहिली. त्याची बाकदार मान... छातीवरची चिंचोक्यासारखी टचटचीत स्तनाग्रं... चॉकलेटच्या सपाट वड्यांसारखं पोट... बेंबीला ओठ लावून त्याच्या शरीरात उधाणलेल्या नदीचा अंश न् अंश तिनं पिऊन घेतला. आणखी थोडं खाली सरकत त्याच्या दोन मांड्यांमध्ये मान घुसळली... तिथल्या उष्ण फुगवट्यावर आपल्या जडावल्या पापण्यांनी नाजूक दंश केले... आणि हलकेच जीभ लावली.

तिला 'त्या उष्णते'ची चव चाखायची होती. त्याचं ताठरलेलं तुफान तिच्या ओठांमधून

आत घुसलं आणि आतल्या ओल्या उबदार जगात हलके-हलके फिरत राहिलं. ती त्याला चोखत होती.

क्षणात तो उसळून उठला. त्यानं तिला पुन्हा आपल्यावर ओढून घेतलं. तिच्या नग्न शरीराखाली दबलेलं तेल पाजल्या लाकडासारखं त्याचं पुष्ट टणक पोट आक्रसून आणखी घट्ट झालं. तिला पाझर फुटू लागले होते. आतून उमलणारा आपला ओलसरपणा त्याच्या शरीरावरून घरंगळतोय, हे जाणवून ती सुखावली. मंद हसली.

कधीच्या उफाळलेल्या जोडीतला एक रसाळ स्तन त्यानं पटकन ओठात पकडला... दुसऱ्या उपाशी स्तनाला कुरवाळत कुस्करत त्याचे तळहात तिची मांसल छाती चाचपत राहिले. खरखरीत सॅन्डपेपरच्या मुठीत मखमल मऊ चुरगळत होती.

त्याचे नवखे पवित्रे चाचपडू लागले. हव्याहव्याशा सुखाची वाट सापडेना... तिनं हलकेच त्याला रस्ता दाखवला. कुठून कसं आत रुजायचं ते मिटल्या डोळ्यांनी समजावता-समजावता त्याचं कोवळं उभार पौरुष तिच्याशी हिंदकळून गेलं... त्या कुंवार कोवळेपणानं सुखावून तिनं पापण्या उचलल्या; तर एक विलक्षण गुपित उलगडल्याच्या आनंदाश्चर्यानं त्याची नजर चमकत होती... ती प्रौढ समजदारीनं हसली आणि त्या नवख्या बच्चाला तिनं हृदयाशी घट्ट कवळून घेतलं.

त्याला वाट सापडली होती.

सुखाची मखमल ओलांडत-ओलांडत तो हलकेच तिच्यामध्ये शिरला आणि दहशतीची, थरारक आवरणं गळून पडली.

उरली, एकमेकांमध्ये गुंतलेली दोन नग्न शरीरं. ती हुंकारू, हिंदकळू लागली.

अपरिमित सुखाचा बिंदू गाठण्याच्या ऊर्मीचा थरार उसळला.

अख्ख्या जगण्याची किंमत न परवडणाऱ्या उंचीवर पोचली होती... तरी नंतर बेबी कोचम्मा म्हणालीच, त्यात काय?... छोटंसं तर मोल... चुकवावंच लागेल.

त्या क्षणाचं मोल.

खरंच छोटं, नगण्य होतं?

दोन आयुष्यं.

दोन मुलांचं बालपण.

...आणि भविष्यात वाकडी वाट धरण्याची हिंमत करणाऱ्यांना वचक बसवील असा सज्जड, ऐतिहासिक धडा.

नजरांमध्ये धुकं उतरलं होतं.

मंद चंद्रप्रकाशात उधाणलेल्या एका सुंदर स्त्रीनं आपलं उतटलेलं, उत्कट शरीर एका तेजस्वी पुरुषासमोर उघडं केलं.

पूर आलेल्या नदीचं उधाण भरलं होतं गात्रागात्रात आणि गर्भाखालची पोकळी फाकत विस्तारत, नदीच्या पात्रासारखी खोल-खोल धावत होती. तिच्या उधाणल्या नदीत त्यानं आपली होडी लोटली. त्याची टोकदार, टणक होडी खोल खोल शिरते आहे, हे तिला जाणवत होतं. त्याच्या त्या स्पर्शानं तिचं पात्र खवळून उठलं. आनंदानं वेड्यापिशा अवस्थेत नव्या दंशासाठी आक्रंदू लागलं. ती त्याला बोलावत होती... आत... आणखी आत... खोल... खोऽऽऽल... तिच्या हाकेला ओ देत तो झपाटल्यासारखा आत घुसत राहिला... अखेरीस त्याची हलती कंबर तिच्याशी पार भिडली... एकमेकांना टक्करलेल्या दोन शरीरांनी रस्ता रोखला... त्यानं पार तळ गाठला होता. तिच्या पात्रातल्या अखेरच्या बिंदूशी ओलिचिंब भेट होताच त्याच्या शरीरात वीज कडाडली आणि उसासत, सुस्कारत तो मोकळा झाला. तिच्या खोल गर्भात पाझरत, बरसत राहिला.

न पेलवणाऱ्या सुखाच्या गुंगीनं ती हलकेच त्याच्याशेजारी कलंडली. घामानं चिंब झालेली दोन धपापती शरीरं एकमेकांवरून घसरत, सरकत वेगळी झाली होती. काही क्षणात त्याच्या श्वासांचं तुफान सावरलं. त्याच्या नजरेतील चमक विझून तिथे सुखाचा संथ तवंग पसरलेला तिला दिसत होता. त्यानं हलकेच तिचे केस कुरवाळले. आपल्यामध्ये उधाणून उसवलेल्या तुफानाची गाठ अजून तिच्या शरीरातून थरथरत धावते आहे, हे त्याला जाणवलं होतं. त्यानं हलकेच तिची कूस परतवून तिला पाठीवर निजवलं. शेजारी पडलेला ओला फडका घेऊन तिच्या अंगावरची माती झटकली. सगळीकडे तरारलेला घाम स्वच्छ पुसून काढला... आणि आपल्या वजनानं तिचं शरीर दुखावणार नाही याची काळजी घेत; तो हलकेच तिच्यावर झोपला. जमिनीवर टेकलेल्या त्याच्या कोपरांखाली छोटे छोटे दगड दाबले गेले... तशी सुखाची एक नवीच कळ त्याच्या शरीरातून धावली. त्यानं तिच्या मिटल्या डोळ्यांवर ओठ टेकवले... तो हलके-हलके तिला चुंबत निघाला. कानाची पाळी... धपापून उभारलेली छाती... मऊ मांसल पोट... जुळ्यांना जन्माला घालताना तिच्या सुकुमार पोटावर उमटलेल्या सात चंदेरी रेघा... बेंबीपासून निघून मांडीमधल्या काळ्या त्रिकोणाकडे धावत निघालेला, कुठून कुठं गेलं म्हणजे तिला सुख होईल हे त्याला दाखवणारा धरधरीत बाण... त्याच्या ओठांना आता नव्यानव्या वाटा फुटत होत्या. उष्णओली जीभ नवे सुखबिंदू शोधत निघाल्ी होती.

तिच्या दोन्ही पायांच्या मधला मांसल सुखाचा स्वर्ग पुन्हा हुंकारू लागला. सुताराच्या रंध्यावर फिरणाऱ्या दोन हातांनी खाली घुसून तिचं ढुंगण वर उचललं आणि दोन गुलाबी पाकळ्या उकलून एक अस्पृश्य जीभ तिच्या आत शिरली. आतले सुखाचे झरे पिऊन घेत ती जीभ तिला आतून कुरवाळत, कुस्करत होती.

तिचं शरीर पुन्हा उधाणून उठलं. ती वेड्यासारखी धुंदावून एका नव्याच सुखाला बिलगली. वेडावल्या शरीरातला कण न् कण नाचत सुटला. होडीच्या आकाराच्या त्या

जमिनीच्या तुकड्यावर तिच्यासाठी स्वर्ग उतरला होता. त्यातल्या सुखाचा हर-एक क्षण तिनं रसरसून भोगला... जगून घेतला.

काही वेळाने तो उठला. आंब्याच्या झाडाला टेकून बसत त्यानं तिला कुशीत घेतलं. सुखाच्या थकव्यानं ती रडत होती... आणि हसतही होती. आपल्याला नक्की काय होतंय ते न समजून आपली पाठ त्याच्या छातीवर झोकून देत ती तशीच त्याच्या कुशीत झोपून राहिली. जेमतेम पाच मिनिटं... पण तेवढ्या काळाचा तुकडाही कल्पान्ताइतका दीर्घ वाटत होता. गेल्या सात वर्षांतल्या ताणतणावांचं बोचकं सुटलं. त्यातल्या सगळ्या कडवट आठवणी पंख लावून मध्यरात्रीच्या अंधारात भुर्रकन् उडून गेल्या. आणि अम्मूच्या नजरेसमोर (मृत्यूच्या दिशेनं धावणारं) छोटंसं, चमकदार कुरण उभं राहिलं. चंदेरी, चमचमते गवताचे शेंडे आणि त्यांच्याभोवती भिरभिरणारी निळी निळी फुलपाखरं... त्या कुरणाच्या पलीकडं खोल विवर... घास घ्यायला टपलेली काळीकुट्ट गहन दरी!

...सावरलेल्या श्वासांनी त्याला भानावर आणलं. सुखाच्या उन्मादात गळून पडलेली दहशत पुन्हा चोहोबाजूंनी घेरून येत होती... काय केलं हे आपण? काय घडलं आपल्या हातून?... हे असंच घडेल, पुन्हा पुन्हा घडत राहील... मग पुढे?

त्यांच्या हृदयाचा थरकाप जाणवून ती जागी झाली. तिच्या नग्न शरीराला बिलगलेल्या त्याच्या छातीमधून दहशतीच्या कळा उसळू लागल्या होत्या. धपापणाऱ्या फासळ्यांमधून वाट शोधत बाहेर फुटू पाहात होत्या. त्याचे दोन्ही बाहू अजूनही तिच्याभोवती वेढलेले... त्यामध्ये गुरफटलेली ती त्याच्या हातातल्या नेच्याच्या छोट्या डहाळीचा खेळ बघत होती. त्याच्या हृदयाच्या वाढलेल्या गतीबरोबर बोटांमध्ये भिरभिरत फिरणारं नेचाचं पान तिला पुष्कळ काही सांगत होतं.

त्या काळ्याकुट्ट अंधारात अम्मू स्वत:शीच हसली. हेच ते हात. गोळीबंद स्नायूंनी टरारलेले... किती विश्वासानं आपण विसावलो त्यांच्या कुशीत! आणि आयुष्यातल्या सगळ्यात धोक्याच्या वळणावर उभं असतानाही किती सुरक्षित वाटतंय या हातांच्या मुक्त, मदहोश मिठीत!

तिच्या नजरेतल्या धुंदीनं वेडावून जात त्यानं आपल्या मनातला सगळा थरार निपटून काढून तळहातावर धरला. कापरं भरवणाऱ्या दहशतीचं ते फूल अम्मूनं पटकन उचललं आणि हात उंचावून आपल्या केसात माळलं.

ती नकळत त्याच्याजवळ सरकली. तिला त्याचा स्पर्श हवा होता... तो हवा होता... आणखी... खूप... संपूर्ण हवा होता. त्यानं आसुसून तिला जवळ ओढलं. कुठूनतरी गार वाऱ्याची झुळूक आली. त्या वाऱ्यानं नदीचं उधाण उचलून नेलं... आणि एकमेकांना बिलगलेली दोन उष्ण धपापती शरीरं हलके हलके, शांत निद्रिस्त झाली.

काहीशी गार, काहीशी ओलावलेली स्तब्ध हवा... आणि नीरव शांतता.

...बाकी सांगण्यासारखं काय होतं उरलं?

तासाभरानं अम्मूला जाग आली.

वेलुथाच्या मिठीतून स्वत:ला सोडवून घेईतो रात्र सरून गेली होती.

'निघते मी. जायला हवं...'

तो काहीच बोलला नाही. जागचा हलला नाही. हलकेहलके कपड्यांमध्ये अदृश्य होत जाणाऱ्या तिच्या शरीराकडे पाहात स्वस्थ बसून राहिला.

आता फक्त एकच गोष्ट महत्त्वाची होती.

एकमेकांना काय विचारायचं ते दोघांनाही ठाऊक होतं

एकच गोष्ट.

त्याखेरीज दुसरं काय विचारणार?... आणि सांगणार?

...आता दोघांमधले सगळे अडसर, अडथळे सरून फक्त एकच प्रश्न उरला होता.

त्यानंतरच्या तेरा रात्री अशाच छोट्या-छोट्या आनंदाची तोरणं लावून बहरल्या... स्मॉल थिंग्ज! मोठे आनंद मनात तसेच रेंगाळत राहून गेले. आपल्या पायाखालची काटेरी वाट पायाखालीच संपून गेली आहे, हे दोघांनाही जाणवत होतं... गोठलेल्या दिशा आणि रिकामा पदर. आता काहीच शिल्लक उरलं नव्हतं दोघांकडे. वर्तमान थिजलेला आणि भविष्याचा तर काही थांगपत्ता नाही, अशी अधुरी अवस्था म्हणून मग मोठ्या आनंदाची – बिग थिंग्ज – स्वप्नं सुटत गेली हातातून आणि छोटी-छोटी सुखं – स्मॉल थिंग्ज – वेचण्याची, साठवण्याची धडपड सुरू झाली.

एकमेकांच्या ढुंगणाला मुंग्या चावल्या; तरी दोघांना हसू फुटू लागलं. आजूबाजूला बघत ते मनसोक्त हसत राहिले. हसता-हसता खूप काही दिसू लागलं. पानांच्या कडेकडेनं सरपटत चालणारे केसाळ सुरवंट... स्वत:चं शरीरही सरळ न करू शकणारे वाकड्या वेटोळ्यांचे किडे... नदीच्या प्रवाहात पोहणाऱ्या वेलुथाला गाठून त्याच्या उघड्या पावलाभोवती हुळहुळणारी छोट्या माशांची एक जोडी... ध्यान लावून बसलेले हिरवे किडे... गांधीलमाशीच्या तुटक्या चंदेरी पंखाचा छद्मी वेष पांघरून हिस्टरी हाऊसच्या व्हारांड्यात भिंतीमधल्या फटीत राहणारा कोळी... स्वत:भोवती त्यानं विणलेल्या जाळ्यात अख्ख्या विश्वाचा पसारा होता. धुळीचे कण, वाळक्या पानांचा चुरा. एका मेलेल्या मधमाशीच्या छातीचा रिकामा पिंजरा. एवढं सगळं स्वत:भोवती गुरफटून बसलेल्या त्या कोळ्याला वेलुथानं नाव ठेवलं – चप्पू थम्बूरन – मूर्खाधिराज.

एका रात्री त्या दोघांनी मिळून चप्पू थम्बूरनला आणखी एक घोळदार अंगरखा देऊ केला – लसणीच्या पाकळीची पातळ कुरकरीत साल. त्या नकोशा आहेराला वैतागलेला चप्पू थम्बूरन स्वत:भोवतीची सगळी आवरणं झटकून नागड्या उघड्या अवस्थेत तुरतुरत

बाहेर आला आणि लसणीच्या सालीचा नवाकोरा अंगरखा त्यानं संतापून फेकून दिला. त्या दोघांची कपड्यांची 'निवड' त्याला मुळीच आवडली नव्हती. नंतरचे काही दिवस तो आत्महत्या करायला निघाल्यासारखा तसाच उघडावाघडा, शेंबडाच्या दुधाळ चिकट थेंबासारखा उभा होता. त्यानं स्वत:साठी उभं केलेलं केरकचऱ्याचं गोल जाळं जुन्यापान्या पृथ्वीच्या पोकळ नकाशासारखं लटकत राहिलं. जणू जुनाट, निरुपयोगी तत्त्वज्ञानाचा गुंता. मग ते मोडून पडलं. असेच कधीतरी चप्पू थम्बूरन स्वत:साठी नवेकोरे कपडे शिवले.

कुणी कुणाला सांगितलं नाही, पण नकळत त्या दोघांनी आपलं भवितव्य आणि प्राक्तन चप्पू थम्बूरनच्या भवितव्याशी जोडून टाकलं होतं (आपलं प्रेम, वेडेपणा, आशाआकांक्षा, आपला अपरिमित... असीम आनंद सगळंच). प्रत्येक रात्री ते दोघे उत्सुकतेनं चप्पू थम्बूरनला पाहात... तो आहे ना? जगलाय ना? रात्रीमागून रात्री जाऊ लागल्या, तशी त्यांची अस्वस्थता वाढू लागली. जाळयात अडकलेल्या चप्पू थम्बूरनच्या नाजूकपणाची चीड येऊ लागली. त्याचं छोटंसं नगण्य अस्तित्व... स्वत:ला हलके-हलके मारत संपवत उद्ध्वस्त करत नेणारा त्याचा ताठा... आपल्याला जे हवं, तेच आणि तेवढंच निवडून घेण्याचा त्याचा चोखंदळपणा हळूहळू दोघांना आवडू लागला. हलके-हलके जडपणानं सरकत चालण्यातली डौलदार प्रतिष्ठा भुरळ घालू लागली.

आपल्यामधली नैतिक दुर्बलता मान्य करून त्यावर भरोसा ठेवल्याखेरीज गत्यंतर नाही, हे दोघांनाही आतून जाणवलं होतं, म्हणून तर अशा दुर्बल अवस्थेतही चिवटपणानं जगण्याला चिकटून राहिलेला चप्पू थम्बूरन आपलासा, हवासा वाटत होता. स्वत:भोवती आपल्या छोट्याशा विश्वाचं जाळं विणून ती दोघं त्याच्यासारखंच जगायला शिकली. छोटे-छोटे आनंद शोधत राहिली. निरोपाची वेळ आली, तरी एकच छोटंसं वचन...

'उद्या?'

'उद्या?'

– एका दिवसात काहीच्या काही होऊ शकतं, हे दोघांनाही मनोमन ठाऊक होतं.

– आणि ते खरंच होतं.

चप्पू थम्बूरनच्या बाबतीतले त्यांचे आडाखे मात्र खोटे ठरले. वेलुथानंतरही तो चिवटपणे जिवंत राहिला. माद्यांशी संभोग करून त्यानं नवीन पिढ्या जन्माला घातल्या.

त्याची वेळ आली, तेव्हा नैसर्गिक कारणानं नैसर्गिकरित्या मेला.

सोफी मॉल आली, त्या रात्री उघड्या शरीरावर वस्त्रं चढवणाऱ्या आपल्या तृप्त प्रेयसीकडे वेलुथा तृप्त अनिमिष नजरेनं पाहात होता.

कपडे घालून झाल्यावर ती वेलुथाच्या समोर उकिडवी बसली आणि जाता जाता तिने त्याला हलकेच स्पर्श केला... नाजूक नखांची नक्षी उमटली, काळ्याभोर फळ्यावर पांढऱ्या खडूनं रेघ ओढावी तशी... भाताच्या सळसळत्या शेतात हलकेच एक झुळूक भरारून जावी तशी... चर्चच्या डोक्यावरच्या निळ्या आकाशात जेट विमानाच्या शेपट्यांनी सुळकांडी मारावी तशी...

त्यानं हलकेच तिचा हसराचेहरा ओंजळीत घेऊन आपल्याजवळ ओढला... डोळे मिटून तिच्या गव्हाळ त्वचेचा गंध भरभरून लुटला. सगळे शब्द संपून गेले होते. अम्मू मंद हसली.

येस मार्गरिट, वी डु इट टु इच अदर टू!

– तिच्या मनात आलं.

त्याच्या मिटल्या डोळ्यांचं चुंबन घेऊन ती उठली. आंब्याच्या झाडाला टेकलेला वेलुथा तिला दूर जाताना पाहात राहिला.

तिच्या मोकळ्या केसात सुकल्या गुलाबाचं फूल माळलं होतं.

जाता-जाता ती पटकन मागे वळली.

वेलुथाकडे पाहत विश्वासानं म्हणाली,

'नल्ले'

– उद्या.

मराठी अनुवादाच्या क्षेत्रातले आघाडीचे नाव!

अरुंधती रॉय यांच्या 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या कादंबरीच्या मराठी अनुवादासाठी 'साहित्य अकादमी'च्या पुरस्काराने सन्मानित.

शोभा डे या ख्यातनाम लेखिकेला तिच्या 'मराठी मुळांशी' उत्कटतेने जोडण्याचे श्रेय. शोभा डे यांच्या 'सिलेक्टिव्ह मेमरी', 'स्पीड पोस्ट' आणि 'स्पाऊज्' या पुस्तकांचे मराठी अनुवाद विशेष लोकप्रिय.

युद्धग्रस्त अफगाणिस्तानातले उद्ध्वस्त बालपण नशिबी आलेल्या मुलांची फरफट शब्दबद्ध करणाऱ्या 'ब्रेडविनर', 'परवाना', 'शौझिया' (डेबोरा एलिस) या तीन पुस्तकांचा अनुवाद प्रसिद्ध.

'फॉर हिअर, ऑर टू गो?' हे पहिले स्वतंत्र पुस्तक. उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या 'सिअॅटल' येथील अधिवेशनात प्रसिद्ध. ६०-७० वर्षांपूर्वी महासागर ओलांडून उत्तर अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या मराठी माणसांच्या 'पाऊलखुणा' शोधणाऱ्या, परभूमीवरचा त्यांचा संघर्ष-कष्ट-झळाळते यश आणि एकाकी अपयश शब्दबद्ध करणाऱ्या या संशोधनाला उदंड लोकप्रियता. गेल्या तीन वर्षांत सहा आवृत्त्या प्रसिद्ध!

संशोधन, लेखन आणि जाहीर कार्यक्रमांच्या निमित्ताने उत्तर अमेरिकेत विपुल प्रवास व वास्तव्य.

पेशाने पत्रकार. सुमारे २० वर्षे पत्रकारितेत सक्रिय. लोकमत वृत्तपत्रसमूहात 'फीचर्स एडिटर' म्हणून कार्यरत.

अपर्णा वेलणकर

पृथ्वीच्या गर्भातून उमटणारे साद-प्रतिसाद, ध्वनी-प्रतिध्वनी, अश्रू आणि हुंदके हे 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' चे प्राणतत्त्व ! मानवी अस्तित्वाला घेरून असणारी आदिम भीती आणि नियतीच्या पाशामधली अपरिहार्यता यांचे वेडे उलगडून पाहणाऱ्या या अद्वितीय लेखनाला अदृश्य मानसिक ताणाचे अस्तर आहे. अपरिमित प्रेम, द्वेष, मत्सर, विश्वासघात, तीव्र तिरस्कार, अपराधीपणाचा डंख अशा अनेक भावभावनांचे पदर कोळ्यांच्या जाळ्यासारखे धावत राहतात... विणले जातात... त्या जाळ्यांच्या वेढ्यांमधून सुटता येत नाही. स्वत:ला अलग करता येत नाही. लोणच्यामध्ये खारवलेल्या आंब्यांचा, जॅममधल्या पिकल्या केळ्यांचा वास येत राहातो. मामाच्या गाडीत बसून एका अपरिहार्य शोकांतिकेकडे प्रवास करणाऱ्या मुलांची गाणी ऐकू येतात.

कथानकाच्या शब्दाशब्दातून ठिबकणारा शोक, गूढ रहस्य आणि काळीज हलवून टाकणारी खिन्नता हे सारेच एक अजब चेटूक आहे.

जाणिवांना संमोहन घालणारा प्रारंभ वाचतानाच लक्षात येते, की नवीन काहीतरी सांगणाऱ्या एका ताज्यातवान्या प्रतिभेने आपल्या मनाची पकड घेतली आहे.. श्वास रोखून धरायला लावणारा नवा स्वर!

यानंतर अशी कथा जणू पुन्हा सांगितलीच जाणार नाही. हीच पहिली... आणि एकमेव !

(आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेच्या 'बुकर पुरस्कार' विजेत्या 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'ला मिळालेल्या जागतिक अभिप्रायांमधून)

मेहता पब्लिशिंग हाऊस
www.mehtapublishinghouse.com
मराठीचा कारभार